म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 23६० 
REFBK-0022452
REFBK-0022452

२२४५२
२४११७८
२१ मे
०११०५२३६०
ओर

मुंबई इलाखा,
...रे, पुराणिक आणि मंडळी
...मार्ग, मुंबई नं.

कै. अनंत ना. परांजपे
...
कुटुंबीयांकडून भेट

श्रीः

कविवर्य

## मोरोपंतांचे समग्र ग्रंथ.

५

# मंत्रभागवत.

(ह्यांत च मंत्रमयभागवताचा समावेश केला आहे)

२३६०
२२४५२

संपादक व प्रकाशक

**रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर.**

मुद्रक

अच्युत चिंतामण भट.

'यशवंत'

छापखाना पुणें.

सन १९१४

REFBK-0022452

हें पुस्तक रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर यानीं पुणें येथें अच्युत चिंतामण भट
ह्यांच्या ‘ **यशवंत** ’ छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

# उपोद्धात.

[ लेखकः—दत्तो वामन पोतदार, बी. ए. ]

**अघ शमतें, सुख गमतें, मन रमतें जेंवि दिव्यसंगीतीं.**

—मोरोपंत.

आर्यसंस्कृतीच्या दृढपरिणामकारक ग्रंथांमध्यें श्रीरामायणभारत या जोडीबरोबर च श्रीमद्भागवताची हि गणना सर्वानुमतें करण्यांत येते.

१. श्रीभागवत-माहात्म्य. वर्तमानकालीन आर्यमनाचें पृथक्करण केलें असतां त्यावर या ग्रंथत्रयीचा संस्कार किती प्रबळ झाला आहे तें तेव्हां च दिसून येईल. वेद व वेदांगें यांचा साक्षात्परिचय व प्रत्यक्ष संबंध कमी होत होत भारतभागवतादिक पुराणेतिहासग्रंथांनीं हळूहळू जनतेचें मन काबीज केलें.

२. या तिन्ही ग्रंथांत हि कालानुक्रमानें श्रीमद्भागवत हें अर्वाचीन आहे. आज कैक शतकें त्याचीं पारायणें या देशांत चालू आहेत. त्यांत वर्णिलेल्या कृष्णचरित्रानें आसेतुहिमाचल अनेक भाविक जन आकर्षितान्तःकरण होत्साते त्याचे श्रवणमननांत गर्क होऊन गेलेले दिसतात व तें अनेकवार वाचून हि 'वयं तु न वितृप्याम स्वादु स्वादु पदे पदे' असा प्रेमोद्गार मिटक्या मारित काढितात. 'हरिलीलें'त भागवताचें महत्त्व असें वर्णिलें आहेः—

**वेदः पुराणं काव्यं च प्रभुर्मित्रं प्रियेव च ।**
**बोधयंतीति ह प्राहुस्त्रिवद्भागवतं पुनः ॥ १० ॥**

३. भक्तांचें निशाण फडकाविणाऱ्या महाराष्ट्रीय साधुसंतांच्या सर्व इमारतींचा हा ग्रंथ तर पाया च होय. यांतल्या प्रेमकथा वाचून ते

प्रेमसागरांत यथेच्छ डुबतात व त्यांच्या भक्तिभावाला भरती येते. ह्या ग्रंथाच्या श्रवणानें "झालां कृतार्थ जन्मुनि; उरलें कर्तव्य काय हो! आतां?" (द. स्कं. ६०३) या उद्धवोक्तीप्रमाणें आपल्या जन्माचें साफल्य झालें, अशी कोट्यवधि हिंदुधर्मीयांची परम श्रद्धा आहे.

४. या ग्रंथाचे बारा स्कंध असून अध्यायसंख्या ३३२ आहे. ग्रंथ सुमारें १८००० अठरा हजार आहे. वेदान्तविषय आला तेथें ग्रंथाला काठिण्य आलें आहे. सर्व च ग्रंथ जरी लोकप्रिय आहे तरी त्यांतल्या त्यांत दशम व एकादश ह्या स्कंधांची मान्यता अधिक आहे. दशमांत रसाळ कृष्णकथा असून एकादशांत भक्तियोगाचें सरहस्य व सांगोपांग विवेचन आहे.

साहजिक च आहे कीं, अशा ग्रंथांतील भक्तिप्रेमामृत सर्वत्रांस चाखविण्याची इच्छा अनेक महाराष्ट्रीय संतकवींस झाली व तदनुसार त्यांनीं आपल्या प्रासादिक वाणीचा व्यय केला.

**५. भागवताचे मराठी अवतार.**

महाराष्ट्रांत मोरोपंतांच्या पूर्वीं होऊन गेलेल्या कवींपैकीं बहिरा पिसा–जातवेद, शिवकल्याण, एकनाथ, कृष्णदयार्णव, विष्णुदासनामा, माधवसुत, श्रीधर, जयरामस्वामी, ज्योतीपंतदादा इत्यादि मराठी कवींनीं मराठींत भागवताची रचना केलेली आहे. यांपैकीं बहुतेकांनीं दशमाचें च गायन केलेलें आहे. पैकीं कृष्णदयार्णवांची हरिवरदा, शिवकल्याणांची रासपंचाध्यायी व एकादशावरील एकाकारटीका वगैरे कित्येक छापून प्रसिद्ध झाल्या आहेत. ज्ञानेश्वरकालीन बहिरा पिसा याची दशमावरील गोड टीका माझ्या संग्रहीं आहे. नाथांची दशमावरील टीका नुकती च उपलब्ध झाली आहे. बाकीच्या बहुतेक श्रुतमात्र च आहेत. ज्योतीपंतदादा यांनीं मात्र सबंध भागवतावर आणि ती हि एक अभंगबद्ध व दुसरी ओवीबद्ध अशी रचना केलेली आहे. दादा हे पंतांचे समकालीन होते. ( भा. इ. सं. मं. चा अहवाल शके १८३४ ).

६. या सर्व अवतारांची परस्परांशीं तुलना करणें अगत्याचें असून पुष्कळ फलदायक होईल. विशेषतः ज्योतीपंतदादा पंतांचे समकालीन असल्यानें अशी तुलना अवश्यमेव व्हावयास पाहिजे. परंतु योग्य साधनांचे अभावीं तूर्त तें शक्य नाहीं. तथापि पुढें मागें केव्हां तरी या सर्व अवतारांची परीक्षा करणें जरूर आहे व त्या वेळीं मोरोपंतांच्या मंत्रभागवताचा हि विचार परीक्षकांस करावा लागेल.

या सर्व संतकवींचा उद्देश भक्तिसुख लुटविण्याचा च मुख्यत्वेंकरून होता. 'श्रीकांतसद्यशोगान' करावें व आपण उद्धरून लोकाना हि उद्धरावें,

७. पंतांचा भागवत-रचनेचा हेतु.

या हेतूनें तें आपापलीं काव्यें निर्माण करिते झाले. 'पंढरीच्या मोठ्या भुतानें' मोरोपंताना हि झपाटलें होतें! आपल्या ऐन उमेदींत जेव्हां त्यानीं सरस्वतीचा वीणा झाडण्यास सुरुवात केली तेव्हां च जाहीर केलें कीं,

**हरिपादयुगस्मरणप्रवणें। भगवज्जनदिव्यकथाश्रवणें।**
**चतुरें रसिकें समय क्रमणें। सुख अन्य नसे चि भवभ्रमणें॥**

अखेरपर्यंत 'प्रेमें गायिन युष्मदद्भुतयशें, नाचेन युष्मज्जनीं' ही च त्यांची महत्त्वाकांक्षा होती; कारण,

**अमृताची एक चि, हरिचरिताच्या पाहतां अपार चवी,** १०।७७९

असा त्यांचा प्रत्यय होता. श्रीमद्भागवतानें हि त्याना हें च शिकविलें होतें. पहाः—

**मृषा गिरस्ता ह्यसतीरसत्कथा न कथ्यते यद्भगवानधोक्षजः।**
**तदेव सत्यं तदु हैव मंगलं तदेव पुण्यं भगवद्गुणोदयम्॥**

४८ द्वा. स्कं.

अन्य प्रकारानीं वाणीचा व्यय करणें त्यांस कधीं हि रुचलें नसतें. ते स्पष्ट च लिहितातः—

**सुयश न जयांत हरिचें चित्र हि गुणभवन कवन तें अशुची;**
**त्यांत सुमति नर न रमति पळ ही, बहु मानिती तया पशु चि. ११८**

८. पंत पुराणिक होते. नित्य रामायण–भारत–भागवत ह्या ग्रंथांचा व्यासंग त्याना करणें पडे. आधीं च त्यांचें मन भाविक आणि प्रेमळ; तशांत व्यवसाय हि आवडीचा मिळाला. मग काय विचारावें ? दुधांत साखर पडली ! पंतांच्या ग्रंथांवरून असें स्पष्ट लिहिण्यास हरकत नाहीं कीं, या ग्रंथांतील कथोपकथा त्यांच्यापुढें हात जोडून सदैव उभ्या असत. भक्तिप्रेमानें आंतून रंगून गेलेलें पंतांचें चित्त अहोरात्र तन्मय झालेलें दिसतें. अशा स्थितींत,

**कीं मागें गुप्त उभा अससि प्रेमें उभारुनी बाहे,**
**तरि काय बाळकाचे तूं सादर बोल ऐकसी बा ! हे ?**

असा विश्वासमूलक संशय त्याना वाटे. किंबहुना, आपल्याला निमित्तमात्र करून तो 'बोलविता धणी' च ही सर्व लीला कौतुकानें घडवीत आहे, असें हि त्यांस वाटल्यावांचून राहिलें नाहीं. मंत्रभागवतांत हि त्यांची ही विश्वासवृत्ति पुढील सुंदर आर्यारूपानें प्रकट झाली आहे:–

**यश अत्यद्भुत अमित प्रकटी सज्जनसुखार्थ सकलेश;**
**वदला तो चि मयूरा, 'तूं ही हें गावयासि सक लेश.'**

९. पंतांचा भाविक हेतु प्रकारांतरानें हि व्यक्त होत आहे. 'नमो भगवते वासुदेवाय' या जपी लोकांच्या प्रिय एकादशाक्षरी मंत्राचें बंधन आपणाला घालून घेण्यांत पंतांचा दुसरा काय हेतु असेल ? मंत्रभागवतांतील व विशेषत: पुढें सिद्ध केल्याप्रमाणें आधीं रचलेल्या दशमस्कंधांतील अस्खलित वाक्प्रवाह पाहिला म्हणजे पंत चित्रकाव्य करण्यास बसले आहेत अशी शंका सुद्धां मनास शिवत नाहीं. या काव्यप्रवाहाचा लोंढा त्यांच्या अंत:करणांतून इतक्या वेगानें बाहेर पडत होता कीं, भाविकपणानें पुण्यप्राप्तीकरतां स्वीकारलेल्या मंत्रवर्णांचें

लोढणें केवळ 'पदरीं पडलें आणि पवित्र झालें' असें च पंताना वाटत असल्याचें त्यांच्या पुढील उद्गारावरून दिसतें:—

**परि मंत्रवर्ण अडविति; आदरिले गुरु कसे न मानावे?** ५।६२

१०. पंतांच्या काव्यांत अनेक कौटुम्बिक व व्यावहारिक नीतितत्त्वें खेंचून भरलेलीं आढळतात व त्यावरून तत्तत्तत्त्वप्रतिपादनार्थ ते काव्य करण्यास प्रवृत्त झाले असावे असा कित्येक वेळां समज होतो. परंतु वस्तुस्थिति तशी दिसत नाहीं. त्यांची यमकाधीनता च यास पुष्कळ अंशीं कारणीभूत आहे. एवढें मात्र खरें कीं, पंत केवळ भाबडे भाविक नसून त्यानीं च सुचविल्याप्रमाणें 'चतुर' व 'रसिक' आहेत; व भारत-रामायणांसारखे नीतितत्त्वानीं गजबजून गेलेले ग्रंथ त्यानीं हातीं घेतले असल्यामुळें त्या तत्त्वांची छाया हि त्यांच्या काव्यांतून उत्कटत्वानें प्रतिबिंबित झाली आहे. परंतु 'उपदेशयुजे'पेक्षां 'शिवेतरक्षतये' करतां च ते प्रामुख्यानें उद्युक्त झाले आहेत. शिरोभागीं उद्धृत केलेल्या गीत्यर्धांत हि अघशमनाला च प्रथम स्थान देण्यांत आलेलें आहे, हे चाणाक्ष वाचकांच्या लक्ष्यांत आलें च असेल.

११. कृष्णविजय तर पंतानीं आधीं च गायला होता; मग पुनः 'भागवतमंत्रमुक्तामणिमाला' (हें पंतकृत मंत्रभागवतांतील पूर्वीं च रचलेल्या दशमस्कंधाचें नांव; पुढें पहा.) रचण्याचें कारण काय? 'श्रीरामायण गायिलें तरि पुन्हां गावें चि ऐसें करी' या पंतोक्तीवरून भगवत्कथा पुनःपुनः गाण्याचा मोरोपंताना ह्व्यास होता हें खरें आहे. तथापि मंत्रांचें कवच कशाला? केवळ चित्रकवनार्थ तर नव्हे च. अर्थात् आपल्या भक्तिसुखार्थ च. हरिवंशांत कृष्णचरित्र च आहे; मग तो कां रचला? तर यजमानसुखार्थ त्यांच्या च आज्ञेवरून, हें पंतानीं स्वतः च सांगितलें आहे. शिवाय 'भागवतमंत्रमुक्तामणिमाला' हीं 'ऐसे साष्टशताच्छ-मंत्रमणि हे, यांची असी वोविली.' ही १०८ मंत्रसंख्या हि पंतांचा भाविक-

यणाचा हेतु उघड करीत आहे. मंत्ररामायणांत खुद्द पंतानीं मंत्रांचें महत्त्व वर्णिताना लिहिलें आहे कीं,

**नृपमुद्रांकित पत्र प्रजेसि होतें जसें शिरोधार्य,**
**प्रभुचरित मंत्रचिह्नित, यास्तव धरितील मस्तकीं आर्य.**

१२. पंत हे 'आपुलिया सुखस्वार्थी । केली च करावी हरिकथा' या पंथाचे होते, हें प्रस्तुत ग्रंथाच्या अंतःस्वरूपावरून हि सिद्ध होतें. तत्त्वज्ञान आलें, वेदान्तविवरण आलें कीं पंतानीं हात आखडला च म्हणून समजावें. कथाभाग आला कीं पंतांची गाडी घांटांतून बाहेर पडल्याप्रमाणें चालू व्हावयाची ! असो.

१३. मंत्रभागवताचा काल.

आर्याभारतरचनेचें प्रचंड कार्य समाप्त झाल्यावर पंत पुन्हां कृष्णचरित्राकडे वळले. 'पुन्हां' म्हणण्याचें कारण असें कीं, त्यानीं कृष्णविजय भारतापूर्वीं च सिद्धीस नेला होता. भारत उरकल्यावर रामकृष्णांच्या कथा च पुनःपुनः गाण्यांत पंत गढून गेले यांत मोठेसें आश्चर्य नाहीं. मंत्रभागवतरचनेचा नक्की काल ठरविण्यास असावें तसें साधन नाहीं. तथापि, पंतकाव्यांचे प्रस्तुतचे पंतवंशीय, रसिक व बुद्धिमान संपादक व माझे मित्र रा. रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर यानीं याविषयीं एक निबंध नुकता च भारत-इतिहास-संशोधक मंडळापुढें वाचून 'केसरी'-द्वारा चर्चार्थ प्रसिद्ध केला. त्यांत त्यानीं जी सिद्धि केली आहे ती सर्वसंमत होण्यासारखी असल्यामुळें त्यांचा निबंध च येथें समग्र उतरून घेणें प्रशस्त आहे.

[पंतानीं आपल्या आवडत्या आर्यावृत्तांत ज्याप्रमाणें व्यासांच्या भारताचें रूपांतर केलें आहे तसें च भागवताचें हि केलें आहे. परंतु, ह्या दोन ग्रंथांच्या रचनेच्या पद्धतींत मात्र फरक दिसून येतो. म्हणजे व्यासभारताचें

मराठी आर्याबद्ध रूपांतर करण्याचा हेतु मनांत धरून आर्याभारताची रचना जशी क्रमानें केलेली दिसते, तशी मंत्रभागवताची दिसत नाहीं.

पंतानीं मंत्रभागवताची रचना आरंभापासून हेतुपूर्वक केलेली नसून, प्रथम भागवतांतील दशम स्कंधावर च मंत्रबद्ध आर्या रचिल्या व तेवढ्या प्रकरणाला "श्रीभागवतमंत्रमुक्तामणिमाला" असें स्वतंत्र नांव हि दिलें व शेवटीं

**'ऐसे साष्टशताच्छमंत्रमणि हे यांची असी वोविली'**

अशा रीतीनें ह्या भागवतमंत्रमुक्तामणिमालेची मंत्रसंख्या हि निश्चित केली. परंतु भारताप्रमाणें आपल्या हातून साग्र भागवतरचना हि व्हावी असा कांहीं मित्रांचा आग्रह पडल्यामुळें त्यांनीं भागवतरचनेचें काम हातीं घेतलें व पूर्वीं निराळ्या नांवानें रचलेल्या दशम स्कंधाला च १ ते ९ व ११ ते १२ ह्या स्कंधांची मागून पुढून जोड देऊन मंत्रभागवत तयार केलें.

आतां असें मानण्याला मूळ पोथी, कविकालीन पत्रव्यवहार किंब-हुना मंत्रभागवत च ह्यांमध्यें काय काय प्रमाणें आढळतात ह्यांचा क्रमानें विचार करूं.

पहिलें प्रमाण पोथी. सर्व मंत्रभागवताची पोथी पाहिली असतां दशम स्कंधाचें भिन्नत्व अनायासें लक्ष्यांत येतें; व तेवढ्या च पोथीचा अधिक जुनेपणा हि मनाला निर्विवाद पटतो. ह्याशिवाय एखाद्या स्वतंत्र ग्रंथाला जोडावा त्याप्रमाणें दशम स्कंधाला उपोद्घात व उपसंहार जोडला आहे. उपोद्घात नमनात्मक असून बारा आर्यांचा आहे, व त्यांमध्यें आद्या-क्षरानीं 'श्रीमानुरुगायो मुकुंदो जयति' असें वाक्य साधलें आहे. दशम स्कंधाची रचना क्रमप्राप्त झाली असती तर मधल्या च स्कंधाला तेवढा उपोद्घात व उपसंहार जोडण्याचें सयुक्तिक कारण दिसत नाहीं. काव्य-संग्रहकारानीं दशम स्कंधाच्या अखेरचे श्लोक छापले आहेत. पण, आरं-भींच्या बारा आर्यांचें यथार्थत्व त्याना न कळल्यामुळें, तो कोठला तरी

निराळा किंवा प्रक्षिप्त भाग आहे असें मानून त्यांनीं त्या आपल्या प्रतींतून वगळल्या आहेत; पण अर्थात च ती चूक आहे.

तसें च प्रत्येक पृष्ठावर डाव्या अंगच्या समासांत जे मंत्रांक लिहिले आहेत ते हि भागवतमंत्रमुक्तामणिमालेचें स्वातंत्र्य सिद्ध करीत आहेत. दशम स्कंधांत जो मंत्र साधला आहे तो च सर्व मंत्रभागवतांत हि आहे. पण, 'नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राच्या १०८ आवृत्त्यांत कृष्णकथा गाण्याचा कटाक्ष दशमस्कंधांत जसा स्पष्ट दिसून येतो तसा इतरत्र दिसून येत नाहीं. इतर स्कंधांतील मंत्राना संख्येचें विशिष्ट बंधन नाहीं. दशम स्कंधाच्या अखेरच्या आर्येंत

**'भागवतमंत्रमुक्तामणिमाळा त्या चि वाहिली देवा'**

अशा रीतीनें कवीनें ह्या प्रकरणाचें स्वतंत्र नामकरण केलें आहे; इतकें च नव्हे, तर ह्या प्रकरणाचा समाप्तिलेख हि 'इति श्रीमंत्रभागवते दशम स्कंध समाप्तः' असा नसून 'इति श्रीमद्भगवद्भक्तानुचर श्रीरामनंदन-मयूरकृतिविरचिता श्रीभागवतमंत्रमुक्तामणिमाला समाप्ता' असा आहे. ह्यावरून श्रीभागवतमंत्रमुक्तामणिमाला हा आरंभीं मंत्रभागवतांतील दशम स्कंध नसून, कृष्णविजयाप्रमाणें एक स्वतंत्र ग्रंथ म्हणून कांहीं दिवस होता हें स्पष्ट आहे.

दुसरें प्रमाण पत्रव्यवहार. चातुर्मास्यांच्या दप्तरांत पंतांचीं जीं पत्रें आहेत त्यांपैकीं दोन पत्रांत भागवतविषयक उल्लेख आढळून येतात. पहिल्या पत्रांत विठोबा आण्णा चातुर्मास्यांचे चिरंजीव भैराळबावा ह्यांना उद्देशून, 'नवम वाचण्यांत आहे. ११, १२ वाचून पाठवूं.' असें लिहिलें आहे. तसें च पंतांनीं दुसऱ्या कोणाकडून लिहविलेल्या दुसऱ्या एका पत्रांत 'पुस्तकें आणविलीं तीं पाठविलीं आहेत. ३ श्रीमद्भागवत—१ नवम, १ येकादश, १ द्वादश, १ महद्विज्ञापना येसी चार पुस्तकें पाठविलीं आहेत. येऊन पोहोंचलीयाचें उत्तर पाठवावें,' असा मजकूर आहे.

ह्यावरून दोन्ही पत्रांत दशम स्कंधाचा कोठें च उल्लेख नाहीं हें लक्ष्यांत येईल.

पहिल्या पत्रांतील उल्लेखावरून असें म्हणतां येतें कीं, पंतानीं श्रीभागवतमंत्रमुक्तामणिमाला ह्या नांवानें पूर्वीं रचलेल्या दशम स्कंधाला मागल्या पुढल्या स्कंधांची जोड देऊन साग्र भागवतरचना केली आहे, असें मैराळबोवाला कळल्यानंतर त्यानें अर्थात् आपल्या संग्रहीं नव्हत्या तेवढया च भागाची म्हणजे १ ते ९ व ११ ते १२ ह्या स्कंधांची नक्कल करण्यासाठीं पंतांकडे मागणी केली. पण, त्या वेळीं ते सर्व स्कंध रचून झाले असले तरी एखाद्याकडे नक्कल करून घेण्यास पाठविण्याइतक्या पूर्ण स्वरूपांत ते तयार नव्हते.

दुसऱ्या पत्रांतील उल्लेखावरून असें दिसून येतें कीं, १ ते ९ व ११ ते १२ हे स्कंध नक्कल करण्याजोगे तयार झाल्याबरोबर, प्रथम मागणी करणाऱ्या मैराळबोवाकडे पाठविले न जातां मध्यंतरीं दुसऱ्या च कोणाकडे पाठविले गेले व पुनः मैराळबोवांचा तगादा लागल्यावर ते परत आणवून मग त्यांचेकडे पाठविले. ह्या दुसऱ्या पत्रावर कार्तिक वद्य ७ बुधवार ही मिति आहे. ही मिति १७०७ शकांत येते. ह्यावरून मंत्रभागवत-रचनेच्या काळाचा अंदाज करितां येतो.

तिसरें प्रमाण मंत्रभागवत च. पंतानीं मंत्रभागवताच्या तीन माळा केल्या आहेत. बारा स्कंध मिळून असलेल्या भागवताच्या ह्या अडनिड्या तीन माळा करून त्या देवाच्या गळ्यांत घालण्याचें पंताना काय कारण? प्रत्येक स्कंध हें एक पुष्प मानून व अशीं स्कंधरूपीं बारा पुष्पें गोवून तयार केलेली माळा भगवद्भक्त पंतानीं प्रभूच्या कंठीं घातली असती तर कांहीं बिघडलें नसतें. इतकें च नव्हे तर, तो च कोटिक्रम कदाचित् सयुक्तिकहि झाला असता। पण पंत अगोदर च दशम स्कंधाला “ भागवतमंत्रमुक्तामणि-**माळा** ” म्हणून बांधून गेलेले ! तेव्हां आतां प्रत्येक स्कंधावर माळेचें

रूपक करून हें बारा माळांचें लोढणें देवाच्या गळ्यांत बांधण्यापेक्षां अगदीं अपरिहार्य अशा तीन माळा वाहून च आपण मोकळें व्हावें असें त्यानीं ठरविलें असावें. एरवीं ११, १३ किंवा १०८ ह्या संख्याना जसें कांहीं वैशिष्ट्य आहे तसें तीन ह्या संख्येला नाहीं; निदान तितकें नाहीं. सारांश, पंतानीं मंत्रभागवताच्या तीन माळा केल्या, ह्या साध्या दिसणाऱ्या गोष्टींत हि बीजरूपानें एक ऐतिहासिक शोध वास करीत आहे.

येथपर्यंत पुढें मांडलेलीं प्रमाणें विचारांत घेतलीं म्हणजे, मंत्रभागवताच्या उपसंहारांतील २।३ श्लोकांतून हि सदर प्रमाणाना आधारभूत असा अर्थ निघतो; किंबहुना तसा अर्थ केला नाहीं तर समाधानकारक व सरळ असा अर्थ लागत नाहीं असें हि मला वाटतें. ते पूर्वोक्त श्लोक पुढील प्रमाणें:—

श्रीराम द्रवुनि स्वयें चि करवी ऐसी **नवी योजना**;
सामग्री अधनासि दे, करि धनी त्याच्या गृहीं भोजना.
हें काय प्रभुला अशक्य हृदया! कां चित्र भासे तुला?
क्रीडार्थ प्लवगांसि योजुनि रची सिंधूंत हा सेतुला. २
**भक्तास्यें** राम आज्ञा करि मज पहिली त्या जशी नारदास्यें,
प्राणी ऐसें चि लोकीं त्रिभुवनगुरुनें तारिलें फार दास्यें.
उत्साह प्रेम देतो, स्वयश जडमुखें आदरें बोलवितो,
विश्वात्मा सज्जनांचीं कविशुकवचनें मस्तकें डोलवीतो. ५ ]

१४. वरील निबंधांतील मजकुराच्या स्पष्टीकरणार्थ येथें मंत्रभागवताच्या पंतलिखित पोथीचें थोडें वर्णन देतों.

पोथीचें वर्णन.

पोथीचे कागद पूर्तकाल ( Portuguese ) असून त्यांतील गर्भचिह्नें ( water-marks ) हि भिन्न आहेत. एक ते नऊ व अकरा व बारा या स्कंधांतील कागद ( १ ) मध्यें Libertas व खालीं VORNIO अशीं अक्षरें असलेलीं एक मेहेरप,

( २ ) बकऱ्यासारखा घोडा व HORSE अशीं अक्षरें, ( ३ ) कोंबडा व रेघा, ( ४ ) एक तुरा व C B C अशीं अक्षरें, इतक्या भिन्न भिन्न चिह्नानीं अंकित झालेले आहेत. त्यांची जाडी हि निरनिराळी आहे. पहिल्या दोन चिन्हांचे कागद पातळ आहेत. या सर्व कागदांची लांबी १२·१ इंच व रुंदी ४·१५ इंच आहे. प्रत्येक पानाला सुमोर १॥ इंच समास सोडला आहे व तद्दर्शक दुरेघी हि दोनी बाजूला काळया अगर तांबड्या शाईनें काढलेली आहे.

दशमाच्या पोथीचा कागद निराळा आहे; त्याची लांबी बरोबर १२ इंच आहे. रुंदी ४·१५ इंच इतकी च आहे. समास पुरता १ इंच देखील सोडला नाहीं व दुरेघी मुळीं च मारलेली नाहीं. बाकीच्या पोथीप्रमाणें जोड पानें दशमांत मुळीं च नाहींत; सर्व सुटीं आहेत; त्यामुळें गर्भचिह्न अर्धें च कापून निघाल्यामुळें नीट ओळखत नाहीं. पण कांहीं नक्षीची आकृति आहे खरी. पंतांच्या लिखाणाच्या कागदांची अशी सूक्ष्म परीक्षा केल्यास पोथ्यांच्या कालनिर्णयास कदाचित् थोडाफार उपयोग होण्याचा संभव आहे.

दशमाची पोथी व तिची भिन्नता.

१५. बाह्यस्वरूपावरून दशमाचें भिन्नत्व सिद्ध करणारी आणखी एक महत्त्वाची बाब म्हटली म्हणजे अक्षर होय. दशमांतील अक्षर ठसठशीत व गोलचीदार आहे. बाकीच्या स्कंधांतलि व विशेषतः एकादशद्वादशांतील अक्षर बारीक व कांपरें आलें आहे. यावरून हि दशम आधीं च लिहिला असावा हें स्पष्ट होतें.

१६. दशमाशिवाय सर्व स्कंधांच्या आरंभीं "श्रीगणेशायनमः। नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम्। देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत्॥" अशा प्रकारची सुरुवात आहे. दशमाला मात्र धडक 'श्रीकंठ' इ० या च उपोद्घातानें प्रारंभ केला आहे. तसें च प्रत्येक स्कंधाचे शेवटीं 'इति श्रीरामनंदनमयूरविरचिते मंत्रभागवते......स्कन्धः' इ० अशा

प्रकारचा उल्लेख आहे. दशमाचा समाह्युल्लेख मात्र कसा भिन्न आहे तें रा. पराडकर यांचे निबंधांत दिलें आहे.

१७. रा. पराडकर यानीं मंत्रभागवतोपसंहारांतून उद्धृत करून घेतलेल्या श्लोकांतील ' नवी योजना ' या पदांचा अर्थ भारतानंतर भागवत हातीं घेतलें असा होत नसून, ' भागवतमंत्रमुक्तामणिमाले ' नंतर त्याला उर्वरित स्कंधांची पुस्ती पुढें पाठीमागें जोडली, असा च करणें युक्त होईल. कारण, कृष्णविजयद्वारा भागवताचा परामर्ष त्यानीं पूर्वीं च घेतला होता. ' भक्तास्थें ' ह्या पदानें बाबा पाध्ये च लोकप्रवादावरून मना पुढें येतात.

१८. ' परि मंत्रवर्ण अडविति; **आदरिले** गुरु कसे न मानावें !' हा गीत्यर्ध हि, पंतानीं आपल्या प्रतिभेच्या स्वच्छंद विहाराला प्रतिबंध करणारा मंत्रवर्णांचा तट आपली " भागवतमंत्रमुक्तामणिमाळा " "श्रीकृष्णें स्वगळां स्वयें चि धरिली " तेव्हां च बांधून ठेविला असें च ध्वनित करतो.

१९. मंत्रभागवताच्या उपोद्घातार्यांत पंतानीं ६ वेळ इष्ट मंत्र साधला आहे. तो पोथींत तांबड्या अक्षरानीं स्वतंत्र ६ आसनें करून त्यांत बसविला आहे. आर्या लिहून जर जागा राहिली तर कोठें कोठें 'श्रीराम जयराम' इत्यादि पुण्यशब्द लिहून जागा भरून काढण्याचा पंतांचा सांप्रदाय आहे. दशमांत मात्र हा पाळलेला नाहीं.

२०. दशमाखेरीज बाकीच्या स्कंधांत पाठीवर समासांत 'प्र०' 'द्वि०' असें स्कंधाचें आद्याक्षर लिहून दोन्ही बाजूला ते च पत्रांक लिहिले आहेत.

२१. दशमांत मात्र तो आधीं रचिला असल्यामुळें पहिल्या च पृष्ठाचे पाठीवर ' प्रथमो मंत्रः ' अशी मंत्रगणना केली आहे. बारा हि स्कंधांत प्रत्येक पानाच्या एका बाजूवर एक मंत्र पुरा होईल

इतक्या, म्हणजे ११ आर्या लिहिल्या आहेत. दशमांत मुद्दाम निश्चित मंत्रसंख्येचें बंधन घालून घेण्याचा हेतु असल्यानें प्रत्येक पानाच्या एक एक बाजूवर पुरा एक एक मंत्र योग्य मंत्रांक क्रमानें टाकून मोजला आहे. दोन मंत्र मिळून एक पान व्हावयाचें; तेव्हां पत्रांक उजव्या बाजूवर मांडले आहेत. मंत्रांक अर्थात् निरनिराळे असल्यामुळें दोन्ही बाजूवर घालावे लागले आहेत. दशमाचे एकंदर मंत्र १०८; तथापि उपोद्घातोपसंहारांचे योगानें ५४ चे ऐवजीं ५५ पत्रें झालीं आहेत.

२२. एक बारीक गोष्ट राहिली. दशमेतर पोथ्यांचे पत्रांक दाखविताना 'श्रीराम' अशी खूण उजव्या बाजूच्या पत्रांकावर सर्वत्र घातलेली आढळते. दशमांत असा प्रकार नाहीं व दशमांत डाव्या बाजूला पत्रांक हि नाहींत.

२३. पोथीच्या बाह्यस्वरूपवर्णनाची समाप्ति आणखी एकदोन गोष्टी सांगून करूं. दशम स्कंधाच्या शेवटच्या पानावर "श्रीकृष्णार्पितमस्तु" झाल्यावर पंतानीं स्वहस्तानें पुढील श्लोक लिहून ठेविला आहेः—

**मांधाता स महीपतिः कृतयुगेलंकारभूतो गतः**
**सेतुर्येन महोदधौ विरचितः क्वासौ दशास्यांतकः ।**
**अन्ये चापि युधिष्ठिरप्रभृतयो यावद्भवान्भूपते-**
**नैकेनापि समंगता वसुमती मन्ये त्वया यास्यति ॥ १ ॥**

कांहीं अशा च अर्थाचा विषय द्वादश स्कंध आर्या ४४ ते ४९ त आला आहे. हा श्लोक कोठला व तो येथें कां उतरला असावा ?

२४. मंत्रभागवताच्या पोथींत कांहीं थोडा भाग परलिखित आहे. परंतु त्यावर पंतांचें शिक्कामोर्तब झालेलें पाहून कोणत्या हि संशयास जागा उरत नाहीं हें सांगावयास नको च. ( टीप पृ. ३२७ पहा. )

२५. पंतानीं अर्थसौकर्यार्थ त्याना वाटेल तेथें अक्षरांवर चरणरेघ काढून पदच्छेद करून दाखविले आहेत; ते रा. पराडकर यानीं तसे च

छापले असते तर बरें झालें असतें. कारण, त्यामुळें संपादकानें स्वतःची बुद्धि कोठें व कशी खर्चिली आहे तें स्पष्ट कळून येण्यास सुलभ साधन झालें असतें. मंत्रभागवताविषयीं येथें एक महत्त्वाची गोष्ट नमूद केली पाहिजे; ती ही कीं, यावर एक संस्कृत टीका काव्यसंग्रहकारांस मिळाल्याचें ( का. सं. द्वि. मा. पृ. ६ टीप ) दिसतें. " ही संस्कृत टीका मंत्रभागवताच्या पूर्वार्धावर गीति ६५४ पर्यंत आहे. पूर्वार्धाच्या ६ गीतींवर टीका उपलब्ध नाहीं. टीकाकाराच्या नांवाचा उल्लेख टीकेंत केला नाहीं." 'केकावलि' ची हि अशी च संभावना झालेली आहे. मराठीच्या अवहेलनेचा पूर्वींचा काळ जाऊन पंतांसारख्यांच्या प्रयत्नानें स्थिति कशी पालटली व मराठीचा विजय कसकसा होत चालला याचें हें एक उदाहरण आहे.

२६. मंत्रभागवताचे प्रत्येक स्कंधाचे शेवटच्या उपसंहारायेंत पंतानीं आपलें नांव गोविलें आहे. पण अष्टम याला चुकून अपवाद राहिला आहे.

२७ खुद्द पंतांच्या काव्यांत मंत्रभागवताचा उल्लेख एके ठिकाणीं च आला आहे, आणि तो हरिवंशांत. पंत लिहितात:—

**श्रीमंत्रभागवत या नामानें ग्रंथ जो, तयांत करी**
**निजचरितांचा संग्रह, कांहीं येथें हि करिल तो चि हरी.**

२८. पंतांचें आर्याभारत शके १७०४ त समाप्त झालें. त्यांच्या काव्यगतीचें स्थूल प्रमाण प्रो. शिवरामपंत परांजपे यांनीं सरासरीनें दिवसास ४।५ आर्यांचें ठरविलें आहे. मंत्रभागवताचा दशम पूर्वीं च रचला असल्यामुळें तो वगळला ह्मणजे अदमासें २४०० ग्रंथ शिल्लक राहतो व तो उरकण्यास दोन पावणेदोन वर्षें पुरेत. या हिशेबानें हि शक १७०७ हा मंत्रभागवताचा स्थूलमानानें अजमाविलेला रचनाकाल अयोग्य ठरत नाहीं.

२९. मराठी भाषेवर पंतांचे किती उपकार झाले आहेत ते वर्णन करितां येणार नाहींत. इतकें च लिहिलें म्हणजे पुरे कीं, मराठी भाषेला

सूक्ष्म पृथक्करण

हल्लींचें 'संस्कृतप्राकृतमिश्रित' रूप देण्याचें बरें च श्रेय त्याना दिलें पाहिजे. आपल्या शुद्ध व प्रौढ वाणीचा वज्रलेप छाप त्यांनीं मराठीवर मारून ठेवला आहे.

३०. पंतांच्या काव्यांचें सूक्ष्म पृथक्करण करण्याची वेळ सांप्रत आली आहे. यापूर्वी स्थूल व किंचित् सूक्ष्म विचार झालेला आहे; पण साकल्यानें खल व्हावयास हवा आहे. पंतानीं कोणकोणते भाषासंप्रदाय ( Idioms ) रूढ केले, कोणते नवीन प्रचात पाडले, इत्यादिक बाबींविषयीं साधार व सप्रपंच विवेचन आतां झालें पाहिजे, व प्रस्तुतसारख्या प्रमाण आवृत्ति (Standard or authorized editions) बाहेर पडत आहेत, त्यामुळें या उद्योगाची सामग्री सिद्ध होत आहे. हरिभक्तिपरायण रा. पांगारकर यानीं म्हटल्याप्रमाणें "या विषयावर हि चांगल्या कसलेल्या मराठी भाषापंडितानें दहावीस वर्षे झटून, मराठी काव्यसमुद्राचें आलोडन करून व व्यवहाराकडे बारीक लक्ष्य पुरवून स्वतंत्र ग्रंथ तयार केला पाहिजे." ( मो. च. पृ. ५६३ ).

पंतकाव्यांच्या या पृथक्करणानें पंतांच्या अंतरंगाचा हि जास्त परिचय होऊन त्यांच्या मनोरचनेची सूक्ष्म परीक्षा करतां येईल.

मंत्रभागवतापुरतें असें थोडेसें पृथक्करण पुढें करतों. वस्त्रगाळ पूड करण्यास पाहिजे तितका अवकाश नसल्यामुळें थोडेंसें भरडून च काढावें लागलें आहे.

( १ ) मंत्रभागवतांत आढळलेले कांहीं भिन्न भिन्न संप्रदाय येणेंप्रमाणें:—

कास करिती ( स्कंध १ पद्य १०५ ), बोल लावी ( १।१०६ ), कपाळ मळवाया ( २।६२ ), कृतकृत्य केलें ( ४।१७१ ), गोते खाय ( ५।४० ), घर-

नियां हनुतें ( ५।३९, १२।१०६ ), पाठ देवूनि ( ६।२१, १०।६८० भिन्नार्थक ), 'र' करवी ( ६।१०६ ), पाठ घेऊनि ( ६।१२७ ), डोळे सुजविले ( ६।१५५ ), पगडी उडवाया ( ६।१७५ ), डोळ्यांत केश झाला ( ७।२२ ), लाळ घोटणें ( ७।२६, ८।६९, १०।२२० ), तोंड देखाया ( ७।२६ ), बुद्धीचा भेद करणें ( ७।३८ ), यश गोळा करणें ( १०।८०७ ), गोळा जाहले ( ४।३८ ), रंध्र ( ७।८८ ), ओष्ठ करपात्रे ( ९।११ ), ओठ सुकवी ( ११।२४० ), मोडा घालणें ( ८।१२५ ), जोडा नसे ( ८।१२५ ), फुगला ( ८।१२९ ), कासेला लावणें ( ८।१२३ ), बेडी फेडणें ( ८।१४८ ), गळां पडणें ( ९।१९–२७०, १०।१०४-५२० ), शब्द चालविणें ( ९।२२८ ), मन जाय ( ९।२८२ ), रेंच उतरी ( ९।२९५ ), मनीं कढे ( १०।४४ ), पदर पसरति ( १०।४-२८६, ११।१२७ ), धीर देणें ( १०।९ ), भाक देणें ( १०।३० ), सपाट करणें ( १०।६६ ), धुतर चारणें ( १०।६७ ), [ तुजा ] काळ ( १०।८९ ), कपाळीं आला ( १०।११९ ), हात देणें ( १०।१४७-६४७, ११।२३५ ), पदरीं घाली ( १०।१८७ ), चित्र होणें ( १०।२०८ ), खोडी करणें ( १०।२२१ ), आंगें जाणें ( १०।२२५ ), जागें असणे ( १०।२९० ), भूलि घालणें ( १०।२९७ ), बाहू ठोकणें ( १०।४३१ ), शल्य काढणें ( १०।४५२ ), सगडी जळे ( १०।४७० ), बोटें मोडणें ( १०।४९७ ), हस्तींचें मन ( १०।४९९ ), दृष्टि झाली ( १०।५२० ), तोंडावर देणें, पळ काढणे, धांव घेणें व तोंडघसीं पडणें ( १०।५३७ ), बाहू थोपटणें ( १०।५४९ ), ओखदास नुरविणें ( १०।५७१ ), कंठ दाटणें, अवघड वाटणें ( १०।५७५ ), पंडितंमन्य ( १०।६०९ ), पंडितमानी ( ११।५२१ ), गटक्या खाणें ( १०।६२०, १२।१५४–१५८ ), जीवितास विटणें ( १०।६४१ ), चार दिवस ( १०।६३२ ), उणे ( १०।६५५ ), डोळे उघडे राहविणें ( १०।६६९ ), हाता लागेल ( १०।६८१ ), मनीं जळणें ( १०।६१८ ), माहेर झालें ( १०।७१९ ), शब्द लागों न देणें ( १०।७२५ ), भार घालणें ( १०।७५२ ), भरीं भरणें ( १०।८५० ), गळांठा करणें ( १०।८६० ), गोडवे गाणें ( १०।८६५ ), मर्कट-चेष्टा करणें ( १०।८८५ ), कामा येणें ( १०।८९३ ), विचार पडणें ( १०।९०१ ), चरण मस्तकीं धरणें ( १०।९२४ ), द्रुम पुरविणें ( १०।१००३ ), गांठीस पुण्य

( १०।११७३ ), हात जोडणें ( १०।११८४, ११।३७७ ), वदनें सुकणें (११।८), मिठी घालणें ( ११।१४ ), कास धरणें ( ११।१७ ), पदरा येणें ( ११।३७ ), असु खरचिणें ( ११।४१ ), वेच नव्हे-व्हावा ( ११।४६-७५ ), पद देण ( ११।८४, मंत्रमयभागवत ३० ), नयनें दिपणें ( ११।८९ ), खालीं व्हावयास लावणें ( ११।८८ ), वपू वाहणें ( ११।१९७ ), उजू करणें ( ११।२१७ ), मान मागें करूं नये ( ११।२२१ ), कळणें, वळणें ( ११।२२५ ), धर्म घडे (११।३१०), हाकेला पावणें ( ११।३१७-५१७ ), पाठ पुरविणें ( ११।३५८ ), सोस करणें ( ११।३७२ ), मनीं घेणें ( ११।३८४ ), खपणें-खपविणें ( २।८४, ११।४३३ ), गरक होणें ( ११।५१० ), लाता खाणें ( ११।५१९ ), शब्द नसे ( ११।५२५ ), 'हाय' म्हणणें ( ११।५२५, उपसंहार ४ ), गटकळी देणें ( ११।५३२ ), अंतर पडों न देणें ( ११।५५८ ), बळ करणें ( ११।५७८ ), 'आ' पसरविणें ( ११।५८३ ), झाडून ( ११।५८८ ), आण वाहणें ( १२।५८ ), भाक घेणें ( १२।६४ ), तोंड वासणें ( १२।८४ ), खंती नसणें ( १२।१५३ ), आवाळ होणें ( १२।१५९ ), जोडून देणें ( १२।२१८ ). यन्नाम थे कनिष्ठिका ( १०।११-६४ ), वकपण न लव लेशीं ( ७।६६ ), उजवें घालणें ( १२।१५० ), रोकडा लाभ ( ४।६० ), गोपिका निवती ( १०।४२७ ), फरफरां ओढणें ( १०।५६२ ), तयांचा ठायीं ( 'च्या' बद्दल 'चा' लिहिण्याची जुनी वहिवाट पंतानीं कित्येक ठिकाणीं पाळली आहे ).

( २ ) शिवाय कित्येक म्हणी किंचित् विकृत अगर अविकृत आढळतात त्या:—

**बा ! जीभ चाविली तरि हित जिह्व चि सारिखे दांत.** १२।४८०
**कंटकतरु व्हायाला तच्छेदक विष्णुपरशुला नाळ.** ७।४५
**जो सुरतरुनें दिधला तो काय कुठार त्यासि तोडीना ?** १०।१७९०
**गरज सरतां चि वैद्या त्याजिति** १०।५९८
**चोरांस चांदिणेंसें** १०।६३७
**पाषाण आंत शुष्क चि वाहो वरि देवसिंधुचा ओघ.** १०।९७९
**शिरावरि पदरक्षा कीं चढावया पाहे.** १०।८९३

( ३ ) ह्या ग्रंथांत पुढील प्रकारचीं क्रियापदें रुळत घातलीं आहेत.

जिववील ( २।८५ ), दुरा ( ३।१११ ); उपरमला ( ५।५ ), व्यापारुनि ( ६।११५ ), होकरितो ( ७।६४ ), परिहारिती ( ८।४४ ), नवसिला ( ९।९४), कवचितें ( १०।६६६ ), ठाती ( १०।८०७), होमणें (१०।१११९, १२।११५–११६ ), दुभसी ( १२।१३२ ), मीनासि ( ११।११ ), वाळिला ( ११।२०५, १२।१७५ ); अनुमोदिती ( ११।५३९–५८६ ), कातरतो ( ११।४१९ ), दाहिले ( १०।२९२ ), कर्मत ( ११।४३४ ).

( ४ ) पंतांच्या मंत्रभागवतांतील कित्येक ध्यानांत ठेवण्याजोगीं रूपें देतों. वैय्याकरणाना उपयोगीं पडतील.

होवीस ( १।३, ५।४२, ११।१४८, १२।२१६ ), वासरुवा, वासुरें (४।११७, १०।२१४ १०।२२८ मंत्रमय० ३ ), मोटा ( सर्वत्र ), दिसा ( ७।१६ ), होण्यास ( ७।७० ), तेत्तांस ( उपोद्घात ६ ), साधुनेतया ( ७।८९ ), भरवसियाचे ( ९।१६८ ), जांत ( ज्यांत ) ( ३।१०२ ), राज्या ( बहुधा सर्वत्र ), च्यार ( अनेक ठिकाणां ), सवे ( १०।२० ), घ विऱ्या ( १०।१४२ ), रीण ( ९।१७१ ), वढिलांहीं ( १।७१ ), ठावुकी व ठेउनि (अशा स्थळीं पंत स्वराबद्दल व्यंजन व व्यंजनाबद्दल स्वर बहुधा लिहितात. ), धणी ( ५।१३ ), वळखावें ( १०।–६०–४८३ ), शतरूपास मेत (३।९२), शतरूपेहुनि (३।१२८), नव्हता (४।२७ ), पोटाखालें ( १०।३५७ ), कांटाळसी ( १०।४०७, १२।२०२ ), करिजेतां १०।२२५ ), दिजे ( १०।४५४ ), फळतो ( १०।४५६ ), सगडी (१०।४७०), फण ( १०।४२५ ), कोमेला ( १०।४९५ ), एकटक ( १०।५०७ ), कसापाप ( १०।९६२ ), गडिनीसां ( १०।११५९ ), जऱ्ही तऱ्ही ( बहुतेक ठिकाणीं ), वहिवरले ( १०।१०२३ ), तां ( १०।१०९२ ), देणें ( ११।५४ ), भ्यानें ( ११, २१७ ), में ( १०।११७५ ), विंगळाला ( ११।१९३ ), इंगळासम ( ११।२०१ ); गडवाडिना ( ११।२५७ ), आजिवरी ( १२।३८ ), जितीन ( ११।३२२ ), बाटसुर ( ११।४४० ), मजसाराखियांची ( ११।५३३ ), हातेरा ( १२।२४ ), आझुनि १२।११४–१२९ ), ढाळी ( १२।१५८ ), पुनित्र ( १२।२०४ ), शीळ (१२।१७९), सेळी ( १२।३६ ), गरक ( ११।५१० ), केऱ्डा ( ११।५१४ ), त्याचप्रमाणें, नैकति (९।२५०), नुतरित्यें (१०–१४०), नुघडितां, नुघडिजे ( १०।४५१–

११५५), तुरविला (१०|५७१), येताहे (१०|१७४), आलोंसें (१०|२६३), होताहे (११|५५७), इ० समस्त रूपें हि नमूद करण्यासारखीं आहेत. ह्याखेरीज, स्फष्ट (११|४४३), धडफडुनि (११|१७१), साक्षात्तसे (१०|८२१), इत्थ (१०|९४६), अकस्माच्चुकलों (१०|८५०), वारिमधें (१०|७७७), इत्यादि शुद्धलेखनप्रकार हि दिसून येतो.

(५) अपरिचित अथवा दुर्बोध शब्दांचा भरणा पंतांच्या मंत्रभागवतांत फार च थोडा आहे; आणि आहे त्यापैकीं बरा च यमकांची हौस पुरविण्याकरितां च करण्यांत आलेला आहे. थिटें (११|२९५), आळुका (६|१४७), सब्रा (८|१००), धारा (११|२७७), काकिणी (१२|५४), मांदळा, बोण (४|११७), वगैरे कित्येक शब्द जिज्ञासूनीं पहावेत.

चुरचुरु चोखी (९|८०), गटगट गिळी (९|१५४), फरफरां ओढी (१०|५६२), चळचळ कांपो (९|२३४), इत्यादि प्रसंगोचित शब्दयोजना; एकादश अर्बुदाब्द (५|९), तुज असा (१०|६५१), वगैरे असमस्त रूपें; कुठारगडी (९|२४६), यक्षरायकिली (१०|२), सुख–निवाडा (११|३३०), इत्यादि नूतन भाषापोषक संकरसमास; 'गडबड नको करूं हो! बसलां तैसे बसा, नको हालों, (१०|२२४), असा अनेकार्थी एकवचनी कोंकणी प्रयोग; वाजत–गाजत–साजत (४|९५), अन्या–धन्या (४|१६८), उचिता–शुचिता (४|१४४, ११|६३६), इत्यादि पंतांचे लाडके अनुप्रास; कुमारमणी–उमा रमणी (१|४२), कुतरियाची–कुतरि याची (१|५८), नको चि रडों–नको चिरडों (४|७९), दया लुबरा–दयालु बरा (७|८३), अगारा या–अगा राया (९|४६), दयालु गडियांतें–दया लुगडियांतें (१०|३१३), मुलास कळकळतें–तुला सकळ कळतें (११|१७३), वगैरे पंतकाव्यवाचकांचे परिचित सोबती; किति नाम दक्ष ? (४|३७), 'वत्सान्मुच-

( ३ ) ह्या ग्रंथांत पुढील प्रकारचीं क्रियापदें रुळत घातलीं आहेत.

जिववील ( २।८५ ), दुरा ( ३।१११ ); उपरमला ( ५।५ ), व्यापारुनि ( ६।११५ ), होकरितो ( ७।६४ ), परिहारिती ( ८।४४ ), नवसिला ( ९।९४), कवचितें ( १०।६६६ ), ठाती ( १०।८०७), होमणें (१०।१११९, १२।११५–११६ ), दुभसी ( १२।१३२ ), मीनासि ( ११।११ ), वाळिला ( ११।२०५, १२।१७५ ); अनुमोदिती ( ११।५३९–५८६ ), कातरतो ( ११।४१९ ), दाहिले ( १०।२९२ ), कर्मित ( ११।४३४ ).

( ४ ) पंतांच्या मंत्रभागवतांतील कित्येक ध्यानांत ठेवण्याजोगीं रूपें देतों. वैय्याकरणाना उपयोगीं पडतील.

होवीस ( १।३, ५।४२, ११।१४८, १२।२१६ ), वासरुवा, वासुरें (४।११७, १०।२१४ १०।२२८ मंत्रमय० ३ ), मोटा ( सर्वत्र ), दिसा ( ७।१६ ), होण्यास ( ७।७० ), तेत्तांस ( उपोद्घात ६ ), साधुनेतया ( ७।८९ ), भरवसियाचे ( ९।१६८ ), जांत ( ज्यांत ) ( ३।१०२ ), राज्या ( बहुधा सर्वत्र ), च्यार ( अनेक ठिकाणीं ), सवे ( १०।२० ), घबिऱ्या ( १०।१४२ ), रीण ( ९।१७१ ), वडिलांहीं ( १।७१ ), ठावुकी व ठेउनि ( अशा स्थळीं पंत स्वराबद्दल व्यंजन व व्यंजनाबद्दल स्वर बहुधा लिहितात. ), धणी ( ५।१३ ), वळखावें ( १०।–६०–४८३ ), शतरूपासमेत (३।९२), शतरूपेहुनि (३।१२८), नव्हता (४।२७ ), पोटाखालें ( १०।३५७ ), कांटाळसी ( १०।४०७, १२।२०२ ), करिजेती १०।२२५ ), दिजे ( १०।४५४ ), फळतो ( १०।४५६ ), सगडी (१०।४७०), फण ( १०।४२५ ), कोमेला ( १०।४९५ ), एकटक ( १०।५०७ ), कसापांप ( १०।९६२ ), गडिनीसीं ( १०।११५९ ), जऱ्ही तऱ्ही ( बहुतेक ठिकाणीं ), वहिवरले ( १०।१०२३ ), तां ( १०।१०९२ ), देणें ( ११।५४ ), ध्यानें ( ११, २१७ ), में ( १०।११७५ ), विंगळाला ( ११।१९३ ), इंगळासम ( ११।२०१ ), गडवडिना ( ११।२५७ ), आजिवरी ( १२।३८ ), जितीन ( ११।३२२ ), बाटसुर ( ११।४४० ), मजसाराखियांची ( ११।५३३ ), हातेरा ( १२।२४ ), आज्ञुनि १२।११४–१२९ ), ढाळी ( १२।१५८ ), पुनित्र ( १२।२०४ ), शीळ (१२।१७९), सेळी ( १२।३६ ), गरक ( ११।५१० ), केऽडा ( ११।५१४ ), त्याचप्रमाणें, नैकति (९।२५०), नुतरितयें (१०–१४०), नुघडितां, नुघडिजे ( १०।४५१ –

११५५), तुरविला (१०।५७१), येताहे (१०।१७४), आलोंसें (१०।२६३), होताहे (११।५५७), इ० समस्त रूपें हि नमूद करण्यासारखीं आहेत. ह्याखेरीज, स्फष्ट (११।४४३), धडफडुनि (११।१७१), साक्षात्तसे (१०।८२१), इत्थ्म (१०।९४६), अकस्माच्चुकलों (१०।८५०), वारिमध्यें (१०।७७७), इत्यादि शुद्धलेखनप्रकार हि दिसून येतो.

(५) अपरिचित अथवा दुर्बोध शब्दांचा भरणा पंतांच्या मंत्रभागवतांत फार च थोडा आहे; आणि आहे त्यापैकीं बरा च यमकांची हौस पुरविण्याकरितां च करण्यांत आलेला आहे. थिटें (११।२९५), आलुका (६।१४७), सबरा (८।१००), धारा (११।२७७), काकिणी (१२।५४), मांदळा, वोण (४।११७), वगैरे कित्येक शब्द जिज्ञासूनीं पहावेत.

चुरुचुरु चोखी (९।८०), गटगट गिळी (९।१५४), फरफरां ओढी (१०।५६२), चळचळ कांपे (९।२३४), इत्यादि प्रसंगोचित शब्दयोजना; एकादश अर्बुदाब्द (५।९), तुज असा (१०।६५१), वगैरे असमस्त् रूपें; कुठारगडी (९।२४६), यक्षरायकिली (१०।२), सुख–निवाडा (११।३३०), इत्यादि नूतन भाषापोषक संकरसमास; 'गडबड नको करूं हो! बसलां तैसे बसा, नको हालों, (१०।२२४), असा अनेकार्थी एकवचनी कोंकणी प्रयोग; वाजत–गाजत–साजत (४।९५), अन्या–धन्या (४।१६८), उचिता–शुचिता (४।१४४, ११।६३६), इत्यादि पंतांचे लाडके अनुप्रास; कुमारमणी–उमा रमणी (१।४२), कुतरियाची–कुतरि याची (१।५८), नको चि रडों–नको चिरडों (४।७९), दया लुबरा–दयालु बरा (७।८३), अगारा या–अगा राया (९।४६), दयालु गडियांतें–दया लुगडियांतें (१०।३१३), मुलास कळकळतें–तुला सकळ कळतें (११।१७३), वगैरे पंतकाव्यवाचकांचे परिचित सोबती; किति नाम दक्ष ? (४।३७), 'वत्सान्मुच-

न्कचिदसमय इत्यादिक' (१०।१५९), सुष्टुविचारितमपि भो ! हंसवर! क्षुद्र दूत ! ( १०।११५२ ), उर्वशि जाये ! घोरे ! तिष्ठ ( ११।५११ ); वगैरे संस्कृती पाद वा पादांश; मंत्रांचा स्वीकार केल्यामुळें, 'सु' दुजा 'व' वर्ण आर्धी ( २।७४ ), 'वासु' असा जो 'देव' ( २।१०६ ), मोद प्रपूर्व चित्तीं ( ३।५७ ), 'य' विरामांसि म्हणे प्रभु ( ३।७७ ), यव अव-पूर्व ( ३।११० ), भाद्रपदपूर्व काळीं (५।४७), सुप्रथम दर्शन ( ९।६३), 'गर्त' पुढें प्रथम 'अजी' ( ९।१०३ ), 'कल्पपूर्व' 'तरु' ९।२१० ), यम उलटा जो ( १०।४७३ ), यप्रथम बंधु जीचा देह ( १०।५१७ ), यगण जसा एकमुखीं मात्र सरल ( १०।६३८); 'मोदन' 'अनु' पूर्वक (११।१३), 'देवन' 'परि'पूर्व करुनि (११।१७४), 'ब्रह्म' पूर्व 'वैवर्त' (१२।२१५) इ. करावे लागलेले हे द्राविडी प्राणायाम; ७।४३ व १०।५४५ या दोन स्थळीं चुंबकमणिसंबंधानें व 'जसि पडतां दृष्टि इंदुवरि लहरी':(११।१२०), येथें प्रकट केलेलें सृष्टचमत्कारज्ञान; (६।४४) त अंगुष्ठगतयवाचा ( १०।४२७ ) त 'जिवती-' चा व (१०।१०४२) त 'विभूती' चा वर्णिलेला गुण; 'बवयोरभेदः' या सूत्राचें पंतानीं करून ठेवलेलें ऋण; राशि ( २।१५ ), विघ्न ( ६।३ ), शपथ ( ९।४१-१८७ ), वगैरे शब्दांची पुल्लिंगी योजना, इत्यादि अनेक लहानमोठ्या बाबींचें विवेचन करणें,

**'हें युक्तिनें चि वदलों, साकल्यें शक्ति वर्णनीं न मज.'** २।३८

**२१. मंत्रभागवताचें अंतःस्वरूप.**

आतां प्रकृत ग्रंथाच्या अंतःस्वरूपाकडे वळूं. पंतांसारखा लोकप्रिय शिष्ट ऊर्फ नागर कवी दुसरा नाहीं. त्यांच्या काव्यांची, कविताशक्तीची वगैरे अनुकूलप्रतिकूल सर्व बाजूंनीं इतकी सविस्तर चर्चा आजवर झाली आहे कीं, तिच्यांत आतां भर घालण्याची हाव बाळगणें निष्फळ होईल. पंत नुसते भाषांतरे नाहींत, हाडाचे प्रतिभावान् थोर कवी आहेत, ते मोठे व्युत्पन्न होते, वगैरे गोष्टी आतां सर्वमान्य

झालेल्या आहेत आणि पंतांचा प्रस्तुत ग्रंथ हि या गोष्टींची चांगली साक्ष पटवील.

कृष्णविजय किंवा ज्याला च 'बृहद्दशम' म्हणण्याचा परिपाठ पडला आहे तो, मंत्रभागवत व हरिवंश या तीन हि ग्रंथांचा विषय स्थूलमानानें एक च आहे. पैकीं हरिवंशाचा विस्तार या सर्वांत मोठा आहे. परंतु, काव्यदृष्टीनें तो अंमळ नीरस च आहे; कृष्णविजय मात्र बऱ्या च वरच्या दर्जाचा आहे. त्यांतील पूर्वार्ध "कठिण झाला असला तथापि त्यांत सुद्धां प्रसाद आहे." (मो. च.) पंत या वेळीं स्वतः च म्हणतात कीं,

"**अभय दिधलें आहे, वाहे शुचिप्रतिभाझरा !**"

मंत्रभागवतांत काठिण्य मुळीं च नाहीं म्हटलें तरी चालेल. कृष्णविजय नारीकेलपाकासारखा आहे, तर मंत्रभागवत द्राक्षापाकासारखा आहे. त्यांतील दशम स्कंध तर 'काव्यामृताचा नवनीतभेला' च आहे. भक्तिरसाचा व वत्सलरसाचा तेथें परमोत्कर्ष झाला आहे. या अमृताची माधुरी ज्याना चाखावयाची असेल त्याना दशमाच्या उपसंहाराचा श्लोक दिला असताना च त्याची लज्जत कळून येऊन ते वेडावतील. एकशें आठ मण्यांची माळा प्रभुचरणीं अर्पण केल्यावर पंतानीं हा मेरुमणि वर बसविला आहे; ते म्हणतातः—

**ऐसे साष्टशताच्छमंत्रमणि हे, यांची असी वोविली**
**माळा स्वच्छयशोगुणीं कविकरें अत्यादरें गोविली.**
**श्रीकृष्णें स्वगळां स्वयें चि धरिली, वक्षस्थळीं शोभली,**
**वर्णावी बहु काय ? पाहुनि इला श्रीदृष्टि ही लोभली.**

शेवटच्या दोन चरणांतिल आत्मविश्वास, चतुराई व गोडी यांवर कोणी हि रसिक तेव्हां च फिदा होईल.

सर्व मंत्रभागवताचा दशम हा केवळ गाभा च असून त्यावरील मंत्रांचें कवच उंची व मऊ रेशमाच्या झिरझिरीत आवरणासारखें भासतें.

न्कचिदसमय इत्यादिक' (१०।१५९), सुष्टुविचारितमयि भो ! हंसवर! क्षुद्र दूत ! ( १०।११५२ ), उर्वशि जाये ! घोरे ! तिष्ठ ( ११।५११ ); वगैरे संस्कृती पाद वा पादांश; मंत्रांचा स्वीकार केल्यामुळें, 'सु' दुजा 'व' वर्ण आर्धी ( २।७४ ), 'वासु' असा जो 'देव' ( २।१०६ ), मोद प्रपूर्व चित्तीं ( ३।५७ ), 'य' विरामासि म्हणे प्रभु ( ३।७७ ), यव अव-पूर्व ( ३।११० ), भाद्रपदपूर्व कालीं (५।४७), सुप्रथम दर्शन ( ९।६३), 'गर्त' पुढें प्रथम 'अजी' ( ९।१०३ ), 'कल्पपूर्व' 'तरु' ९।२१० ), यम उलटा जो ( १०।४७३ ), यप्रथम बंधु जीचा देह ( १०।५१७ ), यगण जसा एकमुखीं मात्र सरल ( १०।६३८); 'मोदन' 'अनु' पूर्वक (११।१३), 'देवन' 'परि'पूर्व करुनि (११।१७४), 'ब्रह्म' पूर्व 'वैवर्त' (१२।२१५) इ. करावे लागलेले हे द्राविडी प्राणायाम; ७।४३ व १०।५४५ या दोन स्थळीं चुंबकमणिसंबंधानें व 'जसि पडतां दृष्टि इंदुवरि लहरी':(११।१२०), येथें प्रकट केलेलें सूक्ष्मचमत्कारज्ञान; (६।४४) त अंगुष्ठगतयवाचा ( १०।४२७ ) त 'जिवती-' चा व (१०।१०४२) त 'विभूती' चा वर्णिलेला गुण; 'बवयोरभेदः' या सूत्राचें पंतानीं करून ठेवलेलें ऋण; राशि ( २।१५ ), विघ्न ( ६।३ ), शपथ ( ९।४१-१८७ ), वगैरे शब्दांची पुल्लिंगी योजना, इत्यादि अनेक लहानमोठ्या बाबींचें विवेचन करणें,

'**हें युक्तिनें चि वदलों, साकल्यें शक्ति वर्णनीं न मज.**' २।३८

आतां प्रकृत ग्रंथाच्या अंतःस्वरूपाकडे वळूं. पंतांसारखा लोकप्रिय शिष्ट ऊर्फ नागर कवी दुसरा नाहीं. त्यांच्या काव्यांची, कविताशक्तीची

२१. मंत्रभागवताचें अंतःस्वरूप. वगैरे अनुकूलप्रतिकूल सर्व बाजूनीं इतकी सविस्तर चर्चा आजवर झाली आहे कीं, तिच्यांत आतां भर घालण्याची हाव बाळगणें निष्फल होईल. पंत नुसते भाषांतरे नाहींत, हाडाचे प्रतिभावान् थोर कवी आहेत, ते मोठे व्युत्पन्न होते, वगैरे गोष्टी आतां सर्वमान्य

झालेल्या आहेत आणि पंतांचा प्रस्तुत ग्रंथ हि या गोष्टींची चांगली साक्ष पटवील.

कृष्णविजय किंवा ज्याला च ' बृहद्दशम ' म्हणण्याचा परिपाठ पडला आहे तो, मंत्रभागवत व हरिवंश या तीन हि ग्रंथांचा विषय स्थूलमानानें एक च आहे. पैकीं हरिवंशाचा विस्तार या सर्वांत मोठा आहे. परंतु, काव्यदृष्टीनें तो अंमळ नीरस च आहे; कृष्णविजय मात्र बऱ्या च वरच्या दर्जाचा आहे. त्यांतील पूर्वार्ध " कठिण झाला असला तथापि त्यांत सुद्धां प्रसाद आहे." (मो. च.) पंत या वेळीं स्वतः च म्हणतात कीं,

" **अभय दिधलें आहे, वाहे शुचिप्रतिभाझरा !** "

मंत्रभागवतांत काठिण्य मुळीं च नाहीं म्हटलें तरी चालेल. कृष्णविजय नारीकेलपाकासारखा आहे, तर मंत्रभागवत द्राक्षापाकासारखा आहे. त्यांतील दशम स्कंध तर ' काव्यामृताचा नवनीतभेला ' च आहे. भक्तिरसाचा व वत्सलरसाचा तेथें परमोत्कर्ष झाला आहे. या अमृताची माधुरी ज्याना चाखावयाची असेल त्याना दशमाच्या उपसंहाराचा श्लोक दिला असताना च त्याची लज्जत कळून येऊन ते वेडावतील. एकशें आठ मण्यांची माळा प्रभुचरणीं अर्पण केल्यावर पंतांनीं हा मेरुमणि वर बसविला आहे; ते म्हणतातः—

**ऐसे साष्टशताच्छमंत्रमणि हे, यांची असी वोविली**
**माळा स्वच्छयशोगुणीं कविकरें अत्यादरें गोविली.**
**श्रीकृष्णें स्वगळां स्वयें चि धरिली, वक्षस्थळीं शोभली,**
**वर्णावी बहु काय ? पाहुनि इला श्रीदृष्टि ही लोभली.**

शेवटच्या दोन चरणांतील आत्मविश्वास, चतुराई व गोडी यांवर कोणी हि रसिक तेव्हां च फिदा होईल.

सर्व मंत्रभागवताचा दशम हा केवळ गाभा च असून त्यावरील मंत्रांचें कवच उंची व मऊ रेशमाच्या झिरझिरीत आवरणासारखें भासतें.

दशमामध्यें पंतांची काव्यगंगा अप्रतिहत धों धों वाहत चालली असून आरंभींचे उपोद्घातांत,

**गायत्रि ! वेदमाते ! मीं केवळ तोक विप्र; या साचें**
**हें सुख दे, तुज नत जो, पात्र नव्हे तो कवि प्रयासाचें. ५**

अशी पंतानीं केलेली प्रार्थना सुफलितार्थ झाली आहे. एकदां सुरू झालेला ओघ इतका अनावर झाला कीं, " वाढेल ग्रंथ म्हणुनि आवरितों मीं बळें चि रसनेला" (१०।४२८) असें म्हणून पंताना आपल्या काव्यवारूला जबरदस्तीनें थोपवावें लागलें.

आपला ग्रंथ प्रमाणाबाहेर वाढेल हा धाक पंताना सतत वाटत असे. विस्तार न करण्याचीं कारणें पंतानीं दिलीं आहेत, तीं पंतचरित्रांत ( पृ. ४१४–४१५ ) जिज्ञासूनीं पहावीं. पंचम स्कंधाच्या उपसंहारांत पंत स्वतः च लिहितात:—

**ते जरि पदार्थ इतरें वर्णावे, ग्रंथ बहु न कां वाढे ?**
**रसिक हि निरलस सादर साधु सदा स्वच्छ थोडके गाढे. ६१**
**वानावीं पातळें सप्त, बळिश्री अनंत वानावे,**
**परि मंत्रवर्ण अडविति; आदरिले गुरु कसे न मानावे ? ६२**
**सुज्ञसमाजसुरसिक श्रीहरि च म्हणेल न लघु पृथु कांहीं,**
**स्वल्पार्थस्कंधांहीं तृप्त चि होईल जेंवि पृथुकांहीं. ६३**

या आर्यांत प्रकट झालेली पंतांची मार्मिकता व चातुर्य अपूर्व आहेत. असें विस्तारभय पंतानीं बाळगिलें आहे; तथापि नवम स्कंधांतील ९३ ते ९९ गीतीपर्यंत रोहिताकरितां त्याच्या बापानें वरुणाशीं चालविलेला चिकटपणा वर्णिताना पंतानीं हि त्याचें च अनुकरण केलें आहे ! असो. असे दोष ' गुणसन्निपातांत ' पार गडप होतात.

श्रीमद्भागवत व मंत्रभागवत यांच्या तुलनात्मक विचाराच्या खोल पाण्यांत शिरण्यास येथें वाव नाहीं. मूळ भागवत १८००० आहे तर

पंतांचें त्याच्या १/५ इतकें आहे. त्यांतील कठिण तत्त्वज्ञानास बेताबेताची जागा देऊन पंतानीं सर्व भर कथाभागावर च टाकला आहे. या कथावर्णनाचा दशमांत अगदीं कळस करून पंतानीं उघडपणें ' परि म्यां भागवतवरें भागवतांतील फार रस नेला ' (१०।४२८) असें जाहीर केलें आहे!

मूळ व पंतकृति या ताडून पाहणाऱ्यानीं पंतांचें भाषांतरचातुर्य, संक्षेपविस्तारकौशल्य, इत्यादि गुणांची तारीफ च केलेली आहे, व त्यांची स्वतंत्र प्रतिभा, त्यांचें पदलालित्य, त्यांची सालंकार वाणी, त्यांचा बहुश्रुतपणा, त्यांची मार्मिकता, त्यांचें सूक्ष्मावलोकन, त्यांची रसिकता व विशेषेंकरून त्यांचें शुद्ध भक्तिप्रेम यांची वाखाणणी करून त्यांस धन्यवाद दिलेले आहेत.

कोठें अध्यायाचे अध्यायांचा अर्क काढून तो एका आर्याबिंदूंत सांठविला आहे, कोठें भगवत्प्रेमाची उसळी आल्याबरोबर आपल्या प्रतिभेचा लगाम सैल सोडला आहे, कोठें गहन तत्त्वविचार आला तेव्हां फार सावधगिरीनें ताजवा धरला आहे. इत्यादि अनेक चमत्कार पंतानीं या काव्यांत प्रकट केले आहेत.

आपलें भारत पंतानीं काशीस्थ पंडितांपुढें अभिप्रायार्थ टाकल त्या वेळीं, घटपटादि खटपटींत दंग झालेल्या पंडितवर्यांनीं मोठ्या मिनतवारीनें ' शलाकापरीक्षा ' केली व आश्चर्याची गोष्ट कीं, पंत या दिव्यांतून हि विजयमंडित होऊन बाहेर पडले. आम्हीं हि आज अशी च शलाकापरीक्षा करण्याचें ठरविलें आहे. ह्या पहा दशम स्कंधांतील पृ. २०४ वरील आर्या निघाल्या! काढा मूळ भागवताचा ४८ वा अध्याय आणि २९।३० ३१ श्लोकांत भगवान् काय म्हणतात पहा. या तिन श्लोकांवर पंतांच्या सुंदर सहा ( ६२३ ते ६२८ ) आर्या आहेत. भागवताचा ३१ वा श्लोक व पंतांची ६२५ वी आर्या ताडा.

**न ह्यम्मयानि तीर्थानि न देवा मृच्छिलामयाः ।**
**ते पुनंत्युरुकालेन** दर्शनादेव साधवः ॥ ३१ ॥ भा. द. ४८

दशमामध्यें पंतांची काव्यगंगा अप्रतिहत धों धों वाहत चालली असून आरंभींचे उपोद्घातांत,

**गायत्रि ! वेदमाते ! मीं केवळ तोक विप्र; या साचें**
**हें सुख दे, तुज नत जो, पात्र नव्हे तो कवि प्रयासाचें. ५**

अशी पंतांनीं केलेली प्रार्थना सुफलितार्थ झाली आहे. एकदां सुरू झालेला ओघ इतका अनावर झाला कीं, " वाढेल ग्रंथ म्हणुनि आवरितों मीं बळें चि रसनेला" (१०।४२८) असें म्हणून पंताना आपल्या काव्यवारूला जबरदस्तीनें थोपवावें लागलें.

आपला ग्रंथ प्रमाणाबाहेर वाढेल हा धाक पंताना सतत वाटत असे. विस्तार न करण्याचीं कारणें पंतांनीं दिलीं आहेत, तीं पंतचरित्रांत (पृ. ४१४–४१५) जिज्ञासूंनीं पहावीं. पंचम स्कंधाच्या उपसंहारांत पंत स्वतः च लिहितातः—

**ते जरि पदार्थ इतरें वर्णावे, ग्रंथ बहु न कां वाढे ?**
**रसिक हि निरलस सादर साधु सदा स्वच्छ थोडके गाढे. ६१**
**वानावीं पाताळें सप्त, बळिश्री अनंत वानावे,**
**परि मंत्रवर्ण अडविति; आदरिले गुरु कसे न मानावे ? ६२**
**सुज्ञसमाजसुरासिक श्रीहरि च म्हणेल न लघु पृथु कांहीं,**
**स्वल्पार्थस्कंधांहीं तृप्त चि होईल जेंवि पृथुकांहीं. ६३**

या आर्यांत प्रकट झालेली पंतांची मार्मिकता व चातुर्य अपूर्व आहेत. असें विस्तारभय पंतांनीं बाळगिलें आहे; तथापि नवम स्कंधांतील ९३ ते ९९ गीतीपर्यंत रोहिताकरितां त्याच्या बापानें वरुणाशीं चालविलेला चिकटपणा वर्णिताना पंतांनीं हि त्याचें च अनुकरण केलें आहे ! असो. असे दोष ' गुणसन्निपातांत ' पार गडप होतात.

श्रीमद्भागवत व मंत्रभागवत यांच्या तुलनात्मक विचाराच्या खोल पाण्यांत शिरण्यास येथें वाव नाहीं. मूळ भागवत १८००० आहे तर

पंतांचें त्याच्या $\frac{1}{5}$ इतकें आहे. त्यांतील कठिण तत्त्वज्ञानास बेताबेताची जागा देऊन पंतानीं सर्व भर कथाभागावर च टाकला आहे. या कथावर्णनाचा दशमांत अगदीं कळस करून पंतानीं उघडपणें 'परि स्यां भागवतवरें भागवतांतील फार रस नेला' (१०।४२८) असें जाहीर केलें आहे!

मूळ व पंतकृति या ताडून पाहणाऱ्यानीं पंतांचें भाषांतरचातुर्य, संक्षेपविस्तारकौशल्य, इत्यादि गुणांची तारीफ च केलेली आहे, व त्यांची स्वतंत्र प्रतिभा, त्यांचें पदलालित्य, त्यांची सालंकार वाणी, त्यांचा बहुश्रुतपणा, त्यांची मार्मिकता, त्यांचें सूक्ष्मावलोकन, त्यांची रसिकता व विशेषेंकरून त्यांचें शुद्ध भक्तिप्रेम यांची वाखाणणी करून त्यांस धन्यवाद दिलेले आहेत.

कोठें अध्यायाचे अध्यायांचा अर्क काढून तो एका आर्याबिंदूंत सांठविला आहे, कोठें भगवत्प्रेमाची उसळी आल्याबरोबर आपल्या प्रतिभेचा लगाम सैल सोडला आहे, कोठें गहन तत्त्वविचार आला तेव्हां फार सावधगिरीनें ताजवा धरला आहे, इत्यादि अनेक चमत्कार पंतानीं या काव्यांत प्रकट केले आहेत.

आपलें भारत पंतानीं काशीस्थ पंडितांपुढें अभिप्रायार्थ टाकलें त्या वेळीं, घटपटादि खटपटींत दंग झालेल्या पंडितवर्यानीं मोठ्या मिनतवारीनें 'शलाकापरीक्षा' केली व आश्चर्याची गोष्ट कीं, पंत या दिव्यांतून हि विजयमंडित होऊन बाहेर पडले. आम्हीं हि आज अशी च शलाकापरीक्षा करण्याचें ठरविलें आहे. ह्या पहा दशम स्कंधांतील पृ. २०४ वरील आर्या निघाल्या! काढा मूळ भागवताचा ४८ वा अध्याय आणि २९।३० ३१ श्लोकांत भगवान् काय म्हणतात पहा. या तीन श्लोकांवर पंतांच्या सुंदर सहा (६२३ ते ६२८) आर्या आहेत. भागवताचा ३१ वा श्लोक व पंतांची ६२५ वी आर्या ताडा.

**न ह्यम्मयानि तीर्थानि न देवा मृच्छिलामयाः ।**
**ते पुनंत्युरुकालेन** दर्शनादेव साधवः ॥ ३१ ॥ भा. द. ४८

**देती फळ बहु दिवसां देव शिलाकाष्ठमृन्मय प्रणतां.**
**जळमय तीर्थें हि तसीं**, संत चि फळती 'नमोस्तुऽते' म्हणतां.

१०।६२५

शेवटचा चरण खुलवून पंतानीं मूळावर हि कशी ताण केली आहे? काशीस्थ पंडिताना जो अनुभव आला तो च आपणांस हि येणार.

**स्वल्प म्हणोनि न सोडी अमृताची शक्ति सर्व चव थेंबा.**

—विराटपर्व.

३२. एखाद्या कवीच्या प्रमाणआवृत्तीचे फायदे सांगण्याचें आतां फारसें प्रयोजन नाहीं. काव्यसंग्रहांत श्री. वामनराव ओकासारख्या उद्योगी पंडितानें केलेली कामगिरी किती हि महत्त्वाची असली तरी प्रस्तुतच्या प्रयत्नानें पंतकाव्यांचे शुद्ध व खरे कविलिखित पाठ मिळून जो फायदा मिळणार तो इतर आवृत्त्यानीं कदापि मिळावयाचा नाहीं. मंत्रभागवतांत हि अनेक ठिकाणीं ही गोष्ट नजरेस येईल. ही गोष्ट पूर्वीं च अनेक वेळां सिद्ध केलेली असल्यामुळें उगा च यादी देऊन जागा अडवीत नाहीं. चांचणीकरितां, धांव उरगतनु ( का० ) धावदुरगतनु (४।९८), श्रीकांतसंघशोगान( का० ) श्रीकांतसद्यशोगान (४।१७४), नारदमुनि ( का० ) नारदमनु ( ५।२ ), नग ( का० ) मग (५।४१), 'तो' 'यशीं बहू' (का०) 'तों' 'यशीं च बहु' ( ९।६९ ), चारी (का०) भारी ( ९।१३१ ), कटे ( का० ) कडे ( १०।४४ ), तया ( का० ) दया ( ११।२५२ ) इ. इ. पहावेत.

खुद्द पंतानीं च जे अन्यपाठ दिले आहेत त्यांपैकीं कांहीं मूळचे हि सुंदर आहेत. उ. १०।१५०–१७३ इ. सर्व च मंत्रभागवत सरस असून दशम तर केवळ अमृत च आहे. त्यांत आवडीनिवडीला जागा च थोडी; तथापि कांहीं उत्कृष्ट निवडक स्थळांची यादी देतों.

'**त्या सुयशोमृतनिधिचे कण हे गोळा सदुर्बळें केले.**' ७।१५५.

**प्रथम माळा**:—२।७६–८८, ३।१०५ ते १०८,

४।३९-४१-४२-४७-४९-५०, ५।५८-६६, पंचमोपसंहार, ६।१७७-१८१, श्रम कळविति चित्तदूत पाठउनी ७।२८, ९।१८५-२१३, अंगुलि चुरुचुरु चोखी ( ९।८० ).

**द्वितीय माळाः**--( सर्व च गोड-पूर्वार्ध बहारीचा ). मायाहवन ( १०।८०-९३ ), कृष्णाची बाललीला ( १०।१६२-१७८ ), गोपाळकाला ( १०।२१३-२२४ ), गोगोपावतार ( १०।२३०-२४० ), रासक्रीडा ( १०।३९५-४०१ ), अक्रूरागमन ( १०।४९३-५०२ ), नंदादिकांस निरोप ( १०।५६३-५७४ ), अक्रूरगोपाप्रेमसंवाद ( १०।५८५-६२१ ), अक्रूरकृष्णसंवाद ( १०।६१५-६३३ ), कुंतीअक्रूरविदुरादिकांचीं भाषणें ( १०।६३३-६६० ), पूर्वार्धाचा उपसंहार. उत्तरार्धः—सुदामदेवकृष्णभेट ( १०।९९७-९९८ ), भृगु-प्रार्थना ( १०।११०१-११०५ ), उपसंहार ( १०-११८९ ).

**तृतीय माळाः**—११।५९१-५९२, मोहें रडत चि गेला, तो उद्धव बाळ जेंवि शाळेला ! ( ११।५८५ ), कलिप्रभाव ( १२।२६-३६ ), उपसंहार.

४।२०-४५, ८।८३-१४३-१५१, ९।१८, १०।३६२-३६३-६१४-०६७, ११।३२१ इ. अशीं क्लिष्ट स्थळें थोडीं आहेत.

मागें उल्लेखिलेल्या ग्रंथांशिवाय पंतांचीं निरनिराळीं १९ भागवती प्रकरणें आहेत व त्यांत भीष्मभक्तिभाग्यासारखीं कित्येक अत्यंत गोड आहेत. त्या च त्या कथा उ. ध्रुवकथा, प्रह्लादकथा पंतानीं भिन्न भिन्न प्रसंगीं कशा वर्णिल्या आहेत हें बघणें फार मौजेचें व आदंदायक आहे; असो.

या भागाच्या शेवटीं जोडण्यांत आलेलें ‘ **मंत्रमयभागवत** ’ म्हणजे एक भाविकपणानें केलेली कसरत असून ती प्रेक्षणीय हि नसल्यामुळें त्याबद्दल कांहीं लिहित नाहीं. येथवर हातीं घेतलेल्या कामाचा पल्ला कसाबसा आणून पोंचविला ! ह्या कामीं माझी योजना कोणत्या हेतूनें करण्यांत आली याची मीमांसा करण्यास मी असमर्थ आहें. हें जड व जबाबदारीचें काम अधिकार नसतां हि स्वीकारण्यांत माझा हेतु कोणता म्हणाल, तर

पंतग्रंथप्रकाशनाच्या प्रचंड गोवर्धनोद्धारास आपली हि पिंजकी छडी लावावयाची ! आधीं च श्रीमद्भागवतासारखा गहन ग्रंथ, त्यावर पंतासारख्या कुशल कारागिराची मखलाशी; " तेथ अल्प मीं अतिमंद काइ होयें "! खरोखर च,

**हें अनावरत विचारितां । वायां चि धिंवसा उपनला चित्ता ।**
**यऱ्हविं काइ भानुतेजीं खद्योता । शोभा आथि ॥ १–६७ ॥**

**कां टिटिभु चांचुवेऱ्हीं । माप सुये सागरीं ।**
**मीं नेणतु तिया परी । प्रवर्ते एथ ॥ ६८ ॥**

**आइकां आकाश गवंसावें । तरि आणिक तैसें चि होआवें ।**
**म्हणौनि अपाडु हें आघवें । निर्धारितां ॥ ६९ ॥**

येवढ्यासाठीं सर्व पंतभक्त रसिक सज्जनाना 'तात्पर्यावरि च दृष्टि' ठेवण्यास सांगून श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दांत

**तऱ्हीं न्यून तें पुरतें । अधिक ही सरतें ।**
**करूनि घेयावें हें तुमतें । विनविलें मियां ॥ ८० ॥**

# मंत्रभागवत
# विषयानुक्रमणिका.

**प्रथम स्कन्ध ( पृष्ठांक १):**—नमनाध्याय ( १-११ ); सूत भागवत सांगण्यास सुरुवात करतात ( १-२ ); भगवंताचे चोवीस अवतार ( ३ );- "भगवन्महिमा वर्णन कर, म्हणजे तुझ्या मनाची हुरहुर राहील" असा नारदाचा व्यासास उपदेश (४-११); व्यास शुकास भागवत पढवितात ( १२-१३ ); शुक परीक्षितीस सांगतात ( १४ ); अर्जुन 'सौप्तिक' प्रकरणानंतर अश्वत्थाम्याचा पाठलाग करतो ( १५-१७ ); अश्वत्थामा ब्रह्मास्त्र योजतो ( १८-१९ ); पार्थ सर्वास्त्रवारण करतो ( २०-२१ ); द्रौपदीची विनंति ( २२ ) ऐकून पार्थानें मणि काढून अश्वत्थाम्याला सोडलें ( २३ ); सर्वांच्या उत्तरक्रिया आटोपल्यावर (२४) धर्मास कृष्ण राज्यपदीं स्थापतो व तीन अश्वमेध करवितो ( २५ ); उत्तरेची प्रार्थना ( २६-२७ ); कृष्ण गर्भस्थ परीक्षितीचें रक्षण करतो ( २८-२९ ); कुंतीचा हर्ष ( ३० ); कृष्णास राहण्याचा आग्रह ( ३१ ); धर्माचा शोक ( ३२ ); भीष्माचा धर्मास बोध ( ३३-३५ ) व निर्याण ( ३६ ); धर्मास राजपद ( ३७ ); कृष्ण द्वारकेस परततो ( ३८-३९ ); गर्भांतील भगवत्स्वरूप ( ४० ) योग्य काळीं गुप्त होतें ( ४१ ); परीक्षितीचा जन्म ( ४२ ); जातकर्म ( ४३ ); आनंदानें ( ४४ ) द्विजाशीर्वाद ( ४५ ) व ज्योतिषांचें भविष्य ( ४६-४७ ); परीक्षित नांवाचा अर्थ (४८); तीन अश्वमेध (४९-५०) सार्जुन कृष्ण द्वारकेस जातो ( ५१ ); विदुर धर्मास तीर्थयात्रावृत्त सांगतो ( ५२-५६ ); विदुराच्या सांगण्यावरून ( ५७-५९ ) गांधारीसह धृतराष्ट्र हिमालयाकडे निघून गेला ( ६०-६१ ); धर्माचा शोक ( ६२-६३ ); धृतराष्ट्रादिकांची गति वर्णून नारदानीं धर्माचा सर्व खेद दूर केला ( ६४-७१ ); अर्जुनविरहानें व उत्पातदर्शनानें चिंताग्रस्त झालेल्या धर्माला अर्जुन भेटला ( ७२-७५ ); खिन्न अर्जुनानें कृष्णनिर्याण, स्वपराभव वगैरे वर्तमान कळविलें

( ७६-८१ ) तें ऐकून सर्व शोक करूं लागले ( ८२ ); धर्माचा प्रस्थानविचार ( ८३ ); मथुरा व हस्तिनापुर येथें नवीन राजांची स्थापना ( ८४ ); पांडवांचें ( ८५-८६ ) व विदुराचें निर्याण ( ८७ ); परीक्षितीचें लग्न ( ८८ ); त्यास चार पुत्र ( ८९ ); त्याचे तीन अश्वमेध ( ९० ); कलिप्रभाव ( ९१ ); परीक्षितीचा दिग्विजय ( ९२ ); प्रभुलीलागान ( ९३-९४ ); बैलरूपी कलीस परीक्षित शिक्षा करितो ( ९५-१०० ); शमीकऋषीच्या गळ्यांत परीक्षित मृतसर्प बांधतो ( १०१-१०३ ); शृंगीचा शाप व आक्रोश ( १०४ ); जागृत होऊन ( १०५ ) दयाळु शमीक तो शाप राजास कळवितो ( १०६ ); अनशन-संकल्प राजास सर्व मुनी भेटतात ( १०७-१०९ ); मुनींची पूजा ( ११० ) व प्रार्थना ( १११-११४ ); मुलास राज्याभिषेक करून ( ११५ ) परीक्षितीनें मुनीस प्रश्न विचारला ( ११६ ) तों च शुकाचार्य आले .( ११७ ); शुकाचा सत्कार व राजाचा प्रश्न ( ११८-१२१ ).

**द्वितीय स्कन्ध (पृष्ठांक १४)**:—शुक परीक्षितीस भागवतमाहात्म्य वर्णून (१-६) " सद्योमुक्ति व क्रममुक्ति यांचे ज्ञानतपोयोगादि पुष्कळ मार्ग आहेत, परंतु त्यांत भक्तियोग सार आहे," इत्यादि उपदेश करितात (७-१५); जगदुत्पत्ति-स्थितिलय व ब्रह्माद्यवतारचरित्रें ह्याविषयीं परीक्षितीच्या प्रश्नास ( १६-१७ ) शुक उत्तरार्थ, नारदब्रह्मदेवांचा एतद्विषयक संवाद सांगतो ( १८-२० ); ब्रह्मदेव म्हणतो:—नारायण च सर्वकर्ता आहे (२१-२६); ब्रह्मांड व पुरुष यांची उत्पत्ति (२७-२९) ब्रह्मदेवाचा यज्ञ (३०-३१) परमेश्वर दुर्ज्ञेय( ३२-३४ ), पहिला 'सहस्रशीर्षा पुरुष' हा अवतार ( ३५ ); सर्व देवऋषि हे हि अवतार (३६-३९); यज्ञवराह (४०), सुयज्ञ (४१), कपिल (४२), दत्त (४३), सनकादि (४४), नरनारायण (४५-४९), ध्रुवदर्शनार्थ वत्सलावतार ( ५०-५४ ), वेनाकरतां त्याचा पुत्र ( ५५-५६ ) पृथु या नांवांचा ( ५७-५८ ), ऋषभदेव ( ५९ ), हयवदन ( ६० ), मत्स्य ( ६१ ), कच्छ ( ६२-६३ ), हरि [ नृसिंह ] ( ६४ ), गजेंद्रार्थ ( ६५ ) , बळी ( ६६ ), हंस ( ६७ ), मनुरूप ( ६८ ), धन्वंतरी ( ६९ ), भृगुराम ( ७० ) राम ( ७१-७३ ), बलराम ( ७४ ), वासुदेव ( ७५-८८ ), व्यास ( ८९ ), बुद्ध ( ९०-९१ ), कल्कि ( ९२ ) इत्यादि अवतार—त्यांचें आनंत्य प्रल्हादादिक च

जाणोत ( ९३-९६ ); नारदा, हें भागवत मीं तुला सांगितलें, त्याचा प्रसार कर ( ९७-९९ ); राजाची भागवत सांगण्याची प्रार्थना ऐकून ( १००-१०१ ) श्रीशुक म्हणतात:—ब्रह्मदेव नाभिकमलांत तप करूं लागला ( १०२-१०५ ), तेव्हां वैकुंठलोकीं दर्शन होऊन भगवंताच्या इच्छेवरून ( १०६-११० ) 'तत्त्वज्ञान द्या ' असा वर मागितला (१११); ' मी च मूळ होतों, अन्वयव्यतिरेकानें तूं सिद्धांत पहा ' हा भगवदुपदेश ( ११२-११७ ) ऐकून संतोषलेल्या विधीनें ( ११८ ) नारदास ( ११९ ) भागवत उपदेशिलें; त्यानें व्यासास बोधिलें; मी शुक तुला सांगतों ( १२० ); सूताचा शौनकास विदुरमैत्रेयतीर्थसंगाबद्दल प्रश्न ( १२१ ).

**तृतीय स्कन्ध (पृष्ठांक २६)**:—परीक्षितीस शुक मैत्रेयविदुरसंवाद सांगतात (१-२); पांडवांचा छळ (३-५); कृष्णोपदेश ( ६ ); विदुराचा उपदेश, उपहास व तीर्थयात्रा ( ७-१७ ); यादवनाशासंबंधीं विदुर व उद्धव यांचें भाषण ( १८-२५ ); 'भगवंताचें उपदेशामृत तुला मैत्रेय पाजील ' असें म्हणून उद्धव बदरीस गेला ( २६-२९ ); मैत्रेय विदुराचें धन्यत्व वर्णितो (३०-३४); 'भागवत ऐकून धन्य हो' ( ३५-३७ ); सृष्टि-मन्वादिकांची उत्पत्ति ( ३८-४१ ); मनूच्या प्रार्थनेवरून ( ४२ ) ब्रह्मदेवाच्या नाकांतून निघालेल्या वराहानें हिरण्याक्षाला वधून पृथ्वीचा उद्धार केला ( ४३-५० ); हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु यांची उत्पत्तिकथा-दितीस वर ( ५१-५९ ); सनकादिकुमारांचा जयविजयांनीं अपमान केल्यामुळें त्यांचा त्यांस शाप ( ६०-६२ ); भगवान् धांवून येऊन कुमारांचें समाधान करतात (६३-७६); शापानुसार जयविजय हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु झाले (७७-८१); त्यांचा धुडगूस(८२-८३);हिरण्याक्षाचा नाश (८४-८८); कर्दमाची तपश्चर्या व त्यास वरप्राप्ति ( ८९-९३ ); कर्दमदेवहूतिविवाह ( ९४-९६ ); देवहूतीस कर्दमाचा वर ( ९७-१०३ ); कर्दमदेवहूती बिंदुसरोवरांतील ऐश्वर्य भोगून ( १०४-११२ ) परत येतात ( ११३ ); नऊ कन्या व त्यांचे विवाह करून व स्वपुत्र कपिलाचा जन्मोत्सव करून कर्दम गेला ( ११४-१२३ ); कपिल देवहूतीमातेस सांख्योपदेश करून निघून जातो ( १२४-१२९ ); देव-

( ७६-८१ ) तें ऐकून सर्व शोक करूं लागले ( ८२ ); धर्माचा प्रस्थानविचार ( ८३ ); मथुरा व हस्तिनापुर येथें नवीन राजांची स्थापना ( ८४ ); पांडवांचें ( ८५-८६ ) व विदुराचें निर्याण ( ८७ ); परीक्षितीचें लग्न ( ८८ ); त्यास चार पुत्र ( ८९ ); त्याचे तीन अश्वमेध ( ९० ); कलिप्रभाव ( ९१ ); परीक्षितीचा दिग्विजय ( ९२ ); प्रभुलीलागान ( ९३-९४ ); बैलरूपी कलीस परीक्षित शिक्षा करितो ( ९५-१०० ); शमीकऋषीच्या गळ्यांत परीक्षित मृतसर्प बांधतो ( १०१-१०३ ); शृंगीचा शाप व आक्रोश ( १०४ ); जागृत होऊन ( १०५ ) दयाळु शमीक तो शाप राजास कळवितो ( १०६ ); अनशन-संकल्प राजास सर्व मुनी भेटतात ( १०७-१०९ ); मुनींची पूजा ( ११० ) व प्रार्थना ( १११-११४ ); मुलास राज्याभिषेक करून ( ११५ ) परीक्षितीनें मुनीस प्रश्न विचारला ( ११६ ) तों च शुकाचार्य आले ( ११७ ); शुकाचा सत्कार व राजाचा प्रश्न ( ११८-१२१ ).

**द्वितीय स्कन्ध (पृष्ठांक १४)**:–शुक परीक्षितीस भागवतमाहात्म्य वर्णून (१-६) " सद्योमुक्ति व क्रममुक्ति यांचे ज्ञानतपोयोगादि पुष्कळ मार्ग आहेत, परंतु त्यांत भक्तियोग सार आहे," इत्यादि उपदेश करितात (७-१५); जगदुत्पत्ति-स्थितिलय व ब्रह्माद्यवतारचरित्रें ह्याविषयीं परीक्षितीच्या प्रश्नास ( १६-१७ ) शुक उत्तरार्थ, नारदब्रह्मदेवांचा एतद्विषयक संवाद सांगतो ( १८-२० ); ब्रह्मदेव म्हणतो:–नारायण च सर्वकर्ता आहे (२१-२६); ब्रह्मांड व पुरुष यांची उत्पत्ति (२७-२९) ब्रह्मदेवाचा यज्ञ (३०-३१) परमेश्वर दुर्ज्ञेय( ३२-३४ ), पहिला 'सहस्रशीर्षा पुरुष' हा अवतार ( ३५ ); सर्व देवऋषि हे हि अवतार (३६-३९); यज्ञवराह (४०), सुयज्ञ (४१), कपिल (४२), दत्त (४३), सनकादि (४४), नरनारायण (४५-४९), ध्रुवदर्शनार्थ वत्सलावतार ( ५०-५४ ), वेनाकरतां त्याचा पुत्र ( ५५-५६ ) पृथु या नांवाचा ( ५७-५८ ), ऋषभदेव ( ५९ ), हयवदन ( ६० ), मत्स्य ( ६१ ), कच्छ ( ६२-६३ ), हरि [ नृसिंह ] ( ६४ ), गजेंद्रार्थ ( ६५ ), बळी ( ६६ ), हंस ( ६७ ), मनुरूप ( ६८ ), धन्वंतरी ( ६९ ), भृगुराम ( ७० ) राम ( ७१-७३ ), बलराम ( ७४ ), वासुदेव ( ७५-८८ ), व्यास ( ८९ ), बुद्ध ( ९०-९१ ), कल्कि ( ९२ ) इत्यादि अवतार–त्यांचें आनंत्य प्रल्हादादिक च

जाणोत ( ९३-९६ ); नारदा, हें भागवत मीं तुलां सांगितलें, त्याचा प्रसार कर ( ९७-९९ ); राजाची भागवत सांगण्याची प्रार्थना ऐकून ( १००-१०१ ) श्रीशुक म्हणतातः—ब्रह्मदेव नाभिकमलांत तप करूं लागला ( १०२-१०५ ), तेव्हां वैकुंठलोकीं दर्शन होऊन भगवंताच्या इच्छेवरून ( १०६-११० ) 'तत्त्वज्ञान द्या' असा वर मागितला (१११); 'मी च मूळ होतों, अन्वयव्यतिरेकानें तूं सिद्धांत पहा' हा भगवदुपदेश ( ११२-११७ ) ऐकून संतोषलेल्या विधीनें ( ११८ ) नारदास ( ११९ ) भागवत उपदेशिलें; त्यानें व्यासास बोधिलें; मी शुक तुला सांगतों ( १२० ); सूताचा शौनकास विदुरमैत्रेयतीर्थसंगाबद्दल प्रश्न ( १२१ ).

**तृतीय स्कन्ध (पृष्ठांक २६)**:—परीक्षितीस शुक मैत्रेयविदुरसंवाद सांगतात (१-२); पांडवांचा छळ (३-५); कृष्णोपदेश ( ६ ); विदुराचा उपदेश, उपहास व तीर्थयात्रा ( ७-१७ ); यादवनाशासंबंधीं विदुर व उद्धव यांचें भाषण ( १८-२५ ); 'भगवंताचें उपदेशामृत तुला मैत्रेय पाजील' असें म्हणून उद्धव बदरीस गेला ( २६-२९ ); मैत्रेय विदुराचें धन्यत्व वर्णितो (३०-३४); 'भागवत ऐकून धन्य हो' ( ३५-३७ ); सृष्टि-मन्वादिकांची उत्पत्ति ( ३८-४१ ); मनूच्या प्रार्थनेवरून ( ४२ ) ब्रह्मदेवाच्या नाकांतून निघालेल्या वराहानें हिरण्याक्षाला वधून पृथ्वीचा उद्धार केला ( ४३-५० ); हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु यांची उत्पत्तिकथा-दितीस वर ( ५१-५९ ); सनकादिकुमारांचा जयविजयांनीं अपमान केल्यामुळें त्यांचा त्यांस शाप ( ६०-६२ ); भगवान् धांवून येऊन कुमारांचें समाधान करतात (६३-७६); शापानुसार जयविजय हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु झाले (७७-८१); त्यांचा धुडगूस(८२-८३);हिरण्याक्षाचा नाश (८४-८८); कर्दमाची तपश्चर्या व त्यास वरप्राप्ति ( ८९-९३ ); कर्दमदेवहूतिविवाह ( ९४-९६ ); देवहूतीस कर्दमाचा वर ( ९७-१०३ ); कर्दमदेवहूती बिंदुसरोवरांतील ऐश्वर्य भोगून ( १०४-११२ ) परत येतात ( ११३ ); नऊ कन्या व त्यांचे विवाह करून व स्वपुत्र कपिलाचा जन्मोत्सव करून कर्दम गेला ( ११४-१२३ ); कपिल देवहूतीमातेस सांख्योपदेश करून निघून जातो ( १२४-१२९ ); देव-

हूतीच्या विसर्जित देहाची नदी (१३०), तें स्थान सिद्धपद (१३१); उपसंहार (१३२).

**चतुर्थ स्कन्ध ( पृष्ठांक ४० )**:—आकूतीचा वंश (१-२); कर्दमाच्या कलादि नऊ कन्यांचा वंश (३-२०):—अत्रिमुनीस दत्तादि पुत्रत्रय (३-१०); दक्ष-कन्यांचा वंश (११-२७); दक्षाध्वरभवनचरित [ **पंत** ] (२८-६५):—दक्षशिव-द्वेष (२८-३५); दक्षाचे यज्ञ (३६-३८); सती शिवाचें न ऐकून यज्ञास आली (३९-४८); दक्षाचा सतीकृत धिक्कार (४९-५२); सती देह सोडते (५३-५४); वीरभद्र दक्षयज्ञ विध्वंसितो (५५); देवांची प्रार्थना (५६-५८) ऐकून शिव शांत होतात (५९); बोकडाचें शिर लावलेला दक्ष शरण येतो (६०-६५); ध्रुवचरित (६६-९५); ध्रुवाचा वंश (९६-९७); वेनकथा-पृथूचा जन्म (९८-१०४); राज्याभिषिक्त ऐश्वर्यवान् पृथु (१०५-११०) प्रजांची तक्रार ऐकून (१११) पृथ्वीच्या मागें लागला (११२-११५); तिच्या प्रार्थनेवरून त्यानें तिचें दोहन करून प्रजा तुष्टविल्या (११६-१२५); पृथूचे यज्ञ-इंद्राचा अडथळा (१२६-१३५); पृथूची समजूत व निधन (१३६-१४३); पृथुस्त्री सती गेल्यावर (१४४) त्याचे पुत्रपौत्र राज्य करितात (१४५-१४८); प्राचेतसांची कथा (१४९-१७६):—प्राचेतसांचें तप (१४९-१५०); शंकराचा उपदेश (१५१ १५३); प्राचीनबर्हीचें निर्वाण (१५४-१५७); त्यांस प्रभु कंडु-कथा सांगून वर देतात (१५८-१६५); वृक्षकन्या-वार्क्षीशीं विवाहादि झाल्यावर (१६६-१७०) नारदापासून आत्मज्ञान पावून ते कृतकृत्य झाले (१७१-१७६).

**पंचम स्कन्ध ( पृष्ठांक ५६ )**:—प्रियव्रतचरित (१-१५); आग्नीध्र (१६-१८), नाभि (१९-२१), ऋषभ व भरत यांच्या कथा (२२-३२); भरत मृग होतो (३३-३८); जडभरतकथा (३९-५७); भूगोल, आकाश, पाताळ व नरक यांचे सारवर्णन (५८-६६).

**षष्ठ स्कन्ध ( पृष्ठांक ६३ )**:—नाममहिमा (१-४); अजामिळकथा (५-३५):—यमदूतविष्णुदूतसंवाद (१४ ३०); यम प्रभुमाहात्म्य वर्णितो (३६-४३); दक्षाचे पुत्र हर्यश्व (४४-४८) याना नारदाचा बापाला अप्रिय असा उपदेश (४९-५८); दक्षाचे नवीन पुत्रांस तो च उपदेश केल्यामुळें नारदास शाप (५९-६४);

दक्षसुता (६५-६९); बृहस्पतींचा अपमान (७०-७१) व देवदानवयुद्ध (७२-७३); ब्रह्मदेवाची सल्ला व विश्वरूपाचा यशस्वी कारभार (७४-७७); विश्वरूपाचा वध (७८-८०); वृत्राचा पराक्रम (८१-८३); शरणागत देवांस प्रभूंचा सल्ला (८४-८७); अश्विनीकुमारांनीं इंद्राच्या दबकावणीस न भितां दधीचीपासून आपला कार्यभाग उरकला (८८-९८); प्रसन्न झालेल्या दधीचीच्या अस्थींचें वज्र (९९-१०२); देवदानवइंद्र व न्यायी वृत्र यांचें तुंबळ युद्ध–वृत्रवध (१०३-१२५); हत्यादोष व इंद्राची दुर्दशा (१२६-१३०); नहुषाचा पात व इंद्राची पुनःस्थापना (१३१-१३५); चित्रकेतुकथा–अंगिराप्रसादानें झालेला पुत्र सवतिमत्सरास बळी पडतो (१३६-१४४); अंगिरा व नारद यांचा राजास बोध (१४५-१५२); नारदानें जिवंत केलेला राजपुत्र सर्वांचें सांत्वन करून नष्ट झाला (१५३-१५९); चित्रकेतूस विद्याप्राप्ति (१६०-१६४); चित्रकेतू शिवाचा उपहास करतो (१६५-१७०); त्यास पार्वतीचा शाप (१७१-१७६); चित्रकेतूची क्षमायाचना (१७७-१८१); शापामुळें हा च वृत्र झाला (१८२-१८४); दितीचें व्रत–इंद्राचें कपट व एकुणपन्नास मरुद्गणांची उत्पत्ति (१८५-१९७); उपसंहार (१९८).

**सप्तम स्कन्ध (पृष्ठांक८१)**:–प्रह्लादचरित(ऊर्फ 'नरहरिचरित '–पंत) प्रारंभ (१-२); हिरण्यकशिपूचें तप (३-८); वरप्राप्ति (९-२१); त्याचे अत्याचार(२२-२७);आकाशवाणी(२८-३२);प्रह्लादाची वृत्ति–भाषण–हिरण्यकशिपूचा व गुरूचा क्रोध (३३-४५); पुनः परीक्षा (४७-५१); निर्भयचित्त प्रह्लादाची स्पष्टोक्ति व छळ (५२-६७); पुनराध्यापन (६८-७३) व संवगड्यांस हरिभक्तीचा उपदेश (७४-८५); प्रह्लादाच्या मातेस इंद्रानें धरून नेलें व नारदोपदेशावरून सोडलें इत्यादि कथा (८६-९८); प्रह्लादहिरण्यकशिपूंचा खडा सामना (९९-११३); नरसिंहावतार (११४-१२१); थोडी झटापट व हिरण्यकशिपूचा मत्यु (१२२-१२८); सिंहासनारूढ प्रभू व आनंदीआनंद (१२९-१३५); प्रह्लादप्रार्थनेवरून शांत झालेल्या प्रभूकडून हिरण्यकशिपूद्धारादि वरप्राप्ति (१३६-१४८); ब्रह्मदेवास उपदेश व अंतर्धान (१४९-१५३); उपसंहार (१५४-१५६); मयांचीं त्रिपुरें व शंकरांशीं युद्ध

( १५७-१६३ ); विष्णूची युक्ति व मयादिकांचा पराभव ( १६४-१६६ ); त्यास धर्मलक्षणें, वर्णाश्रमादिकांचा नारदकृत बोध ( १६७-१७६ ).

**अष्टम स्कन्ध (पृष्ठांक ९७):**— मन्वंतरें (१); गजेंद्रमोक्ष ( २-१८ ); गजेंद्राचें पूर्ववृत्त [ इंद्रद्युम्न राजा—त्यास अगस्त्याचा शाप व भगवंताची दया ] ( १९-२४ ); पुढील मन्वंतरें ( २५-२६ ); देवांची दया-श्रीभगवान् त्यांस क्षीराब्धिमंथन करण्यास आज्ञापितात ( २७-३५ ); बळीकडे जाऊन देवांनीं असुरांचें सहकारित्व मिळविलें ( ३६-३९ ); भगवंतानीं मंदर लीलेनें नेला ( ४०-४२ ); मंथन व कच्छावतार ( ४३-५० ); प्रभु स्वतः च मंथन आरंभितात ( ५१ );उत्पन्न झालेलें हालाहल विष शंकर धारण करितात ( ५२-५९ ); निरनिराळीं रत्नें निघालीं ( ६०-६५ ); अमृतोत्पत्ति व राहुवध ( ६६-७० ); देवासुरांचें तुंबळ युद्ध ( ७१-८२ ); शुक्राचार्यांची संजीवनी ( ८३ ); शंकरास त्यांच्या आग्रहावरून मोहिनीरूप दर्शन, त्यांची त्रेधा व शेवटीं मोहनिरसन ( ८४-१०३ ); वामनावतारः—बळीचा प्रताप व स्वर्गलोकावर राज्य—इंद्राची सोडचिठी ( १०४-११३ ); अदितीस वरप्राप्ति ( ११४-११७ ); बटुवामनास त्रिपादभूमिदान-शुक्राचा शाप-बळीचा उद्धार ( ११८-१३२ ); मत्स्यावतारः—सत्यव्रतराजा व मासा—सत्यव्रतास प्रलयसूचना व उपदेश ( १३३-१५३ ); उपसंहार ( १५४ ).

**नवम स्कन्ध (पृष्ठांक ११२):**—मनुवंशः—मनुचे पुत्र (१-५); इलेची उत्पत्ति ( ६-८ ); इला ती च सुद्युम्न-पुरूरव्याचा जन्म—शंकराचा शाप व वर ( ९–१५ ); पुरूरव्यास राज्य ( १६-१७ ); इक्ष्वाकु वगैरे मनुपुत्र ( १८ ); पृषध्रास गोवधामुळें शाप ( १९-२१ ); इतरांचा वंशविस्तार ( २२-२६ ); च्यवनभार्गवकथा—नेत्रनाश-विवाह-अश्विनीकुमारांचा प्रसाद ( २७-४२ ); बलरामविवाह ( ४३-४८ ); नभगाची सत्यप्रीति व रुद्राचा संतोष ( ४९-५७ ); अंबरीषचरित ( ५८-६८ ); इक्ष्वाकु, शशाद, ककुत्स्थ, धुंधुमार, युवनाश्व, मांधाता त्यांच्या कथा ( ६९-८५ ); सौभरि, पुरुकुत्स, त्रिशंकु ( ८६-९१ ); हरिश्चंद्र पुत्रमोहानें वरुणाशीं टाळाटाळ करतो इ० ( ९२-१०६ ); रोहित, बाहुक ( १०७-१०८ ); सगर—त्याचा यज्ञ व पुत्रांचें भस्म होणें ( १०९-११६ );

असमंजसा–( ११७-१२० ) चा पुत्र अंशुमान् कपिलसगरास संतोषवितो ( १२१-१२५ ); भगीरथ व भागीरथी ( १२६-१३० ); सौदास 'कल्माषपाद' राक्षस होतो ( १३१-१३५ ); त्यास ब्राह्मणीचा शाप–पुढील वंश ( १३६-१४२ ) श्रीरामचरित; ( १४३-१६६ ); निमि ( १६७-१७३ ); जनक ( १७४-१७६ ); अत्रिपुत्र सोमाचें ताराहरण व बुधजन्म ( १७७-१८८ ) पुरूरवा व उर्वशी ( १८९-२०३ ); पुढील वंशः–गाधिकन्येचा विवाह–चरूची अदलाबदल व जमदग्नीचा जन्म ( २०४-२१५ ); परशुराम सहस्रार्जुनाचा नाश करून ( २१६-२२५ ) तीर्थयात्रेहून येतो ( २२६-२२८ ); मलिनचित्त रेणुकामातेला परशुराम वधितो ( २२९-२३५ ), रेणुकादींचें पुनरुज्जीवन ( २३६-२३८ ); पितृवधानें संतप्त झालेल्या परशुरामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करून अवतार समाप्त केला ( २३९-२४८ ); विश्वामित्र व इतरांचे वंश ( २४९-२५३ ); ययाति, शर्मिष्ठा व देवयानी यांचा तंटा–ययातीस शाप ( २५४-२७४ ); पुरूपासून ययातीस वयप्राप्ति ( २७५-२८० ); दुष्यंतशकुंतला व भरत ( २१-२९३ ) भूतदयासागर रंतिदेव ( २९४-२९८ ). इत्यादींविषयीं कथा निरनिराळ्या–कुरु, यदु इत्यादि वंशावळी ( २९९-३७४ ).

**दशम स्कन्ध ( पृष्ठांक १४७ )**:–उपोद्घात ( १-१२ ); भगवंताचा अवतारनिश्चय ( १-९ ); वसुदेवदेवकीविवाह ( १०-१३ ); आकाशवाणी ऐकून कंस सावध होतो, तथापि वसुदेवाची रदबदली ऐकतो ( १४-१९ ); कंसाची दया ( २०-२२ ); नारद कंसास चिथावतो ( २३-२७ ); कंस देवकीपुत्र ठार मारतो–यादवांची दशा ( २८-३३ ); सप्तमगर्भ व मायेस प्रभूंची आज्ञा ( ३४-४३ ); कंसाची स्थिति ( ४४-४७ ); कृष्णजन्म ( ४८-५५ ); कृष्णास मायबापांची प्रार्थना ( ५६-५८ ); भगवंताच्या सांगण्याप्रमाणें ( ५९-६३ ) देवकी व रोहिणी यांच्या अपत्यांची अदलाबदल ( ६४-७७ ); कन्याजन्माची वार्ता दूतमुखें ऐकिल्यावर देवकीच्या विनवण्या झिडकारून कंस मायेला आपटून मारूं लागला ( ७८-८७ ); मायेचें भाषण ( ८८-९० ); कंस देवकीस शरण येऊन मुक्त करतो ( ९१-९३ ); बदसल्ल्यानें कंसाची सर्व लहान अर्भकांवर धाड ( ९४ ९९ ); नंदगृहीं पुत्रजन्मोत्सव ( १००-१०८ ); कंसास कर

देऊन वसुदेवास भेटून नंद आला ( १०९-११२ ); पूतनेचा नाश ( ११३-१३२ ); बाललीला व तृणावर्ताचा वध ( १३३-१४७ ); नामकरण, यशोदेस विश्वरूपदर्शन व उखलींबंधनादि ( १४८-१८० ); वृक्षरूपी कुबेरपुत्रांचा उद्धार ( १८१-१८७ ); वृंदावनांत वसति ( १८८-१८९ ); वत्सासुरवध ( १९०-१९५ ); बकासुर ( १९६-२०० ) व अघासुर यांचा वध ( २०१-२१० ); ब्रह्मदेवास लीला दाखविली ( २११-२६४ ):—गोपाळकाला ( २११-२२० ) ब्रह्मदेवाचें वत्सहरण ( २२१-२२६ ); गोपांच्या रूपानें नटलेल्या परमेश्वराची गूढ लीला ( २२७-२४५ ) ब्रह्मदेव शरण येतो ( २४६-२५६ ); भगवंताचें पुनरागमन ( २५७-२६४ ); गर्दभासुरवध ( २६५-२६८ ); कालियामर्दन ( २६९-२९१ ); दवप्राशनादि लीला ( २९२-२९३ ); प्रलंबासुरादिकांचा नाश व गुंजवनांत गोपाळांचें संरक्षण ( २९४-३०८ ); गोपीवस्त्रहरण ( ३०९-३२१ ); यज्ञपत्न्याख्यान ( ३२२-३४१ ); गोवर्धनोद्धार व इन्द्रगर्वहरण ( ३४२-३७३ ); वरुणाचें नंदहरण ( ३७४-३७५ ); गोपीचित्तहरण ( ३७६-३८५ ); गोपीविरह व तच्छांति ( ३८६-४०७ ); यात्रा ( ४०८-४०९ ); अजगररूपी विद्याधराचा उद्धार ( ४१०-४१६ ); शंखचूडाचा वध ( ४१७-४२२ ); हरीची मुरली ( ४२३-४२८ ); अरिष्टासुरवध ( ४२९-४३५ ); नारदांच्या सठावणीवरून ( ४३६-४३९ ) कंस धनुर्यागाचें मिष करून कृष्णरामांचा नाश करण्याचा घाट घालतो ( ४४०-४४७ ) व नंदादि कंस आपणाकरितां अक्रूरास पाठवितो ( ४४८-४५४ ); केशिवध ( ४५५-४६४ ); नारद व कृष्ण यांच्या भेटी ( ४६५-४६९ ); व्योमासुराचा वध करून कृष्ण गोकुळांत येतो ( ४७०-४८० ); अक्रूर व कृष्ण यांची भेट ( ४८१-४९० ); गोपी कृष्णास न्यावयास आलेल्या अक्रूरावर 'बोटें मोडतात' (४९१-५०३); अक्रूरास दिव्यदर्शन (५०४); कृष्णाचा मथुराप्रवेश ( ५०५-५१० ); परीट,कोष्टी व माळी यांच्यापासून वस्त्राभरणप्राप्ति ( ५११-५१६ ); कुब्जेवर प्रसाद ( ५१७-५२० ) कंसधनुर्भंग ( ५२१-५२५ ); कंसास कृष्णमय जग ( ५२६-५२८ ); कुवलयापीड हत्तीचा वध व बलकृष्णांची पराक्रमी जोडी ( ५२९-५४५ ); चाणूरादिकांचा वध ( ५४६-५५५ ); संतप्त कंसाचा वध ( ५५६-५६४ ); नंदवसुदेव-

कृष्णबल यांची प्रेमळ भेट ( ५६५-५७५ ); नंद परतला ( ५७५ ); उपनयन, विद्याभ्यास ( ५७६-५७९ ); गुरुपुत्र सोडवून आणतात ( ५८०-५८४ ); उद्धव गोकुळीं येतो ( ५८५-५९१ ); गोपी व उद्धव यांचा प्रेमसंवाद ( ५९२-६०४ ) कृष्णाचा निरोप—उद्धवास निरोप ( ६०५-६१५ ); कुब्जेवर कृपा ( ६१६-६१८ ); अक्रूराशीं प्रेमादरपूर्ण भाषण—सूचनेप्रमाणें अक्रूर हस्तिनापुरीं जातो ( ६१९-६३३ ); पांडवांचें दुःखवृत्त ऐकून ( ६३४-६४९ ) धृतराष्ट्रास बोध करून ( ६५०-६५६ ) अक्रूरानें सर्व वृत्तांत रामकृष्णांस निवेदिला (६५७-६६०); जरासंधाचे मथुरेवर सतरा हल्ले व पराभव ( ६६१-६७१ ); काळयवनाला पाहून श्रीकृष्ण ज्ञातींना द्वारकेंत स्थापून पळूं लागले (६७२-६८०); काळयवनास भस्म केल्यावर मुचुकुंदास वर ( ६८१-६८७ ); यवनक्षय ( ६८८ ); जरासंधाला फसवून प्रभु द्वारकेस आले ( ६८९-६९५ ); बळरामरेवती ( ६९६ ) व कृष्णरुक्मिणी यांचा विवाह-रुक्मीपराभवादि कथा ( ६९७-७३५ ); प्रद्युम्न शंबराला मारून सुटून येतो ( ७३५-७४३ ); स्यमंतकोपाख्यान-भामाविवाह ( ७४४-७५४ ); अक्रूराचें मणिहरण ( ७५५-७७१ ); कालिंद्यादिकांशीं कृष्णविवाह-नरकासुरवध ( ७७२-७९३ ); रुक्मिणीशीं विनोद ( ७९४-८०० ); कृष्णाची प्रजा (८०१-८०२); उद्दाम रुक्मीचा बलरामकृत वध ( ८०३-८१३ ); बाण-गर्वहरण व अनिरुद्धउषासंयोग ( ८१४-८४४ ); सरडरूपी मृगराजाचा उद्धार ( ८४५-८५६ ); बलरामाची गोकुळास भेट ( ८५७-८६९ ); पौंड्रकवध ( ८७०-८७७ ); पौंड्रकपुत्रनाश ( ८७८-८८२ ); द्विविदकपीचा वध ( ८८३-८८६ ); सांबविवाह व बळकृत दुर्योधनगर्वहरण ( ८८७-८९८ ); नारदास लीला दाखवून [८९९] उद्धवाच्या सल्ल्याप्रमाणें (९००-९०५) धर्माच्या यज्ञास जाऊन भीमाकडून जरासंधासमोर राजे बंधमुक्त केले इ. ( ९०६-९२३ ); धर्माचा यज्ञ पार पडला ( ९२४-९४१ ); मायावी शाल्वाचें यादवांशीं तुंबल युद्ध व वध ( ९४२-९६९ ); दंतवक्त्रादिवध ( ९७०-९७३ ); 'कुरुपांडवकलह वाढला मोटा' ( ९७४ ) म्हणून तीर्थयात्रा करणाऱ्या बळरामाचा सूतवध व प्रायश्चितार्थ इल्वलासुरवध—भारतीययुद्धवार्ताश्रवण ( ९७५-९८६ ); साम अशक्य पाहून बलरामानें परतून यज्ञ केला (९८७-९९०); सुदामभेटि--त्यास सोन्याची

नगरी दिधली ( ९९१-१००४ ); सूर्यग्रहणपर्वी कुरुक्षेत्रीं सर्वांच्या भेटी, कथा वगैरे ( १००५-१०१५ ); यज्ञ झाल्यावर सर्वांना निरोप ( १०१६-१०२३ ); वसुदेवास ज्ञान ( १०२४-१०२६ ); देवकीस तिचे सहा मृतपुत्र भेटविले ( १०२७-१०३६ ); सुभद्राहरण ( १०३७-१०४८ ); श्रुतदेव व बहुलाश्व या प्रेमळ भक्तांस कृष्णदर्शन, संगति व ज्ञान यांचा लाभ ( १०४९-१०६६ ); भस्मासुरनाश व शंकररक्षण ( १०६७-१०८९ ); भृगूची देवत्रयपरीक्षा–विष्णूस लत्ता व त्याची क्षमाशीलता (१०९०-११०६); एका ब्राह्मणाचे पुत्र त्यास महाकाळपुरांतून कृष्णार्जुन परत आणून देतात (११०७-११३२); गोपीविनोदवर्णन-हंसाशीं संवाद ( ११३३-११७९ ); कृष्णपुत्र ( ११८०-११८१ ); भगवच्चरित्र-माहात्म्य ( ११८२-११८८ ); उपसंहार ( ११८९ ).

**एकादश स्कन्ध (पृष्ठांक २५३ )**:–सांब यादवाला ऋषिशापानें झालेलें मुसळ ( १-१३ ); वसुदेवास नारदमुनि भागवतधर्म सांगतात ( १४-१६ ), पूर्वी निमीला नऊ योग्यांपासून ( १७-२२ ) कळलेला भागवतधर्म ( २३-३१); भक्तलक्षणें ( ३२-३७ ); माया ( ३८-३९ ); ती तरण्याचे उपाय ( ४०-६० ); नारायणस्वरूप ( ६१-६६ ), कर्मयोग ( ६७-६८ ), भगवंताचे पुरुषाद्यवतार ( ६९-७२ ), नारायणावतारकथा ( ७३-९२ ); वालखिल्यदुःखमोचन ( ९३-९४ ), राम ( ९५ ), अभक्तगति ( ९६-९७ ), युगधर्म व प्रभुस्वरूप ( ९८-११७ ) या नऊ गोष्टी सांगून कृष्णाचें परमात्मस्वरूप बोधितो ( ११८-१२१ ); ब्रह्मादिकांची कृष्णस्तुति व अवतारसमाप्तिचर्चा ( १२२-१३० ); ' प्रभासास जा ' ही कृष्णसूचना ( १३१-१३२ ) ऐकून शोकाकुल झालेल्या ( १३३-१३७ ) उद्धवास कृष्णाचा उपदेश ( १३८-१४० ); अवधूतयदुसंवाद–चोवीस गुरु ( १४१-२२१ ); "नित्यमुक्त आत्मा नित्यबद्ध कसा ?" या उद्धवशंकेचें निरसन ( २२२-२५३ ); ' साधु कसा ? भक्ति कशी ? ' या उद्धवप्रश्नांचीं अनुक्रमें उत्तरें ( २५४-२६२ ) व ( २६३-२७० ); सत्संगमाहात्म्य (२७१-२८८); ' कर्मं करावीं का सोडावीं ?; या उद्धवशंकेचा निरास ( २८९-३१० ); गुणत्रयादींचा विचार ( ३११-३१६)' ब्रह्मदेवास हंसरूपानें केलेला बोध ( ३१७-३३० ); ' भक्ति हें च मुख्य सार '

( ३३१-३४९ ); ध्यानप्रकार ( ३५०-३६० ); विभूतिकथन ( ३६१-३६४ ); वर्णाश्रमादि धर्म ( ३६५-३७० ); 'भक्तियोग' ( ३७१-३८४ ); शमदमादि विवरण ( ३८५-४०८ ); ज्ञानादि योगत्रय व भवतारण ( ४०९-४४६ ); 'तत्त्वें पुरुष, प्रकृति' यांचा निवाडा ( ४४७-४९७ ):—भोग—भेदबुद्धि—मन हें मूळ—याविषयीं भिक्षुगाथा ( ४६६-४९४ ); सांख्यशास्त्र ( ४९८-५४७ ):—विषयासक्तीच्या परिणामाकरितां ऐलकथा ( ५०९-५३४ ); संततारक अर्चनयोग ( ५४८-५६५ ); पुनः भक्तियोग ( ५६६-५८१ ); उद्धव बद्रिकाश्रमीं गेला ( ५८२-५८५ ); 'यादवी' ( ५८६-५९६ ); बलरामाचें निर्याण ( ५९७ ); व्याधाच्या बाणानें कृष्ण जखमी होतो ( ५९८-६०५ ); दारुकास शेवटचा निरोप ( ६०६-६१३ ); दारुक द्वारकेस गेला ( ६१४-६१५ ); ब्रह्मादि देवांचा मेळा व कृष्णनिर्याण ( ६१६-६२८ ); वसुदेवादि पुरुष व रुक्मिण्यादि स्त्रियांचे निर्याण ( ६२९-६३९ ); अर्जुनाची सावधता ( ६४०-६४१ ); द्वारका बुडत्ये ( ६४२-६४४ ); वज्रास राज्याभिषेक ( ६४५ ); यादवक्षय ऐकून धर्मादिकानीं महापथ स्वीकारिला ( ६४६-६४७ ); कृष्णकथामाहात्म्य ( ६४८ ); उपसंहार ( ६४९ ).

**द्वादश स्कन्ध ( पृष्ठांक ३०८ )**:—शुक परीक्षितीस सांगतात:—नंदादिक भावी राजे व त्यांचे वंश ( १-२६ ); कलिप्रभाव ( २७-३६ ); कल्कीचा अवतार व वर्णाश्रमधर्माची पुनःस्थापना ( ३७-४३ ); 'आला प्राणी जाणार' हरीचा गुणानुवाद हा च थारा ( ४४-४९ ); कलिप्रभाव–( ५०-८१) भगवन्नामसंकीर्तन हा च एक उपाय–चतुर्विध प्रलय ( ७१-७९ )–भागवत ऐक; तक्षकाचें भय कशाला ? ( ८२-८९ ); परीक्षिती संतुष्ट होतो–शुक जातात व तो ब्रह्मध्यानीं बसतो ( ९०-९९ ); तक्षक कश्यप ब्राह्मणास परतवितो ( १००-१०६ ) व परीक्षितीस डसतो—हाहाकार ( १०७-१११ ); जनमेजयाचें सर्पसत्र–नारदाची मध्यस्थी व तक्षकाचा बचाव ( ११२-१२० ); अठरा पुराणें ( १२१-१२७ ); मार्कंडेयकथा—तप व वरप्राप्ति ( १२८-१५० ); वटपत्रशायी मुकुंद व विचित्र लीलेचा अनुभव ( १५१-१६४ ) शंकरदर्शन;

मोहनिरसन व वरसंपादन ( १६५-१८६ ); विष्णुस्वरूप ( १८७-२०४ ); सूतांचा उपसंहार-पुराणगणना ( २०५-२२० ); पंतांचा उपसंहार ( १-५ ).

**मंत्रमय भागवतः**—ह्यांत दशम स्कंधांतील च कथाभागांची सूची आहे ( १०९ ).

एकूण पद्यसंख्या **मंत्रभागवत ३५९४** व **मंत्रमय भागवत १०९** मिळून **३७०३** आहे.

## पंतलिखित मंत्रभागवतांतील परलिखित पद्यें.

उपोद्घात सर्व, प्रथम स्कंध १ ते २३, द्वितीय स्कंध १०० उत्तरार्ध, १०१, चतुर्थ स्कंध ४१ ते ४४, द्वादश स्कंध २१० पासून अखेरपर्यंत. एकूण साडेपासष्ट पद्यें परलिखित आहेत.

॥ श्रीः ॥

# मोरोपंतकृत

# मंत्रभागवत.

## उपोद्घात.

(गीतिवृत्त)

न लिनाक्ष प्रभु लक्ष्मी न यनमनोहरपदांबुज ।ा न । न वर्धननील चतुर्भुज न मिला जो पुण्यकीर्तिचें स्था न. १
मो हर्तमोर्क जगद्गुरु मो क्षदपद त्या शिवींच त्य रमो,। मो दित मन हो, चिंतित मो घ नसो, सर्व पाप ताप श मो. २
भ व्य हरिहरांचे जे भ वभयहर नारदादि लो भ । भ गवत्तुल्य जगद्धित भ क्त नमस्कारिले विमळशो भ. ३

१. कमलनेत्र (विष्णु). २. लक्ष्मीच्या नेत्रान र मनाला आनंददायक आहे ज्याच्या चरणकमलाचें चिंतन असा. ३. नवीन मेघासारखा निळा. ४. अज्ञानांधकाराचा नाश क ारा सूर्य. ५. मोक्ष देणारे पाय आहेत ज्याचे असा. ६. व्यर्थ. ७. नारद अमृताच्या गुणावर प्रीत आहे ज्याची असे. ८. चे हितकर्ते. ९. निर्मळ आहे कांति ज्यांची.

ग जमुख विद्यामृतनिधि ग [1]णपति; तद्दास तो महाभा ग । ग तगर्व विघ्न जेणें, ग रुडें अत्युग्र ही जसा ना ग.४
व [2]र्यव्रत विधिचे सुत व [3]रशील सदा कुमार [4]शमविभ व । व त्सल विवेकसागर व [5]शिपति ज्यांची सदुक्ति शमवि भ व.५
ते जस्वी सुरसत्तम ते [6]त्तीस ख्यात जे भया हरि ते । ते नमिले कर जोडुनि, ते थें येथें हि बहु दया करि ते.६
वा ग्देवीच्या नमितों बा [8]ळक मी [9]रम्यपादराजीवा । वा रुनि जडत्व [10]जी दे वा त्सल्यें ज्ञान सादरा जी वा.७
सु रसिंधु श्रीकाशी सु ज्ञा हि जडा हि सोडितां चि अ सु । सु खदात्या नमिल्या ज्या सु टका करिती च देति [11]आत्मव सु.८
दे व मुकुंद चि तो जरि दे हीं [12]प्राचेतसादि कवि नां दे । दे श पवित्र करि सदुप दे शें सुयशें प्रमोद कानां दे.९
वा ल्मीकि व्यास सम वि वा चा ज्यांची स्तवी सदा दे वा । वा क्तनुमनें नमन त्यां, वा त्सल्यें हे चि त्यां रुचो सेवा.१०
य श हरिचें ज्यांसि रुचे य दुपतिस चि वाहिला जिहीं काय । य द्यपि निकृष्ट जात्या य वन हि त्यांचे हि वंदितों पाय.११

१. गणपतींना सेवक (भृशुंडी). २. स्तुत्य आहे आचार ज्यांचा असे. ३. श्रेष्ठ शीलाचे. ४. तरुण. ५. शांति हें च ऐश्वर्य ज्यांचे ते. ६. योगिश्रेष्ठ. ७. तेहतीस (देवगण). ८. वालक. ९. रमणीय चरणकमलाला. १०. अज्ञान. ११. स्वकीय धन. १२ वाल्मीकादि.

# प्रथम स्कंध.

(गीतिवृत्त)

न लिनाक्ष[1]क्षेत्र श्रीनैमिष[2] तेथें सदुक्तिपूतातें[3]
शौनकें[4] परम हित पुसे, सादर बहु गौरवूनि, सूतातें[5]. १
मो टा सुमुनिप्रेमा म्हणुनि श्रीशुकें[6] गुरूसि तो भावें
नमुनि 'श्रीभागवत' प्रारंभी, ज्यासि विश्व लोभावें. २
भ गवंताचे वर्णी पुरुषाद्यवतार सार चोवीस,
या माळेसि कवि म्हणति, 'मुक्ति न, आम्हांसि तूं चि होवीसि.' ३
गं रुडध्वजांश भगवान् व्यास द्वापरयुगांत अवतरला,
यद्ग्रंथसेतुसंश्रित[11] जन करुनि भवार्णवासि लवें[12] तरला. ४
व सतां सरस्वतीच्या तीरीं व्यासासि नारदस्वामी
भेटे, त्यासि मुनि[13] पुसे, 'सांग मनीं अप्रसन्न कां बा! मीं?' ५
ते प्रार्थना तयाची परिसुनि तो मुनि म्हणे, 'तुवां कांहीं
प्राधान्यें श्रीभगवन्महिमा अद्यापि वर्णिला नाहीं. ६
वा खाणावें प्रेमें भगवद्यश मुनिवरा! तुवां आतां,
हृदय प्रसन्न होतें प्रभुचा महिमा चि आदरें गातां. ७
सु यश न जयांत हरिचें, चित्र हि गुणभवन[14] कवन तें अशुची,
त्यांत सुमति नर न रमति पळ ही, बहु मानिती तया पशु[15] चि. ८
दे वाचीं ज्यामध्यें नामें सुयशोंकितें प्रतिश्लोकीं
अघ नुरवी च अबद्ध[16] हि असतां तो वाग्विसर्ग[17] या लोकीं. ९

---

१. कमलनयन विष्णूचें स्थान. २. नैमिषारण्य. ३. उत्तम भाषणानें पवित्र अशा (सूताला). ४. शुनकमुनीचा मुलगा. ५. पुराणवक्त्या सूतनामक ऋषीला. ६. शुकाचार्य (व्यासाचा मुलगा). ७. सूत मुनि. ८. सर्वोत्तम. ९. पाहिजेस. १०. विष्णूचा अंश. ११. ज्याच्या ग्रंथरूप सेतूला आश्रय करणारा. १२. अणुप्रमाण [समजून]. १३. व्यास. १४. गुणांचें घर. १५. अज्ञानी लोक. १६. [शास्त्रनियमानीं] बद्ध नव्हे असा हि (कवी). १७. वाणीचा विस्तार.

**वा** क्यें भागवतांचीं कृष्णयशोमृतपरिप्लुतें प्यालों,
धालों, असोनि दासीसुत[1] मीं बा! ब्रह्मपुत्र कीं झालों. १०

**य** श तारक हरिचें गा, व्यासा! येणें चि शीघ्र निवशील,
आहेस चि तूं सर्वश्रुतिशास्त्ररहस्यनिपुण शिवशील[2]. ११

**न** यनातें उन्मीलुनि[3] मुनि जातां 'भागवत' शुका व्यास
विरचुनि पढवी, जैसा आद्यकवि[4] लवा कुशा सुकाव्यास[5]. १२

**मो** ह हि नसतां गावी जीवन्मुक्तीं हि संहिता[6] बा! हे,
श्रीहरिच्या अत्यद्भुत महिमा ऐसा चि सद्गुणीं आहे. १३

**भ** गवद्भक्त शुक कथी ज्यातें प्रायोपविष्ट[7] जो होता
त्या जन्म परिक्षिन्नृपरत्नाचें परिस तूं हि सुश्रोता!. १४

**ग** जपुरपति[8] भीमानें करितां भग्नोरु[9], तत्प्रियीं[10] पापी
अश्वत्थामा सुप्तद्रुपदसुतापुत्रमस्तकें[11] कापी. १५

**व** त्सांच्या बहु शोकीं कृष्णा[12] बुडतां तिला म्हणे नरें[13] तो,
'त्या अधममस्तकीं[14] न्हा, देवि! विलापीं तुझी सुधी न रतो.' १६

**ते** जस्वी विजय रथीं चढला रक्षावया प्रतिज्ञा ते,
तो हाकी हय, म्हणती 'अजित जयाश्रय[15]' जयाप्रति ज्ञाते. १७

**वा** जिखुरचक्रनादें[16] समजुनि पाहोनि पार्थरथ दूर
द्रौणि रथीं चढुनि पळे, रुद्रभयेंकरुनियां जसा सूरें[17]. १८

**सु** प्तशिशुघ्न द्रौणि स्वतुरग थकतां चि न दिसतां त्राता
उपसंहार[18] नये तरि योजी ब्रह्मास्त्र शत्रुच्या घाता. १९

---

१. नारद पूर्वजन्मीं दासीपुत्र होता. २. मंगल आहे स्वभाव ज्याचा. ३. उघडून. ४. वाल्मीकि. ५. उत्तम काव्यास (रामायणास). ६. श्रीभागवतग्रंथ. ७. खाणेंपिणें टाकून मरणार्थ बसलेला. ८. हस्तिनापुराचा राजा (दुर्योधन). ९. मोडलेल्या आहेत मांड्या ज्याच्या असा. १०. त्याचे (दुर्योधनाचे) हिताकरितां. ११. निजलेल्या द्रौपदीच्या पुत्रांचीं मस्तकें. १२. द्रौपदी. १३. अर्जुन. १४. नीचाच्या [ अश्वत्थाम्याच्या ] मस्तकावर. १५. अर्जुनाश्रय ( अर्जुनसारथी ). १६. घोड्यांचे खूर आणि ( रथाचीं ) चाकें ह्यांच्या आवाजानें. १७. सूर्य. १८. आटोपणें ( अस्त्र परत घेणें ).

दे वाज्ञेनें पार्थ ब्राह्म[1] ब्रह्मास्त्रवारणा योजी,
[2]अस्त्रद्वयतेजोर्दित जन म्हणति, ' न भस्म विश्व हें हो जी!' २०

वा रुनि [3]अस्त्रयुगातें त्या बाळघ्नासि पार्थ तो बांधी
प्रभु ' मारावा चि ' म्हणे, परि धर्म त्यजिल साधुची कां धी? २१

य द्यपि बंधादि उचित कृष्णेला दैन्य तें पहावेना,
' सोडा ' म्हणे ' गुरुसम चि गुरुसुत, अपमान मज सहावेना. ' २२

'न च रक्षावा अधम क्षण हि ' असें भीम ही म्हणे कोपें,
[4]मणि हरुनि तया सोडी विजय, नव्हे कर्म तें परा सोपें. २३

मो हें मृतांसि देउनि जळ, धृतराष्ट्रादि मग्न जे शोकीं
त्याचें युधिष्ठिर प्रभु करि सांत्वन उचित जें जसें लोकीं. २४

भ रतकुलप्रवरश्रीधर्मातें कृष्ण मग पदीं बसवी,
करवी हयमेधत्रय, भक्ताचें यश जगत्रयीं वसवी. २५

ग मन [6]स्वपुरा करितां हरिस म्हणे उत्तरा, ' प्रभो! पावें,
हा [7]तप्तलोहशर मजवरि येतो, अभयदान ओपावें. २६

व नवह्नि वनासि जसा कीं म्हणतो मृगकुळासि हरि खावें,
एणें तसें मला चि न मद्गर्भातें गिळोनि [8]हरिखावें. ' २७

ते जें [9]मयूखसे शर तों पांचां पांडवांवरि हि पांच
आले व्यालेश्वरसे जे न च म्हणतिल नतास ही ' वांच '. २८

वा री सुदर्शनें चि द्रौणिब्रह्मास्त्र समजुनि क्षिप्र
पोटीं गर्भ हि रक्षी, तो काय प्रभुपुढें बळी विप्र? २९

सु [10]तसुरतरुतें वर्णी, हर्षविली, वधुनि पातकी, [11]आत्या
दीना धन्या झाली, न च ऐसी करुनि चातकी आ [12]त्यां. ३०

---

१. ब्रह्मास्त्र निवारण करणारें अस्त्र. २. दोन अस्त्रांच्या तेजानें दुःखित. ३. दोन अस्त्रांना. ४. अश्वत्थाम्याच्या मस्तकांतील मणी. ५. प्रेमानें. ६. द्वारकेला. ७. [ अश्वत्थाम्यानें सोडिलेला ] तापलेल्या लोखंडाचा बाण. ८. संतोषावें. ९. किरणासारखे. १०. पुत्रांचा ( पांडवांचा ) कल्पतरु (कृष्ण) जो त्याला. ११. कुंती. १२. मेघास-**पंत.**

दे आज्ञा न युधिष्ठिर, होउनि सिद्ध हि पुन्हां अजित राहे,
प्रभुरीति मनीं आणुनि जाणुनि अच्युतमा अंजि[1]! तरा हे. ३१

वा ढे युद्धहताप्तज्ञातिसुहृत्स्वजनशोक धर्माचा;
कृष्णादिगुरुवचोमृतवर्षे हि शमे न ताप कर्माचा. ३२

वँ[2] श द्यावें भीष्मातें हा सदभिप्राय देवदेवाचा;
व्यासादिमुनींद्रांची न च धर्मा बोध[3]लेश दे वाचा. ३३

न[4] रपति सानुज साच्युत जायें[5] पुसायासि धर्म आज्यातें,
धर्मज्ञानार्थ करी पहिला तांबूलकाम[6] आ ज्यातें. ३४

मो टे मोटे ज्ञाले त्या पुण्यश्लोकपंक्तिला[7] जडले,
भीष्मोक्ताखिलधर्मश्रवणें सर्वांसि[8] सांग सर्व घडले. ३५

भ गवंतातें गंगापुत्र प्रेमें स्तवूनि, देहातें
योगें[9] सोडी, त्यातें तें साक्षाद्ब्रह्म[10] तोयें[11] दे हातें. ३६

ग जसाह्वयीं[12] पदीं त्यां[13] स्थापी धृतराष्ट्र, केशवाज्ञा ते,
म्हणति, 'न निजप्रजांचा[14] करि डोळा वक्र केश वा[15]' ज्ञाते. ३७

वं[16] त्सलवर विभु गेला निजनगरीप्रति पुसोनि धर्मातें;
जेंवि उदयगिरिपासुनि विधु द्याया कुमुदिनीस शर्मातें. ३८

ते मार्गींचे जनपदें[17] जनपदपद्में नमूनि देवाचीं,
तरले, 'यशें जयाचीं गुरु म्हणती, 'ऐक, चित्त दे वाचीं[18].' ३९

वा ढे गर्भ यथास्थित, त्यातें प्रभु उत्तरोदरीं रक्षी,
तो अस्त्र[19]तेजमथित्या अंगुष्ठ[20]समा गदाधरा लक्षी. ४०

---

१. अहो ! २. धर्माच्या गोत्रजवधजन्यशोकनिवारणार्थ उपदेश करण्याचें वश. ३. थोडा बोध. ४. धर्मराज. ५. कुरुक्षेत्रांत जेथें भीष्म शरपंजरीं पडले होते तेथें. ६. विडा खाणें ही इच्छा आहे ज्याची असा [ आ ]. ७. पवित्र आहे कीर्ति ज्यांची अशांच्या रांगेला. ८. यज्ञ. ९. योगबलानें. १०. श्रीकृष्ण. ११. पाणी. १२. हस्तिनापुरांत. १३. धर्माला. १४. निज डोळा प्रजांचा केश-**पंत.** १५. अथवा. १६. अतिशय प्रेमळ. १७. जनपद देशांतील लोक. १८. वाच. १९. [ अश्वत्थाम्यानें सोडलेल्या ] अस्त्राच्या तेजाचें मंथन करणाऱ्या. २०. अंगठ्याएवढ्या.

**सु** रुचिरतनु जगदीश्वर अस्त्राचें सर्व तेज शमवून,
दशमीं मासीं झाला गुप्त प्रभु गर्भदृष्टि रमवून. ४१
**दे** दीप्य[1]मानतनु मग शुभसमयीं जन्मला कुमारमणी;
वदली असेल, 'दुसरा गुह[2] चि' असें शंभुची उमा रमणी. ४२
**वा** द्यें वाजविलीं बहु हर्षें तज्जातकर्म धर्म करी,
पौत्रें पावे तैसा जैसा गंगाहृदें सुखसें करी. ४३
**य**[3] क्षाधिपसा तर्पी नृप भूदेवांसि उचितदानाहीं,
अर्थी म्हणती, 'उरली स्वल्पा हि मनांत रु[4]चि' तदा 'नाहीं.' ४४
**न** रपतिलें तुष्ट द्विज म्हणति, 'नृपा! विष्णुनें दिला बाळ,
हा वि[5]ष्णुरातनामा होइल विख्यात सुप्रजापाळ.' ४५
**मो** दित [6]जातककोविद विप्र कथिति, 'तूं तसा चि हा राया!
कंठीं भिरविल राज्यश्री वसुधा सुगुणरत्नहारा या. ४६
**भ** य न धरिल मरणाचें परिसुनि मुनिपु[7]त्रदत्तशापातें,
श्रीशुककथितहरियशःश्रवणें पावेल सुपद बापा! तें. ४७
**ग** र्भीं जो तो हा कीं अन्य असें पारखी जनीं पाहे,
वास्तव तया 'परीक्षि[8]त्' संज्ञा बा शौनका! मुने! आहे. ४८
**व**[9] सु जें म[10]रुत्तयज्ञीं त्यजिलें होतें असंख्य, खा[11]णविलें;
कृष्णाज्ञेनें भ्राते प्रेषुनि तें हयमखार्थ आणविलें. ४९
**ते** णें हयमेधत्रय धर्में संपादिलें यथाविधि, तें
प्रेमें समर्पिलें मग जगपाळितया तया दयानिधितें. ५०
**वा**[12] सविलें त्यावरि तो देव द्वारावतीस ने संगें,
अंगें स्वसख्याचीं कीं निववाया आपुलीं [13]परिष्वंगें. ५१

---

१. तेजस्वी. २. कार्तिकस्वामी. ३. कुबेरासारखा. ४. आवड. ५. विष्णुरात (विष्णूनें दिलेला) नांवाचा. ६. ज्योतिषी. ७. [शमीक] ऋषीच्या पुत्रानें (श्रृंगीनें) 'तूं तक्षकदंशानें मरशील' ह्या दिलेल्या शापाला. ८. सभोंवतीं पहातो तो. ९. धन. १०. मरुत्त राजाचे यज्ञांत. ११. खणवून काढिलें. १२. अर्जुनाला. १३. आलिंगनें.

सु कवि विदुर मैत्रेयापासुनि जाणोनि आत्मगति[1] हरिला
कृतकृत्य तीर्थयात्रेमध्यें झाला, सुतृप्तिनें वरिला. ५२
दे दर्शन धृतराष्ट्रप्रमुखांसांतें द्रवोनि तो सुकवी[2],
घन जेंवि चातकांचीं, आशांचीं न च मुखें भला सुकवी. ५३
वा त्सल्य बहु तयाचें वर्णुनि जोडूनि धर्म हातातें
बोले, ' निववावा निजकुशळें देवूनि शर्म हा तातें. ५४
य दुपतिचें मग, आधीं बा! स्वकुशळवृत्त आयकीव, अगा!
साधुसि तसी सुरांच्या साधो! येईल काय कीव अगा? ५५
न रपाळाला पुसिलें, तीर्थादि समस्त वृत्त आयकवी.
भगवन्निर्याणकथा[3] तो सांगेल स्वयें चि काय कवी[4] ? ५६
मो[5] हाचा केवळ जो आवास[6] तया नृपा स्वभावास,
' बाबा! सत्वर साधा हित ' विदुर म्हणे असत्स्वभावास[7]. ५७
' भ क्षिसि भीमें दिधल्या पिंडातें[8], वृत्ति हे कुतरियाची,
कीं तूं तो, जो आतर[9], बहु मालुनि आपुली कुंतरि[10], याची[11]. ५८
ग र गोड गमे तुज, जें पीयूष चि भैक्ष्य[12] तें सपर्के[13], राया!
सत्वर हिमालयाप्रति चाल कसा सेवटीं तप कराया.' ५९
व चनें सत्यें स्वहितें विदुराचीं समजला मनीं अंध,
न पुसे, निघे चि तोडुनि परमदृढस्नेहरूप तो बंध. ६०
ते गांधारी हि निघे, त्यां दोघां विदुर होय हो! यष्टी,
आपण होय पथीं बहु, त्यांतें होवूं न दे चि तो कष्टी. ६१
वा पातें मातेतें नृप[14] आला जों सकाळ वंदाया,
' न दिसे गुरुत्रय[15] ' म्हणे ' हा! हा! ' गेले त्यजूनि मंदा या. ६२

---

१. आपली मुक्ति. २. विदुर. ३. श्रीकृष्णाचे निधनाची वार्ता. ४. विदुर. ५. अज्ञानाचा. ६. स्थान. ७. दुष्ट आहे स्वभाव आहे ज्याचा अशा (धृतराष्ट्रास). ८. अन्नाच्या गोळ्याला. ९. नौकेवरून उतरल्याचें मोल—**पंत**. १०. कुनौका—**पंत**. ११. याचना करी. १२. भक्षण करण्यास योग्य. १३. रसहीन. १४. धर्मराजा. १५. तीन वडील जन (धृतराष्ट्र, विदुर आणि गांधारी).

सु कलें मुख धर्माचें, म्हणतां शोकेंकरूनि 'हा! हा!' तें.
ताडी कपाळ पाळ क्षितिचा खेदा धरूनि हा हातें. ६३

दे वर्षि[1] ये भवाची करिता निःशेष जो हंति[2], मिरासी[3]
ब्रह्मींचा, धर्माच्या नाशी तत्काळ मोहतिमिरासी. ६४

वा र्धक्यांत तप उचित, गंगातीरीं हिमाचळीं गेला,
जाड्यनगाच्या भिदुरें[4] विदुरें बोधुनि सदार तो नेला. ६५

य मनियमसुतलें परि झालीं च समाधिनें तिघें हिवसीं[5],
योगें चि आजिपासुनि सोडिल नृप देह पाचवे दिवसीं. ६६

न रपतिच्या त्या उटजासह[6] सहसा सुरनदीतटीं प्रेता
भस्म करिल बा! पावुनि योगा[7] योगाद्भुताग्निसीं[8] त्रेता[9]. ६७

मो[10] ळी तसि गांधारी त्या अग्नींत स्वमूर्ति टाकिल ते,
साध्वीची सहयात्रा[11] म्हणती, 'देसील काय नाकिलते[12]!' ६८

भ स्म सुरनदींत विदुर टाकुनि, पुत्रत्व[13] करुनि, कामगती
तीर्थें सेवित जाइल, त्यास न सद्गति मिळेल कां सग ती?' ६९

ग ति त्या धृतराष्ट्राची सांगुनि बोधूनि धर्मचित्तातें,
गेला देवर्षि प्रभु साधूंच्या[14] गात गात वित्तातें. ७०

च रिले वडिलांहीं कीं सद्योगें सत्तपें बरे लोक,
हर्षें सुखाश्रु वर्षे तो साधु युधिष्ठिर त्यजी शोक. ७१

ते थुनि कितिका दिवसीं गेला होता कुशस्थळीली[15] जो
अर्जुन तद्विरहाला हाला[16] गर म्हणवितां बळी लाजो. ७२

वा र्ता न कळे काहीं, दुष्ट व्यवहार आयके पाहे,
बा! हे विपरीता क्षिति असतीसी[17] नवनवा गुणा वाहे[18]. ७३

---

१. नारद मुनि. २. नाश. ३. ब्रह्मलोकचा वतनदार. ४. अज्ञानरूप पर्वताच्या वज्राने. ५. थंड. ६. आश्रमासह. ७. संयोगाला. ८. तपश्चर्येनें उत्पन्न झालेल्या आश्चर्यकारक अग्नीशीं. ९. अग्नित्रय (दाक्षिण, गार्हपत्य, आहवनीय). १०. [लाकडांची] जुडी. ११. सहगमन. १२. हे कल्पवल्ले! १३. पुत्रधर्म. १४. श्रीकृष्णाला. १५. द्वारका–पंत. १६. दारू. १७. कुलटेसारखी. १८. धारण करी.

सु ख न दिसे कोठें ही, झाला उद्विग्नचित्त तो राजा,
भीमा उत्पात कथी जे स्वास्थ्या[1] म्हणति, 'दूर पोरा! जा.' ७४
दे वाकडून अर्जुन चिंता करितां युधिष्ठिरें आला.
आलापसे विलाप हि शिकला विधिगुरुबळें[2], करुनि[3] आला. ७५
वा[4] सवितें धर्म पुसे, 'पहिलेंसें न भवदास्य[5] वत्सा! हें,
वद कारण, तेजस्वी तूं दैन्या न भवदास्यवत्[6] साहें. ७६
य ज्ञाचें साहित्य न वडलें कीं मळविलें परिभवानें?
तूं स्वसम समर्थ असें करुनि समर कळविलें परि भवानें[7]. ७७
न ष्टश्री नर[8] नयनें पुसि, आटोपूनि गहिवरा, हातें,
ज्यातें विनवि तसी स्वस्थिति[9] व्हाया, जेंवि महि वराहातें[10]. ७८
मो[11] घ आरि करि, अमोघ स्वाश्रित हे दीन, वात कै वारी?
'गेला' म्हणे 'त्यजुनि तो, जो करुणासिंधु तात कैवारी. ७९
भ ग्न पथीं गोपाहीं केला मीं तत्परिग्रहत्राणीं[12],
कळलें भगवदनुग्रह जों पात्र जया सुखा हि तों प्राणी'. ८०
ग डबडला चि तमें परि नाशी हृदयीं स्फुरोनि गीता तें
पार्थ भगवदुक्तातें बहु भुलला, हरिण जेंवि गीतातें. ८१
व दले, हा! माद्रीसुत, बहु दीन चि धर्म भीम गमला, हो!
शोकें मरे पृथा, कां तद्विस्तर[13] दे न भी मग मला हो!? ८२
ते ज न राहे कांहीं, स्वर्गप्रस्थान नृप मनीं आणी,
पाणी भ्राते जोडिति शीघ्र निघाया तसी च ती राणी. ८३
[14]वा रणपुरींत [15]विधिनें मथुरेंत हि आपुल्या तदा राजा
पौत्रा अनिरुद्धाच्या स्थापी, कलि ज्या[16] म्हणे, 'सदारा जा'. ८४

---

१. शांतीला. २. दैवाच्या माझ्या सामर्थ्यानें. ३. मुख पसरून—**पंत.** ४. अर्जुनाला. ५. तुझें तोंड. ६. संसाराच्या गुलामगिरीप्रमाणें. ७. शंकरानें. ८. अर्जुन. ९. आपलें स्थैर्य. १०. वराहावताराला. ११. व्यर्थ. १२. त्या (कृष्णाच्या) स्त्रियांच्या रक्षणीं. १३. त्याचा (शोकाचा) विस्तार. १४. हस्तिनापुरांत. १५. धर्मपूर्वक. १६. परीक्षित राजास.

सु टला वत्स [1]बहुजवें जाया मातेकडे जसा पळतो,
[2]निजगतितें पावाया धर्म विलंब न करी तसा पळ तो. ८५
दे ह त्यागुनि भगवद्ध्यानें तो पावला महागतिला,
तदनुज हि, हरिसखी जी होईल स्वपद कां महाग तिला? ८६
वा[3] रिजबांधवसुत घे भेटि पुन्हां सेवटीं [4]प्रभासाची
पावे सुखें [5]निजपदाश्रितशिबिका हरिपदप्रभा साची. ८७
य श वाढवी परीक्षित्प्रभु बहु, त्याचा जसा जगीं [6]आजा,
नामें इरावती जी [7]उत्तरतनया तिला वरी राजा. ८८
न यधर्मपरें तेणें केले उत्पन्न पुत्र [8]चवघे ते,
जनमेजयादि [9]सद्गुणसूक्तिसुधेची च नित्य चव घेते. ८९
मो दित केले द्विज सुर हयमेधत्रय करूनि धनदानें,
[10]कृपगुरुघन वळतां कां त्या वाढावें विशेष न नदानें? ९०
भ रला कळि राज्यांत व्यक्त असें [11]उत्तरातनय समजे,
कीं जन अन्याय करिति होउनियां विषम ते सनय सम जे. ९१
ग गनमणिसम सुतेजा दिग्विजय तसे चि करि करद पर ते,
[12]त्यांचा शर [13]आगस्कर न वधुनि अहिचा जसा न रद परते. ९२
[14]वैं सु दे वसुधेवरि बहु निजपूर्वजकृष्णचरितगात्यांतें
परिसुनि हि म्हणे पुनरपि नृप तो सुप्रेमभरित 'गा' त्यांतें. ९३
ते गुरु गाती प्रभुच्या सद्रक्षणसदरिघातलीला जे,
ज्याची श्रुति मति ज्यांत न हरि त्या विषयांत घातली लाजे. ९४
वा टेंत नृप विलोकी [15]गोमिथुना, [16]वृशळ जो पदें ताडी
[17]त्यातें [18]धर्मधरा हें जाणुनि तत्ताप तो लया धाडी. ९५

---

१. मोठ्या वेगानें. २. मोक्षस्थानाप्रत. ३. रविसुत यम तत्सुत विदुर-**पंत.** ४. प्रभासतीर्थाची. ५. आपले पायांचा आश्रय करणाऱ्यांची पालखी. ६. धर्मराज. ७. उत्तरराजाची कन्या. ८. उग्रसेन, जनमेजय, भीमसेन आणि श्रुतसेन. ९. उत्तम गुणानीं युक्त अशा वाणीरूप अमृताचें च. १० कृपाचार्य गुरु हा च मेघ. ११. परीक्षित राजा. १२. परीक्षित राजाचा. १३. अपराध करणारे. १४. द्रव्य. १५. गाय व बैल याना. १६. शूद्र. १७. त्या गोमिथुनातें. १८. धर्म आणि पृथ्वी.

**सु**खर[1] असि[2] विकोश[3] करी समजुनि वृपळासि कलि असें भूप,
तो धरि पाय नृपाचे भिउनि प्रकटूनि आपुलें रूप. ९६
**दे** प्राणदान सुयशा तो आज्ञापी असें तया कलिला,
'मद्विषयांत[4] न राहें करिसि अधर्मानयें प्रजा कलिला[5].' ९७
**वा** सार्थ द्यूतादिस्थानें दे करुनि आ कलि लपाया
मागे म्हणुनि तया तो तेथें देतां चि आकलिल[6] पाया. ९८
**य** वसवँदास्या[7] हि अरिस जरि सहसा शूर सुज्ञजन वधिते,
तरि कैसे मेळविते महित चिरस्थायि सुयश अनवधि[8] ते? ९९
**न** द्वेष करी कलिसीं सारग्राही[9] नृपाळ, कीं फळतें
द्रुत[10] संकल्पित हि सुकृत[11], संकल्पितपातकें न मन मळतें. १००
**मो** ठ्या मृगयोत्साहें नृप गेला एकदा वनीं भ्रमला[12],
तेथें शमीकमुनिच्या शिरला पुण्याश्रमीं, बहु श्रमला. १०१
**भ**[13] वितव्यें नृप सत्कृतिपात्र हि सत्कारकाम ही कांहीं
सत्कारलव समाधिस्थितमुनिपासूनि पावला नाहीं. १०२
**ग** तचेतन[14] गरधर[15] मुनिकंठीं घाली नरेंद्र तो चापें,
सत्कारकामभंगें कोपे; हें कर्म करविलें पापें. १०३
**व** सुधाधिप[16] गेल्यावरि शृंगीनामा महर्षिचा बाळ
दे शाप म्हणे, 'सप्तम दिवसीं चावेल तक्षक व्याळ.' १०४
**ते** जोनिधि तो शृंगी उठवी रोदनरवें शमीकास,
पुत्रकृतें तळमळला, कीं करितो परहिता शमी[17] कास. १०५
**बा** ळासि बोल लावी कीं, असहनता सुकीर्तिला मळवी,
जो पश्चात्तप्त नृप, छात्रमुखें शाप तो तया कळवी. १०६

---

१. अत्यंत तीक्ष्ण. २. तरवार. ३. म्यानांतून बाहेर निघालेली अशी. ४. माझ्या देशांत. ५. गढूळ. ६. अडकवील. ७. तृणयुक्तमुखा अरिस—**पंत**. ८. अमर्याद. ९. तत्व जाणणारा. १०. तत्काळ. ११. पुण्यकर्म. १२. चुकला. १३. पुढें होणार म्हणून. १४. मृत. १५. सर्प. १६. राजा (परीक्षित). १७. सहनशील.

सु ख मानी राजा कीं दंडें सरतें समस्त ही पाप,
ज्या वैराग्यें जोडे हारि झाला हेतु तो तया शाप. १०७
दे वनदीच्या तीरीं [1]अनशनसंकल्प तो करी राजा,
'जातों' म्हणे, 'शरण मीं हरिस, विषाग्नीस तूं शरीरा! जा.' १०८
[2]वां डववर [3]कृष्ण [4]घटज राम पराशर वसिष्ठ नारद या
भेटों आले अत्रिप्रमुख, जयांच्या मनांत फार दया. १०९
य त्स्पर्शें शुचि तीर्थें, त्यां [5]तच्चरणांबुजभ्रमर पूजी
त्यांहीं मुक्तिपुरी ही द्यावी, मग काय ती [6]असरपू जी? ११०
न मुनि म्हणे, 'अधम हि या झालों सदनुग्रहें चि धन्यतम,
हरितां [7]गुहागत तुम्हीं कवि रवि हि न हरिल कोण अन्य तम? १११
मो ल तुमचिया या श्रीचरणरजाचें न होय निधि [8]नव ही,
भवदाश्रितकर्मांची सत्य कराया शकेल विधि न वही. ११२
[9]भं गवद्रतमानस मीं हें विदित तुम्हां, [10]सुरापगेला, हो!
सर्प डसो, हरिगुण गा, यांहीं मोक्षा [11]सुरापे गेला हो!. ११३
ग ति भलती हो, श्रीमत्कृष्णयशोमृतनिधींत मज्जन हो,
सत्संग घडो, मैत्री सर्वत्र, तुम्हां नमोऽस्तु सज्जन हो!.' ११४
[12]वं सुमत्यधिपति ऐसें बोले, मग दे स्वराज्य [13]तनयातें;
सुर पुष्पवृष्टि करिती, म्हणती 'बहु धन्य धन्य' जन यातें. ११५
ते मुनि पुन्हां विनविलें ऐसें जोडूनि कर, 'अहो! आर्य!
सांगा [14]विचारूनि मला मरणारा शुद्ध कोणतें कार्य?' ११६
[15]वा सरमणिसा तेजें, [16]सुरुचिरतर कृष्णसा, [17]दिगंबर तो
शुक ये, त्या पाहुनि जनदृष्टि म्हणति 'हा चि शिव, परीं न रतो.' ११७

---

१. उपासाचा संकल्प. २. विप्रश्रेष्ठ. ३. व्यास. ४. अगस्ती. ५. त्यांच्या चरणकमलांचा भ्रमर [राजा]. ६. देवपुरी. ७. गुहेंत असलेला. ८. [कुबेराचे] नऊ हि निधी. ९. कृष्णाचे ठिकाणीं मन रत आहे ज्याचें असा. १०. गंगेला. ११. दारू पिणारा. १२. परीक्षित १३. जनमेजयाला. १४. विचार करून. १५. सूर्यासारखा. १६. अत्यंत सुंदर. १७. दिशा आहे वस्त्र ज्याचें असा, नग्न.

सु रसार्वभौमसा जो श्रीशुक आला, तयासि सामोरा
जायं समुनि नृप, त्या तो मेघ जसा दृष्ट[1] बहुदिसा मोरा. ११८
दे वाची तसि त्याची पूजा परमासनीं करी राजा,
चित्तीं म्हणे, ' कृतार्थ चि झालों, जाणार तरि शरीरा ! जा.' ११९
वा खाणुनि तद्दर्शनमहिमा निजभाग्य हीं बहुतर चि, तो
राजा कार्यार्थ[2] पुसे म्रियमाण[3]श्रेय जो बहुत रचितो. १२०
य द्वस्थान[4] गृहिजना[5] गोदोहनमात्रकाळ[6] हि न कोठें
दिसतें, दयाघना ! या मोरांचें[7] भाग्य या जनीं मोठें. १२१

---

# द्वितीय स्कंध.

न[8] रवर्यांसि शुक म्हणे, " लोकहित प्रश्न हा तुझा, राज्या !
मिरविति गुणज्ञ कनका, कांढी सूक्ष्मा जपोनि झारा ज्या[9]. १
मो क्षपति[10] श्रोतव्यस्मर्तव्य[11] हि हा चि कीर्तितव्य[12] जना,
तस बुध भजति सुयशा हरिच्या चि, न अन्य कीर्तित[13] व्यंजना[14]. २
भ गवद्व्यासापासुनि ' भागवत ' महापुराण मीं पढलों,
आक्षिप्त[15]चित्त झालों जरि हीं नैर्गुण्य[16]सत्पदीं चढलों. ३
गं[17] तिसुखकामुक जे जे त्या त्या सर्वांसि सुफळ भागवतीं,
कुजकें कांहीं मिरवी, परि कैंची त्या सद्उपलभा[18] गवतीं ? ४
ब स ऐकत भागवत प्राज्य, असे सप्तदिवस अवधि, रहा,

---

१. पाहिलेल्या. २. कर्मविषय. ३. मारणाऱ्याचें कल्याण. ४. ज्याचें राहणें. ५. गृहस्थाना. ६. गाईचें दूध काढण्यास लागणाऱ्या वेळाइतके देखील. ७. मोरोपंत कवीचें. ८. परीक्षितीला. ९. ज्या सूक्ष्मा (अल्पा) कनका झारा (झारेकरी) जपोनी काढी—अन्वय. १०. श्रीविष्णु. ११. श्रवण व स्मरण करण्यास योग्य. १२. वर्णन करण्यास योग्य. १३. वर्णिलेल्या. १४. पंखाला. १५. वश—**पंत.** १६. निर्गुण (ब्रह्म) रूप उत्तम स्थानावर. १७. मोक्षसुखेच्छु. १८. उत्तम दगडाची—चिंतामणीची—कांति.

खट्वांगहित[1] मुहूर्तें, न म्हणु अनरस[2] न अनंध अबधिर 'हा[3]!' ५
ते हे सुसंहिता[4] तूं श्रवण करीं, स्वस्थ मीं इचा वदता,
बा ! या सन्मात्रेनें कांहीं हि नुरे चि भवगदीं[5] गदता. ६
वा अभिमन्युसुता ! या भागवतीं चित्तशुद्धिला मूळीं[6]
कथिली आहे भगवद्रूपीं[7] गतिहेतु, धारणा[8] स्थूलीं[9]. ७
सु ज्ञातें सांगितली स्वहृदयपद्मीं सुधारणा, भूपा !
ध्यावें अंगुष्ठमिता प्रभुच्या श्यामा चतुर्भुजा रूपा. ८
दे हत्याग करावा योगबळें ब्रह्मरंध्र[10] भेदून,
प्राणानिळासि[11] सोडुनि मार्ग चळों लेशमात्र नेदून[12]. ९
वा ट श्रुतिनीं स्तविली बहु सद्योमुक्तिची[13] असी बा ! हे,
वाहे ज्ञानिबहुमता[14] राया ! क्रममुक्तिची[15] दुजी आहे. १०
य मनियम[16] धरुनि दृढ विधि पूर्वीं जगदीश्वरासि आराधी,
हें मार्गद्वय[17] सांगे प्रभुवर देउनि तयासि सारा धी. ११
न रवर्या ! यज्ञतपोयोग असे मार्ग मुक्तिचे फार,
परि वा ! कृष्णीं होतो ज्या मार्गीं भक्तियोग तो सार. १२
मो ठ्या यत्नें ब्रह्मा एकाग्रमनें त्रिवार वेदातें
नीट विचारुनि[18] करी निश्चय, पाहे न यांत खेदातें. १३
भ गवच्चरितें सुयशें तीं श्रवणस्मरणकीर्तना उचितें

---

१. राजा—**पंत.** खट्वांगराजाचें आयुष्य एक मुहूर्त उरलें असतां, त्यानें श्रीविष्णूस अनन्य भावानें शरण जाऊन मोक्षपद प्राप्त करून घेतलें. २. प्रेमळ. ३. 'हा !' न म्हणू, खेद न करू—**पंत.** ४. भागवत. ५. आजारीपणा. ६. आरंभीं. ७. ईश्वररूपांत. ८. चित्त स्थिर करणें. धारणा=योगांतील एक अंग. ९. स्थूल स्वरूपानें. १०. टाळू. ११. प्राणवायूस. १२. न देऊन. १३. तत्काळ मोक्ष प्राप्त होण्याचा. १४. ज्ञानी लोकांनीं श्रेष्ठ मानिलेली. १५. क्रमाक्रमानें मोक्ष प्राप्त होण्याचा. १६. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि हीं राजयोगाचीं आठ अंगें आहेत. यम=चित्ताचें दमन करणें. नियम=नियम पाळणें. १७. मुक्ति व क्रममुक्ति हे दोन मार्ग. १८. विचार करून.

येणें तल्लाभें[1] घडे, यावांचुनि कर्म-जें नव्हे शुचि तें. १४
ग ळतो गर्व हरियशःश्रवणें, अघराशि सर्व ही जळतो,
पळतो भ्रम, किंबहुना भगवान् येणें चि सर्वथा वळतो." १५
व सुधापाळ म्हणे, 'बा ! मायेनें विश्व हें कसें हरि तो
करितो शुकयोगींद्रा ! सांग कसें पाळितो कसें हेरितो[2] ? १६
ते ब्रह्माद्यवतार श्रीनारायण मुने ! कसें धरितो ?
वद अवतारचरित्रें, ज्यांहीं जीवांसि अज[3] समुद्धरितो.' १७
वा रिजनाभ[4]प्रभुतें वंदन असकृत्[5] करूनि शुक बोले,
त्या तद्वागमृताच्या पानें नृप मुनिसमाजसह डोले. १८
सु ख वाढविसि प्रश्नें लोकीं, तूं साधु परिसता[6] राया !
बा ! अन्य धन्य कोण्हीं न तराया साधुपरिस ताराया. १९
दे वा ! विधितें नारदमुनि नमुनि पुसे असें चि कीं कर्ता,
भर्ता[7] या विश्वाचा तच्चित्ता[8] तो चि वाटला हर्ता. २०
वाँ[9] रिजयोनि म्हणे, 'बा ! कथितों मीं तत्व, तूं परिस, मजला
कर्ता भर्ता हर्ता म्हणसि कसा ? तुज नसे हरि समजला. २१
य द्यपि तत्वज्ञ न तूं [10]तैरि मज वारि तव दया चि सांगायें[10]
कां गाया तत्व न हे[11] हेतु ? पहा रोमहर्ष आंगा या, २२
न गें[12] केवळ कनक तसें विश्व सकळ वासुदेव[13] जाणावा,
वेदादि सर्व नारायणपर, सद्बोध हा चि बाणावा[14]. २३
मो ह मनींचा माझा तद्भजन चि होय हेतु बा ! जाया,
जीवांच्या विश्रांतिस तत्कीर्ति भवाब्धिसेतु बाजा[15] या. २४

---

१. भगवत्प्राप्ति. २. संहारितो. ३. अनादि (नारायण). ४. श्रीविष्णूतें. ५. वारंवार ६. श्रोता. ७. पालक. ८. नारदाच्या मनाला. ९. ब्रह्मदेव. १०. तरि (तथापि) तव दया चि (तुझ्याविषयीं माझे मनांत असलेलें प्रेम) [ तत्व ] सांगण्यासाठीं मज वरि (उद्युक्त करते). ११. प्रश्नरूप दया-**पंत.** तत्व गाया हे (तव दया) हेतु कां न? या आंगा (माझे शरीराला) रोमहर्ष पहा-अन्वय. १२. अळंकार-**पंत.** १३. वासुदेवमय. १४. ठसावा. १५. खाटा.

भ गवंताचे आम्हीं अंश, नृपा! वासुदेव तो अंशी,[1]
वाणी बोले तेणें बोलविली जेंवि वादकें[2] वंशी[3]. २५
ग गनादिस कारण, जो तत्वगणमदादि[4], उभवितात न या
निर्मिति तपें प्रजापति, याचा प्रभु तो चि उभविता[5], तनया!. २६
व त्सर[6] सहस्र उदकीं तत्वगणोत्पन्न[7] अंड[8] बा! होतें,
परमात्मा प्रभु त्यातें चेतवि न, म्हणे ‘तसें चि राहो तें.’ २७
ते जें चेतउनि[9], तया भेदुनि त्यांतुनि निघे पुरुख[10], राहो
विश्वाकार असा चि, प्रभु चित्तीं आमुचा गुरु खरा हो. २८
बा! देव विराडंतर्यामी[11] जो याचिया चि हीं[12], तनया!
नाभिसरोजीं[13] झाला, मग कां जोडील सांग हात न या? २९
सु तरला! यज्ञ परमपुरुषप्रीत्यर्थ[14] शुभ करावा, हें
बहुत स्वमनीं होउनि मीं संकल्पासि वश बरा वाहें. ३०
दे वाचे अवयव जे संभारें[15] तिहीं च करुनि हा यजन[16]
करि हरिचें, कीं याचा[17] जो न म्हणे तो कधीं च ‘हाय!’ जन. ३१
वा हतसें हृदयाब्जीं अत्युत्सुक मीं सदैव ही हरितें,
सत्य वचन संकल्पित[18] माझें यश वसति सज्जनीं करितें. ३२
य न्नाभिपद्मभव मीं वेदतपोमय[19] हि साधुनि हि योगा,
जेणें प्रजापतिपति हि हरितें, दुर्ज्ञेय केवळ चि तो, गा!. ३३
न कळे मला तुम्हांला शंभुस हि, कळेल काय अन्यासी?
त्यां मात्र तत्प्रसादें कळतो, जे शांत साधु सन्यासी[20]. ३४

---

१. [ सर्व जीव ] ज्याचे अंश आहेत असा. २. वाजविणाऱ्यानें. ३. पांवा. ४. तत्त्वांचा समुदाय (पंचतत्त्वें), मत् (मी ब्रह्मदेव) यांचा आदि (नारायण). ५. उत्पन्न करणारा. ६. वर्षें. ७. पंचतत्त्वांपासून निर्माण झालेलें. ८. ब्रह्मांड. ९. सचेतन करून. १०. पुरुष. ११. सर्व सृष्टिरूप देहाला व्यापणारा. १२. मी ब्रह्मदेव. १३. नाभिकमलीं. १४. परमपुरुषाला (ईश्वराला) संतोष व्हावा म्हणून. १५. साहित्य. १६. यज्ञ. १७. हरीचा. १८. चांगलें कल्पिलेलें. १९. वेदरूप व तपोरूप असून हि. २०. [ कर्मांचा ] त्याग केला आहे ज्यांनीं असे.

मो जिल कोण प्रभुचे अवतार? तथापि ते न कां गावे?
पहिला सहस्रशीर्षा[1] 'पुरुष' तुला इतर ते हि सांगावे. ३५
भं[2] व यज्ञ[3] मीं, तुम्हीं ही हे दक्षादि प्रजेश्वर हि जाण,
अवतार चि नाकमनुजतलखगलोकेश[4] हें मनीं आण. ३६
गं[5] रधर चारण विद्याधर राक्षस यक्ष आणि गंधर्व,
ऋषि पितृ भूत असुर मृग यांचे जे नाथ नारदा! सर्व. ३७
धुँ[6] र तेज गुण वसे ज्या स्थानीं अवतार तो असें समज,
हें युक्तिनें चि वदलों, साकल्यें शक्ति वर्णनीं न मज. ३८
ते हे जगदीशाचे कथितों लीलावतार मीं आतां,
शतजन्मार्जितदुरितक्षय होतो ज्यांसि ऐकतां गातां. ३९
वाँ रिधिचरकनकाक्षक्षय[7] करि हरि, दे बुडों न वसुधेतें,
या यज्ञवराहाची[8] सत्कीर्ति न दे उडों नवसुधेतें. ४०
सु रपति सुयज्ञ[9] आकूत्युदरज[10] रुचिसुत[11] जगत्त्रयासि हरी
स्त्री दक्षिणा सुयाम हि तन्नंदन, मनु[12] म्हणे जयासि 'हरी.'[13] ४१
दे व कपिल कर्दमसुत, नव भगिनी ज्यासि, देवहूतिस जो
सांख्य[14] ध्यान हि कथि, मन, साधाया तत्प्रसादभूति[15] सजो. ४२
बा! आत्रिसि 'तुज म्यां मीं दिधलों' बोले म्हणोनि जो दत्त,
यदुहैहयादि तरले, होउनि ज्याच्या पदार्चनीं युक्त[16]. ४३
य त्नें म्यां तप करितां सनक सनंदन सनत्कुमार हरी
होय सनातन हि प्रभु जो प्रकट कवींत आत्मतत्त्व करी. ४४

---

१. हजार आहेत मस्तकें ज्याला असा. २. शंकर. ३. विष्णु. ४. स्वर्ग, मनुष्यलोक, पाताल, पक्षी आणि लोक यांचे स्वामी (अनुक्रमें इंद्र, राजा, पाताला-धिपति, गरुड आणि लोकपाल). ५. सर्प. ६. श्रेष्ठ. ७. समुद्रांत संचार करणारा जो हिरण्याक्ष राक्षस त्याचा नाश. ८. यज्ञवराहावताराची. ९. नामविशेष. १०. आकूतीचे उदरापासून झालेला. ११. रुचिनामक प्रजापतीचा मुलगा. १२. हा स्वायंभुव मनु सुयज्ञाचा मातामह. १३. इंद्र. १४. ज्ञानयोग. १५. तिचें प्रसादरूप ऐश्वर्य. १६. निमग्न.

न र नारायण हे प्रभु, धर्म पिता, माय [1]दक्षजा मूर्ति,
ज्यांच्या भजनें होत्ये भक्तांची सर्वकामनापूर्ती. ४५

मो हावयासि ज्यांतें शक्रप्रेपित वराप्सरा नटल्या,
झटल्या; उर्वश्यादि स्त्रीरत्नें निर्मितां [2]जिहीं [3]फटल्या. ४६

भ[4] सित करिति तापवि जो [5]कामें तया रोपदृष्टिनें चि पटु,
रोप न जाळिति, जाळी, [6]जंन्हि निपटी सुतप, म्हणति 'हूं निपटु.' ४७

गँ[7] हनप्रताप तो हा रोप न [8]ज्यांच्या शिरे मनीं स्वच्छीं
भीतो बहु दूरुनि ही पद ठेवाया, जसा [9]करी [10]कच्छीं. ४८

व त्सा! मग काम कसा आश्रय त्यांच्या तशा मना करिल?
[11]करिलक्ष हि हो! [12]देवीहरितें आक्रमुनि काय हो! करिल? ४९

ते जस्वी [13]शिशु हि [14]जनकानिकट [15]दुज्यां आइनें उरीं [16]विद्ध
शब्दशराहीं करितां, त्यजि गृह होउनि [17]तपोर्जना सिद्ध. ५०

बा ळा स्वाराधनपथदर्शक [18]सद्दर्शन प्रथम घडवी,
नेउनि सिद्धक्षेत्रीं स्वध्यानीं तत्सुबुद्धिला जडवी. ५१

सु[19] खमूर्तिदर्शन निजस्तवनीं निपुणत्व पद हि दे [20]वरि तें,
जें [21]परमर्षिजनमहित, [22]नतकामित दे पडों न देव रितें. ५२

दे ता झाला [23]ध्रुवगति देव ध्रुवबाळकासि [24]अवतारी,

---

१. दक्षाची मूर्तिनामक कन्या. २. ज्या नरनारायणानीं. ३. फसल्या. ४. भस्म. ५. मदन. ६. जंन्हि [रोष] सुतप निपटी (उत्तम तपाचा नाश करतो) [तरि] [हे शहाणे पुरुष] 'हूं निपटु' (बरें तर, क्रोध आमच्या तपाचा नाश करो) [असें] म्हणति–अन्वयार्थ. ७. अजिंक्य आहे शक्ति ज्याची असा (रोष). ८. ज्या नरनारायणांच्या. ९. हत्ती. १०. जलप्राय देश–**पंत.** ११. एक लाख हत्ती. १२. भवानीच्या सिंहाला. १३. बालक [पुत्र]. १४. पित्याच्या [उत्तानपादाच्या] जवळ. १५. दुसऱ्या. (सावत्र मातेचें नांव सुरुचि होतें). १६. भोंसकलेला. १७. तपश्चर्येला. १८. साधूची [नारदाची] भेट. १९. आनंददायक [देवाची] मूर्ति तिची भेट. २०. आणखी. २१. श्रेष्ठ मुनींना मान्य. २२. भक्तांची इच्छा. २३. अढळस्थान. २४. वत्सलावतारी (विष्णु).

तो भक्तवत्सलप्रभु दीना घडवूनि दास्यलव तारी. ५३

**वा** त्सल्य प्रभुचें बहु, वा! करुणेचा अगाध अर्णव तो,
महिमा न सहस्रास्या[1], मज चतुरास्यासि[2] काय वर्णवतो? ५४

**'य** ज्ञाचा भोक्ता तो मीं च' म्हणे धरुनि मद तया वेना
द्विजशापहता 'या' हें सामोरें नरक वदत यावेना? ५५

**न** रकीं पारि चावूं दे विप्राहीं प्रार्थिला न वेनातें
पुत्र चि होय तशासीं ऐसें न च लाविंतिल नवे नातें? ५६

**मो** क्षप्रदपद तो पृथु यश करि चुकवूनि नरक वेनाचें,
हें चरित गा निवुनि तूं निववाया देव नर कवे[3]! नाचें. ५७

**भ** व्यार्थ त्रिजगाच्या वत्सा! पृथु देव गा! इला दुहिता[4]
हे ज्याची घे द्रव्य, क्षीर जसा गोप गाइला दुहिता[5]. ५८

**ग[6]** लिताखिलविक्रिययतिपति भगवान् ऋषभदेव[7] नाभिज[8] गा!
देव सुदेवीनंदन म्हणती ज्याची सुकीर्ति 'नाभि[9]' जगा. ५९

**वं** तें मत्सत्र, तदा प्रकटे प्रभु जेंवि तोकें[10], विश्वास
जो पाळी, सोडी हयवदन[11] श्रुतिरूप तो कवि श्वास. ६०

**ते** वेद प्रभु रक्षी जे मन्मुखगलित[12] भयदलयकाळीं,
भेटे मनुला[13] होउनि मत्स्य[14] करि विहार नंदनदीपाळीं[15]. ६१

**वा** हे मंदर[16] पृष्ठीं, मथितां क्षीराब्धि होय कच्छप[17] हा,
सुखकर नगधर्षण ज्या निजवि, गमे हें चरित्र अच्छ[18] पहा. ६२

**सु[19]** यश असुनि जड तें ही, होय सकळलोकपाळ कांसव, दे;

---

१. हजार आहेत मुखें ज्याला अशा [ शेषाला ]. २. ब्रह्मदेवाला. ३. हे पंडिता! ४. कन्या. ५. दूध काढणारा. ६. ज्यांचे सर्व विकार नष्ट झाले आहेत अशा मुनींचा स्वामी. ७. नाभिराजाचा पुत्र ऋषभदेव. ८. भिऊं नको. ९. [ जेव्हां ] माझा ( ब्रह्मदेवाचा ) यज्ञ झाला. १०. मूल. ११. हयग्रीव. (याच्या नाकांतून वेदरूप श्वास निघाला). १२. माझ्या ( ब्रह्मदेवाच्या ) मुखांतून गळलेले. १३. विवस्वान् मनूला. १४. मत्स्यावतारवर्णन. १५. समुद्रांत. १६. एक पर्वत. १७. कासव—कूर्मावतारवर्णन. १८. निर्मल. १९. यश चि अमृत; अमृतरस जड—**पंत.**

जो भक्त वारिल दुसरे[1] मळवाया तो कपाळ कां संवदे[2]? ६३
दे वांचें भय हरि हरि, हरि[3]! हरि[3]! हरिरूपि[4] उग्रि घे, दितिज्यां[5]
प्रभु नखराहीं च चिरी, तिळ ही न पविप्रहार भेदिति ज्या. ६४
वा रणवर वारिजकर[6] विनवी धरिला सरांत जो नक्रें
त्यातें स्वकरें उद्धारि हरि अरिचें मुख विदारुनीं चक्रें. ६५
य ज्ञांत त्रिपद[7]क्षिति मागुनि मग वामन च्छळी बळिला[8],
प्रभु बळिनें चि, बहुमतें[9] प्रभुनें बळि भक्तराज न च्छळिला. ६६
न म्रास तुजें[10] हि सांगे हंस[11] प्रभु भक्तियोग ओळोनें[12]
भागवत हि हें मिळतें बा! हरिजनपदरजांत लोळोन. ६७
मो डुनि कुपथ, सुपथ मनुरूप[13] मुकुंद प्रवर्तवी, तनया!
तेजश्चक्रें रक्षी सनया चि जना, वधूनि वीतनया[14]. ६८
भ गवान् धन्वंतरि[15] हरि परिहरि अत्युग्र रोग, ओखद या
प्रभुचें नाम चि, देती याची मातेपरीस तोख[16] दया. ६९
ग र्वी ब्रह्मद्रोही क्षत्रिय खळ एकवीसदा खपवी,
या श्रीभृगुरामाच्या परशुसि करितो प्रणाम लाख पवी. ७०
व सुधापतिपति भगवान् गुर्वर्थत्यक्तराज्यपदकाम
राम स्वाश्रितकल्पद्रुम ज्याचें पापतापहर नाम. ७१
ते कुंभकर्ण[17]दशमुखमुख राक्षस परम उग्र जगदहित,
तद्वधचरितयशोलव होय भवमहागदघ्न अगद हित. ७२
वा रिधिमाजि महाद्भुत त्यावांचुनि करिल कोण बा! सेतु?
वानर सहाय मुक्तिस अत्याश्चर्य प्रताप हा[18] हेतु. ७३

---

१. भक्तिव्यतिरिक्त. २. व्यापार. ३. खेदोद्गार. ४. नृसिंहावतार. ५. हिरण्यकशिपूला. ६. ज्याच्या सोंडेंत कमल आहे असा गजेंद्र. ७. तीन पावलें मावेल इतकी भूमि. ८. [प्रह्लादपौत्र] बळिदैत्यराजाला. ९. सर्वमान्य. १०. तुला [ नारदाला ]. ११. हंसावतारी. १२. प्रसन्न होऊन. १३. मनूचें आहे स्वरूप ज्याला. १४. कुनीतिमान् लोकाना. १५. अवतारविशेष. १६. तोष. १७. कुंभकर्णरावणप्रमुख. १८. हा (उपरिनिर्दिष्टच).

सु दुजा व वर्ण आधीं, मग देव, सुता! जयाचिया नामीं
तत्सुतयश जें सुगतिस्तव वरुनि, असें तया चि [1]याना मीं. ७४

दे व श्रीबलराम प्रभु असुर[2]जनादिकदनकर पवि तो
बा! तत्प्रताप सन्मुख शोभवितो, दुष्टवदन करपवितो. ७५

वा[3] सव पर्वतभेत्ता तो प्रभु तैसा चि शत्रुमदभेत्ता,
खळ[4]धेनुकप्रलंबद्विविदेल्वलबल्वलादिवधवेत्ता. ७६

य दुकुलकमलद्युमणि श्रीकृष्णप्रभु हि मज्जनक थानीं
स्वयशीं मन मुल लाविल, करिल फिके अमृतमज्जन कथानीं. ७७

न व नव निरुपम चरित प्रकट करिल, हरिल भूमितापातें,
श्रीमूर्ति[5] निरखि त्याचें न च एक हि चळबळेल वा! [6]पातें. ७८

मो हिल महातपोधन योगी ज्ञानी हि बाललीलाहीं,
पीतिल नेत्रें त्या स्वश्रीला स्वजनार्थ चाललीलाँ[7] हीं. ७९

भ रुनि विष स्तन पाजी जी त्या ही पूतनेसि तारील,
मथिल तृणावर्तादिक जे, त्यांचें जन्ममरण [8]सारील. ८०

ग गनीं उचलुनि ने त्या असुरासि गळा पिळूनि पाडील,
उपाडिल गुरु[9] अर्जुन[10]तरु शकट[11] पडेसें पदें चि ताडील. ८१

ब क अघ[12] मारिल, दंडिल कालिय, दव[13]पावकासि भक्षील,
उचलुनि गोवर्धननग वृष्टिप्रलयीं[14] व्रजासि रक्षील. ८२

ते ते गोपवधूंचे संकल्प प्रभु अशेष पुरवील,
खळ शंखचूड केशी वृषभासुर जे तयां न उरवील. ८३

वा[15] रणवर्यं[16] कुवलयापीड मथिल, मल्ल[17] कंस खपवील,
उजरुनि कुब्जेसि, तिच्या रूपें भाग्यें रतीस लपवील. ८४

---

१. मार्गाप्रत. २. राक्षससमूहरूपी पर्वताचा नाशकर्ता. ३. इंद्र. ४. दुष्ट धेनुक, प्रलंब, द्विविद, इल्वल, बिल्वल इत्यादिकांचा नाशकर्ता. ५. श्रीकृष्णाची मूर्ति. ६. पापणी. ७. चाललेल्या [स्वश्रीला]. ८. चुकवी. ९. मोठे. १०. वृक्षविशेष. ११. गाडा. १२. राक्षसविशेष. १३. वणव्याला. १४. [इंद्रानें केलेल्या] जलवृष्टिरूप प्रलयकालीं. १५. गजश्रेष्ठ. १६. हा कंसाचा हत्ती. १७. चाणूरादिमल्ल.

सु ख गुरुला[1] गुरुपुत्रानयनें[2] देउनि उदंड निववील,
किंबहुना अहिविषहत शिशुसे श्रित मोहनिहत[3] जिववील. ८५
दे शीं देशीं निजजन चातक त्यांवरि यशोब्द वर्षविल,
देवद्विजारि रडविल, धर्मनयपर स्वभक्त हर्षविल. ८६
वा[4] हिन्यधिपशतांचें हनन परस्पर रणांत करवील,
सुगतिसुकीर्ति[6] करवीं समरहतस्वाहितांसि[5] वरवील. ८७
य श गात्यां श्रोत्यांतें परिपाळाया जगांत वसवील,
अंतीं संतीं स्तविल्या श्रीवैकुंठीं तयांसि बसवील. ८८
न ष्टायु नष्टमति जे त्यां ही द्याया निकां[8] मह[7] व्यास
प्रभु आपण होइल, कीं, दीनत्राणीं निकाम हव्यास[9]. ८९
मो हाया असुर, श्रुतिनिष्ठा त्यांची समूळ उडवाया
मयरचितालक्षितगतिपुरसंश्रित[10] ते सुरारि बुडवाया, ९०
भ र्ता साधुजनांचा कल्पुनि पाखंड वेष, 'हा शुद्ध
मार्ग' म्हणेल, श्रुतिमत दूषिल, म्हणतील 'बुध' तया बुद्ध. ९१
ग रुडस्थ प्रभु कलिच्या अंतीं होईल 'कल्कि' या नावें,
त्यासि सकळपाखंडध्वांतदिवाकर[11] असें चि वानावें[12]. ९२
व दलों संक्षेपें हें, क्षितिचे परमाणु[13] गणिल, परि अंत
प्रभुवीर्याचा कोणा लागेना, गणुनि भागले संत. ९३
ते मात्र सुधी[14] जाणति 'माया' इतुकें चि, जे अजा[15] भजले,
मज लेखज्येष्ठापरि[16] भक्तिप्रेमें सजोनि[17] ही सजले. ९४

---

१. सांदीपनीला. २. सांदीपनीच्या पुत्राला आणून. ३. अज्ञानपीडित. ४. सेनानायकांचीं शतें त्यांचें. ५. रणांत मारलेल्या आपल्या शत्रूंस. ६. केवळ. ७. उत्साह. ८. अतिशय. ९. ध्यास. १०. मयासुरानें उत्पन्न केलेल्या व ज्याचा मार्ग ध्यानांत येणार नाहीं अशा नगरांत आश्रय करून राहिलेले. ११. सर्व पाखंडी (धर्मशास्त्रविरुद्ध) मतांचा नाशक सूर्य. १२. वर्णावें. १३. अत्यंत लहान कण. १४. पंडित. १५. अनादि पुरुषाला. १६. देवांत वडील [ जो मी ब्रह्मदेव ] त्यासारिखे. १७. युक्त होऊन उद्युक्त झाले.

बा ! त्या परमेशाच्या जाणें मीं दास योगमायेतें
कीं भगवान् भव इतुकें ज्ञान भजे जो सदैव त्या येतें. ९५
सु ज्ञ प्रह्लादादिक झाले प्रभुला भजोनि बहुतर[1] ते,
हें हि ज्ञान सुदुर्लभ शब्दज्ञानें सजोनि बहु तरते. ९६
दे वाचें मज कथिलें 'श्रीभागवत,' स्वयें चि तुजला हें
संक्षेपें स्यां हि; नता कवण गुरु म्हणेल 'न हितगुज[2] लाहें' ? ९७
वा नारदा ! सुपात्रीं अर्पुनियां तूं करीं विपुल[3] यातें;
होइल हें जीवांचा जो काम प्रमुख त्या रिपु लयातें. ९८
य द्यपि हे श्रीभगवल्लीला मायाश्रया, तथापि कवी
ईतें गावुनि तरतो, सुज्ञान मनांत हरिकथा पिकवी.' ९९
'नं[4] लिनप्रभवापासुनि मुनि[5], मुनिपासुनि सुपात्र सुरसा[6] जें
तें मज सांगुनि तूं ही स्वयशें, तो[7] जेंवि भूमिसुर, साजें. १००
मो क्षामरवृक्षाच्या भागवता ! आलवालवलयातें[8]
सांगा, तुम्हीं मजकडे तापाच्या चालवा लव लयातें.' १०१
भ गवान् श्रीशुक सांगे, 'ज्या पद्मीं आत्मभव[9] तदाधारा[10]
शोधुनि विधि चिंता करि, अमृताची लाधला तदा धारा. १०२
ग गनीं निकट चि 'तप तप' ऐसी सुखहेतु आयके वाणी,
जाणों चातक पसरी मुख, सोडी त्यांत मेघ तो पाणी. १०३
ब सला त्या चि सरोजीं[11] निश्चळ कोंडुनि तो[12] कवि श्वास,
त्या गीचा[13] तन्मन धरि मातेचा जेंवि तोक विश्वास. १०४
ते उग्र तपश्चर्या दिव्यसहस्राब्द[14] तो करी, रमला[15]
बहुधा तेव्हां नेणे द्रुहिण[16] असे कीं नसे शरीर मला. १०५
वा सु असा जो देव[17] प्रभु तो वैकुंठ आपुला लोक

१. श्रेष्ठ. २. हितकारक रहस्य. ३. विस्तृत कर. ४. ब्रह्मदेवापासून. ५. नारदमुनि. ६. उत्तम रसाला—अमृताला. ७. शुकमुनि. ८. वृक्षाभोंवतीं जें अळें असतें त्याचें मंडळ. ९. आपला जन्म. १०. त्या आधारा. ११. कमलावर. १२. ब्रह्मदेव. १३. [ आकाश. ] वाणीचा. १४. देवाची हजार वर्षें. १५. थांबला. १६. ब्रह्मदेव. १७. वासुदेव.

दावी चतुरास्याला, जेथें भ्रम ताप भय नसे शोक. १०६
सु रुचिर भगवद्रूप चि केवळ वैकुंठलोक तो बा ! गा !
भगवद्रूप चि जेथें पुरुष सकळ शोभती, महाभागा !. १०७
दे खे विधि त्या लोकीं श्रीतें श्रीजानितें[1] हि तो, भावें
वंदी ज्याच्या दासें होउनि बहु तत्समान शोभावें. १०८
वा[2] रिजनाभ म्हणे, 'म्यां तुज हा वैकुंठलोक दाखविला,
उपदेशुनि करउनि तप शुचि मूर्त ब्रह्मरस चि चाखविला. १०९
य त्नें हि मत्प्रसादावांचुनि दुर्लभ विधे ! पराला हें
माग मज प्रणतांच्या सुरतरुला, वांछिता वरा लाहें[3].' ११०
नें[4] लिनप्रभव म्हणे, 'मज निज तत्वज्ञानदान ओपावें,
येणें बद्ध न होइन करितां सृष्टि, प्रसन्न हो, पावें.' १११
मो क्षपदप्रद भगवान् विधिस म्हणे, 'घे ससाधन ज्ञान
माझें गुह्य परम जें काय रहस्याससेत विज्ञान[5]. ११२
भ गवान् सर्गाआधीं[6] मध्यें अंतीं हि एक मीं च असें,
बा ! स्थूळ सूक्ष्म कारण नव्हतें कांहीं च, तत्व जाण असें. ११३
ग गनीं चंद्रद्वयसें नसतां ये प्रत्यया, अधिष्ठानीं[7]
असुनि हि राहुपरि नये जें तूं माया च तें असें मानीं. ११४
व सुधादि पंच भूतें शिरलीं हि, न भौतिकांत[8] तीं शिरलीं,
शिरलों तेंवि न शिरलों मीं त्यांत न यांत, किति वचें[9] जिरलीं. ११५
ते ल जळीं जेंवि तसें जिज्ञासुमनीं स्वतत्व हें पसरे,
जें काय अन्वयव्यतिरेकांहीं[10] सिद्ध त्यांत तूं वस रे !. ११६
वा क्य मनीं हें चि धरीं बळकट, मोहास न कवि कल्पांत[11]

---

१. श्री आहे भार्या ज्याची त्याला (श्रीविष्णूला). २. विष्णु. ३. घे. ४. ब्रह्मदेव. ५. रहस्यासह सम्यग् ज्ञान. ६. सृष्टीच्या पूर्वीं. ७. आधाररूप ब्रह्मीं. ८. सृष्टिरूप कार्यांत. ९. वाक्यें. १०. अन्वय (हेतुसाध्ययोर्व्याप्तिरन्वयः) व्यतिरेक (तदभावयो हेत्वभाव साध्योभावयाव्याप्तिर्व्यतिरेकः) या न्यायांतील सिद्धांत प्रतिपादण्याच्या रीतीनीं. ११. कल्पकाळांत.

पावसिल तसा चि न तूं स्वगुरुवचनमीन[1] बकविकल्पांत[2].’ ११७

**सु** खवुनि विधिला झाला तो गुरु महाविभूतिवल्लभ[3], या
जो भगवदुक्ति जिवंती[4] धरिल न पावेल बाळ वल्लभया[5]. ११८

**दे** नारदास विधि मग ‘भागवत’, द्रवुनि[6] जेंवि दाय[7], करीं
हें बहुधन ज्या काळा दुष्काळा तो म्हणेल ‘हाय! करीं.’[8] ११९

**वा**[9] सव्यात्मजमुनिला देवर्षि सरस्वतीतटीं बोधी,
मीं[10] तुजला[11] कथितों, ‘या श्रीभागवतें तुझी सुखी हो धी.’ १२०

**य** ज्ञरत मुनिवर पुसे तो त्या हरिकीर्तिसिंधुभंगातें[12]
श्रीमन्मैत्रेयमुदिरकाविविदुरमयूरतीर्थसंगातें[13]. १२१

---

## तृतीय स्कंध.

**न** मुनि नृप शुकासि म्हणे, ‘प्रेमें हा सत्समाज डोलावा,
मैत्रेय विदुर यांचा जो सुखसंवाद तो चि बोलावा.’ १

**मो**[14] दाश्रुद्गमकर्ता वक्त्यांचा परमगुरु शुकस्वामी
अभिमन्युसुतासि म्हणेः–ऐक, तुला तें चि सांगतों, बा! मीं. २

**भ**[15] क्तानुजपुत्रांतें खळतनयांच्या मिळोनि कुमतातें
करवी भस्म जतुगृहीं[16] न[17] करि जगीं साधुवाद घुमता तें. ३

---

१. गुरुवाक्यरूपी उदकांतील मासा. २. बगळा तद्रूप संशयांत. ३. मोठ्या ऐश्वर्यांचा स्वामी (विष्णु). ४. मुलांचे गळ्यांतील अलंकार. ५. वालाइतके भीतीला. ६. आर्द्र होऊन. ७. देणगी. ८. हें [ भागवतरूप ] बहुधन ज्या करीं [ असेल ] तो काळा दुष्काळा “ हाय करीं ” [ असें ] म्हणेल–अन्वय. ९. वासरी वसुकन्या सत्यवती तत्पुत्रो व्यासः–**पंत.** १०. शुकमुनी. ११. परीक्षित् राजाला. १२. [ भंग= ]तरंग–**पंत.** विष्णूचे यशोरूप समुद्रांतील तरंगाला ( सूत मुनीला ). १३. श्रीमन्मैत्रेयरूपी मेघाचा ज्ञानी विदुररूपी जो मयूर त्याच्या तीर्थसंगातें (तीर्थावरील आसक्तींतें अर्थात् तीर्थाटनातें ). १४. आनंदाश्रु उत्पन्न करणारा. १५. भक्त बंधु जो पंडु त्याच्या पुत्राना ( पांडवाना ). १६. लाक्षागृहांत. १७. [ ज्यायोगें ] साधुवाद घुमता तें [ धृतराष्ट्र ] न करि.

ग[1] र्हित परम सभेंत हि वारीना सत्स्नुषालकाकर्ष,[2]
पांडुसुतांचें कपटें हरितां सर्वस्व जो धरी हर्ष. ४
व नवास करुनि, मागे सत्यरत अजातशत्रु धर्म, तरी
द्यावें तें देईना, अवलंबी भग्न पापकर्म तरी.[3] ५
ते[4] न अमृतधारा पी प्रभुवाक् जी विधिमुखा निकाम मता,
अवमानिला[5] करी जो[6] दीनीं द्याया सुखा निकां[7] ममता. ६
वा खाणिति जीस बहु ज्ञाते ती विदुर नीति आयकवी,
कळवी अनयाचारें होणार अनर्थ आसराय कवी. ७
'सु त साधु धर्म यातें दे दाय,[8]' म्हणे, 'करीं न अपरा[9] धी,
समजुनि दृष्टि न झांकीं, भीमाचा न च उरेल अपराधी. ८
दे व अजित कृष्णप्रभु पार्थांचा[10] तो पित्यापरि सहाय,
याचा प्रताप लावित आला चि म्हणावया अरिस 'हाय!'. ९
वा[11] ळीं यां[12]; हा दोष चि सुत सद्द्वेष्टा; करीं कुलहितातें,
धर्मासि सुरपदाधिक सामें प्रेमें दिलें फुल हि तातें.[13]' १०
य[14] मधर्मराज कीं तो हित धर्मन्याय बोलिला, परि तें
मंत्रश्रवण पिशाचा, पार्थांच्या तेंवि तापवी अरितें. ११
न ष्टायुश्रीकीर्ति श्रेष्ठद्वेष्टा सुयोधन क्रूर
क्रोधें म्हणे, 'पुरांतुनि दवडा दासीसुतासि[15] या दूर.' १२
मो र उलूकानें[16] कीं धिक्कारावा मराल काकानें,
धिक्कारिला[17] कँवि खळें तें ऐकावें न साधुच्या कानें. १३
भ गवद्भक्त न कोपे, तो बहु मानी सनांत मायेतें;

---

१. निंदित. २. द्रौपदीचें केश ओढणें. ३. नाव, नौका. ४. जी प्रभुवाक् विधिमुखा निकाम (अत्यंत) मता [होती, व जी] अमृतधारा (होय) ते (ती) [धृतराष्ट्र] न पी (स्वीकारी). ५. [धृतराष्ट्रानें]. ६. श्रीकृष्ण. ७. केवळ. ८. पितृद्रव्य (राज्यार्ध). ९. दुसरी. १०. पांडवांचा. ११. दूर कर. १२. दुर्योधनाला. १३. धृतराष्ट्रानें. १४. विदुर (यमाचा अवतार). १५. विदुराला. १६. घुबडानें. १७. विदुर–पंत.

[1]इतराच्या जाळाया भरतें [2]सुकृताधना तमा येतें. १४
ग जपुर सोडी राजद्वारीं च करूनि [3]आयुधन्यास,
तीर्थें करी, न बहुमत धर्मांहुनि वित्त आयु [4]धन्यास. १५
व सुधेवरि तीर्थपदस्थानें तीर्थें पहात तो सुकवी
पावे प्रभास, ऐके क्षयवार्ता जनमुखें जिला चुकवी. १६
ते थुनि सरस्वतीचीं तीर्थें सेवीत जाय तो धीर,
[5]स्वजनालक्षित पावे बहुकाळें विदुर [6]रविसुतातीर. १७
बाँ[7] र्हस्पत्य महामति उद्धव मंत्री जगन्निवासाचा,
भेटे विदुरा, वाटे योगीं दत्त चि तया शिवा साचा. १८
सु हृदांचें त्यासि पुसे तेव्हां सुखवृत्त विस्तरें [8]क्षत्ता,
पार्थांचें [9]त्याचें ही, [10]यद्रीति बसे उरीं जसी लत्ता. १९
दे वाचें सेवटिल प्रेमळभक्तासि वृत्त न च कथवे,
अप्रिय वदतां देती दुःखाचे सज्जनास वचक [11]थवे. २०
बा ष्प गळां बहु दाटे, फाटे उर सांगतां, तथापि कसा
न वदेल ? [12]विस्वर वदे [13]स्ववसंतवियोगविषकथा पिकसा. २१
य दुनाथें श्रीकृष्णें करुनि निमित्त द्विजाति[14]शापातें
संहरिलें जाणुनि भूभर शेष स्वकुळ सर्व, बापा ! तें. २२
नं[15] मीं च [16]कलि प्रकटे अस्ता जातां रवि, प्रभासाची
महि शवमयी च झाली, कां करिल प्रभु न [17]विप्रभा साची ? २३
मो दक लाडू द्यावा बाळा, मज दे [18]स्वतत्त्वबोधा त्या,

१. भक्ताहून अन्य जनाच्या अज्ञानाला. २. पुण्यरूप संपत्तीला. ३. शस्त्रत्याग. ४. भाग्यवान् पुरुषाला. ५. आप्त जनानीं टाकिलेला. ६. यमुनेचें तीर. ७. नीतिशास्त्रनिपुण. ८. विदुर. ९. दुर्योधनाचें. १०. ज्या दुर्योधनाची वागणूक. ११. समूह. १२. शब्दरहित. १३. आपला व वसंतऋतूचा वियोग हें च विष त्याची कथा. १४. ब्राह्मणाच्या शापाला. [ यादव भोज याला 'तुझ्या कुलाचा क्षय होईल' असा शाप झाला होता ]. १५. खेळांत, थट्टेंत. १६. भांडण. १७. विप्राची तेजस्विता. १८. तत्वज्ञानाला.

तों ये व्याससुहृत्सख[1] मैत्रेय हि, मान्य होय तो धात्या. २४
भ क्तासि मला[2] आज्ञा केली जाया निघोनि बदरीतें[3],
जातों, परि वाटे सुख देइल मणिसानुची[4] हि न दरी तें.' २५
ग हिवरुनि म्हणे क्षत्ता, 'सांग मला तत्त्व[5] तूं भगवदुक्त,
भगवान् तसे चि भगवद्भक्त हि करिति स्वकिंकरा मुक्त.' २६
व सु जो पूर्वभवींचा[6] तो उद्धव तेधवां म्हणे, 'विदुरा!
हें[7] मैत्रेया कथिलें, त्वत्स्मृति झाली भवाद्रिच्या भिदुरा[8]. २७
ते णें चि तुला प्रभुच्या आज्ञेनें सर्व तत्त्व सांगावें.
मिळतां सुब्राह्मण गुरु, इतरातें गुरु म्हणोनि कां गावें ?' २८
वा ट हिताची दावुनि उद्धव गेला स्वयें बदरिकेला,
जेथें नरनारायण; भस्म जिहीं सर्व ही सदरि[9] केला. २९
सु रतटिनीतीरीं तो भेटे जावूनि विदुर मित्रजा[10],
स्मरुनि क्षण क्षण मनीं कांपे मोहाद्रिभिदुरमित्रा[11] ज्या. ३०
दे शिकें[12] केला वंदुनि विदुरें मैत्रेय मुनि, तयाला जें
श्रोतव्य[13] तें पुसे तो, ज्याची आइसि म्हणे दया 'लाजें.' ३१
वा[14] डववर्य म्हणे, "बा विदुरा! तूं धन्य कीं तुझें स्मरण
त्रिजगद्गुरुनें केलें, ज्याचे स्मरत्यासि तारिती चरण. ३२
य श बहु पूरुकुळाचें, घेता झालासि ज्यांत जन्मास,
तूं वैष्णवांत, मासांमाजि जसा मार्गशीर्ष सन्मास. ३३
न ळ नृप नृपांत, तैसा तूं पुण्यश्लोक[15] लोकपाळांत,
दिससी नरांत नरसा, दिसला प्रभु जेंवि बाळ बाळांत. ३४
मो क्षसुसाधन कथितों, श्रीसंकर्षण[16] सनत्कुमारा जें

---

१. व्यासाचा मित्र. २. उद्धवाला. ३. बदरिकाश्रमास. ४. मेरुपर्वताची. ५. [ब्रह्माचें] ज्ञान. ६. पूर्वजन्मींचा. ७. [तुला तत्त्व सांगावें] हें. ८. संसाररूपी पर्वताच्या छेदकाला (श्रीकृष्णाला). ९. सज्जनांचे शत्रू. १०. मैत्रेयाला. ११. अज्ञानरूप पर्वताचा छेदक असा जो कृष्ण त्याचे मित्राला (मैत्रेयाला). १२. गुरु. १३. ऐकण्यास योग्य. १४. विप्रश्रेष्ठ (मैत्रेय). १५. पवित्र आहे कीर्ति ज्याची असा. १६. श्रीभगवान् शेष.

सांगे, कुमार[1] सांगुनि जेणें सांख्यायना म्हणे ‘साजें’. ३५
भ क्ता पराशराला विनयें नमितां चि पादराजीवा
श्रीसांख्यायन सांगे करुनि दया त्या हि सादरा जीवा[2]. ३६
गौ[3] रकंठसा चि गुरुवर सर्वज्ञ पराशर स्वयें बा! जें
सांगे ‘भागवत’ मला श्रवण करुनि तें चि तूं यशें साजें. ३७
व र हा देउनि विदुरा! व्हाया अत्यंत निर्मळा दृष्टी
सांगे सविस्तर, करी ब्रह्मा भगवद्वरें[4] जसी सृष्टी. ३८
ते सृष्टि वाढवाया विधिचें रूप द्विधा मिथुन[5] झालें,
स्वायंभुव मनु पुरुष, स्त्री शतरूपा, जयां सुयश आलें. ३९
बा! त्या सुत प्रियव्रत मनुला उत्तानपाद तो दुसरा,
आकूति देवहूति प्रसूति, नलिनी सुता जशा सुसरा[6]. ४०
सु त विधिचे रुचि कर्दम दक्ष, तयां दे तिघां तिघी कन्या,
प्रसवोनि यशें झाल्या सर्वा हि त्रिभुवनांत त्या धन्या. ४१
दे वश्रेष्ठासि[7] मनु प्रार्थी कीं, ‘स्थान[8] सृष्टिला धरणी,
ती च महांबुनिमग्ना[9], यत्न करावा प्रभो! तदुद्धरणीं.’ ४२
वां[10] रिजयोनि विचारी, यत्न न सुचतां, मनीं म्हणे, ‘हा मीं
सर्गीं[11] योजित आहें[11], जेणें कर्तव्य तो करो स्वामी[12].’ ४३
यं[13] तचित्तेंद्रिय होतां विधि, तन्नासाबिळांतुनि[14] क्षिप्र
किटिशिशु[15] निघे गुहेंतुनि; बा! जैसा वालखिल्य सद्विप्र. ४४
न व्हता अंगुष्ठाहुनि अधिक, गजसमान तो क्षणें वाढे,
तन्नाद उग्र, परि हितकर सेविति देव मुनि, जसे काढे. ४५

---

१. सनत्कुमार. २. बृहस्पतीला. ३. शंकरासारखा. ४. श्रीविष्णूच्या वरानें. ५. जोडपें. ६. उत्तम सरोवराला. ७. ब्रह्मदेवाला. ८. [ जी ] धरणी [ पृथ्वी ] सृष्टीला स्थान ( सर्व निर्मित वस्तुजातीला आधार ). ९. महासागरांत बुडलेली. १०. ब्रह्मदेव. ११. सृष्टि उत्पन्न करण्याचे कामीं गुंतलों आहें. १२. विष्णु. १३. ज्यानें आपले मनाचें व इंद्रियाचें दमन केलें आहे असा. १४. त्याच्या नाकपुडींतून. १५. डुकराचें पिलूं.

मो टा हर्ष विधिमनीं प्रभु वाढवि, जेंवि आपला काय,
सिरला जळीं गज सिरे जैसा उष्णांत तापला काय. ४६
भ[1] गवान् दं[2]ष्ट्राग्रें भू स्वखुरांहीं पार्थ[3] तें विदारुनि [4]घे,
प्रभु जेंवि वारि लंघुनि न [5]स्वाहानाथ तेंवि दारु[6] निघे. ४७
ग[7] दिवर दैत्य तशांत प्रकटे, जो करुनि खळखळ विरोधी
प्रभुसि, महि सांडवावी हें चित्तीं धरुनि, खळ खळवि रों[8]धी. ४८
व धुनि तया ये त्याच्या घनरक्तें सर्व वदन सरबटुनीं[10]
अवगा[11]हिलें सुकविनीं सुयश, जसें सुगुरुसं[12]दनसर बटुनीं. ४९
ते ब्रह्मादि मुनिवर स्तविति मखव[13]राहमूर्ति हर्षानें,
बहु निवविले यशानें जैसे अतितप्त अमृतवर्षानें." ५०
'बा! कोण दैत्य? कारण वैराचें काय?' हें पुसे क्षत्ता,
सच्छिष्यप्रिय करणें हें मात्र सुकार्य त्यां[14] जसें दत्ता. ५१
सु[15] दती [16]दिति कामार्ता गांठी संध्येंत[17] कश्यपा, पतिचें
चालों न दे चि मत, करि मन तेशीं[18]चें हि वश्य पाप तिचें. ५२
दे वर[19]भीता मग ती पातिला प्रार्थी स्वगर्भ रक्षाया,
कश्यप म्हणे, 'सुतद्वय होइल, लोका करील रक्षा या. ५३
वा रिल लोकोपद्रव विश्वेश्वर तव सुतांसि मारील.'
तों दिति म्हणे, 'सुनाभें[20] वधिल प्रभु तारि खळां हि तारील.' ५४

---

१. वराहरूपी विष्णु. २. दाढेच्या टोंकानें. ३. पाणी. ४. धरी. ५. अग्नि. ६. लाकूड. ७. गदा धारण करणारांत श्रेष्ठ असा हिरण्याक्षनामक राक्षस. ८. अडथळा करी. ९. अडवी. १०. वरबटून. ११. स्नान केलें. १२. उत्तम गुरूचें घर हेंच सरोवर. १३. यज्ञवराहावताराला. १४. त्या मैत्रेयाला. १५. चांगले आहेत दांत जीचे अशी. १६. दक्षकन्या. १७. तिन्हीसांजा. १८. त्या कश्यपाचें हि. १९. दिराला (शंकराला) भिणारी. कश्यपाचा व शंकराचा सासरा दक्षप्रजापति होय. एका सासऱ्याचे जांवई एकमेकांस भावाप्रमाणें लेखतात, हें प्रसिद्ध आहे. २०. चक्रानें.

यं[1] मिवर म्हणे, ‘ प्रिये! तूं अनु[2]तापविचारविष्णुबहुमान
हृद्रीं वै[3]रीं हि आदर करिसी, कल्याण हें च बहु मान. ५५
नं[4] तिनुतिभाजन सज्जन होइल तुज एक पौत्र सति! जाये!
आलिंगना उभारुनि सर्व भुज, म्हणेल विश्वपति ज्या ‘ ये ’. ५६
मो द प्र[5]पूर्व चित्तीं, देहीं रोमांच तत्क्षणीं दाटे,
या प्रियभविष्यकथनें दितिला ‘ धन्या ’ स्वयें असें वाटे. ५७
भ य लोकविनाशाचें, शतवर्षें दिति तसा चि गर्भ धरी,
दाटे दिशांत बहु तम, न विधु न वह्नि न रवि प्रकाश करी. ५८
ग डबडले सुर, गेले [6]सत्याच्या नायका पुसायातें,
‘ [7]लयदहनतेज धुमतें, भस्म करिल काय [8]कापुसा यां तें? ’ ५९
वं[9] नरुहज म्हणे, मानसें[10] मत्पुत्र सनत्कुमारमुख चवघे
श्रीवैकुंठा गेले, उत्साहेंकरुनि एकदा अवघे. ६०
ते म्हणति, ‘ पहावा चि प्रभुवर[11] सद्वारपाळ[12] कांहीं[13] हो[13],
तों वा[14]रिले जयविजय जे त्या तद्वारपाळकांहीं हो!. ६१
वा रं[15]ण होतां, येतां [16]तद्वेत्र समोर, विप्र[17] तापातें
पावति, शा[18]पिति, दाविति, ते जरि हि तमोरवि प्रतापातें. ६२

---

१. मुनिश्रेष्ठ ( कश्यप ). २. केलेले पापाबद्दल पश्चात्ताप, सुविचार आणि विष्णूचा सन्मान. ३. पतीचे ठायीं. ४. नमन आणि स्तुति यांचें स्थान. ५. ‘ प्र ’ आहे पहिलें अक्षर ज्याच्या असा मोद=प्रमोद ( आनंद ). ६. सत्यलोकाच्या स्वामीला ( ब्रह्मदेवाला ). ७. प्रलयकालीन अग्नीचें तेज. ८. या जगद्रूप कापसाला. ९. ब्रह्मदेव. १०. मनापासून उत्पन्न झालेले. ११. विष्णु. १२. सज्जनांच्या समूहाचा रक्षक. १३. कांहीं हि होवो. १४. अडथळा केला. १५. प्रतिबंध. १६. त्या द्वारपाळांची काठी. १७. चवघे सनत्कुमार. १८. सनत्कुमारानीं जयविजयाना ‘ तुम्हीं देवत्व जाऊन तीन वेळ असुरयोनींत जन्म घेऊन नंतर पूर्वपद पावाल ’ असा शाप दिला. या शापाप्रमाणें जयविजय हे अनुक्रमें हिरण्यकशिपु व हिरण्याक्ष, रावण व कुंभकर्ण आणि शिशुपाळ व वक्रदंत होऊन नंतर मुक्त झाले.

सु[1] गतिभ्रंशकरपरमखरशापत्रस्त जयविजय पाय
धरुनि, तया भगवत्स्मृतिवर[2] मागति, इतर पतितहित[3] काय? ६३
दे व प्रभु समजुनि ये श्रीसह धावुनि पदाति सरि याची
ताता माते हि न ये, मग काय कथा वदा तिसरियाची? ६४
वा[4] रिद कृष्ण, मयूर चि ते, कीं प्रभु[5] चंद्रमा चकोर मुनी
म्हणति, 'स[6]माधि हि त्या श्रीसुखमूर्तिपदांबुजीं नको रमुनी.' ६५
य[7] जिती यज्ञेशातें[8] वाग्यज्ञें[9] ते कुमारमुनि सुकवी,
या कीर्तिरसीं नतमति[10] मुख जसि न शिवीं उमा रमुनि सुकवी. ६६
न[11] लिनाक्ष म्हणे, 'मुनि हो! तेजें न करुत सुदंड तो कांहीं?
दासां सह्य चि केलें प्रभुच्या जन्हि अघ उदंड तोकांहीं. ६७
मो टा अपराध ईहीं[12] प्रभुनीं यां योग्य दंड हा केला,
योग्य प्रतिक्रिया हे, नभ दे अनुरूप हाक हाकेला. ६८
भ जती श्री कीर्ति मला, नित्यजयश्री हि यांसि मीं पात्र,
भ[13]व्यसुधाब्धिब्राह्मणसेवेनें अतिपवित्र हें गात्र. ६९
ग जसा मीं ब्राह्मणपदरेणु शिरीं दानवारि वाहतसें,
हीं[14] मज दे, न मयूरा हर्षाचें दान वारिवाह तसें. ७०
व दनीं भरितां ते ते घेती जे साधु विप्रजन घांस,
स्वभुज हि तोडिन मीं प्रतिकूळ जरि तुम्हां अशां हि अनघांस[15].' ७१
ते मु[16]नि यापरि बहु[17]विधसांत्वनपीयूषमुदिरवर्षानें
बहुत निवाले, वदले चातक जलदासि जेंवि हर्षानें. ७२

---

१. मोक्षाचा नाशक जो अतिशय उग्र शाप त्यानें त्रासलेले. २. भगवंताची आठवण असावा असा वर. ३. पापी लोकांचें कल्याण. ४. मेघ. ५. विष्णु. ६. विष्णुचरणकमलीं रत होण्यास मिळालें म्हणजे ध्यानाची हि जरूरी नाहीं. ७. पूजन करितात. ८. श्रीविष्णूला. ९. वाणीरूप यज्ञानें ( स्तवनानें ). १०. नम्र बुद्धीचा भक्त. ११. विष्णु. १२. या द्वारपाळांनीं. १३. कल्याण हें च अमृत त्याचे सागर जे ब्राह्मण त्यांच्या सेवेनें. १४. ब्राह्मणपदरेणु. १५. अपापांस. १६. सनत्कुमार. १७. नाना प्रकारच्या सांत्वनरूप अमृताच्या मेघांच्या वर्षावानें.

'वा त्सल्यें गौरविसी प्रभुवर तूं ब्रह्मकुळ अगा धात्या!
या श्रीमुखांतुनि निघति ज्या सूक्तिसुधापगा[1] अगाधा त्या. ७३

सु ज्ञ प्रभु तूं यांतें[2] दंडाया वृत्ति[3] द्यावया, स्वामी,
आम्हां ही शिक्षाया कीं उद्धत हे अशा हि या धामीं.' ७४

दे ववर म्हणे, 'जातिल असुरगतिस, वर्ततील हे स्वैर,
मुनि हो! पावतिल मला मजसीं अत्युग्र करुनियां वैर.' ७५

वां[4] तरसन ते आज्ञा मागुनि, जाणोनि हरि[5], खरा गेले,
कीं पावले तसे ही दर्शन होतां चि हरिख रागेले[6]. ७६

यँ[7] विरामांसि म्हणे प्रभु, 'जा, शर्म असो तुम्हांसि, भी सोडा,
याल पुन्हां मज संमत हें, कालविलंब यावया थोडा.' ७७

न मुनि प्रभुचरणांतें, प्रभु गेल्याउपरि, देवें ते[8] रडले,
दितिच्या उदरीं आले, वैकुंठीहूनि जे असे[9] पडले. ७८

'मो ह तयांच्या[10] तेजें तुमचीं[11] तेजें हरूनि हा केला,
जा स्वस्थ संकटीं प्रभु देइल, करुणा करूनि, हाकेला.' ७९

भ त्यांच्या आज्ञेनें शतवर्षांतीं दिती यम[12] प्रसवे,
झाले बहु उत्पात, स्वास्थ्याला मुनिमनांत ही नसवे[13]. ८०

ग र्भे दुराग्रह अकुलज जनतेचे तेंवि वाढती दितिचे,
ज्येष्ठ हिरण्यकशिपु तदनुज[14]नि हिरण्याक्ष कंपद क्षितिचे. ८१

व श केले ब्रह्मवरें बाहुबळें कनककशिपुनें लोक,
गदिवर[15]कनकाक्षभयें अमर लपाले त्यजूनियां ओक[16]. ८२

ते जस्वी कनकाक्ष क्रीडे निःशंक अर्णवामाजी,

---

१. उत्तम वचनामृताच्या नद्या. २. जयविजयांतें. ३. उपजीविकेचें साधन. ४. वायु आहे पेय ज्यांचें ते. ५. हर्ष. ६. रागावलेले. ७. यकार नामांतीं ज्यांच्या **पंत**–जयविजयांच्या. ८. जयविजय. ९. अशा रीतीनें (शापानें). १०. त्या (दितिगर्भवासी). जयविजयांच्या. ११. देवांचीं. १२. जुळें (दोन मुलगे). १३. न राहवे. १४. त्या हिरण्यकशिपूचा धाकटा भाऊ. १५. गदायुद्धांत श्रेष्ठ जो हिरण्याक्ष त्याच्या भीतीनें. १६. घर.

जाणों लहरींस म्हणे, 'कीर्ति च वर्णूनि वर्णवा माजी.' ८३

**वा**[1]रिपति म्हणे [2]त्यातें "[3]प्रतिवीर महाग दाविना शम हा
मज किमपि बा! म्हणति कीं, 'गर्वें चि महागदा विनाश महा.' ८४

**सु**[4]भट पुरा[5]तन पुरुष चि एक, पहा जा तया समरशील
तूं, जरि सदय शिवां[6]वरि तरि हटकुनि बा! तयास मरसील." ८५

**दे**[7]वारि दिति[8]ज दुर्मद न गणुनि तें वरुणवचन तो परते,
प्रभु[9]तें नारद दाविति, हित गमती, म्हणति 'भस्म हो' प[10]र [11]ते. ८६

**वा**[12]रिचर मृग म्हणे तो, देव म्हणे 'ग्राम[13]सिंह' त्या हांसे,
समरीं काळाकरवीं तत्कंठीं देव घालवी फांसे. ८७

**य** ज्ञवराहें दिधला स्वयशोमृतरस नवा असा, राया!
कीं ज्यासि रसिक सेउनि गणिति न मोक्षा नवा असारा यां[14]. ८८

**न**[15] लिनप्रभवात्मभव स्वायंभुवमनु तदीयसंतान
संतां न[16]व्यानवरतहर्षद जैसा तसा न संतान[17]. ८९

**मो** दउनि ब्रह्मयानें आज्ञा करितां प्रजा करायाची,
कर्दम अ[18]युताब्द सुतप करि, बळ सु[19]गुणव्रजाकरा याची. ९०

**भ** गवान् सरस्वतीच्या तीरीं दर्शन कृ[20]तीं तया नव दे,
'नाहीं' असें कधीं ही ज्याची शरणागता दया न वदे. ९१

**ग** रुडरथ म्हणे, 'वत्सा! म[21]नु श[22]तरूपासमेत येईल,
तुज देवहूति कन्या परवां, प्रार्थूनि पाय, देईल. ९२

**व** ररूपगुणा कन्या होतिल नवभक्तिशा, तनय दशम

---

१. समुद्राचा स्वामी ( वरुण ). २. हिरण्याक्षाला. ३. प्रतियोद्धा. ४. उत्तम योद्धा. ५. पुराणपुरुष श्रीविष्णु. ६. कोल्ह्यांवर. ७. देवशत्रु व दितीचा मुलगा ( हिरण्याक्ष ). ८. गर्विष्ठ. ९. श्रीविष्णूला. १०. परंतु. ११. ते नारदमुनि. १२. समुद्रांत भ्रमण करणारा. १३. कुत्रा. १४. संसारातें—**पंत**. १५. ब्रह्मदेवाचा पुत्र. १६. नूतन व निरंतर असा आनंद देणारा. १७. कल्पवृक्ष. १८. दहा वर्षें. १९. उत्तम गुणांचे समुदायाची खाण असा ब्रह्मदेव त्याला. २०. कृतयुगांत. २१. स्वायंभुव मनु. २२. शतरूपानामक आपले भार्येसह.

होणार मीं, प्रपंचा न अधर्मेद[1] होउं दे अनयेंद[1] शम.' ९३
ते कर्दमकर्णनयन निवेंडुनि[2] सुखमूर्ति जाय कामगती,
मनु देवहूति तनया दे प्रार्थुनि विप्रनायका मग ती. ९४
बा ळा सोडुनि जातां पडुनि गळां मनु हि मुनि म्हणे रडला,
जरि हि तिला अनुरूपा दयितासीं योग इच्छिला घडला. ९५
सु खवी मुनितें सेवा करुनि भवानी जयापरि भवातें;
पात्रें[3] न झाली, आली जों न धवा नीज, या परिभवातें. ९६
दे खुनि तीस मुनि म्हणे, 'सुविषयसुख सुतनु वाळलीला[4] हो,
मत्सेवा आवडली ईस, बहु तसी न बाळलीला, हो!. ९७
वा[5] माक्षि! माग वर, हरि[6] गुरु, किमपि अशक्य कर्दमा नाहीं,
जितिले न हरिजनाहीं किति हरिंहीं[7] जेंवि नर्दमानांहीं[8]?' ९८
य मनियमवती प्रार्थी पूजाया पुरुष अनव[9] संतानें[10],
'स्वकलत्र शोभवावें त्वां प्रभुनें, जेंवि वन वसंतानें. ९९
न व रुचिरतर असावें प्रभुसीं क्रीडावया अगार मला,
आपण अजित[11] चि, दीन हि सुरसा चि भजुनि जडा अगां[12] रमला. १००
[13]भो कलिलें आपण हें स्पष्ट विरक्तिस मनांत वाटावें
बहु शांतिच्या[14] हि कंठीं बाष्पें, कल्पूनि विरह, दाटावें[14].' १०१
[15]भें व्य विषय जांत[16] असें संकल्पें[17] चि क्षणांत तो [18]योगी

१. सदा शम असतां अन्याय अधर्म संसारीं घडों देत नाहीं—**पंत.** २. मूळपाठ—**सुखडुनि** ३. पतीस निद्रा जों न आली तों आपणास आली या अशा परिभवातें पात्र न झाली—**पंत.** परिभव=अपयश. ४. कृश झालेलीला. ५. सुंदरनयने! ६. भगवान् समर्थ आहे—**पंत**. ७. सिंहानीं. ८. गर्जना करणाऱ्यांनीं. ९. पुराण, जुनाट. १०. संततीनें. ११. भगवान्स्वाश्रितमनोरथपूर्तिसामर्थ्य काय वर्णावें—**पंत.** १२. कल्पवृक्षाला. १३. अंतरिलें (कर्दमानें आपल्याला टाकिलें असें विरक्तीला वाटावें). १४. विरह कल्पुनि (वियोगामुळें, कर्दमानें शांतीला टाकिलें म्हणून) शांतीच्या हि कंठीं बाष्पें (अश्रूनीं) बहु दाटावें—अन्वयार्थ. १५. मोठें. १६. ज्यांत, ज्या मंदिरांत. १७. योगसामर्थ्यानें. १८. कर्दमऋषि.

प्रकटी, कीं निजसेवा सफळा त्या देवहूतिची हो[1]गी. १०२

**ग** ति सर्वत्र जयाची, निर्मी प्रभु दिव्यवर विमानातें,
ज्यातें पाहुनि तिळ हि स्थळ दे हृदयांत न रवि मानातें. १०३

**व** नितेसि म्हणे, 'सुंदरि! या बिं[2]दुसरोवरीं करीं स्नान.'
आज्ञा वरुनि शिरीं ती मज्जन करि धरुनि पतिपदध्यान. १०४

**ते** स्त्री मज्जन करि जों तों आंत सरोवरीं असें पाहे,
कन्यासहस्र सुंदर निजसेवोत्सुक सुमंदिरीं आहे. १०५

**बा**[3] ळा त्या नमुनि म्हणति, 'आम्हीं तव किंकरी भजायाच्या,
स्वामिनि! आज्ञेवांचुनि पळ सोडुनि पाय हे न जायाच्या.' १०६

**सु** पटुपणें परिचर्या करि तिस कन्यासहस्र तें न्हाणी,
गाणीं गाय गुणांचीं [4]मुनिराज्याची निवाक्या [4]राणी. १०७

**दे** हीं दिव्यालंकृति आवडली ती च नमुनि लेववितीं,
आ[5]सव पाजुनि पूजुनि [6]दृष्टि उत[6]रुनि स्तवूनि जेववितीं. १०८

**वा** टे कांत पहावा तों तत्पार्श्वीं सकिंकरी आहे,
पाहे अत्याश्चर्य श्रीपतिभजनें तसी च ती लाहे. १०९

**यँ**[7] व अवपूर्व.अपूर्व प्रेक्षी पतिचे हि देवहूति सती,
तीस भुले कर्दममति, वाटे त्याच्या हि [8]योगभूतिस [9]ती. ११०

**नं**[10] दद्भुततूर्य असें मुनिनें वरिलें विमान जें, विदुरा!
इतरां तेजांसि म्हणे तें द्यु[11]मणिव्योमयान जेंवि 'दु[12]री'. १११

**मो** द[13]प्रदं जगीं जीं हिमहेमन[14]गादिकीं बुधा! स्थानें,

---

१. वाणी. २. कर्दममुनि भगवताला शरण गेला तेव्हां भगवंताच्या नेत्रांतून अश्रुबिंदु पडले व तेथें च हें बिंदुसरोवर निर्माण झालें. ३. स्त्रिया. ४. देवहूति. ५. मद्य. ६. [ इतरांचे दृष्टीची बाधा न व्हावी म्हणून ] ओवाळून टाकून. ७. अवयव—**पंत.** ८. योगसामर्थ्याला. ९. देवहूति [ भुले ]. १०. आश्चर्यकारक वाद्यें वाजत आहेत ज्यांत असें. ११. सूर्याचें विमान. १२. दूर सरा—**पंत.** १३. आनंद-दायक. १४. हिमालय व मेरुपर्वत वगैरे.

त्यांत रमविली मुनिनें दयिता तदधरमहासुधास्थानें[1]. ११२

भ त्यानें स्वस्थानीं पुनरपि रमवूनि आणिली धन्या,
वर्षोपरि शतवर्षें गेलीं, झाल्या हि नव तिला कन्या. ११३

गँ मनोद्यत[2] हि सतीनें राहविला ग्लानि[3] करुनि तो कांत,
दुहितांतें उजवाया[4], सुतरत्नें व्हावया स्वशोकांत. ११४

व र आठवुनि, तिस कथुनि, कर्दम ही गर्भ ही तिला राहे,
श्रीमूर्तितें[5] प्रसवुनि न सुरभींच्या ही गणी खिलारा हे. ११५

ते व्हां अत्यंतोत्सव जेव्हां प्रभु[6] कर्दमालयीं झाला,
आलाँ[7] पीत चि यश विधि आलापीत चि महासुखें धालाँ. ११६

वा खाणी फार चि, कीं पाहे हरि[9] तोक विप्र, ज्या पतितें
स्मरुनि तरावें; उचित चि, नुतिपद[8] करि तो कवि प्रजापतितें. ११७

'सु टलासि ऋणांपासुनि, कन्यांचे मात्र बा! विवाह करीं,
मग जा जाणें जरि तरि, मुक्तिद आहे चि हा विवाह करीं. ११८

दे कन्या सुवरांतें ' ऐसें सांगोनि पद्मभू[10] गेला,
मग कन्यादानोत्सव दयिता बहु मानवे असा केला. ११९

वों[11] हे कळा मरीचिस, अनसूया अत्रिला हि तो अर्पी,
श्रद्धा हि अंगिऱ्याला, पुलहा देवूनि गति धनें तर्पी. १२०

य श वाढवी हविर्भू कन्या देउनि पुलस्त्यसन्मुनितें,
क्रतुस क्रिया, भृगुस हि ख्याति, घडे त्या सुकर्म जन्मुनि तें. १२१

---

१. तिच्या (देवहूतीच्या) ओष्ठांतील उत्तम अमृताची इच्छा आहे ज्याला अशानें. २. [ परत ] जाण्याला उत्सुक. ३. शोक. ४. लग्न करावयास. ५. श्रीमूर्तितें (कपिलमुनीला) प्रसवुनि हे (ही देवहूति) सुरभींच्या ही (कामधेनूच्या हि) खिलारा (कळपाला) न गणी (पर्वा न करी)–अन्वयार्थ. ६. श्रीविष्णूनें कर्दमाचे घरीं अवतार घेतला. ७. अन्वयार्थः–विधि (ब्रह्मदेव) यश पीत चि (विष्णुयशाचें प्राशन करीत च) [व] आलापीत चि (वर्णन करीत च) [कर्दमाचे घरीं) आला [आणि] महासुखें धाला. ८. स्तुतिपात्र. ९. गरुडवाह हरि–**पंत.** १०. ब्रह्मदेव. ११. वरीं, लग्न करी.

न वरी अरुंधती जी होय वसिष्ठा, शिवासि कावड[1] ती;
जो मुनिराज अथर्वा त्या झाली शांति फार आवडती. १२२

मो क्ष चि मूर्त[2] प्रभु जो, ज्या ठेवी नाम 'कपिल' हें धाता,
त्यातें आज्ञा मागुनि कर्दम गेला निवोनि गा ताता!. १२३

भ जुनि म्हणे ज्या 'निजपशुभावा हो हानि' कामकपिला[3] तें
पदयुग धरि, विनवी ती, उबगुनि मोहा निकास, कपिलातें. १२४

ग ति व्हाया मातेला, सार चि, सोडूनि[4] तो असार, वदे,
उपदेश सुख तिस जसा न घनांचा चातकिस असा रव[5] दे. १२५

व दला, पदलाभ सुखें व्हाया, सगुणस्वमूर्तिचें ध्यान,
जें हृदयाब्जीं ठसतां ध्यात्या व्हावें चि निर्मळ ज्ञान. १२६

ते माय निववली त्या प्रभुनें सांख्याभिधें[6] सुधावर्षें;
वर्णी, कपिलास म्हणे, 'गेलीं विपयांत तीं मुधा[7] वर्षें. १२७

वा णी तुझी मला बा! शतरूपेहूनि बहु हिता कपिला!
कपि लाधला अमृतफळ, हीं जर्न[8] हे स्वर्गपूजिता कपिला.' १२८

सु टका निजमातेची करुनि मग तिला पुसोनि तो गेला,
तेव्हां रडे चि ती जन्हि सुविचार ध्यानयोग ही केला. १२९

दे ह तिचा जो योगें त्यजिला तो होय सिद्धिदा सरिता[9],
न पडे चि शरण गेला प्रभुसि न पावोनि सिद्धि दास रिता. १३०

बा विदुरा! ज्या स्थानीं सिद्धिप्रति देवहूति ती लाहे,
'सिद्धपद' असें विश्रुत त्या क्षेत्रा नाम जाहलें आहे. १३१

य ज्ञशताधिकभगवच्चरितसुधासागरीं च मज्जन हो,
यश अमृत, श्रीकपिलप्रभु घन, आश्रित मयूर, सज्जन हो!. १३२

---

१. जशी शंकराला [ पाण्याची ] कावड प्रिय असते तशी अरुंधती वसिष्ठाला होय. २. प्रत्यक्ष. ३. कामधेनु. ४. कंटाळून. ५. मेघाचा गडगडाट. ६. सांख्यनामक ज्ञानानें. ७. व्यर्थ. ८. मी देवहूति. ९. नदी. (देवहूतीच्या देहाची नदी झाली ).

# चतुर्थ स्कंध.

ने[1] लिनाक्षी आकृति [2]भ्रातृमती तरि हि [3]पुत्रिकाधर्मै
स्वायंभुव रुचिला दे, [4]सुतयुगलब्धें अतृप्त जो शर्मै. १
मो [5]दनिधि [6]मिथुन झालें आकृतिस ‘ यज्ञ-दक्षिणा ’ नामें,
[7]मनु सुत घे, [8]रुचि कन्या, [9]श्री त्या चि वरी [10]हरीसें तत्कामें. २
भ जली मरीचिस [11]कळा, ती कश्यपपूर्णिमा सुतां व्याली;
अत्रिस्त्री अनसूया माता विधिहरिहरां तिघां झाली. ३
‘ [12]गा च्छात्मज ! सृष्टिं [12]कुरु ’ ऐसी आज्ञा करी स्वयें धाता,
[13]ऋक्षकुलनगीं राहे शतवर्षे अत्रिमुनि [14]उभा, ताता !. ४
व र्षें शत हें, चित्तीं आलों जगदीश जो तया शरण,
‘ देवू प्रजा स्वतुल्या मज, ज्याचे स्वर्द्रुचे सखे चरण.’ ५
ते वांछा पुरवाया हरि हर विधि भेटले [15]तया बापा !.
तो चातक, ते मुदिर चि, धाउनि त्याच्या निवारिती तापा. ६
वा धरवें मुनि नयनें उघडि, तिघांचे हि तो सुपाय नमी,
स्तवुनि म्हणे, ‘ प्रभुवर हो ! हें स्तवन चि अर्पितों उपायन मीं. ७
सु रवर हो ! एकातें ध्यातां, आलां तिघे कसें सांगा ?’
ते त्यासि म्हणति, ‘ आम्हीं एक चि, हें तत्व नेणसी कां गा !? ८
दे तों पुत्रत्वें तुज हे आम्हीं आपणा, प्रजा अन्या
अस्मत्तुल्या कैंची ? जे पुत्रीं त्यांत पूज्य हो धन्या !.’ ९

---

१. कमलनयना. २. सानुजा ( भाऊ होते तरी ). ३. कन्याधर्मानें. [ ‘ ही अलंकृत कन्या तुला देतों. हिला भाऊ नाहींत. हिला जो मुलगा होईल तो माझा पुत्र होवो ’ असा करार करून मुलगी देणें याला ‘ पुत्रिकाधर्म ’ म्हणतात. ४. दोन मुलांपासून मिळालेल्या सुखानें. ५. आनंदाचा समुद्र. ६. जोडपें (पुत्र व कन्या ). ७. स्वायंभुव. ८. मुनिविशेष. ९. दक्षिणा ( आकृतिकन्या ). १०. यज्ञाला. ११. कर्दममुनिकन्या. १२. “ जा, मुला ! सृष्टि कर.” १३. ऋक्षनामक कुलपर्वतावर. १४. [ एका पायावर ] उभा. १५. अत्रीला.

वा त्सल्य असें प्रकटुनि गेले प्रभु; अंश सोम[1] हा विधिचा,
हरिचा[2] दत्त, हराचा दुर्वासा पुत्र त्या तपोनिधिचा. १०
य श अंगिरा बहु करी, श्रद्धेपासूनि[3] कन्यका तो घे
चवधि शिनीवालिमुखा[4] सत्सुत हि उतथ्य[5] जीव[6] हे दोघे. ११
न वल प्रजापतीचें[7] सुयश सविस्तर वदेल काय कवी?
तें साधु श्रोत्यांतें भक्तजनमुखें मुकुंद आयकवी. १२
मो टा पुलस्त्यमहिमा, तत्पुत्र अगस्त्य, विश्रवा दुसरा,
त्याची वधू इडबिडा वी सदपत्या, मही जसी सुसरा[8]. १३
भ गवन्मित्र कुबेर ख्यात जगीं तो कुरूत्तमा[9]! आर्या!
रावणमुख[10] पुत्र तिचे तीचे जी केशिनी[11] दुजी भार्या. १४
गं[12] ति पुलहाची भार्या, कर्मश्रेष्ठादि[13] पुत्र तिस तीन,
षष्टिसहस्र क्रतुसुत[14] सुलघु[15] सुगुरु[16] तेंवि अन्य दिसती न. १५
वं[17] रगुण वसिष्ठनंदन विदुरा! ते चित्रकेतुमुख सात;
चित्तिज दधीचि, तेणें बहुत अथर्वाख्य सुखविला तात. १६
ते जस्वी भृगुभार्या त्याची जी ख्याति, सुत तिचा धाता,
दुसरा पुत्र विधाता, तिसरी श्री कन्यका जगन्माता. १७
बा! आयति बियति सुता त्या दोघां मेरूनें[18] दिल्या जाण,
नंदन मृकंडनामा पहिलीचा, दुसरिचा सुत प्राण. १८
सु त होय मृकंडाला तो मार्कंडेय विदुरजी! जाणा,
'वेदशिरा' या नामें झाला नंदन महायशा प्राणा. १९
दे वगुणरता! विदुरा! भृगुसि करि तिजा हि तुष्ट तो कवि रे!

---

१. चंद्र. २. विष्णूचा. ३. श्रद्धानामक भार्येपासून. ४. शिनीवाली (श्रद्धेची कन्या) ज्यांत प्रमुख आहे अशा. ५. मुनिविशेष. ६. बृहस्पति. ७. अंगिरानामक प्रजापतीचें. ८. सुंदर सरोवराला. ९. विदुरा! १०. रावण, कुंभकर्ण व बिभीषण. ११. विश्रव्याची पत्नी. १२. नामविशेष. १३. कर्मश्रेष्ठ, वरीयान आणि सहिष्णु. १४. हे क्रतुसुत म्हणजे वालखिल्यनामक ऋषी. १५. अत्यंत लहान. १६. अत्यंत मोठे. १७. श्रेष्ठ गुणाचे. १८. एतन्नामक मुनीनें.

# चतुर्थ स्कंध.

ने[1] लिनाक्षी आकूति भ्रातृमती[2] तरि हि पुत्रिकाधर्में[3]
स्वायंभुव रुचिला दे, सुतयुगलब्धें[4] अतृप्त जो शर्में. १
मो[5] दनिधि मिथुनें[6] झालें आकूतिस ' यज्ञ-दक्षिणा ' नामें,
मनु[7] सुत घे, रुचि[8] कन्या, श्री[9] त्या चि वरी हरीसें[10] तत्कामें. २
भ जली मरीचिस कळा[11], ती कश्यपपूर्णिमा सुतां व्याली;
अत्रिस्त्री अनसूया माता विधिहरिहरां तिघां झाली. ३
' गं[12] च्छात्मज! सृष्टिं कुरु[12] ' ऐसी आज्ञा करी स्वयें धाता,
ऋक्षकुलनगीं[13] राहे शतवर्षें अत्रिमुनि उभा[14], ताता!. ४
व र्षें शत हें, चित्तीं आलों जगदीश जो तया शरण,
' देवू प्रजा स्वतुल्या मज, ज्याचे स्वर्द्रुचे सखे चरण.' ५
ते वांछा पुरवाया हरि हर विधि भेटले तया[15] बापा!.
तो चातक, ते मुदिर चि, धाउनि त्याच्या निवारिती तापा. ६
वा ग्ररवें मुनि नयनें उघडि, तिघांचे हि तो सुपाय नमी,
स्तवुनि म्हणे, ' प्रभुवर हो! हें स्तवन चि अर्पितों उपायन मीं. ७
सु रवर हो! एकातें ध्यातों, आलां तिघे कसें सांगा?'
ते त्यासि म्हणति, ' आम्हीं एक चि, हें तत्व नेणसी कां गा!? ८
दे तों पुत्रत्वें तुज हे आम्हीं आपणा, प्रजा अन्या
अस्मत्तुल्या कैंची? जे पुत्री त्यांत पूज्य हो धन्या!.' ९

---

१. कमलनयना. २. सानुजा ( भाऊ होते तरी ). ३. कन्याधर्मानें. [ ' ही अलंकृत कन्या तुला देतों. हिला भाऊ नाहींत. हिला जो मुलगा होईल तो माझा पुत्र होवो ' असा करार करून मुलगी देणें याला ' पुत्रिकाधर्म ' म्हणतात. ४. दोन मुलांपासून मिळालेल्या सुखानें. ५. आनंदाचा समुद्र. ६. जोडपें (पुत्र व कन्या ). ७. स्वायंभुव. ८. मुनिविशेष. ९. दक्षिणा ( आकृतिकन्या ). १०. यज्ञाला. ११. कर्दममुनिकन्या. १२. " जा, मुला! सृष्टि कर." १३. ऋक्षनामक कुलपर्वतावर. १४. [ एका पायावर ] उभा. १५. अत्रीला.

वा त्सल्य असें प्रकटुनि गेले प्रभु; अंश सोम[1] हा विधिचा,
हरिचा[2] दत्त, हराचा दुर्वासा पुत्र त्या तपोनिधिचा. १०
य श अंगिरा बहु करी, श्रद्धेपासूनि[3] कन्यका तो घे
चवधि शिनीवालिमुखा[4] सत्सुत हि उतथ्य[5] जीव[6] हे दोघे. ११
न वल प्रजापतीचें[7] सुयश सविस्तर वदेल काय कवी?
तें साधु श्रोत्यांतें भक्तजनमुखें मुकुंद आयकवी. १२
मो टा पुलस्त्यमहिमा, तत्पुत्र अगस्त्य, विश्रवा दुसरा,
त्याची वधू इडाबिडा वी सद्पत्न्या, मही जसी सुसरा[8]. १३
भ गवन्मित्र कुबेर ख्यात जगीं तो कुरूत्तमा[9]! आर्या!
रावणमुख[10] पुत्र तिचे तीचे जी केशिनी[11] दुजी भार्या. १४
गं[12] ति पुलहाची भार्या, कर्मश्रेष्ठादि[13] पुत्र तिस तीन,
षष्टिसहस्र क्रतुसुत[14] सुलघु[15] सुगुरु[16] तेवि अन्य दिसती न. १५
वं[17] रगुण वसिष्ठनंदन विदुरा! ते चित्रकेतुमुख सात;
चित्तिज दधीचि, तेणें बहुत अथर्वाख्य सुखविला तात. १६
ते जस्वी भृगुभार्या त्याची जी ख्याति, सुत तिचा धाता,
दुसरा पुत्र विधाता, तिसरी श्री कन्यका जगन्माता. १७
वा! आयति बियति सुता त्या दोघां मेरुनें[18] दिल्या जाण,
नंदन मृकंडनामा पहिलीचा, दुसरिचा सुत प्राण. १८
सु त होय मृकंडाला तो मार्कंडेय विदुरजी! जाणा,
'वेदशिरा' या नामें झाला नंदन महायशा प्राणा. १९
दे वगुणरता! विदुरा! भृगुसि करि तिजा हि तुष्ट तो कवि रे!

---

१. चंद्र. २. विष्णूचा. ३. श्रद्धानामक भार्येपासून. ४. शिनीवाली (श्रद्धेची कन्या) ज्यांत प्रमुख आहे अशा. ५. मुनिविशेष. ६. बृहस्पति. ७. अंगिरानामक प्रजापतीचें. ८. सुंदर सरोवराला. ९. विदुरा! १०. रावण, कुंभकर्ण व बिभीषण. ११. विश्रव्याची पत्नी. १२. नामविशेष. १३. कर्मश्रेष्ठ, वरीयान आणि सहिष्णु. १४. हे क्रतुसुत म्हणजे वालखिल्यनामक ऋषी. १५. अत्यंत लहान. १६. अत्यंत मोठे. १७. श्रेष्ठ गुणाचे. १८. एतन्नामक मुनीनें.

त्या[1] शुक्र सुखें फुगवी, कीं पाहुनि तात दुष्ट तोक [2]विरे. २०
घा[3] रिजजभवें दक्षें वरिली जी मानवी प्रसूति सती,
पतिच्या वीर्यें पात्रे षोडशवरकन्यकाप्रसूतिस ती. २१
य ज्वा दक्ष समर्पी तेरा श्रद्धादि सत्सुता धर्मा[4];
त्यांतिल मूर्तिप्रसवें, समुनिसुर द्रुहिण पावला शर्मा[5]. २२
न र नारायण जे प्रभु करिती निजभक्तकामनापूर्ती,
जे संप्रति कृष्णार्जुन यांतें ती प्रसवली सती मूर्ती. २३
मो टें स्वाहेचें हीं वैभव, जी अग्निला दिली दक्षें;
यत्संतानोपासन साधूंच्या मांडिलें पहा लक्षें. २४
भ व्य परम जें, झाली पात्र पितर वरुनियां स्वधा, त्याला;
वाटे सोळामध्यें सुखवी अत्यंत हे स्वधा[4]त्याला. २५
ग रिमा[5] तरि मानावा भाग्याचा पंधरांपरिस तीचा,
कीं [6]भवहर भर्ता न च इतरां [7]नतकंधरांपरि सतीचा. २६
व रवी पर[8] वीरा ती संतानसुखासि पावली न सती,
तात शिवद्वेष्टा जरि नव्हता, मेली हि [9]मावली नसती. २७
ते चि कथा तुज कथितों, सांगावेंसें चि [10]अवसरीं आलें,
बा! [11]विश्वसृजित्यांच्या सत्रीं पूर्वीं असें नवल झालें. २८
वा[12] डववरदेवांची भरली होती महासभा, गाती
गंधर्व, अप्सरा ही नाचति, दे बहु [13]महा [14]सभागा! ती. २९
सु र मुनि सर्व हि उठले येतां दक्षप्रजापति समाजीं,
[15]समिति म्हणे, जसि म्हणती ‘ ध्यावीं नमनें ’ प्रजा [16]पतिस ‘ माजीं ’. ३०

---

१. कविनामक भृगूच्या तृतीय पुत्राला. २. दुःखी होई. ३. ब्रह्मदेवाच्या पुत्रानें. ४. [धाता=] पिता—**पंत.** ५. मोठेपणा. ६. शंकर. ७. खालीं मान घातलेल्या पुरुषांसारखा. ८. परंतु. ९. जगन्माता—**पंत.** १०. वेळेवर. ११. सृष्टि निर्माण करणाऱ्यांच्या. १२. ब्राह्मणश्रेष्ठ आणि देव यांची. १३. तेजाला. १४. हे धन्या (विदुरा)! १५. सभा—**पंत.** १६. राजाला.

**दे** व ब्राह्मण अग्नि हि उठले तैसे चि लोकपति पितर,
किंबहुना ते उठले सर्व हि विधिशंभुहूनि जे इतर. ३१
**बा** पा विधितें वंदुनि, दक्ष बसे, वक्र विभु[1]कडे पाहे;
केलें महेश्वरें न प्रत्युत्थानादि[2] जें न तें साहे. ३२
**यँ**[3] द्वा तँ[3]द्वा वदला प्रकटुनि तो बाळ[4] मोह रागेला,
शापुनि निजजन[5]काळव्याळगरळकाळ मोहरा[6] गेला. ३३
**न** सतें कारण कल्पुनि तेव्हांपासूनि आदरि द्रोहा,
कल्याणफळ तशा त्या तरि यावें कां न बा! दरिद्रोहा[7]? ३४
**मो** हें भगवद्द्वेष्टा होय बुडे दक्ष तो; तयावरि ती
ऐक कथा वा ! सत्य प्रभुस चि न सुकीर्ति तोतर्या[8] वरिती. ३५
**भ** र्ता प्रजापतींचा झाला ब्रह्माभिषिक्त तो दक्ष,
करि वाजपेय[9], गर्व चि संपादी परिभवूनि सल्लक्ष[10]. ३६
**ग** र्वें फुगला बहु, मग आरंभी तो बृहस्पतिसवातें[11],
किति नाम दक्ष[12]? यांच्या[13] तो उडवावें बृहस्पतिस वातें. ३७
**व** ह्यादि देव पितर ब्रह्मर्षि सर्वांत जाहले गोळा,
नेल्या सभर्तृका[14] त्या दक्षें एकी उण्या सुता सोळा. ३८
**ते** सववार्ता परिसुनि, विनवी जाया शिवा अनादिसंती[15],
तेव्हां जाणों तिस तीं न सुखें जीं प्रभुपदीं जना दिसती. ३९
‘**वा** टे सवासि आम्हीं जाउनि सुखउनि जन स्वैं[16] साजावें,
व्हावें जशा सपतिका त्या पूजाभाजन[17] स्वसा[18], जावें.’ ४०

---

१. शंकराकडे. २. उठून उभें राहणें वगैरे. ३. भलभलतं. ४. अज्ञानी. [दक्ष]. ५. स्वकीय भक्तांच्या कालरूप सर्पाचे विषाचा नाशक. ६. मणिविशेष; हा सापाचे मस्तकांत सांपडतो. ७. निर्धनसंकल्पास-**पंत**. ८. ढोंगी पुरुषाला. ९ यज्ञविशेष. १०. साधूंचा लक्ष ( लक्षावधि साधु ). ११. बृहस्पतिनामक यज्ञाला. १२. “ दक्ष ” हें नांव धारण करणारा [पक्षी] चतुर. १३. या गर्वाच्या:-**पंत**. १४. पतीसह अशा. १५. दक्षाची कन्या. १६. स्वकीय. १७. पूजेला पात्र अशा. १८. बहिणी.

सु रमणि म्हणे, "परिस हित, [1]मतिमति! सति! [2]पतिस म्हण 'नको,' परत,
करिल चि तो मद्द्वेष्टा मत्त खळ [3]त्वदवगणन कोपरत. ४१
दे वि! स्वजनासत्कृत संभावित सुजन अपयशें मळतो,
आप्तप्राप्त [4]असह अपमान मरण हें चि फळ, पळें फळतो.' ४२
वा यां गेला सत्य प्रिय हित परमगुरुकृत सदुपदेश,
उपदेश किति? सतीनें त्यजिला [5]स्वस्वर्द्रु जो [6]तदुपदेश. ४३
य द्यपि जैसी छाया अवलंबुनि पद सदैव शोभावी,
जाय चि, अवश्य होतो होणार अनर्थ अर्थ जो भावी. ४४
न गणुनि पतिस, न चिंतुनि भावी [7]पितृसदनघात पायानीं
जाय; मन न जावूं दे अवलंबुनि [8]सदनघा [9]तपां [10]यांनीं. ४५
मो डुनि वचन निघाली, न गणुनि [11]अवमानपरिघ रागेली,
[12]स्वगणसह [13]सदरिच्या ती अभिमुख [14]पवमानपरि घरा गेली. ४६
भ गवत्कथित समस्त हि जातां चि प्रत्यया तिच्या आलें,
कीं होय तिचें दर्शन दुःसह शिवशत्रुलोचनीं आलें. ४७
ग रळ चि गमलें सांत्वन, जें भगिनी माय मावसी करिती,
भगवद्द्वेषी यास्तव निंदी, निंदूं नये पिता परि ती. ४८
व दली तातासि असें कीं, "तूं दक्षा! असाधु कळलास,
करुनि शिवद्वेषातें झालासि परम अभद्र, मळलास. ४९
ते पाय सुमंगळ, तुज काय खळशिरोमणीस [15]हातनया?
हा! तनया तव मीं, हें वपु अघ, लावूं महेश हात न या. ५०
वा चेला द्व्यक्षर 'शिव' हें येतां नाम, [16]शमळ ताप सरे,
त्या निंदिसि हा! मूढा! 'शिव शिव' चि म्हणोनि [17]अमळता पसरे. ५१

---

१. हे बुद्धिमति! २. मज पतिस 'नको' म्हण, 'जाण नलगे' असें म्हण; परत, मनांतून उपरति हो—**पंत.** ३. तुझा अपमान. ४. असह्य. ५. आपला कल्पवृक्ष. ६. त्याचा (त्या महादेवाचा) समीपप्रांत. ७. पित्याच्या घराचा नाश. ८. उत्तम व निर्मल अशाला. ९. उन्हाळा. १०. गमनीं. ११. अपमानाचा वेढा. १२. आपल्या (महादेवाच्या) गणांसह. १३. साधूंच्या शत्रूच्या (दक्षाच्या). १४. वाऱ्यासारखी. १५. टाकिली आहे नीति ज्यानें अशाला. १६. पातक. १७. शुद्धता.

सु टका पापापासुनि भक्षितपापान्न ओकितां आहे,
भवदुत्पन्न[1] तसें हें वपु पाप, त्यजिल मग न कां या[2] हे?" ५२
दे वी ऐसें बहुत चि बोलुनि अनिलाग्निधारणा[3] मांडी,
हृदयीं शिवमूर्ति धरुनि, भस्म करुनि आत्ममूर्तिला सांडी, ५३
वा विदुरा! त्या समयीं स्पष्ट मुखें दक्ष मात्र न वदे 'हा!'
मग ती हिमगिरिपासुनि पावे शिवदास्यपात्र नव देहा. ५४
य ज्ञ ध्वंसुनि दक्षा रुद्रजटोत्पन्न वीरभद्र वधी,
दुर्वृत्तांची दंडावांचुनि पावे कधीं हि न द्रव धी. ५५
न लिनभव नलिननाभ प्रभु हे दोघे अनर्थ तो भावी
जाणुनि आले नव्हते, ज्यांची शांतांत शांति शोभावी. ५६
मो ह चि झाला सर्वां, भ्याले सुर, वृत्त कळविती विधिला;
तो त्यांसह कैलासीं जाउनि विनवी तया दयानिधिला. ५७
भ यविकळांतें प्रभु तो तत्काळ चि अभय दे, तदा ज्ञाल्या[4]
प्रार्थिति दक्ष उठाया, उठवी होउनि सुधा तदाज्ञा त्या. ५८
ग र हि गिळायाचा जो प्रभु, न गिळिल काय तदपराधा त्या?
विधिस म्हणे, 'हा ईश्वर न च दंडी, मद चि मंदपरा[5], धात्या!' ५९
व[6] स्ताचें शिरं दक्षा होय; सखा कां न बोकडा हो तो?
भगवत्पराङ्मुखाला कुंदशेचा लाभ रोकडा होतो. ६०
ते सुर विधिसह घेउनि गेले होते शिवा सवस्थानीं[7],
ज्याचा सोडावा चि ध्याता जीवांचिया अवस्थानीं[8]. ६१
वा हुनि चरणीं हस्तक मस्तक वस्तक[9] कुरूप तो दक्ष
स्मरुनि सतीस गहिंवरे, प्रभुसि म्हणे, 'मदपराध बा! लक्ष. ६२
सु टलों दंडें पापापासुनि, जरि सत्त्वगुण तदपि नाकी[10]

---

१. तुझ्यापासून उत्पन्न झालेलें. २. ही (मी). ३. वायूच्या योगानें होणारी अग्नीची धारणा. ४. ज्ञान्याला (शंकराला). ५. गर्विष्ठाला. ६. यज्ञपशूचें—**पंत**. ७. यज्ञाच्या ठिकाणीं. ८. [जननमरणादि] अवस्थानीं. ९. मस्तक. **पंत**-मस्तक आहे बोकडाचें ज्यास. १०. देव.

चुकती, परि करिसि दया तूं नाशुनि मद[1]महागद पिनाकी[2] !' ६३
दे व गरुडरथ ही ये, होय सकळ खेदपर्वता पवि तो.
भक्त मयूर, घन हरि च, तदितर जनकादि सर्व ताप वितो. ६४
वा खाणिलें असें हें ' दक्षाध्वरमथनचरित ' शर्वाचें,
याच्या श्रवणें जातें अघ अश्रुविमोक्ष[3] करित सर्वांचें. ६५
य श अत्युत्तम आतां परिसा उत्तानपादराज्याचें,
देतें श्रवणद्वारें प्राशन[4] बहु हर्ष सादरा[5] ज्याचें. ६६
न[6] यसुनिपुणा सुनीति[7] ज्येष्ठा सत्कर्मसादरा आर्या,
सुरुचि कनिष्ठा ती बहु त्या मनुतनुजासि[8] आवडे भार्या. ६७
मो हें सुरुचिसुतातें अंकीं घे उत्तमाभिधानातें,
बहु लालन[9] करि राजा, कृपण जसा बहु भजे निधानातें. ६८
भ त्यांजवळ चि होती हो ! ती जी काय लाडकी सुरुची,
तो ध्रुव सुनीतिसुत ही तसि इच्छी प्रीति आपल्या गुरुची[10]. ६९
ग वें सुरुचि म्हणे, ' रे ! राजासन होय योग्य मत्तनया,
राजसुत हि सांप्रत तूं समुचित भव्यासि[11], जेंवि मत्त न यां[12]. ७०
व त्सा ! जरि राजपदीं बैसाया इच्छितोसि तूं, हरितें
भज, मत्सुत हो, सफळ प्रभुचें भजन चि मनोरथा करितें.' ७१
ते बोल सुरुचिचे खरतर हृदयीं लागले जसे बाण,
रडत सुनीतिकडे ध्रुव जाय, तिचा जो बहिश्चर प्राण. ७२
वा तीं परिसुनि ते ही रडली बहु कांपली जसी कदली,
' पदलीनासि पदप्रद हरि च ' म्हणे, ' बा ! खरें च ती वदली.' ७३
सु रुचि तसें चि सुनीति हि बोले, सुस्वहितहेतु[13] बोध मनीं

---

१. गर्वरूप मोठा रोग. २. हे पिनाकधनुर्धारी शंकरा ! ३. अश्रूंचें सोडणें. ४. सेवन. ५. आदरयुक्ताला. ६. नीतीमध्यें अत्यंत निपुण अशी. ७. उत्तानपादाची ज्येष्ठ भार्या. ८. मनुपुत्राला ( उत्तानपादाला ). ९. लाड. १०. बापाची. ११. कल्याणाला. १२. नृपासनास–**पंत.** १३. आपल्या कल्याणाचा चांगला हेतु असा.

ठसला, दीप कराया ध्रुव बाळ सुतेज होय तो धमनी[1]. ७४
दे वाराधनकामें तत्काळ निघोनि जाय गा[2]! बाळ;
तेजस्वि अपत्य ठळक, वरकड निस्तेज, काय गाबाळ? ७५
वा[3] टे सुरर्षि[4] भेटे, दे, जाणुनि निश्चयासि, उपदेश,
कुरवाळूनि मधुवनीं[5] धाडी ध्रुव व्हावयासि सुपदेश. ७६
य श हरिचें गात चि मुनि भेटे उत्तानपादभूपास,
'कां व्याकुळ?' म्हणुनि पुसे सांत्वुनि अत्यंतदीनरूपास. ७७
न मुनि नृप म्हणे, 'रडतों मीं अकृप अनादरूनि तोकास.'
मुनि सांगे, 'सुयश करिल सत्पदवीची धरूनि तो कास. ७८
मो टा महिमा त्याचा, करिल जगत्पति कृपा, नको चि रडों,
सत्वर भेटेल तुला, अतिशोकभरें नृपा! नको चिरडों.' ७९
भ रला ध्रुव गुरुदर्शितसद्योगाच्या[6] भरीं असा, राया!
कीं सार एक भगवद्ध्यान धरुनि न स्मरे असारा[7] या. ८०
ग डबडले बहु याच्या प्राणनिरोधें सुरादि चट सारे,
विदुरा! प्रपंच होऊं पाहे निश्चेष्ट चित्रपटसा रे!. ८१
व य पांचा वर्षांचें, अतिकोमळकाय नव लहान, पण[8]
सा मासांत चि मतिचा हरि तो मळ, काय हा लहान पण[9]? ८२
ते लोकपति प्रभुनें देउनि अभय स्थळासि पाठविले,
ज्यांहीं प्राणनिरोधव्याकुळमतिहीं स्वपाद आठविले. ८३
वा[10] तमनोतिगतिकुशळगरुडस्कंधीं चढोनि नाकर्षी[11]
हृष्ट कराया प्रभु ये, ध्रुवहृदयस्थ स्वमूर्ति आकर्षी. ८४
सु टतां थाग मुर्तीचें शिशुसा, ध्रुव गडबडोनि जों पाहे,
तों जो ध्यानीं होता सुखमूर्ति तसा चि तो पुढें आहे. ८५

---

१. फुंकणी. २. संबोधन—**पंत.** ३. मार्गात. ४. नारद. ५. यमुनातीरस्थ उपवनांत. ६. गुरूनें दाखविलेल्या उत्तम योगाच्या प्रकर्षांत. ७. मिथ्याभूताला (संसाराला). ८. परंतु—**पंत.** ९. प्रतिज्ञा—**पंत.** १०. वायु व मन यांला उल्लंघणाऱ्या गतीविषयीं कुशल अशा. ११. देवर्षि.

दे वा पाहुनि, हर्षें, वर्षे प्रेमाश्रु, आदरें वंदी,
स्तुतिरीति कळेना परि वाटे व्हावें चि विष्णुचा [1]बंदी. ८६
बा ळमनोरथ पुरवी श्रुतिमयशंखें सिवोनि गल्ल हरी,
उठवी स्तुति[2]सूक्ति, जसा अनि[3]ळ क्षीरार्णवांत [4]सल्लहरी. ८७
य श करि हरि बाळाचें, त्यासि म्हणे, 'सन्मनांत वससील,
छत्तिस सहस्र वर्षें राज्य करुनि मत्पदीं च बससील.' ८८
न गरातें ध्रुव होउनि सिद्ध, करुनि अतुळ शुद्ध तप, गेला.
विदुरा! ध्रुवकीर्ति सखी देवांच्या कां न होय अप[5]गेला? ८९
मो टा उत्सव नगरीं झाला, मग विषयभोगमत्तातें
न सुगति म्हणुनि तप करुनि दिधलें निजपद तयासि [6]दत्तातें. ९०
भ वितव्य घडे, वधिला उत्तम मृगयेंत दुष्ट पुण्यजनें,
केला ध्रुवें बहु परक्षय, [7]दहनक्षय वनीं जसा चि घनें. ९१
ग जकुळ हरिनें, गरुडें अहिकुळ, परबळ तसें ध्रुवें मथिलें,
मनुनें पौत्र शमविला, जें भगवद्भक्तयोग्य तें कथिलें. ९२
[8]व सुद हि 'वर माग' म्हणे, हरिभक्ति च त्यासि धन्य तो याची,
अन्य वराची सुजनीं रुचि, त्या हि [9]खगीं न अन्य तोयाची. ९३
ते णें सखक्रियेची पद्धति उपदेशिली जसी संतीं
हरिभक्ति साधुसंगति वरिली [10]सुविरक्तिबदरिका अंतीं. ९४
वा जत गाजत साजत आलें सुविमान, सत्पदीं चढला,
कीं प्रथम चि तो गुरुवरदत्तमहामंत्र आदरें पढला. ९५
सु त उत्कळ सुविरक्त, [11]भ्रमि हि म्हणे, 'या सुखीं च वत्स रतो.'
मुनिहीं कनिष्ठ जो ध्रुवनंदन केला नृपाळ वत्सर तो. ९६
दे वब्राह्मणपूजक पंचम वत्सरकुळांत नृप अंग,

---

१. स्तुतिपाठक. २. स्तुतियुक्त उत्तम भाषणें. ३. वारा. ४. उत्तम लाटा. ५. गंगेला. ६. दक्षानें. ७. वणव्याचा नाश. ८. कुबेर हि. ९. चातकपक्ष्याच्या ठिकाणीं. १०. उत्तम वैराग्यरूप बदरिकाश्रम. ११. ध्रुवपत्नी—**पंत**.

त्याला तपासि दवडी मृत्युसुतातनुजवेनखळसंग. ९७

वा चाल खळ अधार्मिक शीलाला मृत्युच्या चि अनुसरला,
प्रकृति नव्हे चि तयाची बा! जैसी धावदुरगतनु[2] सरला. ९८

य[3] त्त अधर्मी च, 'म्हणति खळशीळ कधीं हि' कवि 'दुरावेना,'
श्रमले प्रार्थुनि, बोधुनि मुनि वळविति लेश न विदुरा! वेना. ९९

न वळे म्हणुनि ऋषीहीं हुंकाराहीं च तो खपविला हो!
जाणों ते म्हणति, 'महाखळवध ऐकोन तोखें[4] पविला हो.' १००

मो टें भूदेवांचें यश कीं जेणें वधूं निवेना तें,
कर्म करूनि निववितो निजसामर्थ्यें वधूनि वेनातें. १०१

भ लतें चि करुनि केलें यश ऋषिनीं तरति कवि जया कथुनीं,
कीं मूर्त दोष बाहिर काढियला हो! शवोरुतें[6] मथुनीं. १०२

ग[7] जशुंडादंडोपम भुजदंडद्वय हि मग तिहीं मथिलें,
वर मिथुन काढिलें हो! तें श्रीहरिरूप हें जना कथिलें. १०३

व दले, 'महायशस्वी पुरुष पृथु, स्त्रीस नाम या अर्ची,
साक्षाल्लक्ष्मी देवी हे या देवा अनामया[8] अर्ची[9].' १०४

ते धरणीसुर[10] पृथुला अभिषेचुनि बसविती पदीं विधिनें,
त्या नृपतिनें सुखविले लोक सकळ, कृपण[11] जन जसा निधिनें. १०५

वा तें वालव्यजनें[12], दंड यमें अर्पिला धरापाळा[13],
इंद्रें किरीट दिधलें, धर्में ही धर्मरूपिणी माळा. १०६

सु[14] रमणि खड्ग, सुदर्शन हरि, विधि दे ब्रह्ममय[15] तया कवच,
हैम[16] वरासन धनद हि, बहु विस्तरभीरु मीं वदें न वच. १०७

---

१. यमाच्या मुलीचा (सुनीथेचा) पुत्र जो वेन त्याचा दुष्ट समागम. २. धावणाऱ्या सर्पाचें शरीर. ३. यत्नवान्-**पंत.** ४. संतोष. ५. पृथ्वी-**पंत.** ६. प्रेताच्या मांडीला. ७. हत्तीची सोंड आहे दंडाच्या उपमेकरतां ज्याला असे. ८. रोगरहिताला. ९. पूजी. १०. ब्राह्मण. ११. अधन-**पंत.** १२. वाळ्याच्या पंख्यानें. १३. राजाला (पृथूला). १४. महादेव. १५. वेदस्वरूप. १६. सोन्याचें.

दे ती आशीराशी प्रेमभरें पूर्ण जे ऋषि तपानीं,
त्यांच्या पृथु अतिसादरधी[1] गंगेच्या जसा तृषित पानीं. १०८
वा निति वंदी मागध सूत[2] तयातें भविष्य जाणून,
ज्यापासीं उत्तम जें देती तें वस्तु यास आणून. १०९
य श धर्मन्यायें जें पृथु मेळविणार तें चि ते वदले,
सत्कविभाषित सत्य चि, बा विदुरा! न च कधीं हि तें बदले. ११०
न रपति शिरीं उडाया लागे जों काय कीर्तिचामर तों
येउनि म्हणति, 'प्रभुजी! आम्हीं अन्नाविणें प्रजा मरतों.' १११
मो हारि इतुकें हि जसें रेंज[3] दुःसह होय लोचना पृथुला[4],
श्रितदुःख तसें ज्याच्या हृदया सोसेल गुरु कसें पृथुला? ११२
भ रला रागें भूवरि, चढुनि रथीं, चाप शर धरी राजा,
शरणागतावनीं जो म्हणता, 'जातेंसि तरि शरीरा! जा.' ११३
ग जबजली भू धाकें, गोरूप धरुनि पळावया लागे,
मागें पृथु हि म्हणे, 'तुज दंडिन शासन कळावयाला गे!' ११४
व सुधा मृगी, पृथु मृगयु[5], वाटे किति ती पळोनि चुकविल या?
नेवूं पाहे अनलस[6] तीस, अविद्येसि जेंवि सुकवि लया. ११५
ते भू सुबहु भ्रमली, श्रमली, मग राहिली उभी, 'मातें
स्त्रीतें कां वधिसि?' म्हणे, विनवी त्या भिउनियां सुभीमातें. ११[६]
'वांसरुवा[7] हि न पाजी' भूप म्हणे 'खाय यवस[8] आंबोण,
ती दंडार्हा चि; अगे! लावावें मांदळ्यांसि[9] कां बोणी[10]? ११७
सु जल्या अन्नाकरितां त्या आल्या मजकडे प्रजा मिळुन,
विधिसृष्टौषधिबीजें[11] दुष्टे! गेलीस तूं कसी गिळुन?' ११८
दे वातें भूमि म्हणे, 'भक्षित होते सदोषधी[12] हो! त्या

---

१. अत्यंत आदरयुक्त आहे बुद्धि ज्याची. २. 'मागध' व 'सूत' या नांवांचे स्तुतिपाठक. ३. धुळीचा कण. ४. मोठ्या. ५. पारधी. ६. उद्योगी. ७. वासराला. ८. गवत. ९. मृदंगाला. १०. गव्हाची भिजवलेली कणीक. ११. ब्रह्मदेवानें उत्पन्न केलेल्या औषधांची बीजें. १२. दोषयुक्त बुद्धि ज्यांची ते.

2380
22092

म्यां यज्ञार्थे चि गिळिल्या, विधिसृष्टा ज्या सदोषधी होत्या. ११९

**वा** गविता उदरीं त्या ओपधि गेल्या जिरोनि बहुकाळें,

मत्क्षीर दुहुनि घ्यावें त्वां कल्पुनि वत्स पात्र जनपाळें. १२०

**य** ल असा आहे, मज तोय टिकाया करा परि समाना,

प्रभुजी! कार्यकर अधिक सदुपाया या करापरिस माना.' १२१

**न** रपति वत्स करि मनुसि निजपाणिस पात्र होय दुहिता, तें

सकलौषधिमय पय भूधेनूचें घे प्रजैकसुहितातें. १२२

**मो** ठ्या उत्साहें मग अन्य हि घेती यथेष्ट मोहून,

वश केली पृथुनें जी भू धेनु तिच्या पयासि दोहून. १२३

**भ** क्तिमती भूदेवी श्रीपृथुनें द्रवुंनि मानिली दुहिता,

केली चापाग्रें मग नग सारुनि चुरुनि ती समा सुहिता. १२४

**ग** रिमादिपदें वैन्यें नगरग्रामादिकल्पना नव्या,

केली तेव्हांपासुनि पावे अकुतोभय प्रजा भव्या. १२५

**व** हु हर्षें पृथु शतहयमखदीक्षा घे, समास नवनवती

झाले, कौतुक दावी, जी तच्छ्रद्धासमृद्धि नवनव ती. १२६

**ते** मख अत्यद्भुत कीं ज्यांत प्रत्यक्ष विष्णु विधि शर्व,

त्या उत्सवांत एका इंद्रावांचूनि हर्षले सर्व. १२७

**वा** ह महेंद्रें चरमीं हयमेधीं तस्करें तसा हरिला,

अत्रि विलोकुनि धाडी पृथुपुत्रा सोडवावया हरिला. १२८

'**सु** रपति भस्मजटाधर होय' म्हणे पृथुकुमार 'हा धर्म'

परतुनि ये, अत्रि म्हणे, 'इंद्र चि तो, उचित दस्युवधकर्म.' १२९

---

१. [पुढें होणाऱ्या] यज्ञास्तव च. २. चांगल्या वनस्पति. ३. सारखी, सपाट. ४. स्वहस्ताला. ५. दोहनकर्ता. ६. प्रजेच्या च एका उत्तम हिताला. ७. दयार्द्र होऊन. ८. पर्वत. ९. सारखी. १०. 'गरिमा' आदिकरून सिद्धींचीं स्थानें. ११. वेनपुत्रानें. १२. जिला कोठून हि भय नाहीं अशी. १३. कल्याणाला. १४. शंभर अश्वयज्ञांची दीक्षा. १५. नव्याणव. १६. घोडा. १७. शेवटच्यांत. १८. चोराचा नाश करण्याचें कर्म.

दे वेंद्रावरि गेला पृथुसुत, तों गुप्त होय मघवा[1] जी!
'विजिताश्व[2]' नाम पावे पृथुनंदन आणितां चि मग वाजी. १३०

वा जी पुनरपि, निर्मुनि तम, हरितां, कथुनि आणवी अत्री;
हरिस[3] भयप्रद पृथुसुत, अहिस जसा विष्णुरथ[4] महापत्री. १३१

य मसम असकृन्निजहयहरणें[5] दीक्षित नरेंद्र तो खवळे,
वधित चि होता अरितें, परि व्हाया वारिल्यांसि[6] तोख वळे. १३२

न[7] गरिपुसि सिद्ध झाले दहनीं द्विज तत्तकाय होमाया,
सद्धर्मघातकर जो त्याची साधूंसि काय हो! माया? १३३

मो टा अनर्थ तो, परि परिहारि हरिनाभिकमळभव[8], नमुनी,
प्रभुची आज्ञा मानिति, कीं ते श्रुतिसंपदमळभवन[9] मुनी. १३४

भ स्मजटाधर आधीं खट्वांगकपाळधर[10] पुन्हां झाला,
पाखंड निर्मिलें तें अनुसरले मूढ जीव ते यांला[11]. १३५

'ग लिताभिमान पुण्यश्लोक खरा, शांति सुरभि मानावी,
अनहंकारा साधु ज्ञाता, अज्ञान दुरभिमाना वी.' १३६

व र्णुनि सच्छील असें, समजावी विधि हि हरि हि वैन्यातें,
आग्रह सोडुनि, जोडुनि हरिस[12] हि कर, पावला न दैन्यातें. १३७

ते पृथुशक्र स्वांशें[13] प्रभुनें स्वकरें धरूनि भेटविले,
अभिमान शमविला ज्या वातें दोघे दवाग्नि पेटविले. १३८

वा त्सल्यें विष्णु म्हणे, 'वत्सा! वैन्या! अभीष्ट वर माग,
मीं स्वाश्रितसाधूंचे करिता परिपूर्ण काम परमाग[14].' १३९

---

१. इंद्र. २. जिकला आहे घोडा ज्यानें तो. ३. इंद्राला. ४ विष्णूचा रथ—जो मोठा पक्षी—गरुड. ५. पुनःपुनः स्वतःच्या घोड्याच्या हरणानें. ६. निवारणाऱ्यांला (ऋत्विज्यांला). ७. इंद्राला. ८. विष्णूच्या नाभिकमलापासून झालेला—ब्रह्मदेव. ९. वेदरूप संपत्तीचीं निर्दोष गृहें च असे. १०. खट्वांग=जीवर मृतमाणसाची कवटी ठेविली आहे अशी काठी व कपाल=भिक्षापात्र, हीं धारण करणारा. ११. पृथुराजाला. १२. इंद्र—**पंत.** १३. आपले अंश (अवतार). १४. कल्पवृक्ष—**पंत.**

सुं[1] ज्ञशतस्तुतसद्गुण तो मागे भक्ति च कविवर दात्या,
देवास चि घे, दावी न बहु स्वासक्ति चकवि वरदा त्या. १४०

दे व विसरला निघतां जैसा पृथु आपणासि बा! विसरे,
तदुद[2]श्रुदृष्टि म्हणती न उचंबळल्या हि आ[3]लि बा[4]विस रे!. १४१

वां[5] सवसखा तया मग भेटोनि सनत्कुमार तद्रु[6]चितें
पुरवि सदुपदेशें, जें प्रिय करि येवूनि देवँ[7]सद्रु चि तें. १४२

र्य जुनि यथाविधि यलें, प्रभुच्या प्रीत्यर्थ सज्जनां भजुनी,
सजुनि सुवैराग्यें निजगति पावे, तनु तपोवनीं त्यजुनी. १४३

नं गसानुस्थानीं ती देवी आर्चि स्वयें रची सुचिता,
उचिता गति सहगमनें पावे, सुर वर्णिती तिची शुचिता. १४४

मो रें, न वधुनि अहि, मणि घ्यावा, तैसें चि जिणुनियां [10]हरितें,
'अंतर्धान' पृथुतनुज घे, नाम तसें चि त्या यशें धरि तें. १४५

भ व्यगुणा त्या अंतर्धाना पृथुभू[11]सें पुत्र जो झाला,
नाम 'हविर्धान तया,' सत्रीं[12] श्री[13] तो त्यजी, तिला भ्याला. १४६

ग द्याहीं पद्यांहीं ज्याच्या कवि गाति अद्भुता धा[14]मा,
पुत्र हविर्धानाचा विश्वप्रख्यात बर्हिषन्नामा. १४७

व रशीळा त्या झालें नाम 'प्राचीनबर्हि' हें दुसरें,
तद्वीर्यें दश सुत बहुरुचिर, जसें पद्म पोषिलें सुसरें. १४८

ते प्राचेतस त्यां करि तात 'करा सृष्टि' या निदेशातें,
गेले आज्ञा घेउनि, तप संपादावया विदेशातें. १४९

वा रिधिसम सुसरोवर जावुनि पश्चिमदिशेंत पाहोनीं,
गां[15]धर्व राजसुत ते ऐकति तीरीं मुहूर्त राहोनीं. १५०

---

१. शेंकडों ज्ञात्यानीं स्तविले आहेत सद्गुण ज्याचे असा. २. त्याची अश्रुपूर्ण दृष्टि. ३. सखी. ४. विहिरीस–**पंत.** ५. इंद्राचा मित्र. ६. त्याच्या इच्छिताला. ७. कल्पवृक्ष--**पंत.** ८. पूजून. ९. पर्वतशिखराच्या ठिकाणीं. १०. इंद्राला. ११. पृथुपुत्राला. १२. यज्ञांत. १३. वैभव. १४. तेजाला. १५. गायन.

**सु** कृती ते रोमांचित झाले जों आयकोनि गांधर्व,
तों त्या सरांतुनि निघुनि दुर्लभ दर्शन तयांसि दे शर्व. १५१
**दे** शिकवर[1] शिव योगादेशाख्य[2] स्तोत्र करि, दया सिकवी,
'श्रीविष्णुवशीकरण चि' म्हणती अनुभवुनि गुण जयासि[3] कवी. १५२
**वा** रींत अयुतवर्षें[4] ते प्राचेतस करीत तप वसले;
श्रीशिवकथितस्तोत्रें स्तवित मनीं ध्यात विष्णुला बसले. १५३
**य** ज्ञांच्या चि बहु भरीं भरला प्राचीनबर्हि जो त्यातें[5]
श्रीनारदमुनि भेटे तत्व न समजोनि बद्ध होत्यातें. १५४
**नं** रनाथातें सांगे अध्यात्म[6] परोक्षरीतिनें[7] चित्र,
कीं तो भगवान् साक्षात् संसारध्वांतनाशिता मित्र[8]. १५५
**मो** ह हराया कथिलें चित्र[9] पुरंजनचरित्र भूपातें,
त्या हंसें निजमानस पावाया त्यजुनि देहकूपातें. १५६
**भ** वगति[10] समजे, स्वपदीं[11] सुत ठेवी, ज्यासि गाति गीर्वाण[12],
कपिलाश्रमीं तप करुनि पावे प्राचीनबर्हि निर्वाण[13]. १५७
**ग** रुडध्वज वरद प्रभु भेटे प्राचेतसांसि बहु हर्षें,
निववी निजदृष्टिसुधावृष्टीनें लोटतां अयुत वर्षें. १५८
**व** रदेश तयां सांगेः–पूर्वी होता तपस्विवर कंडु,
भिउनि हरि[14] म्हणे 'त्यातें प्रम्लोचे[15]! तव कटाक्षशर खंडू. १५९
**ते** प्रम्लोचा त्यातें मोहुनि मग कंडुवीर्यजा कन्या
टाकुनि गेली, तेव्हां ती वृक्षांहीं च पाळिली धन्या. १६०
**वा** त्सल्यें सोम[16] तिला क्षुत्क्षामा[17] पाहतां च कळवळला,

---

१. गुरुश्रेष्ठ. २. "योगादेश" आहे संज्ञा ज्याची तें. ३. ज्या स्तोत्राला. ४. दहा हजार वर्षें. ५. राजाला (प्राचीनबर्हीला). ६. आत्मज्ञान. ७. अप्रत्यक्षपणानें. ८. संसाररूप अंधकाराचा नाश करणारा सूर्य. ९. आश्चर्यकारक [ असें ] पुरंजनाचें (शरीर उत्पन्न करणाऱ्या जीवाचें) चरित्र. १०. संसारगति. ११. आपल्या (राज्य-) पदीं. १२. देव. १३. मुक्ति. १४. इंद्र. १५. अप्सराविशेष. १६. चंद्र. १७. क्षुधेनें कृश अशी.

त्यजिलें अपत्य पाहुनि; करुणेनें साधु तो सकळ वळला. १६१

**सु** रस अमृत कन्येच्या वदनीं देवूनि देशिनी[1] ओती,
'भार्या तुम्हां देहांची[2] माझ्या आज्ञेकरूनियां हो ती. १६२

**दे** ह सुगुण शुचि तुमचा तैसा चि असे शुचि स्वभाव तिचा,
अतिचातुर्यनिधि सती, सुत होइल तो सखा शचीपतिचा.[3]' १६३

**वा** णी सफळा केली, स्तवुनि प्रभुतें, पदासि लागोनीं,
बा! घेतली सग तिहीं सर्ववरश्रेष्ठ भक्ति मागोनीं. १६४

**य** श गाया रुचि देउनि सद्गतिचें[4] पुसुनि जाय माहेर,
मग त्या पुण्यसरांतुनि सिद्ध निघाले दहा हि बाहेर. १६५

**न** गनिकरव्याप्त[5] क्षितितळ पाहुनि कोपले नगांवरि ते,
झाले स्वमुखभवानिलदहनाहीं[6] भस्म भूरुहां[7] करिते. १६६

**मो** ळ[8] सुका जेंवि दवें, तरु जळतां तेंवि रुडनलें[9] ओले,
त्यांसि विधि, 'तुम्हीं पाळक भूप, न उच्छेदकर' असें बोले. १६७

**भ** य पावुनि विधिवचनें, तरु देती त्यांसि मारिपा कन्या,
वन्या, तरि ती धन्या, न न्यायज्ञा जगीं तसी अन्या. १६८

**गं**[10] जनासोरू सुंदती[11] सुमुखी वार्क्षी[12] वधूत्तमा मग ती,
त्या दक्षातें प्रसवे, तो व्यापी निर्मुनि प्रजा जगतीं. १६९

**व** सले प्राचेतस नृप बहु संवत्सरसहस्र मह्यवनीं,[13]
पुत्रीं दक्षीं श्री[14] स्त्री ठेउनि गेले, न राहिले भवनीं. १७०

**ते** पश्चिमसिंधुतटीं जाजलिच्या सिद्धिदाश्रमीं गेले,
आत्मविचारनिरतमति कृतकृत्य श्रीसुरर्षिनें[15] केले. १७१

---

१. तर्जिनी. २. दहा प्राचेतसांचो. ३. इंद्राचा. ४. मुक्तीचें माहेर (विष्णु). ५. वृक्षसमुदायानें व्याप्त. ६. आपल्या मुखांपासून उत्पन्न झालेला वायु आणि अग्नि यानीं. ७. वृक्षांला. ८. तृणविशेष. ९. क्रोधाग्नीनें—**पंत.** १०. हत्तीसारखें नाक व मांड्या जिच्या. ११. सुंदर आहेत दांत जिचे ती. १२. वृक्षाची कन्या म्हणून "वार्क्षी". १३. पृथ्वीच्या रक्षणीं. १४. मारिषा. १५. श्रीनारदानें.

**वा**[1] रिरुहांतें रवि कीं कुमुदांतें[2] चंद्र जेंवि हर्षवितो,
निववुनि तन्नयनांतें तेंवि प्रेमाश्रुपूर वर्षवि तो. १७२
**सु** मति प्राचेतस हरिहुनि मानिति अन्य न मुनिला; भावें
पुसति हित, नतें ज्यातें प्रिय व्हाया धन्य नमुनि लाभावें. १७३
**दे** वर्षि[3] तयां सांगे अध्यात्मज्ञान हरिपद्ध्यान,
ज्ञान टिकावें व्हावें ऐसें श्रीकांतसद्यशोगान[4]. १७४
**वा** ढविली जी होती श्रीहरिहरभक्ति धरिलि सन्मतिहीं,
केलें सुमुनिकृतसदुपदेशें लेशें हि सफळ जन्म तिहीं. १७५
**य** श हरिचें तें चि अमृत, सुमुदिर[5] भगवान् सुरर्षि तो वर्षे,
श्रोतृसमाज **मयूर** चि, पुष्कळ नाचे जनीं, वनीं हर्षे. १७६

---

# पंचम स्कंध.

**न**[6] रवरवर प्रियव्रत मनुपुत्र ज्येष्ठ मंदरद्रोणी[7]
वसउनि होता, श्रीहरिभक्ति च रुचली तयास, न क्षोणी[8]. १
**मो** रातें धन, तैसा आला भेटावया तया धाता,
नारदमनु प्रियव्रतसह पूजी नमुनि आदरें ताता. २
**भ** गवत्पर प्रियव्रत विधिनें सृष्टयर्थ[9] बोधिला हो! तो,
कीं हरिभजनें भव हितें[10], जैसा बचनाग शोधिला[11] होतो. ३
**ग**[12] लपतित राज्यभार स्वीकारी स्वगुरुगुरुवचन[13] मानी[14],
साधु प्रियव्रत करिल आग्रह कां? वरिल गुरुवच न मानी. ४
**व**[15] चनकरा पौत्रातें बहु मानुनि विधि निजस्थळा गेला,
उपरमला[16] मनु दैवें, गुरुराज्यभरासि[17] सुत उभा केला. ५

---

१. सूर्यविकासी कमलांला. २. चंद्रविकासी कमलांला. ३. नारद. ४. भगवंताच्या उत्तम कीर्तीचें गान. ५. चांगला मेघ. ६. नरश्रेष्ठांत श्रेष्ठ. ७. मंदरपर्वताची गुहा. ८. पृथ्वी. ९. राज्यार्थ–**पंत.** १०. हितकारक. ११. शुद्ध केलेला. १२. गळ्यामध्यें पडलेला. १३. आपल्या पितामहाचें वचन. १४. स्वीकारी. १५. आज्ञाधारक. १६. मृत्यु पावला. १७. मोठ्या अशा राज्याच्या ओझ्याला.

ते  जोनिधि प्रियव्रत राजा झाला नृपा ! तया भार्या
बर्हिष्मती सती, ती बहु निपुणा विश्वकर्मजा[1] आर्या. ६
वीं[2] सरमणिसे तत्सुत दश आग्नीध्रादि, त्यांत जन्म तिघे
भगवद्भजनीं वेंचिति, विषयांचें नाम ही न तन्मति घे. ७
सु  त दुसरीचे उत्तम तामस रैवत असीं तयां नामें,
मन्वंतराधिपति ते पुरुषाकृति विष्णुचीं च तीं धामें. ८
दे  सुख जनासि बहु तो, एकादशअर्बुदाब्द[3] राज्य करी,
अर्ध प्रकाशितो रवि यास्तव[4] आपण तसें चि तेज धरी. ९
बा ! सप्तवार[5] फिरतां झाले हे सिंधु वर्तमान खरें,
तद्रथचक्राग्रें[6] जे या भूमितळांत गर्ते मान खरें[7]. १०
य  न्नामें क्षारोदक इक्षुरसोदक सुरोदक घृतोद,
क्षीरोदक आणिक दधिमंडोदक सातवा हि शुद्धोद. ११
न  वल द्वीप हि झाले ते जंबू प्लक्ष शाल्मली नामें,
कुश हि क्रौंच हि शाक हि पुष्कर हीं सर्व सुप्रजाधामें[8]. १२
मो  टे पटु प्रतापी आग्नीध्रप्रमुख वीरमौलिमणी[9],
केले जंबूप्रमुखद्वीपांचे ते स्वपुत्र सप्त धणी[10]. १३
भ  व्यगुणा शुक्राला दिधली ऊर्जस्वती सुता धन्या,
बा ! जीस 'देवयानी' म्हणती ती सन्मता तिची कन्या. १४
ग  रळकटु विषय मानुनि, शवसम बर्हिष्मतीस सोडूनीं,
पावे प्रियव्रत सुगति नारदमुनिगुरुसि हात जोडूनीं. १५
वें[11] ध्वर्थी आग्नीध्र प्रार्थी विधिला करूनि तप भारी,
तो पूर्वचित्ति याप्रति धाडुनि दे अप्सरा वरीं[12] नारी. १६

---

१. विश्वकर्म्याची मुलगी. २. सूर्यासारखे. ३. अकरा अर्बुद (एकशें दहा कोटि) वर्षें. ४. बाकी अंधकारांत राहिलेलें अर्ध त्याकारितां. ५. सातदा. ६. तीक्ष्ण अशा त्याच्या रथाच्या चक्राच्या अग्रानें. ७. खळगे. ८. उत्तम प्रजेची वसतिस्थानें. ९. शूरशिरोभूषण. १०. स्वामी. ११. स्त्रीची इच्छा करणारा. १२. उत्तम.

ते अप्सरा विलोकुनि आग्नीध्र स्त्रैणमणि[1] जसा भोळा,
बोले, तीस 'मुनि' म्हणे, त्या रसखंडींमधील[2] हा तोळा. १७
वा णी आग्नीध्राची, जेंवि सुरा, पूर्वचित्तिला मोही,
बा! तदधरासवरसें वर्षायुत मोह पावला तो ही. १८
सु त नव झाले नाभिप्रमुख तिला, त्यांसि जाय सोडून,
ते जंबूद्वीपीं नव वर्षपति[3] पितृप्रसाद जोडून. १९
दे उनि सवांत[4] दर्शन तारी द्विज संत, कां न नाभि तरे?
प्रभु सुत ज्यास, न देखति ज्या स्मरतां अंतकानना[5] भितरे. २०
वा ळे, बहु पुष्टि धरी मग, कीं ती अमृत मूर्त सेवी तें,
सुख अमृतघन लतेतें प्रभु सुत[6] दे तेंवि येरु देवीतें. २१
यँ तिपतिपति ऋषभ प्रभु नाभितनय पुण्यकीर्ति तो प्राज्य,
प्रथम चि महिस निर्वावि[9], मग देइल सुख काय न करितां राज्य? २२
न गतनयेसि शिव वरी, ऋषभ जयंतीस तेंवि, सुत तीस
शत भरतमुख, जयांची पंक्ति हंसे मणिसुरद्रुसुततीस[10]. २३
मो टा योगी भरत प्रभु, कविमुख भागवत नवू धन्य.
द्विज एकाशीति[11], नवति[12] मुख्य, कुशावर्त आदि नव अन्य. २४
भ गवान् ऋषभ ब्रह्मावर्तीं[13] पुत्रांसि सूक्ति आयकवी,
जीतें सेवुनि म्हणती, 'देवांची काय अधिक गायें[14]?' कवी. २५
गं[15] लदश्रुस्नाता त्या भरता देवूनि राज्य, उर्वरितें[16],
देहें भ्रमे, यश नुरवि ज्याचें मोहा अशा हि उर्वरितें[17]. २६
व नजनसमवृत्ति[18] ऋषभ योगीश्वर, साम्य शुष्कपर्णा या,

१. स्त्रीलंपटांत प्रमुख. २. [ भाषण–] रसाच्या खंडींतील. ३. खंडधिपति. ४. यज्ञांत. ५. यमाच्या मुखाला. ६. प्रभु हा च पुत्र. ७. ऋषिपतींचा स्वामी. ८. पुष्कळ. ९. शांत करी. १०. रत्नें व कल्पवृक्ष यांच्या उत्तम विस्ताराला. ११. एक्यायशीं. १२. नव्वद. १३. सरस्वती व दृषद्वती या नद्यांमधील प्रदेश. १४. कामधेनु. १५. स्रवणाऱ्या रोदनोदकानें स्नान केलेला. १६. बाकी राहिलेल्यानें. १७. मोठ्या शत्रूला. १८. वनचरांप्रमाणें आहे वर्तन ज्याचें.

यच्चर्या[1] निंदाया कुमतिस सुमतिस हि हेतु वर्णाया. २७
**ते** णें त्यजिला मळ जो तद्वातें सुरभि[2] देश दश गावें,
सर्व सुगंधाहुनि बहु बहु ज्याचें सुरसिकें हि यश गावें. २८
**वा** त तसा चि भ्रमत भ्रमत प्रभु योगिराज तो जाय,
अश्मकवल[3] धरुनि मुखीं कर्णाटकवनदवीं[4] त्यजी काय. २९
**सु** मति ऋषभचर्येचें जाणुनियां तत्व सर्व ही तरला,
अर्हन्नृपादि[5] जड जन नरकीं पाखंडकल्पनें भरला. ३०
**दे** व भरत जो याचे गुण सुखविश्रामहेतुमंच[6] जनीं,
वरि विश्वरूपदुहिता, ती प्रसवे पंच पुत्र पंचजनी. ३१
**वा** गवुनि सुखें धर्मन्यायपथें स्वप्रजा अवनिपाळ[7],
स्वरत भरत राज्य करी तो वर्षायुतसहस्रमित[8] काळ. ३२
**य** ज्ञ यथाविधि करुनि, स्वसुमतिमुखनंदनांसि[9] भूदायें[10]
वांटुनि देवूनि, हरिक्षेत्रीं पुलहाश्रमीं च तो जाय. ३३
**न** द्युदकीं स्नान करुनि तीरीं जप करित बैसला होता,
हरिरवभीतमृगीच्या पाहे पतिता मृतांबका[11] पोता. ३४
**मो** हें त्या भरतानें मृतमातृक बाळ पाळिला सुचिर[12],
शुचिरक्षणार्ह[13] फार चि आवडला पुत्रसा चि तो रुचिर. ३५
**भ** रत तयाच्या विरहें तळमळला बहु, म्हणे, 'स्वहरिणा मीं
हतभाग्य कधीं पाहिन? किंबहुना मृग चि होय परिणामीं.' ३६
**ग**[14] तिविच्युत हि हरिभजक जातिस्मर[15] भरत मृगपणीं[16] झाला,
कालंजराहुनि[17] पुन्हां धावुनि पुलहाश्रमासि तो आला. ३७

---

१. ज्याची वर्तणूक. २. सुगंधित. ३. दगडाचा घांस. ४. कर्णाटकांतील अरण्यांतील वणव्यांत. ५. अर्हत्नामक राजा इत्यादि मूर्ख. ६. सुखानें आराम घेण्याचे पलंग. ७. पृथ्वीचा रक्षणकर्ता. ८. दहा हजार सहस्र ( दशकोटी ) वर्षांनीं मोजलेला. ९. आपल्या सुमतिप्रमुख पुत्रांला. १०. पृथ्वीरूप पितृधन. ११. मेली आहे आई ज्याची अशा बालाला. १२. पुष्कळ काळ. १३. शुद्ध व रक्षण करण्यास योग्य. १४. मोक्षमार्गभ्रष्ट. १५. पूर्वजन्म आठवणारा. १६. मृगजातींत. १७. एतन्नामक पर्वतापासून.

ते अप्सरा विलोकुनि आग्नीध्र स्त्रैणमणि[1] जसा भोळा,
बोले, तीस 'मुनि' म्हणे, त्या रसखंडींमधील[2] हा तोळा. १७
वा णी आग्नीध्राची, जेंवि सुरा, पूर्वचित्तिला मोही,
बा! तदधरासवरसें वर्षायुत मोह पावला तो ही. १८
सु त नव झाले नाभिप्रमुख तिला, त्यांसि जाय सोडून,
ते जंबूद्वीपीं नव वर्षपति[3] पितृप्रसाद जोडून. १९
दे उनि सवांत[4] दर्शन तारी द्विज संत, कां न नाभि तरे?
प्रभु सुत ज्यास, न देखति ज्या स्मरतां अंतकानना[5] भितरे. २०
वा ळे, बहु पुष्टि धरी मग, कीं ती अमृत मूर्त सेवी तें,
सुख अमृतघन लतेतें प्रभु सुत[6] दे तेंवि येरु देवीतें. २१
यँ तिपतिपति[7] ऋषभ प्रभु नाभितनय पुण्यकीर्ति तो प्राज्य[8],
प्रथम चि महिस निर्वावि[9], मग देइल सुख काय न करितां राज्य? २२
न गतनयेसि शिव वरी, ऋषभ जयंतीस तेंवि, सुत तीस
शत भरतमुख, जयांची पंक्ति हंसे मणिसुरद्रुसुततीस[10]. २३
मो टा योगी भरत प्रभु, कविमुख भागवत नवू धन्य.
द्विज एकाशीति[11], नवति[12] मुख्य, कुशावर्त आदि नव अन्य. २४
भ गवान् ऋषभ ब्रह्मावर्तीं[13] पुत्रांसि सूक्ति आयकवी,
जीतें सेवुनि म्हणती, 'देवांची काय अधिक गायी[14]?' कवी. २५
गें[15] लदश्रुस्नाता त्या भरता देवूनि राज्य, उर्वरितें[16],
देहें श्रमे, यश नुरवि ज्याचें मोहा अशा हि उर्वारितें[17]. २६
व नजनसमवृत्ति[18] ऋषभ योगीश्वर, साम्य शुष्कपर्णा या,

१. स्त्रीलंपटांत प्रमुख. २. [ भाषण–] रसाच्या खंडींतील. ३. खंडधिपति. ४. यज्ञांत. ५. यमाच्या मुखाला. ६. प्रभु हा च पुत्र. ७. ऋषिपतींचा स्वामी. ८. पुष्कळ. ९. शांत करी. १०. रत्नें व कल्पवृक्ष यांच्या उत्तम विस्ताराला. ११. एक्यायशीं. १२. नव्वद. १३. सरस्वती व दृषद्वती या नद्यांमधील प्रदेश. १४. कामधेनु. १५. स्रवणाऱ्या रोदनोदकानें स्नान केलेला. १६. बाकी राहिलेल्यानें. १७. मोठ्या शत्रूला. १८. वनचरांप्रमाणें आहे वर्तन ज्याचें.

यच्चर्या[1] निंदाया कुमतिस सुमतिस हि हेतु वर्णाया. २७
ते णें त्यजिला मळ जो तद्वातें सुरभि[2] देश दश गावें,
सर्व सुगंधाहुनि बहु बहु ज्याचें सुरसिकें हि यश गावें. २८
वा त तसा चि भ्रमत भ्रमत प्रभु योगिराज तो जाय,
अश्मकवळ[3] धरुनि मुखीं कर्णाटकवनदवीं[4] त्यजी काय. २९
सु मति ऋषभचर्येचें जाणुनियां तत्व सर्व ही तरला,
अर्हन्नृपादि जड[5] जन नरकीं पाखंडकल्पनें भरला. ३०
दे व भरत जो याचे गुण सुखविश्रामहेतुमंच[6] जनीं,
वरि विश्वरूपदुहिता, ती प्रसवे पंच पुत्र पंचजनी. ३१
वा गवुनि सुखें धर्मन्यायपथें स्वप्रजा अवनिपाळ[7],
स्वरत भरत राज्य करी तो वर्षायुतसहस्रमित[8] काळ. ३२
य ज्ञ यथाविधि करुनि, स्वसुमतिमुखनंदनांसि[9] भूदायें[10]
वांटुनि देवूनि, हरिक्षेत्रीं पुलहाश्रमीं च तो जाय. ३३
न द्युदकीं स्नान करुनि तीरीं जप करित बैसला होता,
हरिरवभीतमृगीच्या पाहे पतिता मृतांबका[11] पोता. ३४
मो हें त्या भरतानें मृतमातृक बाळ पाळिला सुचिर[12],
शुचिरक्षणार्ह[13] फार चि आवडला पुत्रसा चि तो रुचिर. ३५
भ रत तयाच्या विरहें तळमळला बहु, म्हणे, 'स्वहरिणा मीं
हतभाग्य कधीं पाहिन? किंबहुना मृग चि होय परिणामीं.' ३६
गं[14] तिविच्युत हि हरिभजक जातिस्मर[15] भरत मृगपर्णीं[16] झाला,
काळंजराहुनि[17] पुन्हां धावुनि पुलहाश्रमासि तो आला. ३७

---

१. ज्याची वर्तणूक. २. सुगंधित. ३. दगडाचा घांस. ४. कर्णाटकांतील अरण्यांतील वणव्यांत. ५. अर्हत्नामक राजा इत्यादि मूर्ख. ६. सुखानें आराम घेण्याचे पलंग. ७. पृथ्वीचा रक्षणकर्ता. ८. दहा हजार सहस्र ( दशकोटी ) वर्षांनीं मोजलेला. ९. आपल्या सुमतिप्रमुख पुत्रांला. १०. पृथ्वीरूप पितृधन. ११. मेली आहे आई ज्याची अशा बालाला. १२. पुष्कळ काळ. १३. शुद्ध व रक्षण करण्यास योग्य. १४. मोक्षमार्गभ्रष्ट. १५. पूर्वजन्म आठवणारा. १६. मृगजातींत. १७. एतन्नामक पर्वतापासून.

व पु वाळविलें तेथें शुष्क चि तृणपर्ण मात्र भक्षूनीं,
तीर्थांत सोडिलें; फळ काय तसें पशुशरीर रक्षूनीं ? ३८
ते हरिणतनु त्यजितां पावे सुब्राह्मणालयीं जनुतें,[1]
होती हरिप्रसादें स्मृति चुचकारीत धरुनियां हनुतें. ३९
वां[2] डववरास पुत्र ज्येष्ठस्त्रीचे स्वतुल्य नव होते,
मिथुन कनिष्ठस्त्रीचें, त्यांत पुरुष भरत खाय जो गोते. ४०
सु त सन्मुनिचा झाला, भ्याला संगासि[3] फार, कीं फसला,
वसला मग होउनि 'जडभरत' बळें बाळपंक्तिला[4] बसला. ४१
दे[5] वीचे वर्ण न धरि घोकवितां च्यार मास चोवीस,
तो वीस हि नुच्चारी, भरत म्हणे, 'तूं मनीं च होवीस' ४२
बा प अलब्धमनोरथ[6] वृद्ध गृहीं च त्यजूनि तनु जाय,
माय सहगमन करि, तरि न म्हणे चि मुखेंकरूनि जड[7] 'हाय!' ४३
य त्न करुनि पढवुनि ते नव हि भ्राते भले बहु श्रमले,
जडपण तें सोंग असें, कोणीं हि न समजले, जन भ्रमले. ४४
न म्हणे साधु असाधु स्व पर, करी कर्म भलतसें,[8] खाय,
मणि जेंवि रंजें[9] त्याचा सुबहुमळें दिव्य झांकला काय. ४५
मो टा परि कोंडा ही खावुनि, त्याच्या सुखा नसे तोटा,
तो टाकिला निजजनें, सुटला जो संग सर्वथा खोटा. ४६
भं द्रपदपूर्व काळीं[10] देवी, तीकारणें वृषळपतिनें,[11]
पुरुषपशु मिळविला तो, गेला चि सुटोनि नियतिच्या[12] गतिनें. ४७
ग डबडले तद्रक्षक, त्यांसि निशीथांत[13] भरत सांपडला,

---

१. जन्माला. २. [ त्या ] ब्राह्मणश्रेष्ठाला. ३. [ संसारांत बद्ध करणाऱ्या ] समागमाला. ४. मूर्खांच्या रांगेला. ५. मंत्रदेवतेचीं ( गायत्रीचीं ) अक्षरें. ६. [ पुत्राला पंडित करावें हा ] मनोरथ प्राप्त झाला नाहीं ज्याचा असा. ७. 'मूर्ख' ( भरताचें अन्वर्थक नांव ). ८. जसें आवडेल तसें. ९. [ साफ करावयाच्या ] धुळीनें. १०. 'भद्र' हें पद आहे आरंभीं जिच्या अशी—काळी. ११. शूद्राधिपतीनें. १२. दैवाच्या. १३. मध्यरात्रींत.

बा ! शोधितां कपर्द न घ्यावा सन्मणि पथांत कां पडला ? ४८

व चनें स्वभ्रात्यांच्या होता रक्षीत भरत सेतातें,[1]
केला प्रयत्न पुष्कळ चुकवाया कष्टभेर[2] तसे तातें.[3] ४९

ते तस्कर तेथुनि त्या गेले घेउनि, उगा[4] चि हा गेला,
वधितां त्या बहु काळी कोपे, न च तिळ हि भरत रागेला. ५०

वा घीण क्षोभावी वधितां स्वसमक्ष जेंवि पेटयाला,[5]
क्षोभे तसी च काळी अनुगांसह[6] खाय त्या चि बेटयाला. ५१

सु टला, परि इक्षुमतीतीरीं विसरे न पळ हि जो हरिला,
भरत रहूगणशिबिकावाहककुळनायकें[7] बळें धरिला. ५२

दे ह बरा धड पाहुनि, शिबिकेला जोडिला बळें चि खलें,
सुजनें कुजनें करिजे जन विमळ समळ जसा जळें चिखलें. ५३

घा हे स्कंधीं, बाळ[8] न जाणुनि, भलतें चि जरि वदे काय,
स्वसुखामृतें तयातें निववी, सत्पुरुष कां नव्हे माय ? ५४

य द्यपि लंघितयां[9] गुरु न फळद, हा त्यासि तरु जसा कपिलीं,[10]
भरतापासुनि पावे तत्व पुसों जाय काय जें कपिला.[11] ५५

न वल चि भवाटवीतें[12] वर्णुनि तो राय शोधिला[13] भरतें,
त्या सच्चंद्रें[14] प्रभुच्या आणुनि थोरा यशोधिला[15] भरतें. ५६

मो क्षपथपथिक[16] केवळ ऋषभ तसा भरतसुत सुमति झाला,
याच्या वंशीं गय नृप, वर्णिति हरिसम चि सुकविजन ज्याला. ५७

भ[17] व्य सविस्तर कथिला भूगोळ शुकें अशेष जाणाया;
याच्या ध्यानें हृदयीं सूक्ष्म प्रभुचें स्वरूप बाणाया. ५८

---

१. शेताला. २. हालांचे भार. ३. बापानें—ऋषभानें. ४. स्तब्ध. ५. वाघाच्या बच्याला. ६. सेवकांसह. ७. रहूगणाची पालखी वाहणारे ( भोई ) त्यांच्या कुलाच्या नायकानें. ८. मूल [ पक्षीं ] अज्ञ. ९. उल्लंघन करणाऱ्याला. १०. वानराला. ११. एतन्नामक ऋषीला. १२. संसाररूप अरण्याला. १३. शुद्ध—पापरहित—केला. १४. साधुजनरूप चंद्रानें. १५. यशःसागराला. १६. मोक्षमार्गावरील वाटसरू. १७. फार मोठा. १८. [ भगवंताचें जें दृश्य स्थूल स्वरूप अशा ] भूगोलाच्या.

ग गर्गी ध्रुवादि कथिले सूर्यादिग्रहगतिस्थितिज्ञानें,[1]
तैसें जनासि बहुमत होय असें कथिल कवि[2] किति ज्ञानें ? ५९
व सुधेवरील लोकालोकापर्यंत[3] जे पदार्थ, तथा
गगनांत जे तयांची कथिली श्रीमच्छुकें चि सांग कथा. ६०
ते जरि पदार्थ इतरें वर्णावे, ग्रंथ बहु न कां वाढे?
रसिक[4] हि निरलस सादर साधु सदा स्वस्थ थोडके गाढे. ६१
वा नावीं पाताळें सप्त[5], बळिश्री अनंत वानावे,
परि मंत्रवर्ण[6] अडविति; आदरिले गुरु कसे न मानावे? ६२
सुं ज्ञसमाजसुरसिक[7] श्रीहरि च म्हणेल न लघु पृथु[8] कांहीं,
स्वल्पार्थस्कंधांहीं[9] तृप्त चि होईल जेंवि पृथुकांहीं[10]. ६३
दे वाच्या कीं गाती तद्भक्तांच्या यशास नर कां तें
हर्षद सोडुनि वर्णू तापद जे त्यां कशास नरकांतें? ६४
वा इट वाटेल म्हणुनि वर्णितसें सर्वनरकरीतीतें,
गदःदुख वैद्य तैसें नाशिति जें पाप नर करीती तें. ६५
य मदूत यातना बहु भोगविती उग्र ते नरक सारे,
रामसुत मयूर म्हणे, 'त्यांच्या श्रवणीं न भी नर कसा रे!' ६६

---

१. सूर्यआदिकरून जे ग्रह त्यांच्या गतिस्थितींच्या ज्ञानानें. २. स्वतः मोरोपंत. ३. लोक ( उदयाचल ) व अलोक ( अस्ताचल ) यांमधील प्रदेश. ४. [ ग्रंथ वाढवावा तर ] निरलस, सादर, साधु, सदा स्वस्थ [ व ] गाढे रसिक हि थोडके; [ तेव्हां मग विस्तार करून उपयोग तरी काय ?]. ५. अतल, वितल, सुतल, तलातल, रसातल, महातल व पाताल अशीं सात पाताळें. ६. ' नमो भगवते वासुदेवाय ' ह्या मंत्र-भागवतरचनेसाठीं आदरिलेल्या मंत्रांतील अक्षरें. ७. ज्ञान्यांच्या समुदायांतील रसज्ञ. ८. मोठें. ९. अत्यंत थोडा अर्थ ज्यांत आहे अशा स्कंधानीं. १०. पोह्यानीं.

# षष्ठ स्कंध.

न रपति म्हणे, 'शुकमुने! म्यालों श्रवण चि करूनि नरकास,
वद तरतो कोणाची पापसमुद्रीं धरूनि नर कास?' १
मो टें प्रायश्चित्त श्रीशुक सांगे स्वयें नरपतीतें,
जेणें पातकबीजें, दहनें जैसीं तृणें करपती तें. २
भ गवन्नामोच्चारें सकळें हि अघें[1] सवासनें जळती,
मळती न नामधारक[2], पळती यमदूत, विघ्न ही टळती. ३
ग णपतिस विघ्न तैसे भगवन्नामासि दोष कांपति, तें
माहात्म्य ऐकिल्यावरि, गणिजेल यमोग्ररोष[3] कां पतितें? ४
व रकुलज कान्यकुब्जीं[4] विप्र अजामिळ असे महादोषी,
दासीपति पितृधर्मस्त्रीनय सोडुनि तिला[5] चि तो पोषी. ५
ते दासी केवळ तनु, तत्सुत दश ते हि केवळ प्राण,
त्यांचें करि परघातद्यूतस्तेयादिकें[6] परित्राण[7]. ६
वा र्धक केवळ आलें, जन्हि अष्टाशीति[8] लोटलीं वर्षें,
दासीच्या पोरांचें लालनपालन करी सदा हर्षें. ७
सु त त्या दासीचे प्रिय, परि निपट[9] लहान, दशम जो चरम[10]
नारायण नाम तया, तो त्या जरठासि आवडे परम. ८
दे तां, घेतां, पीतां जळ, खातां अन्न, जागतां, निजतां,
लुब्धाचें प्रेम धनीं, त्याचें नारायणीं तसें झिजतां. ९
वा टे त्या वृद्धाला नारायण पुत्र अधिक असुपरिस,
प्रिय नव, दशम प्रियतर जरठा, कृपणास जेंवि वसु[11] परिस. १०
य मदूत तिथे आले, कां त्या पाप्या तिहीं न बांधावें?
मारी हाक अजामिळ 'येसी नारायणा! न कां? धावें.' ११

---

१. वासनासहित पापें. २. [ भगवंताचें ] नाम धारण करणारे (जपणारे). ३. यमाचा भयंकर कोप. ४. देशविशेषीं. ५. त्या दासीला. ६. दुसऱ्याचा नाश, जुगार, चोरी इत्यादिकानें. ७. रक्षण. ८. अठ्यायशी. ९. केवळ, अगदीं. १०. शेवटला. ११. धन.

न[1] लिनगदारिदरधर श्रीहरिचे दूत धांवले चवघे
श्याम चतुर्भुज कुंडलकटकमुकुटमंडितांग[2] ते अवघे. १२
मो राहीं सर्व तसे विष्णुभटाहीं अजामिळा झटते
चट तेजें भग्नप्रभ[3] केले श्रीदंडपाणिचे[4] भट ते. १३
भ गवद्भटांसि म्हणती ते, 'आम्हीं धर्मराजभट, कां जी!
देतां निषेधुनि[5] तुम्हीं, देतात श्येनें[6] भीति चटकां[7] जी? १४
ग जेत धावुनि आलां सुर, कीं उपदेव[8] सिद्ध[9] कळवा जी!;
पवन गरुड न तुम्हांसम, किंति रविचे जरि अगाधबळ वाजी? १५
व[10] रवेश तुम्हीं कोण? द्युति तुमच्या भानुच्या तसी आंगा,
या धर्मपाळकाच्या दूतांतें कां निषेधितां सांगा?' १६
ते प्रभु[11] म्हणती, 'म्हणतां जरि आपण धर्मराजभट, सांगा
तरि धर्म तो कसा रे!? हूं! याच्या आंतळों[12] नका आंगा. १७
वा डव नेतां कां रे! बोला दंडास योग्य हा कां तें?'
प्रभुभट पुसति असें यमदूतांतें, हंस जेंवि काकांतें. १८
सु रसत्तमांसि सांगति यमभट, जो वेदविहित तो धर्म,
तद्विपरीत अधर्म, प्राणी तेणें न पावती शर्म. १९
दे उनि भाक अधर्मा भजला, समजोनि हीनधर्मातें,
माता तात उपेक्षुनि, अनुसरला हा कुधी कुकर्मातें. २०
वा ला कुलजा भार्या त्यजिली, देवूनि पाठ वेदासी,
अष्टाशीत्यब्दवया[13] तरि या स्वप्नांत आठवे दासी. २१
य मवचनास्तव आलों अतिपातकनायका लया न्याया;
सुज्ञ तुम्हीं कां, नसतां पति[14] घातक, नायकाल या न्याया?' २२

---

१. कमल, गदा, चक्र व शंख धारण करणाऱ्या. २. कुंडलें, वळीं व मुकुट यानीं भूषित आहेत शरीरें ज्यांचीं असे. ३. निस्तेज. ४. यमाचे. ५. धिक्कार करून. ६. ससाणे. ७. चिमण्यांला. ८. यक्षगंधर्वादि. ९. अणिमादि सिद्धि ज्याला प्राप्त आहेत असे. १०. उत्तम वेषधारी. ११. विष्णुदूत. १२. स्पर्श करूं. १३. अठ्यायशीं वर्षे झालीं आहेत ज्याच्या वयाला असा. १४. यमधर्म–पंत.

न यधर्मरहस्यज्ञ प्रभुभट हांसोनि म्हणति, “ हारि! हारि! ते
कीं हें चि करिति अनय व्यवहारश्रवणदुरितपरिहरिते[1]. २३
मो टा अधर्म ऐसा धर्मज्ञांच्या सभेसि सिवतो कीं
दंडिति अदंड्य, कैंचें करितां तातें चि घात शिवें[2] तोकीं? २४
भ गवन्नाम सुमंगळ चतुरक्षर जपति ज्यासि काय कवी
तें ‘ नारायण ’ ऐसें घे हा, आम्हां हि दूर आयकवी. २५
ग तपातक हा, निष्कृत[3] हरिनामें कोटिजन्मपापांचें;
गरुडापुढें उराया क्षण ही सामर्थ्य काय सापांचें? २६
व दना नाम कसें तरि हरिचें येतां चि सर्व पाप हरी,
सांकेत्य[4] पारिहास्य[5] स्तोभ[6] हि हेलन[7] हि कोटि भव्य[2] करी. २७
ते शुचि हरिच्या नामें गुरुतल्पग[8] चोरटा सुहृद्द्रोही
गोब्राह्मणराजस्त्रीपितृहंता, ज्या नरा सुरा मोही. २८
वा चेसि नाम येउनि करितें स्वगुण स्मरूनि जें विहित
न कळुनि खातां ओखद तोखदें[9] होतें करूनि जेंवि हित. २९
सु टतो चि अघापासुनि, ‘ हरि ’ म्हणतां, पावतो शुभां लोकां,
पतित स्खलित[10] हि भग्न हि संदष्ट[11] हि तप्त आहत[12] हि हो कां.” ३०
दे वाचे भट ऐसे बहु वदले, सोडउनि तया गेले,
धन्य अजामिळ, ज्यास्तव उघडे प्रभुनें स्वनामगुण केले. ३१
वा दें त्यांच्या[13] झाला बहु पश्चात्तप्त तैं अजामिळ तो,
गंगाद्वारीं करि हरिभक्ति च कीं भक्त त्या अजा[14] मिळतो. ३२
य मदूतांपासुनि बा! सोडविला दीन तो जिहीं भट ते

---

१. व्यवहाराच्या श्रवणानें [ तदनंतर तत्संबंधीं जो ] संशय त्याचा परिहार करणारे. २. कल्याण. ३. परिहार. ४. संकेतानें ठेविलेलें. ५. थट्टेनें घेतलेलें. ६. गाण्याची पूर्तता होण्याकरितां घेतलेलें. ७. निंदेनें घेतलेलें. ८. गुरुभार्येशीं रत होणारा. ९. संतोष देणारें. १०. पडलेला. ११. [ जनावरानीं ] चावलेला. १२. दुसऱ्यानीं मारलेला. १३. विष्णुदूत व यमदूत यांच्या. १४. जन्मरहिता विष्णूला.

आले, विमान आणुनि, जे हरिसमरूपभूषणें नटते. ३३
न मुनि तयांसि अजामिळ गंगातीर्थीं त्यजूनि कायातें,
श्रीपतिसमीप गेला सुविमानें, लाभ हा निका यातें. ३४
मो टा महिमा प्रभुच्या नामाचा, किति म्हणोनि बोलावा?
पावे रूप असें त्या विष्णुभटांसीं विशंक तोलावा. ३५
भ गवद्दूतपराजित यमदूत स्वाननांसि मळवीती
आज्ञाभंग तयाचा[1] झाला तें सर्व वृत्त कळवीती. ३६
ग हिवरुनि यम म्हणे, 'रे! आम्हां ब्रह्मेंद्रचंद्रभर्गांतें
जो शासितसे, ज्याचे गुण न च गणवतिल कोटिगर्गांतें[2]. ३७
व त्सक हो! त्या श्रीमद्विष्णुप्रभुचे चि दूत ते, ज्यांचें
कार्य हरिजनावन हें प्रभुच्या जे स्थान पूततेजांचें[3]. ३८
ते प्रभुदूत त्रिजगीं ध्वंसाया सर्वपरमद[4] भ्रमती,
त्यांच्या तेजें जळतिल धरितिल जे गर्व परम दभ्रमती[5]. ३९
वा णी ज्यांची श्रीप्रियतमनामा जाहली असेल वही,
त्यांतें वक्र पहाया काय तुम्हां तेज? मज नसे लव ही. ४०
सु मति हरिभजक विधिमनु कपिल बालिकुमार[6] शंभु नारद रे!
भीष्म प्रह्लाद जनक शुक मीं बारा रहस्यदृष्टि[7] बरे. ४१
दे वाच्या चि दयेनें अत्यंत रहस्य भागवतधर्म
जाणतसों, भट हो! जन तरती यांहीं च पावती शर्म. ४२
वा हत असतां तुळसी हरिचरणीं मलयपर्वतीं बाहे[8]
मजला अगस्त्य मुनिवर सांगे अत्यद्भुता कथा बा! हे.' ४३
य व अंगुष्ठगत[9] करी जन्हि दुर्गतिपात्रजन तथापि हिता
मुखगत हरिनाम तसें प्रकटि शुक दयालु या पथीं पिहितीं[10]. ४४

---

१. यमाचा. २. कोट्यवधि गर्गांला. [ गर्ग हा यादवांतील वृष्णिकुळाचा उपाध्याय होता ]. ३. पवित्र प्रभांचें. ४. सर्वांचा मोठा गर्व. ५. अल्पबुद्धि. ६. सनत्कुमार. ७. [ भागवतधर्माच्या ] रहस्याची दृष्टि ज्यांला आहे असे. ८. बोलावी. ९. आंगठ्यावर असलेला. १०. गुप्त मार्गाला.

**न** रनाथा! तो दक्ष प्राचेतस विंध्यपर्वतीं तपला,
अघमर्षण[1]सत्तीर्थी यमनियमां[2]तें सदा बरा जपला. ४५
**मो** र[3]स्थळ हारातें पूजुनि भावें त्रिकाळ विधिदक्ष[4]
तो नित्य 'हंसगुह्य' स्तोत्रें स्तवि सत्तपोंबुनिधि दक्ष. ४६
**भ** गवान् दर्शनसद्वर देउनि त्यां[5]तें म्हणे, ' मदुक्त करीं,
पंचजनाची दुहिता सुमति असिक्नी सती प्रजार्थ वरीं.' ४७
**ग** रुडध्वजविभुवचनें वरिली दक्षें प्रजार्थ ती देवी,
झाले पुत्र अयुत तिस, संज्ञा 'हर्यश्व' हे तयां ठेवी. ४८
**व** दला दक्ष तयांतें, ' उत्पन्न करा प्रजा,' असें, राज्यां !
त्याप्रति तपोर्थ गेले ' नारायण ' नाम सत्सरा बा! ज्या. ४९
**ते** थें भगवान्नारद भेटे, ज्या सर्व वंदिती संत,
त्यांसि म्हणे, ' सृष्टि कसी करितां भूचा न जाणतां अंत? ५०
**बा** लिश हो! एकपुरुष[6] राष्ट्र बिल अ[7]दृष्टनिर्गम हि कांहीं
बहुरूपा स्त्री पूरुष पुं[8]श्चलिपति तो हि देखिला नाहीं. ५१
**सु** त हो! न[9]दी उभयतोवाहा जी ती हि पाहिली नसतां,
तैसें चि पंचपंचाद्भुत[10]गृह सृष्टयर्थ तप करित बसतां, ५२
**दे** वप्रिय हो! नेणा तो ही जो हंस चित्रकथ[11] कैसे?
सर्गपर[12] भ्र[13]मशील क्षु[14]रपविकृत चक्र नेणते ऐसे. ५३
**बा** ळक हो! स्वपित्याचा आ[15]देश स्वानुरूप जो त्यातें
नेणुनि सर्ग कसा रे! रचितां गृह न रचितां चि जो त्यातें? ५४

---

१. अघमर्षणनामक उत्तम तीर्थांत. २. योगांतील पहिल्या दोन अंगांला. ३. लक्ष्मीच्या वक्षःस्थळसंबंधीं. ४. विधींविषयी तत्पर. ५. प्राचेतसनामक दक्षाला. ६. परमात्मा. ७. ज्यांतून बाहेर पडावयाचा मार्ग दृग्गोचर होत नाहीं असें. ८. जारिणीचा [ मायेचा ] पति. ९. जन्ममृत्युरूपानें दोन्हीकडून वाहणारी नदी. १०. पंचवीस तत्वांचें अद्भुत गृह. ११. आश्चर्यकारक कथा सांगणारे. १२. सृष्टीकर्तां तत्पर. १३. भ्रमण करणारें ( चक्र ). १४. वस्तरे व वज्र यानीं निर्मिलेलें. १५. आज्ञा.

य त्नें हि पराभेद्य श्रीमुनिचे वचनकूट[1] दश सारे
सुतपःशुद्धसुमति ते सन्मुनि हर्यश्व समजले बा! रे!. ५५
न म्रपणें साधूंचे ज्याहीं आराधिले सदा चरण,
त्यां काय कठिन, घडलें बहु सत्तीर्थीं जयां सदाचरण? ५६
मो क्षेश ब्रह्म[2]मति हि जीव हि माया हि अंतरात्मा[3] ही
शास्त्र हि काळ तथा उपदेशदश पदार्थ जाणिले त्यांहीं.' ५७
भ[4] व्यमति समजले ते तत्व, मग अनंत पावले शर्म,
मुनितें वंदुनि गेले, फिरतिल, करितिल विमुक्त कां कर्म[5]? ५८
ग तपुत्रांतें शोची दक्ष, तया ब्रह्मदेव समजावी,
गुरुवचनें दुःखस्थिति, रवितेजें तिमिरराशिसम जावी. ५९
व रगुण सहस्र नंदन निर्मुनि त्यांस हि म्हणे, 'करा सृष्टी.'
त्यांवरि हि तो दयाघन गुरु[6] त्या चि सरोवरीं करी वृष्टी. ६०
ते शबलाश्व हि गेले वंदुनि मुनितें निजाग्रजपथानें[7],
गुरु करिती धाया शिव विनता तोका निर्जाग्र जप थानें. ६१
वा र्ता परिसुनि कोपे दक्ष, जयाच्या महाजन यशा पी
त्या नारदासि, कल्पुनि निजपुत्रोद्धार तो अनय, शापी. ६२
'सु तघातका! त्रिलोकीं भ्रमसिल, न स्थान पावसिल कांहीं.'
शापी असें; तळमळे पुत्रस्मृतिहीं जसा च सिलकांहीं. ६३
दे वर्षि स्वीकारी शापोक्ति, म्हणे सुखें 'तथास्तु' तिला;
बहुत रुचे सुकर्वीच्या श्रीहरिजनशांतिची कथा स्तुतिला. ६४
वी[10] रिजभव समजावी त्यातें जो सुतत्रिनष्टिनें[11] कष्टी,
मग दक्ष असिक्नीच्या उदरीं उत्पन्न करि सुता षष्टी. ६५
य त्संततिनें भरले हे लोक तिन्ही, तयांत दश धर्मा,

---

१. भाषणरूपकोडें. २. [ 'पुंश्चलि' ही ]. ३ [ 'पंचपंचाद्भुतगृहं' ]. ४. विशालबुद्धि असे. ५. [ सहेतुक ] क्रिया. ६. नारदमुनि. ७. आपल्या वडील भावाच्या मार्गानें. ८ आपला समीपभाग (सान्निध्य). ९. थंडीनें पोटांत कळा मारतात त्यांनीं १०. ब्रह्मदेव. ११. पुत्रनाशानें.

तेरा कश्यपमुनिला देउनि, तो दक्ष पावला शर्मा. ६६

न क्षत्राख्या कन्या दे सत्तावीस[1] दक्ष सोमातें,
तो हृदयांत म्हणे, 'या दानें भगवान् प्रसन्न हो मातें.' ६७

मो दें भूतासि दिल्या दोन, सुमुनि अंगिरा तया दोन,
दोन कृशाश्वा, ताक्ष्यीं च्यार सुपात्रा, म्हणेल कां तो[2] न? ६८

भ जन अशेष नद्यांचें न घडे, परि न विटला चि मीन मनें,
दक्षसुता हो! करितों मतिहीन अशक्त दीन मीं[3] नमनें. ६९

ग वें सुरपति नें[4] उठुनि गुरुसि[5] सुधर्मासभेंत[6] अवमानी,
साहे न तो, गुरूनीं न सहावा, श्याप मान अवमानीं[7]. ७०

व उनि सभेसि गेला, गुरु पश्चात्तप्त होय बहु हरि तों
'भ्रमलों मदें' म्हणे 'गुरुपद नमुनि स्वापराध परिहरितों.' ७१

ते व्हां सुरगुरु झाला गुप्त, न उमगे चि म्हणुनि मघवा[8] तें
स्वकृत स्मरे, क्षणक्षण कांपे तो देवतरु चि अधवातें. ७२

वा र्ता ऐकुनि सुररिपु[9] करिती कविगुरुमतें[10] महासमर,
झाले भग्न, विधिप्रति वंदुनि, निजवृत्त सांगती अमर. ७३

सु रपतिस शब्द लावी प्रभु कीं, 'गुरुसत्कृतीस चुकलास,
मुकलास श्रीस, अहा! शक्रा! विजळाब्जसा[11] चि सुकलास. ७४

दे व! तुम्हीं त्वष्ट्याचा सुत सुतपा विश्वरूप विनवा, जा,
सोसा विप्रिय हि किमपि, लघु न म्हणुनि फार तो कवि नवाजा[12].' ७५

वा[13] सवमुख सुर विधिला नमुनि म्हणति, 'काम हा पुरो धात्या!
विनउनि न विश्वरूपा मग करितिल कां महापुरोधा[14] त्या?' ७६

य श गेलें, आणुनि दे 'नारायणवर्म[15]' तो कथुनि हरिला,

---

१. कृत्तिकादि नक्षत्रे. २. ताक्ष्यं. ३ मोरोपंत. ४ मूळ पाठ—**जेव्हां**. ५. बृहस्पतीला. ६. देवसभेंत. ७. नीचानीं. ८. इंद्र. ९. दैत्य. १०. शुक्रबृहस्पतींच्या अनुमोदनानें. ११. उदकशून्य कमलासारखा च. १२. वाखाणा—**पंत**. १३. इंद्रप्रमुख. १४. मुख्य पुरोहित. १५. नारायणरूप कवच (वैष्णवी विद्या).

त्या विद्येनें परमद शक्रें त्यांचीं[1] बळें मथुनि हरिला. ७७
नें[2] गर्भित् त्यासि वधी, सुरहेलन साहेल कां महाभाग?
कीं मातृस्नेहें दे असुरां तत्प्रीति[3]काम हा भाग[4]. ७८
मो डुनि मर्यादेतें, चोरुनि भलतें चि तो करी कर्म,
म्हणुनि वधी, ईश्वर ही हत्या घे, न बुडवी बळें धर्म. ७९
भ जला वर्षभरि तिलों तो भगवान्देवराज सविचार,
भूजळतरुस्त्रियांतें हत्येचे दे विभाग कवि च्यार. ८०
गर्[6] हिंत कर्में करि हरिहनना[7] त्वष्टा कवि प्रयोगातें,
निर्मी वृत्रासि, मना क्रुद्धाच्या कर्म कां न यो[8]गा! तें? ८१
व ह्नींतूनि प्रकटे, जेंवि युगांतीं कृतांत, लोकांतें
व्यापी वृत्र, सुरांचें बळ भिववीना महोग्र तो कां तें ? ८२
ते सुर युगपत्[9] शस्त्रें वर्षति मारावयासि वृत्रास,
तो तीं गिळी, विलोकुनि तें धरिती सर्व शस्त्रभृत् त्रास[10]. ८३
वां[11] रिजनाभप्रभुला गेला सुरराज शरण सुरसहित;
यद्यश अमृताधिक हृत[12]शरणागतजन्ममरण सुरस हित. ८४
सु रचातकांसि भेटे करुणाघन, अभय[13]दानवारीतें
मागति आनन पसरुनि, तों दे त्यां, अभयदान वारी[14] तें. ८५
दे व स्तवनें हरिवरि होउनियां सुप्रसन्न वदला हें,
‘ शक्रा ! दधीचिमुनिच्या अस्थिसुशस्त्रें पुन्हां स्वपद लाहें. ८६
वा हेल शरीर तुम्हां अतिर्थीस, जडाकडे[15] न पाहेल,
आहे लक्ष ब्रह्मीं, अर्थिमनोभंग तो न साहेल.’ ८७
स्व श परमाद्भुत मुनिचें कीं निजवदनें चि वानिलें अजितें,

---

१. दैत्यांचीं. २. इंद्र. ३. त्यांची ( दैत्यांची ) प्रीति आहे हेतु ज्याला असा. ४. [ यज्ञान्नाचा ] अंश. ५. ब्रह्महत्येला. ६. निंद्य. ७. इंद्रनाशाकरितां. ८. देवो. ९. एकाएकीं. १०. भय. ११. विष्णूला. १२. हरण केलीं आहेत शरण आलेल्यांचीं जन्ममरणें ज्यानें असें. १३. अभयदानरूप उदकाला. १४. तें ( वृत्रासुररूप संकट ) दूर करी. १५. अचेताकडे ( शरीराकडे ).

ऐका सर्व सुकविनीं भगवद्यशसें चि मानिलें अजि ! तें. ८८
न मुनि मुनिस दस्त्र[1] म्हणति, 'भगवंता ! तूं प्रसन्न हो, पावें,
ब्रह्मोपदेशसदमृत आम्हां शरणागतांसि ओपावें.' ८९
मो घमनोरथ[2] न करी, दस्त्रांसि म्हणे दधीचि, 'मग या, हें
सांगेन तत्व मीं, या समयीं कर्मांत गुंतलों आहें.' ९०
भ वनातें मुनिस नमुनि गेले ते, तों दधीचिला शक्र
भेटोनि बहु दटावी अन्योत्कर्षासहिष्णु जो वक्र. ९१
'ग वें ज्ञानबळाच्या करितां भलतें चि कर्म ठकवीतें,
विप्रा ! दुराग्रहानें घडतो बहु घात कर्मठ कवीतें. ९२
व दसिल जरि सद्विद्या त्या वैद्यांतें मदुक्ति मोडूनीं,
शस्त्रें सहसा उडविन विप्रा ! त्वन्मस्तकासि तोडूनीं.' ९३
ते दस्त्र पुन्हां येतां, शक्रोक्त तयां दधीचि तो कळवी;
परि साध्वस[3] त्या सद्गुरुसच्छिष्यांच्या न सद्यशा मळवी. ९४
वा डववरासि[4] वडवासुत म्हणती, " ज्ञानिनायका ! पावें,
युक्ति असे कीं, तव शिर न म्हणों देतां चि 'हाय !' कापावें. ९५
सु ज्ञवरा ! मग मस्तक अश्वाचें तुज मुहूर्त जोडावें,
तेणें उपदेशावें[5] त्वां, तें शक्रें यथेष्ट तोडावें. ९६
दे दीप्यमान जैसें आहे हें शिर असें चि योजावें,
गुरुदक्षिणा समर्पुनि आम्हीं मग करुनि तुज 'नमो[6]' जावें." ९७
वा क्या या दस्त्रांच्या होय जसा क्षुधित पायसा[7] मान्य,
केलें तसें चि, राज्या ! तो गुरु, ते शिष्य काय सामान्य? ९८
यं वस तसें सर्वस्व ब्रह्मज्ञा ज्या दधीचिला तुच्छ,
तो वेढिला सुरांहीं, मधुपांहीं स्वर्द्रुचा जसा गुच्छ. ९९
नं गवर[9] मंदरसा कीं शतगुण तदधिक उदार तो विप्र

---

१. अश्विनीकुमार. २. नष्ट झाली आहे इच्छा ज्याची असे. ३. भय. ४. ब्राह्मणश्रेष्ठाला. ५. जोडावें. ६. नमस्कार. ७. खिरीला. ८. तृण. ९. पर्वतश्रेष्ठ.

थोरांच्या कार्यावरि जड[1] तें पडतें म्हणोनि दे क्षिप्र. १००
मो दें चि दिलें मुनिनें वपु विद्याव्रततपःसुकृतसार,
फार प्रहृष्ट झाले तत्सत्वें सकळ सुर सपरिवार. १०१
भ व्यप्रभ रचुनि सुमुनिशुक्लीं[2]हीं वज्र विश्वकर्मा तें
दे शक्रा; गातें त्या अतुळा अद्यापि विश्व कर्मातें. १०२
ग[3] जराजीं शक्र चढे भगवत्तेजःप्रदीप्त[4]परतेजा;
तृणसम गमति असुरभट जे वृत्रासुरसहाय पर ते ज्या. १०३
व[5] ज्री सामर सासुर वृत्रासीं नर्मदातटीं झगडे,
देवांच्या तेजांहीं दैत्यांचें तेज संगरीं रगडे. १०४
ते जस्वी वृत्र करी जऱ्हि कीर्ति[6]सुलोकहेतुहित बोध,
तऱ्हि त्याचे न परतले जे भग्न त्रस्त असुरवर योध. १०५
वा रुनि भग्न[7]वधोद्यत सुर धिक्कारूनि होय पर[8]वीर
क[9]रवीर जयश्रीचें, देवांकरवीं रणांत करवी[10] र[10]. १०६
सु र[11]मथि, न भी परबळा, जैसें भ्यावें न अर्णवा मकरें,
शक्रप्रहितगदेतें धरि जैसें बर्हि[12]पर्ण वामकरें. १०७
दे वेश्वर[13]वाहनगज त्या चि गदेनें रणांगणीं ताडी,
मागें सप्त[14] धनु[14] सरे, कीं त्याच्या विकळ जाहल्या नाडी. १०८
वा सव जों सावध करि निजगज फिरवूनि अमृतमय पाणी,
तों तो वृत्र व्यसनीं न गदा पुनरपि शचीपतिस हाणी. १०९
य द्यपि असुर तदपि बहु[15]धर्मन्यायैकसार तो बोले,
जें ऐकुनि परमसुखें तद्धनो[16]द्यत सुरेंद्र ही डोले. ११०

---

१. अचेतन ( शरीर ). २. अस्थि-**पंत.** ३. ऐरावतावर. ४. उत्कृष्ट-**पंत.** ५. इंद्र. ६. यश व उत्तम लोक यांला कारण असा हितकारक. ७. हतधैर्य झालेल्यांच्या नाशाविषयीं उद्युक्त असे. ८. श्रेष्ठ वीर. ९. करवीरक्षेत्र ( निवासस्थान ). १०. रडवी. ११. संहारी. १२. मोराचें पीस. १३. ऐरावत. १४. सात धनुष्यें. [ १ धनुष्य=४ हात ]. १५. पुष्कळ धर्म आणि न्याय हे एक च आहेत सार ज्याच्यांत असें. १६. त्याच्या (वृत्रासुराच्या) नाशाविषयीं उद्युक्त.

न यधर्मश्रीभगवद्भक्तिरहस्यज्ञ विगत[1]कुत्स वदे,
'वज्रें वधिसिल, शंका त्यज,' ऐसें म्हणुनि हरिस उत्सव दे. १११
'[2]मो दाकर होइन मीं, सत्पदलाभें घडो रणीं मरण,
हो भलतें जन्म, असो तेथें भगवत्पदांबुजस्मरण.' ११२
भ क्त [3]परमपुरुषाचा तो वृत्र [4]भवांतरीं असें कळलें,
कीं ऐशा असुरपणीं ज्ञान तयाचें न लेश ही मळलें. ११३
ग र्जुनि हरिवरि वृत्र प्रेषी अत्युग्र शूळ त्यासकट
वज्रें [5]तद्दक्षिणभुज तोडुनि करि शक्र विक्रम प्रकट. ११४
व [6]ज्रधरासि कपोळीं [7]तदिभास हि एक भुज हि परिघातें
[8]व्यापारुनि तो ताडी, पाडी, पवि अधिक काय हरिघातें? ११५
ते व्हां लाजे हरि, पवि नुचली, कीं गळुनि अरिपुढें पडला,
वृत्र म्हणे "घे, परिभव कोणा [9]अजिततरा नसे वडला? ११६
बा हु असे एक तरि; त्यजिला म्यां संगरीं न आवांका,
तूं कां त्यजिसी? न म्हणे वीरांतें युद्धधर्म हा 'वांका'." ११७
सु रराज म्हणे, 'बापा! वृत्रा! तरलासि विष्णुची माया,
बा! धन्य तूं, तुझ्या नयधर्मज्ञपणा नसे चि सीमा या.' ११८
दे वेशावरि वृत्रें मग पुनरपि टाकिला परिघ, राया!
[10]हरिला सांगुनि धाडुनि पवि सभुजा हानि ने परि घरा [11]यां. ११९
चा सुनि मग मुख केला विस्तीर्ण [12]रसातळापरसि गळा
वृत्रें गिळिला तो त्या [13]वज्रधरासह [13]महाकरी सगळा. १२०
य द्यपि स्यावें स्याला भगवत्तेजें न [14]कुक्षितिमिरासी,
यावत्प्राण न सोडी वृत्र [15]समिति, जेंवि [16]कुक्षिति [17]मिरासी. १२१

---

१. निंदारहित. २. आनंदाची खाण. ३. विष्णुचा. ४. जन्मांतरीं. ५. याचा उजवा बाहु. ६. इंद्रास. ७. त्याच्या हत्तीला. ८. एका बाहूची योजना परिघ घेण्याकडे करून. ९. ईश्वराहून इतराला. १०. शक्रास—**पंत.** ११. परिघास—**पंत.** १२. पृथ्वीपेक्षां. १३. इंद्रासह मोठा हत्ती. १४. उदरस्थ अज्ञानाला. १५. युद्ध. १६. वाईट—नापीक—जमीन. १७. वतनदार.

नं[1] गभित् चित्तीं चिंती मोहतमाच्या चि कुक्षितमिं[2] रवितें,
बालार्कतेज कुक्षिक्षतजें[3] होवूनि उक्षित[4] मिरवि तें. १२२
मो ह तसा वृत्राचा कुक्षि, दृढ ज्ञान तेंवि वज्र, नृपा!
झाला युक्त, शतक्रतु, जीव, गुरु दधीचिमूर्ति, विष्णुकृपा. १२३
भ गवान् हरि मग वर्षें[5] वृत्राचा अशनिनें गळा कापी,
वज्रितनुच्छुरिकेला[6] मरणार्थं चि वृत्रतनुबळाका[7] पी. १२४
ग ति बहु बरवी घडली वृत्रा असुरासि आयका हो! ती,
श्रीभगवंतीं शिरलें तद्देहोत्थित[8] सुनिर्मळ ज्योती[9]. १२५
व ध वृत्राचा होतां झाला सर्वामरांसि बहु तोष,
इंद्र चि फार तळमळे, कीं, तो घडला तयासि अतिदोष. १२६
ते वृत्रहानि चित्तीं शतदा एका घडींत आठव दे,
त्या 'तिष्ठ[10] तिष्ठ[10]' ऐसें हत्या घेउनि[11] बळें चि पाठ[11] वदे. १२७
वा सव पळोनि फार श्रमला, मग मानसा सरा गेला,
अवश[12] अशांत म्हणुनियां तो बहु निजमानसास रागेला. १२८
सु टला श्रीहरितेजें न च शिरुनि सरोजनालतंतूंत[13],
महदाश्रयाविना पटु भोग चुकविणार कोण जंतूंत[14]? १२९
दे वेंद्र भोगवर्जित दीन लपाला सहस्रहायन[15] गा!
त्यासि विपत्काळ म्हणवि, जेंवि अनावृष्टिकाळ 'हाय!' नगां[16]. १३०
वा स असा शक्र करी, तेव्हां पाळी सुरां नहुख[17], पावे,
परि त्याला मद झाला, जेणें गरळें तसे बहु खपावे. १३१
यं[18] ति सत्कृतिच्या[19] तैसा नहुष शचीच्या धरून कामातें,
होय पदभ्रष्ट, वरिति जरि कुमति म्हणे 'वरूं नका मातें.' १३२

---

१. इंद्र. २. उदरस्थ अंधकारांत. ३. कुक्षीसंबंधीं रक्तानें. ४. सिंचित. ५. एक वर्षानें. ६. इंद्रशरीररूप सुरीला. ७. वृत्रदेहरूप बगळी. ८. त्याच्या शरीरापासून उत्पन्न झालेलें. ९. [आत्म-] तेज. १०. थांब, थांब. ११. पाठीस लागून. १२. पराधीन. १३. कमलांच्या नालतंतूंत. १४. प्राण्यांत. १५. वर्षें. १६. वृक्षा. १७. नहुष. १८. संन्यासी. १९. सत्काराच्या.

न हुष शचीनें सुरगुरुकथितोपायें महर्षि[1] शिबिकेला
योजउनि तींत बसउनि परमपदभ्रष्ट[2] जेधवां केला. १३३
मो टे मोटे ज्ञानी ब्रह्मर्षि मरीचिमिश्रं[3] जाणूनीं
ज्ञानें गुप्तस्थितितें[4] शक्रातें स्वस्थळासि आणूनीं. १३४
भ गवंतातें सांगे हयमेधें ते यथोक्त यजवूनीं.
हत्येपासुनि शक्रा सोडविती हरिजनांसि भजवूनीं. १३५
गं[5] जपुरनाथ पुसे, 'तो नारायणभक्त वृत्र असुर मला
नवल गमे, सांग गुरो! कृष्णीं च कसा, त्यजूनि असु, रमला?' १३६
व दला शुकमुनिः--पूर्वी होता नृप चित्रकेतु मघवासा,[6]
ज्या खळबळ भी, श्रीहरिपदतुळसीच्या जसें चि अघ वासा. १३७
ते णें केल्या होत्या भार्या शुभरूपशीलनिधि कोटी,
परि तो अनपत्य, नृपा! बा! दैवाची असी च गति खोटी. १३८
वा माक्षी त्या भार्या, श्री[7] भू कांहीं च त्या नृपा न रुचे,
अनपत्या विभवाचे गुण अगुण चि, जेंवि निष्फळा तरुचे. १३९
सु कृतमय करी मंदिर लावुनियां पाय अंगिरा याचें,
ज्येष्ठेसि एक सुत दे, मन निववी आधिसंगि[8] रायाचें. १४०
दे उनि यज्ञोच्छिष्टं[9] ज्येष्ठस्त्रीतें, नृपास मुनिराय
'सुत एक हर्षशोकप्रद होइल तुज,' असें म्हणुनि जाय. १४१
बा ळक सुप्रभ[10] झाला, त्या पाहुनि चित्रकेतु बहु हर्षे,
अर्थिजनीं सर्वत्र हि तो धन, घन वन,[11] तसें विपुळ वर्षे. १४२
य श सवतिचें न सोसे, देति शिशुसि पापमानसा[12] गर गा!
क्षोभुनि उपडिति वंशा जेंवि नगा[13] सापमान सागरगा.[14] १४३

१. अगस्त्यादि महर्षि. २. श्रेष्ठ (इंद्र) पदापासून भ्रष्ट. ३. 'मिश्र' हें उपपद विशेषनामाच्या अंतीं गौरवार्थ योजितात. ४. इंद्राच्या गुप्त वसतिस्थानाला० ५. हस्तिनापुरचा स्वामी--परीक्षित्. ६. इंद्रासारखा. ७. ऐश्वर्य. ८. मनोव्यथेचा सोबती च अशा राजाचें. ९. यज्ञान्नांतील शेषभाग १०. सुतेजस्वी. ११. पाणी. १२. दुष्ट आहे मन ज्याचें अशा. १३. वृक्षाला. १४. नद्या.

न गवर वज्राघातें, सुतशोकें तेंवि भूप तो पडला,
राज्ञी कृतद्युति जसी शतगुण बहु चित्रकेतु ही रडला. १४४
मो ह हराया त्याचा नारदसह अंगिरा नृपा! आला,
तत्सुतशोक शमाया सांगति बहु सद्विवेक ते त्याला. १४५
'भ र शोकाचा कां? हा कोण तुझा? तूं हि काय गा! याचा?
गावा श्रीहरि च, नव्हे लटिका; संबंध काय गायाचा? १४६
ग णिति न बुध संबंधा, सम [1]युक्तवियुक्तवाळुका काय;
नियम नसे नात्याचा; त्याचा तूं सुज्ञ आळुकां[2]! काय?' १४७
व दले बहु; भूप पुसे, 'कोण तुम्हीं सदय बोधितां यां[3] हें?'
त्यासि म्हणे मुनि, 'जो तुज पुत्रद मीं तो चि अंगिरा आहें. १४८
ते जोनिधि हा दुसरा नारदमुनिराज पूर्ण सुज्ञानें,
व्हावें संसारीं त्वां यासि नमुनि धन्य तूर्ण[4] सुज्ञानें. १४९
बा! द्यावें ज्ञान चि तुज तेव्हां जनकें जसें सुता वित्त,
पुत्र चि दिधला म्यां, कीं पुत्रीं च तुझें निविष्ट[5] बहु चित्त. १५०
सु तवंतांचा आतां अनुभविला कीं तुवां महाताप?
तापद असे चि दारागेहादि पदार्थ सर्व हे साप.' १५१
दे वर्षि म्हणे, 'विद्या[6] देतों जिणें मनीं न ताप रिघे,
आहे सुदुर्लभा हे बा! जेंवि जनीं सुधा नतापरि[7] घे.' १५२
बो हुनि गतजीवात्मा त्या सर्व सुहृज्जनासि तो दावी,
करि नवल, तया वदवी, [9]जें साधुसभा स्मरोनि मोदावी. १५३
यं[10] मदूतनीत ही जो जीवात्मा प्रभु करूनि आज्ञा त्या
सिरउनि शवीं म्हणे, 'वद, दे सुख पितृमानसास, बा ज्ञात्या!' १५४
न यनें उघडुनि बैसे तो जीवात्मा, म्हणे, "तुम्हीं कोण?

---

१. एके ठिकाणीं होऊन पुनः दूर होणाऱ्या वाळूसारखा. २. छांदिष्ट पुरुषा! ३. मला. ४. सत्वर. ५. अत्यंत शिरलेलें—मग्न झालेलें. ६. मंत्रोपनिषत्. ७. शरणागतापरि. ८. बोलावून. ९. भाषण. १०. यमदूतानीं नेलेला.

मीं कोण? कां सुजविले डोळे? केले रडोनि कां शोणे[१]? १५५
मो[२] तीं सिंधु हि न रडे, जातें रज सत्व, तेंवि जायाचें,
जनसंबंध नसे चि स्थिर, शिकल्या[३] तत्व, तें विजायाचें[३]. १५६
भ वमार्गीं भेटि जना विरह त्यागूनि जों[४] दया दे हा
प्रिय कैसा? आपुलिया[५] ध्या पावायासि मोद या देहा. १५७
ग गना तसें न आत्म्या येणें जाणें, म्हणोन कायातें
शोचूं नका चि जन हो! कोणी ‘साचा’ म्हणों नका यातें.” १५८
व दुनि असें गेला तो जीव, मग त्यजिति शोक तज्ज्ञाती[६],
नृप चित्रकेतु विद्या घेता झाला नमूनि तज्ज्ञा[७] ती. १५९
ते मुनिवर गेल्यावरि तो सेउनि सप्तदिवस जळ मात्र,
विद्याधराधिपत्या[८], विद्येतें धरुनि, होय नृप पात्र. १६०
वा ढे तेज बहु महा विद्येनें, मग मनोज्ञवेषा[९]तें
तो सिद्धवर्य वंदी जाउनि चरणासमीप शेषातें. १६१
सु रवरनुत[१०] सुखमूर्ति प्रभु भक्तकृतस्तवें सुखी होय,
तत्वज्ञान तया दे, देतो घन जेंवि चातका तोय. १६२
दे उनि दर्शन शुद्धज्ञान प्रभु गुप्त होय मग, नमुनी
वरदा स्वपदा ये नृप, ज्या म्हणति ‘उदार देवनग न’ मुनी. १६३
वा वरला संवत्सर लक्षांचें एक लक्ष तो योगी,
जो गीष्पतिनुतसद्गुण[११] दिव्य विषय विपुळ शक्रसा भोगी. १६४
य[१२] क्षवराधिकभाग्यें प्राक्तनकर्में तया हि मद नाशा
झाला, निंदी प्रभुला पुरविलि जेणें न एक मदनाशा. १६५

---

१. लाल. २. मोतीं आणि सागर यांचा जन्यजनक संबंध असून हि त्यांचा वियोग झाला असतां एक हि रडत नाहीं. ३. तत्त्वज्ञान झाल्यावर तें (सत्त्वरजप्रधान लिंगशरीर) नाश पावावयाचें. ४. देह. ५. आपल्याच्याला (जो देह आपला संबंधी असें तुम्हांला वाटतें त्याला). ६. त्याचे गोत्रज. ७. ती (विद्या) जाणणाऱ्या [नारदाला]. ८. विद्याधराच्या अधिकाराला. ९. सुंदर वेष धारण करणाऱ्याला. १०. देवश्रेष्ठांनीं स्तुत. ११. बृहस्पतीनें स्तविले आहेत चांगले गुण ज्याचे असा. १२. यक्षश्रेष्ठापेक्षां हि अधिक ऐश्वर्यानें.

न यनमनोहर भगवद्दत्तविमानीं बसोनि लोकांत
फिरतां महेश्वरातें पाहे जो भानु भक्तकोकांत. १६६
मो ठ्या प्रेमें घेउनि अंकीं श्रितसा[1]नुकंप देवीतें
आलिंगुनि होता प्रभु, यद्ध्यान ज्ञानसंपदे वीतें. १६७
भ क्त प्रभुचा तो त्या ज्ञानिसभेच्या समीप राहोनीं,
मोठ्यानें हांसे हो! शिववदन अनादरें चि पाहोनीं. १६८
गे[2] हीं असी करी कीं, 'हा लोकगुरु स्वयें वदे धर्म,
करितो तप, धरितो जपमाळा, व्रत, भस्मभर, जटा, चर्म[3]. १६९
व नितेतें आलिंगुनि बसला सन्मुनिसभेंत वित्र[4]प हा,
प्राकृत ही जें न करी, करितो तें ज्ञानिनाथ चित्र[5] पहा.' १७०
ते निंदा प्रभु साहे, परि फार करी महासती राग;
पावे वे[6]तस नम्र स्तब्ध, न पावे महास[7] तीरार्ग. १७१
[8]वा चाळा! ऐक' म्हणे, "तूं शास्ता काय रे! अरे! मत्ता!?
सत्ता दाविसि, निंदिसि जो प्रभु बहु मान्य नारदा दत्ता. १७२
सु र चरणरेणु माथां धरिति ब्रह्मादि सर्व भाटतसे,
ज्याचें सद्यश गाती तो हा प्रभु तुज विनिंद्य वाटतसे? १७३
दे वांच्या देवाचा निंदक तूं खळ चि, भाग्यमत्त, पहा
सद्यः स्वकृतफळ, म्हणों, गुरुलंघन साहतां, न मत्तप 'हा!' १७४
वा[9] सासि तूं न समुचित साधूंचा हरिपदासमीप गडी,
उडवितसें जे श्री हे तव उडवाया मदास मीं पगडी. १७५
य श लंघिसी गुरूंचें म्हणुनि म्हणों असुर पाप हो न कसें?
सोसावा त्वां शाप, स्वर्णें शुद्ध्यर्थ ताप हो[10]नकसें." १७६

---

१. आश्रितांच्या-भक्तांच्या-ठिकाणीं सदय असा. २. निंदा. ३. [गजाचें] कातडें. ४. निर्लज्ज. ५. आश्चर्य. ६. वेत. ७. उत्सवास—**पंत**. ८. तीरावरील वृक्ष. ९. वसतीला. १०. हीनकसें (?). [मूळ प्रतींत दोन्ही चरणांत 'होनकसें' असें आहे; पण त्या दोन्ही ठिकाणीं 'हीनकसें' असा यमकप्रयोजक पाठ असणें च इष्ट दिसतें. कदाचित् हस्तदोषानें 'ही' चा 'हो' झाला असेल].

न म्रपणें शापातें घेउनि, न धरूनि कंप, दोघांतें
तो चित्रकेतु वंदी त्यां संश्रितसर्वसंपदोघांतें. १७७
मो दें चि वदे, 'अंबे! न तुवां हा नियतिनें दिला शाप,
भ्रमतां भवांत घडती आनंद जना जसे, तसे ताप. १७८
भ व हा चि भ्रम, येथें शाप अनुग्रह, तथा नरक नाक,
सुख दुःख काय? सत्यज्ञाता न गुणाहिचा धरिल धाक. १७९
ग जवरवरद प्रभु निजमायेनें या विचित्र विश्वास
रचितो लीलार्थ, असे दृढ माझा तत्पदीं च विश्वास. १८०
व दलों जें तें अनुचित मानुनि तूं कोपलीस तरि माते!
नमितों, क्षमा करावी, न क्षोभे माय, बाळ जरि माते.' १८१
ते ज असें शांत करुनि गेला तो चित्रकेतु; शिव त्यातें
वर्णी शिवेजवळि बहु, चंद्रातें जेंवि सिंधु शिवत्यातें. १८२
वा खाणी शिव कीं, 'क्षम परि न प्रतिशाप दे, विवरवाहें
स्वीकृत जन तो तत्सम न तशाप्रति शाप देवि! वर वाहें.' १८३
सु रशत्रु वृत्र झाला शापें तो चित्रकेतु गा राज्या!
लार्जत होत्या ज्वाळा बाहिर तैशा चि आंत गारा ज्या. १८४
दे वद्वेष्टे दितिचे सुत दोघे, तत्प्रताप बहु कथिला,
ज्येष्ठ हिरण्यकशिपु सुत, अन्य हिरण्याक्ष विष्णुनें मथिला. १८५
वा सववधार्थ मागे प्रार्थुनि सुत अमर पतिस दिति देवी,
मुनि हि भिडेस पडुनि दे, तें जाणुनि शक्र बहु तिला सेवी. १८६
र्य त्किंचिद्व्रतनियमीं चुकतां, योगें शिरे तिच्या पोटीं

---

१. आश्रय करणाऱ्यांच्या सर्व संपत्तीचे प्रवाह च अशांला. २. दोरीरूप सर्पाचा. ३. स्पर्श करणाऱ्याला. ४. समर्थ. ५. गरुडवाह विष्णूनें. ६. अग्नि-ज्वालांपेक्षां हि ज्याचें बाह्य स्वरूप भयंकर होतें व अंतर्यामीं गारांपेक्षां हि ज्याचें मन कोमळ होतें. ७. [ कश्यपापासून झालेले ]. ८. थोडेसें ( एके दिवशीं संध्याकाळीं आंचवल्याशिवाय व पाय धुतल्याशिवाय दिति झोंपीं गेली, इतकें जपनियमांत उणें पडलें ).

हरि[1] गर्भ सप्तधा करि[1]; देवचारित्रें म्हणों नये खोटीं. १८७
न मरति, रडति म्हणुनि ते केले एकैक सप्तधा[2] पविनें,
केला प्रयत्न अद्भुत चुकवाया आत्मघात त्या कविनें. १८८
[3]मो हे दिति, शक्र म्हणे, 'गर्भा! रोदन करूं नको' मारी[4].
जागी झाली नाहीं, पोटीं गडबड जऱ्ही असा भारी. १८९
भ गवद्भक्तमहिमा हा अत्यद्भुत कीं अशा हि वक्रांचें[5]
झालें कल्याण, यश प्रख्यात जगत्रयांत शक्राचें. १९०
ग र्भविनाश न झाला पहिले[6] एकोन[7] तेंवि पन्नास,
जें वज्र परम दारुण घातक पीयूष तें विपन्नासि[8]. १९१
व[9] ज्री बाहेर निघे घेउनि पन्नास आपणासकट,
मोह हि दितिहृदयांतुनि, होय प्रेमा सुधांशुसा[10] प्रकट. १९२
ते सुत दिति पाहे जों जागी होवूनि दृष्टिला उघडी,
भगवान् म्हणे, 'विघडली[11] माझी कारुण्यवृष्टि लाउ घडी[11].' १९३
वा सव त्या भ्रात्यांसह वंदी दिति, त्या सुता जवळ बाहे,
प्रेमें पुसे, 'असावा एक, बहु कसे सुधाकवळ बा! हे?' १९४
सु रपति यथार्थ सांगे, जोडुनि करयुग्म, आपुलें कर्म,
कीं, सत्य चि धर्म परम, तें चि तया होय संकटीं वर्म[12]. १९५
दे वदया द्वेषातें द्रुत[13] दवडुनि दूर बहु शुभ द्रव दे;
'नांदा एकत्र सुखें भ्राते' ऐसें चि दिति सुभद्र[14] वदे. १९६
'[15]वा ढं' म्हणोनि नाकीं ने दितिचे शक्र ते मरुत्तनय,
शिकले गुरूक्त, जैसा श्रीसंवर्तोक्त[16] तो मरुत्त[17] नय. १९७

१. इंद्रानें तिच्या पोटांतील गर्भाचे सात तुकडे केले. २. पुन्हां त्या साताचे प्रत्येकीं साताप्रमाणें एकुणपन्नास तुकडे केले; हे च मरुद्गण होत. ३. मूर्छित होई. ४. मारून टाकी. ५. क्रूराचें. ६. प्रथम चि उदरीं जसे—**पंत.** ७. एक उणें. ८. विपत्ति पावलेल्यास. ९. इंद्र. १०. चंद्रासारखा. ११. दितीनें इंद्रावर कृपा केली ही विघडलेली घडी. १२. कवच. १३. सत्वर. १४. उत्तम मंगळ. १५. वरें. १६. श्रीसंवर्तऋषींनीं सांगितलेला. १७. या नांवाचा राजा.

य  श अत्यद्भुत अमित प्रकटी सज्जनसुखार्थ सकलेश,
वदला तो चि 'मयूरा! तूं ही हें गावयासि सकें[1] लेश.' १९८

---

# सप्तम स्कंध.

न  रहरिचारित शुक वदे नारद सांगे युधिष्ठिराला जें,
ज्याचे रसिक कवि म्हणति, 'अमृता! तूं यापुढें जडा! लाजें.' १
मो  टा कनककशिपुचा पुत्र प्रह्लाद भागवत[2] पहिला,
जेणें न चित्रगुप्ता लाउं दिला टांक आपुला वहिला[3]. २
भ  क्त हि कनककशिपु मुनिशापांत पडुनि करी हरिद्वेष,
होय अभक्त, जसा सितगारुडमणिमंदिरीं[4] हरिद्वेष[5]. ३
ग  जयूथाधिप हरिनें, तेंवि हिरण्याक्ष मारितां हरिनें,
कनककशिपुनें अनुजस्त्रीदिति[6] समजाविल्या परोपरीनें. ४
व  ध गोद्विजवर्यांचा, उच्छेद श्रुतिमखादिधर्मांचा,
करवी असुरभटांतें आज्ञापुनि नाश पुण्यकर्मांचा. ५
ते  ज अतुळ मिळवाया, कनककशिपु दैत्य मंदरा[7] गेला,
तो श्रीहरिवरि शापें होवूनि अशांत[8] मंद[9] रागेला. ६
वा  रि[10] निषेधुनि, वात चि सेउनि, तो उर्ध्वभुज गगनदृष्टी,
पादांगुष्ठस्थित[11] तप करि, तेजें तापवी बहुत सृष्टी. ७
सु  र भिउनि कथिति विधितें, 'हरिल तव पद हि तपोनि धीर चि तो,
सर्व करिल, हे शंका अस्मच्चित्तीं तपोनिधी रचितो.' ८

---

१. शक, समर्थ हो. २. परमश्रेष्ठ भगवद्भक्त. ३. चोपडीला. (चित्रगुप्त हा यमलोकांतील एक अधिकारी असून तो प्रत्येकाच्या पापपुण्याचा हिशेब ठेवीत असतो असें मानतात). ४. पांढऱ्या गरुडपाचमण्याच्या मंदिरांत [ज्याप्रमाणें] हिरवा वर्ण ज्याचा तो [मणि]–निर्णय०. ५. वराहावतारीं याचा वध केला होता. ६. धाकट्या भावाची स्त्री व [माता] दिति. ७. मंदरपर्वताला. ८. क्षुब्ध. ९. मूर्ख. १०. पाणी टाकून. ११. पायांच्या आंगठ्यांवर उभा राहिलेला

दे[1] वज्येष्ठ प्रभु मग सानुग येउनि तयासि जों पाहे,
दितिज पिपीलिकभक्षिततनु[2] वल्मीकांत[3] झांकला आहे. ९
वा रिजभव त्यासि म्हणे, 'वत्सा! कश्यपसुता! अगा! राहो
तप, ऊठ, पुरे, घे वर, तूं वदता सुधृतिच्या अगारा हो. १०
य मनियमयत्न भारी हा, रीति असी न जाणती अन्य,
भक्षिलि तनु दंशांनीं[4] तऱ्हि असु अस्थींत वसति, तूं धन्य. ११
न गसा निश्चळ निरुदक तूं तप तपलासि दिव्य शत वर्षें,
झालासि सिद्ध; आलों मीं धाता द्यावयासि वर हर्षें.' १२
मो दउनि असें त्यातें प्रोक्षी स्वकमंडलुस्थतोयांहीं,
दिव्यस्वरूप झाला तत्काळ हिरण्यकशिपु तो यांहीं. १३
भ व्य विमानीं गगनीं पाहुनि गहिवरुनि नमुनि पणज्याला[5]
स्तवि, पावती सुखें, तप[6] बहु जरि महिवरुनि न मुनि पण[7] ज्याला. १४
ग[8] र्जज्जलदा प्रार्थी चातक, इच्छा धरूनि, तोयाची,
तेंवि विधिस वांछित वर दितिसुत अंजलि करूनि तो याची. १५
'व रदा! जीं त्वन्निर्मित भूतें व्यसु[9] सासु[10] भूमिवर, देहा
त्यांपासुनि मृत्यु नसो, न नभीं, रात्रि हि, दिसा हि, वर दे हा. १६
ते वीं च नसेल तुवां लोकत्रितयांत निर्मिलें ज्यातें
त्याच्या ही शस्त्राहीं मरण नसावें प्रभो! मला हातें. १७
बा हेरें[11] हि न घडावा मृत्यु मला आंत ही नसावा हो!
तुमचा वरप्रसादामृतनद मजवरिं सदा असा वाहो. १८
सु रवर्या! ज्यां व्हावें अप्रतिभट[12] संगरांत, जे देही

---

१. देवांत वडील असा—ब्रह्मदेव. २. मुंग्यानीं भक्षिला आहे देह ज्याचा असा. ३. वारुळांत. ४. डांसानीं. ५. ब्रह्मदेवाला. ६. पुष्कळ तप जरि नाहीं पण (परंतु) पृथ्वीवरून मुनि ज्याला पावतात. ७. परंतु—**पंत.** ८. गर्जना करणाऱ्या मेघाला. ९. गतप्राण. १०. सप्राण. ११. [त्रैलोक्याच्या] बाहेर. १२. ज्याला प्रतिकार करण्यास समर्थ असा योद्धा नाहीं तो.

लोकप त्या सर्वांचा पति जीस्तव शक्ति तूं मला दे ही. १९
दे महिमा जेंवि तुझा, अणिमाद्यैश्वर्य सर्व ओपावें
वरदा! वर दासा या अभिमत हे, तूं प्रसन्न हो, पावें.' २०
वा रिजयोनि म्हणे, "बा! दुर्लभ वर मागतोसि, पण तूतें
दिधले 'माग' म्हणुनि, मग कैसें स्वमुखें म्हणों 'न' पणतूतें?" २१
य द्यपि सुदुर्लभ तदपि वर देउनि जाय देव लोकेश,
झाला अतिदुःखप्रद लोकत्रयलोचनांत तो केश. २२
न क्षत्रेशादिग्रहतारागणतेज जेंवि रवि हरितो,
शक्रादिलोकपतिसुरनिकरयशस्तेज तेंवि कवि हरि तो. २३
मो टा प्रताप त्या दितिपुत्रीं च, तसा परीं असेना, कीं,
त्रिभुवन जिंकुनि निर्भय तो शतमखमंदिरीं वसे नाकीं. २४
भ जली जे सुरमुनिवर यांची सुज्ञानसिंधु राजी जी
भवविधिविष्णु निराळे करुनि म्हणे असुरसिंधुरा 'जी! जी!' २५
ग ट कारि आपण चि कनककशिपु प्रभु यज्ञभाग, दे खाया
लव हि न सुरांसि, लावी घोंटाया लाळ, तोंड देखाया. २६
व ज्रिप्रमुख सकळ सुरपाळक चिरकाळ उग्रदंडातें
सर्पातें मूषकसे भ्याले बहु त्या अतीव चंडातें. २७
ते मग जगदीशातें गेले सुर शरण, चरण आठउनीं,
दीनांच्या बंधूतें श्रम कळविति चित्तदूत पाठउनीं. २८
वा त चि भोजन ज्यांला, ऐसी कष्टा दशा सुरां आली,
त्यांतें आश्वासाया प्रभुची वाणी नभीं असी झाली. २९

---

१. राजे. २. अणिमाआदिकरून [ अष्टसिद्धींचें ] ऐश्वर्य. ३. ब्रह्मदेव. ४. त्रैलोक्याच्या डोळ्यांत केसासारखा सलणारा झाला. ५. नक्षत्रांचा स्वामी चंद्र आदिकरून ग्रह व तारे यांच्या समूहाची कांति. ६. इंद्र आदिकरून लोकपति व देव यांच्या समुदायाच्या यशाचें तेज. ७. इंद्राच्या मंदिरांत. ८. पंक्ति. ९. दैत्यश्रेष्ठाला. (सिंधुर=हत्ती). १०. भयंकर शासन ज्याचें अशाला. ११. रागीटाला.

'सु र हो! श्रुतिविप्रादिद्वेष्टा पावेल कां न नाशाला?
करितो धर्मोच्छेदक खळ पितरांच्या[1] चि काननाशाला[*]. ३०

दे इल दुःख स्वसुता, मीं नेइन तेधवां च विलयातें;
साधुद्वेषें मरण चि; गुरु हि न हयमेध वांचविल यातें.' ३१

वा क्यें प्रभुच्या 'मेला खळ' मानुनि सोडिती च उद्वेगा,
परम विचक्षण ते सुर झांकिति हृदयीं जपोनि मुद्वेगा[2]. ३२

य[3] क्षप जेंवि धनाचा, साधुत्वाचा तसा चि पति जो तो
प्रह्लाद असुरपतिसुत लज्जित ज्याच्या यशा शशी होतो. ३३

न यकोविदा तयातें शंडामर्काख्य[4] शुक्रसुत दोघे
पढविति, म्हणति, 'सुबुद्धे! दंडनयाद्याखिल[5] जनकसा हो, घे.' ३४

मो ट्या प्रेमें अंकीं घेउनियां एकदा स्वतनयातें
असुर पुसे, 'वद वत्सा! साधु,' असें; तो वदे मत[6] न या तें. ३५

भ व्यमति म्हणे, "राजा! मीं म्हणतों साधु हें च, 'सोडावें
मोहावह गृह, जावें गहनीं, हरिपादपद्म जोडावें.'" ३६

'ग हनीं हरिभजन' असें कानीं पडतां चि असुर तो हांसे,
वचके मनांत, जाणों तो मृग, सद्वाक्यवर्ण ते फांसे. ३७

व दला दैत्य, 'जपावें गुरुनीं, शिष्यानयें वडे खेद,
केला असदुपदेशें परपक्षें[9] बाळबुद्धिचा भेद.' ३८

ते गुरु पुसति तयातें, "वद वत्सा! सत्य; 'धर्म' या वेद
स्मृति साधु म्हणति; परकृत कीं तव हा स्वकृत बुद्धिचा भेद?" ३९

बा ळ अंबाळमति[11] वदे, 'नमितों मीं त्या प्रभूसि, यन्माया
मोहुनि हेतु गुरूस हि करिताहे स्वपरभेद जन्माया. ४०

सु ज्ञ प्रिय हरि होतां अनुकूळ भ्रम झडे, घडे शुद्धि,

---

१. पितरांच्या च वनाला—स्मशानाला. * वसतिस्थान. २. आनंदाच्या भराला. ३. कुबेर. ४. शंड आणि अमर्क या नांवांचे. ५. दंडनीति इत्यादि सर्व. ६. मान्य. ७. मोह उत्पन्न करणारें. ८. अरण्यांत. ९. शत्रूच्या (विष्णूच्या) पक्षानें. १०. शंडामर्क. ११ प्रौढबुद्धि.

हा अन्य, अन्य मीं हे होय [1]अभिन्नात्मनिष्ठिता बुद्धी. ४१
दे वा ज्या स्वपर म्हणति अविवेकी, [2]सत्यपा हि कविपतिला
मोह पडे, ज्या जाणों जातां, या तो चि भेदितो मतिला. ४२
वा डव हो! चुंबक[3]मणिसन्निधि घडतां जसें [4]अयं भ्रमतें,
हरिसन्निधिनें मम मन भेद तसें पावतें, पदीं रमतें.' ४३
य द्यपि तें सूक्त अमृत, तऱ्हि त्यांच्या मानिलें विष मनाहीं,
गुरुसुत कडकडुनि म्हणति, ' [5]चवथा चि उपाय, या विषम नाहीं. ४४
न ष्टनय कसा झाला दिति[6]सुतचंदनवनांत हा बाळ?
कंटकतरु व्हायाला तच्छेदक विष्णुपरशुला [7]नाळ.' ४५
मो टें [8]तर्जन करिती, आणविती भूमिदेव वेत्रास,
प्रह्लादा दाखविती भय, ज्या काळा न देववे त्रास. ४६
भ य देउनि [9]त्रिवर्गप्रतिपादक शास्त्र पढविती विप्र,
प्रह्लाद सिके, [10]सारी नियमीं कटु [11]वाढिलें जसें क्षिप्र. ४७
ग ति बरवी राजनयीं झाली हें [12]कवितनूज जाणोनीं
मातेनें भूषविला सुत भेटविती प्रभूसि आणोनीं. ४८
व सउनि अंकीं प्रेमें असुरेंद्र पुसे [13]निजांगजातातें
' वद जें गुरुपासुनि तूं उत्तम शिकलासि किमपि [14]ताता! तें.' ४९
ते व्हां प्रह्लाद म्हणे, ' श्रीहरिचें श्रवण कीर्तन स्मरण
[15]स्वार्पण, सख्य, [16]समर्चन, पदसेवन, दासता, नमस्करण, ५०
बा पा! असी नवविधा भक्ति करावी समर्पिली हरितें,
उत्तम अध्ययन जनीं सर्वाध्ययनांत मानितों तरि तें.' ५१
सु रारिपु गुरुपुत्रातें कोपोनि म्हणे, ' द्विजाधमा! [17]मदरे!

---

१. एक आत्म्याच्या ठिकाणीं निमग्न अशी. २. ब्रह्मदेवाला. ३. लोहचुंबकाचें सान्निध्य. ४. लोखंड. ५. (साम, दाम, भेद व दंड यांतील) चवथा दंड. ६. दैत्यरूप चंदनवनांत. ७. दांडा. ८. दटावणें ९ धर्म, अर्थ व काम हे तीन भाग प्रतिपादन करणारे. १०. संपवी. ११. वाढलेलें—अन्न. १२. शुक्राचा मुलगा. १३. स्वदेहापासून झालेल्याला—पुत्राला. १४. बाळा! १५. आत्मनिवेदन. १६. पूजन. १७. माझ्या शत्रो!

अरिसीं मिळुनि शिकविलें शिशुसि अहित हें असें कसें वद रे!?' ५२
दे शिकपुत्र[1] म्हणे, ' हरिशत्रो ! आम्हां न अयश ओपावें,
याची सहजा मति हे, त्वां सत्प्रभुनें वृथा न कोपावें.' ५३
वा सवशत्रु म्हणे, "हा गुरुसुत, जरि कुमति शिकविली असती
म्हणता ' चुकलों ' अशिवा वद रे! कोठूनि बुद्धि हे [2]असती?" ५४
य मसम दैत्य खवळला, प्रह्लाद न भी, म्हणे तदपि त्यातें,
' कृष्णीं मति होणें जें दुर्लभ गेहव्रतीं[3] पद पित्या! तें. ५५
न गुरूंच्या उपदेशें, न परस्परभाषणें, स्वयें ही न,
कृष्णीं होय तयांची मति, सेविति सेविलें[4] चि जे हीन. ५६
मो हित जे विषयांहीं, ते नेणति विष्णुकीर्तिचा गंध,
ऐशां विषयांधांला जे गुरु रुचती तसे चि ते अंध. ५७
भ गवद्भक्तजनांच्या चरणरजांहीं घडे न जों स्नान
हरिचरणस्पर्श मतिस तों कैंचा? याविना वृथा ज्ञान.' ५८
ग जसा मदांध दैत्य क्रोधांध हि, रीति फार ती खोटी,
[5]कोटिज्ञानिस्तुत सुतरत्न स्वांकावरूनि तो लोटी. ५९
वँ[6] क्रप्रकृति सुनिर्दय असुरेश्वर तो म्हणे, ' अरे! भट हो !
मँदहितदास[7] मदहित चि, हा तुमच्या शस्त्रमुद्गरा[8] घट हो.' ६०
ते उग्रें भृत्यें हाणिति व्हाया शत[9] चूर्ण आयुधा त्याचें;
खळ किति? न पुरेल चि हरिजननाशीं पूर्ण आयु धात्याचें. ६१
वा यां गेले नानाशस्त्रप्रकर[10]प्रहार, ते श्रमले,
गमले निर्दैवांचे उद्यमसे विफळ, खळ बहु श्रमले. ६२
सु त न मरे यास्तव बहु शंके, चिंता करी, वधा योजी
दिग्गिभ[11] भुजग विष कृत्या[12] तो, धृतहरिकवच शिशु म्हणे, ' वो जी !'

---

१. गुरुपुत्र. २. खोटी. ३. गृहस्थाश्रम्यांस. ४. सेवन केलेलें च (विषयसुख). ५. कोट्यवधी ज्ञान्यानीं स्तविलेलें. ६ वांकडा स्वभाव ज्याचा तो. ७. माझा शत्रु (विष्णु) त्याचा सेवक. ८. शस्त्ररूप मुद्गराला. ९. शत उग्र भृत्य. १०. प्रकर=समूह. ११. दिग्गज. १२. कृत्या (राक्षसी) उत्पन्न करून पाठीस लावणें.

**दे** वध्यानें न मरे गिरिशिखरावरुनि लोटिला तरि तो,
न गळे हिमांत, न जळे दहनांत, तदन्य काय हो[1]करितो? ६४
**वा** रिधिमाजि बुडविला, गर्तीं[2] हि पुरूनि कोंडिला सुचिर,
वरि गिरि हि पाडिले जऱ्हि उपवासी ठेविला तऱ्ही रु[3]चिर. ६५
**य** लशतें ही होतां पुत्राच्या वक्रपण न लव लोर्मीं[4],
असुर म्हणे, 'भ्यालों या शिशुसि; बळी शक्र पण न लवलों मीं. ६६
**नें**[5] कुतोभय शिशु पांचा वर्षांचा ही महाप्रभाव मला,
बहुधा नाश विरोधें याच्या, न च हा म[6]हाप्रभा वमला.' ६७
**मो** रासि भुजग तैसा बहु शिशुला वचकला मनीं खळ तो,
त्याला शुक्रसुत म्हणति, 'अस्थिर बाळस्वभाव तुज कळतो. ६८
**भ** य पावुनि न पळावा, अ[7]हिपाशानीं कुमार आकळुनीं,
गु[8]रु ये तों रक्षावा, चिंता कां हित उपाय हा कळुनीं?' ६९
**ग** मलें वरवें तन्मत, मान्य करुनि तो म्हणे, 'अहो! यास,
हित राजधर्म शिकवा, शिशुच्या भ्रम बुद्धिला न होयास.' ७०
**ब** हु मानुनि तें प्रभुवच पढविति ते अ[9]र्थधर्मकामगती;
भागवतधर्मरुचि ज्या त्या देइल उक्ति शर्म कां मग ती? ७१
**ते** थुनि त्याचा गुरु तो जेव्हां अन्यत्र जाय कार्याला,
क्रीडार्थ बहाति सखे त्या समयीं असुरबाळ आ[10]र्याला. ७२
**बा** ळांचें प्रेम म्हणुनि हरिचिंतनपर हि तो दयालु बरा
त्यां दे नि[11]जबोध, झटे हरिजन चि, न परहितोदया लुबरा. ७३
"**सु** ख विषयांत न कांहीं, हरिस भजा येधवां चि, 'बाळपण
सारुनि भजों' म्हणाल प्रियसख हो! वश नसे चि काळ प[12]ण. ७४
**दे** वा ह[13]रिचें चि सदा व्हावें चि असुरकुमार हो! भक्त,

१. शब्द करतो. २. खळग्यांत. ३. सुंदर, सतेज. ४. केशीं. ५. कोठून हि ज्याला भय नाहीं असा. ६. बहु छाळिला तऱ्हीं कोपला नाहीं—**पंत.** ७. सर्परूप पाशानीं. ८. शुक्राचार्य. ९. अर्थ, धर्म व काम यांचीं स्वरूपें. १०. पूजनीय (प्रह्लादाला). ११. आत्मोपदेश. १२. परंतु—**पंत.** १३. 'चें' वरील अनुस्वार हस्तदोष जाणावा?

कीं, हा या भूतांचा आत्मा ईश्वर सुहृत्प्रिय व्यक्त. ७५
वा टेल तुम्हांसि जरि श्रीकृष्ण चि एक देव जोडावा,
तरि भोगोद्यम[1] सहसा आधीं कैसा समस्त सोडावा? ७६
य लावांचुनि दैवें दुःख, तसें सुख हि देहयोगानें,
भोगोद्यमें न आयुःक्षय भगवत्कीर्तिच्या चि हो! गानें. ७७
न घडेल भजन हरिचें, तरुणपणीं विषयसाधनीं भ्रमतां,
वृद्धपणीं ही दुःसहकासश्वासाद्युपद्रवें[2] श्रमतां. ७८
मो ह स्त्रीपुत्रांचा गेहीं, तैसी च अर्थतृष्णा, तें
दुस्त्यज, या सांपडला प्राणी पावेल काय कृष्णातें? ७९
भ जतो अभिमाना जो जन, बहुमत ज्यास कामसंगर[3], हा,
बुडुनि बुडवितो, याचा त्यजुनि महामोहधाम[4] संग रहा. ८०
ग रुडध्वज सर्वांचा आत्मा आहे च सिद्ध हा, यास
भजनें प्रसन्न करितां दैत्यात्मज हो! नसे चि आयास. ८१
व सतो आत्मा, वास्तव सर्वां भूतीं दया करा नमुनी,
करिति उपाया इतरा सुखवाया या दयाकरा न मुनी. ८२
ते योगयाग न रुचति भूतदया हे जसी रुचे हरिला,
प्रभु तुष्ट इणें होतां, अर्थ कवण जड जना! मनीं धरिला? ८३
धा रिजनेत्रा[5] भावें ध्यावें, गावें सदा यशाला हो!
आम्हां इतुकें चि पुरे, धर्म इतर मोक्ष ही कशाला हो,? ८४
सु खहेतु भक्तिपथ हा श्रीनारायण[6] सुरर्षिला[7] बोधी,
तो मज, म्यां हि तुम्हांला, येणें तुमची हि हरिरता हो धी." ८५
'दे वर्षिसमागम तुज घडला कैसा?' असें मुलें पुसती,
सांगे कथा तयांतें सत्प्रेमाची च मूर्ति ती नुसती. ८६
"बा ळक हो! ज्या काळीं सुतपोनियमांत मज्जन करी [8]ती

१. विषयोपभोगाचा उद्योग. २. दुःसह अशा खोकला, दमा इत्यादि उपद्रवानें. ३. अभिलाषाचें युद्ध. ४. महामोहाचें स्थान असा. ५. कमलनयना विष्णूला. ६. नराचा सखा. ७. नारदाला. ८. ती (रीति). (माझा बाप हिरण्यकशिपु हा

मंदरगिरिची जैसी होती तैसी च मज्जनकरीती. ८७

य त्नें देवानीं त्या रंध्रीं[1] भंगूनि असुर पळवीले,
लुटिलें सर्वस्व, मुखीं अयशःकज्जळ लिपूनि मळवीले. ८८

न गभेत्ता प्रभु माझ्या मातेला धरुनि ने, तया वाटे
श्रीनारद भेटे, [2]तें अनुचित त्या साधु[3]नेतया वाटे. ८९

मो चन मन्मातेचें शक्रापासुनि करावयासि कवी
'योग्य न तूं या कर्मा,' ऐसें अयशीं तरावया सिकवी. ९०

भ्रं तों पुलोमजेचा[4] वदला, 'जठरीं इच्या अहितें[5] आहे,
त्या वधुनि इतें सोडिन, राहो जों प्रसव तों वरि च बा! हे.' ९१

ग[6] जवाहना मुनि म्हणे, 'आला आहे बळी[7] इच्या पोटा,
न मरेल चि तव यत्नें, रे! हा निर्दोष भागवत मोटा.' ९२

व चनें मुनिच्या वज्री माज्या मातेसि तत्क्षणीं सोडी,
उजवी घालुनि, हस्तद्वय भगवद्भक्त भक्तिनें जोडी. ९३

ते जस्वीश्वर नारद मज्जननीला निजाश्रमीं रक्षी,
'पति ये तों स्वस्थ रहा' ऐसें सांगे, सुतापणें[8] लक्षी. ९४

'बा! गर्भ क्षेम असो, पति आल्यावरि सुखें प्रसव हो,' हें
मागे वरद्वयं, तिला मुनि दे, आंदण जसें दिजे मोहें[9]. ९५

सु रमुनिवर तो मातें उद्देशुनि तत्व सर्वधर्मांचें,
ज्ञान हि दे, ओखद जें कर्मांचें, हेतु[10] नित्य शर्मांचें. ९६

दे वर्षिदत्त वयुन[11] स्त्रीत्वें झालें तिचें तिरोहितें[12] हो!
माझें तसें चि आहे, तुमचें ही यांत सन सिरो, हित हो." ९७

बा ळांसि असें अभिमुख करुनि प्रह्लाद आपल्यासि कवी

---

सागरांत निमग्न झालेल्या मदराचलाप्रमाणें जेव्हां तपश्चर्येंत आणि नियमांत निमग्न होता. तेव्हां मला नारदाची भेट घडली असें तात्पर्य ).

१. [ लक्षणेनें ] गैरसावधगिरीच्या समयांत. २. इंद्राने मातेला धरून नेणें. ३. साधूंच्या नायकाला. ४. इंद्र. ५. शत्रु. ६. इंद्राला. ७. बलाढ्य. ८. कन्याभावानें. ९. प्रेमानें. १०. कारण. ११. ज्ञान. १२. आच्छादित.

ज्ञान तसें निववाया चित्ता त्यांच्या हि तापल्या सिकवी. ९८
य श हरिचें अमृताधिक जें, गाया लाविले कुमार हि तें,
यद्रु[1]चिसत्कृतिरहितें व्हावें न, अजें जसें कुं[2]मा[3]रहितें. ९९
नें[4] ष्टधृति त्रस्त गुरु प्रभुला, कळतां चि वृत्त तें, कळवी,
तो असुरेश्वर परमक्रोधें वदना यशास ही मळवी. १००
मो ठ्या क्षोभें दितिसुत पुनरपि तद्वध चि मानसीं आणी,
त्या साधुप्रह्लादा श्रवणा[5]योग्या असी वदे वाणी. १०१
भ स्म कराया पाहे पादाह[6]त दृ[7]ष्टिविष जसा साप,
बाप क्षोभे अरिहुनि कोटिगुणें, कीं मनीं महा पाप. १०२
ग र्जोनि म्हणे, 'मंदा! लंघिसि मच्छासन[8]स्वसेतूतें,
कुलभेदकरा! अधमा! अविनीता! कोण बळ असे तूतें?' १०३
ब द्धांजलि साधु वदे, "माझें चि नव्हे, तुझें हि बा! बळ तो,
ब्रह्मादि सर्व हि बळी कर जोडुनि ज्या महेश्वरा वळतो. १०४
ते जस्वी परमेश्वर सृष्टिस्थितिविलय कौतुकें करितो,
बापा! अजितें[9] तव मन चि तव शत्रु, नव्हे चि निश्चयें हरि तो. १०५
वा यां चि गर्व धरिती किति, 'आपण जिंकिल्या दिशा' म्हणती,
न जिणुं[10]नि देहींचे जे लाविति[11] कामादि चोर सा खणती[11]. १०६
सु ज्ञ जन जिंकितो मन जो सम सर्वत्र साधु लोकांत,
स्वाज्ञानकल्पित[12] अहितें[12] कैंचे त्या घालणार शोकांत?" १०७
दे वारि म्हणे, 'मंदा! स्वच्छंदा! मरणकाम तूं स्पष्ट,
कष्ट प्रार्थिसि, भलतें बडबडसी धर्मनयपथभ्रष्ट. १०८

---

१. ज्याच्या (ज्या हरीच्या यशाच्या) रुचीचा सत्कार ज्याला झाला नाहीं त्यानें. २. पृथ्वी—**पंत.** ३. लक्ष्मी—**पंत.** ४. भय पावलेला. ५. ऐकण्यास अनुचित. ६. पायानें ताडला गेलेला—स्पृष्ट झालेला. ७. दृष्टींत विष आहे ज्याच्या असा. ८. माझी आज्ञा तद्रूप आपल्या मर्यादेला. ९. न जिंकलेलें. १०. जिंकून. ११. (पाळेंमुळें खणून नाश करणारी) खणती लावतात. १२. स्वतःच्या अज्ञानानें कल्पिलेला शत्रु.

वा क्यें अनन्वितें हीं दुष्टें आसन्न[1]मरणसा वदसी,
मद सीमातिगें[2] हा, या तुजसह खाया बळी असे मद्[3]सी. १०९
य ज्ञांचा भोक्ता मीं जगदीश्वर, मच्छिरीं पदन्यास[4]
करुनि, स्तविसी भजसी तूं ज्या जगदीश्वरा मदन्यास[5], ११०
नं [6]ष्टप्रज्ञा! वद रे! कोठें जगदीश तो तुझा आहे?'
प्रल्हाद म्हणे, 'मत्प्रभु सर्वत्र, ज्ञान[7]दृष्टि या पाहे.' १११
मो हांध म्हणे, 'तरि कां स्तंभीं न दिसे? भयें दडालाहे?
तो जगदीश्वर काय? स्तवुनि कवण हित तशा जडा [8]लाहे?' ११२
भ क्त म्हणे, 'तव गुरु[9]गुरुगुरु करि ज्या यजनयाजनांदिस[10] तो
हा या स्तंभीं, करितां तत्स्मृति हें भजन, यां[11] जनां[11] दिसतो.' ११३
ग जसा गर्जोनि म्हणे, 'मीं तव शिर स[12]भवदीशमद हरितों.'
[13]कलितासिमुष्टिनें तो ताडी स्तंभासि, गर्जला [14]हरि तों. ११४
[15]वं नदायुतकोटितटित्पद्मार्बुदगर्जनादिगुरुनादें
मानिति निजधामलय ब्रह्मादि हि [16]तद्दयानदीयादें. ११५
ते व्हां सभेंत न दिसे, तरि दितिसुत तो चहूंकडे पाहे,
तों त्या स्तंभीं च न नर न मृग असें तेज कोंदलें आहे. ११६
वा क्य त्रिजगामध्यें जगदीश करावया [17]स्वदासाचें
अत्युद्भुत रूप धरी स्वव्यापकपण हि, तो तदा साचें. ११७

---

१. जवळ आलें मरण ज्याचें त्यासारखा. २. मर्यादा उल्लंघून जाणारा. ३. माझें खड्ग. ४. पायांचें ठेवणें. ५. माझ्याहून दुसऱ्यास. ६. हे नष्टबुद्धि! ७. ज्ञान हीच दृष्टि ज्याची तो. ८. मिळवितो. ९. गुरूचा गुरु (ब्रह्मदेव) त्याचा गुरु–विष्णु. १०. यजन (स्वतः यज्ञ करणें) याजन (आचार्य होऊन यजमानासाठीं यज्ञ करणें) इत्यादींला. ११. (भजन करणाऱ्या) मला. १२. तुझ्या ईश्वराच्या गर्वासह. १३. धरलेली जी तरवारीची मूठ तिनें. १४. विष्णु. १५. हजारों मेघ, कोट्यवधि विजा, पद्मावधि मेघगर्जना इत्यादींच्या मोठ्या नादानें. १६. त्याच्या (नरसिंहाच्या) दयारूप नदींतील जलचर. १७. आपल्या भक्ताचें (प्रल्हादाचें).

सु रारिपु म्हणे, 'अहो! हा न मृग, न नर, काय हें विचित्र? कसें
झालें स्तंभांतूनि प्रकट महानरमृगेंद्ररूप असें?' ११८
दे दीप्यमान [1]भीषणतम [2]नमदमरेंद्र [3]योगिवरगीत
[4]ऱ्हीत जया काळ अशा रूपा झाला न तो दितिज भीत. ११९
[5]बा हुसहस्रधृताद्भुतचक्रकुलिशमुखमहायुधा त्यातें
पाहुनि असुरबळ पळे, दैत्या [6]वरसुखमहायु धात्यातें. १२०
य द्यपि तेज सुदुःसह, तदपि म्हणे असुरवर्य, 'मायावी
हा हरि नरहरि झाला, विजयश्री मद्वधें न या यावी.' १२१
न रहरिवरि अरि धांवे गरगर फिरवित महागदा, त्यातें
प्रभुतेज लोपवी, बहुदात्याचें जेंवि अल्पदात्यातें. १२२
मो टा [7]धृष्ट महासुर, रविस हि न जयाकडे पहावे, गा!
त्या प्रभुतें जवळि भिडुनि सहसा हाणी गदा महावेगा. १२३
भ गवान् नरहरि [8]अरितें धरि तेंवि, खगाधिपति जसा अहितें,
प्रभुच्या हस्तापासुनि परि सोडुनि घेतलें चि त्या अहितें. १२४
ग रुडें सुटला अहिसा, प्रभुनें [9]असिचर्मधर पुन्हां धरिला,
चळबळ जरि करि अरि तरि हरिनें बळवेग सर्व ही हरिला. १२५
[10]वं ज्राक्षतत्वचातें द्वारीं दडपुनि [11]निजोरुवरि पाडी,
झाडी मदगद, त्याचें प्रभु नखराहीं च उग्र उर फाडी. १२६
ते [12]पविगुरु नख देती यश कृतफळदान [13]कोविदां राया!
प्रभुसि परा उशिर जसा वाता [14]जळदा नको विदाराया. १२७
[15]वा रणयूथपति च तो त्या नरहरिनें विदारिला पहिला,

१. अत्यंत भयंकर. २. नमस्कार करताहेत देवेंद्र ज्याला असें. ३. योगिश्रेष्ठांनीं गाइलेलें. ४. लाज्जित. ५. हजार भुजांनीं धरिलीं आहेत अलौकिक चक्र (सुदर्शन) व कुलिश (वज्र) प्रमुख मोठीं शस्त्रें ज्यानें अशाला. ६. श्रेष्ठ सुख, उत्सव व आयुष्य. ७. उन्मत्त. ८. शत्रु हिरण्यकशिपूनें. ९. तलवार व ढाल धरणारा. १०. वज्रानें अक्षत (भंगली नाहीं) त्वचा ज्याची त्याला. ११. आपल्या मांडीवर. १२. वज्राहून मोठे (तीक्ष्ण). १३. चतुर अशा. १४. मेघाला. १५. गजांच्या कळपाचा नायक.

मग रदपदनखरांहीं तद्यूथ[1] हि हर्षवावया महिला. १२८

**सु** भट दिसेना, केला क्रोधाच्या प्रसर फार आवेशें,
ओवाळुनि सांडावे प्रभुच्या नेत्रांवरूनि आवे[2] [3]शें. १२९

**दे** व नृसिंह प्रभु मग बसला सिंहासनीं स्वभक्तांच्या[4],
तो अरुणवदनकेसर[5] बिंदूनीं निहतदैत्यरक्ताच्या[6]. १६०

**वा** रिधि[7] ज्याच्या श्वासें खळबळले, सूर्य जन्हि महातेजा,
भासे निष्प्रभ, मानिति दिनहिमकर[8] जन नभीं पहाते ज्या. १३१

**य** द्यपि भक्त, सकळ सुर भ्याले, प्रभुच्या पुढें नये कोणी,
श्रीदृष्टि[9] म्हणे प्रीतिस, 'बसल्यें नेत्रांचिया सये! कोणीं.' १३२

**न** रसिंहावरि करिती सुरकुसुमांच्या सुरस्त्रिया वृष्टी,
विधि शिव सरकति मागें, करि जेव्हां प्रभु तयांकडे दृष्टी. १३३

**मो** टा उत्सव सर्वा, वाजविलीं दानवारिनीं[10] वाद्यें,
गाती नाचति दूर चि, कीं व्हावें सुप्रसन्न त्या आद्यें[11]. १३४

**भ** गवंतातें स्तविती ब्रह्मादि समस्त, परि तयाजवळ
जाया कोणी न शके, वाटे प्रभु करिल आपुला कवळ. १३५

**ग** डबडली पाहोनि श्री हि अदृष्टश्रुतोग्ररूपातें[12],
प्रभुचें कोपप्रशमन सर्वांसि गमे अशक्य भूपा! तें. १३६

**व** र भक्त प्रह्लाद स्वनिकट होता, तया म्हणे धाता,
'तव जनकावरि झाला क्षुब्ध प्रभु, शमिव तूं चि, जा तोता[13]!' १३७

**ते** व्हां प्रह्लाद महाभागवत हळू च हरिकडे जाय,

---

१. त्याचा ( त्या गजाचा—हिरण्यकशिपूचा ) कळप ( अनुचर ). २. कुंभार वगैरे लावतात त्या भट्ट्या. ३. शेकडों. ४. हिरण्यकशिपूच्या. (जय व विजय ह्या विष्णु-भक्तांचे अवतार हिरण्यकशिपु व हिरण्याक्ष होत). ५. लाल झालें आहे मुख व जटा ज्याच्या. ६. मारलेल्या दैत्यांच्या रक्तांच्या. ७. समुद्र. ८. दिवसाचा चंद्र. ९. लक्ष्मीची दृष्टि. १०. दैत्यशत्रूंनीं—देवानीं. ११. विष्णूनें. १२. पाहिलें व ऐकिलें नाहीं अशा भयंकर स्वरूपाला. १३. मागें ४९ वी गीति पहा.

पाय प्रभुचे वंदी; हरिभय हरिबाळकासि हो! काय? १३८
वा त्सल्यें प्रभु उठवी, ठेवी प्रह्लादमस्तकीं पाणी,
काळ 'न पाहीन[1]' म्हणुनि सोडी घेवूनि हस्तकीं पाणी. १३९
सु[2] समाहित तो भावें श्रोतृजनमनीं नुरावया खेद,
प्रभुसि महाभागवत प्रह्लाद कवि स्तवी जसा वेद. १४०
दे व प्रसन्न झाला, निववाया स्वपदपद्मसद्[3]तें!
'माग' म्हणे 'प्रिय वर मज, वत्स! प्रह्लाद! भद्र[4]! भद्रं[5] [6]ते.' १४१
बा ळ प्रह्लाद वदे प्रार्थूनि, करून कोमळा वाणी,
'निष्कामा कामवरें लोभवुनि करूं नको मला वाणी[7]. १४२
य ज्ञेशा! कामांचा उद्भव चित्तीं नसो असा याला,
देणें तरि वर दे; हा वांछी पादांबुजीं वसायाला.' १४३
न रहरि म्हणे, 'बुध[8] वरिति मुक्ति हि न त्यजुनि भक्तियोगातें,
तर्‍हि तूं असुरेश्वर हो, मन्वंतरमात्र भोग भोगातें.' १४४
मो[9] क्षकरस्मरणातें प्रह्लाद म्हणे, "प्रभूत्तमा! गमला
वरदानपात्र जरि हा, म्हणसि स्वमुखें 'प्रभूत[10] माग' मला, १४५
भ क्ता या वर दे हा, केली निंदा तुझी हि मत्तातें,
मज तव दासा छळिलें, पूत करीं या अशा हि मत्तातें." १४६
गं[11] जरिपुवदन वदे, 'बा! मीं श्रितकल्पद्रु, काम हा साधो,
त्वत्तात पूर्वजांसह पूत न होईल कां महासाधो!? १४७
व पुला ज्याच्या माझा स्पर्श असा त्यास काय गा! ताप?
बाप तुझा शुचि; हें किति? न उरेल जनीं तुझ्या यशें पाप.' १४८
ते जातें आवरुनि प्रभु होतां सुप्रसन्न, सुरस हितें[12]
प्रह्लादासीं वदतां ब्रह्मा विनवी तयासि सुरसहित. १४९

---

१. तो अमर होता, असा भावार्थ. २. चांगला समाधानयुक्त. ३. आपल्या पदकमलीं उत्तम विसावा ज्याला अशा. ४. हे मंगल! ५. कल्याण. ६. तुझें. ७. वैश्य. ८. ज्ञाते. ९. ज्याचें स्मरण मोक्षकर आहे त्याला. १०. पुष्कळ. ११. सिंहाचें मुख ज्याला तो. १२. कल्याणकारक.

“वा त्सल्य प्रह्लादीं प्रभुनें केलें अनंत, विश्वास
  स्वपदीं अचळ बसविला दासांचा, तारिलें चि विश्वास. १५०
सु रारिपु वरमत्त सुरां कां मारुनि हाक दापिना? मरता
  न प्रभुवांचुनि, कळलें म्हणु देसि न ‘हा!’ कदापि नामरता.” १५१
दे व म्हणे, ‘ऐसें वरपय पाजावें न असुरसर्पातें,
  [1]दर्पातें पावेना जो, त्या जें काय इष्ट अर्पा तें. १५२
वा र्ता ही मत्तांच्या सन्नयनांतें हि करिति रोहितें[2] हो!’
  ब्रह्मादिकांसि ऐसें हित शिकवुनि होय हरि [3]तिरोहित हो!. १५३
य मवरुणधनदशक्रप्रमुखसकळलोकपाळसुरसिद्ध
  त्यांसह विधि [4]अभिषेचुनि कारि त्या [5]अनळा जसा [6]अनिळ इद्धँ[7]. १५४
न रहरिभक्तासि सकळ पुसुनि [8]तदर्चित निजस्थळा गेले.
  त्या सुयशोमृतनिधिचे कण हे गोळा [9]सुदुर्बळें केले. १५५
मो टें भाग्य तुझें त्या प्रह्लादाच्या परीस ही, धर्मा!
  कीं [10]त्वन्मातुलसुत तो प्रभु बा! या तव गृहीं करी कर्मा. १५६
भ गवान् यासम हा चि स्वाश्रितहृदयासि बहु करी मुदित,
  रुद्रयश मयें हारिलें, केलें येणें चि तें पुन्हां उदित. १५७
ग ति सर्वत्र जयांची, कनकरजतलोहमय पुरें तीन
  रचिलीं मयासुरानें, केले शक्रादि सर्व ही दीन. १५८
[11]व सुरेत्यातें जाउनि शरण म्हणति, ‘सर्वपाळका! पावें,
  यश बुडविलें परानीं, अहिनीं न च गरुडबाळ कापावें.’ १५९
ते सुर सर्व निवविले ‘मा भै[12]’ असें म्हणोनि, मग चापीं
  जोडुनि अस्त्र त्रिपुरीं सोडी, [13]तन्नाम बुध जसा पापीं. १६०
बा णापासुनि बहु शर विविध निघुनि त्या पुरत्रयीं पडले,

---

१. गर्वाला. २. लाल. ३. आच्छादित, गुप्त. ४. राज्याभिषेक करून. ५. अग्नीला. ६. वारा. ७. प्रदीप्त. ८. त्यानें (प्रह्लादानें) पूजित. ९. अत्यंत अशक्तानें (मोरोपंतानें). १०. तुझ्या मामाचा मुलगा (श्रीकृष्ण). ११. द्रव्य हें च वीर्य ज्याचें त्याला (महादेवाला). १२. भिऊं नका. १३. त्याचें—महादेवाचें—नाम.

रविमंडळांतुनि जसे कर[1] परमर्मस्थळीं च ते जडले. १६१
सु रशत्रु मयासुर तो, व्यसु पडले स्वप्रवीर जे त्यांतें
सिद्धामृतरसकूपीं बुडउनि उठवी अमर्त्यजेत्यांतें[2]. १६२
दे व वृषध्वज[3] होतां तें पाहुनि खिन्न, ज्यासि जग गाय,
वत्स विधि करुनि, आपण होय श्रितसर्वकल्पनग गाय. १६३
बा! पीतपट प्रभु तो गोरूपें जाय जे स्थळीं वापी.
पापी असुर न जाणति, न च वारिति, रस अशेष भूपा[4]! पी. १६४
य त्न न पुरतां, नेदी मान विवेका असा रसास[5] मय,
असुरांसि सारसुगतिद[6] परि तो वाटे असारसा[7] समय. १६५
न वल महिरथादि[8] सकळ संगरसाहित्य करुनि, जयशाली
केला शंभु प्रभुनें, पिकवितसे हा चि मुदिर[9] जयशाली[10]. १६६
मो क्षद[11] धर्म कवि[12] कथी, ज्यांहीं सुज्ञान भक्ति हि श्रीशीं,
न सुधेसीं हि वदे सुरमुनिगी[13], बोलेल काय मिश्रीसीं[14]? १६७
भ गवान् वेदमयहारे, स्मृति, तिसरी तज्ज्ञसन्मनस्तुष्टी[15],
हें त्रिविध मूळ, येणें आहे स्थिति धर्मपादपा[16] पुष्टी. १६८
ग णिलीं सत्य दया तप इत्यादिक धर्मलक्षणें तीस,
शौच[17] तितिक्षा[18], युक्तायुक्तविचार हि रुचे सुजनधीस. १६९
व र शम, दम हि, अहिंसा, स्वाध्याय[19], ब्रह्मचर्य हि त्याग,
आर्जव[20], संतोष महत्सेवा[21], येणें प्रवृत्तिचा राग. १७०
ते वीं च पाहणें जें होती विफळा क्रिया जनीं त्यांचें,
व्यर्थ न वदणें, देहाहुनि आत्मा भिन्न जाणणें साचें. १७१

---

१. किरण. २. देवाला जिंकणाऱ्यांला. ३. शंकर. ४. हे परीक्षित! ५. अमृतरसाला. ६. श्रेष्ठ व चांगली अशी मति देणारा. ७. तुच्छसा. ८. भूरथ आदिकरून. ९. मेघ. १०. जयरूप धान्यविशेष. ११. पाठांतर–**मोदद.** १२. नारद–**पंत.** १३. नारदवाणी. १४. खडीसाखरेबरोबर. १५. त्याला–भगवंताला–जाणणाऱ्याचा चांगला मनाचा संतोष. १६. धर्मरूप वृक्षाला. १७. शुद्धता. १८. सहनशीलता. १९. उचित मंत्रांचा किंवा वेदांचा अभ्यास. २०. सरळपणा. २१. साधूंची सेवा.

वा टुनि देणें अन्नादिक [1]भूतांकारणें, महाशुद्धी,
जेणें तसी च सर्वां भूतीं ही आत्मदेवताबुद्धी. १७२
सु खहेतु श्रवणादिक नव भक्ति मिळोनि लक्षणें तीस,
हा धर्म मनुष्यांचा जी परमा सिद्धि दे [2]पणें तीस. १७३
दे ते जे वर्णाश्रमधर्म सुखें सेवित्या जना शुद्धी,
कथिले नारदमुनिनें ज्यांहीं लागे स्वचिंतनीं बुद्धी. १७४
वा खाणावे किति ते म्यां विस्तरभीरुनें? [3]जयां न मन
विसरे क्षण हि कवींचें, केलें साष्टांग हें तयां नमन. १७५
य तिधर्म प्रह्लादा कथिला अत्यंत सार [4]अवधूतें,
पावे भक्तमयूरश्रुति जें तेणें, प्रियें हि न वधू तें. १७६

---

# अष्टम स्कंध.

न रनाथ! स्वायंभुव पहिला, स्वारोचिषाख्य मनु दुसरा,
तिसरा उत्तम, तामस चवथा, यद्यश [5]हंसे [6]सुधासुसरा. १
[7]मो क्ष गजाचा [8]ग्राहापासुनि मन्वंतरां तया केला,
श्रीहरि अत्यार्ताच्या अतिसत्वर पावला चि हाकेला. २
भ व्य क्षीरसमुद्रीं हेमरजतलोहशिखर रत्नमय
नग [9]अयुतयोजनोच्छ्रय, ज्यासि [10]लिहों न पटु, करुनि यत्न, मय. ३
ग जराज त्या [11]त्रिकूटीं होता, त्या अद्रिची [12]महाद्रोणी
तेथें ऋतुमन्नामक [13]जलनाथोद्यान शोभवी [14]क्षोणी. ४
व रुणाच्या उद्यानीं होतें शुभ साधुहृदयसें सुसर,
त्यांत क्रीडा करितां चरणीं त्या करिवरा धरी [15]सुसर. ५

---

१. प्राणिमात्रासाठीं. २. प्रतिज्ञनें. ३. ज्या वर्णाश्रमधर्माला. ४. एका अजगर-वृत्ति संन्याशानें. ५. लाजवी. ६. अमृताच्या उत्तम सरोवराला. ७. सुटका. ८. सुसरापासून. ९. अयुत योजनें उंची असलेला. १०. लिहावयास. ११. पर्वतावर. १२. मोठी गुहा. १३. वरुणाची बाग. १४. पृथ्वी. १५. आर्य-पंत.

**ते** जस्वी वारणवर झटला द[1]शशतसमा समग्रा हा,
बहु थकला, न च शकला झाडाया त्या यमासम ग्राहा. ६
**वा** रणपतिस सराच्या तो ग्राह निघों न दे चि बाहेर,
त्या सर उत्साहप्रद, कन्याप्रेम्यासि जेंवि माहेर. ७
**सु** टका व्हाया त्याची [2]गजगजिनीकलभयूथ तें झटलें,
[3]घटलें यत्नशत करुनि, मागें त[4]द्दळ तसें चि तें हटलें. ८
**दे** वातें चि शरण तो जाय, म्हणे संकटांत सिं[5]धुर 'हा!'
झाला दुर्बळ समरीं म्हणतां दिगि[6]भासि शक्तिसिंधु 'र[7]हा'. ९
**वा** रिज धरुनि, क[8]रातें कष्टें उचलूनि बैसतां झोले
स्तवुनि विलोकुनि गरुडीं, 'नारायण! ते नमोऽस्तु' हें बोले. १०
[10]**यँ** ववज्रांकुशजलजध्वजचिह्नित पादपद्म आठविलें,
तों ये आपण चि प्रभु पा[11]र्षदबळचक्र ही न पाठविलें. ११
[12]**नं** भसंगमवर गरुड त्यजुनि, प्रभुवर उडी च घाली हो!
ऐशा सदया स्मरतां भस्म जनाची न कां अँ[13]वाळी हो? १२
**मो** [14]लेंकरीसे लो[15]कप, तात चि पाँ[16]हुनि मुलास कळकळतो,
तैसा हरि च, कवि म्हणति, 'देवा! प्रेमीं[17] तुला सकळ कळतो.' १३
**भ** गवान् उडी च घालुनि काढी बाहिर गजा अँ[18]नुग्रा हा
पायीं मिठी जयाची त्यासह त्या ही मँ[19]हातनु ग्राहा. १४
**ग** जचरण स्वकरें अँ[20]रिपाटितनक्राननामधुनि काढी,
त्या दोघांचा ही करि उद्धार; प्रभुदया बहुत गाँ[21]ढी. १५

---

१. दहाशें वर्षें. २. हत्ती, हत्तीण व छावे ह्यांचा समूह. ३. कमी झालें. ४. त्याचा परिवार. ५. हत्ती. ६. दिग्गजास. ७. थांब. ८. सोंडेला. ९. मूळ पाठ— **भो! अखिलगुरो! भगवन्!** १०. यव, वज्र, अंकुश व मकरध्वज यांनीं चिह्नित असें. ११. सेवकाचें सामर्थ्य किंवा सुदर्शन ही. १२. पक्षिश्रेष्ठ. १३. पापपंक्ति. १४. मजूरदारासारखे. १५. इंद्रादि लोकपाल. १६. कष्टतें असें—**पंत**. १७. भक्ति. १८. सौम्या. १९. मोठें आहे शरीर ज्याचें अशा. २०. चक्रानें मो० केलेल्या सुसराच्या तोंडांतून. २१. अगाध.

**स्व**[1] रूप ग्राह धरी, हूहू गंधर्व तो, तया शाप
देवलमुनिचा होता, भगवत्स्पर्शें चि जाय तें पाप. १६
**ते** जित[2]चक्रकरातें वर्णुनि वंदूनि जाय निजलोका,
देउनि सा[3]रूप्य गजा कुरवाळी प्रभु, जसा जनक तोका. १७
**वा** घरवपुष्पवृष्टिस्तुति विधिमुख देव पितरजन करिती,
[4]धरिती सदयपणाची देवाहुनि रीति इतर जनक रिती. १८
**सु** कृती पहिला राजा तो इंद्रद्युम्न, राज्य सोडून,
आश्रम करुनि कुलनगीं होता हरिची च भक्ति जोडून. १९
**दे** वातें पूजित जितचित्तेंद्रियवर्ग पांड्य तो होता,
सुव्रतनियमीं जपतां देवें दिधला तशास ही गोता. २०
**वा**[5] र्धिप्राशन करिता [6]भगवान् ये त्या नृपासि देखाया,
जो जनु[7]पासुनि सुनिपुण[8]गुण सुतनु तपोनळासि दे खाया. २१
**य** मनियमैकपर नृपें[9] प्रत्युत्थानादि सत्क्रिया चुकला,
'स्तब्धा[10]! मदांध गज हो' घटज म्हणे, योगसिद्धिला मुकला. २२
**न** त होता प्रभुचरणीं, म्हणुनि [11]प्राणात्ययीं हरि स्मरला,
सरला शाप, श्रीहरिपार्षद[12] झाला, भवार्णवीं तरला. २३
**मो** टा प्रसाद करि हरि, 'तुज मज गायील तो तरेल' वदे,
म्हणुनि सुकवि म्हणति, 'तुझ्या कीर्तिसुधासिंधुचा [13]हरे! लव दे'. २४
**भ** गवान् [14]शुभ्रविकुंठासुत तो वैकुंठ, जो हरी शोक,
श्रीस्तव[15] कल्पी[16] स्वभिध[17] रैवतमन्वंतरीं महालोक. २५
**ग** रुडध्वज संभूतीवैराजप्रभव[18] तो अजितनामा

---

१. उत्तम स्वरूप. २. तेजयुक्त असें चक्र ज्याच्या हातांत आहे त्यानें (कृष्णानें). ३. सारूप्य नांवाची मुक्ति. देवतेचें व भक्ताचें रूप सारखें होणें हें सारूप्य. ४. व्यर्थ धरितात. ५. समुद्राचें प्राशन. ६. अगस्त्य ऋषि. ७. जन्मापासून. ८. उत्तम गुणवान्. ९. इंद्रद्युम्नराजा. १०. गर्विष्ठा! ११. मरणकाळीं. १२. श्रीहरीचा सेवक. १३. हे विष्णो! १४. शुभ्र व विकुंठा यांचा पुत्र. १५. लक्ष्मीकरितां. १६. निर्माण करी. १७. आपल्या नांवाचा (वैकुंठ). १८. संभूती व वैराज यांचा मुलगा.

दे अमृत[1], करि सुरांच्या चाक्षुषमन्वंतरीं सफळ कामा. २६
ब हु दुर्वास:क्षोभें झाले निश्रीक[2] तीन ही लोक,
असुरहत सुर न उठती, इंद्रादि समस्त पावले शोक. २७
ते विधिला विनविति, मग जाय तयांसह चि तो हरिपदा[3] त्या,
जेथें सरूप होउनि गातो या मुक्तिच्या करिप[4] दात्या. २८
वा रिजनाभ प्रभुतें कळवी स्तुति करुनि बहु विधाता [5]तें,
कीं, शरण आलियांची हरिली च विपत्ति बहुविधा तातें. २९
सु रपरिपालक भगवान् प्रकटे ब्रह्मादि जे तदादिपती[6],
तों विधिभवेतरांचीं[7] प्रभुतेजें लोचनें तदा दिपती. ३०
दे वांतें देव म्हणे, 'आहें चि सहाय मीं तुम्हां जाणा,
संधि करा असुरांसीं, सर्पाखुन्याय[8] मानसीं आणा. ३१
वा सुकिला नेत्रं[9] करा, क्षीराब्धिमथनार्थ मंदरा मंथा[10],
ओषधि घाला, घुसळा हा अमृतप्राप्तिचा धरा पंथा. ३२
य त्न सफळ करिन, जरामरणहर अमृत तुम्हांस पाजीन,
मीं स्वजना तेंवि जपे, न धना लोभी, सुता न वा जीन. ३३
न विषा भ्यावें सुर हो! म्हणतिल जें असुर तें चि परिसा हो!
तुमचें चित्त खवळतिल बहु कामक्रोधलोभ, परि साहो. ३४
मो हुनि असुरांतें, मीं तुमचें चि करीन सर्वथा कार्य,
अमृतें तुम्हांसि सुयशें तर्पुनि, बहु हर्षवीन मीं आर्य!.' ३५
भ गवान् यापरि सिकवुनि अंतर्हित[12] होय; आत्मभू[13] शर्व[14]
निजधामातें गेले, बळिच्या भेटीस देव ते सर्व. ३६

---

१. या अजितानें देवांला समुद्रमंथन करून अमृत दिलें. २. ऐश्वर्यरहित. ३. वैकुंठलोकाला. ४ गजेंद्र. ५. संकट–**पंत**. ६. ब्रह्मदेवादि जे देव त्यांचा स्वामी. ७. ब्रह्मदेव व शंकर यांहून इतरांचीं. ८. सर्प आणि उंदीर यांचें परस्पर-वर्तन. (पेटींत कोंडलेला साप प्रथम उंदराशीं मैत्री करतो व नंतर बाहेर निघाला म्हणजे त्याला च खाऊन टाकितो, तद्वत्). ९. रज्जु–**पंत**. १०. रवी, माथ्या. ११. तारा. १२. गुप्त. १३. ब्रह्मदेव. १४. शंकर.

ग ज पाहुनि सिंह तसे, उठुनि म्हणति, '[1]भाव कळिव' देवारी,
सुरकदनोद्युक्तासुरवीरांतें नीति बळि वदे, वैरी. ३७

ब ळि सदना आल्यांतें बहु सत्कारी, न होय तो [2]वक्र,
[3]असुरेंद्रासीं सख्य प्रभुशिक्षितसन्नयें करी शक्र. ३८

ते सुर असुर मिळाले, मथन क्षीराब्धिचें तयां रुचलें,
जे त्रिपुरवासि शंबर इत्यादि रि म्हणति 'हें भलें सुचलें.' ३९

वा हुनि मंदर नेतां मार्गीं ते देव दैत्य ही थकले,
[4]चुरले, पडला [5]नग मग कनकमय न चाळवावया शकले. ४०

[6]सु च्छदरथ ये, एकें हस्तें चि नग स्ववाहनावरि घे,
[7]गगनीं महार्णवीं अवलंबुनि जेंवि प्रवाह नाव रिघे. ४१

दे व क्षीरधितीरीं जावुनि उतरी [8]सलील मंदर तो,
करि तो हरि चरितामृत, कीं, विषयविष त्यजूनि मंद रतो. ४२

[9]वा सुकि वेढुनि गिरिला आरंभिति दुग्धराशिचें मथन,
झाला [10]मुखाकडे प्रभु, यच्चरिताचें हरी मना कथन. ४३

य द्यपि हित करि हरि, तरि अरि [11]परिहरिती भुजंगपुच्छातें,
होती मुखाकडे हो! म्हणति, 'स्पर्शेल कोण [12]तुच्छातें?' ४४

न ग मथितां सिंधुतळीं जाय [13]निराधार तो महाभार,
त्या विघ्नें देव असुर सर्व हि ते खिन्न जाहले फार. ४५

'मो टा चि लक्षयोजनपृष्ठ असा देव होय [14]कच्छप हा,
पाठीवरि गिरि घे, हें चरित प्रभुचें [15]अतीव [15]अच्छ पहा. ४६

भ र गिरिचा घे पृष्ठीं उचली तो विपुलकाय[16] कासव त्या,

---

१. बळिस काय आज्ञा असें पुसती—**पंत.** २ प्रतिबंध करी. ३. बळीशीं. ४. चुरून गेले. ५. [मंदर-] पर्वत. ६ गरुडरथ श्रीविष्णु. ७. गरुडातें अवलंबुनि देव गगनीं रिघे, जसी प्रवाह अवलंबुनि समुद्रीं नोका—**पंत.** ८. सहज, लीलेनें. ९. वासुकी सर्पाची दोरी केली. १०. [वासुकीच्या] तोंडाकडे. ११. सोडून देती. १२. तुच्छ अशा [शेंपटाला]. १३. श्रीविष्णु. १४. कांसव. १५. अत्यंत निर्मळ. १६. भव्य आहे शरीर ज्याचें असा.

दे अमृत[1], करि सुरांच्या चाक्षुषमन्वंतरीं सफळ कामा. २६
ब हु दुर्वासःक्षोभें झाले निश्रीक[2] तीनही लोक,
असुरहत सुर न उठती, इंद्रादि समस्त पावले शोक. २७
ते विधिला विनविति, मग जाय तयांसह चि तो हरिपदा[3] त्या,
जेथें सरूप होउनि गातो या मुक्तिच्या करिप[4] दात्या. २८
वा रिजनाभ प्रभुतें कळवी स्तुति करुनि बहु विधाता तें[5],
कीं, शरण आलियांची हरिली च विपत्ति बहुविधा तातें. २९
सु रपरिपालक भगवान् प्रकटे ब्रह्मादि जे तदादिपती[6],
तों विधिभवेतरांचीं[7] प्रभुतेजें लोचनें तदा दिपती. ३०
दे वांतें देव म्हणे, 'आहें चि सहाय मीं तुम्हां जाणा,
संधि करा असुरांसीं, सर्पाखुन्याय[8] मानसीं आणा. ३१
वा सुकिला नेत्र[9] करा, क्षीरधिमथनार्थ मंदरा मंथा[10],
ओषधि घाला, घुसळा हा अमृतप्राप्तिचा धरा पंथा. ३२
य त्न सफळ करिन, जरामरणहर अमृत तुम्हांस पाजीन,
मीं स्वजना तेंवि जपे, न धना लोभी, सुता न वा जीन. ३३
न विषा भ्यावें सुर हो! म्हणतिल जें असुर तें चि परिसा हो!
तुमचें चित्त खवळतिल बहु कामक्रोधलोभ, परि साहो. ३४
मो हुनि असुरांतें, मीं तुमचें चि करीन सर्वथा कार्य,
अमृतें तुम्हांसि सुयशें तर्पुनि, बहु हर्षवीन मीं आर्य !' ३५
भ गवान् यापरि सिकवुनि अंतर्हित[12] होय; आत्मभू[13] शर्व[14]
निजधामातें गेले, बळिच्या भेटीस देव ते सर्व. ३६

---

१. या अजितानें देवाला समुद्रमंथन करून अमृत दिलें. २. ऐश्वर्यरहित. ३. वैकुंठलोकाला. ४. गजेंद्र. ५. संकट—**पंत.** ६. ब्रह्मदेवादि जे देव त्यांचा स्वामी. ७. ब्रह्मदेव व शंकर यांहून इतरांचीं. ८. सर्प आणि उंदीर यांचें परस्पर-वर्तन. (पेटींत कोंडलेला साप प्रथम उंदराशीं मैत्री करतो व नंतर बाहेर निघाला म्हणजे त्याला न खाऊन टाकितो, तद्वत्). ९. रज्जु—**पंत.** १०. रवी, माथ्या. ११. तारा. १२. गुप्त. १३. ब्रह्मदेव. १४. शंकर.

**ग** ज पाहुनि सिंह तसे, उठुनि म्हणति, 'भाव[1] कळिव' देवारी,
सुरकदनोद्युक्तासुरवीरांतें नीति बळि वदे, वारी. ३७

**ब** ळि सदना आल्यांतें बहु सत्कारी, न होय तो वक्र,
असुरेंद्रासीं[3] सख्य प्रभुशिक्षितसन्नयें करी शक्र. ३८

**ते** सुर असुर मिळाले, मथन क्षीराब्धिचें तयां रुचलें,
जे त्रिपुरवासि शंबर इत्यादि रि म्हणति 'हें भलें सुचलें.' ३९

**वा** हुनि मंदर नेतां मार्गीं ते देव दैत्य ही थकले,
चुरले[4], पडला नग[5] मग कनकमय न चाळवावया शकले. ४०

**सु**[6] च्छदरथ ये, एकें हस्तें चि नग स्ववाहनावरि घे,
गगनीं[7] महार्णवीं अवलंबुनि जेंवि प्रवाह नाव रिघे. ४१

**दे** व क्षीरधितीरीं जावुनि उतरी सलील[8] मंदर तो,
करि तो हरि चरितामृत, कीं, विषयविष त्यजूनि मंद रतो. ४२

**वा**[9] सुकि वेढुनि गिरिला आरंभिति दुग्धराशिचें मथन,
झाला मुखाकडे[10] प्रभु, यच्चरिताचें हरी मला कथन. ४३

**य** द्यपि हित करि हरि, तरि अरि परिहरिती[11] भुजंगपुच्छातें,
होती मुखाकडे हो! म्हणति, 'स्पर्शेल कोण तुच्छातें[12]?' ४४

**न** ग मथितां सिंधुतळीं जाय निराधार[13] तो महाभार,
त्या विघ्नें देव असुर सर्व हि ते खिन्न जाहले फार. ४५

'**मो** टा चि लक्षयोजनपृष्ठ असा देव होय कच्छप[14] हा,
पाठीवरि गिरि घे, हें चरित प्रभुचें अतीव अच्छ[15] पहा. ४६

**भ** र गिरिचा घे पृष्ठीं उचली तो विपुलकाय[16] कासव त्या,

---

१. बळिस काय आज्ञा असें पुसती—**पंत.** २ प्रतिबंध करी. ३. बळीशीं. ४. चुरून गेले. ५. [मंदर-] पर्वत. ६ गरुडरथ श्रीविष्णु. ७. गरुडातें अवलंबुनि देव गगनीं रिघे, जसी प्रवाह अवलंबुनि समुद्रीं नौका—**पंत.** ८. सहज, लीलेनें. ९. वासुकी सर्पाची दोरी केली. १०. [वासुकीच्या] तोंडाकडे. ११. सोडून देती. १२. तुच्छ अशा [शेंपटाला]. १३. श्रीविष्णु. १४. कांसव. १५. अत्यंत निर्मळ. १६. भव्य आहे शरीर ज्याचें असा.

परिवर्तन[1] कंडूयन[2] वाटे त्रैलोक्यनायका स्वत्या[3]. ४७
ग गनीं सहस्रबाहु प्रभु धरि मंदरशिरासि कवळून,
स्तविती, पुष्पें वर्षति, न ढळति मुनि भक्तराज जवळून. ४८
ब ळ दे तेव्हां देवासुरवासुकिमंदरांसि तो मथनीं,
अत्यद्भुत प्रभुचरित वदतां सद्यश न माय[4] हें कथनीं. ४९
ते पर[5] अहिविषदहनें हत, दवदहनें वनीं जसे सरळ[6],
सुर हि तसे चि, तयांवरि घन वर्षवि कीं नसोत ते तरळ[7]. ५०
वा[8] रिदनील प्रभु मग, अमृत न निघतां, स्वयें चि मथन करी,
इतर धराया याचा, सिंहाचा जेंवि योग्य पथ न करी. ५१
सु[9] भगतम श्रीमूर्ति प्रभुनें मथितां चि धरुनियां अहिला,
हाळाहळनामक विषरस लयदहनोग्र[10] जन्मला पहिला. ५२
‘दे अभय’ म्हणति जाउनि विश्वेशा शंभुला प्रजा शरण,
चरण स्वांतीं[11] माथां धरिती, ज्यांचें भया हरि स्मरण. ५३
वा त्सल्यें द्रवला प्रभु शंभु उमेला म्हणे, ‘अहो सुसती!
भीतों परदुःखा, विष पीतों, कवि न व्रतच्युता पुंसती[12].’ ५४
य तिपति परतर गुरु उरुकीर्ति[13] प्रभु सिद्ध होय विषपाना,
नाना काम पुरविता भ्राता माता पिता सखा माना. ५५
नें[14] गजा देवी स्वधवात्यद्भुतरूपासख[15]प्रभावज्ञा.
अनुमोदन दे, करवे ज्याची न यमा नखप्रभावज्ञा[16]. ५६
मो टें तेज कळविलें आणुनि निजकरतळांत विषम[17] हि तें,

---

१. [ मंदराचळाचें ] फिरणें. २. खाजणें. ३. स्वतंत्र अशा [ कच्छपरूपी ] त्रैलोक्यनायक विष्णूला. ४. मावत नाहीं. ५. शत्रु ( राक्षस ). ६. वृक्षविशेष. ७ दमलेले. ८. मेघश्याम. ९. अतिशय सुंदर. १०. प्रलयकाळच्या अग्नीप्रमाणें. ११. चित्तीं. १२. मान देतों. १३. मोठें आहे यश ज्याचें असा. १४. पर्वतकन्या. ( पार्वती ). १५. [ असख ] अद्वितीय--**पंत.** आपल्या पतीच्या अत्यद्भुत रूपाच्या अद्वितीयपणाचा प्रभाव जाणणारी. १६. नखांच्या तेजाचा अपमान. १७. घातुक.

सहसा [1]मह साधूंतें द्याया गिळिलें पळांत विष [2]महितें. ५७
[3]भ वकरतळगलितमहाविषकण तो वृश्चिकादिकीं आहे,
[4]यां हे वेग, मग तया साहेसा कोण हो ! दुजा आहे ? ५८
ग [5]ळनाल नीळ केलें प्रभुचें गरळें, स्ववीर्य दाखविलें,
[6]राखविलें करुणेनें, तें चि जना अमृत करुनि [6]चाखविलें. ५९
व रिचेवरि मग मथितां, [7]सुरभी, उच्चैःश्रवा [8]महावाजी,
ऐरावत, कौस्तुभमणि, ज्यासि म्हणति भक्तजन ‘ पहावा जी !’. ६०
ते सर्व हर्षवी बा ! प्रकटुनि मग पारिजात [9]गुणधाम,
[10]तूं तैसा जो पुरवी अर्थिजनाचे सदा सकळ काम. ६१
वा रांगना सुरांच्या बहु सुभगा अप्सरा मग निघाल्या,
जाणों त्यांच्या हृदयीं [11]क्षुब्धाब्धिप्रहित शक्ति च रिघाल्या. ६२
सु गुणसुखनि [12]सुभगांची [12]आद्या श्री प्रकटली, तिणें वरिला,
निर्दोषगुण प्रभुवर तीस रुचे, [13]ती तसी न त्या [14]हरिला. ६३
दे वास श्री वरि, मग दे [15]वासस्थान वरद वक्ष तिला,
दृष्टि सुधावृष्टि तिची करि [16]निजजनदैन्यखरदवक्षतिला. ६४
वा [17]रुण्याख्या देवी कन्या नवकमललोचना झाली,
विष्णुमतें वरुनि तिला असुरांची मंडळी नृपा ! घाली. ६५
य ज्ञहविर्भोक्ता ये धन्वंतरि, अमृतकलश आणून,
नेला तो असुरानीं, भ्याले सुर आत्मघात जाणून. ६६
न मुनि कथिति सुर शोचिति पर[18]हृतपीयूषसुरसकलशातें,

---

१. मोठेपणा. २. शंकरानें. ३. शंकराच्या हातून पडलेला भयंकर विषाचा बिंदु. ४. [विंचु इत्यादिकांचे ठायीं असलेल्या] या (विषाला). ५. गळा ६. अन्वय—करुणेनें राखविलें तें चि अमृत करुनि जना चाखविलें. ७. कामधेनु. ८. यत्नात्मक मोठा घोडा. ९. गुणांचें स्थान असा. १०. परीक्षित राजा. ११. क्षोभलेल्या समुद्रानें पाठविलेल्या. १२. सुंदर स्त्रियांतील मुख्य. १३. लक्ष्मी. १४. विष्णूला. १५. राहण्याचें ठिकाण. १६. आपल्या भक्तांचें जें दैन्य तो च प्रखर वणवा त्याच्या नाशाला. १७. वारुणी नांवाची. (सुरादेवी). १८. हृत=हरण केलेल्या.

देव म्हणे, 'स्वस्थ असा, पावाल समस्त सुर सकल शांतें[1].' ६७
**मो** ही परांसि होउनि तत्काळ चि तो हरी परमहेला[2],
अमृतकलश घे स्वकरीं, त्या अहितांची करी परम हेला[3]. ६८
**भ** क्तांसि सुधा पाजी, देणारी सेवि त्यांसि भद्रा[4] जी,
पर भुलविले स्मितरसें, वसली घोंटींत लाळ तंद्राजी[5]. ६९
**गं**[6] ट करितां[6] अमृत, शिरुनि त्या सुरपंक्तींत राहु विधु तरणी
सुचविति, हरि[7] अरिनें[8] शिर, करि अरि तो विजयिबाहु[9] विधुतें[10] रणीं. ७०
**घ** ळिला असुर उठविती, खवळे तो शत्रुनीं बहु च्छळिला,
काळिला करि, परि हितकर युद्ध न तें केतक[11] चि तया[11] आळिला. ७१
**ते** असुर पात्र झाले होउनि गतगर्वसार[12] खेदास,
सुर धन्य, विषम न च, हरि सुरतरु, या सर्व सारखे दास. ७२
**वां**[13] सवसहाय भगवान् मारी समरांत काळनेमीतें,
कैसा ही प्रबळ असो, लंघूं न शके चि काळ नेमी तें. ७३
**सु** खवी सुरांसि आश्रितवांछापरिपूर्तिदक्ष वनमाळी[14],
प्रभुचा प्रताप समरीं दवदहन चि होय कक्षवन[15] माळी[16]. ७४
**दे** ववररणीं कार्मुकवेदानें[17] रक्षिला चि न सुमाळी,
इंद्रक्षोभीं[18] रक्षिल वृक्षांचे किति जपोनि असु माळी ? ७५
**वा** रणवरसा चि महामत्त मदें माल्यवान् करी समर,
त्यातें ही लीलेनें हरिनें मारूनि सुखविले अमर. ७६
**य** त्नें वज्री वज्रें, वाग्युद्धीं बळि न आटतां, ताडी,

---

१. सुखाला. २. श्रेष्ठ स्त्री. ३. हेलना, अपमान. ४. कल्याणा. ५. त्यांची (दैत्यांची) पंक्ती. ६. गिळत असतां. ७. तोडी. ८. चक्रानें. ९. ज्याचे भुज विजयी आहेत असा. १० कंपित. ११. मूळ पाठ—**काशकुसुम त्या.** काशनामक गवताचें फूल. १२. ज्यांचा मद व मस्ती उतरली आहे असे. १३. इंद्र आहे मित्र ज्याचा असा. १४. वनमाला धारण करणारा (विष्णु). १५. गवताचें रान. १६. असुर—**पंत.** १७. धनुर्विद्येनें. १८. मेघाधिपति इंद्राचा क्षोभ झाला असतां (आवर्षण पडलें असतां).

यानासकट[1] तयातें तद्भटशोकाश्रुबिंदुसह पाडी. ७७
**न** गणुनि वज्रातें ही धांवे हरिवाह[2] गुरुगदी[3] जंभ,
ऐरावतासि पाडी, मोडी सत्यासि पळ जसा दंभ. ७८
**मो** हें द्विरदें[4] पडे, तों मातलि[5] तत्काळ दिव्य रथ आणी,
हाणी शूळ तया[6] अरि, तोडी तन्मस्तकासि पविपाणी[7]. ७९
**भ** गवान् नारद सांगे, क्षोभुनि तज्ज्ञाति[8] गांठिती हरिला,
बळ पाक वधुनि, मारी फेंसानें नमुचिनामका अरिला. ८०
**ग** र्जुनि हरि हरिणांतें मागें लागोनि जेंवि लोळविती,
तेंवि अमर असुरांतें, प्रेक्षकधार्मिकमनांसि पोळविती. ८१
**व** ध असुरांचा विधिनें जिष्णुकडे नारदासि धाडून
राहविला, सुर मारित होते पळतां हि असुर झाडून[9]. ८२
**ते** सुर गेले स्वर्गा, बळिला घेवूनि असुर अस्तनगा[10],
शिवुनि बळिस उठवि, म्हणे, ‘अमृत जड, तयासि’ शुक्रहस्त[11] ‘न गा’. ८३
**वा** डववर[12] कवि उठवी योजुनि संजीविनीस जेत्यांतें,
अविनष्टावयव[13] असुर होते समरीं परासु[14] जे त्यांतें. ८४
**सु** रमणि देव[15] सुरमणीसह[16] जाय प्रभुकडे, म्हणे, ‘कृष्णा!
अवतार देखिले बहु, आहे स्त्रीरूपदर्शनीं तृष्णा.’ ८५
**दे** व म्हणे, ‘प्रणतांच्या कैसें सुरसत्तमा! न हाकेला
पावावें? मोहाया दैत्य स्त्रीवेष रम्य हा केला. ८६
**वा** टे आपण तो स्त्रीवेष पहावा असें, महादेवा!
तरि कामिबहुमता[17] त्या कामोदयकारका[18] पहा देवा.’ ८७

---

१. वाहनासकट. २. सिंह–**पंत** सिंह आहे वाहन ज्याचें असा. ३. मोठा गदाधारी. ४. हत्ती. ५. इंद्राचा सारथी. ६. मातलिला--**पंत**. ७. इंद्र. ८. जंभाचे जातभाई. ९ सर्व. १०. अस्ताचलाला. ११. शुक्राचार्याचा हात. १२. ब्राह्मणश्रेष्ठ शुक्र. १३ ज्यांचे अवयवांचा नाश झाला नव्हता असे. १४. गतप्राण. १५ महादेव. १६. उत्तम स्त्रीसह (पार्वतीसह). १७. कामी लोकांना फार मान्य. १८. मदनाला.

य [1]ज्ञपति असें बोलुनि तत्काळ चि गुप्त होय, हर पाहे
[2]स्त्री उपवनीं, म्हणे, 'क्षण' वैराग्यादिसुगुणांसि '[3]हरपा' हे. ८८

न [4]शिवासंकोच उरे, हृदयीं तैसें स्वभान ही न टिके,
घटिकेमाजि अनीश्वरसा झाला, गुण हि सत्य ते लटिके. ८९

मो हुनि धावोनि गळां त्या स्त्रीच्या [5]कामकाळ ही पडला,
[6]जड लागे पाठीला जैसा दृष्टांत ही तसा घडला. ९०

[7]भ वभुजबंधांतूनि [8]प्रभु निसटुनि तो पळावया लागे,
शंभु म्हणे, 'भीरु! उभी, पुसतों त्वन्मत कळावयाला गे!'. ९१

ग जराज तसा स्त्रीच्या मागें न गणूनि खेद हर लागे,
तीस म्हणे, 'तुजचिपुढें माझा [9]मंदिराक्षि! वेद हरला गे!'. ९२

व सुधेवरि वीर्य गळे जेथें जेथें [10]कुमारजनकाचें,
तेथें तेथें होय क्षेत्र रुप्याचें तसें चि कनकाचें. ९३

ते ज हराया पाहत होता आरि काम तो अवसरा ज्या
बहुधा करुनि स्वाश्रितकल्पद्रुमविष्णुला नवस राज्या!. ९४

वा रिधि नद्या महागिरि आणि वनें उपवनें, परमहर्षी
ज्यातें चिंतुनि जेथें होते निजभक्त जे [11]पर महर्षी. ९५

सु रमणि [12]फणिमणिकुंडल तेथें त्या मोहिनीस अनुसरुन
गेला, मग उमजे हरिमाया जातां, धरूनि हनु, सरुन. ९६

दे वांच्या देवाचा जगदात्म्याचा अगाध महिमा तो,
जाणुनि म्हणे सदाशिव, 'नेणुनि सुरतरु [13]अगाधम हि [14]मातो'. ९७

[15]वा माद्यदेव जाणे त्या [16]अपरिज्ञेयवीर्यजलधीतें,

---

१. विष्णु. २. मोहिनी. ३. सोडून द्या. ४. पार्वतीचा संकोच. ५. मदनाचा काळ (शत्रु), शंकर. ६. मूर्ख मनुष्य. ७ शंकराच्या बाहुपाशांतून. ८. मोहिनीरूपी विष्णु. ९. मोहक आहेत डोळे जिचे अशी. १०. कार्तिकस्वामीच्या बापाचें (शंकराचें) ११. मोठे. १२. सर्पश्रेष्ठ कुंडलें आहेत ज्याची तो. १३. नीचतरु—**पंत**. १४. माजो, गर्विष्ठ होवो १५. 'वाम' शब्द आदि आहे ज्याच्या असा देव=वामदेव. १६. ज्याचा प्रभावरूपी समुद्र अज्ञेय (जाणण्यास अशक्य) आहे अशातें (विष्णूला).

स्वभ्रम अद्भुत न मनी, कधि हि नुमजता तदन्य मळधी[1] तें. ९८

य[2] तिपति तो स्वस्थ असें पाहुनि निजपुरुषरूप घेवून,
देवून श्रीकंठा दर्शन बोले मुकुंद येवूनः-- ९९

‘न गजाकांता ! शांता ! तूं स्वप्रकृतीस पावलास बरा,
त्या काय अश्विनीचा[3] इतरा धरितील[3] पावला सबरा[3]? १००

मो हितहृदय महेशा ! केलासि असा हि तूं निकाम[4] हि म्या,
कैसा स्वयें चि सावध झालासि, सुपात्र या निका माहिम्या? १०१

भ य दाखविल न यावारि माझी तुज कविस असुतरा[5] माया,
मिथ्या इला समजला बुध जो, भ्रमहेतु न सुत रामा[6] याँ[7].’ १०२

ग रुडध्वजसत्कृत शिव कैलासीं ब्रह्मकथनयज्ञांत
‘तत्त्व हरि’ असें सांगे देवीतें आत्मपथनयज्ञांत[8]. १०३

व र्तत असे[9] विवस्वत्सुत[10] नामें श्राद्धदेव सप्तम हा,
अवतार यांत[11] वामन, निववि यशें श्रोतृजीव[12] तप्त महा. १०४

ते कीर्तिकथा प्रभुची ऐसी भार्गव[13] मुनींद्र तो बळिला
तेज तपःसामर्थ्यें अद्भुत दे, पद्म रस जसा अळिला. १०५

बा ढविलें बळ कविनें बळिचें, अनिळें जसें चि अनळाचें,
कीं, सुरस वाहणें तें गुरुजलदाधीन[14] शिष्यपनळाचें[15]. १०६

सु ज्ञ मुनीश्वर भार्गव ते करउनि विश्वजिन्मख[16] च्छळिला

---

१. मलिन बुद्धीचा २. महादेव. ३. तुजसम योगी तूं-**पंत.** इतरा सबरा (गाभण्या) [घोड्या] त्या अश्विनीच्या (अश्विनीकुमारांच्या मातेच्या) पावला धरितील काय ( तिची बरोबर करूं शकतील काय )?=अश्विनीला जसे देववैद्य अश्विनी कुमार झाले त्याप्रमाणें इतर घोड्या सबर असल्या तरी त्याना अश्विनीकुमार होतील काय? अर्थात् नाहीं. ४. अतिशय. ५. तरून जाण्यास कठिण. ६. स्त्री. ७. अशाला. ८. ब्रह्ममार्गाची रीति जाणणाऱ्या लोकामध्यें. ९. चालू आहे. १०. सूर्याचा मुलगा. ११. या मन्वतरांत. १२. ऐकणाऱ्यांचे प्राण. १३. शुक्राचार्य. १४. गुरुरूप जो मेघ त्याच्या अधीन. १५. शिष्यरूप पन्हळाचें. १६. विश्वजित नांवाचा यज्ञ.

शक्रें, तत्पद घ्याया गुरु करिति महाभिषेक त्या बळिला. १०७
दे वेंद्राच्या वेढी अमरावत्याख्य राजधानीतें,
गुरु[1] हरिस म्हणे, 'बळिच्या न करिल कोण्ही प्रतापहानीतें. १०८
वा ढविला ज्या गुरुनीं, त्यांचा जेव्हां करील अपमान,
तेव्हां बुडेल बळि हा, तूं यातें मूर्त शुक्रतप मान. १०९
य ज्ञपतिप्रभुवांचुनि याचें कोण्हा न तेज आटावें,
सोडावें स्वपद, तुला संप्रति हित सत्य हें चि वाटावें.' ११०
नै गभेत्ता[2] गुरुवचनें त्यजुनि श्रीसह पुरीस, 'चोरा! हे
घे' म्हणुनि जाय. सुरसह योगबळें गुप्त होय तो राहे. १११
मो टा तेजस्वी बळि समधिष्ठुनि[3] सुरपुर, प्रतापानें
वश करि जगत्रयातें, कविवृंदातें हि कीर्तिच्या[4] पानें. ११२
भ क्ता बळिकरवीं शत हयमख भार्गव मुनींद्र करवीती,
त्याची, प्रल्हादाची जैसी तैसी च रीति बरवी ती. ११३
कां[5] जबजली अदिति[6] सुतस्नेहें, आलीं सुखें परा जितकीं
दुःखें त्यांला जालीं, न च दाखविती मुखें पराजित कीं. ११४
व र मागे पतिला[7] ती व्हाया स्वपदस्थ शक्र सुरसहित,
कश्यप कथी 'पयोव्रत,'[8] विष्णुभजन जें, न वक्र, सुरस, हित. ११५
ते अदिति निववीली व्रतराजें, जे सिद्धि कोटि नवसानीं
अतिदुर्घटा घडविली, कीं भेटविला चि विष्णु अवसानीं[9]. ११६
वा रिजनेत्र म्हणे, 'मीं येतों चिंता हरावया पोटा,
प्रेमा जसा तुझा मजवरि माझा ही तसा असे मोटा.' ११७
सु त होय तिचा वामन वाम[10], नवा मन हरावया महिमा

---

१. बृहस्पति. २. पर्वतांचा छेदक (इंद्र). ३ वसवून. ४. यशाच्या. ५ कष्टी झाली. ६. देवमाता. ७. कश्यपाला. ८. एका व्रताचें नांव. (यांत परमेश्वराची दुग्धस्नानानें पूजा करावयाची असते व मनुष्यानें स्वतः हि दुग्धप्राशन करून राहावयाचें). ९. अखेरीस. १०. सुंदर.

प्रकटी, मधुरा ज्याच्या सत्कीर्तिसमा न[1] वा सुधा न हिमा. ११८

दे व बळिकडे गेला मायावामन सुरम्यमूर्ति बटु
पटु वक्ता मधुर असें बोले कीं ज्यापुढें सुधा हि कटु. ११९

धा डववेषें भेटे होतां हयमेध सेवटिल बळिला,
बहुमान याचका त्या वैरोचन,[2] पद्म दे जसा अळिला. १२०

य ज्ञांत सुपात्र दिलें ज्या प्रत्युत्थान अग्निनीं येतां,
पूजुनि बळि काम पुसे हर्षें, येत्तात आयु ही देता. १२१

न वल करी, प्रभु मागे स्वपदत्रयपरिमिता मही मात्र,
बळि हसुनि म्हणे, ‘बहु घे, तूं न स्वल्पा परिग्रहा[3] पात्र.’ १२२

मो क्षप्रद देव म्हणे, ‘इतुक्या चि परिग्रहें कृतार्थ असें.’
बळिराज ‘अवश्य’ म्हणे ‘घे, देतों तुज, बटो! रुचेल तसें.’ १२३

भ गवन्मत समजुनि गुरु बळिस म्हणे, “रे! न विप्र हा, हरि तो
लोकत्रय हि पदत्रय[4]कपटें म्हणवावयासि ‘हा!’ हरितो.” १२४

ग रकटु गुरुवच लागे, दानोत्साहांत घालितां मोडा,
बळि कविस म्हणे, “हरि हा तरि ‘हा!’ कां? या यशा नसे जोडा.

ब ळि ‘न’ म्हणेल कसा हो!? आला होवूनि विप्र याचाया,
हरि[5] हो, अरि[5] हो, गुरुजी! मीं कामा पुरवितों चि याच्या या.” १२६

ते व्हां गुरु अपमानें क्षोभे, ‘निःश्रीक[6] हो’ असें शापी,
तान्हि बळि सत्त्वें[7] जोडी कीर्ति, हरी ताप, जी सुधावापी[8]. १२७

वा मनविभुच्या घाली भूदानाचें सुपाणिवारि पाणी,
वाढे त्रिविक्रम, क्षण मात्र न होतां चि, होय अरिपाणी[9]. १२८

सु ख झालें बहु, बहुधा दुर्लभ सुवदान्य[10] भेटतां फुगला,

---

१. न मधुरा न च हिमा सुधा–**पंत**. ज्याच्या सत्कीर्तीप्रमाणें अमृत गोड नाहीं व थंड हि नाहीं. २. विरोचन–**पंत**. ३. दान घेण्याला. ४. तीन पाउलें जमिनीच्या निमित्तानें. ५ हा बटु विष्णु असो अगर शत्रु असो. ६. दरिद्री. ७. चांगुलपणानें. ८. अमृताची विहीर. ९. अरि (चक्र) आहे हातांत ज्याच्या असा (विष्णु). १०. उत्तम दाता.

सात्विक भाव प्रकटे, समयीं राहेल तो कसा उगला[1] ? १२९
दे व पदयुगें[2] सर्व व्यापुनि, मागे पदा भरून तिज्या,
स्वशिर बळि करि पुढें त्या, भावें आम्हीं तुम्हीं करूं नति[3] ज्या. १३०
वा खाणी प्रभु बळिला, 'छळिला तर्हि सत्वसत्पदीं टिकला,
शिकला आज्यापासीं[4], द्वारप[5] हरि तरि च तो जसा विकला. १३१
य[6] ज्ञ गुरुसि निरउनियां, दे स्वयशोरूप सेवका सेला[6],
सुतळीं[7] स्थापी, लावी आपुलिया त्यासि देव कासेला. १३२
न रपति पुसे, शुक तया सांगे मत्स्यावतारचरितातें,
मागिल निद्राप्रळयीं[8] झाला जगदीश रूप धरिता तें. १३३
मो हुनि विधितें, दानवराज हयग्रीव दे महाखेद,
कीं, तो विधिवदनांतुनि बाहिर निघतां चि हरुनि ने वेद. १३४
भ गवान् हरि तें दानवचेष्टित[9] जाणोनि होय मीन; मुनी
सस, नृपति सत्यव्रत, यां तारी, कथिन हें चि मीं नमुनी. १३५
ग रुडध्वजभक्त नृपति सत्यव्रत बहुविरक्त, यश गातां,
या कल्पाच्या पूर्वीं जो, तो चि श्राद्धदेव मनु आतां. १३६
व सुधापति तो तर्पण कृतमाळेच्या[10] जळें करी मीन
ये अंजळींत, टाकी, नेणें, प्रभु ही म्हणे, 'हरी[11] मीं न'. १३७
ते व्हां तो मीन म्हणे, ' खातिल मज, मजपरीस जे मोटे,
भ्यालों ज्ञातींपासुनि, भक्षिति तत्काळ लघुसि हे खोटे.' १३८
वा टे सत्य, दया ये, घे, स्वकमंडलुजळीं नृप स्थापी,
कलशावकाश एका दिवसीं वाढोनि मीन तो व्यापी. १३९

---

१. अव्यक्त. २. दोन पावलानीं. ३. नमस्कार. ४. प्रल्हादापाशीं. ५. द्वाररक्षक. ६. यज्ञ गुरुसि ( शुक्राचार्यास ) निरउनियां ( संपूर्ण करण्यास सांगून ) देव सेवका ( बळिराजाला ) स्वयशोरूप सेला ( शेला ) दे. ७. पाताळ लोकांत. ८. ब्रह्मदेव निद्रा घेत होता त्या वेळीं ब्रह्मदेवाचे मुखांतून वेद गळले होते. ९. हयग्रीवाचें आचरण. १० कृतमालानदीच्या. ११. हरण करीत.

सु खहेतु विपुल वसतिस्थान कमंडलुपरीस तो याची,
मणिकीं[1] स्थापी नृप कीं अवकाशाची समृद्धि तोयाची. १४०
दे व करत्रय वाढे एक मुहूर्तें, म्हणे, 'नको मणिक,
प्रांजळ[2] जळस्थळ असें योजीं, सकृपा नृपा! मला अणिक.' १४१
वा रिचरातें[3] तो नृपसत्तम नेउनि सरोवरीं सोडी,
व्यापूनि म्हणे, 'बा! गा! जागा या ही सरोवरीं थोडी.' १४२
य त्नें सोडी त्यातें सत्यव्रतभूप अर्णवामाजी,
हरिलीला बहु भुलवी, ती न धरि सुवर्णवर्ण वामा जी[4]. १४३
न रपतिस म्हणे मीन, 'ग्रासितिल मला पळांत हे मकर
तस्करसे, अर्णव हा वनसा, मीं जेंवि पांथ[5] हेमकर[6].' १४४
मो हीं पडुनि नृप म्हणे, 'वद सकृपा मीनसत्तमा! साच,
तूं भगवान् हरि तेजें, नव्हसी सामान्य मत्त मासा च. १४५
भ गवान् कसा नव्हसि तूं? एक दिनीं वाढलासि शतं गावें[7].
न तगावें तम[8] दासीं, त्वद्यश, होउनि तुला चि नत, गावें.'[9] १४६
ग रुडरथ म्हणे, "राज्या! वदतों मीं तें बरें मनीं आण,
होणार आजपासुनि सप्तमदिवसीं दिनप्रलय[10] जाण. १४७
ब स नावेंत, तुजकडे धाडिन मीं बसिव सप्त हि महर्षी,
मद्भक्त मला जैसा होतो पावोनि तप्त हिम हर्षी. १४८
ते ऋषि तम[11] हरितिल घे बहु बीजांसह सदोषधी नावें[12],
तारिन मीं जों रजनी[13], माजें जप तूं अदोषधी[14] नाव. १४९
धा रा सुटेल, येइन, तूं माज्या नाव बांध शृंगासीं,

---

१. मडक्यांत. २. संकोचरहित असें. ३. माशाला. ४. जी [ हरिलीला ] सुवर्ण [श्रेष्ठ] वर्ण [किंवा] वामा [कनिष्ठ वर्ण] न धरि=हरिलीला उच्चनीचाचा भेद मानीत नाहीं. ५. प्रवाशी. ६. हातांत सोनें असलेला. ७. शंभर योजनें. ८. अज्ञान. ९. असा तव महिमा—**पंत.** १०. ब्रह्मदेवाचा दिवस संपला म्हणजे त्रैलोक्यप्रलय होतो तो. ११. अंधकार. १२. नौका. १३ [ ब्रह्मदेवाची ] रात्र. १४. दोषरहित बुद्धि ज्याची आहे असा.

मजसीं तुजसीं संगति, पुष्पासीं आणि जेंवि भृंगासीं. १५०

सु रसा सद्धर्मकथा तुं[1]ज सुखवायासि आयकविन मुनी,
म्हणतील ‘सुकृतसुरभी’ गुणवेत्ते ज्यांसि[2] काय कवि नमुनी.” १५१

दे व असें सांगुनियां झाला तत्काळ गुप्त मग, राया!
तें सत्य करुनि दावी भक्त मत[3] महाविभूतिनगरा[4] या. १५२

वा रिधिमध्यें निज गुज कथिलें सत्यव्रतास; मीनवरा
नमुनि सुधन तें जोडिल जो, तो मुक्तिस म्हणेल ‘मीं नवरा’. १५३

य दुपतिच्या चरणाब्जीं वाहियला स्कंध लेश अष्टम हा,
अल्प हि बहुफळ होतें कृष्णार्पित चुकवितें चि कष्ट महा. १५४

---

# नवम स्कंध.

न रपति मनुवंश[5] पुसे, शुक सांगेः—पुरुषनाभिपद्मांत[6]
विधि झाला, ज्याच्या श्रुतिहरिमूर्तिनिवास[7][8] हृदयसद्मांत. १

मो हतमोर्क मरीचि प्रभु मानसपुत्र होय तो विधिला,
तत्सुत कश्यप मुनिवरपुत्र, विवस्वान् तया तपोनिधिला. २

भ गवान् सूर्य प्रसवे मनु नामें श्राद्धदेव तो, याचे
दश पुत्र, तत्कुळाचे भूषण, सत्पद्म जेंवि तोयाचे. ३

गं[9] णनीयगुण प्रथमज[10] इक्ष्वाकु, तसा चि पुत्र नृग, तिसरा
शर्याति, दिष्ट धृष्ट हि ज्यांचे गुण म्हणाति ‘अन्यगुण विसरा’. ४

व र्य करूपक सावा पुत्र, नारिष्यंत सातवा, राया!
आणि पृषध्र, नभग, कवि, अतिपटु जे आत्मघात वाराया. ५

---

१. मु. न सुखवायासि तुज आयकविन--**पंत.** २. ज्यांसि ( ज्या कथांस ) गुणवेत्ते कवि काय ( शरीर ) नमुनी ‘सुकृतसुरभी’ (पुण्यानें प्राप्त झालेली कामधेनु) [ असें ] म्हणतील. ३. बहुमान्य—**पंत**. ४. मोठ्या ऐश्वर्याचें स्थान अशा ( विष्णूला. ) ५. मनूच्या वंशाचा इतिहास. ६. नारायणाच्या नाभिकमलांत. ७. वेद आणि हरिमूर्ति ह्यांचें रहाणें. ८. अज्ञानांधकाराचा नाशक. ९. वर्णन करण्यास योग्य आहेत गुण ज्याचे असा. १०. ज्येष्ठ, पहिला.

ते[1] हे नव्हते, तेव्हां पुत्रार्थ वसिष्ठ [2]इष्टि कारि उक्ता,
[3]मनुची पत्नी श्रद्धा तीच्या हृदया गमे [4]सुता युक्ता. ६
बा[5] ळासी कळवी निजकन्यावांछा हळू च [6]होत्यातें,
आहुति देतां हृदयीं आठवलें मानलें हि हो! त्या [7]तें. ७
सु त व्हावा तें चुकलें, श्रद्धेला जाहली नृपा! कन्या,
मनु [8]गुरुसि बोल लावी, बीज वसिष्ठा कळे, न तें अन्या. ८
दे [9]वप्रभुतें प्रार्थुनि करि पुरुष वसिष्ठ जी इला [10]दुहिता,
सुरभी हरिची सेवा पावे सारा हि रस इला [11]दुहिता. ९
घों[12] हीं चढोनि मनुचा सुद्युम्न कुमार तो वनीं गेला,
तेणें मृगया करितां [13]मेरूपवनीं प्रवेश बा! केला. १०
य[14] मसोदरसुत तेथें [15]स्त्रीपण सिरतां चि सानुचर पावे,
तैसी कुदशा येतां, 'हा!' म्हणतां कां न ओष्ठ करपावे? ११
न टळे [16]विधि, [17]सोमसुता भेटे, जसि शर्करा दुधा सुरसा,
झाला पुरूरवा सुत [18]तीच्या पोटीं तया बुधा [19]सुरसा. १२
मो हीं स्मरे वसिष्ठा, [20]मुनि विनवी [21]प्रभुसि, त्यासि हर पावे,
मास पुरुष मास स्त्री करि, ज्या स्मरतां चि ताप हरपावे. १३
भ गवान् हर करि पूर्वीं त्या गहनीं स्वप्रियेसह क्रीडा,
मुनि दर्शनार्थ येतां त्यां पाहुनि भगवती धरि व्रीडा. १४
ग णपतिच्या मातेच्या प्रीतिस्तव भव असी करी आज्ञा
कीं, येथें[22] पर[23]पुरुष स्त्री हो, न करील काय ती प्राज्ञा? १५

---

१. हे मुलगे होण्याचे पूर्वीं. २. यज्ञ. ३. श्राद्धदेवमनूची. ४. कन्या. ५. लहान मुलीप्रमाणें. ६. हवन करणाऱ्याला. ७. ती इच्छा. ८. वसिष्ठास. ९. परमेश्वरास. १०. कन्या. ११. दोहन करणारा. १२. घोड्यावर. १३. मेरुपर्वताचे खालचे भागांत. १४. यमाचा भाऊ जो श्राद्धदेव मनु त्याचा मुलगा (सुद्युम्न). १५. 'या वनांत जो कोणी प्रवेश करील तो स्त्री होईल,' असा शंकराचा शाप होता. १६. दैव. १७. चंद्राचा मुलगा बुध त्याला. १८. इलेच्या. १९. देवासारखा. २०. वसिष्ठ. २१. शंकरास. २२. मूळ पाठ—**या वनांत पुरुष.**

व सुधापति सुद्युम्न प्रतिपाळी स्वप्रजा प्रति[1]ष्ठानीं,
त्या त्यासि न बहु मानिति, सुख कैचें मग दुज्या प्रतिष्ठानीं? १६
ते[2] णें वृद्धें स्वपदीं बैसविला सुत पुरूरवा राया!
जो मृगयेंत म्हणे, 'रे! अनुचर हो! [3]मृदु [4]रुरूर [5]वारा या.' १७
बा[6] ळार्थ हरिस भजला मनु शतवर्षें [7]वरूनि यमुनेतें,
जो स्वयशासि म्हणे, 'शिरिं अव कर्णविवर धरू नियमु ने [8]तें.' १८
सु रतरु भगवान् फळला इक्ष्वाकुप्रमुखदशसुपुत्रफळें,
भजतां, न कलिपतां ही, पडति गळां बहु फळें असीं च बळें. १९
दे शाप [9]पृषध्रा [10]गुरु 'हो शूद्र' असा चि, कीं [11]निशीं भारी,
व्याघ्र म्हणुनि [12]बभ्रुसि शिर उडउनि तत्कर्णसह चि तो मारी. २०
वा[13] ताशनादि उग्रव्रत धरुनि जपे महातपा, याला
सद्गति घडे, शिरे दवदहनीं, न म्हणे 'स्व' हातपायाला. २१
[14]यव स चि विषयसुख [15]कविस हें, पावे हरिस करुनियां नवस,
[16]नवसरसिजनयन वसे हृदयीं कामादिका म्हणे 'न वस'. २२
न रनाथ [17]उत्तरापथपाळक कारूष ते करूषाचे,
[18]धृष्टाच्या वंशींचे ब्राह्मण झाले तपोनिधी साचे. २३
मो व न ज्यांचें भाषण [19]बाळपणीं ही असे [20]नृगकुळांत

१. एतन्नामक नगरांत. २. सुद्युम्नानें. ३. मृगयाव्यासक्त अन्य जे त्यांसि वारा; सर्व तुम्हीं मजमागें फिरोनि प्रतिष्ठानासि जायासि या; कां म्हणाल, तरि मृगांचें हृदय कोमळ; निरपराध कसे मारावे? म्हणजे पुरूरवा बहुसद्गुणसंपन्न कीं भूतदया मुख्य गुण–**पंत.** ४. रुरूचें (मृगाचें) उर (वक्षःस्थळ). ५. मारूं नका. ६. पुत्रप्राप्तीसाठीं. ७. (यमुनेचे काठावर) राहून. ८. अन्वयार्थ? ९. पृषध्रनामक मनूचे आठवे पुत्राला. १०. वसिष्ठ ऋषि. ११. रात्र. १२. कपिला गाईला. १३. फक्त हवा खाऊन राहणें इत्यादि. १४. गवतासारखें. १५. कविनामक मनूचे दहावे पुत्राला. १६. नूतनकमलनयन (विष्णु). १७. उत्तर देशाचें रक्षण करणारे. १८. धृष्ट (मनूचा पांचवा मुलगा) त्याचे वंशांतील क्षत्रिय तपानें ब्राह्मणत्व पावले. १९. बाळपणीं. २०. नृग=मनूचा दुसरा मुलगा.

दात्यांत जे जलदसे शत्रूंत जसे हरी मृगकुळांत. २४

भ व्यगुण नरिष्यंत[1]प्रभव सुमतिचित्रसेनमुख सर्व
जालें अंतीं ब्राह्मण, कुळविद्येचा[2] जयां नसे गर्व. २६

ग र्वादिदोषवर्जित शिष्टसुमत दिष्टजात[3] जें कुळ तें
ज्यांतिल मरुत्तनृपयश धवळपणें अमृतरश्मि[4]सीं तुळतें. २६

घ नगत शर्याति नृप च्यवनाच्या आश्रमीं वनीं राहे,
त्याची सुता सुकन्या तेजें वल्मीकबिलगतें[5] पाहे. २७

ते जें काय म्हणुनि ती कांट्यानें च्यवनलोचनें टोंची,
तत्क्रोधें सेनेचा मळमूत्रनिरोध जाहला तों ची. २८

बा हुनि शर्याति पुसे, 'सांगा घडलें असेल जें आग[6];
च्यवनाश्रम हा, आला स्वाश्रमपददूषणें[7] तया राग.' २९

सु सुता सांगे, 'फिरल्यें विपिनीं घेवूनि आपल्या आली,
वल्मीकीं हें घडलें, स्मृति आतां मैन्य तापल्या आली.' ३०

दे खे नृप तों केला स्वसुतेनें च्यवन आंधळा कष्टी,
तदनुग्रह संपादी, अर्पी त्याच्या करीं सुतायष्टी[8]. ३१

वां[9] चा अर्थासिं तसी त्यांसि[10] सुकन्या कदापि सोडीना,
करुनि प्रसन्न घे ती, पतिची आज्ञा कदापि मोडीना. ३२

य ज्ञहविर्भागार्थी भेटति त्या प्रसवली जयां[11] वडवा[12],
त्यांसि मुनि म्हणे, 'वय[13] मज द्या, ईश्वर हो! दया करा, घडवा.' ३३

न वसिद्धरसीं डोहीं देती त्यासकट ते स्वयें हि बुडी
स्वसम करिति, हरिति कुंडी[14], श्रीहरिहर देव जेंवि बुद्धि कुंडी[15]. ३४

---

१. नारिष्यंत (मनूचा सातवा मुलगा) त्याचे पुत्र. २. क्षात्रविद्येचा. ३ दिष्टापासून झालेलें. ४. चंद्राशीं. ५. वारुळाच्या बिळांत असलेलीं. ६. अपराध. ७. आपलें आश्रमस्थान दूषित केल्यामुळें. ८. कन्यारूप काठी. ९. वाणी. १०. च्यवनाला. ११. ज्या अश्विनीकुमाराना. १२. घोडीचें रूप धारण करणारी सूर्यपत्नी. १३. तारुण्य. १४. [च्यवनऋषीचें पहिलें जराग्रस्त] शरीर. १५. खोटी.

मो हे, पतिस सुकन्या नेणे, मग शरण जाय, नवे[1] दोघे
करिति विवाह चि; म्हणती, “हा धव[2] तव, हृदय ‘हाय!’ न वदो, घे.”
भ वना ते गेले तों ये यज्ञ करावयासि शर्याती,
पाहे सुता उपासी[3] जी अद्भुतरूपविप्रवर्या[4] ती. ३६
ग मली दुष्टा, बोलुनि दावी ही, मग म्हणे सुकन्या या,
‘जामाता चि तुझा हा, लाविसि नुमजोनि बा! चुक न्याया.’ ३७
व दली सविस्तर सती कारण ती प्राप्तदिव्यरूपाचें
भेटे मुलिस प्रेमें, द्रवलें अतिमात्र हृदय भूपाचें. ३८
ते जस्वी तो च्यवन प्रारंभी श्वशुरसोमयागातें
अघटित चि करी साधु ब्राह्मणमंडळ ससोम या गातें. ३९
बा! सुरवैद्यांतें दे सोम[5], अतुळ आयका यश, च्यवन
करि सपवि[6] भुज स्तंभित[7] तैं, घडतें त्यासि काय शच्यवन[8]? ४०
सु रपतिनें त्या समयीं नसतिल कां शपथ वाहिले शतदा?
होउनि सुचकित विसरे सुमुनींचा जप थवा[9] हि लेश तदा. ४१
दे वेंद्रातें शासुनि योग्य करी दस्र सोमपानातें,
वेदीं जें सामर्थ्य श्रीच्यवनीं ही तसें चि माना तें. ४२
वा सवसा झाला या शर्यातिकुळीं कुशस्थळीपाळ[10],
त्याचें नाम ककुद्मी, जो अरिचा काळ, साधुचा बाळ. ४३
य श त्याचें परिसा हो! ‘अमृत चि’ म्हणतात रसिक ते जन या,
नवरा पुसावया तो गेला नेवूनि विधिकडे तनयां[11]. ४४
न वरा पुसावया क्षण गांधर्वांच्या प्रसंग पाहून,
राहून उगें चि पुसे, मग तच्चरणीं शिरोब्ज वाहून. ४५

---

१. नवे, अनोळखी (अश्विनीकुमार). २. पति. ३. उपासना करी. ४. अलौकिक आहे स्वरूप ज्याचें अशा ब्राह्मणश्रेष्ठाला. ५. सोमरस. ६. वज्रासह. ७. स्तब्ध, हालेनासा. ८. इंद्राणीचें रक्षण. ९. समूह. १०. कुशस्थळीनगरीचा राजा. ११. कन्या ( रेवती ).

**मो** ह हरि, प्रभु[1] सांगे, ' आल्यास चतुर्युगें अगारा[2] या
सत्ताविस गेलीं कीं, दे बळदेवासि[3] हे अगा राया !. ४६

**भ** र भूचा वाराया अवतरला देवदेव नवरा हो!
म्यां कथिला हा चि करा योग्य असे हा विचार, नव राहो.' ४७

**गं**[4] दिगुरुवरा बळाला कन्या देवूनि जाय बदरीतें,
करि तप जेणें जाची गर्भाख्या दुःखहेतु न दरी तें. ४८

**च** रगुण नभगमनुतनुज निपट[5] चि अकपट, तयासि जे भ्राते,
म्हणती, ' बहु ठळक तुला वांटा तात चि दिला ' असें बा! ते. ४९

**ते** व्हां पुसे गुरुकुळागत तो तातासि, ' काय तूं वांटा?'
त्यासि मनु म्हणे, ' वत्सा ! भ्रात्यांला भासतोसि तूं कांटा[6]. ५०

**बा** ! हे आंगिरस करिति सत्र, तयामाजि किमपि चुकतात,
तें त्यांसि सांग[7] जा तूं, तेणें स्वर्गी फळासि मुकतात.' ५१

**सु** मति नभग तें चि करी, आंगिरस हि संपवूनि सत्रास,
स्वर्गी जातां देती त्या सत्रोर्वरित[8] वस्तु पत्रास[9]. ५२

**दे** उनि जें धन गेले आंगिरस, तयासि नभग करि गोळा,
तों उत्तरेकडुनि ये पुरुष[10] म्हणे, ' एक हि न तुझा तोळा. ' ५३

'**वा**[11] स्तुक वसु हें माजें ' नभग म्हणे, ' संपवूनि सत्रास,
गेले देउनि मुनि मज;' अनृत करी कंपवूनि सत्रासें[12]. ५४

'**य** ज्ञोर्वरित धन ' म्हणे, ' कोणाचा भाग हें स्वतातातें
जा पूस, चालवावा धर्म तुज्या आग्रहें स्वता तातें.' ५५

**न** भग पित्यासि पुसे, तो सांगे, ' यज्ञावशिष्ट हा भाग
कोठें रुद्रासि असे, सर्वा ही पात्र तो महाभाग. ' ५६

**मो** ठ्या वेगें येउनि सांगे तैसें चि नभग देवांस[13],

---

१. ब्रह्मदेव. २. गृहा. ३. बळरामाला. ४. गदा धारण करणाऱ्यांमध्यें जे गुरु त्यांमध्यें हि श्रेष्ठ. ५. सर्वथैव. ६. वैरी. ७. विश्वेदेवांचीं सूक्तें त्याना पढीव. ८. यज्ञांतील अवशिष्ट. ९. तुळसीदल–पंत. १०. रुद्र. ११. वसतिस्थान. १२. त्रासयुक्त. १३. रुद्राला.

[1]सत्यें प्रसन्न होउनि तें स्वधन हि निजपदीं हि दे वास. ५७
भ गवत्प्रसादभाजन नभग, तयाच्या कुळांत हरिदास
नृप अंबरीष होता तो बहुमत फार हरिस [2]अरिदास. ५८
ग लिताभिमान तो नृप वर्षभरि द्वादशीव्रतासि धरी,
दे षष्टिकोटि विधिनें गोदानें, [3]सांग तें सुकर्म करी. ५९
[4]व र्षांतीं उद्यापन करूनि सविधि [5]पारणा करूं लागे,
तों दुर्वासा मुनि ये, '[6]अशन किजे' हा चि वर तया मागे. ६०
ते णें स्नानीं केला बहु उशिर, द्वादशी उरे थोडी,
[7]जळपारण करि, तों ये मुनि, कोपे, भूप कर तया जोडी. ६१
[8]वा डव तो व्यर्थ करि क्रोध, नृपवधार्थ मग जटा तोडी,
[9]कृत्या निर्मी, तीतें नृपरक्षक विष्णुचक्र तें झोडी. ६२
[10]सु प्रथमदर्शन तयामागें लागे, पळे मुनि त्रासें,
त्राणार्थ तो विधिकडे शंभुकडे जाय, दाटला श्वासें. ६३
दे तीं अभय न कोणी, मग गेला हरिकडे, म्हणे 'रक्ष',
प्रभु हि म्हणे, 'तो चि [11]प्रभु शरणागतरक्षणीं, न मीं, दक्ष'. ६४
[12]वा ताशन तो वाडव बा! तापें तापला, बहु श्रमला,
गमला दीन पहातां त्याहुनि तो अंबरीष हि श्रमला. ६५
य ज्ञादिसुकृतदानें विनवुनि चक्रासि साधु तो वारी,
तारी मुनिला भगवद्भक्त नृपति, कीर्ति साधुची भारी. ६६
न मुनि मुनिवरासि मग प्रथम प्रार्थूनि जेववी हर्षें,
तो अंबरीष त्याच्या आज्ञेनें पारणें करी [13]वर्षें. ६७
मो टें चरित परि तसें तें देवें थोडक्यांत [14]आटविलें,

---

१. सत्यवादीपणानें. २. [सुदर्शन] चक्र देणाऱ्याला (विष्णूला). ३. यथासांग. ४. कार्तिकमासीं. ५. व्रतसमाप्ति. ६. भोजन. ७. पाणी पिऊन व्रतसमाप्ति करतात ती. ८. ब्राह्मण दुर्वास. ९. राक्षसी. १०. 'सु' आहे प्रथम ज्यांत असें दर्शन=सुदर्शन. ११. अंबरीष राजा. १२. वारा हें च आहे खाद्य ज्याचें तो. १३. एका वर्षानें. १४. आटपलें.

कीं, सुख तज्ज्ञजनाला काय श्रीवामनें न वाटविलें ? ६८
भ गवद्विभूति मनु तो, शिंके, तों होय दिव्य सुतरत्न
तो इक्ष्वाकु, तयाचे शत सुत, ज्यांचा यशीं च बहु यत्न. ६९
ग णिले शतांत तीन, ज्येष्ठसुत विकुक्षि, निमि दुजा, तिसरा
दंडकनामा, यांचें शुचि यश हासे सुधेचिया हि सरा. ७०
व चनें गुरुच्या[1] टाकुनि[2] इक्ष्वाकु विकुक्षिला वारि यशास,
कीं, श्राद्धा आणविले मृग त्यांतिल खाय तो सुत शशास[3]. ७१
ते णें 'शशाद[4]' ऐसें झालें त्याचें प्रसिद्ध मग नाम,
इक्ष्वाकुनृपामागें येउनि तो आपुलें वसवि धामें[5]. ७२
वा हन हरि[6] करि तत्सुत[7], वाटे तें विष्णुचें चि माणिक,
होयें 'ककुत्स्थ' 'पुरंजय' नाम तया 'इंद्रवाह' आणीक. ७३
सु रबहुमत तद्वंशीं झाला नृप कुवलयाश्व तो भारी,
त्या 'धुंधुमार' म्हणती कीं असुरा धुंधुनामका मारी. ७४
दे मुनिहितार्थ[9] धुंधुश्वासाग्निस एकविस सहस्र सुत,
उरले तिघे चि त्यांतुनि, झाले त्या पावकांत सर्व हुतें[10]. ७५
वा गविले दैवें जे तीन, तयांमाजि जो दृढाश्व कृती,
त्याच्या वंशीं झाला युवनाश्वमहीपती शुचिप्रकृती. ७६
य त्न करुनि तो थकला, होत्या त्या भूपतीस शत भार्या,
तन्हि अनपत्य वनातें गेला, आले[11] दयालु ऋषि कार्या[11]. ७७
न रनाथा सुत व्हाया मुनिमखसदनांत मंत्रिलें तोय
होतें, हो ! तें प्याला सुतृषित युवनाश्व; भावि तें होय. ७८
मो टें पोट नृपाचें जों जों तों तों प्रजेसि भय मोटें,

१. वसिष्ठाच्या. २. हद्दपार करून. ३. सशाला. ४. ससा खाणारा. ५. गृह. ६. इंद्र. ७. त्याचा-शशादाचा-पुत्र (पुरंजय). ८. दैत्यांचें पुर जिंकल्यामुळें 'पुरंजय', इंद्र वाहन झाल्यामुळें 'इंद्रवाह' व वृषभरूपी इंद्रावर बसल्यामुळें 'ककुत्स्थ' अशीं शशादाच्या मुलाचीं नांवें पडलीं. ९. [ उत्तंक ] ऋषीच्या हिताकारितां. १०. हवन केलेले-भस्मीभूत. ११. उपयोगी पडले.

दक्षिण[1] कुक्षि विदारुनि जन्मे शिशु साधु, यश नव्हे खोटें. ७९
भ गवान् सुरपति शिशुच्या अमृतमयी देशिनी[2] मुखीं घाली,
अंगुलि चुरुचुरु चोंखी, तत्पानें तत्क्षुधातृषा घाली. ८०
ग डबडुनि जों मुनि म्हणति 'कं धास्यति?[3]' तों चि इंद्र 'मीं धाता,[4]'
ऐसें प्रकटुनि वदला म्हणुनि म्हणति त्या नृपासि 'मांधाता'. ८१
घ र सुरमुनिवर्यसभा त्या युवनाश्वासि वांचवीसा वी,
आपण चि माय बाप हि पूजी तो भूप पांचवी सावी. ८२
ते जें त्याच्या झाले त्रस्त दशमुखादि[5] दस्यु[6] कीं धाम[7]
अद्भुत यास्तव शक्रें 'त्रसदस्यु[8]' असें हि ठेविलें नाम. ८३
वा हत होते सप्तद्वीपस्थित लोक जे तदाज्ञा ते
त्या चक्रवर्तिला 'जगदीश' असें वर्णिती तदा ज्ञाते. ८४
सु त त्याचे गुणनिधि पुरुकुत्स तथा अंबरीष मुचुकुंद,
या त्यजुनि पर कविस तरि अळिस हि नलिनापरसि रुचु कुंदे[9]. ८५
दे वी तशा चि होत्या मांधात्याला शतार्ध ज्या कन्या,
एका श्रीसौभरितें[10], रूपासि भुलोनि, वरिति त्या धन्या. ८६
वा टे स्वसम समर्थ न कोण्ही च असें पदभ्रमांधा[11] त्या,
बहुत चि लाजवि सौभरिमुनिचें वैभव अदभ्र[12] मांधात्या. ८७
य श हरिचें गाउनि तो सौभरि, होउनि विरक्त, तनु सोडी,
गोडी खरी हरिगुणीं कैंची विषयांत ती? मृषा[13] थोडी. ८८
न मांची देणारी निजभगिनी 'नर्मदा,' तितें भ्राते[14]
पुरुकुत्साला देउनि, आर्जविती फार सर्वदा त्या ते. ८९
मो हुनि फणिवर[15]वचनें गंधर्ववधार्थ नर्मदा त्यातें[16],

---

१. उजवी. २. तर्जनी. ३. कोणाला पिईल? ४. मला पिणारा. ५. रावण आदिकरून. ६. दुष्ट. ७. तेज. ८. दस्यु (दुष्ट) ज्याला भितात असा. ९. कुंदपुष्प. १०. एतन्नामक ऋषीला. ११. [आपल्या श्रेष्ठ] पदाच्या भ्रमानें अंध अशा. १२. अनल्प. १३. मिथ्या. १४. नाग, सर्प. १५. सर्पश्रेष्ठाच्या भाषणानें. १६. पुरुकुत्साला.

नेती रसातळीं, अहि देति अभयसुवर शर्मदात्यातें. ९०

भं[1] गणीं भरूप दिसतो जो [2]गाधिजनीत [3]शक्रपातित या,
वंशीं त्रिशंकु सुयशा, कोण न गाईल साधु गाति तया? ९१

गं[4] तिमत्पूज्यतम हरिश्चंद्र अतियशा त्रिशंकुचा तनय,
सद्वैद्यें रोग तसा जेणें नाहीं उरों दिला अनय. ९२

ब हु वर्षें [5]ज्यांकरितां जरि ही गाधिज वसिष्ठ हे शुद्ध,
बुद्धख्यात तरि करिति [6]आडीबकनाम ते महायुद्ध. ९३

ते णें नारदवचनें व्हाया संतान नवसिला वरुण,
'सुत हो, पुत्रें चि यजिन' यापरि दे पुत्र यासि तो करुण. ९४

बा ळक रोहित होतां वरुण म्हणे, 'या सुतें मज यजावें';
नृपति म्हणे, '[7]निर्देशं पशु शुद्ध, [8]अमध्यें कसें तुज भजावें?' ९५

सु त निर्देश होतां ये, वरुण म्हणे, 'या सुतें मज यजावें';
भूप म्हणे, 'येवूं दे दंत, अमेध्यें कसें तुज भजावें?' ९६

दे येवूं दंत तया, वरुण म्हणे, 'या सुतें मज यजावें';
राजा म्हणे, 'पडावे [9]प्रथम, अमेध्यें कसें तुज भजावें?' ९७

वा ळाचे रद पडतां, वरुण म्हणे, 'या सुतें मज यजावें';
'यावे पुन्हां रद' म्हणे नृपति, 'अमेध्यें कसें तुज भजावें?' ९८

य त्नें रद येतां ये, वरुण म्हणे, 'या सुतें मज यजावें';
भूप म्हणे, 'व्हावा रणदक्ष, अमेध्यें कसें तुज यजावें?' ९९

न रवर यापरि पुत्रस्नेहें काळासि युक्तिनें [10]वंची,

---

१. नक्षत्रसमुदायांत. २. विश्वामित्रानें [ तपोबलानें स्वर्गास ] नेलेला. ३. इंद्रानें [ स्वर्गावरून ] पाडलेला. ४. गतिमंतांत—मुक्तांत—अत्यंत पूज्य. ५. हरिश्चंद्राकारितां. ६. आडी आणि बक हीं नांवें ज्यांत आहेत असें. ( विश्वामित्रानें हरिश्चंद्राचें सर्वस्व हरण करून त्याला दुःख दिलें. म्हणून वसिष्ठानें आडी नांवाचा पक्षी होण्याचा शाप त्याला दिला. तेव्हां विश्वामित्रानें हि उलट वसिष्ठाला 'तूं बक हो' असा शाप दिला. पक्षिरूपानें दोघांचें पुष्कळ वर्षें युद्ध चाललें होतें ). ७. [ जन्मून ] दहा दिवस झाले असा. ८. अशुद्धानें. ९. पहिले ( दुधाचे ) दांत. १०. फसवी.

सुत निसटे, नृपतिस धरि वरुण, स्वार्थोद्यतीं[1] दया *कंची[2] ? १००
मो टें उदर पित्याचें[3] ऐकुनि रोहित पुरासि जों जाय,
इंद्र म्हणे, 'कर तीर्थें, कां जासी ? वेड लागलें काय ?' १०१
भ[4] गवान् प्रत्यब्दीं[5] ये वारी जनशब्द[6] वांचवायास,
रोहित वनीं च होता तो, लोटे अब्द पांचवा यास. १०२
'ग र्ते' पुढें, प्रथम 'अजी,' ज्याच्या नामीं तयाकडे[7] गेला,
तन्मध्यमपुत्र विकत घेउनि वरुणार्थ गुरुपुढें[8] ठेला. १०३
व रुणादि सुरांसि पुरुषमेधें यजि नृप रिणें अंजी[9] गर्ते[10],
पुत्र करि शुनःशेफा गाधिज, ज्यातें विकी अजीगर्त. १०४
ते व्हां त्या नरमेधीं बहुत चि सत्कार लाहला[11], होता[12]
परम प्रसन्न चित्तें श्रीविश्वामित्र जाहला होता. १०५
वा रिद सुज्ञानाचा श्रीगाधिज चातकीं नृपीं वळला,
त्याचें कारण परिसा, हरिसा सत्वें तयासि तो कळला. १०६
सु गति हरिश्चंद्राला घडली, रोहितकुळीं पुढें झाला
राजा बाहुक, अरिनीं निजराष्ट्रांतूनि दवडिलें त्याला. १०७
दे ह त्यागी वृद्ध[13], ज्येष्ठा त्याची महासती भार्या
सहगमनोत्का[14] औवें[15] गर्भवती म्हणुनि वारिली आर्या. १०८
वां[16] माचारा सवती देती गर्भा गळावयास गर,
और्ववरें तो झाला नामें, पावुनि बळा वया, 'सगर[17].' १०९
य वन विकृतवेष[18] सकळ केले, किति मारिले अहित सगरें,

---

१. आपला हेतु प्राप्त करून घेण्यास तयार झालेल्याच्या ठिकाणीं. २. कोठली. ३. हरिश्चंद्राचें उदर जलोदररोगानें मोठें झालें आहे असें ऐकून. ४. इंद्र. ५. प्रत्येक वर्षीं. ६. लोकापवाद टाळण्यास. ७. अजीगर्ताकडे. ८. बापापुढें. ९. अगदीं. १०. ऋणेंकरून अधोलोक होतो—**पंत**. ११. पावला. १२. हवनकर्ता. १३. म्हातारा (बाहुक). १४. [मृतपती-] बरोबर गमन करण्याविषयीं उत्कंठित अशी. १५. एतन्नामक ऋषीनें. १६. दुराचरणी. १७. विषसहित. १८. विलक्षण केला आहे वेष ज्यांनीं असे. * यमकसुखार्थ 'कैची' हरताळून 'कंची' केलें आहे.

या चक्रवर्तिचें यश बहु गाती खेटें[1] खर्वटें[2] नगरें. ११०

न गरिपु अश्व शताव्या हयमेधाचा छळें बळें चोरी,
कीं, साहेना त्याला सगराच्या पुण्यकीर्तिची थोरी. १११

मो घ न व्हावा केला संकल्प, म्हणोनि पुत्र सगरानें
आज्ञापिले हयास्तव शोधिति एकीकडूनि नग रानें. ११२

भ रले भरीं [*]सुमतिचे सुत साठ सहस्र भूमिला खणिती,
तो हा सागर झाला, बलशाली दृप्त[3] ते श्रम न गणिती. ११३

ग[4] र्तें चहुंकडे केले गेले शोधित धरूनि ईशानी[5],
त्यांनिकट[6] हय पहाती, गावें ज्या श्रीमुनीस ईशानीं. ११४

ब ळमत्त सगरसुत ते लंघिति मानूनि चोर कपिलातें,
न गमे अलंघ्य चलदलनग[7] दैवत जारि हि थोर कपिला[8] तें. ११५

ते खळ षष्टिसहस्र हि जगदीश्वरलंघनात्मदोषानें,
भस्म क्षणांत जाले, न च भगवत्कपिलविष्णुरोषानें. ११६

वा जी शोधायाला पाठविला अंशुमान्नृपें सगरें,
ज्याचा गुरु[9] असमंजस आठविला 'हाय!' म्हणुनि त्या नगरें. ११७

सु त असमंजस सगरप्रभुचा जो संग युक्तिनें उडवी,
कीं, पौर[10]बाळकांतें नेउनि सरयूंत खेळतां बुडवी. ११८

दे त्यासि निरोप पिता कीं, करितो जेंवि घात [11]कीनाश,
जावू स्वैर, न दावू मुख, पावो पौरघातकी नाश. ११९

वा[12] रिगृहीं श्रीसरयूधात्रीस[13] कथूनि मुदित राखविले,
ते पुर सोडुनि जातां स्नात अळंकृत कुमार दाखविले. १२०

य मसा आधीं दारुण, मग गमला मायबापसा लोकीं,
तो अंशुमान् तयाचा सुत सगरातें बुडों न दे शोकीं. १२१

---

१. लहान खेडीं. २. पर्वताच्या पायथ्याजवळचीं खेडीं. ३. गर्विष्ठ. ४. खळगे. ५. ईशानी दिशा. ६. त्या (कपिल ऋषी-) जवळ. ७. पिंपळाचें झाड. ८. वानराला. ९. बाप. १०. नागरिकांच्या मुलांला. ११. यम. १२. जलानें वेष्टिलेल्या घरांत. १३. दाईला. * सुमति ही सगराची कनिष्ठ पत्नी होय.

न गरांतूनि निघुनि हय[1] शोधित जावूनि पाहुनि तयातें,
कपिलातें नमुनि स्तवि, करि जेणें प्रभुसि ये बहु दया तें. १२२
मो रासि घन तसा त्या निववी श्रीकपिलहरि, म्हणे, ‘हरि[1] घे,
हे दग्ध पितर तारील गंगोदक, इतर गुरुभरीं[2] न रिघे.’ १२३
भ गवंतातें वंदुनि दे हय नेवूनि सगर राज्याला,
क्रतुशेष[3] समाप्त करी, बहु सुखवी अंशुमान् स्वआज्याला[4]. १२४
ग ति बरवी और्वाहिं[5] ज्ञानें तो सगर पावला आजा,
जैसा तसा चि झाला त्यामागें साधु अंशुमान् राजा. १२५
व सुधेवरि गंगेतें आणाया तप करूनि तो मेला,
तत्सुत दिलीप नृप ही त्यास्तव तत्सुत भगीरथ हि गेला. १२६
ते श्रीगंगा भेटे, जीचा सद्गति जनां कथासव[6] दे,
‘वेगधर[7] कोण? कोठें क्षाळूं अघ?’ हें भगीरथास वदे. १२७
‘वा मादिदेव[8] वेगा धारिल,’ भगीरथ म्हणे, ‘अघ हि गंगे!
हरितिल हरिजन, त्यांचें[9] हृदयस्थमुकुंदचिंतनें भंगे.’ १२८
सु रमणितें आराधी, धरि तीच्या तो हि देव वेगातें,
गंगा सगरसुतांतें पद दे, कोण्हां न देवचे गा! तें. १२९
दे वी भगीरथाची कन्या ‘भागीरथी’ असें म्हणते
गंगाप्रसादभाजन होती, स्मरती तिला क्षणक्षण ते. १३०
वा सवमान्यभगीरथवंशीं सौदास[10] मित्रसह[10] भारी,
मृगयेसि वनीं गेला, तेथें एका निशाचरा मारी. १३१
य लें सौदासगृहीं तदनुज[11] राहे करूनि सूदपण[12]
सेवेसि जपे, वाढी अर्धी उष्ण चि भरूनि मूद[13] पण. १३२

---

१. घोडा. २. मोठ्या बोजाच्या कामांत. ३. राहिलेला यज्ञ. ४. सगराला. ५. और्वनामक गुरूपासून मिळालेल्या. ६. कथारस. ७. [स्वर्गातून भूमीवर पडणारा माझा] वेग धारण करणारा. ८. महादेव. ९. त्यांचें [अघ]. १०. हीं दोन्हीं एकाचीं च नांवें होत. ११. त्या राक्षसाचा धाकटा भाऊ. १२. स्वयंपाकीपणा. १३. भाताची मूद.

न रमांस वसिष्ठाला वाढी, तें त्यासि समजलें पाप;
न करुनि विचार 'राक्षस हो' ऐसा मुनि नृपासि दे शाप. १३३

'मो टा प्रमाद, राक्षसकृत हें, हा मज चि शब्द बा! राहो,'
'स्वल्प[1]समय शाप' म्हणे गुरुराज, 'पलाश अब्द बारा हो.' १३४

'भ स्म गुरुसि करिन' म्हणुनि त्या सौदासें हि घेतलें तोय,
[2]स्त्री वारी, स्वपदीं घे, राक्षस 'कल्माषपाद' तो होय. १३५

ग र्भाधानो[3]द्यत ऋषिसुत तो राक्षसपणांत धरि खाया,
तत्पत्नी बहु विनवी निजपतिदानें वनांत हरि[4]खाया. १३६

व चनें करुणें न गणी, व्याघ्र मृगा तेंवि खाय त्या पापी;
'गर्भाधानीं मरसिल तूं हि' असें त्यासि ती सती शापी. १३७

ते णें अनपत्य नृपति, तत्प्रार्थित गुरु वसिष्ठ सुतपा 'हो,
मदयंती गर्भवती शीघ्र' म्हणे, '[5]कल्मषांघ्रि सुत पाहो'. १३८

वा ढुनि उदरीं तीच्या होता तो गर्भ [6]सप्तमित [6]अब्द,
तदुदर [7]उंपळें ताडी गुरु, लागों दे न निजयशा शब्द. १३९

सु त मदयंतीचा तो अश्मकनामा, तदीय तनयातें
'नारी[8]कवच' असें किति म्हणती '[9]मूलक' असें हि जन यातें. १४०

दे [10]हावसान तोंवरि, देवांचें दों घडींत निजकार्य,
हरिचिंतन करुनि तरे तो नृप खट्वांग या कुळीं [10]आर्य. १४१

बा! या खट्वांगाचा जो सुत तो 'दीर्घबाहु'नामा गा!

---

१. थोडा आहे अवधि ज्याचा असा. २. मदयंतीनामक पत्नी. ३. मैथुनासक्त. ४. हर्षाया. ५. कल्माषपाद. ६. सप्तावधि वर्षें. ७. दगडानें. ८. परशुरामानें पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा केली तेव्हां स्त्रियांनीं वेढून याला वांचविलें म्हणून, यास, नारी आहेत कवच ज्याला असें सार्थ 'नारीकवच' नांव पडलें. ९. याच्याचमुळें पुनः क्षत्रिय अस्तित्वांत आले म्हणून 'मूलक'. १०. दैत्यनाश केल्यामुळें देव प्रसन्न झाले व वर इच्छिण्यास त्यांनीं खट्वांगाला सांगितलें; राजानें 'आयुष्य किती राहिलें' असें विचारलें तेव्हां, 'एक मुहूर्त च उरला आहे' असें सांगण्यांत आलें. तेवढ्यांत खट्वांगानें हरिचिंतन करून स्वतःला तारिलें.

त्याचा हि रघु, म्हणे जो, 'द्विज हो! धन काय? बाहुना[1] मागा'. १४२

य श कवि गाती ज्याचें तो रघुसुत अज, तयासि सुत झाला
श्रीदशरथ नृप, ज्याच्या पोटा श्रीरामचंद्र हरि आला. १४३

न यनाभिरामरूप श्रीराम तसा चि लक्ष्मण व्यक्त,
भरत हि शत्रुघ्न हि हे एक, परि ज्येष्ठबंधुचे भक्त. १४४

मो टा प्रताप गाधिजमखरक्षण[2] गौतमांगनोद्धार[3],
हरचापभंग[4] जेणें बळशाली भूप गांजिले फार. १४५

भ क्ता सीता लक्ष्मी जनकसुता तत्करग्रह[5], प्राज्य
मद रामाचा[6] हरिला, त्यजिलें पितृसत्यरक्षणा[7] राज्य. १४६

रा मनागमना अडचण शूर्पणखाप्राणवायुची[8] वारी,
खरदूषणादि देवासह्य चतुर्दश सहस्र खळ मारी. १४७

व सुधावत्साविरहीं[9] रडुनि स्त्रीपरजनासि[10] वेडावी,
शबरीस बरी गति दे, तनुबेडी ईश्वरें चि फेडावी. १४८

ते जस्वी ही मथिला मित्रसुकंठप्रियार्थ[11] तो वाळी,
ज्याच्या पायांसि मुकुटमणिदीपाहीं अराति[12] ओवाळी. १४९

वा नरसेना मिळउनि सीतेचा प्रथम आणवी शोध,
मग दक्षिणवारिधिचें रोधी निजबळपयोधिनें[13] रोध[14]. १५०

सु मनाप्रति मधुप तसा निजचरणाप्रति निघोनि आला जो,
अरिबंधुस ही पद[15] दे, राम म्हणे, 'पंक्तितुंड[16] या लाजो'. १५१

---

१. ज्यावर माझें क्षत्रियत्व अर्थात् पराक्रम अवलंबून आहे त्या बाहुना हि मागा. २. विश्वामित्राच्या यज्ञाचे रक्षण. ३. अहिल्योद्धार. ४. शिवधनुष्याचा भंग. ५. तिचें पाणिग्रहण. ६. परशुरामाचा. ७. पित्याचें—दशरथाचें—( कैकेयीला दिलेल्या वचनाचें ) सत्यत्व रक्षण करण्याकरतां. ८. शूर्पनखेच्या प्राणवायूची घेण्याजाण्याला—श्वासोच्छ्वासाला—अडचण नाक [ कापून ] निवारण करी. ९. सीतेच्या विरहांत. १०. स्त्रैणजनाला. ११. मित्र जो सुग्रीव त्याच्या हितार्थ. १२. शत्रु. १३. आपल्या सेनासमुद्रानें. १४. तीर. १५. [ लंकेचें ] राज्यपद. १६. दशमुख, रावण.

दे प्रथम मान, न वळे जलधी, मग हो न राम कां परसा?
क्षोभे प्रभु; सागर किति? पावे सर्वसहा हि कांप रसा. १५२
वा रिधि रूपी भेटे, प्रार्थी रघुनायका, 'यश तगावें'.
करिता लक्ष हि गावें, फार नवल, सेतु काय शत गावें? १५३
य म जिकडे न पाहे कपिनीं ती राम कांपवी लंका,
गट गट घटकर्ण गिळी, त्याची कोण्ही धरी च ना शंका. १५४
नें गतरुधर कपि, नानायुधधर राक्षस तशांचिया कोटी
मरती घडींत शतशा; संग्रामख्याति ती जगीं मोटी. १५५
मो हाया बहु माया करिति दशमुखादि मत्त मायावी,
भस्म चि व्हावी ती जी भंगाया राजसत्तमा यावी! १५६
भ स्म प्रभुनें केला सानुज सात्मज ससैन्य अहित रणीं,
प्रभु चि परांचा करिती भेकतमांचा न नाश अहितरणी. १५७
ग रुडें अहि, सिंहें गज मर्दावे, सिंह जेंवि शरभानें,
प्रभुनें राक्षस तैसे, हरिति परांचीं पळांत शर भानें. १५८
व ह्नींत शिरुनि कळवी शुचिता उचिता पतिव्रता पतिला,
प्रियविरह चि दे दुःसह तिळ हि दहन तो न तीव्र ताप तिला. १५९
ते थुनि पुष्पकयानीं बसुनि बिभीषणसुकंठसह तूर्ण
आला साकेताला भरतमनोरथ करावया पूर्ण. १६०
वीं णी श्रीस सुखास प्रभुराज्यांत प्रजेसि लव नाहीं,
भवनाहीं स्वर्ग दिला स्मरुं नंदन ही तसें च न वनाहीं. १६१
सु ज्ञांची मर्यादा किति सांगों? भी जडों हि परिटा कीं,
अघ लावी, राम म्हणे, 'सौमित्रे! हे सती च, परि टाकीं'. १६२
दे वी कुश लव दोघे वाल्मीक्याश्रमपदीं सुत प्रसवे,
दोघे दोघे चि तिघां, सोडुनि राजासि पळ तयां नसवे. १६३

---

१. मूर्तिमान्. २. योजनें. ३. वानरांकडून. ४. कुंभकर्ण. ५. पर्वत व झाडें. धरणारे. ६. रामाला. ७. बेडुकरूप काळोखांचा. ८. सर्परूप सूर्य. ९. अयोध्येला १०. कमताई. ११. अडाण्याला. १२. लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांला.

वा ल्मीकिगीत सेविल कोणी श्रीरामचरित जरि लव ही,
तरि यमधर्म तयाचें कर्म पहाया करीं न धरिल वही. १६४

य श बहु हें, वैकुंठा गेला पौरां हि सकट कवि मानी,
येतां साकेताप्रति राम बसे जेंवि सकटक विमानीं. १६५

न व राज्यें आठांचीं,[1] कुश वंशकर प्रसिद्ध सैन्महित,[2]
ज्याच्या सत्संततिच्या गानें श्रवणें हि होय जन्महित. १६६

मो टा [3] निमि ही सत्रीं ऋत्विग्भावें वैरी वसिष्ठातें,
'शक्रमख करुनि येतों, तों थांब', म्हणोनि जाय शिष्टातें. १६७

भ रवसियाचें न किमपि, काळापासुनि न कोण संत्रास[5]?
अन्य मुनि प्रार्थुनि[4] तो निमिराजा चालवी स्वसत्रास. १६८

ग णुनि खळ मुनि म्हणे, "जन करुनि गुरुमहत्त्वहानि[6] मेला, हें
उमजो, तव देह पडो, शाप म्हणायासि 'हा! निमे!' लाहें." १६९

व मला शापविष निमि हि, दोघांचे देह पावले पतन;
कुंभीं वसिष्ठ उपजे, ऋषि निमिदेहासि ठेविती जतन. १७०

ते ऋषि सुर सत्रांतीं आले जे त्यांसि म्हणति, 'हानि [7]मितें
अँर्थे झाली, उठवा, तुमचें फेडील रीण हा निमि तें.' १७१

वा सवमुख सुर म्हणती 'बहु उत्तम', तों चि निमि म्हणे, 'मजला
देहासीं योग नको, ज्ञाता यातें त्यजावया सजला.' १७२

सु र देती त्या निमिला प्राण्यांच्या लोचनांत थारा हो!
तद्देह मथुनि केला सुत, कीं न अराजकव्यथा[8] राहो. १७३

दे वानीं 'मिथिल' 'जनक' 'वैदेह' असीं दिलीं तया नावें,
याच्या वंशींचे नृप जे त्यां [9]गेहीं च मुक्त मानावें. १७४

वाँ[10] ट मखाचा करितां श्रीसीता सांपडे जया कन्या,

---

१. राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांच्या आठ मुलांचीं. २. साधूनीं स्तुत. ३. इक्ष्वाकूचा मुलगा. ४. प्रार्थी. ५. त्रासयुक्त. ६. कुलगुरूच्या मोठेपणाचा नाश. ७. अल्प कारणानें. ८. ज्या राष्ट्रांत राजाचा अभाव आहे असें विघ्न. ९. घरांत ( अरण्याचा वगैरे आश्रय न करतां च ). १०. मंडप.

‘सीरध्वज जनक’ असें म्हणती वंशज्ञ जन तया धन्या. १७५
य श अत्युत्तम यांचें योगेश्वर याज्ञवल्क्यसन्मुनितें
[1]समुपासुनि केलें जें आत्मविचारैककार्य जन्मुनि तें. १७६
[2]नें लिननयननाभिनलिनभव तत्सुत जो महर्षि अत्रि तया
नेत्रापासुनि झाला सोम[3] अमृतमूर्ति मत जगान्नितया. १७७
मो टा मद होय तया, कीं, केला राजसूय नक्षत्रें,
ब्राह्मण ओषधि यांचा पति हा नमिजेल केंवि न क्षत्रें[4]? १७८
भ व्यगुणा गुरुभार्या[5] तारा नेली बळें चि सोमानें,
गुरु मागे, बहुवार प्रार्थी जऱ्हि तऱ्हि न दे चि तो मानें. १७९
गं[6] जवाह, च्छात्र म्हणुनि रुद्र मिळे गुरुसि गुरुसुतस्नेहें[7],
संग्राम तारकामय यांत गळालीं असंख्य बा! देहें. १८०
वं[8] नतनुकडे कवि मिळे गुरुच्या द्वेषामुळें असुरसहित,
कीं, देवारींस तसा गमला सोमास ही असुरस हित. १८१
ते व्हां हें वृत्त कथी विधिला भेटोनि अंगिरा[9] अंगें[10],
विनउनि म्हणे, ‘प्रभो! त्या सोमाला धर्म तूं तरी सांगें.’ १८२
वा रिजभव सोमातें धिक्कारुनि गुरुसि दे स्वयें तारा,
‘[11]अहिताहित गर्भ कसा वाहसि होवूनि आमुची दारा?’ १८३
सु रगुरु असें म्हणे, तो पाठीस चि लागला, तिणें ‘गर्भ
[12]दुःप्रज्ञे! त्यज’ म्हणतां, त्यजिला तो हातचा जसा दर्भ. १८४
दे वांचा गुरु पाहे, ‘[13]कनकनिभ कुमार’ मग म्हणे ‘माझा,’
‘जा जा! तुझा कसा हा?’ तो विप्रांचा असें म्हणे राजा[14]. १८५
‘वा ई! हा कोणाचा?’ ऐसें पुसती ऋषी, न ती सांगे;

---

१. चांगली पूजा करून. २. ब्रह्मदेव. ३. चंद्र. ४. क्षत्रियानें. ५. बृहस्पतीची बायको. ६. इंद्र. ७. गुरूच्या (अंगिरसाच्या) पुत्राच्या (बृहस्पतीच्या) मित्रत्वानें. ८. जलमय आहे तनु ज्याची अशाकडे (चंद्राकडे). ९. बृहस्पतिपिता. १०. स्वतां. ११. शत्रूनें (चंद्रानें) (आहित) ठेविलला. १२. दुर्बुद्धे! १३. सोन्यासारखा. १४. चंद्र.

पुत्र म्हणे, 'दुर्वृत्ते! मौन कशाला? न सांगसी कां गे?' १८६
य लें द्रुहिण तिस पुसे, सांत्वुनि, घालूनि शपथ सोमाचा,
हळु च म्हणे, 'मामाजी! पुसतां तरि सत्य तनय सोमाचा.' १८७
न क्षत्रेशें नेला लावण्याद्भुतसुधासर कुमार,
विधि त्यासि म्हणे, 'पाहुनि तुज मागें बा बुधा! सरकु मार.' १८८
मो दितमानस केला सोम बुधें, यास ती इळा लाहे,
तेव्हां पुरूरवा सुत सन्मणि पुंण्यर्धिनें मिळाला हे. १८९
भ रला पुरूरवा तो हृदयीं देवर्षिगीतगुणपानें;
उर्वशि म्हणे, 'भजावें त्या अविमुक्तासि या स्वकुणपानें'. १९०
ग रसा जाचित होता जो मित्रावरुणशाप तो च हित
वाटे, ती वीज घना या वरि, देवांत पद जिचें महित. १९१
व सुधापति बहुमानी, रोमांचित होय दर्शनें तीच्या,
सर्वोत्कृष्टत्वाप्रति संगें देऊनि हर्ष नेतीच्या. १९२
ते उर्वशी म्हणे, 'मीं सेविन घृतमात्र, उरणक प्राण,
सुरतीं च नग्नदर्शन, या समयाचें करीं परित्राण.' १९३
वा हुनि आण म्हणे 'हें मान्य मला' तो पुरूरवा भूप,
भुलवी तीचें त्याला अद्भुत त्याचें हि तें तिला रूप. १९४
सु रतसुख उर्वशी दे राज्या बहुत चि सुरूप हा तीतें,
लक्ष्मीशध्यानार्थी सुमिथुन सन्मुनि गुरू पहाती तें. १९५
दे वेश म्हणे, 'नाहीं श्री, नसतां उर्वशी सुरसभेला,
सुरदृष्टिमक्षिकांला दावा गंधर्व हो! सुरस भेला.' १९६
धा सववचनें चोरिति रात्रौ गंधर्व त्या उरणकांतें,

---

१. बुध. २. ब्रह्मदेव. ३. पार्वतीश जो शिव त्याचा. ४. ब्रह्मदेव चंद्राचा आजा म्हणून तारेचा आजेसासरा. सासऱ्याला 'मामा' म्हणण्याचा प्रघात आहे. ५. मागें फळो. ६. मदन. ७. पुण्यसंपत्तीनें. ८. मूळ पाठ—**भरिला.** ९. स्वशरीरानें. १०. नेणारीच्या. ११. [ माझे दोन ] बकरे. १२. प्रतिज्ञेचें. १३. विष्णुध्यान हा अर्थ ज्यांचा ते. १४. गुळाची ढेप. १५. मेंढ्यांला.

ती 'क्लीबं[1]' म्हणे राज्या, देवीवच आणिता स्फुरण कां तें? १९७
**य** ष्टि तसी खड्गलता घे, धांवे, न गणि अंधकारा, ते
मेष त्यजिती, पळती, म्हणती, 'फळलासि अंधकाराते[2]!' १९८
**न** ग्न चि गेला होता आवेशें सोडवूनि ते उरण,
आला समीप जों, तों झालें सहसा तडिल्लतास्फुरण[3]. १९९
**मो** हुनि देवी जातां[4], राजा उन्मत्तसा बहु भ्रमला,
पाहे मग तीस कुरुक्षेत्रीं सुसरस्वतीतटीं श्रमला. २००
**भ** जुनि पुन्हा हि भजाया प्रार्थी प्रेमें तयासि ती देवी,
स्त्रीहृदय उग्र कळवी, परि तो नृप तीवरी च मन ठेवी. २०१
**ग** र्भवती हें कळवी, भेटे तेथें चि ती पुन्हां वर्षें,
नृप एकरात्र तीसीं क्रीडे पहिला जसा तसा हर्षें. २०२
**व** सला त्या देवीच्या लोकीं, स्फुरल्या मनीं त्रयी[5] विधिनें
आराधुनियां हरितें, केला पूर्णेच्छ तो दयानिधिनें. २०३
**ते** उर्वशीतनूद्भव सा त्यांत ज्येष्ठ पुत्र तो आयु
हा युद्धीं अहितांतें मेघ करुनि जाहला स्वयें वायु. २०४
**वा** रिधिला घटज तसा गंगेला जो महातपा प्याला,
जह्नुकुळीं सा यद्यश कर दे जातां वहात पाण्याला. २०५
**सु** रसा सुगुण धरापति या चि कुळीं तो कुशांबसुत गाधी,
याची कन्या नामें 'सत्यवती' तिस ऋचीक मुनि साधी. २०६
**'दे'** म्हणतां गाधि म्हणे, 'पंक्तिशत[6] श्यामकर्ण दे वाजी,'
हयदक्षिणा वरुण दे, सुखहेतु ऋचीकभूमिदेवा जी. २०७
**वा** जिसहस्र समर्पुनि दाउनि सामर्थ्य वारिला आँधी[7],
सत्पात्रीं कन्यार्पण करउनि दाटूनि[8] तारिला गाधी. २०८
**यं** मिवर्या[9] त्या विनवी त्याची भार्या सुबुद्धि सत्यवती,

---

१. नपुंसक. २. शंकरा! ३. विजेचा चकचकाट. ४. निघून गेली असतां. ५. कर्मबोधक वेदत्रय. ६. एक हजार. ७. मानासिक चिंता. ८. जबरीनें. ९. तपस्व्यांमध्यें श्रेष्ठ अशाला.

तैसी च तिची माता आपण व्हायास साध्वपत्यवती.[1] २०९
न विफळ व्हाया प्रार्थित दोघींचें कल्पपूर्व[2] तो तरु तें
भगवान् सिद्ध करि उभयमंत्रांहीं[3] कार्यसाधका चरुतें.[4] २१०
मो हें माता कन्याचरुभागामाजि अधिक गुण लक्षी,
निजचरु सुतेसि[5] देउनि मागुनि घेउनि तदीय चरु भक्षी. २११
भ क्षितचरुचा व्यत्यय समजुनि भगवान् म्हणे, 'प्रिये! घोर
तुज सुत होइल, त्या तव मातेला साधु सत्तपा थोर.' २१२
ग डबडुनि म्हणे, 'प्रभुजी! मजला तों घोर सुत नसो, फिरवा,
जिरवा पोटीं माझा अपराध, स्वाकृतक्षमा मिरवा.' २१३
व दला मुनि, "सत्यवति! प्रार्थिसि 'चुकल्यें च' परि न कोपावें,
पौत्र तरि तसा होइल, 'घोर तनय' म्हणसि जरि 'नको, पावें.'" २१४
ते जस्वी सत्यवतीसुत जमदग्नि प्रसिद्ध तो, आर्या
रेणुनृपाची कन्या त्या मुनिची रेणुका सती भार्या. २१५
वा डववरजमदग्निस पुत्र वसुमदादि सेवटिल राम,[6]
ज्या 'भगवदंश' म्हणती, ज्याच्या बाहुद्वयीं अतुळ धाम.[7] २१६
सु न दत्त अत्रिचा जो त्या भगवंतासि भजुनि बलशाली,
अर्जुन ज्या परसेना भेद्या जासि मुद्गरांसि[8] कलशाली.[9] २१७
दे वासह्य दशानन ज्या वीरें नर्मदाह्रदीं क्रीडा
करितां धरिला, हरिला मद, हरिला विक्रमें दिली व्रीडा. २१८
वा हुसहस्र असे वर दुर्लभ पात्रे भजोनि जो दत्ता,
अतुळ प्रताप लोकीं, ज्याची सर्वत्र सारिखी सत्ता. २१९
यँ[10] क्षेश्वरसा अर्जुन मृगयायोगें तपोवनीं जाय,
तो परमतपोनिधिचे श्रीमज्जमदग्निचे धरी पाय. २२०

---

१. उत्तम पुत्रवती. २. 'कल्प' आहे पूर्वी ज्याच्या असा तरु ( कल्पतरु ). ३. [ब्राह्म व क्षात्र या] दोन मंत्रांनीं. ४. शिजलेल्या भाताला. ५. कन्येला—सत्यवतीला. ६. परशुराम. ७. पराक्रम. ८. शस्त्रविशेषाला. ९. घागरींची रांग. १०. कुबेरासारखा.

न  रपतिस बळासह दे भोजन, द्यावें जसें अमृत शक्रें;
  बळ कामधेनुचें तें जाणुनि हरिली बळें चि ती वक्रें[1]. २२१
मो डुनि सन्मर्यादा गेला घेवूनि अग्निहोत्रीतें[2],
  कळतां राम न साहे, साहे जमदग्नि अग्निहोत्री तें. २२२
भ  गवान् राम परश्वधकार्मुकधर[3] सिंहसा उसळला हो!,
  अर्जुन काय? म्हणेना ज्ञाता, 'जय पविपुढें मुसळ लाहो.' २२३
ग  रुडें जसा महोरग परवीरांसकट तो खपविला हो!
  जाणा राम म्हणे, 'खलबलदलनें प्रकट तोख पविला हो.' २२४
व  धिल्या एकें रामें सतरा अक्षौहिणी चमू क्रोधें,
  कदन सहस्रभुजाचें केलें द्विभुजें चि त्या महायोधें[4]. २२५
ते  व्हां अयुत तदात्मज[5] गेले माहिष्मतीस[6] सोडून,
  गिरि करुनि परशिरांचा ये, घेउनि धेनु, कीर्ति जोडून. २२६
बा प म्हणे, 'अपराध स्वल्प, महादंड काय हा युक्त?
  राजवध ब्रह्मवध चि, हो आधीं तीर्थसेवनें मुक्त.' २२७
सु  रधुन्यादि सुतीर्थें[8] सेवाया एक लागला अब्द[9],
  मग राम आश्रमा ये ताताचा चालवूनियां शब्द. २२८
दे  वनदीप्रति गेली आणाया शीघ्र रेणुका तोय,
  दर्शन जलकेलिनिरतचित्ररथाचें[10] सुरा[11] तिला होय. २२९
घा रि भरुनि होमसमय टळल्यावरि भीत रेणुका आली,
  होय पुढें घट ठेउनि काष्ठाच्या पुतळिची खरी आली. २३०
य  मसम समर्थ दंडीं शिवसा सर्वज्ञ मुनि म्हणे, 'मळली[12],
  गंधर्वीं चित्ररथीं झाली किंचित् स्पृहा तिची कळली.' २३१
'न गसा गुरुजन जो हा दुष्टे! त्वां आज रेणु केला गे!'

---

१. दुराचरणी अर्जुनानें. २. कामधेनूला. ३. परशु व चाप धरणारा. ४. महावीरानें. ५. त्याचे—अर्जुनाचे—मुलगे. ६. ही अर्जुनाची नगरी. ७. जमदग्नि. ८. गंगा आदिकरून. ९. वर्ष. १०. जलक्रीडेंत रममाण झालेल्या चित्ररथाचें. ११. मद्य (भान नाहींसें करणारें). १२. पापलिप्त झाली.

जमदग्नि म्हणे, 'मज तव असतीत्वें लाज रेणुके! लागे.' २३२
मो ठ्या क्षोभीं त्याचें रुद्राचें तेंवि दे वपु त्रास,
स्वविध सांगे वसुमत्प्रमुखा तो भूमिदेव पुत्रास. २३३
भ यविकळ सकळ झाले, चळचळ कांपों चि लागले सुत ते,
असते तज्ज्ञें[1], निदेशें त्या चंद्रें सर्व सिंधुसे उतते[2]. २३४
ग डबडला राम न तो, मान्या श्रुतिसी च ती तदाज्ञा त्या;
भ्रात्यांसह मातेतें मारी, सुखवी पित्या तदा ज्ञात्या. २३५
व धितां वचनासरिसे सुत दारें[3], बहु प्रसन्न मुनि होय;
अतितप्त परि निवालें त्या प्रभुचें हृदय तें, जसें तोय. २३६
ते व्हां सत्यवतीसुत[4] 'वर माग' म्हणे तया नमुनि चरण;
राम म्हणे, 'उठवावे मृत सर्व हि, यां नसो वधस्मरण.' २३७
वा गमृतें मुनिच्या ते उठले निद्रेचिया जसे अंतीं,
जमदग्निराम यांचें अत्यद्भुत तेज वर्णिलें संतीं. २३८
सु त अयुत अर्जुनाचे ते, नसतां राम आश्रमीं, आले;
रेणुसुता[5] विनवी, तरि जमदग्निस दुष्ट मारिते झाले. २३९
दे हातें आलिंगुनि पतिच्या, करि शोक रेणुका भारी,
उर ताडुनि 'ये रामा!' यापरि हाका महासती मारी. २४०
वा णी कानीं शिरली जऱ्हि होता राम काननीं दूर,
ये धावुनि, पितृगतितें पाहुनि, करि फार शोक तो शूर. २४१
य मसा खवळे, शवसह बंधूंच्या करुनियां अधीन रडीं
उसळे, म्हणे, 'अरींचीं कापीन असीं च मीं कधीं नरडीं?' २४२
न गरींत शिरे, क्रोधें शत्रुशिरें परशु धरुनि तो कापी;
उष्ण क्षतज[6] पिशाची पिवुनि म्हणति 'पोट भरुनि' तोका 'पी'. २४३
मो टा प्रळय चि करि अरिमूर्ध्यांच्या[7] भीतिदायका ढीगा,
अयुत हि मारुनि परिभवपंकांतुनि कीर्तिगाय काढी गा!. २४४

---

१. त्याला (जमदग्नीला) जाणणारे. २. उतास आले असते. ३. भार्या (रेणुका). ४. जमदग्नि. ५. रेणुका. ६. रक्त. ७. शत्रूंच्या डोक्यांच्या.

भ गवान् पितृशिर जोडी आणूनि, करावया सव, धडास.
हा प्रभु चि, अकरचरण[1] हि अहि घे चि करावयास वध डास. २४५

ग[2] रदहनतसा पेटे, जाणों प्रभुला म्हणे, 'उठा रगडी'.
करि एकवीस वेळा पृथिवी निःक्षत्रिया कुठारगडी[3]. २४६

व धुनि खळ कुरुक्षेत्रीं रक्तें ह्रद नव भरी महावेशें;
रामीं च वीररस बा! हा सोडुनि अन्य कां पहावे शें? २४७

ते[4] जितकुठारपाणि प्रभुसा करणार अन्य न वध रणीं,
यज्ञांत [5]हे द्विजां दे, निर्मी वासार्थ अन्य नव धरणी. २४८

वा डव झाला मग तो श्रीविश्वामित्र गाधिसुत, राया!
याचें यश गाइल जो भववैतरणी[6] सदैव सुतरा[7] या. २४९

सु त शत जे त्यांसि म्हणे, 'ज्येष्ठ शुनःशेफ बंधु मानावा'.
नैकति तयांसि शापी, शेप म्हणति, 'देवरात वानावा'. २५०

दे[8] वीसुत आयु तया नहुषादिक पांच पुत्र जे त्यांचे,
भारी प्रताप जैसे विष्णुभुजांचे सुरारिजेत्यांचे. २५१

वा डववर शौनकमुनि धन्वंतरि[10] देव नृप अलर्क रजी,
ज्यांच्या कुळीं असे हे ज्यांसि म्हणावें सुरेश्वरें हि 'अजी[11]!' २५२

य ति आणि ययाति असे नहुषतनुज सा, तयांत हि ययाती,
मुख्य महाराज भजे श्री जी लोकाधिपांप्रति[12] जया ती. २५३

न हुषतनूज ययाती याची श्रीशुक्रकन्यका भार्या,
आइक ऐसी झाली प्राप्त त्या क्षत्रियासि हे आर्या. २५४

मो टा दैत्येश्वर वृषपर्वा, दे शुक्र देव या नीती,
तत्कन्या शर्मिष्ठा, काव्यसुता[13] होय देवयानी ती. २५५

---

१. हस्तपादहीन. २. विषाग्नीसारखा. ३. परशुरामाचा मित्र. ४. पाजळलेला परशु आहे हातीं ज्याच्या असा. ५. ही पृथ्वी. ६. संसाररूप वैतरणी नदी. ७. तरून जाण्यास सुलभ अशी. ८. शुनःशेफ. ९. उर्वशी—**पंत**. १०. आयुर्वेदाचा प्रवर्तक. ११. अहो. १२. अष्टदिक्पालांप्रत. १३. शुक्राचार्यांची मुलगी.

**भ** व्यगुणा शर्मिष्ठा एका समयीं सखीसहस्त्रयुता,[1]
रम्योपवनीं क्रीडे, होती तीसह चि ती हि शुक्रसुता. २५६

**ग**[2] रगल पाहुनि कन्या गडबडल्या फार पावल्या व्रीडा,
कीं त्या करीत होत्या, वस्त्रें ठेउनि तटीं, जळक्रीडा. २५७

**व** स्त्र गुरुसुतेचें ते राजसुता नेसली गडबडून,
दोघी पितृभाग्यमदें स्नेह बुडविती वृथा बडबडून. २५८

**ते** कविजा तीस म्हणे, 'सिंहीतें लंघिती शिवा[3] दासी'.
राजसुता हि म्हणे, 'कां करिसी तूं भिक्षुकी विवादासी?' २५९

**वा**[4] स हिरुनि शर्मिष्ठा गेली ढकलूनि तीस अंधूंत,[5]
बहु गुणवती शतगुणें जी आवडली पित्यास बंधूंत. २६०

**सु**[6] विधि अकस्मात्तेथें आणी त्या संकटीं ययातीतें,
दे उत्तरीय,[7] काढी धरुनि कर, करूनि तो दया, तीतें. २६१

'**दे** वा! तूं मद्भर्ता' ऐसें कविजा म्हणे ययातीस,
रुचला, पुरुषोत्तमकचशापोक्ति[8] गमे मनीं दया तीस. २६२

**वा** र्ता ऐकुनि आला, तात[9] तया रडत कळविलें कीं तें;
जाय निघुनि जाणों पुर रक्षाया दूर पळवि लेंकीतें. २६३

**य** त्नें वृषपर्वा तो गुरुतें कवळूनि चरण समजावी
'मीं तुमचा चि,' कवि म्हणे, 'परि [10]हे, अपमान मरण सम, जावी.' २६४

**न** मुनि तिला वृषपर्वा प्रार्थी हिमगिरिसुतेसि वासवसा,
'विधुंच्या[11] पादाहीं[12] जलनिधि तुमच्या हा उते शिवास[13] वसा.' २६५

**मो** टा प्रताप दावी श्रीगुरुकन्या म्हणे सखेदा ते,

---

१. एक हजार सखींसह. २. विषकंठ (महादेव). भारतान्तर्गत व भागवतान्तर्गत शर्मिष्ठादेवयानीआख्यान ह्यांत वर्णनविरोध आहे तो जिज्ञासूनीं पहावा. ३. कोल्ही. ४. वस्त्र. ५. विहिरींत. ६. सुदैव. ७. अंगावरचें वस्त्र. ८. पुरुषश्रेष्ठ जो कच त्याचें शापवचन. (आर्या० आदि० अ० १०।१२ पहा) ९. शुक्राचार्य. १०. ही (शर्मिष्ठा). ११. चंद्राच्या. १२. किरणांनीं [पक्षीं] पायांनीं. १३. कल्याणाला.

'यो [1]सानुगा मजकडे द्या तुम्हि कल्पद्रुचे सखे दाते.' २६६
भ य तें असुरकुळाचें वाराया ती तिचे धरी पाय,
सेवी सखीसहस्रासह, न म्हणे 'श्रांत आपुला काय.' २६७
ग णपतिला जसि दूर्वा, तो कवि राज्यासि तेंवि ती ओपी;
शर्मिष्ठेसि म्हणे, 'जा, गाई तिकडे चि ज्या वनीं गोपी.' २६८
व सुधापतिस कवि म्हणे, 'तल्पीं[2] [3]ईतें कधीं न बसवावें,
हें मद्वचन ययाते! स्वमनीं त्वां जागरूक वसवावें.' २६९
ते शर्मिष्ठा [4]गुरुजापुत्र विलोकूनि बहु मनीं रडली,
स्वसखीपति म्हणुनि गळां एकांतीं त्या ययातिच्या पडली. २७०
बा ळक यदु तुर्वसु हे दोघे गुणसिंधु देवयानीचे,
द्रुह्यु अनु पूरु तीचे ज्यां भुलले साधु देव [5]यानींचे. २७१
[6]सु णगुण निघतां चि, नृपा! त्या शर्मिष्ठाययातिसंगाची,
जाय जनकसदना ती, अनिवार्या होय जेंवि गंगा ची. २७२
'दे वि! क्षमस्व' ऐसें प्रार्थी जरि ही चुरी पद ययाती,
न करि [7]प्रसादभाजन करुनि हृदय आपुलें सदय, [8]यां ती. २७३
'[9]वां लिश! विशतु जरा त्वां' ऐसें कोपुनि वदे अविनयातें,
कन्येतें चि प्रेमें बहु मानी तिळ हि तो कवि न यातें. २७४
[10]यें दुतात म्हणे, 'ईची सेवनवांछा असे चि अद्यापी.
अमृत पुरे कां वाटो? व्यसनी भुलतो तथापि मद्या पी.' २७५
न रपतिस कवि म्हणे, 'तुज [11]वय देइल जो सुखें तनुज राहो,
त्यावरुनि काळ कांहीं दूर तुझी त्यजुनि हे तनु जरा हो.' २७६
मो हें न करिति [12]चवघे, पूरु पितृप्रिय करी वयोदानें,
तेणें तृप्त पिता तो केला, चातक जसा पयोदानें. २७७

---

१. सखीजनांसहवर्तमान अशी. २. शय्येवर. ३. शर्मिष्ठेला. ४. देवयानीचे मुलगे. ५. विमानींचे. ६. गुणगूण. ७. कृपापात्र. ८. ययातीला. ९. मूर्खा! वृद्धत्व तुजप्रत प्रवेशो (येवो). १०. ययाति. ११. तारुण्य. १२. मागें २५१ वी गीति पहा.

म जुनि प्रियविषयातें बहुशतवर्षे हि नृप न तो धाला,
'विषयत्यागीं च असे सुख,' ऐशा पात्र होय बोधाला. २७८
ग मन विरागें करितां, सांगे तो कविसुतेसि [1]बस्तकथा,
भुलवी माया, वेश्या जेंवि म्हणुनि नाचऊनि हस्तक [2]थों. २७९
व य देउनि निजपद दे पूरुसुता, दिधलि ते जरा ज्याला.
तदधीन यदुमुखाग्रज, त्या ये ऐसें चि तेज राज्याला. २८०
ते जस्वी पूरुकुळीं राजा दुष्यंत तो करी मृगया,
कण्वाश्रमांत घेउनि गेला बहु लोभवूनियां मृग या. २८१
बा[3] ळा [4]कण्वाश्रमपदभूषा सुमुखी शकुंतळा पाहे,
'मन जाय' म्हणे राजा 'बहुधा हे राजकन्यका आहे.' २८२
सु मुखी पुसतां सांगे, 'मीं गाधिजमेनकासमागमजा.'
भूप म्हणे, 'सुमुखि! [5]तरि च रुचलिस माझ्या मना, नसे भ्रम ज्या. २८३
दे हाचें दान मला दे, आहें पात्र मीं, स्वयें करिती
स्वहित क्षत्रियकन्या, अनुरूप वर स्वयंवरा वरिती.' २८४
वा क्यातें अनुसरली, वरिली गांधर्वनामकें विधिनें,
योगें त्यां हर्ष जसा अधनजना प्राप्त जाहल्या निधिनें. २८५
य श पूरुच्या कुळाचें वाढाया धरि शकुंतळा गर्भा,
राजा स्वपुरा गेला, कण्व जपे तत्सुता जसा दर्भा. २८६
न वल चि तेज तयाचें, कीं बांधी करिहरींस तो दमुनी,
'सर्वदमन' त्या म्हणती, पावुनि तद्विक्रमें प्रमोद मुनी. २८७
मो ह त्यजुनि पतिकडे कण्वानें गौरवूनि पाठविली,
'तूं कोण?' म्हणे राजा, जरि ती शतदा मनांत आठविली. २८८
'भ रत' असें नाम पडे, कीं त्या गगनीं असी उठे वाणी,
'भरण करीं स्वसुताचें, न च अवमानीं शकुंतला राणी.' २८९

---

१. बोकडाची कथा. २. 'था' म्हणणें–तोम्, नोम्, तराणा इत्यादि सताल म्हणणें. ३. मुलगी. ४. कण्वाश्रमस्थानाला भूषण अशी. ५. तूं क्षत्रियकन्या आहेस म्हणून च, असा भावार्थ.

ग　गनोक्तिश्रवणें चि प्रत्यय आला जनासि, मग तीतें
स्वीकारी, त्या भरता वृद्धपणीं दे नृपाळ जगतीतें.　　२९०

ध　सुधेला भरत, तसे बहुधा रुचले न अन्य ते तीस,
करि हयमेध शता[2]वारि अद्भुत तो परम धन्य तेत्तीसे.　　२९१

ते　णें दिधल्या गाई, त्यांच्या ब्राह्मण सहस्र बद्वातें[3]
वांटुनि घेती, गेला मद दात्यांचा समस्त तद्वातें[4].　　२९२

वा[5]　रण कनकविभूषित वर दे विप्रांसि लक्ष चवदा हो!,
दानीं ज्ञानीं शुद्धीं युद्धीं भरतासि दक्ष च वदा, हो!.　　२९३

सु　यशा भरतसुत वितथ तद्वंशीं रंतिदेव तो करुण,
भूतदयेतें झाला वश, तरुणीतें नृपा! जसा तरुण.　　२९४

दे　जें अन्न मिळे तें अन्नार्थिप्राणियांसि सारें च,
उतरी वैराग्यबळें षडरींचा तो दिसा[6]दिसा रेंच.　　२९५

धा　रि हि पीतां, नाहीं अन्न म्हणुनि नमुनि पुल्कसा[7] दे हां[8],
राबवि अर्थिजनाच्या भजनांत[9] गृहीत[10]शुल्कसा देहा.　　२९६

य　द्यपि अठ्ठेचाळिस दिवस उपोषित कुटुंबसह होता,
क्षुधिता दे चि मुखींचें, देतो कळवळुनि खग[11] जसा पोतां[12].　　२९७

न　लिनभवादि च्छळिती, 'माग' हि म्हणति प्रसन्न होवून,
त्यांसि म्हणे तो, 'मज भवशीतार्ता विष्णुभजन हो ऊन.'　　२९८

मो　टा वितथ यशस्वी तन्नंदन मन्युनाम, तत्तनय
ख्यात बृहत्क्षत्र, प्रभु हस्ती तत्पुत्र शुद्धधी सनय.　　२९९

भ　व्यगुण हस्तिनापुर त्यापासुनि नाकगर्व[13] साराया,
हस्तीचे पुरुमीढ द्विमीढ अजमीढ तीन गा राया!.　　३००

---

१. पृथ्वीला. २. एकशें तेतीस. ३. बद्वाला. बद्व=१३०८४. ४. त्या गार्यींवरून गेलेल्या वाऱ्यानें. ५. हत्ती. ६. दिवसेंदिवस. ७. अंत्यज जातींतील एका पुरुषाला. ८. रंतिदेव. ९. सेवेंत. १०. घेतलें आहे मोल ज्यानें असा=नोकरासारखा. ११. पक्षी. १२. पिलाला. १३. स्वर्गाचा गर्व.

**गा**[१] जपदसें ज्याचें यश त्या अजमीढाचिया कुळीं कांहीं
ब्राह्मण, कांहीं क्षत्रिय, केली धन्या निजप्रजा याहीं. ३०१
**व** सुधापति द्विमीढ प्रख्यात यवीनरादि तद्वंशीं,
जो तत्प्रतापमहिमा नव्हता एकीं हि तो उणा अंशीं. ३०२
**ते** जस्वी अजमीढ प्रभु हा, याची च बा! दुजी भार्या.
तद्वंशामाजि दिवोदास, अहल्या हि तदनुजा आर्या. ३०३
**बा**! पुत्र अहल्येचा सुमति शतानंद, तत्कुळीं जाला
साधु शरद्वान्नामा, मोही तत्काळ उर्वशी त्याला. ३०४
**सु** टुनि शरस्तंबीं[२] त्या सन्मुनिचें रेत तत्क्षणीं पडलें,
घडलें तत्काळ मिथुन[३]; शंतनुच्या देखतां मनीं जडलें. ३०५
**दे** वें शंतनुनें तें मिथुन प्रतिपाळिलें सुता धन्या,
म्हणति ‘कृपाचार्य’ असें, भार्या द्रोणासि ती ‘कृपी’ कन्या. ३०६
**बा**[४] ढगुण दिवोदासा मित्रायु, तयाचिया कुळीं राजा
सोमक, शतपुत्र तया, ज्यांसि म्हणति साधु ‘सद्यशें साजा’. ३०७
**य** श बहु शतपुत्रांत ज्येष्ठाहुनि ही कनिष्ठपृषताचें,
तत्पुत्र द्रुपद, सुता त्याची कृष्णा[५], सुपुण्य तें साचें. ३०८
**न** रपति अजमीढाचा अन्य तनुज बा! तया म्हणति ऋक्ष,
त्या संवरण, तया कुरु, ज्यासि म्हणति सुकवि ‘अर्थिसुरवृक्ष’. ३०९
**मो** टा कुरुचा महिमा, सुत याचा उपरिचरवसु श्रेष्ठ;
त्याचा बृहद्रथ तनय, बंधूंमध्यें गुणें वयें ज्येष्ठ. ३१०
**भ** व्यगुण अनुज याचे त्यांच्या वंशीं च जाहले चैद्य,
गजसे मदांध जे पर, त्यांच्या हरणार मदगदा वैद्य. ३११
**ग** णपतिसा चि बृहद्रथ परविघ्नांचा[६] निवारिता, भर्ता[७],
यज्ञांचा मग, आधी दीनांचा कामतृप्तिचा कर्ता. ३१२

१. हस्तीच्या पावलासारखें (विस्तृत). २. दर्भाच्या बेटावर. ३. जुळें (एक मुलगा व एक मुलगी). ४. मोठे आहेत गुण ज्याचे असा. ५. द्रौपदी. ६. शत्रुरूप विघ्नांचा. ७. राजा.

व नि ता दुसरी त्याची दैवें[1] ती प्रसवली नृपा! शकलें,
जडलीं हि जराहस्तें,[2] तें[3] चि असें ही करावया शकलें. ३१३
ते जोनिधि कुरु तत्सुत जह्नु, तयाच्या प्रतीप वंशांत;
तच्चक्षु परांत[4] तसें बा! जेंवि सधूम तेज दंशांतें[5]. ३१४
बा ह्लीक शंतनु तनुज, तिसरा गेला वनासि देवापी;
शंतनुतनु हर्षे शिउनि पिउनि सुधेची मनास दे वापी[6]. ३१५
सु त जो बाह्लीकाचा तो नामें सोमदत्त, तत्तनय
भूरिश्रवा प्रतापी, ज्या मत योग्यासि जेंवि दत्त नय. ३१६
दे वनदीच्या पोटीं शंतनुचा ज्येष्ठ पुत्र जो भीष्म
ज्याचा प्रताप तापवि बाहिर आंत हि परां जसा ग्रीष्म[7]. ३१७
वा डवरूप श्रीश[8] प्रकटे पोटीं जिच्या, प्रिया[9] दुसरी
त्या शंतनुराज्याची, जीच्या भगवत्परा कळाकुसरी[10]. ३१८
य श भीष्में मेळविलें मेळउनि जिला अनंत लोकांत
ती सत्यवती प्रसवे तोकद्वय[11] पूज्य सर्वतोकांत. ३१९
न रपति विचित्रवीर्ये स्वीकारी काशिराजतनयांतें,[12]
बहुराजसहस्रांतुनि हरिता भीष्मान्य कोण जन यांतें? ३२०
मो टी आसक्ति स्त्रीसंगीं क्षयरोग लागला खपवी,
कर्मनगा भंगाया न शके पाहोनि लाग लाख पवी. ३२१
भ गवान् व्यास अपुत्रभ्रातृक्षेत्रांत[13] भव्य[14] तनय तिघे
कारि मातेच्या वचनें, ज्यांचे सद्गुण अशेष जन यति घे. ३२२
रा जपुरपति धृतराष्ट्र ज्येष्ठ, दुजा पांडु नृप, तिजा विदुर,
तो कविवर, वच ज्याचें धर्मसुनयसंशयाद्रिचें[15] भिदुर[16]. ३२३

---

१. खंडें. २. जरानामक राक्षसीच्या हातानें. ३. दैव—**पंत.** ४. शत्रुनाशक. ५. माशांचा नाश करणारे. ६. विहीर. ७. उन्हाळा. ८. व्यास. ९. सत्यवती नांवाची. १०. चातुर्य. ११. पुत्रद्वय. (चित्रांगद व विचित्रवीर्य). १२. काशिराजाच्या कन्यांला. १३. निपुत्रिक भावाच्या स्त्रियांचे ठायीं. १४. रूपगुणसंपन्न. १५. धर्म व न्याय यांविषयींचे जे संशय तद्रूप पर्वताचे. १६. वज्र.

**व** निता धृतराष्ट्राची गांधारी प्रसवली शत सुतांतें,
आधीं जे दुग्धाच्या, गरळाच्या हांसले मग उतांतें. ३२४

**ते** जोनिधि पांडुनृपति मृगशापें[1] होय मैथुनीं रुद्ध[2],
तज्ज्येष्ठा स्त्री कुंती जाणुनियां भाव बहु तिचा शुद्ध. ३२५

**बा** ळपणीं दुर्वासा विद्या दे ती च होय बा! दूती,
धर्मासीं[3] कुंतीसीं योग करी वाढवावया भूती[4]. ३२६

**सु** त कुंतीस युधिष्ठिर पहिला, दुसरा हि भीम पवनाचा,
जे साधूंतें वदले देवुनि आनंद नित्य नव, 'नाचा'. ३२७

**दे** वेंद्रापासुनि ही मग पावे अर्जुना पृथा[5] हो! ती;
देवद्विजपूजक जे त्यांचे संकल्प कां वृथा होती? ३२८

**बा**! दुसरी पांडुस्त्री दस्रांपासुनि तया हि माद्रीतें
नकुळ सहदेव, ज्यांची कीर्ति म्हणे 'सि[6]त न' [6]या हिमाद्रीतें. ३२९

**यँ** दुपत्यनुजेपासुनि विजयज[8] अभिमन्यु तव पिता वीर,
जनमेजय पुत्र तुझा[9] करिल पुढें सर्पसत्र हा धीर. ३३०

**न** रपतिययातिचा तनुजनु अनु अनुरूप त्यासि सुत झाला,
म्हणति 'सभानर' ऐसें जे परम कुशळ कुळज्ञ कवि त्याला. ३३१

**मो** टा वंश तयाचा त्यामध्यें रोमपाद नृप, धन्या
ज्या स्वसख्याला दशरथ दे शांता नाम आपुली कन्या. ३३२

**भं** द्रगुणाकर अधिरथ या चि कुळीं, यासि सांपडे कर्ण
जो कुंतीनें त्यजिला, वल्लीनें वाळलें जसें पर्ण. ३३३

**ग** जमदहर सिंह तसे द्रुह्युकुळीं वीर शत्रुमद हारिते
उत्तरदिशेंत झाले म्लेच्छाधिप राजसत्तमापरि ते. ३३४

**व** रगुण तुर्वसुवंशीं भूप करंधम मरुत्त हे महित[11],

---

१. [ किंदमऋषीरूप ] मृगाच्या शापानें. २. प्रतिबंधित. ३. यमासीं. ४. ऐश्वर्य. ५. कुंती. ६. अतिधवळा-**पंत.** ७. सुभद्रेपासून. ८. अर्जुनापासून झालेला. ९. परीक्षितीचा. १०. मंगल गुणांची खाण असा. ११. स्तुत.

दान दिलें तें चि गमे हित ज्यांला, संग्रहीं न हेमें हित. ३३५

ते जस्वी यदुवंश श्रवण करीं आदरूनि नैपुण्य,
जेव्हां या परिसावें सहज चि मिळतें अनंत तें पुण्य. ३३६

बा पा! सहस्रजित्सुत त्या यदुचा ज्येष्ठ, तत्कुळीं दत्ता
आराधुनि अर्जुन करि हरिसा लोकत्रयीं स्वयें सत्ता. ३३७

सु त मधु त्याचा, त्याचा शतपुत्रज्येष्ठ 'वृष्णि' या नावें,
यास्तव 'यादव' 'माधव' 'वार्ष्णेय' म्हणोनि यांसि वानावें. ३३८

दे[2] वगुणसुत क्रोष्टा यदुचा, याच्या कुळांत शशबिंदु,
त्याचें जगदीशाचें जैसें तैसें चि वदति यश विंदु[3]. ३३९

बा पा! त्या राज्याच्या धर्मपरा दशसहस्र ज्या भार्या
प्रत्येक लक्षलक्ष चि सुत पतिपासूनि पावल्या आर्या. ३४०

य श त्यांत साजणांचें, त्यांमध्यें जो पृथुश्रवा राजा
तद्वंशीं ज्यामघ जो स्वगुणांसि म्हणे, 'सुधेसि वारा, जा.' ३४१

न वरी आणुनि न वरी, जेव्हां 'हे कोण?' हें पुसे शैब्या,
भिवुनि म्हणे 'सून तुझी,' पावे पत्नीपुढें अशा क्लैब्या. ३४२

मो टा तेजस्वी परि गडबडला राय, जाय [4]आवांका,
जाणों 'हूं' म्हणता जरि, म्हणति 'वसूं द्या करूनि आ, वांका.' ३४३

भ य जालें जाणुनि ती हास्य करि, म्हणे, 'प्रसिद्ध मीं वंध्या.
[5]पुत्रावांचुनि सून, ब्राह्मण जाला नसे चि तों संध्या'. ३४४

ग डबडला हें पुसतां ज्यामघनृप तो[6]कविप्रसवशील,
सून म्हणे, 'हे ज्यास्तव सति! तूं कीं तो कवि [7]प्रसवसील.' ३४५

व दनांतुनि हे वाणी निघतां सुर म्हणति बा! 'तथास्तु' तिला,
झाला विदर्भसुत तिस, इतुका चि ग्रंथ बहु कथास्तुतिला. ३४६

ते णें रचिल्या वंशीं जाला सुपुरुष महोदय दशार्ह,

---

१. सोनें. २. देवांसारखे गुण आहेत ज्याचे असा पुत्र. ३. ज्ञाते. ४. धैर्य. ५. [ जों ] संध्या नसे चि तों ब्राह्मण जाला नसे चि. [ त्याचप्रमाणें ] पुत्रावांचुनि सून [जाली नसे चि]. ६. बाळश्रोत्रियशुष्कयज्ञस्वभाव—पंत. (?). ७. उत्पन्न करशील.

तैसा चि साधु सात्वत देवावृध तत्तनूज सुदशार्ह[1]. ३४७
वा खाणिति देवावृध तन्नंदन बभ्रु यांसि सुज्ञाते,
जे यांपासुनि तरले ठळक पुरुष सा सहस्र सुज्ञा! ते. ३४८
सु त अन्य सात्वताचा नाम तयाचें नृपा! ‘महाभोज,’
भोज तयाच्या वंशीं ज्यांचें वाखाणिलें महा ओज[2]. ३४९
दे वसम युधाजित्सुत हा सात्वतपुत्र वृष्णि जो त्याचा,
[3]हा ही अनमित्राचा उत्पादक जेंवि सिंधु मोत्याचा. ३५०
वा रिधि गुणरत्नांचा गंभीर क्षोभ यॅन्मना[4] कांहीं
दिव्यां[5] ही विषयांहीं[7] स्वभावस्थेंत ही कधीं नाहीं. ३५१
य[6] ज्वा अनमित्राचा निम्न हि सत्राजित प्रसेन असे
निम्नाचे, दुसरा ही अनमित्राचा तनूज वृष्णि असे. ६५२
न यपटु त्याचा सुत शिनि, त्याचा सत्यक, तयासि सुत झाला,
तो सात्यकि युयुधान, ज्ञाता कवि सर्व तद्यशें धाला. ३५३
मो टा वृष्णिकुळीं च श्वफल्क तैसा चि चित्ररथ जाणा,
ज्येष्ठ श्वफल्कनंदन अक्रूर सुकवि असें मनीं आणा. ३५४
भ व्यप्रभाव सात्वतसुत अंधक तत्तनूज जो पहिला
तो कुकुर, तया भीती पर भूपकभेक हे कॅसे अहिला. ३५५
ग र्वादिदोषवर्जित कुकुरकुळामाजि दीर्घबाहु कवी
तो देवकोग्रसेनाभिध[8] जे यां दों सुतांसि आहुक वी. ३५६
व र्यगुण देवक तया धृतदेवाप्रमुख सात ज्या कन्या
त्या वसुदेवा दिधल्या, संसारामाजि जाहल्या धन्या. ३५७
ते उग्रसेनसुत जे कंसादिक नव, तशा च ज्या दुहिता
कंसाप्रमुखा[9] त्या जे वसुदेवानुज तयां दिल्या सुहिता. ३५८
बा पा! चित्ररथ म्हणुनि कथिला म्यां अनुज जो श्वफल्काचा,

---

१. चांगल्या दशेला योग्य असा. २. तेज, प्रताप. ३. युधाजित. ४. ज्याच्या (युधाजिताच्या) मनाला. ५. स्वर्गीय वस्तूंनीं सुद्धां. ६. यज्ञ करणारा. ७. जसें. (?). ८. देवक व उग्रसेन या नांवाचे. ९. ह्या पांच होत्या.

त्याच्या कुळांत शूर क्षय ज्याच्या कीर्तनें चि कल्काचा. ३५९
सु त दश त्या शूराचे, ज्या समयीं ज्येष्ठ होय वसुदेव,
आनकदुंदुभि ताडिति हर्षें आदित्य रुद्र वसु देव. ३६०
दे वी पृथा, दुजी श्रुतदेवा, श्रुतकीर्तिनामिका अन्या,
चवथी श्रुतश्रवा हो! पांचवि राजाधिदेवि, या कन्या. ३६१
बा ळपणीं च दिली जो परमसखा कुंतिभोज त्यासि पृथा,
मुनिविद्याप्राप्तार्कें कर्ण दिला, टाकिला भिवोनि वृथा. ३६२
यँ क्षाधिपसा श्रीमान् प्रपितामह पांडु जो तुजा, राया!
त्याची ती कुंतिसुता कुंती पहिली पृथा सती जाया. ३६३
न रपा! जें श्रुतदेवाभिध कन्यारत्न वृद्धशर्मा तें
वरि, दंतवक्त्र तत्सुत, दे स्वजना तो प्रवृद्धशर्मातें. ३६४
मो ठ्या प्रेमें त्या श्रुतकीर्तिस कैकेय धृष्टकेतु वरी,
संतर्दनादि तत्सुत पांच निजारातिमृगकुळांत हरी. ३६५
भ व्यगुणजयत्सेनें वारिली राजाधिदेविका भार्या,
विंदानुविंदनामक सुत दोघे प्रसवली महा आर्या. ३६६
ग मली सुधा चि चेदीश्वरदमघोषा श्रुतश्रवा जाया,
प्रसवे ती शिशुपाळा त्या, होय कुमारशाप बा! ज्या या. ३६७
व रशीला पुत्रवती वसुदेवाच्या महासती भार्या
कार्यासि रोहिणी कीं ये क्षितिच्या फार देवकी आर्या. ३६८
ते राम कृष्ण आले त्यांच्या पोटासि, भाग्य अर्णव तें
न चतुर्मुखासि वदवे, कैसें एका मुखासि वर्णवतें? ३६९
वा चा शुद्ध कराया थोडें ही वर्णिलें पुरे यश तें,
वर्णन सरेल कल्पावधि करितां आननांचिया न शतें. ३७०

---

१. पापाचा. २. वाद्यविशेष. ३. ऋषीच्या (दुर्वासाच्या) विद्येनें प्राप्त झालेल्या सूर्यानें. ४. कुबेरासारखा. ५. पणजा. ६. अतिशयित सुखातें. ७. आपल्या शत्रुरूप पशुसमूहांत. ८. मागें तृतीय स्कंध आर्या ६२ वरील १८ वी टीप पहा. ९. पृथ्वीच्या. १०. मुखांच्या.

सु त कीर्तिमत्प्रमुख[1] त्या सप्तम बळ देवकीस, अष्टम हा
भगवान् साक्षात् सन्मुनिधन, यन्नामें सरे चि कष्ट महा. ३७१
दे वकिची जी तनुजा सुमति सुभद्रा मुरारिची[2] अनुजा,
तव आजी ती मनुजाधीशा[3] वरि म्हणति देव ही 'ननु![4]' ज्या. ३७२
वा राया भूमीचा भर, शरणागत अशेष ताराया,
माराया दैत्यांतें अवतरला श्रीनिवास बा राया!. ३७३
य श इंदिरावराचें[5] इंदु[6] चि, जे कवि तयां चकोरांतें
आपण मुदिर चि सुखउनि बहु नाचिवणार भक्तमोरांतें. ३७४

---

१. कीर्तिमत् प्रमुख आहे ज्यांत असे. २. कृष्णाची. ३. राजाला (अर्जुनाला). ४. 'जी!' 'अहो!' ५. लक्ष्मीपतीचें. ६. चंद्र.

श्रीः

# मंत्रभागवत.

## द्वितीय माला.

### दशम स्कंध.

(उपोद्घात)

**श्री** कंठ नारदमुनि प्राचेतस शुक पराशर व्यास
नमिले भागवतोत्तम, जे शर सिवले पैरा[1] शैरव्यास[2]. १
**मा** तापिता स्वकुळगुरु विद्यागुरु वंदिले सदा शीतें[3]
ज्यांच्या निरीक्षिणें भवताप निवे, देति जे सदाशीतें[4]. २
**तु** तिनतिपात्र जगीं जें नमिलें जंगम अजंगम हि स्यां तें,
द्यावी आज्ञा तेणें मज गाया स्वांतरंगमहिम्यातें[5]. ३
**रु** क्मिण्यादि सतींतें नमुनि, पसरुनि स्वदास मीं पदर,
हें मागतों, न पावो मन, जातां प्रभुपदासमीप, दर[6]. ४
**गा** यत्रि! वेदमाते! मीं[7] केवळ तोक विप्रें, या साचें
हें सुख दे, तुज नत जो, पात्र नव्हे तो कवि प्रयासाचें. ५
**यो** गींद्रा आत्रेया नमिलें स्यां सिद्धनायका कपिला,
तैसें चि श्रीसीतारामनस्तोषदायका कपिला. ६
**मु** निकृति नमिल्या श्रीमद्रामायणभारतादि, ज्या माता

---

१. शत्रुरूपी. २. शरव्य=जीवर नेम धरून शर सोडावयाचा ती वस्तु. ३. शीतल (मनाला निवविणाऱ्या अशा) दृष्टीनें. ४. चांगल्या आशीर्वादातें. ५. आपल्यामध्यें रहस्यरूपानें असणाऱ्या ईश्वरी तत्त्वाला. ६. भय. ७. मी विप्र.

पाजिति जगा अपत्या [1]अमृत जसें सोम [2]दक्षजामाता. ७
कुं तीतें माद्रीतें, तत्पुत्रांतें हि सत्वजळधींतें
नमिलें, यच्छस्त्रहतां सद्गति झाली तशां हि मळधींतें. ८
दो षज्ञगुरु श्रीमान्भरतकुलांभोजभानु शांतनव
नमिला विदुर हि, ज्यां दे [3]निजभक्तिमहाविभूति [4]कांत [3]नव. ९
ज [5]ह्नुसुता [6]भानुसुता सरयू इत्यादि आपगा त्यांचें
पदयुग्म वंदिलें म्यां, ज्या हरिती सर्व पाप गात्यांचें. १०
य ज्ञांतें क्षेत्रांतें तीर्थांतें सद्वनां नगां नमनें,
सर्व क्षमा करा हो! वरिलें [7]तीर्थांघ्रिकीर्तिगान मनें. ११
ति लक श्रीमत्पुण्यश्लोकसभेचा उपास्य थोरांचा
नमिला ग्रंथारंभीं श्रीकृष्णवन स्वदासमोरांचा. १२

---

[8]न लिनोद्भव शरणागत [9]दितिदनुजभरार्तभूमिच्या [10]अवना,
प्रार्थी जावुनि देवांसह [11]दुग्धोदधितटीं [12]रमाभवना. १
मो हतिमिर[13]गुरुरविची अभयोक्ति समाधिमाजि आयकिली
विधिनें, जसि मेळविली अधनें आर्जवुनि [14]यक्षरायकिली. २
भ वशकाद्यमरांतें मग [15]परमेष्ठी म्हणे, 'अहो! हरिला
विदित असे, अभय दिलें, जाणा भूभार निश्चयें हरिला. ३
[16]ग रुडासन अवतार क्षितिवर धरणार साधु ताराया,
माराया दुष्टांतें पृथिवीचा भार सर्व वाराया. ४

---

१. मोक्ष [ पक्षीं ] सुधारस. २. दक्षाच्या सत्तावीस कन्या तारका सोमाला—चंद्राला—दिल्या होत्या. ३. आपली भक्ति हें च नूतन असें महावैभव. ४. कृष्ण. ५. गंगा. ६. यमुना. ७. तीर्थं आहेत चरणीं ज्याच्या अशा देवाचें गीत. ८. ब्रह्मदेव. ९. दैत्यदानवांच्या भारानें पीडलेल्या पृथ्वीच्या. १०. रक्षणाकरितां. ११. क्षीरसागराच्या तीरावर. १२. विष्णूला. १३. अज्ञानरूप अंधकाराला गुरुरूप जो रवि त्याची (विष्णूची). १४. कुबेराची किल्ली ( अर्थात् त्याच्या खजिन्याची). १५. ब्रह्मदेव. १६. विष्णु.

व पु धरुनि मनुष्यांचें सुर हो ! यदुच्या कुळीं भजा देवा,
देवस्त्रियादि भूवरि उपजोत, करोत विष्णुची सेवा. ५
ते चि कृतार्थ प्रभुची सेवा जे प्रेमयुक्त करितील,
सुरगुरुं[1]वरसहवासें अतिदुर्लभ शर्म कीर्ति वरितील. ६
वा हिलि आहे जेणें स्वफणाग्रीं हे वसुंधरा सकळा,
अवतार धारिल आधीं तो शेषप्रभु [2]जगन्निवासकळा. ७
सु रकार्यार्थ प्रभुची आज्ञा मानूनि साधु तन्माया[3]
स्वांशें मनुष्यलोकीं न सम[4]यलंघन करील जन्माया.' ८
दे उनि धीर धरेला तीच्या चिंताज्वरासि पळवूनि,
स्वस्थाना विधि गेला प्रभुची आज्ञा सुरांसि कळवूनीं. ९
वा [5]सवतुल्यश्री श्रीयदुकुळपति शूरसेन [6]नृपयोगी,
जो [7]शूरसेनमाथुरविषयांतें आक्रमूनियां भोगी. १०
य दुकुळपाळक पूर्वीं ज्या श्रीमथुरापुरींत तो नांदे,
यदुवंशराजधानी त्यापासुनि ती प्रमोद सुजनां दे. ११
न गरींत त्या चि दिधली वसुदेवा देवकी, तिला मिरवी.
कंस स्वरथीं बसउनि सारथि होवूनि कौतुकें फिरवी. १२
मो टा उत्सव करितां मिरवित असतां वधूवरांसि सुखें,
म्हणत असतां जनांचीं कौतुक पाहोनि 'धन्य ! धन्य !' मुखें, १३
भ गिनीप्रियकरकंसाप्रति त्या परमोत्सवीं नभोवाणी,
ऐसें सहसा सांगे, चित्तांत विरोध तत्क्षणीं आणी. १४
'ग र्भ इचा जो अष्टम तो काळ तुझा विनिश्चयें जाण,
मूर्खा ! सावध हो रे ! कंसा हरणार कीं तुझे प्राण.' १५

---

१. देवांमध्यें परमपूज्य अशाच्या (कृष्णाच्या) सहवासानें. २. विश्वाचें निवासस्थान जो (वासुदेव) त्याचा अंश. ३. त्याची (हरीची) शक्ति. ४. अवसराचें अतिक्रमण. ५. इंद्राच्या बरोबरीचें वैभव ज्याचें तो. ६. राजर्षि. ७. शूरसेन व माथुर या प्रांतांला.

**वं** त्सळ[1] होता परि तो भोजपति[2] क्रूर होय वाणीनें,
भगिनीवधार्थ कवळी कौळव्याळाभ[3] खड्ग पाणीनें. १६
**ते** देवकी पतीनें तद्गर्भार्पणविनिश्चयोपायें
वांचविली, आठवितां सूचविली युक्ति विष्णुच्या पायें. १७
**वा** टे कंसासि असें कीं, 'ईचे सर्व गर्भ मारीन,
मग चिंता काय ? खरें वदतो हा सांधु, मृत्यु वारीन.' १८
**सु** तदान मान्य करितां जाय गृहा कंस शौरि[4] ही सुकवी,
झालें होतें प्राप्त स्वप्राणव्यसन, परि सुखें चुकवी. १९
**दे** वककन्या देवी मग पुत्र प्रथम जेधवां प्रसवे,
शौरी कंसाप्रति दे, कीं साधूला मृषोक्तिची[5] न सवे[6]. २०
**वा** णी मृपा न केली, वसुदेवीं कंस यास्तव द्रवला,
'द्या आठवा चि, हा न्या' ऐसें बोलोनि तो पदीं लवला. २१
**य** द्यपि अभय दिल्हें तरि त्याचा तो साधु न धरि विश्वास,
खल चैलमति[7] अतितरखर[8], ऐसें ठावें असे चि विश्वास. २२
**न** वल करीत गृहा जों शौरि अपत्यासि ने अशांत मुनी,
नारद सुरगुह्य कथी कंसासि, विचारितां पदें नमुनीं. २३
'**मो** हुनि आप्तपणें तुज वेढुनि दितिदनुजशत्रु आहेत,
त्वद्वध शीघ्र करो नरतनु हरि, यांच्या मनांत हा हेत. २४
**भ** रले व्रजांत[9] निर्जर[10], मथुरेंत हि वृष्णि गोप हे सारे
देव चि, यांच्या भार्या देवी, हो सावधान कंसा रे!. २५
**ग** वळी नंदादिक जे वसुदेवप्रमुख वृष्णि जे राज्या!
हे सर्व हि सुर, कथिलें सत्य चि, कीं, भजसि तूं पदा माझ्या.' २६
**व** दला असें यथार्थ त्रिदशांचा[11] कार्यभाग साधाया,
गेला मुनि, मग लागे तो कंस हि यादवांसि बांधाया. २७

---

१. कृपाळु. २. कंस. ३. कृष्णसर्पाप्रमाणें आहे तेज ज्याचें असें (अत्यंत उग्र). ४. वसुदेव. ५. असत्य भाषणाची. ६. संवय. ७. चंचल आहे बुद्धि ज्याची तो. ८. अत्यंत उग्र, क्रूर. ९. गोकुळांत. १०. देव. ११. देवांचा.

**ते** णें कंसें वधिला प्रथम सुत तसे चि आणखी पांच,
भगिनीपति वांचविला जाणों घेऊनि पुत्रधनलांच. २८
**वा** हे पायीं बेडी चित्तीं चिंता सदार[1] वसुदेव,
कारागृहीं म्हणे मनिं, 'हरिना कां आमुचे हि असु देव?' २९
**सु** रशत्रु [2]काळनेमी आपण, वध विष्णुनें रणीं केला,
हें कळतां कंस वरी देवुनि निजदुर्मतीस [3]भाकेला. ३०
**दे**[4] हात्मबुद्धि तो खळ अवलंबुनि कुमतिच्या चि हातास,
राज्य करी बद्ध करुनि [5]यदुभोजांधकपतीस तातास. ३१
[6]**वा** डव जसा समुद्रीं, कंस तसा यदुकुळीं महापाप,
[7]बकबक्यरिष्ट इत्यादिक खळ खवळउनि दे सदा ताप. ३२
**य** त सुचेना म्हणउनि यादव गेले पळोनि परदेशा,
किति त्यासि शरण गेले, परि चित्तें [8]श्रीवरा चि वरदेशा. ३३
**न** म्र जयाच्या चरणीं योगीश्वर तो [9]अनंत मग तीच्या
पोटा आला सप्तम गर्भ, हराया भरासि जगतीच्या. ३४
**मो** हघ्न विश्वसाक्षी भगवान् [10]स्वपदाश्रितार्ति जाणोनी,
त्या काळीं मायेला सांगे चित्तांत कार्य आणोनीं. ३५
"[11]**भ** द्रे! संप्रति आहे शौरिस्त्री देवकी सुगर्भवती,
तीच्या उदरीं [12]साक्षान्मद्धाम अनंत जाणत्ये [13]भवती! ३६
**ग** र्भासि तिच्या, [14]नंदव्रजविवरीं शौरिच्या स्त्रिया वसती,
त्यांमाजि, रोहिणीच्या उदरीं घालीं, दुजी तसी न सती. ३७

---

१. पत्नीसह. २. या नांवाचा एक सहस्रबाहु दैत्य. ३. वचनाला देऊन (जणूं काय वाग्निश्चय च करून). ४. देह हा च आत्मा अशी ज्याची बुद्धि तो. ५. यदु, भोज व अंधक यांच्या स्वामीला म्हणजे स्वपित्याला. ६. वडवाग्नि. ७. बक (पूतनेचा भ्राता) बकी (पूतना) व अरिष्टासुर. ८. वर देणारांमध्यें श्रेष्ठ अशा लक्ष्मीपतीला च. ९. शेषनामक नाग. १०. आपल्या पायांच्या ठिकाणीं जे आश्रित त्यांची पीडा. ११. मंगले! १२. प्रत्यक्ष माझें निवासस्थान. १३. तूं आर्या. १४. नंदाच्या गोकुलरूप विवरांत.

वं[1] रदर्षभ मीं मग त्या देवक्युदरीं सिरेन जन्माया,
जन्म यशोदाजठरापासुनि धरिसील तूं हि मन्माया. ३८

ते[2] जश्रीविद्याजयकाम तुला सर्व साधु भजतील,
त्वद्यश गाया मायादेवि! महाकवि मुनी हि सजतील. ३९

बा ळासि रोहिणीच्या 'संकर्षण' 'राम' 'बळ' असीं नावें,
त्वद्विक्रमें चि होतिल, हें यश जोडावया तुवां जावें." ४०

सु रवरगुरुची आज्ञा घेउनि वंदूनि पाय ये महि[3]तें,
करि सर्व भगवदुक्त प्रकट कराया यशें जगन्महि[4]तें. ४१

दे वक्युदर रिकामें होतां पौरांत[5] जाय ती वार्ता,
म्हणती, 'गर्भ गळाला; हा! किति सोसील ताप शोकार्ता[6]? ४२

वा स तदुदरीं केला साधुसुखार्थ स्वयें चि त्या अजितें,
म्हणतो प्राचींत[7] जसा चंद्र तत्तेज परि उणें अजि[8]! तें.' ४३

य ज्ञपति प्रभु पोटा येतां बहु तेज देवकीस चढे,
आला विष्णु असा तो कंस मनीं तर्क करुनि फार कढे. ४४

'न व्हतें तेज असें यामागें, मारीन तरि महा पाप,
काय करूं?' कंस म्हणे, 'शिरला सदनांत दुखविला साप.' ४५

मो[9] दप्रदपद भगवान् दुष्टाला होय फार तापकर,
श्रांत[10] न लावी कुवलयदामा[11], कल्पूनि कृष्णसाप, कर. ४६

भ यविकळचित्त तो जग सारें पाहे जगन्निवासमय,
जो ये त्यातें त्यातें भावी[12] निजमृत्युचा चि हा समय. ४७

ग र्भस्थीं श्रीशातें ब्रह्मा शिवशक्रदेवमुनियुक्त
नमुनि स्तवी प्रभूत[13], प्रेमें गुण गाय, गाति ज्यां मुक्त. ४८

---

१. वर देणारांत श्रेष्ठ असा २. पराक्रम, संपत्ति, विद्या व यश यांची इच्छा करणारे. ३. पृथ्वीवर. ४. जगांत पूज्य अशीं. ५. पुरवासी जनांत. ६. दुःखानें पीडित अशी (देवकी). ७. पूर्वदिशेंत. ८. अहो! ९. आनंददायक आहेत पाय ज्याचे तो. १०. श्रम पावलेला. ११. नीलकमलांच्या माळेला. १२. मानी. १३. बहुत.

व णुंनि गुरुला[1] गुरुच्या तो मातेला[2] हि फार कवि मानी,
जाय स्वस्थानाप्रति गात चि यश विश्वतारक विमानीं. ४९

ते देवककुलभूषा[3] मूर्तब्रह्मासि सुसमयीं प्रसवे,
रोहिण्यृक्षीं[4] भाद्रीं[5] रात्र्यर्धीं जेथ दुर्गुणा नसवे. ५०

वा जविलीं देवांहीं, दुंदुभिवीणामृदंगशुभवाद्यें,
होतां प्रकट श्रीमद्देवक्युदरांतुनि त्रिजगदाद्यें. ५१

सु मनें वर्षति सुरमुनि, वर्णिति गंधर्व अप्सरा सहित,
गाती, नाचति, म्हणति, ‘प्रभु झाला प्रकट, करिल दासहित’. ५२

दे[6] ही सर्व निवाले, त्या समयीं अग्नि[7] जाहले जागे,
वाहति वायु सुखप्रद, हळुहळु घन गर्जना करूं लागे. ५३

वा[8] रिदनील चतुर्भुज, दरचक्रगदाब्जपाणि[9] मूर्त सुख,
पीतांबरवनमाळाकौस्तुभधर सुस्मितामृताढ्यमुख[10]. ५४

य[11] तिदुष्प्रेक्ष्यब्रह्मा पाहति वसुदेव देवकी सुचिर[12],
जें कुंडलमुकुटकटकमुद्रांगदरत्नहारधर[13] रुचिर. ५५

न मुनि स्तविति प्रभुला प्रेमें वसुदेवदेवकी दोघें,
म्हणति, ‘निवालों या तव दृक्पातें[14] जेंवि अमृतसरिदोघें[15]. ५६

मो ल नव्हे चिंतामणिकोटि रजाचें[16] हि ज्यांचिया[16] पाय[16],
ते कीं हे वर्णावे आम्हीं निजभाग्य निजमुखें काय? ५७

भ य कंसाचें वाटे, झांका निजरूप हें, न दावा हो!,

---

१. वसुदेवाला. २. देवकीला. ३. देवकाच्या कुळाला भूषणभूता. ४. रोहिणी नक्षत्रात. ५. भाद्रपदमासीं. ६. देह ज्याना आहेत ते ( प्राणी ). ७. स्मार्ताग्नि व श्रौताग्नि. ८. मेघश्याम. ९. शंख, चक्र, गदा व कमल हीं आहेत ज्याच्या हातांत तो. १०. सुहास्यरूप अमृतानें युक्त आहे ज्याचें मुख तो. ११. यतींला हि दिसण्यास अवघड अशा ब्रह्माला. १२. बहुत काल. १३. कुंडलें, मुकुट, वलय, आंगठी, केयूर व रत्नांचा हार हीं सर्व धारण करणारें. १४. दृष्टीच्या पडण्यानें. १५. अमृताच्या नदीच्या ओघानें. १६. ‘ज्यांचिया पायरजाचें हि’—अन्वय.

साक्षीप्रति[1] कळवाया स्वाधि[2] स्वमुखें किती वदावा हो!?' ५८

ग जवरवरद हरि म्हणे पूर्वकथा कथुनि, "जन्म हें तिसरें[3]
तुमच्या पोटीं झालें; जरि हि विसरलां तुम्हीं, न मीं विसरें. ५९

व ळखावें मज आधीं, प्राग्जन्मस्मरण मग तुम्हां व्हावें,
प्रकट करुनि दाखविलें हें दिव्य स्वात्मरूप या भावें. ६०

ते चि घडेल गति तुम्हां 'ब्रह्म' म्हणुनि 'पुत्र' म्हणुनि वा मजला
ध्यातां स्नेहें, पावे जीतें ज्ञानी मदंघ्रिला[4] भजला. ६१

वा रीन ताप सारे, धीर धरा, हें कळों न द्या अन्या,
मज नंदगृहीं ठेउनि त्याची घेऊनि या तुम्हीं कन्या." ६२

सु चउनि कर्तव्य मग प्राकृतशिशुरूप[5] तत्क्षणीं झाला,
कंसापासुनि न तसा विरहापासूनि शौरि बहु भ्याला. ६३

दे वा देवाज्ञेनें उचलुनि वसुदेव जैं निघे जाया,
त्या चि समयीं व्रजांत प्रसवे मायेसि गोपपतिजाया[6]. ६४

वाँ[7] हविलें व्रजमथुरावासिजनज्ञान उपजतां चि तिणें,
हरिधारिशौरिचें[8] चि न हरिभक्तिविणें वृथा म्हणोनि जिणें. ६५

य त्नाविणें चि उघडे जें तें दृढ बंधनालय[9]कपाट,
करि हरिदृष्टि स्वाश्रितगतिरोधक[10] सर्व संकट सपाट. ६६

न निजति दिवा[11] हि, काराद्वारांत चि जागती जसे कुतरे,
ते एकदा चि निजले; जाणों सर्वांसि चारिले धुतरे[12]. ६७

मो हांत योगमाया[13], त्यांतें पंकांत दगडसे बुडवी,
'हूं' हि न म्हणती केवळ मार्गीं जे ज्यांसि तो तमीं तुडवी. ६८

---

१. ( सर्व–) द्रष्ट्याला. २. आपली चिंता. ३. पृश्निगर्भ, वामन व कृष्ण म्हणून 'तिसरें'. ४. माझ्या चरणाला. ५. सामान्य बालकाचें आहे रूप ज्याला असा. ६. गोपांचा स्वामी (नंद) त्याची भार्या (यशोदा). ७. नाहींसें केलें. ८. हरीला धारण करणाऱ्या वसुदेवाचें. ९. कारागृहद्वार. १०. स्वभक्तांच्या उन्नतीला प्रतिबंधक. ११. दिवसा. १२. धोत्र्याचें बीं. १३. ईश्वराची अज्ञेय शक्ति.

भ गवंतावरि धरुनि [1]स्वफणासुच्छत्र शेष करि सेवा,
सिकवि असें कीं, 'हरिनें दिधल्या भाग्यैंकरूनि हरि सेवा'. ६९

ग जें घन तो दुंदुभि, यात्रेंत च्छत्रधर अही, नि[2]वटी
घनतिमिराप्रति मार्गी, शं[3]पा ती प्रभुपुढें गमे दिवटी. ७०

व षें घन, [4]यमभगिनी पूरभरें फार दाटली होती,
दे तदपि वाट विभुला, सेवा[5]र्हा तैं चि वाटली हो! ती. ७१

ते जेंकरूनि [6]पूर्वी दे वाट नदीपती जसी रामा,
प्रभुला, ऐकुनि ऐसें, पथ त्याची देइना कसी [7]रामा? ७२

वा तासम वेगानें, गेला नंदव्रजासि वसुदेव,
ठेवाया मित्रगृहीं, तें केवळ दुर्लभ [8]स्ववसु देव. ७३

सु प्त सकळ जन, याला कोण्ही हि न 'कोण तूं?' असें हटकी,
निजली असे यशोदा, निजल्या सेवेचिया हि ज्या बटकी. ७४

दे व यशोदाशयनीं ठेउनि घेऊनियां तिची तनया,
जाय [9]यथागत मार्गी, स्वाश्रुभरेंकरुनि वाहवीत [10]नया. ७५

वा[11] टेनें ज्या आला कारागारा तिणें चि तो गेला,
सुटला होता पूर्वी, परि पुनरपि बद्ध होवुनीं ठेला. ७६

य मुना दे पथ येतां देति कपाटें हि पथ तसीं, मग तीं
लागति; भूतें चुकतीं आज्ञेला तरि जडें कसीं तगतीं? ७७

न ष्टज्ञान द्वारप आल्यावरि शौरि जाहले जागे,
ज्या काळीं बाळध्वनि ती [12]मायादारिका करूं लागे. ७८

मो हापासुनि सुटले कारागृहपाळ बाळरुदितातें
ऐकुनि कथिति नृपातें सज्जनतापार्थ नित्य उदि[13]तातें. ७९

भ गिनीप्रसूतिवार्ता कानीं पडतां चि तो त्यजी शयन,

---

१. आपल्या [ सहस्र ] फणांची चांगली छत्री. २. विध्वंसी. ३. विद्युत. ४. कालिंदीनदी. ५. सेवा करण्यास योग्य. ६. रावणवधसमयीं. ७. स्त्री (नदी). ८. आपलें धन. ९. आल्या मार्गानें. १०. नद्या. ११. द्वारानें. १२. योगमायेचें रूप धारण करणारी बालिका. १३. तत्पर असलेल्याला.

'आला काळ' असें मनिं मानुनि झाला भयें [1]भ्रमन्नयन. ८०
ग डबडला चित्तीं परि गेला धावोनि [2]सूतिकागेहा,
पडला पथांत शतदा, सांवरितां [3]वसन [4]कच हि भागे हा. ८१
व ज्रहृदय तो जातां त्यासि म्हणे देवकी, 'नृपा! सून
हे सत्य तुझी दादा! निश्चय केला चि आजपासून. ८२
ते पुत्र मारिले त्वां दे सेवटिली तरी मला कन्या,
अन्याय स्त्रीहत्या, दे जीवितदान, कीर्ति हो धन्या!' ८३
वा घ हि वळता परि खळ वळला नाहीं, तिला चि बहु दापी,
पोटीं धरूनि रडतां कन्या वोढूनि घे बळें पापी. ८४
सु मनोहरचरणयुगीं धरुनि शिळेवरि वधार्थ जों हाणी,
तों ती उडोनि गगनीं जाय; तिला धरिल काय खळपाणी? ८५
दे वी प्रभुची अनुजा दि[5]व्यायुधशोभितायताष्टभुजा,
सुर[6]मुनिनुता [7]वराकृतिभूषा तेजा धरी, धरी प्रभु ज्या. ८६
वा निति सुरमुनि, पूजिति येउनि तत्काळ अप्सरा दासी,
हर्षें नाचति गाती गंधर्वपती नमूनि पादासी. ८७
य श ऐसें अतुळ जिचें ते श्रीदेवी म्हणे, 'मला कंसा!
मंदा! मारूं पाहसि; वायस जिंकील काय रे! हंसा? ८८
न ष्टा! मज मारुनि फळ काय? तुजा काळ वेगळा आहे,
कोठेंतरि वाढतसे, वधिल तुला, उक्ति मनिं धरीं गा! हे.' ८९
मो हुनि मन कंसाचें बहु नामें धरुनि निर्मळें देवी
बहुतां स्थानीं नांदे, कल्पलता वांछिलीं फळें दे, वी. ९०
भ गवत्युक्तिश्रवणें अतिविस्मित होय तो म्हणे, 'हाय!'
जाय शरण भगिनीतें शौरीतें मुक्त करि, धरी पाय. ९१
'ग र्भ वृथा म्यां वधिले गगनोक्तीचा धरूनि विश्वास,

---

१. फिरत आहेत डोळे ज्याचे असा. २. बाळंतिणीच्या घरांत. ३. वस्त्र. ४. केश. ५. दिव्यायुधानीं अलंकृत आहेत अष्ट भुज जिचे अशी. ६. देवर्षिस्तुता. ७. उत्तम आहेत आकृति व अलंकार जिचे अशी.

चुकलों, क्षमा करा मज, भस्म न तुमचे करोत निश्वास.[1] ९२

व सुदेव देवकी त्या पश्चात्तापाकुळासि[2] सुखवीती,
सज्जन कृतागसांचें,[3] केल्यावरि नमन, न मन दुखवीती. ९३

ते थुनि तदनुज्ञेनें[4] गेल्यावरि रात्रिवृत्त[5] तो, जपती
जे सदुपद्रवमंत्राप्रति,[6] सांगे त्यां प्रियांसि भोजपती. ९४

'बा ळ अनिर्दश[7] निर्दश मारावे, त्यांत सांपडेल अरी,
गोब्राह्मण मारावे, हे हरिचें मूळ, हे हि युक्ति बरी.' ९५

सु रशत्रु मंत्र ऐसा सांगति, दुष्टासि फार तो रुचला;
दे आज्ञा या कार्या, कंस म्हणे, 'विजयलाभ होउ, चला.' ९६

दे शोदेशीं शिरले खळ जे गोविप्रबाळहननाश,[8]
कंसप्रिय असुर करिति नानारूपें धरूनि जननाश. ९७

वा जी बक अजगर खर एवं बहुवेष दुष्ट ते लोकीं
संचार करिति जिकडे, बुडविति तिकडे प्रजा महाशोकीं. ९८

य ज्ञविनाश ब्राह्मणबाळकवध करिति, काय सांगावें?
खळगुणकीर्तन राहो; त्यागुनि हंसां न वायसां गावें. ९९

न[9] वपुत्रोत्सवपरवश नंद करी जातकर्मकविधीतें,[10]
सुखवि वदान्य[11] मिळाला पूर्वीं तैसा कधीं हि न विधीतें. १००

मो दानें गोदानें पुष्कळ दे ब्राह्मणांसि यक्षपसा,
कनकें अर्थिजनाचा भरि, सांडे तो हि, दानदक्ष पसा. १०१

भ रिला वरुनि यशोदापुत्रत्व व्रज[12] जसा सदानंदें,

---

१. [दुःखानें आलेले दीर्घ] उच्छ्वास. २. पश्चात्तापानें व्याकुळ झालेल्याला. ३. केला आहे अपराध ज्यानीं अशांचे. ४. त्यांच्या (देवकीवसुदेवांच्या) परवानगीनें. ५. रात्रीं घडलेला वृत्तांत. ६. उत्तम अशा उपद्रवांच्या मंत्राला. ७. ज्यांला जन्मून दहा दिवस झाले नाहींत असे. ८. गाई, ब्राह्मण व मुलें यांच्या हननाची इच्छा करणारे. ९. नूतन पुत्राच्या उत्सवांत निमग्न झालेला. १०. जातकर्म ज्याच्यांत आहे अशा विधीला. ११. दानशील. १२. गोकुळ (गोकुळवासी जन).

अर्थिव्रज[1] हि धनानें, होता चि अपूर्ण जो सदा, नंदें. १०२
ग वळी सुज्ञ सुभग बहु, कीं, गेला श्रीनिवास त्यांजवळी,
स्वपतिमनःप्रिय म्हणुनि श्रीचा करुणाकटाक्ष त्यां कवळी. १०३
व निता वांटिति कुंकुम हळद विडे शर्करा फळें, गाती,
शुकमुनि म्हणे, 'नृपा! श्री पडली त्यांच्या गळां बळें गा! [2]ती.' १०४
ते ळ हळद धेनुवृषभवत्सां लाविति, कधीं हि न वनीं तें;
गोपी गोप विनोदें लिंपिति अन्योन्य शुद्ध नवनीतें. १०५
वा हति सर्वत्र [3]व्रजरथ्यांत क्षीरपूर दूरवर,
आनंद दे अपरिमित सर्वांसि श्रीश दानशूरवर. १०६
[4]सु त्रामा नंद गमे, वन नंदन, अमरपुर चि तो घोषें[5],
स्त्रीपुरुष देवदेवी, गमति स्वर्धेनु[6] धेनु निर्दोष. १०७
दे ती आशीर्वाद ब्राह्मण, गाती सुमंगळें गोपी,
नंदगृहीं पशुपांस[7] हि मूर्तिमती मुक्ति जाहली सोपी. १०८
वा र्षिक कर द्याया मग मथुरेला नंद जाय, त्या मित्रा
भेटे शौरि, वदे प्रिय, पुत्रांसि पुसे, कथा कथी चित्रां[8]. १०९
'य त्नें तूं चरमवयःप्राप्तात्मजरक्षणीं[9] असें जागा,'
वसुदेव म्हणे, 'बहुधा होतिल उत्पात[10], गोकुळा जा, गा!'. ११०
न करी नंद विलंब, प्रियसुहृदातें पुसोनि शीघ्र निघे;
वसुदेव ऋषी च असें जाणे, म्हणवूनि धाक तो मनिं[11] घे. १११
मो डी जो [12]स्वपदस्मृतिरतजनविघ्नांघ्रि [13]सर्वखळजिष्णु
तो आठविला नंदें सुतकल्याणार्थ विश्वगुरु विष्णु. ११२
भ व्य स्वरूप घेउनि कपटें तों पूतना व्रजीं आली,

---

१. याचकसमूह. २. श्री=ऐश्वर्य, लक्ष्मी. ३. गोकुळांतील रस्त्यांत. ४. इंद्र. ५. गोवळवाडा. ६. कामधेनु. ७. गाईबैल वळणाऱ्या गवळ्यांना. ८. आश्चर्यजनक. ९. वृद्धपणीं झालेल्या मुलाच्या जपणुकींत. १०. [भूमिकंप, अग्निप्रलय यांसारखे] अनर्थ. ११. मनिं. १२. आपल्या पायांच्या ठिकाणीं चिंतनानें रममाण झालेले जन त्यांच्या विघ्नांचा पाय मोडणारा. १२. अखिल दुष्टांला जिंकणारा.

व्यालीपरीस उग्रा, जी केवळ मृत्युची स्वयें आली. ११३

ग मली व्रजवासिजना शोधीत असेल हे पतीस रमा,
भुलले गोप पहातां गोपी हि, तसी च रुचि[1] तिची परमा. ११४

व रि बरवी, अत्युग्रा अंतरीं, कोशांत[2] जेंवि तरवारी,
वारी[3] न रोहिणी[4] तिस न यशोदा, कोण हो! इतर वारी? ११५

ते सदनांत अशंक चि शिरली, कळलें न पाहतां नयनीं,
साक्षी असदंतक[5] विभु निद्रितशिशुभावें[6] दाखवी शयनीं. ११६

बा हेरि असें दावी, गोपी[7] दायी च, माय तोकाची
साची आपण चि अहों; भाव प्रकटील काय तो काची[8]? ११७

सुं[9] साहि रज्जु मानुनि घ्यावा जैसा भ्रमोनि निजघाता,
प्राकृत शिशु मानुनि घे प्रभुला विष द्यावया कपटमाता. ११८

दे उग्रविपरसस्तन अंकीं घेऊनि लोकपाळाला.
हा! त्या वदनीं द्याया आला रस काय तो कपाळाला? ११९

वां[10] पीचें जीवन किति त्याला, जो सागरासि सुतपा[11] पी?
तसि ती प्रभुला, जेणें वधिले दितिचे बळाढ्य सुत पापी. १२०

यं[12] ज्ञपति विष म्हणेना! झांकुनि नयनें जगज्जनक थानीं
रुचि आणुनि पी, तिस दे अमृत[13], म्हणुनि वेधिले जन कथानीं. १२१

न यनें फिरवी, झाडी कर चरण, म्हणे 'पुरे', रडे, तदपी
न करी पुरे, न सोडी, गोडी आणूनि असु हि मांस्पद[14] पी. १२२

मो टा शब्द करूनि क्षितिवरि साकोस पूतना पडली,
कांपविली भू, चुरिली अटवी[15] जी स्वपतनांत सांपडली. १२३

भ य पावोनि बहु व्रजवनिता धावोनि काढिती हरिला,
म्हणती, 'वांचविला शिशु भगवंतें, बाळकाळ संहरिला'. १२४

---

१. सौंदर्य. २. म्यानांत. ३. प्रतिबंध करी. ४. बलराममाता. ५. दुष्टांचा संहारकर्ता. ६. झोंपलेल्या बालकाची लीला. ७. यशोदा. ८. मित्री. ९. निजलेला सर्प. १०. विहिरीचें. ११. अगस्त्यमुनि. १२. विष्णु. १३. मोक्ष. १४. लक्ष्मीचें स्थान (माधव). १५. अरण्य.

**ग** वळणि सर्व यशोदा, ते हि श्रीरोहिणी तया बाळा
गोमूत्ररजीं[१] न्हाणिति, गोपुच्छें स्पर्शती जगत्पाळा. १२५

**व** दनें 'केशव' 'माधव' असिं नामें गाति त्या सती बारा,
द्वादश भालाद्यंगीं[२] गोमय घेऊनि लाविति उदारा. १२६

**ते**[३] भव्यमूर्ति 'अव्यादजोंघ्रि' इत्यादि मंत्रमय वर्म
त्या लेववूनि रक्षिति; तें विश्वाला हि कवच दे शर्म. १२७

**बा** ळाला स्तन पाजुनि नीजविलें पाळण्यांत जों त्याला,
आला नंद पथीं, ती तनु पाहुनि विस्मित स्वमनिं झाला. १२८

**सु** हृदा वसुदेवाच्या ज्ञानाची नंद करि नितांत[४] नुती[५],
परशूनीं तोडवुनीं दग्ध करवि रचवुनी चिता तनु ती. १२९

**दे** ह सुगंध प्रसवे, कृष्णागुरु जेंवि पावकीं जळतां,
कीं तो झाला शुद्ध श्रीमत्तीर्थांघ्रिपाद[६] आतळतां[७]. १३०

'**वा** स असा अतिअद्भुत कोठुनि येतो? अहा! महावास[८]!'
नंदादि म्हणति, 'गंधा! बापा! तूं हरिपदीं वहावास'. १३१

**य** मुनास्नान करुनि जों गेला नंद व्रजासि, तों सकळ
वृत्त श्रवण करि, म्हणे, 'महिमा विश्वंभरा! तुझा अकळ[९]'. १३२

**न** वल असें चि करि प्रभु तो स्वौत्थानिकमहोत्सवीं[१०] प्रकट,
रडतां स्तनार्थ उडवी उत्क्षिप्तस्वांघ्रिपल्लवें[११] शकट[१२]. १३३

**मो** टें कौतुक करितां जीं होतीं तेधवां समीप मुलें,

---

१. गोमूत्र व गोचरणधूळ यानीं. २. कपाळ आदिकरून अंगांच्या ठिकाणीं. ३. अन्वयार्थः—त्या (व्रजवनिता) 'अव्यादजोऽघ्रि' इत्यादि मंत्रमय वर्म (कवच) लेववूनि ते भव्य मूर्ति रक्षिति. तें कवच विश्वाला हि शर्म दे. ४. अतिशयित. ५. स्तुति. ६. श्रीमत् तीर्थ हें ज्याच्या आंगठ्याच्या ठिकाणीं आहे त्याचे (विष्णूचे) पाय. ७. स्पर्शितां, अवलंबितां. ८. अतिशयित प्राणतर्पण असा सुवास. ९. अगम्य. १०. आपल्या उत्थानसंबंधीं (प्रथम च कुशीला वळण्यासंबंधीं) महोत्सवाच्या कालीं. ११. वर फेंकलेल्या आपल्या पायाच्या अग्रानें. १२. गाडा.

तत्व कथिति, परि गवळी म्हणति, 'तरि खचेल काय अद्रि फुलें?'
भ द्रार्थ बाळकाच्या बाधाशमनार्थ धरुनि [1]सारा धी,
अर्पुनि गोधन धान्यें ब्राह्मणचरणांसि नंद आराधी. १३५
ग रिम[2]गुणें मातेच्या पीडी क्षणमात्र एकदा अंका,
उतरि क्षितिवरि, करि हरिचिंतन, चित्तीं धरोनि आशंका. १३६
व पु पुष्पदामसें तें गुरु होतां अंक पीडतां आर्यां
भी, भूमीवरि ठेवी, मग जों कांहीं गृहीं करी कार्या, १३७
ते व्हां चि कंसहितकर दुष्ट तृणावर्त दैत्य ने त्यातें,
विश्वाच्या ब्रह्याच्या प्रबळा काळाचिया हि ने[3]त्यातें. १३८
वा[4] त्यारूपें सर्व व्रज करुनि व्याकुल क्षणामाजी,
ने शिशु; 'घातरता जी मति' खळ 'न' म्हणे 'कुलक्षणा माजी.' १३९
सु त न दिसतां रडे बहु माता, कृ[5]पणा धनासि तसि शोधी,
धांवे, म्हणे, '[6]नुतरित्यें तुज तरि संतापती च न शिशो! धी?' १४०
'दे गे! बाई! बाळक खेळायास्तव असेल जरी नेला,'
ऐसें पुसे रडे, तों गोपींनीं ही विलाप बहु केला. १४१
वा र्ता ऐकुनि गोपी आल्या धावोनि बाबिऱ्या रडती,
शोकें करू[7]नि उररी [8]कुररीरीतीस फार आरडती. १४२
य [9]मभटशताभ्यधिक खळ गेला गगनीं, अशांत हरि त्यातें
[10]गुरुता स्वीकारुनि धरि दृढ कंठीं आपणासि हरित्यातें. १४३
न सुटे मिठी, न चाले बळ, खळ बळहीन जाहला रडला;
[11]स्वनयनयुगसह [12]हरखरशरहतपुरसा शिळातळीं पडला. १४४
मो [13]घमनोरथ झाला, मेला पडतां च, त्या तृणावर्ता

---

१. तत्त्वग्राहक बुद्धि. २. वजनाच्या गुणानें. ३. स्वामीला. ४. वावटळीच्या स्वरूपानें. ५. कृपण स्त्री. ६. न उतरित्यें (खालीं न ठेवितें). ७. स्वीकारून (?). ८. कुररी=एक पक्षीण. ९. यमाच्या वीरांच्या शतापेक्षां अधिक असा. १०. जडपणा. ११. आपल्या डोळ्यांच्या बुबुळांसह. १२. शंकराच्या तीव्र बाणानीं नष्ट अशा त्रिपुरासारखा. १३. भग्न झाली आहे इच्छा ज्याची तो.

गोपी पाहति, भाग्यें प्रभुस हि जो अग्नि त्या तृणावर्ता. १४५
'भ[1] द्रं! भद्रं[1]!' म्हणती, घेती उचलूनि, विस्मयीं बुडती,
देती जननीहस्तीं, त्या स्त्री माझ्या चि मूर्ति ही गुड ती. १४६
ग मलें आश्चर्य, म्हणति, 'दुष्टपणें दुष्ट पावला वात,
सर्वत्र सम म्हणुनि शिशु न निमाला[2], ईश्वरें दिल्हा हात.' १४७
व दनीं विश्व यशोदा स्तन देतां सहज एकदा पाहे,
विस्मय पावे, नेणें कीं उदरीं विश्व विश्वपति वाहे. १४८
ते थें वसुदेवोक्तें गेला, गर्ग[3], व्रजेश त्यास नमी,
पूजुनि म्हणे, 'सफळजनि[4] झालों त्वत्पदरजांसि आसन मीं.' १४९
वा[5] च्य न होतां करवी दोवांचें नामकर्म तो गोष्ठीं[6],
मुनि भूतभाविकथनीं नेत्रीं जळ जिरवि[7] कंपभर[8] ओष्ठीं. १५०
सु ज्ञ स्थापी एका संकर्षण, राम, बळ असीं नावें,
तो कृष्णवासुदेवप्रमुख बहु दुज्या सुतासि सद्भावें. १५१
'दे तील सुख अपरिमित, गोब्राह्मणधर्म रक्षितील बळें,
यांचें यश सुहृदसुहृन्नयनयुगीं[9] नित्य वाहवील जळें.' १५२
वा खाणूनि असें बहु मुनि होवुनि जाय फार सानंद,
अतितुष्टपुष्ट झाला सेवुनि तद्वाक्सुधारसा नंद. १५३
य[10] च्चरणरेणु दुर्लभ योगिवरांतें प्रमोदराशि[11], शुची
क्षितिसि कराया करिति क्रीडा प्रभु रीति धरुनियां शिशुची. १५४
न[12] वपल्लवमृदुकरपद विभु रांगति कर्दमांत ही, तुच्छें[13]
वत्सांचीं अवलंबुनि ते जगदवलंब[14] चालती पुच्छें. १५५
मो हिति मन सुचपळ ते, चपळ असे परि तसा न पारद[15], या

---

१. बरें झालें! बरें झालें! २. मृत्यु पावला. ३. यादवांचा पुरोहित. ४. सफल आहे जन्म ज्याचा तो. ५. प्रकट. ६. गोठ्यांत. ७. मूळ पाठ—**मिरवि**. ८. कंपातिशय. ९. मित्र व शत्रु यांच्या नेत्रद्वयांत. १०. ज्याची पायधूळ. ११. आनंदाचा समुच्चय. १२. नूतन पालवीप्रमाणें मऊ आहेत हातपाय ज्याचे तो. १३. कमी महत्त्वाचीं अशीं. १४. जगदाधार. १५. पारा.

खेळीं च सद्[1]वनस्वव्रतराजीं हि न मनीं अपार दया. १५६
भ वन त्यजुनि घडिघडि प्रभुवदन पहावया स्त्रिया येती;
वदन पहातां उत्तर कैंचें घरिं ? भलतसें बळें देती. १५७
ग ळीं चुंबिति, भेटति, नाचविति, सुशब्द पढविति ब्रह्मा,
गोपी सिकविति नेति य[3]तिपतिमतिरतिदा यदात्मज[4] ब्रह्मा. १५८
वें[5] त्सान्मुचन्कचिदसमय इत्यादिक हि कथिति बोभाट
त्या निर्दोषगुणाचे ज्याचा जो द[6]शशतास्य तो भाट. १५९
ते बोभाट य[7]शोदाश्रुतिसि सु[8]धासेकसे चि निववीती.
मृद्भक्षणीं च पळभरि नंदाचे दार भार भिववी ती. १६०
वा सी वदन प्रभु तों त्यांत ब्रह्मांड पाहती झाली,
त्यांत व्रज, त्यामध्यें आपण ही, हें विलोकितां भ्याली. १६१
सु रपूर्वज भगवान् विधि वर अंशावतरणीं असा द्रोणा,
वसुला धरास्त्रियेसह दे, कीं, ' त्वद्यश तसें नसो कोणा.' १६२
दे वाची भक्ति असी पुत्रस्नेहेंकरूनियां घडली.
लेश क्लेश न होतां त्यांची हृद्वृत्ति ईश्वरीं जडली. १६३
वा मनपणीं अदितिला, कौसल्येला न जें नृपाळपणीं,
तें सुख गोपीला दे शतदा दिवसांत देव बाळपणीं. १६४
य त्याराध्यपद प्रभु, स[10]त्याधिपगुरु, सदैव सुखवासी;
तो स्व[11]गत विश्व दावी भिवुनि जिला जीपुढें स्वमुख वासी. १६५
न व्हत्या गृहीं रिकाम्या दासी म्हणवूनि एकदा गोपी
कारि दधिमथन, तनयगुण गाय मुखें, तद्रसीं च मन ओ[12]पी. १६६
मो त्यें मोटीं मोटीं पाच हिरे नील माणिकें यांहीं

१. साधूंचें रक्षण हें च आपलें मुख्य व्रत त्यांत हि. २. नमन. ३. गोपिभक्तांच्या मनाला आनंद देणाऱ्याला. ४. ज्याचा पुत्र. ५. अकालीं वासराला कोठें तरी सोडणें. ६. सहस्रमुख (शेष). ७. यशोदेच्या कानाला. ८. अमृतवर्षावासारखे. ९. यशोदेला. १०. ब्रह्मदेवाचा पिता. ११. स्वतःचे ठायीं. ११. अर्पी.

खचित[1] नग[2] सकळ देहीं, गेहीं तद्दीप्ति मायिना कांहीं. १६७

भ रली वरि आनखशिख[3] नंदवधू शुद्धमणिगणें हेमें;
आंत हि पुत्रीभूतब्रह्माच्या[4] दिव्यगुणगणप्रेमें. १६८

ग ळती नेत्रांतूनि प्रेमाश्रुजळें फुलें शिराहूनीं,
ऐसें मथन करीतों श्रीकृष्ण धरी रवीस बाहूनीं. १६९

ब सवी बळें च्चि तीस स्तन्यार्थी[5] देव तो धरूनि रवी,
शिशुपण तिच्या न केवळ उद्धारा आसुच्या हि तें मिरवी. १७०

ते पाजी कांहीं तों जें जाय गृहीं उतोनि त्या दुग्धा
सांभाळाया धांवे, सांडुनि अमृतासि गोपिका मुग्धा[6]. १७१

वा इट वाटे प्रभुला, स्वमनिं[7] म्हणे, 'स्पष्ट विषय हा खोटा.'
कोपे, उपळें[8] फोडी दधिचा डेरा समीप जो मोटा. १७२

सु तकृत पाहे, हांसे, गोपी शोधी गृहीं तया जंव ते
उखळीं चढोनि खातो लोणी, खाताति कपि[9] हि त्याभंवते. १७३

दे खे प्रभु हि तिला कीं येताहे माय घेउनीं यष्टी,
टाकुनि उडी पळे, हे लागे पाठीस, होय बहु कष्टी. १७४

वाँ[10] ङ्मनसागोचर जें ब्रह्म तया ती म्हणे धरीन अहा!
भागे, मार्गे लागे, ये हाता कठिनचित्त देव न हा. १७५

य ष्टि उगारी जों कर धरुनि करें तों तदश्रुतनुकंपा[11]
पाहे, राहे ताडन, वारी त्या गोपिकेसि अनुकंपा[12]. १७६

न गर अनंत अनंतब्रह्मांडांचें तयासि बांधाया
लागे, दामें[13] न पुरतां दुसरें तिसरें तरी हि सांधाया. १७७

मो टेपण टाकुनि दे, घे उखळासीं अनंत बांधोनी

---

१. जडित. २. अलंकार. ३. आपादमस्तक. ४. पुत्रत्वाप्रत प्राप्त झालेल्या ब्रह्माच्या. ५. दुधाची इच्छा करणारा. ६. वेडी. ७. मूळ पाठ–**चित्तांत म्हणे, 'पदार्थ.** ८. दगडानें. ९. मूळ पाठ–**बाळकपि भंवते.** १०. वाणी व मन यांना अगम्य असे. ११. त्याचे अश्रु व शरीरकंप. १२. दया. १३. दोरी.

मातृकर रक्तं[1] होतां दामासमवेत दाम सांधोनी. १७८
भ क्तवश देव ऐसा कीं त्या करुणार्णवासि तें युक्त,
बद्ध असतां हि करि मुं[2]निशप्तधनदनंदनार्जुनां मुक्त. १७९
ग वळणिचें भाग्य नसे शंभूतें, न विधितें, न लक्ष्मीतें,
उखळीं बांधी दामें, नुरवि चलन यन्न[3]खेंदु [4]पॅक्ष्मीं तें. १८०
ब द्ध करि नित्यमुक्ता गोपी गुंते गृहांत गृहकृत्या,
तों यमळा[5]र्जुन पाडी. प्रभु दे सत्यत्व नारदा भृत्या[6]. १८१
ते तरु पडतां धांवति, पाहुनि आश्चर्य करिति जों गवळी,
उखळीं बद्ध यशोदाबालक ही देखती तयांजवळी. १८२
'वा ताविणें हि गुरुतरुपतन कसें? वांचला हि बाळ कसा?'
म्हणति, बहु नवल करिती, न कळे तो बाळ विश्वपाळकसा. १८३
[7]सुं त त्यांसि म्हणति, 'केलें आंतुीन जावूनि या महाभागें
वृक्षोन्मूर्[8]लन ओढुनि नेतां हें उखळ गुंततां मागें. १८४
दे दीप्यमान दोघे या वृक्षांतूनि पूरुष निघाले,
नमुनि यशोदापुत्राप्रति ते रविसे नभांत चि रिघाले[9].' १८५
वा क्य मुलांचें साचें परि झालें गोपजनमतीं लटिकें;
[10]हरिनीळरत्ननिकरीं म्हणउनि ध्यावें चि तत्सम स्फटिकें. १८६
य मलार्जुनगतिदातें[11] करुनि विमुक्त व्रजेश्वर[12] सगोप
स्त्रीच्या पदरीं घाली, ती जेंव्हां प्रथम आपुल्या कोप. १८७
न व नव उत्पात असे होति बृहद्वानिं म्हणोनि उपनंद
वृंदावनासि जाया सांगे, वृद्धोक्ति[13] मान्य करि नंद. १८८

---

१. तांबडे. २. नारदमुनींनीं शापिलेले कुबेरपुत्र, जे अर्जुनवृक्षाचे रूप धारण करून होते त्यांला. ३. ज्याचा नखस्वरूप चंद्र. ४. पापण्याच्या ठिकाणीं ५. दोन अर्जुनवृक्ष. ६. सेवका. ७. गोपांचीं मुलें. ८. झाडाचें समूळ पडणें. ९. शिरले. १०. इंद्रनीलमण्यांच्या समुच्चयांत. ११. यमलार्जुनांला (कुबेरपुत्रांला) सुस्थिति देणाऱ्याला. १२. नंद. १३. वृद्ध उपनंदाचें वचन.

**मो** रसिजकुंकुमांकित[1] जे चरण सदैव शेषतनुतल्पीं[2]
वृंदावनांत ते, तप गुरु त्याचें भाग्य बहु नसे अल्पीं. १८९
**भ** वशमनदक्ष[3] चेतोहर[4] पुण्यश्रवणकीर्तन स्वामी,
चारी वत्सें, होउनि वत्सप[5], जो वंद्य सत्यपतिधामीं[6]. १९०
**ग** डि गोप दास घेउनि चारिति वत्सांसि रामकृष्ण वनीं.
वत्सांत वत्सरूपें दैत्य सिरे धरुनि दुष्ट भाव मनीं. १९१
**व** त्स न हा हें रामा त्यास हि कळलें नसे असें कळवी.
शलभा[7] दीप तसा प्रभु हळु हळु येऊं चि दे, न त्या पळवी. १९२
**ते** ला निजप्रतापें कढतां होतां प्रतप्त वह्नि च पी.
मारुतिपुढें चपलपण गर्वें करितां जगेल कोण कपी? १९३
**वा** रणशिशुसि जसा हरि हरि अरिला मागिल्या पदीं कवळी,
गरगर फिरवुनि टाकुनि सुकपित्थीं[8] सुखवि तत्फळें गवळी. १९४
**सु** मनें वर्षति अरिकरिहरिहरिवरि[9] देव, नाचती बाळें.
बहु चित्र हें च कीं, प्रभुयश वाढे, होय दुष्टमुख काळें. १९५
**दे** वासि जलाशयतटनिष्ठ[10] बकाकार असुर, सुग्रास
क्षुधित ब्राह्मणसा, गिळि; भीति न शिशु सुर हि बळ हि उग्रास. १९६
**धा** री नाम जयाचें कंठीं धरितां चि सर्व तापा तें,
अमृत हि गिळितां जाळी कंठीं त्या दुर्जना सुपापातें. १९७
**य** द्यपि तापहर सुगुण केवळ कर्पूरपूर[11] हरि त्यातें
अंगार[12] होय म्हणवुनि उगळी कंठांत दाहकरित्यातें. १९८
**न**[13] वशूलोग्राग्रें जों चंच्वग्रें ये शिरीं च हाणाया
चंचुपुटें धरुनि चिरी जेंवि लव्हाळयास देवराणा या. १९९

---

१. लक्ष्मीच्या स्तनावरील कुंकुमानें चिह्नित असे. २. शेषदेहरूप शय्येवर. ३. संसाराचा नाश करण्यांत चतुर असा. ४. मनोहर. ५. गवळी. ६. ब्रह्मलोकीं. ७. पतंगाला. ८. उत्तम कवठीच्या वृक्षावर. ९. शत्रुरूप हत्तीला सिंहासारखा असा जो कृष्ण त्यावर. १०. सरोवराच्या कांठावर बसलेला. ११. कापराच्या पूर. १२. अग्नि. १३. नव्या शूलाच्या उग्रत्वानें.

मो टा उत्सव झाला, सुर करिती दिव्यपुष्पवृष्टींतें;
वर्णिति सुखमूर्तीतें मग आधीं गोप[1]बाळदृष्टींतें. २००

भ क्षी अजगररूपी दैत्य स[2]पशुपाळबाळवत्सकुळा,
ग्रासी प्रभूत्तमास हि, जैसा दावाग्नि पुष्पिता बकुळा. २०१

ग गनस्थ अमर तेव्हां [3]शुष्कमुखें 'हंत! बत! अहा!' म्हणती.
क्षण तीर्थपदा[4]हुनि गुरु मानुनि करिती विधिप्रति प्रणती. २०२

व दनीं शिरतां जों तो अघ[5] सर्वांसकट आपणा चूर्ण
करणार, तों तयाच्या कंठीं वाढोनि दाटला तूर्ण[6]. २०३

ते णेंकरूनि झाला तत्काळ प्राणरोध पापाचा[7],
नेत्रें गळोनि पडलीं ऐसें करि लव[8] विभुप्रतापाचा. २०४

वा ढोनि गळा मूर्धा भेदी, मग त्या पथें चि तत्प्राण
निघती; प्रभु अवलोकुनि करि विषहत[9]वत्सवत्सपत्राण. २०५

सु हृदांवत्सांसह विभु बाहेरि निघे अघाननांतून;
तद्देहोत्थित[10] तेज प्राशी घातक नव्हे मनांतून. २०६

दे व घन[11] कुसुमवृष्टी करिति स्तव सिद्ध, मुनि महानंदें
म्हणति,.'सभाग्य, सुपुत्री, ज्ञानी ही जिंकिले पहा नंदें.' २०७

वां[12] रिजजन्मा भगवन्नुतिनादश्रवण करुनि ये, पाहे;
अद्भुतमहिमप्रभुतें होउनियां चित्र अंबरीं राहे. २०८

य मनियमनिष्ठ योगी वांछिति जी दे अघासि त्या गतितें;
यास्तव वदान्य[13]गुरुचें विधिला आश्चर्य वाटलें अति तें. २०९

न[14] गगह्वरसें झालें वृंदावनिं अघशरीर जें सुकलें;

---

१. गवळ्याचा मुलगा या दृष्टीला (मताला). २. गवळ्यांच्या पोरांसह वांसरांच्या समुदायाला. ३. कोरड्या पडलेल्या तोंडानें. ४. तीर्थपद जो विष्णु त्यापेक्षां. ५. अघासुर. ६. शीघ्र. ७. दुष्टाचा. ८. लेश. ९. विषानें मृत झालेलीं वांसरें व गवळी यांचें रक्षण. १०. त्याच्या शरीरापासून निघालेलें. ११. दाट. १२. ब्रह्मदेव. १३. दानशूरांत जो श्रेष्ठ त्याचें. १४. पर्वताच्या गुहेसारखें.

क्रीडति त्यांत मुलें तीं, यन्मरण मुकुंददृगमृतें[1] चुकलें. २१०
मो क्षण[2] अहिपासुन जें कौमारदशेंत[3] आपुलें केलें,
तें पौगंडदशेंत[4] प्रकटिति शिशु; एक वर्ष तों गेलें. २११
भ लतैसें हि हरिचरित कथिति सुखें पशुपशिशु सदा सदनीं;
वर्षभरि असें अद्भुत यश त्यांच्या राहिलें कसें वदनीं? २१२
ग हनींचें वृत्त तिहीं केलें प्रकट व्रजांत वर्षानें;
त्याचें कारण आतां परिसावें साधुनीं च हर्षानें. २१३
व धुनि अघातें प्रभुनें रक्षुनियां वासुरांसमेत मुलें
नेले जळाशयाप्रति जेंवि करंडांतरीं[5] भरूनि फुलें. २१४
ते थें पाजुनि पाणी वत्स चरायासि सोडिले जवळी.
पुलिनीं[6] बसोनि भोजन करि हरि घेऊनि पंक्तिला गवळी. २१५
वा[7] रिरुहकर्णिकेच्या पत्रांची पंक्ति भोंवतीं असती,
श्रीमूर्तिच्या तसे शिशु फुल्लमुखांभोज[8] भोंवते बसती. २१६
सु ख काय तें वदावें? प्रथम ब्रह्माचिया मुखीं कंवळ[9]
घालिति, मग आपुलिया; चाखिति रस तो हि जो तयाजवळ. २१७
दे ती मिटक्या, दाविति अन्योन्य स्वस्वभोज्यरुचि[10], रमती,
हांसति भोजन करितां, हांसविति प्रभुसि गोप रुचिरमती. २१८
वा मकरीं दध्योदन[11], अंगुलिसंधींत[12] लवणशाकफळें[13]
धरि शृंग[14] वेत्र[15] कक्षीं, जठरपटीं[16] वेणु भक्तभाग्यबळें. २१९
य ज्ञांचा भोक्ता करि भोजन घेऊनि पंक्तिला बाळ.
दूरुनि अवलोकुनि तें ब्रह्मादिकदेव घोंटिती लाळ. २२०
न वल पहावें अणखी प्रभुची कांहीं करूनियां खोडी

---

१. कृष्णदृष्टिरूप अमृतानें. २. सुटका. ३. पांच वर्षांच्या वयांत. ४. सहा वर्षांच्या वयाच्या अवस्थेंत. ५. टोपलींत. ६. वाळवंटावर. ७. कमळाच्या दांड्याच्या. ८. विकसित झालीं आहेत मुखकमलें ज्यांचीं ते. ९. घांस. १०. आपापल्या [शिदोरींतील] अन्नाची चव. ११. दहींभात. १२. बोटांच्या चिमटींत. १३. लवणयुक्त शाक फळें. १४. शिंग. १५. काठी. १६. पोटावर बांधलेल्या [धोतराच्या] पट्ट्यांत.

अघवधविस्मित विधि हें योजी, कीं लागली यशीं गोडी. २२१

मो [1]कलिली मर्यादा, नेले ते वत्स चोरुनीं विधिनें;
कीं लोटिला पदें नत, अपराधी जन न, या दयानिधिनें. २२२

'भ रले वनांत बहुधा तृणलोभें वत्स, लांबले दूर,'
ऐसें म्हणे सख्यांप्रति, आणाया जाय तो कृपापूर. २२३

'ग डबड नको करूं हो! बसलां तैसे बसा, नको हालों,
हातींचा ग्रास गिळा, घेउनि वत्सांसि मीं हि हा आलों.' २२४

व त्सांतें शोधाया गेला आंगें दयांबुधी रानीं.
[2]करिजेतो [3]निगमवनीं ज्याचा बहु शोध साधुधीरानीं. २२५

ते वत्स न दिसतां ये पुलिनाप्रति तों न तेथ निजगोप!
त्यांस हि शोधी, जाणे [4]सुतकृत्य, प्रभु मनीं न धरि कोप. २२६

वा टावें सुख विधितें वत्सपवत्सांचिया हि मातांतें,
प्रभु होय वत्स वत्सप सुखवाया कविजनां हि गातां तें. २२७

सु रमुख्यें जीं जितकीं गोपांचीं वासुरें मुलें हरिलीं,
तैसीं च विश्वरूपें तितकीं रूपें यथास्थितें धरिलीं. २२८

दे ह जसे, वर्ण जसे, भूषण ज्यांचें जसें, जसे पावे,
वेत्रें वस्त्रें शिंकीं झाला [5]पैत्राण ही असें [6]भावे. २२९

[7]वा सर सरतां गेला प्रभु आपण आपणासि घेऊनीं,
गोगोपीगोपांतें सुखवाया आत्मदान देवूनीं. २३०

य द्यपि झाला सर्व प्रभु, या विषयीं च न शकला तो, कीं,
पहिल्याहुनि मातांचा स्नेह अधिक मोह ही न त्या तोकीं. २३१

न कळे रामास हि तें, संवत्सर एक लोटला [8]प्राया.
जाणेल सुप्रसादाविण याच्या कोण हो! अभिप्राया? २३२

मो टें कौतुक झालें असतां वर्षांत दिन उणे कांहीं,
तोंपर्यंत प्रभुची लीला रामासि ठावुकी नाहीं. २३३

---

१. सोडली. २. केला जाता. ३. वदरूप वनांत. ४. पुत्राचें (ब्रह्मदेवाचें) कर्म. ५. पादत्राण. ६. भावें, प्रीतीनें (?). ७. दिवस. ८. प्रायः, सामान्यत्वें.

भ गवंत उभयता ही गेले होते स्ववत्स चाराया,
निजपदपद्मरजांहीं सकळस्थिरजंगमांसि ताराया. २३४
ग वळी चारित होते गोधन गोवर्धनाद्रिवरि दूर;
तेथुनि वत्स पहातां गायींला नावरे कृपापूर. २३५
व[1] र्षांनदी तशा त्या अद्रिवरुनि धांवल्या, न आवरती;
आल्या चि, नव्या वत्सांपरिस बहु प्रीति यां जुन्यांवरती. २३६
ते गोप क्रोधानें आले जों त्यांसि न्यावया मागें,
गायींहूनि द्रवले बाळ पहातां चि सोडिले रागें. २३७
वा हति दुग्धें, पाजिति चाटिति त्या वासुरांसि, हंबरती.
प्रीति न केवळ मानी गोहृदय स्वल्प, तें हि अंबर[2] [3]ती. २३८
सु टले नयनीं अश्रु, प्रेमभरें कंठ दाटले, शब्द
न निघे, जाणों गोपां सुतविरहीं कोटि लोटले अब्द. २३९
दे ती सुदृढालिंगन, घेती उचलूनि, चुंबिती, बाप,
हुंगिति माथां, निववीति शीतसुतालिंगनामृतें ताप. २४०
वा टे रामाला तें बहु कौतुक, मग मनीं म्हणे तो कीं,
'जें प्रेम वासुदेवीं गोगोपाचें[4], तसें कसें तोकीं? २४१
य क्ष निधानासि[5] जसे, गोप तसे सोडिती न बाळांतें.
माझें हि मन द्रवतें यां पाहुनि जेंवि विश्वपाळातें. २४२
न गशिखरावरुनि कशा आल्या धावोनि धेनु वत्सवती?
फिरती पुनःपुन्हा हे गोगोप, पुनःपुन्हा बहु द्रवती. २४३
मो ह मला ही जेव्हां, तेव्हां मत्स्वामिची च हे माया,'
चिंतुनि ऐसें, पाहे विश्वालंकारहेतुहेमा[6] या. २४४
भ क्तांचा मोहांतक देव, तयाला स्वतत्त्व तें कळवी.
रामाच्या चित्तींचा संशय वैकुंठ तत्क्षणीं पळवी. २४५

---

१. पावसाळ्यांतील [वेगवान्] नदी. २. आकाश. ३. तीं प्रीति. ४. गोगोपांचं (?). ५. ठेव्याला. ६. विश्वरूप अलंकाराचें मूळकारण जें सुवर्ण त्याला (परब्रह्माला).

ग गनीं तो ब्रह्मा हि [1]स्वत्रुटिकाळेंकरूनि ये, पाहे,
तों पहिला तैसा चि प्रभु, वत्सप, वत्ससह सुखें आहे. २४६
‘व त्सप, वत्स हि हरिले; [2]मायाशयनीं च निजविले असती;
कैंचे तसे च दुसरे हे? ते तों स्पष्ट आणिले नसती? २४७
ते साचे कीं हे? हें नुमजे,’ ब्रह्मा [3]विचारितां श्रमला,
श्रमला; तों सर्व प्रभु दिसती, पाहोनि चित्रसा गमला. २४८
वा रिदनील चतुर्भुज, सायुध, जो तो हि, पीतपटधारी,
[4]कौस्तुभकटकमुकुटवनमाळ‌गदमकरकुंडली, हारी; २४९
सु [5]रसा [6]दामें कंठापासुनि आपादरम्य सर्वांच्या,
ज्या त्या मूर्ति [7]ध्येयैं सर्व सुरांच्या, [8]सहात्मशर्वाच्या. २५०
दे खुनि अद्भुत रूपें पडला, दिपला अनंततेजानें;
परि धन्य धीर तो, कीं, नयनीं भरिले अनंत ते ज्यानें. २५१
वा [9]णीपति मग सावध झाला प्रभुच्या पदप्रसादानें.
नेत्रें उघडी, [10]मेला प्राणी अमृताचिया जसा दानें. २५२
य द्वत् पूर्वी होता शोधित निजवत्सवत्सप स्वामी,
तैसा चि पाहिला प्रभु [11]कवळकर वनीं [12]सुखर्धिच्या धामीं. २५३
न मन करि प्रभुचरणा, सोडुनियां सत्यनायक विमान;
स्वगुरुपदासि धराया माथां पाहेल काय कवि मान? २५४
मो र जसा मेघातें प्रभुतें पाहोनि विधि तसा हर्षे.
‘चुकलों’ म्हणे, धरी पद; देव तयावरि दयामृतें वर्षे. २५५
भ क्तीनें करि हरिची स्तुति, मागे चरणभक्ति वरदास;
आज्ञा मागुनि जाय स्वस्थाना विष्णुचा [13]प्रवर दास. २५६

---

१. स्वतःला चुटकी वाजविण्यास लागणाऱ्या वेळांत. २. मायेच्या आंथरुणावर. ३. विचार करतां करतां. ४. कौस्तुभ, कडीं, मुकुट, वनमाळा, केयूर व मकराकार कुंडलें धारण करणारा. ५. तुलसी–**पंत.** ६. मालेनें. ७. ध्यान करण्यास योग्य. ८. आपणासह जो महादेव त्याच्या. ९. ब्रह्मदेव. १०. मेलेला. ११. घांस आहे ज्याच्या हातांत असा. १२. सुखसमृद्धीच्या निवासस्थानीं. १३. श्रेष्ठ.

**ग** मन करितां विधाता, सर्व मुलें वासुरें यथास्थानीं
उतरी तीं, पूर्वीं निजमायेच्या[1] लाविलें जयां थानीं[1]. २५७
**व** त्सांतें पुलिनाप्रति पति विश्वाचा स्वयें कवळपाणी[2]
एका वर्षें, विधिची हरुनि चरित्रामृतें तृषा, आणी. २५८
**ते** शिशु म्हणति, ‘सख्या! ये, सांपडले वत्स तुज बरे जवळ.
आलासि शीघ्र, आम्हीं बा! एक हि भक्षिला नसे कवळ’. २५९
**वा** णी ऐकुनि त्यांची हांसे प्रभु, त्यांसवें पुन्हा जेवी,
प्रभुची माया कवणा मोहीना विश्व येवढें [3]जे वी? २६०
**सु** खवी सख्यांसि हरि, करि हास्य विनोद प्रिय स्वदासां जे;
दूरुनि अजगर दावुनि, घोषा ये, ये जसा सदा सांजे[4]. २६१
**दे** हर्ष व्रजकर्णां वेणूच्या पाठवूनि लांब रवा[5].
श्रवणें हि ताप हरि, त्या अमृताहुनि न म्हणतील कां बरवा? २६२
**वा** ट प्रभुची पाहे व्रज, जलदाची तृषार्त चातकसा;
आलोंसें वेणुध्वनि दूतमुखें कथि, करील घात कसा? २६३
**य** श हरिचें शिशु सांगति जातां चि व्रजजनाचिया कानीं,
‘आम्हां गिळितां, कृष्णें खळ अजगर आजि मारिला रानीं.’ २६४
**न**[6] वघनसारघनप्रभ, विभुसत्तम, राम कृष्ण मग रानीं
एका दिवसीं गेले, ज्यां भ्यावें सर्वशत्रुनगरानीं[7]. २६५
**मो** दक जसे गणेशा, रुचती गुण फार ईश्वरा ज्याचे[8],
दास्यापुढें जयाच्या होती अतितुच्छ भोग राज्याचे, २६६
**भं**[9] द्रगुण प्रभु तो करि रामसुगुणवर्णन स्वयें रानीं;
सूक्तिसुधारस सादर अग्रज हरिचा भरी नव्या कानीं. २६७
**ग** र्दभरूपी सुररिपु मग मारुनियां, यथेच्छ ताळांचीं[10]

---

१. आपल्या मायेच्या स्तनांच्या ठायीं (मायेच्या अधीन). २. घांस आहे हातांत ज्याच्या तो. ३. जी (माया). ४. सायंकाळीं. ५. आलापाला. ६. नव्या मेघाच्या अर्कांप्रमाणें दाट आहे तेज ज्याचें तो. ७. सर्व रिपूंच्या शहरानीं. ८. बलरामाचे. ९. मंगलगुण. १०. ताडांचीं.

देउनि फळें सुखविलीं चित्तें त्या सर्व गोपबाळांचीं. २६८

**ब** ळभद्रावांचुनि हरि ने गायी एकदा, वनीं चारी;
त्या कालीयह्रदाचें ग्रीष्मीं धोंपोनि[1] सेविती वारी. २६९

**ते** गोपशिशु हि विषजळ पीती, मरती तटीं च तत्काळ;
तें पाहतां कळवळे करुणानिधि, सत्पती, असत्काळ[2]. २७०

**बा** ळांतें गाईंतें उठवी[3], पाहे दयार्द्रदृष्टीनें,
पूर्वीं जसें दशवदनरणहतकपिकटक अमृतवृष्टीनें. २७१

'**सु** च्छदभयें[4] लपाला सौभरिवरनिर्भयस्थळीं[5] सर्प,
वसतो डोहांतुनि हा, दवडावा यांतुनी हि विषदर्प[6].' २७२

**दे** व असें मनिं आणी, ह्रदतटजकदंबतरुशिरीं[7] वेघे.
जें पूर्वीं अमृतकरद्विजपपदरजांसि[8] आश्रया दे, घे. २७३

**बा** हूंतें ताडुनि हरि गर्जे घनसा; ह्रदीं उडी टाकी;
तों अहि धांवे, चावे; गवळी च न, सर्व कांपले नाकी[9]. २७४

**य** म जेंवि काळपाशें मार्कंडेयासि, नाग भोगींनें[10]
बांधी, बांधावें ज्या प्रभुवर्या प्रेमभक्तियोगानें. २७५

**न** वनीतमृदुल अवयव, आनंदांकुर चि जे नवे चावे,
'खळ त्यांतें वेचावे' रमा[11] म्हणे, 'प्राण जे न वेचावे.' २७६

**मो** हीं नंद यशोदा व्रज हि बुडे, ऐकतां असी वार्ता;
धाउनि येउनि पाहुनि रडती गोपी हि धेनु ही आर्ता[12]. २७७

[13]**भ** गण जसा राहुमुखीं विधु पडतां, व्रज तसा दिसे दीन;
डोहीं बुडतां, वारी राम, समस्तांत तो चि भयहीन. २७८

---

१. अत्यंत तृषित होऊन. २. दुष्टांचा संहारकर्ता. ३. जिवंत करी. ४. गरुडाच्या भयानें. ५. सौभरि ऋषीच्या वरानें निर्भय झालेल्या ठिकाणीं. ६. विषरूप गर्व. ७. डोहाच्या कांठावर उगवलेल्या कदंबवृक्षावर. ८. [द्विजप=] गरुड—**पंत.** अमृत आहे हातीं ज्याच्या अशा गरुडाच्या चरणधूलिकेला. ९. देव. १०. वेटोळ्यानें. ११. रमा म्हणे, 'जे खळ त्यांतें वेचावे (मारावे); [पण स्वतांचे] प्राण न वेचावे.' १२. पीडित. १३. तारकांचा समूह.

ग[1] रळमदांधखळभुजगभोगनिबद्धांग देव तो उगला
होता विषमूर्छितसा, मग भगवान् भोगबंधनीं फुगला. २७९

व[2] लयें जरि न उकलिता कालिय, तैसा चि निजबळें भुलता,
तरि तत्काल चि त्याचा भोग तटतटां स्थळस्थळीं उ[3]लता. २८०

ते ज विषाचें न चले, परि करि फूत्कार फार तो नाग;
धांवे धरावया तों चुकवी, आणी पुनःपुन्हां राग. २८१

वा[4] ताशन तो दुष्ट श्रमवुनि बहु वेळ फार भागविला;
प्रभुनें अनीतिवर्ती वि[5]षधनमदमत्तनाग नागविला. २८२

सु हृदानंदकर प्रभु मग त्याच्या मस्तकांवरी चढला.
यत्न न चाले कांहीं, नाग क्रोधानळें मनीं कढला. २८३

दे उनि पाय फणांवरि तांड[6]व आरंभिलें त्रिजगदाद्यें.
तत्काळागत सेवासादर गंधर्व वाजविति वाद्यें. २८४

वा हे शोणि[7]त नासानेत्रास्यें[8], होय हीन[9] तनु रक्तें;
करितां नृत्य मुकुंदें तांडवसा[10]हित्यसंपदनुरक्तें. २८५

य मुनेला अहिला ही करितां निर्दोष, सकरुणा आर्या
प्रभुला पदर पसरुनी मागति असुदान त्याचिया भार्या. २८६

न मितां प्रसन्न होय, स्तवितां कोप प्रभु त्यजी पहिला;
अहिला म्हणे, '[11]रमणकद्वीपाला सहकुटुंब जा वहि[12]ला.' २८७

मो त्यें नागस्त्रींच्या लेवविलीं आपुल्या करें नाकीं,
स्वयशें देवस्त्रींच्या कंठीं देवें दयाकरें नाकीं. २८८

भ रिती मूर्ति प्रभुची रत्नांहीं, आपुली [13]तदंघ्रिरजीं;

---

१. विषानें उन्मत्त झालेला दुष्ट नाग त्याच्या शरीरानें बांधलें गेलें आहे अंग ज्याचें तो. २. वेटोळें. ३. तुटता. ४. वायुभक्षक [कालिया]. ५. विषरूप जें धन तद्रूप गर्वानें माजलेला सर्प. ६. नाचणें. ७. रक्त. ८. नाक, डोळे व तोंड यांतून. ९. रक्तहीन. १०. नृत्याची सामग्री ही च संपत्ति तिला लोभलेल्या अशा. ११. जंबुद्वीपाच्या आठ उपद्वीपांपैकीं एक त्याला. १२. सत्वर—पंत. १३. त्याच्या चरणधूलिकांनीं.

भाग्योदयें मिळालीं, सुलभ ब्रह्मादिकां सुरां हि न जीं. २८९
"ग रुड न करील पीडा, मत्पदमुद्रा असे शिरीं, जा गा!"
देव म्हणे, 'त्वन्मथनस्मरत्यां[1] अहिभय नसो, असें जागा.' २९०
व चन अभयामृतार्द्र प्रभुचें प्राशूनि नाग तो गेला.
जयजयकार सुरानीं, गोपाळानीं हि, तेधवां केला. २९१
ते थें चि सप्रभु व्रजवासी रात्रीस राहिले हो! ते;
तैं प्रभु वणवा प्याला; नाहींतरि सर्व दाहिले[2] होते. २९२
बा ळांसह बळ कृष्ण क्रीडति नानापरी सदा रानीं,
ज्या क्रीडा देवानीं आदरिल्या उज्झितस्वदारानीं[3]. २९३
सु खद क्रीडा यांची पाहुनि असुर प्रलंब हानी च
मानी, प्रभुघातार्थी कपटी गोपाळ होय हा नीच. २९४
दे वानीं क्रीडाया बाळांचे दोन कल्पिले भाग,
शिरला प्रलंब वृंदीं[4] त्या, ज्यांचा नाथ हरि महाभाग. २९५
वा[5] ह्य जयवंत[6], वाहक जे त्या खेळीं पराजित, क्रीडा
आरंभिली असी जी, दे अधिका मुक्ति म्हणति त्यां 'व्रीडा[7]'. २९६
य दुपति जाणोनि, तया माराया खेळ तो तसा करवी;
हरि अरिला मित्र करी; असुर म्हणे, 'भूलि घातली बरवी'. २९७
न वल कारि हरि, पराजित होय, क्रीडेंत हांसणें साहे;
श्रीदाम्याला आपण, वृषभाला भद्रसेन[8] ही वाहे. २९८
मो क्या हर्षें वाहे रामास हि घातक प्रलंब; कसा
समयीं चुकेल जपत चि होता दंभप्रवीण जो बकसा? २९९
भ रभर[9] धांवति अन्य हि वाहक वाह्यांसि नेति एकवटें.
उतराया मर्यादा होता भांडीरनाम एक वट. ३००
ग दगद हांसत सकळांहूनि बळाचा पुढें पळे घोडा;

१. तुझें [हें मीं केलेलें] मथन आठविणाऱ्याला. २. जाळिले. ३. टाकल्या आहेत आपल्या स्त्रिया ज्यानीं. ४. समुदायांत, टोळींत. ५. वाहून नेण्यास योग्य. ६. जिंकणारे. ७. लज्जा. ८. यादवविशेष. ९. एकदम.

लंघी परमेश्वरकृतमर्यादा, समय राहिला थोडा. ३०१
ब[1] ळभर वेग उणा त्या दुष्टाचा पळवितां करी; हरिला
मूढें स्वकाळ दाटुनि; न मरेल हरुनि कसा करी हरिला? ३०२
ते शिशुमायों[2] त्यजिली, तेणें निजदेह [3]अद्रिगुरु धरिला;
मग गगनपथें दुष्टें राम घनें पूर्णचंद्रसा हरिला. ३०३
वा टे भय पळभरि, परि हरि करि सावध बळाचिया चित्ता;
मग मुष्टिनें चि हाणुनि शिर फोडी, वांचवी [4]सुहृद्वित्ता. ३०४
सु टला बळ रिपुपासुनि, सखिजन, सुरजन हि आधि[5]पासूनीं;
पडलि कुसुमवृष्टि नभापासुनि, खळतनु हि तोंड वासूनीं. ३०५
दे[6] वर इंद्राणीचा मुंजवनीं [7]दावपावकाकुळ ती
गोगोपचमू रक्षी, द्रवला जाणोनि भाव काकुळती. ३०६
वा[8] युसखातें प्राशी, शीत, सुरभि, मधुर, शुचि जसें पाणी,
भांडीराप्रति मीलि[9]तनयनां गोपां सगोधनां आणी. ३०७
यं[10] त्त सदा प्रभु आर्तत्राणीं च, दुजी न तन्मनांत रुची;
स्वप्नीं हि न होवूं दे स्वजनांला स्मृति सुरांचिया तरुची. ३०८
नं[11] गकन्येसि कुमारी हेमंतीं पूजिती यथोक्त, 'सदा
नंदतनय अस्मत्पति हो,' ऐसें प्रार्थिती नमूनि पदा. ३०९
मो ठ्या प्रातःकाळीं यमुनेचें स्नान करुनि त्या धन्या
कात्यायनीसि पूजिति, भक्षिति नियमें [12]हविष्य त्या कन्या. ३१०
भ[13] गवत्यर्चनसक्ता हर्यनुरक्ता कुमारिका मास
व्रत करिति, म्हणुनि जाय प्रभु पुरवाया तदीयकामास. ३११
गं[14] गनमणिसुतातीरीं वस्त्रें ठेउनि, कुमारिका [15]अमळीं

---

१. बलरामाचा जोर. २. बाललीला. ३. पर्वताएवढा मोठा. ४. मित्राच्या (कृष्णाच्या) संपत्तीला (प्राणांला). ५. चिंतेपासून. ६. दीर (कृष्ण). ७. वणव्यानें वेष्टित. ८. अग्नीला. ९. मिटले आहेत डोळे ज्यांचे त्यांला. १०. सज्ज. ११. पार्वतीला. १२. हवन करण्यास योग्य असें शुद्ध अन्न. १३. पार्वतीपूजनांत निमग्न झालेल्या. १४. यमुनातीरीं. १५. स्वच्छ अशा.

जों त्या करीत होत्या स्नान पहाटे महासरित्कमळीं[1]. ३१२

व र द्यावयासि गेला तों घेउनि तो दयालु गडियांतें
हरि! हरि! हरि स्वहस्तीं त्यांच्या चि हितोदया लुगडियांतें. ३१३

ते धवल, रक्त, मेचकें[2], पीत, हरित, वस्त्रभार बरवे घे;
यमुनातटभूरुहकुलदीपीं[3] नीपीं[3] त्रिलोकवर वेघे. ३१४

वा स श्रीचा हांसे जो निववुनि हांसवी सखेदास.
हांसती कदंबतरुवरि जे त्या सुखसिंधुचे सखे दास. ३१५

सु दंतींस[4] म्हणे, 'देतों वर वस्त्रें, एक एक मागा या.'
ऐकुनि बाळा लाजति कामितदा[5] दिव्यजंगमागा[6] या. ३१६

दे ह सलिलपटपारिवृत[7] करिति, सती होति सत्रपा[8], यांतें
नर्म सुखवि, विनविति; कवि म्हणति जयां 'अमृतसत्र[9]' पीयातें[10]. ३१७

वा सें यावीं हातां, म्हणउनि सामाद्युपाय त्या करिती;
परि न वळे प्रभु, मग जगदीशमताला कुमारिका वरिती. ३१८

य मुनेसह लज्जेला सोडुनि ते नमिति पाद, सहवासें
ज्यांच्या धन्या लक्ष्मी, वरिति हितवरप्रसादसह वासें. ३१९

न लिनींतें द्युतिकर[11], कीं कैरविणींतें[12] सुधाकरें[13] सत्यांतें
सुखउनि गेला प्रभु, यापरि ते देती कधीं न रस त्यांतें. ३२०

मो दांकर[14] परमेश्वर बळगोपसमेत गोधनें चारी,
मार्गीं तरुगुण वर्णी, 'कीं उपकारी जगांत ते भारी.' ३२१

---

१. महानदीच्या उदकांत. २. काळे. ३. यमुनेच्या कांठावरील वृक्षसमुदायांत जो दीपाप्रमाणें त्या कदंबवृक्षावर. ४. चांगली आहे दंतपंक्ति ज्यांची अशांला. ५. इच्छित देणाऱ्याला. ६. दिव्य व हिंडताफिरता जो वृक्ष त्याला. ७. जलरूप वस्त्रानें वेष्टित. ८. लज्जायुक्त. ९. अमृताची पोई. १०. मूळांत हा चरण चुकून ३१८।२ येथें पडला व तेथील येथें पडला होता. परंतु शोधचिह्नानें उभय चरणांची युक्त स्थानें वरीलप्रमाणें सुचविलीं आहेत. ११. सूर्य. १२. कुमुदिनीला. १३. चंद्र. १४. आनंदाची खाण च असा.

भ वनीं सर्वक्रतूंच्या चारी गाईस पद्मनाभ वनीं,
अवनीतें धन्य करी चरणीं, जे पटु जगाचिया अवनीं. ३२२
म वतें भक्षुनि गाई झाल्या तृषिता, तयांसि रविजेतें[1]
नेउनि पाजी जळ तो, यत्पद्जळ शिरि शिवें मिरविजेतें. ३२३
व लवशिशु बळकृष्णां म्हणति, 'सिदोरी न आणितां आलों,
सांगा उपाय कांहीं, प्रभु हो! क्षुद्विकळ[2] सकळ ही झालों.' ३२४
ते पाठविले प्रभुनें विप्र करिति सत्र तेथ 'जा, राम
मीं ही आलों सांगा; अन्नें देतील ऐकतां नाम.' ३२५
वां[3] डव गोपाळांनीं नमिले, कथिलें प्रभूक्त, परि कांहीं
'जा' ऐसें हि न वदले; आले शिशु, म्हणति, 'उत्तर हि नाहीं'. ३२६
सु कुशळ याचकरीत्या स्वध्यानामृतहृदांत न्हात्यांतें
द्विजदारांतें अन्नें मागाया पाठवी पुन्हां त्यांतें. ३२७
दे वाज्ञेनें त्यांतें भेटुनि कथितां चि हर्षल्या आर्या;
घेउनि अन्न निघाल्या, अर्पाया गुरुवरासि मुनिभार्या. ३२८
वा रिति पति, परि परिभव[4] करुनि निघाल्या; मरे चि एक सती!
पतिपापाग्नीं प्रेमस्वर्णाचा[5] दाखवूनि दे कस ती. ३२९
य मुनोपवनीं भेटति त्या सुखसिंधूसि आपगा[6], त्यांचें
गुरुलंघन हि न लंघन, हरिहरि हरि सर्व पाप गात्यांचें. ३३०
न यनयुगें प्राशिति त्या मूर्तश्यामामृतास त्या, तृषितें,
प्रेमें स्त्रिया हि प्याल्या; प्रेमरहित पावले न ते ऋषि तें. ३३१
मो कळुनि सर्व संग प्रेक्षिति त्या निर्निमेष वरदास्य[9];
मागति पदर पसरुनीं मुक्त्याद्यखिलां वरांत वर दास्य. ३३२
'भ वना जा' म्हणतां त्या म्हणति, 'अहो! सदय! नाथ! देव! मन
ज्या विटलें त्यासि कसें सेविल? अजि! फार विकृति दे वमन[10]. ३३३

---

१. यमुनेला. २. भुकेनें व्याकुळ. ३. ब्राह्मण. ४. अनादर. ५. प्रेमरूप सुवर्णाचा. ६. नद्या. ७. इंद्राधिपति कृष्ण. ८. पात्रास पातें लाविल्याशिवाय. ९. वर देणाऱ्याचें मुख. १०. ओकलेली वस्तु.

ग रळाहुनि विषय विषम[1], दाटुनि तत्सेवनासि पाठविसी,
　हें उचित काय? सदया! वद या दासींत कां न सांठविसी? ३३४
व रदेश्वरा! अभयवर दिधले शरणागतांसि बहुलक्ष;
　रक्ष, उपेक्षा न करीं, हा जन न भवानळांत[2] हो कक्ष[3]. ३३५
ते पति अति कठिन, कसें येऊं देतील मागतीं सदना?
　वद नाथा! दावावें त्यांला जाऊनि या कसें वदना?' ३३६
वा डववरस्त्रियांतें प्रभु समजावुनि म्हणे, 'मला गावें;
　त्यांत प्रसन्न बहु मीं, योगांतरसाधना[4] न लागावें. ३३७
सु ख लेश अंगसंगें, मज चित्त समर्पितां अनंत सुख;
　पावाल मला निश्चित, पति हि द्रवतील देखतां चि मुख.' ३३८
दे ऊनि आत्मप्राप्तीविषयीं निजभक्तिरूप मोकला[5]
　बोळवितां त्यांहीं बहुवार नमस्कार वल्लभा केला. ३३९
वा खाणिति पति त्यांचें बहु भाग्य, अभाग्य आपुलें सर्व;
　म्हणति, 'बुडालों कर्मीं कर्मठ, वाहूनि मस्तकीं गर्व. ३४०
य[6] ज्वे, पंडितंमानी[7] म्हणुनि भ्रमलों! बरी असाक्षरता[8];
　ज्ञानाभिमान नसता करगत परमार्थ कां असा क्षरता[9]?' ३४१
न[10] गभित्प्रियार्थ वार्षिकमखसंभारांसि[11] करवितां, नंदा
　'कारितां काय?' म्हणे प्रभु, सांगे कुळधर्म तो जगत्कंदा. ३४२
मो डी मत त्यांचें प्रभु, कवण 'नव्हे हें' म्हणेल त्यासि कवी!
　'गोब्राह्मणगोवर्धनपूजा विहिता' असें तया सिकवी. ३४३
'भ जतां भलत्यासि कसे? सिरतां दाटूनि कोंवि सर्व तमीं?
　म्हणतों स्वजीविकाश्रय[12] गोधन गोवर्धनाख्य पर्वत मीं.' ३४४
ग र्व त्रिदशपतीचा नाशाया वृद्धबुद्धिभेद[13] करी;

---

१. अवघड. २. संसाररूपी अग्नींत. ३. गवत. ४. अन्य योगाच्या उपायाला. ५. वचनाला. ६. याज्ञिक. ७. पंडितंमन्य. ८. निरक्षरपणा. ९. गळता. १०. इंद्रहितार्थ. ११. प्रतिवर्षी होणाऱ्या यज्ञाच्या तयारीला. १२. आपल्या जीविताला आधारभूत असें. १३. वडील [नंदादिक] त्यांच्या बुद्धींत फरक.

वाटे नंदप्रमुखां हित, आग्रहरहित, विहित उक्ति खरी. ३४५
**व** ळले, सर्व हि करिती गोद्विजगिरिपूजनोत्सव प्राज्य[1];
वाढिति विप्रांसि बहु स्वाद्वन्नें मसृण[2] दुग्ध दध्याज्य[3]. ३४६
**ते** स्वमतीस प्रत्यय व्हावे म्हणवूनि अन्य रूप धरी;
भक्षी उपहार नगीं बैसुनि, 'मीं गिरि' म्हणे स्वयें चि हरी. ३४७
'**वा** गवितों मीं सकळां, आश्रित माझे तुम्हीं, असा भजनीं;
व्याळ, व्याघ्र खळजनीं होतों, करितों कृपा बहु स्वजनीं. ३४८
**सु** ख देतों, भय हरितों, मीं गोवर्धन, सखा चि भजत्यांचा;
पितरांसि अपत्यांचा लोभ असे त्यांपरीस मज त्यांचा.' ३४९
**दे** व असें नगशिखरीं धरुनि बृहद्वपु[4], वदे तया गवळी
वंदिति, 'जय! जय!' म्हणती; करि आपण ही तसें चि त्यांजवळी.
**वा** जविती वाद्यांतें, गाती गिरिला, प्रदक्षिणा करिती;
म्हणती, 'झालों धन्य!' प्रभुवाग्विश्वास मानसीं धरिती. ३५१
**य** ज्ञ असा गोवर्धनगोधनविप्रप्रियार्थ करवीला,
लीलामृतरस आम्हां भवरोगव्याकुळांसि भरवीला. ३५२
**न** गरिपु पूजाभंगें नंदावरि, गोधनांवरि हि कोपे,
प्रेषी प्रळयघन व्रजनाशार्थ, विवेक त्या तेमीं लोपे. ३५३
**मो** ट पिपीलिकपुंजीं[6], प्रलयघनघटा[7] तसी व्रजीं ओते.
होते अजितभुजाश्रित[8], नाहीं तरि वांचते कसे हो! ते? ३५४
**भ** ग्न क्षणांत केले जे पादप[9] बद्धमूळ ते वातें,
पातें शंपांच्यीं[10] ही; 'धांव' म्हणति सर्व गोप देवातें. ३५५
**ग** र्जति घन कटु, शंपा कंपा देती, महाभया गारा;
धारा त्या धारणशा[11], 'धांव' म्हणति गोपिका दयागारा[12]. ३५६

---

१. जंगी. २. घट्ट, स्निग्ध. ३. दहीं व तूप. ४. मोठें शरीर. ५. [कोपरूप] अज्ञानांत. ६. मुंग्याच्या समुदायावर ( वारुळावर ). ७. प्रलयकाळच्या मेघांचा समुदाय. ८. कृष्णबाहूंला आश्रयिलेले. ९. वृक्ष. १०. विजांच्या. ११. खांबासारख्या. १२. दयेचें घर असणाला.

व  त्सें पोटाखालें झांकुनि, पाहोनि हरिस हंबरडे
फोडिति गायी, एवं तो व्रज होऊनि निरवलंब रडे. ३५७
ते  व्हां गोवर्धन नगनाथ, छत्राक जेंवि बाळानें,
धरिला समूळ हस्तीं लीळेनें चि त्रिलोकपाळानें. ३५८
वा  त हि न करि उपद्रव जेथें ऐसें स्थळ क्षणांत करी;
गोगोपगोपिकांतें रक्षी सप्ताह त्या स्थळांत हरी. ३५९
सु  टले न ते चि त्या चि व्यसनापासूनि विनवितां हरितें.
अद्यापि तच्चरित्र स्मरत्यांचीं सर्व संकटें हरितें. ३६०
दे  व असें करि संश्रितरक्षण सुरनाथमुख हि भारहित;
दीनांचें संपादी वाहुनि सप्ताह अद्रिभार हित. ३६१
वा  सव गुरुनयपटु हि न माने, कीं तेथ गर्वतम नांदे;
माने जड हि यश दिलें, अचळपणें तोप पर्वतमना दे. ३६२
य  श नगरिपुचें प्रभु हरि, दे स्वकरीं धरुनि त्या जडा हि नगा;
देवें न म्हणतां हि म्हणे, 'अचळा गा, स्वाग्रजा चळासि न गा.' ३६३
न  ष्टमद बळारि म्हणे, 'घन हो ! मळउनि वृथा नभा गाजा;
व्रजपदरज हि न बहुधा पुरतें प्रक्षाळिलें, न भागा, जा'. ३६४
मो  घश्रम जलदघटा परते ते, जेंवि हरिपुढें कुतरीं;
व्रजजन बाहेरि निघे, मग नग जगदीश भूतळीं उतरी. ३६५
भ  ग्नमद त्रिदशाधिप एकांतीं त्या पदा करी नमन;
जेणें प्रमुदित केलें नाशुनियां आपदा करीनमन. ३६६
गं  जवाहन कर जोडुनि विनवी करुणार्णवा जगन्नाथा,
ज्याच्या श्रीपदपाथा ओडविला सादरें हरें माथा. ३६७

---

१. निराधार. २. छत्रीच्या आकाराचें एक लहान झाड उगवतें तें. ३. सात दिवस. ४. आश्रितांचें संरक्षण. ५. निस्तेज. ६. मोठा नीतिनिपुण असा असतां हि. ७. दिलेलें. ८. देवानें [गोवर्धन 'स्वकरीं धरून'] कांहीं न बोलतां हि असें सुचविलें कीं, 'गोवर्धनाला गा; चंचल बुद्धीच्या माझ्या वडील भावास (इंद्रास) गाऊं नका.' ९. गजेंद्राचें मन. १०. इंद्र. ११. शोभायमान अशा चरणरूप उदका.

व त्सलगुरु हरि घाली वज्रभृदपराधवृंद पोटीं तें;
व्रत चि तयाचें, दिधलें अभय असें चि प्रपन्नकोटींतें. ३६८

ते पाय मायबाप प्रणतीं न कधीं हि जाहले वक्र.
न क्रतुशत हितकर हरिपदनतिसम, समजला असें शक्र. ३६९

वा सवकाळापासुनि निजसंतति रक्षिली, म्हणोनि सती
सुरधेनु प्रभुचरणा वंदी, पितर न दुजे तसे दिसती. ३७०

सु रभी ब्रह्मानुमतें निजसंततिपाळका तया हरिला
अभिषेकार्थ प्रार्थी, प्रभुनें ही तत्प्रियार्थ आदरिला. ३७१

दे वर्षिशक्र करिति प्रभुला अभिषेक गगनसारिदंभें.
स्वपयें सुरभि हि तारी, यद्यश आलें मुखासि जरि दंभें. ३७२

वा स्तोष्पति 'गोविंद' प्रभुसि म्हणे, होय तें चि तन्नाम;
कीं, गाईंचा होउनि इंद्र करी पूर्ण सुरभिचा काम. ३७३

य मुनेंत, हरिदिनीव्रत करुनि, पहाटे च मज्जन व्रजप
करि पारणा कराया, साधुनि देवार्चन स्वमंत्रजप. ३७४

न व्हती मज्जनवेळा यास्तव नंदासि वरुणभृत्य हरी.
त्याला आणी वरुणापासूनि, करी सुपुत्रकृत्य हरी. ३७५

मो हनमूर्ति विभु म्हणे, 'अमृतकरधवलशरन्निशांमाजी
क्रीडावें गोपींसीं, वांछिति सेवा मनीं सदा माजी'. ३७६

भ क्तप्रिय परमेश्वर वाजवि बहु मधुर, चित्तहर पावा;
कीं गोपींचा, सेउनि नादामृत, सर्व ताप हरपावा. ३७७

ग मलें गृह गोपींतें गहन, गहन गेह, वेणुच्या पानें;
गेल्या प्रियाकडे त्या, नेल्या रक्षूनि पुष्पचापानें. ३७८

---

१. इंद्राच्या अपराधांचा समुदाय. २. शरणागतांच्या कोटींला. ३. [ रक्षण करणारे म्हणून ] पितर. ४. भागीरथीच्या उदकानें. ५. आपल्या दुधानें. ६. इंद्र. ७. ह्या ठिकाणचा खोडलेला पाठः—देवातें इंद्र. ८. पालनकर्ती. ९. एकादशीव्रत. १०. नंद. ११. चंद्रानें [ आपल्या किरणांनीं ] शुभ्र केलेल्या अशा शरदृतूंतील रात्रीं ( चांदण्यांत ). १२. अरण्य. १३. पावाच्या, मुरलीच्या. १४. पुष्पें हे च बाण ज्याचे त्या मदनानें.

ब ल्लव रोधिति ज्यांला त्या तनुतें त्यजिति तत्क्षणीं, अजि ! तें
प्रेम वदावें काय ? श्रीहुनि बहु मानिल्या स्वयें अजितें. ३७९

ते गोप मग न रोधिति, निजदारांतें विलोकिती शयनीं;
प्रभु माया स्त्रीरूपें त्यांच्या रेखी सदैव ही नयनीं. ३८०

वा हों आल्या तनुमन निजचरणीं हें कळोनि, आगमनीं
त्यांसीं विनोद करि बहुनिष्ठुरसा जरि हि सानुराग मनीं. ३८१

सु मुखी रडति 'गृहा जा' म्हणतां, मग त्या नमूनि भवनाशा,[1]
दास्यवरार्थ प्रार्थिति हृदयांतूनि त्यजूनि भवनाशा.[2] ३८२

दे अभय दयासिंधु, क्रीडे त्यांसीं परोपरी रानीं.
पूजिति पाय प्रभुचे पुष्पानीं, तेंवि त्या शरीरानीं. ३८३

वा टे त्यांस प्रभुनें करितां बहुमान, 'सुंदरी, धन्या,
सर्वां[3] स्त्रियांत आपण, ऐसी लोकत्रयीं नसे अन्या'. ३८४

य तिपति, आत्मरत, प्रभु, साक्षी म्हणवूनि त्यास त्या कळल्या
कीं, या सौंदर्यमदें मानें मूढा व्रजस्त्रिया मळल्या. ३८५

न म्रपणें श्रीदेवी[3] सेवी पद, जीस सर्व मानवती;[4]
तीच्या स्वामीस कशा त्या गोपी मानतील मानवती[5] ? ३८६

मो कलिल्या तत्काळ, प्रभु झाला गुप्त, दुर्गुणें[6] विटला;
स्त्रीजन विरहीं टाकी, जैसा अग्नींत दिव्य पट किटला. ३८७

भ रल्या प्रियविरहविषें, स्मरल्या गोपी मनांत अपराधा;
'नेली एक प्रभुनें जी, काय करी अनंत तप राधा?' ३८८

ग हनीं शोधिति, पुसती देव स्थिरजंगमांसि, तळमळती.
अश्रुस्नाता गोपी पडतां कवळूनि भूमितळ मळती. ३८९

व ल्लभपदमुद्रांसह[7] सिकतेंत[8] स्त्रीपदें हि लक्षूनि
त्या बहु तापति, जेंवि क्षुधित सदन्नांत गरळ भक्षूनि. ३९०

---

१. संसाराचा नाश करणाऱ्याला. २. घराची आशा. ३. लक्ष्मी. ४. मान देतात. ५. अभिमानयुक्त. ६. [ सौंदर्यमदरूप ] दुर्गुणानें. ७. प्रियाच्या पायांवरील चिह्नांसह. ८. वाळूंत.

ते वींच, दिसे जों जों तत्क्रीडाचिह्नपंक्ति महिवरती
तों तों गोपी, जाणुनि कांतकृतस्वापमान गहिवरती. ३९१

वा टे तिसं[1]ही ऐसें कीं, 'ललनारत्न मीं, तरीच मला
गोपी टाकुनि आला घेउनि, मजसीं परोपरी रमला.' ३९२

सु दती ती प्रभुसि म्हणे, 'मज तों मार्गीं न चालवे स्पष्ट,
जाणें तिकडे न्यावें, हरि! मीं न शकें चि, पावल्यें कष्ट.' ३९३

दे व म्हणे, 'ये स्कंधीं,' गोपी गेली च हो! बसायास,
तों गुप्त होय भगवान्! स्वातिक्रम मानतो कसा यास? ३९४

वा टेंत रडे ती जों, तों गेल्या तीसमीप त्या सर्वा;
रडती, निंदिति तीच्या आपुलिया हि व्यथाकरा गर्वा. ३९५

[2]य मुनापुलिनीं गेल्या, विफळाशा जाहल्या, वनीं श्रमल्या,
श्रमल्या भगवद्विरहीं, त्या सर्वा दीनदीनशा[3] गमल्या. ३९६

न क्षत्रें इंदुविणें, स्त्रीरत्नें प्रभुविणें, तसीं गमलीं.
स्वसुखनिधान करींचें जातां त्यांचीं मनें बहु श्रमलीं. ३९७

मो हळ कृष्ण सुरसमय, गोपी सरघा[4] चि, त्यासि त्या चुकल्या.
काय क्लेश वदावा? सुकल्या शोकें, स्वजीवना मुकल्या. ३९८

भ क्तीनें आळवितां, गातां गुण चिंतुनीं मनीं मूर्ती,
प्रकटे गोपींत प्रभु, होतां तद्बुद्धि निर्मळा पूर्ती[5]. ३९९

[6]ग लदंजनाश्रुमलिनें वदनें त्यांचीं पुसी स्वपाणीनें;
सांत्वन करि प्रियांचें परमेश्वर अमृतमधुरवाणीनें. ४००

व नितांसह मग तितक्या मूर्ति धरूनि स्वयें करी रास[7].
गोपी चुंबिति, हुंगिति, आलिंगिति, सुंदरा शरीरास. ४०१

ते बाहुगुण[8]ग्रथित, श्यामप्रभ, गौर, देह अतिरुचिर
रासीं शोभति, हारीं शुचिमरकत[9]कनकमणि, तसे सुचिर[10]. ४०२

---

१. राधेला. २. यमुनेच्या वाळवंटावर. ३. अत्यंत दीन अशा. ४. मधमाशा. ५. पूर्ण. ६. गळणारें जें कज्जलयुक्त नेत्रोदक त्यानें मलिन. ७. गोपालांचा नृत्यविशेष. ८. बाहुरूप रज्जूनीं गोंवलेलें. ९. पाच. १०. बराच वेळ.

वा द्यें वाजविती सुर, गोपींसीं गाय जैं हरी रासीं;
स्वर शोभला स्वरासीं, जैसें चि शरीर तच्छरीरासीं. ४०३
सु भगानीं शुभगानीं स्कंधीं पतिच्या समर्पुनि स्वभुजा
दाखविल्या देवगणीं दावी वेणूंत मूर्छना[1] प्रभु ज्या. ४०४
दे वुनि पद्मादुर्लभ[2] सुखरासीं त्या जळीं स्थळीं रमवी;
अस्खलितवीर्य[3] भगवान् गोपींचा कामताप तो शमवी. ४०५
वा[4] माक्षी त्या प्रातःकाळीं जातां फिरोनि सदनातें
शतदा भेटति, चुंबिति, पाहति मुरडोनि कांतवदनातें. ४०६
य मसदन तसें होय त्रासप्रद गोपिकांसि निज[5] ओकें;
कांटाळती गृहातें, म्हणति, "खरें, म्हणति यासि कवि 'ओकं[6].'" ४०७
न गजा, श्रीजगदंबा, पशुपतिहृदयप्रिया तिची यात्रा
आली, साक्षान्नानापीडांची नाशकारिणी मात्रा. ४०८
मो टा यात्रोत्सव तो, गेले बळ, कृष्ण, नंद पशुपतिला.
पूजिति, आधीं पूजुनि तत्पतिला, प्रेमयुक्त पशुप तिला[7]. ४०९
भ क्षी अजगर रात्रौ नंदाला; फार पावला विपदा.
ताडिति भाजिति, परि अहि सोडीना; मग मुकुंद लावि पदा. ४१०
ग ति बरवी तो पावे; पादस्पर्शें सुरूप होय अही.
देव पुसे, 'तूं कोण द्युतिनें[8] करिसीं प्रकाशपूर्ण मही?' ४११
व दला तो पुरुष, "असें विद्याधर मीं, मुनींद्रशापानें
झालों अजगर देवा! स्वकृतांगिरसोपहासपापानें[9]. ४१२
ते मुनि कुरूप पाहुनि त्यांला मीं हांसलों प्रभो! अति; तें
पाप स्वसुरूपमदें घडलें मज, पावलों अशा गतितें. ४१३
वा रुनि कुगति, सुगति दे पद चि सुदर्शन, न नाम हें माजें.
धत्तूरा साजेना, साजे तें 'कनक' म्हणति हेमा जें. ४१४

---

१. गायनाचा प्रकारविशेष. २. लक्ष्मीला दुर्लभ. ३. ज्याचें वीर्य स्खलित झालें नाहीं असा. ४. सुंदर आहेत नेत्र ज्याचे त्या. ५. स्वगृह. ६. वांति. ७. पार्वतीला. ८. तेजानें. ९. आपण केलेलें अंगिराऋषीचें उपाहासरूपी पाप त्यानें.

सु गतिप्रदपदपद्मा! पद्मासद्मा! तुझ्या पदा नमन;
वर दे वरदेशा! हा, माझें विसरो तुला कदा न मन." ४१५
दे हातें ओवाळी प्रभुच्या पायांवरूनि तो दास.
जाय सुदर्शन विद्याधरवर पावोनियां प्रमोदास. ४१६
वा जविती वेणु वनीं रात्रौ बळकृष्ण एकदा; त्यांतें
सेविति गोपी अधरामृतरस पाजूनि तृप्तिदात्यांतें. ४१७
य क्षेंद्रभृत्य गुह्यक दरचूड अशांत गोपिकांसि हरी
त्यामागें धावति बळहरि; हस्तीच्या वधार्थ जेंवि हरी. ४१८
नैं क्तंचर चोर, चपळ बळकृष्णांच्या भयें वधूरत्नें
सोडूनि पळे प्राणत्राणार्थी, त्यासि हरि वधी यत्नें. ४१९
मो हें प्रभुचीं ललनारत्नें हरितां स्वमूर्धरत्नातें
हारवि; असें चि बुडति व्यसनीं दुर्मति करूनि यत्नातें. ४२०
भ गवंत शंखचूडा मारुनि तन्मूर्धरत्न रामातें
अर्पी, सादर पाहति सुप्रभ हरिमुख चि त्या, न रामा तें. ४२१
ग रकटु हरिविरहदिन क्रमिति सती तद्गुणांचिया गानीं;
आनंद स्वर्गीं ही त्याहुनि द्यावा उणा चि यागानीं. ४२२
व र्णिति हरिमूर्तीला तदधरचुंबी तया हि मुरलीला;
ज्यांच्या, गाती गगनीं सस्त्रीक महेशमुख्य सुर, लीला. ४२३
ते प्रेमोद्गार मधुर, मधुरतर मुकुंदयश हि आधीं तें,
गात्यांच्या, श्रोत्यांच्या, दूर करिति तत्क्षणीं च आधीतें. ४२४
वा हों नये जळानीं, डोलावें फण करूनि उरगानीं,
अश्रूनीं देवींचें नित्य भिजावें सवस्त्र उर गानीं. ४२५
सु र अनिमेष, तसे खग, मृग हि; वसति अहि, मयूर ही जवळ.
प्रभुवेणुरवश्रवणीं गायी, वत्स हि, न भक्षिती कवळ! ४२६

१. लक्ष्मीनिवासा. २. शंखचूड. ३. निशाचर. ४. प्राणरक्षणेच्छु. ५. आपल्या मस्तकरूपी रत्नाला. ६. त्याच्या ( शंखचूडाच्या ) मस्तकावर असणारें एक रत्न. ७. रामा ( स्त्रिया ) तें ( रत्न ) न [पाहति]. ८. यज्ञानीं. ९. त्याच्या अधरोष्ठाला चोखणारी.

**दे** वातें, वेणूतें विरहीं वर्णूनि गोपिका निवती,
त्याहीं केली प्रभुची कीर्ति स्वप्रेमशिशुगळां जि[1]वती ? ४२७
**वा** ढेल ग्रंथ म्हणुनि आवरितों मीं बळें चि रसनेला.
परि म्यां [2]भागवतवरें भागवतांतील फार रस नेला. ४२८
**य** मकाळांतकदारुण असुर अरिष्टाख्य एकदा आला;
त्याला पाहोनि व्रज, कृष्णावांचूनि, सर्व ही भ्याला. ४२९
**न** गसा उच्च, महाबळ, खळ; वेगीं त्यापुढें उणा वात.
गोगोपीगर्भांचे झाले, तो दुष्ट गर्जतां, पात. ४३०
**मो** [3]चांतें वात तसा, गोपींतें कांपवी अरिष्ट खळ.
त्याला, ठोकुनि बाहु, प्रभु [4]बाहे, जो खळक्षयीं प्रबळ. ४३१
**भ** ग्न कारि गिरि जिहीं तीं हाणों येतां चि हरि धरी शृंगें,
सारी अष्टादश पद. जिंकावा हंसपति कसा भृंगें ? ४३२
**ग** जयूथवरें गजसा, तो खळ सारूनि पाडिला मागें.
पुनरपि सुर[5]र्षभावरि धांवे वृष वध करावया रागें. ४३३
**व** रिचेवरि धरुनि वृषभ शृंगीं प्रभुनें, जसा [6]अशुष्क [6]पट,
आक्रमुनि पदें, पिडुनि, केला नीरक्त तो सुदुष्कपट. ४३४
**ते** [7]तद्विषाणदंड प्रभुच्या वश जाहले स्वभुजदंडा.
फिरतां विधि, शिरिं होते ज्याच्या [8]तदसु हरिती करुनि दंडा. ४३५
**वा** निति जय, गोप म्हणति, 'कृष्णा! ऐसा चि वांच बहु वर्षें.'
जयजयकार सुर करिति, घोषातें झांकिती कुसुमवर्षें. ४३६
**सु** रमुनि कंसासि म्हणे, '[9]खगिरेला दोष कां पशो! देसी ?
हा कृष्ण देवकीचा, ती कन्या जाहली यशोदेसी. ४३७
**दे** वक्यात्मज कृष्ण, प्रसवे पूर्वीं च रोहिणी रामा

१. मुलाच्या गळ्यांत सटवाईची बाधा न व्हावी म्हणून पांचवीच्या दिवशीं एक ताईत बांधतात तो. २. श्रेष्ठ भगवद्भक्तानें. ३. केळींला. ४. बोलावी. ५. देवश्रेष्ठ (कृष्ण) त्यावर. ६. ओलें वस्त्र. ७. त्याचे शृंगरूप बाहु. ८. त्याचे प्राण. ९. आकाशवाणीला.

नंदसखा आला या वसुदेवाला स्वसंकटीं कामा. ४३८
बा ळ दिसति परि काळ चि, पुरुष तुझे सर्व त्या चि दोघानीं
नेले लयासि, गंगायमुनांच्या जेंवि दोष ओघानीं.’ ४३९
[1]यं वस ग्रीष्मीं दावें पेटे, क्रोधें तसा चि, त्यों [2]राया
[3]मुनि युक्तिनें चि वारी, उठतां शूरात्म[4]जासि मा[3]राया. ४४०
न रपति पुन्हां सदारा वसुदेवा बद्ध करुनि केशीतें
कृष्णवधार्थ प्रेषी, परि कांपे, कंप जेंवि ये [5]शीतें. ४४१
मो टें भय पावे, परि तो खळ फुगवी बळें चि गल्लांतें;
बाहे मुष्टिकतोशलशलचाणूरादि राजमल्लांतें. ४४२
भ गिनीपतिकपट कथी मल्लांसह आपुल्या अमात्यांतें;
ह[6]स्तिपकातें हि कुमति दे शीघ्र पहावया यमा त्यांतें. ४४३
‘ग ज सिद्ध असों द्यावा रंगद्वारापुढें [7]महामात्रा!
येतां चि रामकृष्णां उपदेशीं तूं चि यमपुरी यात्रा.’ ४४४
‘व र [8]मंचें रचा सत्वर मल्लमणी हो! तुम्हीं असा रंगीं.
येतां आंत तुम्हीं घ्या, शक्ति हरिपुढें टिके न [9]सारंगीं. ४४५
ते रामकृष्ण माझे मृत्यु खरे, सर्वथा न हे भाचे.
ज्यांची वृद्धि न हित, ते कापावे जेंवि [10]रदें महेभांचे. ४४६
बा ळस्त्रीवृद्धजना मंच बसाया पुरोनि राहोत.
पशु मारा, चालों द्या धनुयाग, नि[11]र्युद्ध सर्व पाहोत.’ ४४७
सु हृदा अक्रूरा मग कंस म्हणे, “तूं चि यदुकुळीं सुकवी.
जो सुज्ञ साधु तो [12]न प्रार्थिलिया [13]व्यसनविह्वळें चु[12]कवी. ४४८
दे दानपते! मज हें कथितों, तें त्वां अवश्य मानावें;
आणावे नंदतनय, जे असती ‘राम’ ‘कृष्ण’ या नावें. ४४९

---

१. तृण. २. मूळ पाठ—**माराया.** ३. मूळ पाठ—**वसुदेवासि उठे, तों मुनि वारी युक्तिनें चि त्या राया.** ४. शूरवंशीय जो वसुदेव त्याला. ५. हिंवानें. ६. महाताला. ७. विशेषनाम. ८. आसन. ९. काळविटांमध्यें. १०. मोठ्या हत्तींचे दांत. ११. बाहुयुद्ध. १२. अंगचोरपणा करीत नाहीं. १३. दुःखार्तानें.

बा ळक ते शौरीचे, मित्रपणें निजगृहांत मंदानें,
सुरनिर्मितमन्मृत्यू वाढविले सुत म्हणोनि, नंदानें. ४५०

य त्नें [1]मंत्र नुघडितां धनुर्म[2]खकौतुकविलोकनव्याजें
घेउनि ये, हा रथ ने, तें हि करीं तुज सुचेल भ[3]व्या! जें. ४५१

न गरीप्रति गो[4]रसकर द्याया सहगोप नंद आणावा.
त्वद्वचनें तच्चित्तीं बहु मत्स्नेहप्रसाद बाणावा. ४५२

मो घमनोरथ रिपुजन करिन, हृदयिंचें उ[5]पायहस्तीं तें
काढीन शल्य; केलें आहे म्यां सिद्ध मल्लहस्तींतें.'' ४५३

भ क्त प्रभुचा चित्तीं हांसे, त्यातें म्हणे, 'अजि! प्राज्ञा!
यत्नतरु अ[6]यवसंतें फळतो; त्यां आणितों, दिजे आज्ञा.' ४५४

ग हिवरला प्रेमभरें आज्ञा घेऊनि तो गृहा जातां
केशी गेला, त्याचें परिसावें मैं[7]थन सज्जनीं आतां. ४५५

व [8]सुधाधरोन्नता तो केशी खळ वाजिच्या धरी वेषा;
त्याच्या टापा क्षितिला कांपविति, विमानपंक्तिला हेषा[9]. ४५६

ते खुर त्याचे केवळ वज्रसखे, हाणितां पडे वापी,
दापी सुरांसि जो, कां गोपां न गमेल काळ तो पापी? ४५७

वा जीतें प्रभु बाहे, ज्याची काळाहिवरि सदा सत्ता;
लत्ता मारूं पाहे त्याला; धरि त्या पदीं च त्या मत्ता. ४५८

सु चिर गरगरां फिरउनि लीलेनें, गरुड जेंवि उरगातें,
देव शत ध[10]नुष्यांवरि टाकी सा[11]वज्ञ दुष्टतुरगातें. ४५९

दे वावरि पुनरपि ये चावाया वदन पसरुनीं तुरग.
प्रभु निजभुज त्या तुंडीं शिरवी, जैसा महाबिळीं उरग. ४६०

---

१. [गुप्त] विचार प्रकट न करतां. २. धनुयागाचें कौतुक पहाण्याच्या मिषानें. ३. हितकर्त्या! ४. दूध हा च कर. ५. उपायरूपी हातानीं. ६. भाग्यरूपी वसंतऋतूनें. ७. हनन. ८. पर्वताएवढा मोठा अशा. ९. (घोड्याचें) खिंकाळणें. १०. चार हात म्हणजे एक धनुष्य अशा शंभर धनुष्यांवर. ११. तिरस्कारानें.

**वा**[१] हाचे त[२]प्तायःस्पर्शेंसे दंत उमळले गाढे.
त्या खळदेहीं प्रभुभुज, जैसा आमय[३] उपेक्षिला वाढे. ४६१
**य** व बहु तिळभारि हि नुरवि देहीं अवकाश[४], भुज असा फुगला.
राहेल कसा दीपक तेजें न व्यापितां घटीं[५] उगला? ४६२
**न** यनें फिरउनि पडला, कर्कटिका[६]फळ जसें तसा उलला.
अजिन तशा हि पोटीं शिरुनि प्राण हरि त्या भुजा भुलला. ४६३
**मो** टा उत्सव झाला जनीं व्रजींच्या, तसा चि गगनींच्या.
आधीं श्रीकृष्णभुजा संत म्हणति ‘ धन्य!’ त्या हि मग नीच्या. ४६४
**भ** क्तश्रेष्ठ सुरर्षी एकांतीं स्वगुरुचे सुमृदु पाय
नमुनि म्हणे, ‘हे केले जीव तराया प्रमोदभृदुपाय[७]. ४६५
**ग** मलें सुख बहु देवा! परवां तूं मारिसील कंसातें;
पाहेन नागमल्लप्रमथन[८] मीं सुरशिरोवतंसा[९]! तें. ४६६
**व** धिसील शंख, यवन हि, मुर, नरक हि; पारिजात हरिसील;
वरिसील वीरकन्या, नृगराजाला[१०] हि मुक्त करिसील. ४६७
**ते** निजपितृभगिनीचे[११] नंदन उत्तमपदीं बसविसील;
अमरावतीसपत्नी[१२] नगरी रत्नाकरीं[१३] वसविसील.’ ४६८
**वा** खाणूनि भविष्यें, प्रभुचरितें, सुप्रसन्नवदन मुनी
आज्ञा घेउनि गेला तीर्थास्पद[१४] देवदेवपद नमुनीं. ४६९
**सु** खसागर मग गेला गायी चारावयास दास गडी
घेउनि, ज्याच्या रिपुच्या चिंतेची मनिं जळे सदा सगडी[१५]. ४७०

---

१. [केशीरूप] घोड्याचें. २. तापलेल्या लोखंडाच्या स्पर्शानें जसे तसे. ३. रोग. ४. जागा. ५. घडा, मडकें. ६. काकडीचें फळ. ७. आनंददायक उपाय. ८. कुवलयापीड हत्ती व चाणूरादि मल्ल ह्यांचा वध. ९. देवांच्या मस्तकाला चिह्न शोभणाऱ्या!, देवश्रेष्ठा!. १०. एकदां एका ब्राह्मणास दिलेली गाय चुकून पुन्हा दुसऱ्यास दिली गेल्यामुळें शापानें हा सरड होऊन पडला होता. ११. कुंतीचे. १२. इंद्रपुरीची सवत (द्वारका). १३. समुद्रावर. १४. तीर्थांचें निवासस्थान. १५. शेगडी.

दे श मनोरम पाहुनि, द्याया यज्ञक्रियापरां[1] व्रीडा
होऊनि 'मेष[2]' 'चोर' प्रभु सख करिती निलायनक्रीडा[3]. ४७१
बा ळक मेषायित[4] जे त्यांला, जे बाळ 'चोर' ते, हरिती.
त्यांची सादर पाहे मुग्ध क्रीडा जगद्गुरू हरि ती. ४७२
यें[5] म उलटा जो, त्याचा पुत्र व्योमाख्य खळ खरा चोर
शिशुमेष हरुनि भारि गिरिदरि, वारि अरि बैसवी शिळा थोर. ४७३
न वल गमे प्रभुला तें, उरले शिशु च्यार पांच मात्र वनीं!
'झाली गति काय?' असें देव विचारूनि उमजला स्वमनीं. ४७४
मो हतमोकें प्रभु धरि धावुनि बाळांसि पळवितां अरिला.
जाणों तो सिंहें निजभागहर वृक क्षणामधें धरिला. ४७५
भं[6] जकधन दस्युची[7] गति करि अरिकरिहरि जसी मखीं पशुची,
श्वासनिरोध वधसम प्रथम, पशु हि तो पवित्र, हा अशुची. ४७६
ग गनीं सुर हर्षविले, ते हि दरीरुद्ध[8] जे कुमार गडी;
द्रुतगमन श्रम सम पारि तदा मृदुलपतिपदा उमा रगडी. ४७७
ब र्हिप्रसून[9]पल्लवगुंजास्रग्धातुभूषणा विभुला
भुलति तरु, लता, गोपी, किति उँयां[10] मुरली म्हणे प्रियांसि 'भुला'.
ते जःपुंज, श्रीमत् कुंजविहारी व्रजासि ये सांजे;
तैं गोपी ओवाळुनि सांडिति तनु तैंदनु[11] हातिंचे सांजे. ४७९
वा टेंत उभी गोपी जी जी घेउनि करांत आरतिला
नयनें चि पी अनंता, 'सद्गुरु' न म्हणेल कोण और[12] तिला? ४८०
सु टला दांव्यापासुनि वत्स स्तन्यार्थ[13] जेंवि गाईला
धांवे अक्रूर तसा भेटाया कडकडोनि आईला[14]. ४८१

---

१. यज्ञक्रियेला वाहिलेले (कर्मठ) त्यांला. २. मेंढे. ३. लपंडावाचा खेळ. ४. मेंढे झालेले. ५. 'यम' उलटा म्हणजे 'मय'. ६. कृष्ण. ७. चोराची. ८. गुहेंत अडकलेले. ९. मोराचें पीस, पानें व गुंजा यांच्या माळा व धातूंचीं भूषणें धारण करणाऱ्याला. १०. मूळ पाठ–**देवांस हि म म्हणति देव.** ११. त्याच्या नंतर. १२. अजगर. १३. दुधाकरतां. १४. कृष्णपरमात्म्याला.

दे खे शुभ शकुन पथीं, चित्तीं चिंती अलभ्यलाभातें;[१]
कंसास हि 'साधु' म्हणे; 'पाठविलें मूळ[२] पद्मनाभातें'. ४८२

वा हे व्रजपथधूळी स्वशिरीं, कीं, स्वामिचीं पदें अमळें
वळखे, पळ खेद नुरे, हरिलें मन अंकुशें[३] ध्वजें[३] कमळें.[३] ४८३

य दुनाथातें गोष्ठीं पाहे, जैसा चकोर सोमासी.
त्याच्या [४]प्रभुमूर्तिरतदृगुपमेसि सितारता[५] असो मासी. ४८४

न यनयुग दानपतिचें[६] ध्याया करुणामृतार्णवांत बुडी
आधीं टाकी, मग भवदवहतवपु[७] त्या रथावरूनि उडी. ४८५

मो र तसा अक्रूर, श्रीपति घनसा, तया दयारसदा
धावुनि वंदी; यांचा प्रेमा त्यांचा हि, परि असा न सदा. ४८६

भ रिला दासें देह प्रभुपदनीरजरजीं, न कां घोळी?
यांहीं च मळायास्तव केल्या तीर्थांत फार आंघोळी. ४८७

ग द्गदगल, साश्रुनयन, रोमांचित, दास; हरि हि या दासीं
वर्षे अश्रु, उठवितां वाटे भेटे सुधाब्धि यादासीं. ४८८

ब ळ हि तसी च करि कृपा; पूजिति जनरीति धरुनि त्या आर्या;
जेववुनि कुशळ पुसती; सांगे तो पातला जया कार्या. ४८९

ते प्रभु जाणति सर्व हि; परि सांगे अखिळ वृत्त अक्रूर.
होय सकपटीं सकपट, युक्त करी तो दयाळु, न क्रूर. ४९०

वा र्ताश्रवणें हांसति, होती उद्युक्त कंसघातातें.
न करुनि रहस्य उघडें कंसाज्ञा सांगति स्वतातातें. ४९१

सु चवी व्रजीं नृपाज्ञा भृत्यमुखें नंद गोप ती चरमा.[९]
'पुत्र न न्यावे' म्हणता तरि, जाणों फार कोपती च रमा. ४९२

---

१. अप्राप्य [ कृष्णाच्या ] प्राप्तीला. २. आमंत्रण. ३. हीं ईश्वरपदचिह्नें होत. ४. प्रभूच्या मूर्तीच्या ठिकाणीं रममाण झालेली जी दृष्टि तिच्या उपमेला. ५. साखरेच्या ठिकाणीं निमग्न झालेली. ६. अक्रूराचें. ७. संसाररूपी वणव्यानें भाजलेलें आहे शरीर ज्याचें तो. ८. मनोगत, उद्देश. ९. शेवटची.

दे शाधिपति[1]नियोगें नेणार सकाळ नंदतनयातें
ऐसें ऐकुनि गोपी म्हणती, "करितो व्रजेश अनयातें. ४९३
वा ई! न पारिजातावांचुनियां अन्य नंदनानंद[2];
घोषानंद[3] हि ज्याविण, नेतो कीं त्या स्वनंदना नंद. ४९४
य मदूतशत[4]क्रूर स्वमुखें 'अक्रूर' म्हणवितो मेला;
आला गांव वधाया, परि बाई हो! न लेश कोमेला." ४९५
'न ष्ट, क्रूर, अकृप, शठ[5]' अक्रूराला व्रजस्त्रिया म्हणती.
त्या साधूची केली त्यांहीं च तधीं च दुर्जनीं गणती. ४९६
मो डिति अक्रूरावरि कंसावरि सत्यपति[6]वरि हि बोटें.
पहिल्यासि वृथा निंदिति; दोघांतें तें न कविमतें खोटें. ४९७
भ वनें कारागारें, काय[7] महाभार, हार ते साप,
पति अतिखळ, विपतरुचीं फुलें मुलें गमति; पावल्या ताप. ४९८
ग जबजले प्राण सकळ, धैर्यें मन सोडिलें चि हस्तींचें;
गोपींत विरहभय तें शिरलें कदलींत यूथ हस्तींचें. ४९९
व दनीं 'गोविंद! हरे! दामोदर! राम! कृष्ण!' हे वाणी,
चित्तांत चक्रपाणी, गोपींच्या लोचनद्वयीं पाणी. ५००
ते राम कृष्ण जेव्हां दानपतीनें रथांत बसवीले,
गोपीजनीं हि दैवें सुमनोहर शोक मोह वसवीले. ५०१
वा टेंत उभ्या गोपी साश्रुमुखी नवविपद्दशा[9] होत्या;
सर्वस्व हरुनि चोरें वृकविपिनीं[10] सांडिल्या तशा हो! त्या. ५०२
सु हृदाननें तयांतें 'येईन, मनीं सुखी असा' ऐसें
सांगे; गमे मयूरींप्रति रसितें[11] दवाकुळीं[12] वनीं जैसें. ५०३
दे दिव्य दर्शन प्रभु यमुनाहृदमज्जनीं स्वभक्तातें

---

१. राजाज्ञेनें. २. नंदनवनाचा आनंद. ३. गोकुळाचा आनंद. ४. शंभर यमदूतांइतका क्रूर. ५. लबाड. ६. ब्रह्मदेवावर. ७. देह. ८. कळप. ९. नवान संकटाची दशा ज्यांला आहे अशा. १०. लांडग्यांच्या रानांत. ११. मेघगर्जित. १२. वणव्यानें व्याप्त अशा.

त्या गांदिनीसुतातें[1] केवळनिजचरणदास्यसक्तातें. ५०४

**बा** ह्यवनीं मथुरेच्या उतरे प्रभु, जेथ तो पिता नंद
दासासि निरोपासह दे 'होवूं अतिथि,' हा हि आनंद. ५०५

**य** दुकुळनृपधानीतें[2] प्रेक्षाया साग्र राम कृष्ण मग
गेले अपराह्णीं[3], जे साधूंचे देवदेव, देवनग. ५०६

**न** गरींत ते पहाया स्त्रीपुरुषांचें मिळोनि ये कटक;
विधुसि चकोरचकोरी प्रेक्षिति लावूनि तेंवि एकटक. ५०७

**मो** हनमूर्ति सिकवि जी जाणति अनिमेषदृष्टि[4] अमरी, ती
वरचील[5]; माथुरजनीं होती पहिली च सर्वसम रीती. ५०८

**भ** व्यप्रभमूर्तीतें प्राशिति नयनीं च ते जन अधासी.
दृष्टि न सोडिति रूपा, जडति जशा मक्षिका नवमधासी. ५०९

**ग** ति, हसितविलोकन, वर रीति, विलोकूनि म्हणति, 'वन्यांचें[6]
भाग्य अतुळ, त्रिभुवनीं ऐसें कोठें नसेल अन्यांचें.' ५१०

**ध** स्त्रें शुद्धें घेउनि रजक[7] पुढें ये, तयासि हरि याची;
तों तो अभाग्य पामर हांसे, निर्भर्त्सना चि करि याची. ५११

**ते** शब्द साहता, परि मारी सत्सांत्वनार्थ हरि त्यातें;
हस्ताग्रें चि शिर हरी; किति संकल्पें चि विश्वहरित्या तें? ५१२

**घां** सःकोश त्यागुनि भृत्य पळाले समस्त रजकाचे.
शिशुहरिपुढें न करिपति टिकति; कसे ठाकतील अर्जे[10] काचे? ५१३

**सु** हृदां गोपांसह विभु वस्त्रें घेती यथेष्ट; तीं पुरलीं.
लोळति धूळींत पथीं जाणों शोकें चि अंबरें उरलीं[11]! ५१४

**दे** हानुरूप त्यांचे वेप रची, साधु वायकां[12] त्याला
लाभ प्रभुप्रसादें दुर्लभसारूप्यमुक्तिचा झाला. ५१५

---

१. अक्रूराला. २. मथुरेला. ३. दिवसाच्या उत्तरार्धांत. ४. पापणीला पापणी लाविल्यांशिवाय जी दृष्टि ती. ५. अन्य, वरकड. ६. गांवढळांचें. ७. परीट. ८. मागें. ९. वस्त्रांचा ढीग. १०. बोकड. ११. राहिलेलीं वस्त्रें. १२. कोष्टयाला.

**वा** हे माळा माळाकार सुदामा; तया स्वपादरता
निजभक्तिप्रमुखवर प्रभु दे, पाहोनि साधु सादरता. ५१६
'**य**'[1] प्रथमबंधु जीचा देह, असी भेटली पथीं रामा[2];
ती प्रेमें अनुलेपन देउनि दे तोष माधवा रामा. ५१७
**न** रलोकीं सुरलोकीं अतुळ करि तिच्या त्रिवक्रदेहातें.
तक्रोचितां[3] हि दीना सकृप अमृतकरें[4] न तक्र दे हातें. ५१८
**मो** डुनि, पुंत्रें[5] घडिली, रुचिर रची दृष्टिनें चि, त्या तनुला
जाणों श्रीपद लावी शुद्ध्यर्थ चि, कर हि सांत्वना हनुला. ५१९
**भ** व[6]दृगनळदग्धस्मरभूताची दृष्टि तत्क्षणीं झाली,
ती सुंदरी प्रभूच्या यास्तव पडली गळां चि, बहु भ्याली. ५२०
**ग** जगामिनीस देउनि अभय, पुढें जाय राय लोकांचा.
कंसधनुं[7]स्थान पुसे पौरांतें, काळ दासशोकांचा. ५२१
**व** सुदेवसुतें जावुनि मल्लच्छद्में[8] धनुस्थळीं धनुतें,
मत्तगजें इक्षु तसें, केलें भग्न क्षणांत सिद्धनुतें[9]. ५२२
**ते** व्हां चापध्वनिनें भूव्योम भरूनि कंस कांपविला.
ज्यासि न भी हा खळ, त्या लज्जा दिधली नसेल कां पविला? ५२३
**वा** घावरि ओतुं[10] तसे कृष्णावरि चापरक्षक क्रोधें
आले; झाले तैसे, तृणराशि जसे दवाग्निच्या रोधें. ५२४
**सु** हृदांतें बहु सुखउनि, बहु दुखउनि मानसांत इतरांतें,
गेले शकटस्थाना[11], हर्षविषादार्तें[12] करुनि पितरांतें. ५२५
**दे** खे रात्रौ कंस स्वप्नांतें आत्ममृत्युदूतातें,

---

१. 'य' या अक्षरांतील प्रथम भाग 'ट' ज्याचा बंधु तो (तीन ठिकाणीं वांकडा झालेला कुब्जेचा देह). २. स्त्री. ३. ताक पिण्यास च योग्य अशाला. ४. मूळ पाठ **–सुधाकर.** ५. ब्रह्मदेवानें. ६. शिवाच्या नेत्राग्नीनें दग्ध झालेल्या कामरूप पिशाचाची. ७. कंसाचें शस्त्रभांडार. ८. मल्लाच्या सोंगानें. ९. सिद्धानीं जो स्तुत त्यानें. १०. बोके. ११. रथ ठेवण्याचे ठिकाणीं. १२. [भेटीचा] आनंद व [चिंतेचें] दुःख ह्यानीं पीडित.

भययोगें सर्वत्र हि तो त्या हि त्रिजगदात्मभूतातें. ५२६
**वा** रिप्राशन करितां त्यांत प्रतिबिंब आपुलें पाहे,
तें हि श्रीकृष्ण गमे; सर्व श्रीकृष्ण होउनी राहे. ५२७
**य** तिवर विश्व ज्ञानें पाहे हरिमय, भयें तसें चि खळ;
प्रेमें भेटो किंवा भांडो उद्कीं विरे चि तें डिखळ. ५२८
**न** रपति कंस सकाळीं मंचीं[1] बैसे धरूनियां असितें[2]
जन सर्व आणवी, करि आज्ञा मल्लांसि निजमुखें असितें[3]. ५२९
**मो** टा धनुमखदुंदुभिरव ऐकुनि ये समस्त जन कानें.
आदरिली नंदानें आज्ञा, तैसी च विश्वजनकानें. ५३०
**भ** यहेतु दुर्जनांचे, सुजनांचे भयहर प्रभू दोघे
सहज निघाले प्याया, ज्यां बळजळधींस सिद्ध खळ मोघे[4]! ५३१
**ग** जवर रंगद्वारीं होता जो ख्यात कुवलयापीड,
तदपसरणार्थ[5] हरिनें उचलुनि निजबाहु सुवलयापीड[6], ५३२
**व** दनें आज्ञा केली; परि परिसेना महात. गाढव तो,
पडणार आपणासह काळमुखीं, त्यासि काय काढवतो? ५३३
**ते** दोघे हि भ्राते माराया तो महात नागातें[7]
प्रेरी दाटुनि यांवरि, गरुडावरि जेंवि काळ नागातें. ५३४
**वा** रण धावोनि धरी, साधु म्हणति 'हा! यमासि सांपडला.'
तो होउनि सूक्ष्म, करापासुनि[8] सुहृदश्रुबिंदुसह पडला. ५३५
**सु** टतां त्यातें ताडुनि, त्याच्या चरणांत तो मग दडाला.
नागासि गरुड तैसें, ओढी पुच्छीं धरूनि हि जडाला[9]. ५३६
**दे** उनि तोंडावरि, हरि पळ काढी, धाव घेउनीं मागें.
तो तोंडघसीं च पडे करितां दंतप्रहार बहु रागें. ५३७
**वा** टो सांपडलोंसें म्हणउनि पळतां, जगन्निवास पडे.

---

१. आसनावर. २. तरवारीला. ३. काळ्या. ४. रहाटाला गाडगीं बांधतात तीं. ५. त्याच्या (हत्तीच्या) दूर होण्याविषयीं. ६. उत्तम कंकणांनीं अलंकृत. ७. हत्तीला. ८. (हत्तीच्या) सोंडेपासून. ९. त्या जड प्राण्याला.

करितां प्रहार चुकवी सुकवि प्रभु, गज पडे, मनांत रडे. ५३८
य दुपति पुनरपि येतां आंगावरि, हस्त पिंडुनीं[1] पाडी,
रद उपडूनि गजातें, हस्तिपकातें हि भुजबळें ताडी. ५३९
नें[2] गरिपु नगासि वज्रें, तेंवि गजातें गजाचिया दंतें
ताडुनि अचल करी, तें प्रभुचरितामृत चि सेविलें संतें. ५४०
मो टा दंत स्कंधीं प्रभु घे, दे एक दंत रामाच्या.
मदरक्तबिंदु देहीं शोभति, कणिका मुखीं हि घामाच्या. ५४१
भ रला गजमदरक्तें, वीररसें, देव त्या हि रंगांत
तद्दर्शनीं च रौद्र[3]प्रभृति रस हि तैं[4]त्तदंतरंगांत. ५४२
ग डबडला कंस मनीं, मल्लगण हि, पाहतां चि भावांतें[5].
इतर सकळ जन सादर वर्णिति यांच्या श्रुतप्रभावांतें. ५४३
व सुदेवपुत्र होते नंदगृहीं, ज्येष्ठ राम जो गौर,
'श्यामलकामललिततनु[6] कृष्ण' असें कथिति, दाविती पौर. ५४४
ते प्रभु चुंबकमणिसे चुंबिति जनदृष्टि त्यां चि दोघांतें
धांवति यात्रा, गंगायमुनांच्या जेंवि भास्वदोघांतें[7]. ५४५
बा हे चाणूर हरिसि राजाज्ञेनें करावया युद्ध.
कृष्ण म्हणे, 'शिशु आम्हीं, प्रौढ तुम्हीं, कर्म हें नव्हे शुद्ध'. ५४६
'सु रपतिगजसम गज जो, दशशतगजशक्ति ज्यांत, तो माथिला',
चाणूर म्हणे, 'कृष्णा! त्वां स्वपराक्रम न बोलतां कथिला. ५४७
दे शपतिप्रिय करणें हें जरि उचित प्रजांसि, तरि कृष्णा!
युद्ध करावें. भूपतिनेत्रांची या रसें शमो[8] तृष्णा. ५४८
बा ळ न तूं बळशाली, बळ हि; बरें; कर धरूनि पाहूं तें.
तूं मीं, बळ मुष्टिक, या खेळों. हूं! थोपटा स्वबाहूंतें'. ५४९
य श आपुलें चि होतें, ज्यातें सेऊनि साधु तरतील;

---

१. सोंड पिळवटून. २. इंद्र. ३. खोडलेला पाठ—**शृंगारादि**. ४. त्यांच्या त्यांच्या अंतःकरणांत. ५. आविर्भावाना. ६. मदनाप्रमाणें सुंदर देह ज्याचा असा. ७. तेजस्वी प्रवाहांला. ८. मूळ पाठ—**पुरो**.

मरतील दुष्ट कळलें; प्रभु मग मागें कशास सरतील? ५५०
न गसे मल्ल, तयांचा ठाईं प्रभुबाहुवज्रपात, कसें
जीवन टिकेल? सरलें, यांच्या नामेंकरूनि पातकसें. ५५१
मो डुनि मुष्टिनिघातें हाडें, झाडें जसीं महावातें,
मल्लशरीरें भूवारि पाडिति; विभु दाविति प्रभावातें. ५५२
भ ग्न करी कूटाचें मस्तक मग राम वाममुष्टीनें;
कृष्ण शलाचें शिर हरि, पादानें साधुदत्ततुष्टीनें. ५५३
ग र्वें करी तो शलक हि, त्यातें मधुसूदन क्षणांत चिरी,
यज्ञवराहरणीं जय पावेल कसा महामदांध किरी[1]? ५५४
व रकड मल्ल पळाले, प्रेक्षकजन सर्व पावले तोष.
करिति नियुद्ध[2] सख्यांसीं, तें पाहुनि कंस बहु करी रोष. ५५५
ते प्रभु न रुचति कंसा, जैसा आसन्नमृत्युला काढा.
दुष्ट म्हणे, 'शौरीचे येथुनि दुर्वृत्त पोर हे काढा. ५५६
बा हेर शीघ्र घाला, माझ्या राज्यांत हे न राहों द्या.
बांधा नंदासि, हरा गोपांचें धन, विपत्ति पाहों द्या. ५५७
सु तवत्सल, सत्यच्युत, वसुदेव वधा; तुम्हां नसे पाप.
रिपुपक्षीं जो दुर्मति, मारावा आमुचा हि तो बाप.' ५५८
दे तां दोष गुरुजना, कोपें जगदीश बहु मनीं कढला.
अहिमथनार्थ गरुडसा, प्रभु त्या मंचीं उडोनियां चढला. ५५९
वां[3] ताश जेंवि गरुडें, खळ केशीं, खड्ग पराजितां, धरिला,
मंचाखालें लोटुनि, मारी, टाकूनि वरि उडी, अरिला. ५६०
य द्यपि खळ कंस, तऱ्ही चित्तीं चिंती सदैव जें रूप,
त्रासें तन्मय पाहे जग, मरतां तें चि होय तो भूप. ५६१
न[4] ष्टासुदेह, ओढी रंगीं[5] श्रीरंग फरफरां रागें.
रामें वधिले कंकन्यग्रोधाद्यष्टबंधु त्यामागें. ५६२

---

१. डुकर. २. बाहुयुद्ध. ३. सर्प. ४. नष्ट आहेत प्राण ज्या शरीरांत तें. ५. सभामंडपांत.

मो दभरें देवानीं वाजविलीं, त्या जयीं, नभीं वाद्यें;
वरि कुसुमवृष्टि केल्या, वधितां तो दुष्ट कंस विश्वाद्यें. ५६३
भ तां मरतां रडती शोकार्ता ज्या स्त्रिया, तयांसि हरी
समजावी करुणार्णव, आज्ञा ही प्रेतसार्थकार्थ करी. ५६४
ग[1] दनिर्मुक्त करुनि कुळ, पितरांतें बंधमुक्त करवूनीं,
श्रीरामकृष्ण नमिती, तत्कर्णीं विजयअमृत भरवूनीं. ५६५
व सुदेवदेवकी हे 'जगदीश' असें कळे, तयाकरितां
संकोचती मनीं बहु, पितृभावें त्यांसि पोटिसीं धरितां. ५६६
ते पितर मोहिले निजमायेनें ईश्वरें चि जाणोनि,
'पुत्र' म्हणावें यांत चि बहु सुख, ऐसें मनांत आणोनी. ५६७
'वा यां चि जन्मलों, श्रम मात्र दिले, न घडले चि सुतधर्म,
आतां क्षमा करावी,' ऐसें प्रार्थूनि देव दे शर्म. ५६८
सु तभावें मग भेटति, अंकीं घेऊनि फार गहिंवरती;
उतरे तदश्रुधारा, दुसरी गंगा तसी च, महिंवरती. ५६९
दे राज्य उग्रसेनाप्रति, अतिसंमान करुनि त्या वडिला.
तो हि स्वीकार करी, प्रभुच्या पुरवावयासि आवडिला. ५७०
वा हनपत्रें प्रेषुनि आणविले कंसभयपद[2]भ्रष्ट,
मथुरेमाजि नुरविला कोठें ही ओखदास ही कष्ट. ५७१
य[3] त्नस्तंभितबाष्प प्रभु दोघेजण हि नंदतातातें
वंदुनि म्हणती, "ठेवा माथां स्नेहेंकरूनि हातातें. ५७२
न धरावा भेद मनीं, आम्हीं बाळें, खरे तुम्हीं पितर.
हितरक्षण जें केलें, तें क्षण हि करील कोण हो! इतर? ५७३
'मो घ श्रम' न म्हणावें. येऊं? राहूं? कसें करूं? बोला.
गाईला वत्सांला चारा चाराल कीं बरा ओला?" ५७४
भ क्तिस्नेहें पूजुनि वंदुनि नंदासि लावितां वाटे,

---

१. रोगरहित. २. कंसाच्या भयानें स्थानच्युत झालेले. ३. प्रयत्नानें थांबविले आहेत अश्रु ज्यानीं असे.

दाटे कंठ प्रभुचा; अवघड चित्तांत घडिघडी वाटे. ५७५
**ग** र्गप्रोक्तविधीनें उपनयनें शौरि सांग करि त्यांचीं,
निजनामकीर्तनें चि स्वाश्रितजनकर्म सांग करित्यांचीं. ५७६
**व** सति गुरुकुळीं विहिता, म्हणउनि गेले, [2]तमोपहस्मरण
देव, अवंतीवासिश्रीसांदीपनिगुरूसि ते शरण. ५७७
**ते** त्या श्रीगुरुरायें पाहुनि सद्भावरीति पढवीले;
सर्व कवींच्या माथां, सद्विद्यारत्नमुकुट, चढवीले. ५७८
**वा** क्य गुरूचें कानीं पडतां, धरिती कळा चतुःषष्टी
सिकले तितुक्या चि दिसां; गुरु आपण ही न जाहले कष्टी. ५७९
'**सु** त सागरीं [3]प्रभासीं झाला जो मग्न, तो चि द्या आणा',
ऐसें मागे 'मागा' म्हणतां, जाणोनि यांसि गुरुराणा. ५८०
'**दे** तों' म्हणोनि गेले बैसोनि रथीं तटासि, तों [4]क्षिप्र
भेटे सिंधु, म्हणति, 'रे! बाळ हरुनि गांजिला कसा विप्र?' ५८१
[7]**वा** र्धिमतें, [6]दररूपासुरपंचजना, जळीं शिरोनि, धरी;
पोट चिरी, शिशु न दिसे, मग ये घेउनि तदंगशंख हँरी. ५८२
**य** मलोका जाउनि, दर वाजवितां, ये समोर पितृपाळ,
वंदुनि पूजी; आज्ञा होतां तो आणवूनि दे बाळ. ५८३
**न** मुनि गुरुपदें, देती बाळक, घेती प्रसादसुखराशीः
आले पुरासि पंडित होउनि ते रामकृष्ण सुखराशी. ५८४
**मो** ह व्रजवनितांचा नाशाया, आठवूनि तदुपकृती

---

१. रहाणें. २. अज्ञाननिवारक स्मरण ज्यांचें असे. ३. या नांवाच्या क्षेत्रांत. ४. लवकर. ५. समुद्राच्या मतानें (अनुमोदनानें). ६. शंखरूप दैत्य जो पंचजन त्याला. ७. ही आर्या पंतांनी मागाहून रचली असून वर समासामध्यें "इयमेवार्या मुख्या" असें म्हणून लिहिली आहे. पहिली हरताळलेली सटीप आर्या पुढीलप्रमाणें:—

[*]**वा** र्धि म्हणे, 'शिव! शिव! हें म्यां तों केलें नसेल, तोयांत
दररूप पंचजनखळ आहे, वाटे असे [ल] तो यांत. ५८२

* या कर्मी हा जन—पंत. ८. कृपेनें उच्चारिलेला आशीर्वाद. ९. गोपींचा.

स्वज्ञानयोग द्याया, धाडी उद्धवकवीस यदुप कृती. ५८५
भ रवाया ज्ञानामृत उद्धव गेला व्रजा तया नंद
पूजुनि फार रडे, कीं, अंतरला मूर्त सुतमयानंद. ५८६
ग हिवरली नंदस्त्री, घटिकेंत पुसोनि नंदना शतदा;
तैसें चि मनीं भावी[1] निजसदनाचा हि नंद नाश तदा. ५८७
व र्णुनि चरितें, रडती, रडविति त्या उद्धवास ही, दोघें.
समजावी ज्ञानें, परि वाहे तत्प्रेमभक्तिच्या ओघें. ५८८
ते नंदयशोदोद्धव रात्रीला नेणती च सरलीला.
प्रभुच्या मनोहरा, नुरविति देहादिस्मृतिप्रसर[2], लीला. ५८९
वा ढ्यापुढें सकाळीं रथ पाहुनि म्हणति गोपिका, 'गेला
घेऊनि जीव, कंसश्राद्धा नेणार मांस ही, मेला!'. ५९०
सु मनोहर हरिवेष प्रभुचा प्रियभृत्य पाहतां महिला[3]
धालया[4]; भ्यालया होत्या सणिहारीं प्रथम कल्पुनीं अहिला. ५९१
दे उनि आसन, गोपी एकांतीं त्यासि घेउनीं बसती,
म्हणती, 'असेल तुमची बहुधा मथुरापुरीमधें वसती? ५९२
वा टे, तुमचा कृष्ण स्वामी, तेणें तुम्हांसि पाठविलें;
वृंदावनांत बहुधा या पितरांतें असेल आठविलें. ५९३
य तिस हि दुस्त्यज मातृस्नेह, जऱ्ही सर्व ही मृषा पाहे.
प्रिय पितर, इतर तैसा जन त्याला कोण या व्रजीं आहे? ५९४
न टिके इतरत्र स्थिर मैत्री, स्वार्थार्थ मात्र केवळ ती.
नेल्यावरि सुमनांचा रस तिकडे मधुप काय ते वळती? ५९५
मो कलिती निर्द्रव्या[5] वेश्या, अफळद्रुमासि ही पक्षी,
अबळा नृपा प्रजासी, मृगकुळ, दग्धा वना हि, जें रक्षी, ५९६
भ क्षुनि अन्न गृहातें अतिथी, कृतविद्य शिष्य गुरुराया,
घेऊनि दक्षिणा यजमाना ऋत्विज, न ते धरिति माया. ५९७

---

१. मानी. २. देहादिस्मृतींचा पसारा. ३. स्त्रिया. ४. समाधान पावल्या. ५. दरिद्र्याला.

ग रज सरतां चि वेश्या त्यजिती. होती गळां प्रथम हार,
आपण होउनि तृप्त, त्यजिति अतृप्त स्त्रियांस ही जार'. ५९८
व दति असें, बहु रडती, आठवुनी तद्विलास, त्या महिला.
वर्षर्तुभ्रम[1] देती स्फार[2], प्रेमाश्रुवृष्टिनें, महिला. ५९९
ते थें तशांत आला मधुप, तया एक गोपिका लक्षी,
त्यासीं बोले ऐसें कल्पुनि कीं, कृष्णदूत तो पक्षी. ६००
वा णी ती गोपींची बहु सरसा उद्धवासि उद्धव[3] दे.
निंदा स्तवाधिका करि हरिची, सप्रेम फार शुद्ध वदे. ६०१
सु ज्ञशिरोमणि उद्धव बहु त्यांचें प्रेमभाग्य वाखाणी;
त्यांसि म्हणे, 'बाई हो ! अमृताची प्रेमभाव हा खाणी. ६०२
दे हीं गेहीं झालें चित्त उदासीन, कृष्णगुण गातां;
झालां कृतार्थ, जन्मुनि उरलें कर्तव्य काय हो ! आतां ? ६०३
वा[4] चिक तुमच्या दयिता[5] कृष्णाचें सांगतों तुम्हां, परिसा,'
म्हणुनि असें ज्ञान कथी यांसी सुविशुद्धकांचनीं[6] परिसा. ६०४
य दुनाथें पाठविलें ज्ञानामृत पाजिलें, तथापि सती
भगवदधररसतृषिता नाहीं उपदेशिल्या तस्या दिसती. ६०५
न वपीयूषसमुद्रीं पतन चकोरीसि जन्हि घडे [7]विधिनें,
तदपि अमृतकर चि तयां प्रिय, सुख त्यां त्याचिया चि सान्निधिनें. ६०६
मो टा शुद्धोद[8] असो, घनाविना चातकीस तो मरु[9] चि;
तैसें सगुणावांचुनि निर्गुण गोपींस लेश दे न रुची. ६०७
भ र बहु सगुणचरित्रीं गोपींचा, नित्य तें चि आठविती.
पढवुनि भक्ति, बहु दिवस ठेउनि, मग उद्धवासि पाठविती. ६०८
ग वळयांच्या शिष्यपणीं सुरगुरुंचा[10] शिष्य जाहला धन्य.
अन्य स्पष्ट चि, सगुणप्रेमावांचूनि, पंडितंमन्य. ६०९

---

१. पावसाळ्याचा भ्रम. २. अतिशय. ३. उत्सव, आनंद. ४. निरोप. ५. प्रिय अशा. ६. अत्यंत शुद्ध अशा सुवर्णाच्या ठिकाणीं. ७. सुदैवानें. ८. शुद्ध आहे उदक ज्याचें असा (समुद्र). ९. निर्जल प्रदेश. १०. बृहस्पतीचा शिष्य (उद्धव).

ब ल्लवनाथ, यशोदा, गोपी, गोपाळ, देति न निरोप;
परि विनउनि जाय कवि, प्रेमाचें लावुनि स्वमनिं रोप. ६१०
ते नंदादिक म्हणती, “उद्धवजी! कृष्णजीस हें सांगा,
‘डोळ्यांपुढें दिससि; परि कां गा! विरहाग्नि भाजितो आंगा?’” ६११
वा ट्यांत सायसाखर भरुनि यशोदा म्हणे, ‘अहो साधो!
द्या दोघांला, झांका, न पराची दृष्टि भक्षितां बाधो.’ ६१२
सु[1] तनु म्हणति, “त्यांसि[2] असें विनवा जोडूनि अंजलीला हो!
‘वृंदावनांत अगतिकगति[3] युष्मत्पादकंजलीला[4] हो. ६१३
दे हांतरीं हि दास्य चि द्या, ऐसा ज्ञानयोग न वदान्या,’
सांगा हें चि ज्ञान; ‘उपायनें[5] त्यांला अयुक्त’ न वदा, न्या.” ६१४
वा होनि रज व्रजजनचरणांचें, उद्धव प्रसन्नमनें
जाउनि, उपायनार्पण करुनि हरिसि, करि पुनःपुन्हां नमनें. ६१५
य जन, भजन, जप, तप हीं कर्में साङ्ग सुखें जिला[6] घडलीं,
प्रभुला सदंगरागार्पण[7] करितां चि, स्वयें गळां पडलीं. ६१६
न वस तिचे नारायण पुरवी, तिजसीं करूनि केलीला
श्री च करी कुब्जेला श्रीपति, आपण चि योग्य केलीला. ६१७
मो क्षाधिकसुखभाजन दानपति[8] हि, जाउनीं घरा, केला.
श्रीमूर्तिला पहातां साधु निवे चि, न चकोर राकेला[9]. ६१८
भ[10] वसख झाला साधु, स्वकुटुंबासह धरूनि माथां तें
श्रीतीर्थपादपादद्वय[11] आधीं, मग धुवोनि पाथांतें[12]. ६१९
‘ग टक्या भवाब्धिमध्यें खातां, हे पायनाव सांपडली’,
अक्रूर म्हणे, ‘माता बाळाच्या दृष्टि बहुदिसां पडली. ६२०
व णव्यामध्यें जळतां, अमृताची प्रचुर जाहली वृष्टी.
उद्धरले मत्पूर्वज सकळ हि, पडतां चि पाय हे दृष्टी. ६२१

---

१. सुंदर स्त्रिया (गोपी). २. रामकृष्णांना. ३. अनाथरक्षक अशी. ४. आपल्या चरणकमलांची लीला. ५. भेट, देणगी. ६. कुब्जेला. ७. उत्तम उटीचें अर्पण. ८. अक्रूर. ९. पौर्णिमेच्या रात्रीला. १०. कुबेरासारखा धनी. ११. कृष्णचरणद्वय. १२. उदकांला.

ते जांचें तेज सकळ, गुह्यांचें गुह्य, हें शिवें शिवांचें
या चि श्रीचरणाब्जीं मन मधुकर जाहलें शिवाशिवांचें.' ६२२
वा खाणितां असें, प्रभु आपण त्यातें म्हणे, "अहो काका !
साधु तुम्हीं, विश्वाचे तारक, बहु मानितां मला पाकों. ६२३
सु टले सत्संगें चि व्यसनापासूनि जीव; साधूनीं
दिधलें रंकास हि, निजपद धारितां, मुक्तिपद हि साधूनीं. ६२४
दे तीं फळ बहु दिवसां देव शिलाकाष्ठमृन्मय प्रणतां;
जळमय तीर्थें हि तसीं; संत चि फळती 'नमोऽस्तु ते' म्हणतां. ६२५
बा पा ! स्व अर्थ साधिति, दासा मग देति, देव फळ कांहीं;
साधु न तसे परानुग्रहपर हे सेव्य; सुर असा नाहीं. ६२६
य ष्टि जसी अंधांला, जीवांला साधु साधुगतिहेतु.
आश्रय इतर प्लव भवजलधींत, तुम्हीं च संत दृढसेतु. ६२७
नं र्म नव्हे हें, सत्य चि; काकाजी ! निजमनीं विचारा हो !
बंध स्थिर जनसंग्रहरीतिसतीनीतिनीविचा राहो. ६२८
मो जा स्वापत्यांत चि आम्हांला रीति नीति सिकवा हो !
त्या आत्याबाईचे प्राण हि, देऊनि धीर, टिकवा हो !. ६२९
भ र्ता मेला, बाळ हि लघु, राजा अंध, दुष्ट तत्तनय,
पुत्रस्नेह हि मोहक, तेथ असावा चि सर्वथा अनय. ६३०
गं जसाह्वयासि जाउनि शोध करा, त्या नृपासि जें विहित
सांगा, त्यांचें हि करा, कारित असा आमुचें हि जेंवि हित. ६३१
व सुदेव तसे चि तुम्हीं, भगिनीचा घ्या स्वयें समाचार.
येथें तसें चि तेथें दिवस स्वसुहृज्जनीं क्रमा च्यार. ६३२
ते थूनि याल, जैसें सांगाल तसें पुढें करूं कार्य",

---

१. मंगल. २. महादेवपार्वतींचें. ३. बालका. ४. तुला नमस्कार असो. ५. दुसऱ्यावर कृपा करण्यांत तत्पर. ६. उत्तम गतीचें कारण. ७. नौका. ८. थट्टा. ९. लोकाना मार्गाला लावण्याची रीति हो च सति तिच्या नीतिरूप नीवीचा (निरीचा) बंध (गांठ). १०. कुंतीचे. ११. हस्तिनापुराला.

ऐसें सांगुनि गेला प्रभु, तो ही हस्तिनापुरा आर्य. ६३३
वा रणपुरांत भेटे आधीं अक्रूर आंबिकेयनृपा[1].
मग भीष्मा बाह्लीका विदुरा द्रोणा पृथेसि आणि कृपा. ६३४
सु त जे धृतराष्ट्राचे, पांडूचे जे तयांसि तो पाहे;
लाहे सत्कृति, नरवरवृत्त कळायासि त्या पुरीं राहे. ६३५
दे खे वृत्त असें कीं, अंधं खळपुत्र, कुमतिगणिकेला
वश होउनि, वृद्धपणीं खिन्नमनीं, भरतमुकुटमणि केला. ६३६
वा ढति सद्गुण, तों तों प्रेम करिति लोक पांडवांवरि, तें,
चोरासि चांदिणेंसें, ताप चि देतें सुयोधना आरितें. ६३७
य[2] गण जसा एक मुखीं मात्र सरल, भूप, वक्र मग सर्व,
ज्येष्ठत्व, राज्य, सुतशत औरस, ज्याच्या मनीं असा गर्व. ६३८
न टसा वरि बरवा नृप ऐसें कळलें, म्हणे स्वयें क्षत्ता[3],
'साधो! काय करावें, या पुत्रस्नेहमद्यरसमत्ता? ६३९
मो टा द्वेष सुयोधन करितो; भीमासि मारिलें होतें,
विष चारूनि बुडविलें. मरण मुकुंदें चि वारिलें हो! तें.' ६४०
भ गिनी पृथा म्हणे, 'या विटल्यें दुर्जीवितास दादा! मीं.
दैवें अहर्निश मला चिंतेच्या बांधिलें सदा दामीं[4]. ६४१
गं[5] हित वैधव्य, मुलें लघु, चिंतिति नित्य पाप दायाद,
गेहांत भोगितें मन, जैसें जाळांत आपदा याद[6]. ६४२
व द, वारावे कैसे वृक, हरिणीनें, स्वपांडसां डसते?
जे वह्नितप्त, पावति दायादांचा न पाड[7], सांडस[8] ते. ६४३
ते माद्री धन्या; मीं न तसी म्हणवूनि भोगित्यें कष्ट;
विधिनें उपेक्षितां मज, बंधुजनें ही उपेक्षिलें स्पष्ट. ६४४
वा रील काय माझें दुःख श्रीकृष्ण, जेंवि बापाचें?
त्या कंसाचें तैसें भस्म करिल काय या हि पापाचें[9]? ६४५

---

१. धृतराष्ट्राला. २. ।ऽऽ हें यगणाचें चिह्न. ३. विदुर. ४. दाव्यांत. ५. निंदित.
६. मासा. ७. साम्य. ८. चिमटे. ९. दुष्टाचें ( दुर्योधनाचें ).

सु चलें बरें तुम्हांला, भेटावेंसें कसें मनीं आलें?
बहुधा दुःखितदर्शनदुःखापासूनि मृदुल मन भ्यालें? ६४६
दे ईल कृष्ण कर मज, बुडतां व्यसनार्णवीं? सदा दात्या
जलदासि चातकीसी ध्यात्यें दीनाश्रयास, दादा! त्या.’ ६४७
वां[1] सें आच्छादुनि मुख रडे पृथा, तीस दानदंति-विदुर
म्हणती, “सति! हो सावध. दुःखगिरींचें मुकुंदपद भिदुर[2]. ६४८
य दुपति हरील दुःखें, सुत हि तुझे सुगुण अंश देवांचे,
म्हणति कवि, ‘कृष्ण! कृष्ण!’ प्लव[3] हि कटांहीं मुखें वदे, ‘वांचे’”.
न यनें पुसोनि तीचीं, घेउनि आज्ञा, नृपाकडे गेला.
त्याला हि बोध ऐसा अक्रूरें पंडितोत्तमें केला. ६५०
‘मो ठ्या वंशांत तुझें जन्म नृपा! तूं चि तुजअसा मान्य.
आहेत नृपति पुष्कळ; परि ते सामान्य, तूं न सामान्य. ६५१
भ रतकुळीं अनुज तुजा पांडु, गुणज्येष्ठ, करुनि हें राज्य,
गेला परलोकातें; जोडुनि यश तूं हि मेळवीं प्राज्य. ६५२
ग ति उत्तम होय असें वर्तावें, धर्मनीति रक्षावी,
चित्तांत पूर्वजांची नित्य स्थिति रीति शांति लक्षावी. ६५३
व र्तावें सम; जैसे शत तैसे पांच पांडुचे मानीं.
होईल विषमभावें कुळशिवसत्कीर्तिसत्क्रियाहानी. ६५४
ते पांडव काय उणे? हे तुजला अधिक काय? जो रानीं
लुटिला कुटिलानीं तूं दुर्बळ होऊनि पुत्रचोरानीं. ६५५
वा टेंत कुटुंबपथिकभेटि[4] न बहुकाळ गांठि बा! यासीं.
देह हि जायाचें, ज्या रक्षाया पडति जीव आयासीं.’ ६५६
सु ज्ञाचे बोल असे श्रवणीं पडतां म्हणे, ‘खरें वदसी.
साधो! बहु योग्य तुझे मोहारिपुजयासि शब्द हे सैंदसी[5]. ६५७
दे य प्रशस्त म्हणवुनि देतां मजला हि हित असें कळतें;

१. वस्त्रानें. २. वज्र. ३. नौका. ४. कुटुंबरूप वाटसरांची भेट. ५. उत्तम तरवार.

परि हृ[1]दयामघटांतुनि उपदेशामृत हळूहळू गळतें. ६५८
वा टे साधूक्त हित, स्नेहें पुत्रोक्त तें हि परम हित.
ईश्वर करो विहित जें आम्हां जीवांसि, तो चि पर महित[2].' ६५९
'य[3] द्वो मतमस्तु[3]' असें बोलुनि, घेउनि निरोप, दानपती,
येऊनि रामकृष्णां वृत्त कथीं ज्यांसि मुनि सदा जपती. ६६०

## उत्तरार्ध[4].

नँ रपतिपति मगधेश्वर वीर जरासंध त्यासि तत्तनया
अस्तिप्राप्ती, पत्नी कंसाच्या, कथिति शौरिच्या अनया. ६६१
मो हें प्रियकन्यांच्या, तो नरकुंजर, करूनि शोकातें,
यदुसिंहांच्या, वेढी, बहु सेना मेळवूनि, ओकांतें[5]. ६६२
'भ स्म करीन यदुकुळा,' ऐसा पण करुनि वेढिली नगरी.
प्राकारें[6] खाणिती भट शस्त्रें, शृंगें चि वृष जसे डँगरी[7]. ६६३
ग डबडतां पुर, भगवान् स्वमनिं म्हणे, 'संहरूं बळें कटका.
भूभर हरूं, न मारूं या मगधेशा बळांचिया घटका[8].' ६६४
व[9] र रथ सायुध गगनांतूनि उँतरले[10] अशांत; मग रामा
देव म्हणे, 'बैसा हो! स्वरथीं, पुरवा जयें स्वजनकामा.' ६६५
ते दोघे दिव्यरथीं बैसोनि, करूनि कवचितें[11] अंगें,
स्वपुरांतूनि निघाले प्रभुवर, घेऊनि अल्प बळ संगें. ६६६
वा चाळ मागधातें बडबडतां, प्रभु म्हणे, 'धनू उचला.
न विकत्थनरस[12] रुचला कुळजांला. काय चोंखितां कुचला?' ६६७
सु टला मगधपतीचा तीव्रशरव्रातवात[13] जैं भेटे,
भगवद्भुजप्रतापानळ खळबळकाननांतरीं पेटे. ६६८

---

१. हृदयरूपी कच्च्या गाडग्यांतून. २. स्तुत. ३. जें तुमचें मत तें च असो. ४. ह्या आर्येपासून पुढील दशमाचा **पंतांनीं** उत्तरार्ध केला आहे. परंतु आर्यांचे क्रमांक भावते च ठेविले आहेत. ५. घराला. ६. तट. ७. मातीचें टेंकाड. ८. सैन्याची घटना रणाऱ्या. ९. उत्तम. १०. खोडलेला पाठ–**निघाले**. ११. कवचें घातलेली. २. निंदा. १३. प्रखर बाणांचा समुदाय हा च वायु.

दे ह विदारुनि केले शतखंड, क्षतजपूर वाहविले;
उघडे डोळे एका मगधपतीचे चि त्यांत राहाविले. ६६९

वा रुणमानुषपाशीं बांधी, जिंकूनि, राम त्या रिपुला;
श्रीकृष्णें सोडविला. न जयश्री, [1]ही च वरि, तया विपुला. ६७०

य तें असें चि पुनरपि तेविस अक्षौहिणी च बळ आणी;
सतरा वेळ पराभव करिति पुन्हां चक्रपाणि हळपाणी[2]. ६७१

न गरीप्रति अठराव्या रोधा[3] येणार जों जरासंध,
ये देवर्षिप्रेरित[4] काळयवन, जो सदा मदें अंध. ६७२

मो टी सेना त्याची, यवनांच्या तीन त्यासवें कोटी.
देव म्हणे, 'काढावे[5] ज्ञाति, स्थिति या स्थळीं दिसे खोटी. ६७३

भ य एकाचें तों हें दुसरें आलें पहा. अहा! यासीं
रण करितां, तो स्वजना पाडील चि निश्चयें महायासीं. ६७४

ग म्य खळांसि नसावें, करवावें अर्णवीं[7] च पुर तूर्ण[6];
तेथें ज्ञाति स्थापुनि, यवनांचें पूर्ण मग करूं चूर्ण.' ६७५

वँ नराशिमाजि अमरत्वष्ट्याकरवीं[8] प्रभू पुरी करवी.
बारा गावें रचिली ती जी अमरावतीहुनी बरवी. ६७६

ते थें सर्व जनातें योगबळें नेउनि प्रभु स्थापी.
ठेवी मथुरेंत बळा, जो काळाला हि कोपतां दापी. ६७७

वा[9] रणवरगति, भगवान् वनमाळी, यदुकुलाब्जरवि, पत्ती[10],
निःशस्त्र निघे नगरींतूनि; बळें मिरवि ईश्वर विपत्ती. ६७८

सु रमुनिनें जीं कथिलीं, त्यां चिह्नांचें विलोकितां भवन,
[11]जवन अहि तसा लागे पाठीला ओळखोनि तो यवन. ६७९

दे सी पाठि कसी, यदुकुळजा कृष्णा! न हें तुला युक्त',
तो खळ म्हणे; परि पळे सत्य कराया [12]स्मरारिचें उक्त. ६८०

---

१. लज्जा. २. नांगर आहे हातीं ज्याच्या तो (बलराम). ३. वेढ्यासाठीं. ४. नारदानें पाठविलेला. ५. आप्तगण दूर काढावे. ६. त्वरित. ७. समुद्रामध्यें. ८. देवांचा सुतार विश्वकर्मा त्याच्याकडून. ९. गजश्रेष्ठाप्रमाणें (सावकाश) आहे चाल ज्याची तो. १०. पायीं. ११. वेगवान. १२. शंकराचें.

वा टे आतां हाता लागेल व्यक्त, जाहला श्रांत,
ऐसे ठकउनि यवना, सिरला गिरिकंदरीं रमाकांत. ६८१
य वनें, दरींत सिरतां, अन्य पुरुष एक देखिला सुप्त.
तो मानिला मुकुंद, श्रमला, निजला, सुसाधुसा, गुप्त. ६८२
न ष्टविवेक खळ यवन ताडी पादें तया महाभागा.
पादप्रहार करितां दुष्टें, तो क्षिप्र जाहला जागा. ६८३
मो हें, काळभुजंगा मंडूकें तेंवि, त्यासि जागविलें.
मग तद्दृक्पाता खळदेहाग्निनें, न लेश, भागविलें. ६८४
भ स्म यवन केला, त्या मुचुकुंदें, सर्वदुष्टदर्पहरें,
मांधातृसुतप्रवरें, निजरक्षणमुदितदेवदत्तवरें.[1] ६८५
ग र्भीं अद्रिदरीच्या प्रकटे प्रभु, तें विलोकितां रूप
होय सुखी, सांगे निज वृत्त, प्रभुचें हि तो पुसे, भूप. ६८६
व रदेश्वर ओळखि दे मुचुकुंदाला, करी कृतार्थ पळें,[2]
तुष्टसुरानीं निद्रा, मुक्ति दिल्ही मुक्तिनायकें चि बळें. ६८७
ते थूनि भूप,[3] आज्ञा घेउनियां, बदरिकाश्रमा गेला.
प्रभुनें येउनि मथुरेप्रति, यवनबळक्षय क्षणें केला. ६८८
वा रिधिदुर्गीं[4] नेतां यवनांचें धन, पुन्हा जरासंध
तितुकें चि सैन्य घेउनि ये, ज्याला शांतिचा नसे गंध. ६८९
सु तरां[5] भयविकळ तसे, तें धन टाकूनि, रामकृष्ण, पथीं,
काळ पळे यन्नामें, ते प्रभु पळती न बैसतां स्वरथीं. ६९०
दे खे पळतां, मागध लागे मागें, धरावया सबळ;
जैसा पिसाळला श्वा अंगारांचा[6] चि ध्यावया कवळ. ६९१
वा सव जेथें वर्षे नित्य, प्रभु त्या प्रवर्षणीं[7] अगमीं
होतां गुप्त, खळ म्हणे, 'शत्रूंसह जाळितों चि हा अग मीं.' ६९२

---

१. आपल्या रक्षणानें आनंदित झालेल्या देवानीं दिलेल्या वरानें. २. क्षणांत. ३. मुचुकुंद. ४. समुद्रांतील कोटाला–द्वारकेला. ५. अत्यंत. ६. निखाऱ्यांचा. ७. प्रवर्षणनामक पर्वतावर.

य वसांचे, काष्ठांचे, भार रचविले महाद्रिच्या कटकीं[1]
लावुनि ज्वलन, गमे वांटविली शर्करा खळें कटकीं. ६९३
न ग तो अकरा गावें उंच कवळिला चहूंकडे दहनें.
प्रभु शृंगावरुनि उडी टाकिति, सर्वत्र पेटतां गहनें[2]. ६९४
मो हुनि मन दुष्टाचें, प्रभु आले द्वारकेसि; जळधींत
ठेउनि झालों भस्म ज्वलनीं, ऐसा प्रमोद खळधींत. ६९५
भ रणीं चंद्रासि जसी पूर्वी विधिनें समर्पिलीं दक्षें;
रामासि रेवती निजकन्या तैसी च रेवतें दक्षें[3]. ६९६
ग वें हरूनि खळांचा प्रभुनें श्रीभीष्मकात्मजा[4] वरिली.
तीचा विवाह हि, प्रभु, गावा; याणें हि साधुधी हरिली. ६९७
ध र्म्यगुणभीष्मकाचे सुत रुक्मीप्रमुख पांच, एक सुता,
ती रुक्मिणी भगवती श्री अवतरली समस्तलोकनुता. ६९८
ते परिसोनि पितृगृहीं, साधूनीं साधु वर्णितां, 'हरिला'
चित्तीं म्हणे 'वरावें'; प्रभु हि इच्या रूपसद्गुणीं हरिला. ६९९
बा प हि, बंधु हि म्हणतां, 'द्यावी संसाररोगवैद्यातें'.
कृष्णद्वेषी रुक्मी 'देईन' म्हणे बळें चि, 'चैद्यातें[5]'. ७००
सु चली युक्ति सतीला; स्वकरें चि लिहोनि पत्रिका, विप्र
पाठविला, आणाया प्रभुला, श्रीद्वारकेप्रति क्षिप्र. ७०१
दे वर[6] हि रेवतीचा उत्सुक होता चि; विप्र ही गेला.
त्याचा बहु आदर त्या श्रितसंतानें[7] यदूत्तमें केला. ७०२
वा चविलें पत्र जसें, आइकिले सात उत्तम श्लोक;
तेव्हां चि निघे, स्वरथीं घेउनि विप्रासि, उत्तमश्लोक[8]. ७०३
य दुपति गेला भीष्मककन्याहरणार्थ, ऐकतां चि असें,
सबळ बळ निघे. वातावांचुनि दहनासि राहवेल कसें? ७०४

---

१. कड्यावर. २. अरण्यें. ३. चतुर रेवतराजानें. ४. रुक्मिणी. ५. चेदिदेशाच्या राजाचा पुत्र शिशुपाल त्याला. ६. दीर. ७. आश्रिताना जो कल्पवृक्षासारखा त्यानें. ८. उत्तम आहे कीर्ति ज्याची तो कृष्ण.

**न** गरा वैदर्भीच्या शाल्व, जरासंध, दंतवक्र, खळ
आले शिशुपाळाला घेउनि, आणूनि फार भूपबळ. ७०५
**मो** टा उत्सव कुंडिनवासी जन करिति, फार पुर साजे.
सत्कारिले यथोचित, सुतसंतोषार्थ, भीष्मकें राजे. ७०६
**भ** ट्ट उपाध्याय वधूवरपक्षीं देवकें हि ठेवविती.
चैद्यासि रुक्मिणीस हि वृद्धा[1] सुविवाहवेष लेवविती. ७०७
**गा** जंति [2]बंदी, वाद्यें, गायक, बहुसंख्य, नाचती गणिका;
मणि कांचनें उधळिती नृपकर, करिकर[3] जसे पयःकणिका[4]. ७०८
**व** रकड सर्व सुखी; परि बहु चिंता रुक्मिणी करी; न निजे;
हळुचि रडे; चिंती ते पाय, शिवाच्या हि सर्वदा मनिं जे. ७०९
**ते** जोनिधिच्या[5] विरहीं नलिनी जैसी, तसी च ती हरिच्या.
क्षुधित निवेल कसा हो! उपचारें चंदनादिकें वरिच्या? ७१०
**वा** टे तिला, 'प्रभूचें मजवरि नाहींच सुप्रसन्न मन.
नाहींच मानलें श्रीगौरीला शंभुला हि मन्नमन. ७११
**सु** ज्ञ द्विज हि न आला, [6]स्वविधी च घडों न दे प्रिया; मेला
मज दुर्भगेसि न गिळी, गिळितो खळ काळ कां त्रियामेला[7]?' ७१२
**दे** हीं न रुक्मिणीच्या, चिंतेनें शक्ति लेश ही उरली.
प्रातःकाळीं अश्रुस्नाता तद्वामभुजलता[8] स्फुरली. ७१३
**वा** टे चिंता करितां, जी बाहुलता तिला महाभार,
स्फुरतां, प्रिया गमे ती, फार कुसुमहार जेंवि हळवार[9]. ७१४
**य** श घेउनि तो विप्र हि आला; 'आला' म्हणे 'अनादि' सती;
त्याला नमीं[10], मग धनें बहु दे; परि न बहु सज्जना दिसती. ७१५
**न** मितां, वाहे पायीं, श्रीच्या प्रेमाश्रुचा झरा, ज्याच्या,
ओवाळुनि सांडाव्या त्यावरुनि, समृद्धि, कां न राज्याच्या? ७१६

---

१. वडील स्त्रिया. २. स्तुतिपाठक. ३. हत्तींच्या सोंडा. ४. पाण्याचे कण. ५. सूर्याच्या. ६. आपलें दैव. ७. रात्रीला. ८. तिची डावी भुजा तद्रूप लता. ९. हलका. १०. नमी (?).

**मो** दाब्धिनिमग्ना, ती श्री, जैसें किमपि, अन्य परिसेना,
तसि च विषादविषांबुधिमग्ना, येतां चि कृष्ण, अरिसेना. ७१७
**भ** क्त विदर्भाधिपति, प्रभुची पूजा करी, धरी पाय.
रुक्मी जळे मनीं, परि घूकाचें[1] तेज रविपुढें काय? ७१८
**ग** डबडलें खळमंडळ, झालें भीतीस भव्य माहेर.
नेतां श्रीगौरीच्या पूजेला रुक्मिणीस बाहेर. ७१९
**व** रविक्रमभटकटकें[2] रक्षित होतीं, भिवोनि शौरीतें,
कुळधर्मास्तव नेतां पूजाया रुक्मिणीस गौरीतें. ७२०
**ते** ज किति काजव्यांचें भानुपुढें? त्यां म्हणे हरि, 'न भागा,
पशु हो! तेव्हां रक्षा, फिरतां मागें चि मीं हरिन भागा'. ७२१
**वा** जत गाजत गेली, पूजा विध्युक्त करुनियां फिरली,
तेव्हां दृष्टींत तिच्या साक्षात्त्रैलोक्यमोहिनी सिरली. ७२२
**सु** मशरकुसुमसमूहीं[3] श्रीचे सुकटाक्ष देवतरु फुलले;
भुलले रक्षक पामर, भेंडे[4] रसदृष्टिवृष्टिनें उलले. ७२३
**दे** वीकटाक्षबाणप्रकरें[5] कटकें क्षणांतरीं भुललीं.
करुणा चि करी, म्हणवुनि न खळभटांचीं उरस्थळें उललीं. ७२४
**वा** ट पहातां, समयीं, जेंवि मयूरीप्रति स्वयें अब्द,
श्रीकृष्ण रुक्मिणीप्रति भेटे, लागों न दे यशा शब्द. ७२५
**य** लें रक्षित असतां, सहरिपुनृपकीर्ति[6] रुक्मिणी वारिली,
हरिनें जेंवि शृगाळांतुनि[7] निजभाग, प्रभूत्तमें हारिली. ७२६
**न** रपतिचक्र हतप्रभ केलें, नेलें चि निजवधूरत्न,
'हा! गोपानीं हारिलें यश' म्हणती, करिति खळ पुन्हा यत्न. ७२७
**मो** टा क्षोभ खळांच्या चित्ता झाला; पुन्हा हि समरांत

---

१. मूळ पाठ—**चंद्राचें**. २. श्रेष्ठ आहे पराक्रम ज्यांचा अशा योद्ध्यांचीं सैन्यें. ३. मदनाचे बाण हे च पुष्पसमूह त्यांच्या योगानें. ४. मातीच्या कच्च्या विटा. ५. देवीचे जे कटाक्ष तद्रूप बाणसमूहानें. ६. शत्रु जो राजा त्याच्या कीर्तीसह. ७. कोल्ह्यांतून.

आनंद यादवांत, व्योमीं तैसा चि होय अमरांत. ७२८

भ ग्न रणीं खळ झाले, फिरले मगधेश्वरादि जों मागें;
रुक्मी करी प्रतिज्ञा, धांवे प्रभुला वधावया रागें. ७२९

ग र्व तयाचा हरि हरि; हननाचा थोडका दिसे अवधी.
[1]धवधी सदया व्हाया, श्री पद धरि; म्हणुनि मेहुण्या न वधी. ७३०

व [2]पन स्मश्रुकचांचें करि, बांधुनि मेहुण्यासि [3]चैलानें.
बैलानें खिजवावा हरि कां हो! वज्रकर हि शैलानें? ७३१

ते थें आला, मारुनि रिपुबळ, जैसें [4]पलाशबळ राम,
[5]श्यालासि सोडवी, बहु लावी अनुजासि शब्द, बळराम. ७३२

[6]वा रिधरें क्षिति उदकें, तैसी ती रुक्मिणी सुसामानें
क्षिप्र निववली बंधुव्यसनार्ता, भेटतां चि रामानें. ७३३

सु टला तेथुनि रुक्मी, झाला भग्नप्रतिज्ञ; तो राहे
निर्मूनि भोजकट पुर; न पुन्हां कुंडिनपुराकडे पाहे. ७३४

दे वी श्रीवैदर्भी स्वपुरीं नेवूनि, त्या दयानिधिनें
करुनि महोत्सव वरिली, स्वसुहृज्जन तोषवावया, विधिनें. ७३५

बा ळ तिला [7]स्मर झाला, रिपु जाणुनि शंबरासुरें हरिला,
बुडवुनि पयोधिमध्यें, शोक दिला शोकनाशका हरिला. ७३६

य दुपतिसुत ज्या मीनें गिळिला, तो धीवरांसि सांपडला;
राष्ट्रपतिशंबराला भेटविला. खळकरीं पुन्हां पडला. ७३७

[8]न क्रध्वजभार्या रति, जाणोनि भविष्य, तद्गृहीं होती,
चिरितां [9]महानसीं [10]झष, पावे शिशु तदुदरांतरीं हो! ती. ७३८

मो हे [11]सूदार्पित शिशु पाहुनि मायावती रती स्वांतीं,
नारद रहस्य सांगे; मग पोषी, मातृरीति धरि कांतीं. ७३९

---

१. [ प्राण- ] नाथाची बुद्धि. २. दाढीमिशांचें मुंडन. ३. वस्त्रानें. ४. राक्षससैन्य. ५. मेहुण्याला. ६. मेघानें. ७. मदनावतार प्रद्युम्न. ८. मदनस्त्री. ९. पाकशाळेंत १०. मासा. ११. सैंपाक्यानें दिलेला.

भ तों प्रबुद्ध होतां, करि फार विनोद, कांत जाणोनि.
तो प्रद्युम्न म्हणे तिस, 'कां बुडविसि अघ मनांत आणोनी?' ७४०
ग भांदि वृत्त सांगे रति, रिपुनाशार्थे दे महा माया,
मारवुनि शत्रुपतिला, घेउनि ये द्वारकेसि, ती जाया. ७४१
व ल्लभतुल्याकृति तो पाहुनि अंतःपुरांत आर्यांनीं
क्षण मानिला मुकुंद चि, वैदर्भीसह मुकुंदभार्यांनीं. ७४२
ते व्हां नारद सांगे, वसुदेवप्रभृति पावले हर्षा.
ती वेला दे पौरां सुख, मोरां चातकां जसें वर्षा. ७४३
वां सरमणि स्यमंतकमणि दे सत्राजिता सख्यासि; तया
मागे यदुराजार्थ प्रभु; तो नेदी, मनीं धरी न भया. ७४४
सु बहु सुवर्ण प्रसवे, रविसा तेजेंकरूनि मणि साजे,
त्या लोभें तो प्रभुला नेदी मणि, लब्धकांचनें माजे. ७४५
दे दीप्यमान तो मणि बांधुनि कंठीं, प्रसेन तद्भ्राता
मृगयार्थ वना गेला; हरिनें हरिला, करूनि तद्घाता. ७४६
घा रणरिपु मारुनि, मणि नेला स्वबिळांत जांबवंतानें.
पर्यंकोपरि केला, खेळाया पाहुनि स्वसंतानें. ७४७
'य दुनाथें चि प्रायः स्वभ्राता मारिला,' असें मोहें
बोलें सत्राजित, जें जनवदनें प्रभु हि आयके हो! हें. ७४८
न गरजनांसह शोधी प्रभु, तें अपयश करावया दूर;
पाहे वनीं प्रसेना, मग सिंहा, मग बिळीं सिरे शूर. ७४९
मो टा कलह प्रभुसीं करि अठ्ठावीस दिवस ऋक्षपती.
मग बळ सरतां वळखे गुरुला, दे मणिसमेत जांबवती. ७५०
म रला बिळांत हरि, ते पुरजन होऊनि दीन, दिन बारा,

---

१. खोडलेला पाठ—**मोटा होतां ती रति.** (ह्या पाठानें ही आर्या मंत्रवर्णांतील द्वितीयस्थानीं असताना बदललेल्या पाठामुळें ती तृतीयस्थानीं होत आहे हे अंकानीं स्पष्ट केलें आहे). २. खोडलेला पाठ—**चिंतिसि पापधर्म.** ३. पावसाळा. ४. सूर्य. ५. पलंगावर. ६. जांबवान्.

होते; मग शोकाकुळ आले, लेवूनि अश्रुच्या धारा. ७५१
ग णपतिच्या मातेला वसुदेवप्रमुख घालिती भार.
देवी स्वप्नीं सांगे, त्याचा तत्काळ ये चमत्कार. ७५२
व नितेसह येउनि, हरि मणि दे सत्राजिता, जना तोष.
तो रत्न, सत्यभामा दे जाया आत्मदोष, विभुरोष. ७५३
ते कन्या चि प्रभुनें प्रेमें स्वीकारिली, न तें रत्न;
जाया स्वदोष जरि त्या केला सत्राजितें महा यत्न. ७५४
वा र्ता, पांडव झाले दग्ध असी, ऐकतां चि सहराम
विज्ञातार्थ[1] हि, गेला शिष्टाचारार्थ, साधुसुखधाम. ७५५
सु हृदुत्तम कृतवर्मा, अक्रूर हि साधु, शौरिच्या मागें,
न दिली कन्या म्हणउनि, कुमति सुधन्व्यासि सिकविती रागें. ७५६
'दे तों म्हणोनि न दिली, कृष्णासि सुता दिली; महा खोटा.
घे सत्राजित मारुनि मणि; आम्हां दोष लाविला मोटा.' ७५७
वा णी ऐकुनि त्यांची न करी च विवेक तो भ्रमें पापी.
दापी स्त्रियांसि रात्रौ सूर्यसख्याचा[2] बळें गळा कापी. ७५८
य[3] मदूतकर्म केलें, मणि नेला. शोक सत्यभामेला
न धरे; जाउनि सांगे प्रभुला कीं, 'एवमेव[4] बा मेला'. ७५९
न यनीं जळ आणुनि विभु आले स्वपुरा खळासि माराया.
भी शतधनु, त्यासि म्हणे कृतवर्मा, 'मीं न कल्प[5] ताराया'. ७६०
मो कलिला मणि घेउनि दानपतीनें हि, म्हणुनि धैर्य गळे.
मग शतधनु शतयोजनगाम्य[6]श्वावरि चढोनि तूर्ण पळे. ७६१
भ व्य गरुडकेतु[7] रथारूढ सबळ देव लागला पाठी.
मिथिळेजवळी मृत हय त्यागुनि पळतां, तया खळा गांठी. ७६२
ग रुडध्वज रथ सोडुनि पायीं धावूनि, सोडुनी अरिला[8],

---

१. विशेष रीतीनें ठाऊक आहे गोष्ट ज्याला असा. २. सत्राजिताचा. ३. प्राणहरण. ४. अशा प्रकारें. ५. समर्थ. ६. शंभर योजनें जाणाऱ्या घोड्यावर. ७. गरुड आहे (रथावरील) पताका ज्याची. ८. चक्राला.

रिपु वधुनि अलब्धमणि[1] श्रीश म्हणे, 'व्यर्थ मारिलें अरिला'. ७६३
**ब** ळ निजवंचन जाणे, म्हणे, 'बरें जा पुरीं, करीं शोध;'
जाय स्वभक्त मैथिल[2] ताराया, धरुनि मानसीं क्रोध. ७६४
**ते**थ वसे बहु वर्षे, हरि सेवकभवमहागदासि कवी;
श्रीराम आणिखी धृतराष्ट्रसुताला हि तैं गदा सिकवी. ७६५
**वा**रिधिदुर्गीं[3] जाउनि, विभुनें हृदयीं धरूनि भामा, तें
वृत्त कथुनि, उद्धारिलें, करवुनि संस्कार सर्व, श्वशुरातें[4]. ७६६
**सु**टला, मेला तेव्हां शतधनु, हें ऐकतां चि कृतवर्मा,
अक्रूर हि शीघ्र पळे; भ्याले ते आपुल्या चि त्या कर्मा. ७६७
**दे**शांतरासि गेला अन्याय करूनि, तदपि दानपती
कासीवासी झाला; सुज्ञपणें सर्व दूषणें लपती. ७६८
**वा**राणसींत बहु मख करि, वांटी लोहधातुपरि सोनीं.
प्रभुनें आणविला तो, वृद्धमुखें राष्ट्रशिवद[5] परिसोनीं. ७६९
**य**दुनाथ म्हणे त्यातें, 'शतधनुनें मणि तुम्हां दिला, राहो;
मख केले कळलें, मज दावा, रामप्रसादनद[6] वाहो.' ७७०
**न** करुनि विलंब दावी दानपती; सर्व ही सभा पाहे.
त्या भक्तास चि तो मणि निजजनचिंतामणि प्रभू वाहे. ७७१
**मो**रांसि जसा जळधर, सुखवाया पांडवांसि तापहर,
इंद्रप्रस्था गेला प्रभु, ज्याचा वर्णितो प्रताप हर. ७७२
**भ**वना येतां मूर्त श्रीचें सौभाग्य पांडुचे सुत ते
आनंदे, जेंवि विधूदय होतां सिंधु, जाहले उतते. ७७३
**बौ**णरात्र[7] तेथ राहे, जिष्णुसवें[8] एकदा वना जाय;
पूर्वीं पुरासि धाडिति मृग मारुनि, सर्वधन्विजनराय[9]. ७७४

---

१. मिळालेला नाहीं मणी ज्याला असा. २. जनक राजा. ३. द्वारकेंत. ४. श्वशुराला ( सत्राजिताला ). ५. राष्ट्राला कल्याण देणारा. ६. बळरामाची कृपा तद्रूप नदी. ७. पुष्कळ रात्रा ( पुष्कळ दिवस ). ८. अर्जुनाबरोबर. ९. सर्व धनुधर्‍यांमध्यें श्रेष्ठ.

व नसंचारें झाले श्रांत, प्राशिति कलिंद[1]जातोय;
तों कन्यारत्नाचें दर्शन, तीच्या तटीं तयां, होय. ७७५
ते, पुसतां जिष्णुप्रति सांगे कीं, 'मीं ख[2]रांशुची कन्या
कालिंदी, तप करित्यें, विष्णु वरावा, वरूं नये अन्या. ७७६
वां[3] रिमधें यमुनेच्या पितृनिर्मितमंदिरांत मीं आहें.
यावत्प्रभुदर्शन तों, तप म्यां अवलंबिलें असे बा! हें.' ७७७
सु हृदें तें वृत्त तिचें कथितां, ती वाहिली रथीं नवरी;
स्वपुरा आणूनि वरी प्रभुवर विधिनें तिला, पथीं न वरी. ७७८
दे ववि खांडव[4] दहना, म[5]य रक्षुनि तत्करें सभा रचवी.
अमृताची एक चि, हरिचरिताच्या पाहतां अपार, चवी. ७७९
बा पाच्या भगिनीची कन्या ही, रुक्मिणी तसी चरणीं
रतबुद्धि, मित्रविंदा वरुनि, मथी खळचमू तसी च रणीं. ७८०
य म[6]महिषोग्र महाबळ वृष, जे दुर्जय अनेक भूपांतें,
ते जिंकिले प्रभूनें, लीळेनें धरुनि सप्तरूपांतें. ७८१
नें[7] ग्नजितें कौसल्यें सत्या कन्या समर्पिली देवा.
हे सावी प्रभुभार्या, परि करि दासी जसी, तसी सेवा. ७८२
मो द्या प्रेमें प्रभुला भद्राख्या, बंधुनीं दिली सुहिता,
ती सातवी, पित्याची भगिनी श्रुतकीर्ति जी तिची दुहिता. ७८३
भ व्यगुणा मद्राधिपकन्या श्रीलक्ष्मणा हि विष्णूनें
हरिली स्वयंवरीं; जसि कृ[8]ष्णा, भेदूनि लक्ष, जिष्णूनें. ७८४
शं णिल्या सहस्र सोळा, एकशत प्रभुवराप्रिया अन्या.
मारुनि नरकासुर ज्या वारिल्या गंधर्वसिद्धनृपकन्या. ७८५
व सुधासुत नरकासुर पीडा देवादिकांसि फार करी.
तें बहु काय वदावें? अ[9]दितीचीं कुंडलें हि दुष्ट हरी. ७८६

---

१. यमुनेचें पाणी. २. सूर्याची. ३. पाण्यामध्यें. ४. कुरुक्षेत्रांतील इंद्राचें मोठें अरण्य. ५. खांडववनांत सांपडलेला मयासुर. ६. यमाच्या रेड्याप्रमाणें उग्र. ७. कोशलदेशाचा राजा नग्नजित त्यानें. ८. द्रौपदी. ९. इंद्रमातेची.

से ज तयाचें दुःसह, सर्वांसीं सर्वदा हि तो वक्र.
हें निजदुःख प्रभुला कळवी स्वमुखें चि येउनी शक्र. ७८७

खा सवकार्यार्थ प्रभु भामेसह खगवरीं[1] बसोनि निघे.
दयितेसि, पारिजात द्रुम द्यावा हें मनांत आणुनि, घे. ७८८

सु रारिपु मुर, नरकासुर, दारुण रण करिति, तदपि ते खचले.
सर्वांवरि चाले, परि गिरिवरि बळ लेश वायुचें न चले. ७८९

दे उनि अभय नरकसुतभगदत्ता, भौमेमंदिरीं रुद्धा[2]
होत्या त्या मुक्त करी आधीं, राजन्यकन्यका[3] शुद्धा. ७९०

वा टे सर्वांसि, प्रभु भर्ता व्हावा; तसें चि देव करि.
प्रेषी स्वपुराप्रति; मग नेउनियां पारिजात, त्यांसि वरी. ७९१

य दुकुळकमळादिनमणी अदितीतें नमुनि कुंडलें अर्पी.
भामेसि पारिजातें सुखवी; सुजना यशोमृतें तर्पी. ७९२

न[4] क्षत्रादिशुभगुणीं एकीं लग्नीं[4] अनेक तनु धरिल्या,
हरिल्या प्रेक्षकवृत्ति, प्रभुतिलकें, एकदा चि त्या वरिल्या. ७९३

मो टा विनोद भैष्मककन्येसीं[5] एकदा करी, तीतें
देव म्हणे[6], ' सुदति! वृथा वरिलें मातें[6], अलोकरीतीतें[7]. ७९४

भ र्ता, योग्य, कुलज, नृप, न वरुनि, मजला वरूनि, चुकलीस.
राजसुते! चित्रनलिनरतमधुपीसी[8], हितासि मुकलीस.' ७९५

ग र्वे तिच्या मनिं कीं, 'मीं आवडत्यें, प्रभु न दे वियोग मला.'
तें जाणूनि करि असें, जो स्मरत क्षण तीस तो गमला. ७९६

व चन नवें, अति अप्रिय कानीं पडतां, पडे, रडे चि सती.
उचली करुणार्णव, कीं, दीनाहुनि दीन जाहली दिसती. ७९७

---

१. गरुडावर. २. भौमासुराच्या गृहांत अडकवून ठेविलेल्या. ३. क्षत्रियकन्या. ४. (नक्षत्रांच्या) विशिष्टयोगांत (लग्नसमयीं.) ५. रुक्मिणीशीं. ६. खोडलेला पाठ–**विटंबी ललना, लीलारस लो...** .... ७. लोकांपेक्षां वेगळी अशी आहे रीत ज्याची त्याला. ८. चित्रांतील कमळाच्या ठिकाणीं रममाण झालेल्या मधमाशीसारखी.

ते ल जसें उत्तेजन देतें तत्काल दीप[1]कळिकेला,
प्रभुचें कृपावलोकन तेंवि तिला; तो हितार्थ कळि केला. ७९८
'वा माक्षि! साश्रु कोप[2]स्फुरदधर [3]तवास्यपद्म देखावें',
देव म्हणे, 'यास्तव तें वदलों, न मनांत सत्य लेखावें'. ७९९
सु ख सांत्वनामृतें दे प्रभु. त्याचे पाय नमुनियां मग ती
विनवी. बहुसरस वदे, जें पीतां ताप न हृदयीं तगती. ८००
दे वी वैदर्भीचे प्रद्युम्नप्रमुख पुत्र दश, शीला
प्रभुच्या चि धरिति; 'पित्राह्लादक' कवि म्हणति त्यां चि, न शशीला. ८०१
वा [4]र्ष्णेयप्रभुची स्त्री जी जी, सुतलाभजन्य उत्सव ती
पावे; वैदर्भीसीं तुल्य चि त्या प्रियसखी, तस्या सवती. ८०२
य द्यपि चिंताकारण, दे कन्या त्यांसि एक ज्या माता
कन्यांच्या संसारीं [5]त्यां होय सुधाभिषेकें जामाता. ८०३
न वरी रुक्मवती जी मातुळकन्या, स्वयंवरीं तीतें
प्रद्युम्न हारि स्वबळें दावूनि पित्याचिया चि रीतीतें. ८०४
मो टा द्वेष्टा प्रभुचा, परि भगिनीच्या प्रियार्थ तें साहे,
पौत्री हि रोचनाख्या [6]अनिरुद्धा द्यावया स्वयें बाहे. ८०५
भ [7]विकगुणाब्धि मिळाले रामश्रीप्राणवल्लभ व्याही,
त्यांला न भजे रुक्मी, कपटद्यूता भजे [8]अभव्या ही. ८०६
ग मलें खळकालिंगप्रमुखांचें वाक्य हित, बळा भोळा
मानूनि, द्यूतें तरि पाहे प्रभुयश करावया गोळा. ८०७
ब ळदेवाला रुक्मी द्यूतक्रीडा करावया आणी,
कपटें चि [9]ग्लैह जिंकी, 'रुक्मी लटिका' म्हणे नभोवाणी. ८०८
ते व्हां वदला कटु कीं, '[10]बाणांहीं नृपजनांत दक्षाहीं,

---

१. दिव्याच्या कळीला (ज्योतीला) २. रागानें कांपणारे असे आहेत ओठ ज्याच्या ठिकाणीं तें. ३. तुझें मुखकमल. ४. वसुदेवसुत कृष्णाची. ५. मूळ पाठ—**होय तयां अमृतसेक.** ६. प्रद्युम्नपुत्राला. ७. कल्याणकारक गुणांचे समुद्रच. ८. हानिकारक अशा. ९. पैज. १०. नृपजनांचा अंत करण्यांत तत्पर अशा बाणांनीं.

राजार्ही च करावी क्रीडा; तैसी च यां हि अक्षांहीं[1]. ८०९

वा ढवितां प्रीति वृथा द्यूतीं; पटु नृप, वनीं तुम्हीं गोप.’
ऐसें म्हणतां आला रामाला त्या दुरुक्तिनें कोप. ८१०

सु रपति पवितें अचळीं जैसें, तैसें चि राम परिघातें
घाली रुक्मिशिरावरि, सुखवी हारिला मनांत अरिघातें. ८११

दे श कलिंगादि सकळ हांसोत खळा, म्हणोनियां दांत
कालिंगाचे पाडी, हांसे जो बहु असाधु वादांत. ८१२

वा ईट बरें न म्हणे रामानुज देव रुक्मिणीकांत;
[2]गुरुदयितास्नेहाच्या भंगा भी, प्रकृतिनें हि तो शांत. ८१३

य श ज्या दात्याचें निस्तुळ त्या बळिचा स्वसुत शतज्येष्ठ,
शोणितपुरपति, बाण, श्रीशंकरसर्वकिंकरश्रेष्ठ. ८१४

न [3]गैजापतिप्रसादें सुर, सेवकसे चि, त्यासि वश सर्व,
तो दशशतभुज, वाद्यें वाजवि; तांडव करी जयीं शर्व. ८१५

मो क्षप्रद संतोषे, ‘माग’ म्हणे, त्या प्रसन्न सुरपाळा
बाण म्हणे, ‘देतां तरि, माझें, आंगें तुम्हीं च, पुर पाळा’. ८१६

भ क्तासि तें हि दे प्रभु. एके दिवसीं म्हणे, ‘भुजा भार
दिधला, तुजसम योद्धा न मिळे, कंडूति[4] यां भुजां फार’. ८१७

ग[5] जमुखगुरु त्यासि म्हणे, ‘जेव्हां पावेल केतु[6] हा भंग,
युद्धांत मत्समासीं तुज तूर्ण घडेल दर्पहर संग’. ८१८

व र मानी शापाला, हर्षे तो, केतुला सदा पाहे.
स्वप्नीं अनिरुद्धासीं रतिसुख त्याची उषा सुता लाहे. ८१९

ते जागी होय, रडे; तीचें प्रियविरहदुःख बहु भारी.
कळतां चि, चित्रलेखा पितृ[7]सचिवसुता तिची सखी तारी. ८२०

वा री ताप असा ती. योगबळें देव, दैत्य, गंधर्व,
दावी लिहोनि मानव, यादव, साक्षात्तसे स्वयें सर्व. ८२१

---

१. फांशानीं. २. वडील व भार्या ( रुक्मिणी ) यांच्या प्रेमाच्या. ३. शंकर. ४. खाज. ५. गणेशपिता शंकर. ६. ध्वज. ७. पित्याच्या प्रधानाची कन्या.

**सु** रत जयासीं, त्याच्या ताताला ती विलोकितां, लाजे.
पति दावितां चि, आणी अनिरुद्धासहित उंचलुनि बाजे. ८२२
**दे** आणुनि कांत तिला सेवाया, अमृतरस जसा आतां.
बहु दिवसां ती कळली, रक्षकवदनें शिवानुगा, वार्ता. ८२३
**बा** ण स्वयें चि पाहे येउनि; मग त्या रणांत अनिरुद्धा
बांधोनि नागपाशीं, घाली कारागृहांत अनिरुद्धा. ८२४
**य** दुचें चिंतेंत पडे कुळ, वार्षिक च्यार मास पावेतों,
जों केवळ चि बुडावें, प्लवसा देवर्षि त्यास पावे तों. ८२५
**न** मनें मुनिचरणांच्या चिंता सरली च, लागला शोध.
बळ हरि घेउनि गेले, द्वादश अक्षौहिणी महायोध. ८२६
**मो** टा तो संग्राम; श्रीहर, भक्तप्रियार्थ, त्या हरिसीं,
जैसा करी करीसीं, भांडे; अथवा जसा हरी हरिसीं. ८२७
**भ** क्तासि भक्तवांछित वर देउनि विसरला असें वाटे,
करुणाब्धि; आपणासीं आपण भांडे, मनीं दया दाटे. ८२८
**ग** दसारणयुयुधानप्रद्युम्नहळायुधादिवीरांसीं
समसैन्य बाण भांडे; धीर मिसळले रणांत धीरांसीं. ८२९
**व** ह्व्यस्त्रप्रमुखें जीं उग्रें बहुसंख्य पार्वतीशास्त्रें,
पार्जन्यप्रमुखांहीं शमवी हरि, 'एक' म्हणति ज्यां शास्त्रें. ८३०
**ते** जस्वी प्रभु कृष्णें योजुनियां जृंभणास्त्र मग युद्धीं
हर मोहिला गमे. अपकर्ष मनीं सुमलिनीं च, न विशुद्धीं. ८३१
**बा** णासि विरथ करितां, रक्षाया संकटीं सुता भग्ना,
मध्यें येउनि ठाके तों त्याची माय कोटरा नग्ना. ८३२
**सु** टला बाण प्राणव्यसनापासूनि, दृष्टि हरि फिरवी.
तेज अजितप्रभुपुढें नग्न सती शस्त्र आपुलें मिरवी. ८३३

१. बाणासुराला. २. अप्रतिबंध अशा (रणांत). ३. सर्पबंधानीं ४. चातुर्मास्य. ५. नावेसारिखा. ६. महान् योद्धे ज्यांत आहेत असें. ७. शिव आणि विष्णु एक च असल्यामुळें. ८. सारखें ( बरोबरीचें ) आहे सैन्य ज्याचें असा. ९. पार्वती-ईश-अस्त्रें=पाशुपत अस्त्रानें. १०. जांभई आणणारें अस्त्र. ११. मानखंडना.

दे त्रिशिरा[1] ज्वरताप; प्रभु शीतज्वर, तयास ही भाजी.
शरणागता ज्वरा हरि रक्षी; सांगे, 'कथा तुजी माजी, ८३४
वा चील, आइकेल, स्पर्श तया त्वां करूं नये, तापा!
जा; हें स्मरण असों दे.' म्हणतां तो ज्वर म्हणे, 'बरें बापा!' ८३५
य लें बाण पुन्हा ये, आणुनि शस्त्रें मुरारिवरि सोडी.
त्यांतें तद्वाहूंसह सहसा[2], चक्रेंकरूनि हरि तोडी. ८३६
न गशाखा तोडाव्या जेंवि कुठारें[3], भुजा तस्या अरिच्या
चक्रें तोडी; तों शिव येउनि ठाके उभा पुढें हरिच्या. ८३७
मो क्ष, प्राणव्यसनापासुनि, भक्ता घडो, म्हणोनि कर
जोडी श्रीहरहरिला; प्रार्थूनि म्हणे 'करूं नको निकर. ८३८
भ क्तबळितनुज हा; या अभय दिलें यश पराक्रम हि म्यां; तें
रक्षावें कृष्णा! त्वां. लागों द्यावा न शब्द महिम्यातें.' ८३९
ग जवजतां करुणाकर हर, हरि त्यातें म्हणे, "अहो देवा!
आवरिलें चक्र पहा! भक्तशिरीं अभयकर तुम्हीं ठेवा. ८४०
घ र दिधला प्रह्लादा कीं, 'मीं न तुझ्या वधीन संततिला';
ते न मृषा मद्वाणी, ऐसें म्हणतां तुम्हींच संत तिला. ८४१
ते जस्वी अजरामर बाणाचे राहतील भुज च्यार.
याचा भुजेंदर्पज्वरभर[5] हरिला, भूमिचा हि बळभार[6]. ८४२
वा त्सल्य दाखवीलें जेव्हां त्या श्रीपुरारिबाणानें[7],
दाखविलें तें मिथुन[8] हि, सुखवाया श्रीमुरारि, बाणानें. ८४३
सु प्रिय झालें, गेले स्वपुरा घेउनि, करूनि युद्धमह[9],
अनिरुद्धासि उषेसह हरि हर बाणासि तदभयोक्तिसह. ८४४
दे खति वृष्णिकुमारक[10] कूपीं सरडा महापुरोपवनीं;
न निघे प्रयत्न करितां; कृष्णातें कथिति कुतुक तें भवनीं. ८४५

१. शिव. २. एकाएकीं. ३. कुऱ्हाडीनें. ४. अनर्थ. ५. भुजांचा गर्व तद्रूप ज्वराचा भर. ६. सैन्याचें ओझें. ७. शंकराच्या बाणानें. ८. जोडपें. ९. युद्धरूप उत्सव. १०. यादव.

धा मकरातें प्रेरुनि त्या शरठाला[1] मुकुंद उद्धरवी.
स्पर्शहताशुभ[2], दिव्यद्युति होय पळांत, जेंवि शुद्ध रवी. ८४६
य दुपति त्यासि तयाचें वृत्त पुसे, हित जनासि कळवाया.
सांगे नमुनि पुरुष तो ब्रह्मस्वग्रास[3], लोभ पळवाया. ८४७
"न रवर इक्ष्वाकुतनय नृग मीं; श्रवणासि, नाम, दात्यांच्या
गोष्टींत, तुझ्या, यावें, ऐकति कीर्ती भले सदा, त्यांच्या. ८४८
मो जाया कोणांस हि सामर्थ्य नसे असीं प्रमोदानें
ग्यां दिधलीं सत्पात्रीं, विधिनें पूजा करूनि, गोदानें. ८४९
भ रलों भरीं[4], अकस्माच्चुकलों, देवा! न सांगवे, हाय!
कृष्णा! विप्रासि दिली विप्राची, ग्यां न जाणतां, गाय. ८५०
श ति झाली असि, गेले टाकुनि दोघे हि धेनुला विप्र.
मीं ही त्या संतापें त्यागुनि तनु, यमपुराप्रति क्षिप्रें[5]. ८५१
ध दलों यमासि, पुसतां, 'आधीं भोगीन थोडकें पाप.'
'पत[6]' ग्हणतां पडलों मीं, झालों कृकलास, भोगिले ताप. ८५२
ते, 'काय करूं?' ग्हणतां, द्विज वदले, करुनि मदुपहास, 'रडा';
नाहीं उपेक्षिला त्वां, हे भगवन्नाथ! यदुप! हा सरडा." ८५३
वा नूनि कीर्ति मग, नृग वंदुनि हरिला, चढे वरविमानीं
तेव्हां त्याहूनि अधिक निजतेज, असें मनीं न रवि मानी. ८५४
सु हृदांप्रति कृष्ण ग्हणे, 'ब्रह्मस्व चि होय उग्रतम, न गर.
ब्रह्मस्व कुळ ग्रासी; न भयप्रद यापरीस यमनगर.' ८५५
दे[9] शिकवर देव हित स्वजनाला बहु निजाननें बोधी.
उपदेशामृतपूरें जीवांचें काममलिन[10] मन शोधी. ८५६
वा[11] र्दुर्गाहूनि बळप्रभु गेला गोकुळासि निववाया,

---

१. सरड्याला. २. स्पर्शानें नाहींसें झालें आहे पाप ज्याचें ३. ब्राह्मणधनाचा ग्रास. ४. उत्कर्षांत—वैभवांत. ५. सत्वर [गेलों]. ६. पड. ७. सरड्याप्रत. ८. ब्राह्मणाचें धन च. ९. गुरुश्रेष्ठ. १०. लोभदूषित. ११. द्वारकेहून.

जैसा अमृतघन[1] व्रतिपतिचातक[2]खगकुळासि जिववाया. ८५७

ब दुकुळकुमुदकळानिधि, नंदयशोदापदांबुजां, नमनें,
'मीं राम' म्हणोनि, करी; स्मरला पितरां, तदा दुजां न मनें. ८५८

न मितां राम उरासीं धरिला कवळूनि मायबापानीं.
म्हणति, 'निवालों. गोडी अमृताच्या, अधिक काय बा! पानीं?' ८५९

मो हें अंकीं घेउनि रडती, घालुनि मिठी गळां ठाती[3].
अतुळा प्रेमकळा, कीं, प्रभुधैर्याचा करी गळांठा ती. ८६०

'भ[4] वदनुज सुखी आहे? पाहेन असें चि काय सुख? दामीं
ज्या बांधिलें स्वहस्तें या उखळीं, या स्थळीं च, सुखदा मीं. ८६१

ग मतें तुम्हांसि; परि बा! न गमे क्षणमात्र, वासरा! मातें.
व्रजवास दुःख देतो जें, बंधनगेहवास[5], रामा! तें.' ८६२

व दली असें उदंड चि, रडली, पडली गळां; तिला राम
समजावी. मग मित्रें सुखवी तो विश्वचित्तविश्राम[6]. ८६३

ते जवळ, पुन्हां आलें गोपींला वृष्णिकुळवरागमनीं,
जेंवि लतांसि वसंतागमनीं; नुरवी च ताप रंग[7] मनीं. ८६४

वा मा रामापासीं गावुनियां फार गोडवे, दात्या
'कृपणशिरोमणि' म्हणती, लागति यद्रीति गोड वेदा त्या. ८६५

सु[8] रभिऋतु प्रभु तेथें राहे, क्रीडा करी, प्रियांसंगें.
निजविरहतापतप्तें त्यांचीं निववी सुधौघ[9] तो अंगें. ८६६

दे उनि निजाधरामृत, त्यांचें ही देवदेव तो पी तें.
विषमशरज्वर[10] शमवी, रमवी रात्रौ वनांत गोपींतें. ८६७

वा रिक्रीडार्थ प्रभु बाहे; परि लंघिलें वच नदीनें.
प्रभुनें कसें सहावें? सोसावें लंघिलें वचन दीनें. ८६८

---

१. अमृत देणारा मेघ. २. [चांद्रायणादि] व्रतें करणाऱ्यांत जे श्रेष्ठ असे चातकपक्षी त्यांच्या कुळाला. ३. राहती. ४. तुझा धाकटा भाऊ (कृष्ण) ५. कारागृह. ६. विश्वाच्या चित्ताच्या आरामाचें ठिकाण. ७. प्रीति. ८. वसंत ऋतु. ९. मूळ पाठ—**निववी करुणामृतौघ.** १०. पंचशर जो मदन त्याचा ताप.

य  मुनेसि हेळें[1] ओढी, मग चरणीं घालितां मिठी, सोडी.
ऐसें प्रभु यश जोडी, लावी गोपींसि भक्तिची गोडी. ८६९
न  रपति पौंड्रकनामा तेव्हां निजदूत हरिकडे प्रेषी.
तो यदुसभेसि येउनि सांगे जें बोलिला प्रभुद्वेषी. ८७०
मो  टें हास्य जना ये, दूतमुखें ऐकतां चि संदेश;
कीं तो म्हणे, 'खरा मीं, लटिका तूं वासुदेव मंदेशें[2]. ८७१
भ  व्यार्थें[3] नाम चिह्नें सोडुनि ये शरण, मरण चुकवीन,
अथवा रणासि ये गा! गातिल माझा चि विजय सुकवीनें[4].' ८७२
ग  दबंधु[5] म्हणे दूता, 'चिह्नें त्याचीं तयासि अर्पीन.
जा सांग, शीघ्र येउनि गृध्र शिवा संगरांत तर्पीन.' ८७३
व  दला दूत तसें चि. क्रोधें तो मित्रकाशिपतिसहित
अक्षौहिणीत्रयबळें झाला सिद्ध त्रपारहित[6] अहित[6]. ८७४
ते  थें जाउनि अरिबळ मर्दी, गज जेंवि नलिनवन तुडवी.
प्रभु काशिपतीचें शिर, त्याच्या नगरीं पडे असें उडवी. ८७५
वा  रण जसा मृगेंद्रें, पौंड्रक तत्काळ मारिला हरिनें.
अरिनें काय टिकावें, निष्ठुर होतां मुरारिच्या अरिनें[7]? ८७६
सु  गति प्रभुच्या ध्यानें द्वेषें वेषें हि तोतया लाहे,
तन्मय झाला मरणीं; दे मुक्ति मुकुंद तो तयाला हे. ८७७
दे  खोनि काशिपतिशिर, तत्पुत्र सुदक्षिण स्मरांतकरा[8]
जाय शरण; शिव भेटे; मागे निजताततशत्रुनाशवरा. ८७८
वां  राणस्यधिपतिला[9] सांगे कृत्याग्निसाधनीं[10] युक्ती.
'अब्रह्मण्यावरि[11] परि योजावा' प्रभु असी वदे उक्ती. ८७९
य  लें साधुनि कृत्यानळ, हरिवारि धाडिला चि त्या अरिनें,
भग्न करुनि, त्याकरवीं भक्षविला दुष्ट, विष्णुच्या अरिनें. ८८०

---

१. नांगरानें. २. मूढशिरोमणि. ३. कल्याणासाठीं. ४. सुकविश्रेष्ठ. ५. कृष्ण. ६. निर्लज्ज शत्रु. ७. चक्रानें. ८. शंकराला. ९. काशिराजाला. १०. शत्रुनाशक अशा कृत्याग्नीच्या प्राप्तीविषयीं. ११. ब्राह्मणद्वेष्ट्यावर.

न गरी भस्म चि केली; जाणों तें तीस शस्त्रशक्रानें[1]
प्रायश्चित्त दिलें, खळसंसर्गमळक्षयार्थ, चक्रानें. ८८१

मो[2] क्षपुरीतें जाळुनि, ठाके पार्श्वीं मुरारिच्या, अरि[3] तें.
त्यावरि हळधर मारी नरकाच्या मित्रबंधुतें अरितें. ८८२

भ यरहित तो द्विविद कपि, सुग्रीवाचा प्रधान, मित्रास
परलोकीं सुखवाया, दे नरकारिप्रजांसि[4] वित्रांस[5]. ८८३

ग मला काळ चि कपि तो, वारिधिमध्यें शिरोनि जळ उडवी.
बुडवी ग्राम तटींचे, जाळी, दडपी नगीं[6], पदीं तुडवी. ८८४

घ नितांसह रैवतकीं करितां क्रीडा, बळासि तो पाहे.
करि बहु मर्कटचेष्टा, प्रभुहस्तें मरण मग रणीं लाहे. ८८५

ते समयीं रामावरि करिती सुर कुसुमवृष्टि रैवतकीं.
आश्चर्य काय? तो प्रभु त्या सर्वांचें हि इष्ट दैवत कीं. ८८६

घा रणपुरीं सुयोधनभूपतिची लक्ष्मणा सुता स्वबळें
हरिली जांबवतीच्या पुत्रें सांबें स्वयंवरीं प्रबळें. ८८७

सु ख न मनीं दुर्योधन, अन्यायें युद्ध करुनि धरि त्यातें.
बहुत मिळोनि विरथ करि, बांधी, निजकन्यकेसि हरित्यातें. ८८८

दे वर्षिमुखें कळतां, बहु कोपें उग्रसेन तो राजा.
दे आज्ञा, 'यादव हो! त्या अंधाच्या, वधा चि, पोरा; जा.' ८८९

वा रुनि तयांसि आपण राम प्रभु जाय, उपवनीं उतरे.
मुसळासि म्हणे, 'कैसे मारावे हे अचक्षुचे सुत रे!?' ८९०

य दुर्वीरें भेटीला येतां दुर्योधनासि सामानें
कथिलें हित, परि न बधे; न वळे दंडाविना पिसा[7] मानें. ८९१

न वल करी दुर्योधन; हांसूनि म्हणे, 'अहो सख्या कर्णा!
आम्हांसि उग्रसेनें आज्ञा केली, तुम्हीं हि आकर्णा[8]. ८९२

---

१. शस्त्रांमध्यें शक्र–श्रेष्ठ–अशानें. २. वाराणसीनगरीला. ३. चक्र. ४. नरकासुराचा शत्रु (कृष्ण) त्याच्या प्रजांला. ५. विशेष त्रास. ६. झाडांनीं. ७. मूर्ख. ८. ऐका.

मो टेपण दिधलें, तें आलें कामा; न गौरवाया हे
यादव पात्र; शिरावरि पदरक्षा कीं चढावया पाहे! ८९३
भ गिनी वसुदेवाची, ती काकी आमुची, असें नातें.
'घ्या छत्र' म्हणतसे मीं; निर्मर्यादीं कुळीं असेंना तें.' ८९४
गौं हां करूनि गेला, तेव्हां हांसोनियां म्हणे राम,
'चुकलों आम्हीं, जेथें योजावा दंड, योजिलें साम.' ८९५
ब ळ मग खवळे; खेळपुर उखळुनियां डिखळसें, निजहळानें
गंगेंत पालथें तें घालूं पाहे, पळांत चि बळानें. ८९६
ते व्हां चि धार्तराष्ट्रें सर्वांचा अंतकाळ जाणोनीं,
भेटविला, सस्त्रीक प्रभुचा प्रभुला कुमार आणोनि. ८९७
वा त जसा नौकेला, नांगर नगरीस बुडविता चि; परी
शरणागता खलास हि दे प्रभु अभय, स्वयें न घात करी. ८९८
सु रमुनि एका समयीं प्रभुचें कौतुक पहावया आला;
सोळा सहस्र सदनीं नवनव लीला विलोकितां धाला. ८९९
दे शींदेशींचे नृप अयुतद्वयसाष्टशत जरासंधें
केले होते बद्ध; श्रम बहु ते भूप पावले बंधें. ९००
वां चिक सांगोनि तिहीं पाठविला दूत दीनबंधुकडे,
धर्मे हि राजसूयक्रत्वर्थ सुरर्षि; तैं विचार पडे. ९०१
य ज्ञाप्रति जावें कीं शरणागत नृप करावया मुक्त;
पुसतां, प्रभुला उद्धव सांगे, 'जावें मखासि हें युक्त. ९०२
नृ रपति दिग्विजयावरि योग्य करायासि राजसूयातें;
सर्व नृपांत मगधपति अतिबळ, लागेल मारणें यातें. ९०३
मो हुनि विप्रच्छद्में, मागावें रण, तरी च आटेल;
मारील भीम; दुःसह तव सन्निधिनें न शत्रु वाटेल. ९०४

---

१. पायपोस. २. अमर्यादा करणाऱ्या. ३. निंदा. ४. दुष्टाचें नगर (हस्तिनापुर). ५. वीस हजार आठशें. ६. निरोप. ७. धर्मराज. ८. जरासंध. ९. ब्राह्मणाच्या सोंगानें.

भ[1] यभंगबंधहेतु प्रथम जरासंधबाहु तोडावे,
मग म[2]गधपरुद्धसकळशरणागतबंध, दीन सोडावे.' ९०५

ग मलें उद्धवमंत्रें सुख सकळां; मग अजें पदीं नमुनीं,
धर्माप्रति पाठविला, स्वागमन कळावया अ[3]दीन मुनी. ९०६

व सुधापतींकडे मग पाठविला, अभय देवुनीं, दूत;
तो हरि त्यांच्या क्लेशा, जैसा तिमिरासि भानुचा[4] सूत. ९०७

ते भूप अभयदानें हर्षविले, जेंवि तीर्थपादानें[5]
सस्त्रीपुत्रें जाउनि पांडव ही, दर्शनाचिया दानें. ९०८

वा हत होता चिंता यज्ञाची धर्म, त्यासि उत्साहा
दे दासांचा चिंतामणि, होऊं दे न दासकुत्सा[6], हा. ९०९

सु रपतिदिशेसि[7] मारुति जींकी[8]; सहदेव यमदिशेसि[9] तथा;
वरुणदिशेसि[10] नकुळ; नर हरमित्रदिशेसि[11] धरुनि धर्मपथा. ९१०

दे श अपरिमित जिंकुनि, आणुनि धन संपदा अदभ्रा[12], ते,
धर्मासि भेटति, जसे सिंधूसि श्रावणीं नद, भ्राते. ९११

वा टे धर्मासि वृथा दिग्विजय, न जिंकितां जरासंधा;
प्रभु उद्धवमंत्र कथी, स्वकृता ही त्या धरावरा संधा[13]. ९१२

य[14] मसुतनृपासि वंदुनि, भीमार्जुनकृष्ण जाहले विप्र;
ते भेटले मग अतिथि समयीं त्या मागधाप्रति क्षिप्र. ९१३

न रपतिसि म्हणति, 'आम्हीं अर्थी आलों दुरूनि मागाया.
मागों तें दे दात्या! सद्यश जोडीं नृपोत्तमा! गाया.' ९१४

मो घ[15] नसो जनु[16] म्हणुनि, छद्मज्ञ[17] हि नृप म्हणे, 'दिलें, मागा.'
ते द्वंद्वयुद्धभिक्षा मागति याचकमिषें महाभागा!. ९१५

---

१. भीति, पराभव व बंधन यांला कारण. २. मगधपतीनें—जरासंधानें—अडकवून ठेविलेलें असे सर्व शरण आलेले त्यांचीं बंधनें. ३. दीन नव्हे असा—समर्थ. ४. सूर्याचा सारथि अरुण. ५. ज्याच्या चरणीं तीर्थ आहे अशानें (कृष्णानें). ६. दासांची निंदा. ७. इंद्रदिशेला—पूर्वेला. ८. जिंकी. ९. दक्षिणेला. १०. पश्चिमेला. ११. कुबेरदिशेला—उत्तरेला. १२. पुष्कळ. १३. प्रतिज्ञा. १४. धर्माला. १५. निरर्थक. १६. जन्म. १७. कपट जाणणारा.

भ[1] द्रापति मग सांगे नामें; हांसे नृपाळ तो कळतां.
प्रभुसि म्हणे, 'भांडेना तुजसीं; बळ कळविलें तुवां पळतां. ११६
ग णना न जिष्णुची मज; हा भीम चि योग्य तुल्यबळ आहे,'
ऐसें वदोनि, युद्धीं, देउनि रिपुला गदा, उभा राहे. ११७
बं[2] ळशिक्षाधैर्यांहीं दोघे हि समर्थ, बहु भलें युद्ध
सत्तावीस दिवस ते करिती. रात्रौ जसे सखे शुद्ध. ११८
ते ज बहु मगधपतिचें; भीम गडबडे; स्वशक्ति केशव दे;
दावी पत्र चिरूनि; प्रभु रणसमयीं मुखें न लेश वदे. ११९
बा[3] र्हद्रथ नृप भीमें चिरिला, सांधा चि उखळिला, शकलें
केलीं भिन्नें, होतें शकलयुग जराकरें[4] चि तें डकलें. १२०
सु हृदुत्तम हरि भेटे भीमाला; मगधपतिपुरा शोक.
तत्सुत सहदेव पदीं स्थापुनि, भगवान् करी सुखी लोक. १२१
दे वक्यात्मज मग त्या राज्यांतें मुक्त करुनि, देशाला
जाया, पूजुनि दे, तो दासांचा कल्पतरु, निदेशाला[5]. १२२
वा डववेप धरूनि, प्रबळारिपुक्षय करूनि, धर्मातें
भीमार्जुनहरि वंदुनि देती, सांगोनि वृत्त, शर्मातें. १२३
य जनोचितकाळीं मग निजकुळगुरुचरण मस्तकीं धरिले,
ऋत्विज वसिष्ठविश्वामित्रव्यासादि पांडवें वरिले. १२४
न यधर्मज्ञ ब्राह्मण, धृतराष्ट्र द्रोण भीष्म विदुर कृप,
आले सकुटुंब, सकळ वर्ण, सकळ आप्त इष्ट मित्र नृप. १२५
मो दें हरि[6]दासाच्या यज्ञाला सुर विधिप्रमुख आले.
तो यजनोत्सव पाहुनि सर्व शतमखादि लोकपति धाले. १२६
भ[7] वभंजनासि सोमाभिषवदिनीं[8] धर्म सन्मतें अर्ची[9].

---

१. सुभद्रापति. २. बल, शिक्षण व धैर्य यानीं. ३. बृहद्रथाचा पुत्र–जरासंध. ४. जरानामक राक्षसिणीच्या हातानें. ५. आज्ञेला. ६. कृष्णसेवकाच्या (धर्माच्या). ७. संसारनाशकाला (कृष्णाला). ८. सोमवल्ली कुटण्याच्या दिवशीं. ९. पूजी.

कृष्णाग्रार्चन[1] झालें शिशुपाळा, जेंवि कापुरा अर्ची[2]. १२७
ग तबुद्धि, शापदग्ध, द्वेष्टा, शिशुपाळ मोहवैद्यातें[3]
निंदी सभेंत; तेव्हां म्हणती 'धिक्!' सर्व सभ्य चैद्यातें. १२८
घ ध त्याचा चक्रानें तत्काळ करी मुकुंद, पापातें
नाशी, तद्देहोत्थित तेज प्राशी, हरूनि शापातें. १२९
ते जयविजय द्वारप[4] विधिनंदनशप्त[5], एक उद्धरिला
तिसरे जन्मीं; आहे उद्धरणें दंतवक्त्र ही हरिला. १३०
वा रिदसा धर्मात्मा धर्म करी रत्नदक्षिणावृष्टी.
गौरविले सर्व जन प्रेमें. सर्वत्र सारखी दृष्टी. १३१
सु ख फार पावले जन, धनमानें पूजिले, दिली आज्ञा.
जातां आलें अश्रु व्यासा विदुरा नदीसुता[6] प्राज्ञा. १३२
दे खोनि यज्ञ झाले पात्र सुखा, सोयरे सखे दास;
पावे, एक सुयोधन मात्र कुमतिचा निवास, खेदास. १३३
वाँ डवपदावनेजन[7] अंगीकारी मखीं स्वयें विष्णु.
सहदेव पूज्यपूजा; गुरुशुश्रूषा करी तदा जिष्णु. १३४
य जमानाची पत्नी[8] वाढी, दे कर्ण याचकां दानें,
विदुरविकर्णादि कृती समयोचित साधिती प्रमोदानें. १३५
न कुळ हि होता त्या त्या द्रव्याच्या साधनीं तदा दक्ष;
वित्ताध्यक्ष[9] सुयोधन, मारुति तेथें महानसाध्यक्ष[10]. १३६
'मो क्षद तीर्थपद प्रभु जो सुरपंक्तीमधें सुधा वाढी,'
कवि म्हणति, 'तो चतुर्भुज विप्रोच्छिष्टें हि त्या मखीं काढी.' १३७

---

१. कृष्णाची अग्रपूजा. २. ज्वाला. ३. अज्ञाननाशक कृष्णाला. ४. द्वारपाळ. ५. ब्रह्मदेवाचे पुत्र जे सनकादिक त्यानीं शापिलेले. [सनकादिक विष्णुदर्शनास आले असतां जयविजयानीं त्यांची अमर्यादा केली; त्यामुळें तीन जन्मीं असुर होण्याचा त्याना शाप झाला. हिरण्याक्ष, हिरण्यकशिपु; रावण, कुंभकर्ण आणि शिशुपाल दंतवक्त्र, हे ते तीन जन्म होत]. ६. भीष्माला. ७. ब्राह्मणाच्या पायांचें प्रक्षालन. ८. द्रौपदी. ९. धनाधिपति, खजीनदार. १०. स्वैंपाकघरांतील मुख्य.

भ[1] मांचे, रत्नांचे राशि मिरविती सुमेरुशोभा, जे,
पाहुनि दुर्योधन खळ, रवितेजें घूकसा चि, तो भाजे. ९३८
ग मनीं, एका समयीं, स्थळ तें मयकृतसभेंत जळ मानी;
जें जळ तें स्थळ भावी, त्यांत पडे धार्तराष्ट्र खळ मानी. ९३९
व सला होता राजा, नृपजन, हरिच्या स्त्रिया हि त्या मागें
भीमादि सर्व हांसति; त्या अपमानें हि तो जळे रागें. ९४०
ते थुनि तसा चि मागें, रागें न विचारितां, पुरा गेला.
प्रभुनें श्रमवुनि दुर्जन, भूभरहरणा निमित्त तो केला. ९४१
वा रिजनाभें हरिली वै[2]दर्भी, शा[3]ल्व तैं परिभवातें
पावे, यदुकुललयपण करि; आराधी तयावरि भवातें. ९४२
सु खसेव्या देवातें आराधी, धूळिमुष्टि भक्षूनि.
जन्हि आ[4]शुतोष, भेटे वर्षांतीं, न[5]ष्टकष्ट लक्षूनीं. ९४३
दे प्रभु त्यासि त[6]दीप्सित वर. का[7]मगयान मयकरें करवी.
येतां लोहपुर करा, शाल्व म्हणे, ‘सिद्धि साधिली बरवी.’ ९४४
वा होनि सैन्य त्यावरि गगनपथें द्वारकेसि तो पापी,
तनुसि महारोग जसा, शाल्व स्वबळेंकरूनियां व्यापी. ९४५
य दुवीर प्रद्युम्न स्वपुरीला अभय दे; स्वबळ सिद्ध
करुनि शिरे रिपुकटकीं, जैसा गहनांतरीं दहन [8]इद्ध. ९४६
न[9] वषड्द्वादशसंख्याहोरात्रें तुमुल युद्ध का[10]मानें
केलें; सात्यकिनें ही, सांबानें ही सुकीर्तिकामानें. ९४७
मो हाया शाल्व करी ज्या ज्या माया, तयांसि तत्काळ
प्रद्युम्न म[11]हामाय ध्वंसी, मायाबळें चि तत्काळ. ९४८
भ ग्न प्रद्युम्नातें शाल्वामात्य द्युमान् करी; मागें

---

१. सोन्याचे. २. रुक्मिणी. ३. हा शिशुपालाचा मित्र. ४. लवकर प्रसन्न होणारा. ५. नष्ट झाले आहेत कष्ट ज्याचे असा. ६. त्यानें इच्छिलेला. ७. मानसिक प्रेरणेनें जाणारें विमान, वाहन. ८. प्रज्वलित. ९. सत्तावीस दिवस. १०. प्रद्युम्नानें. ११. मोठें आहे कपट ज्याचें.

दारुकसुत[1] ने म्हणवुनि मूर्छा जातां चि तो म्हणे रागें:– ९४९
'ग हिंत[2] अपयान; कसें मुख दावूं रामकृष्णतातांतें?
राहेल कसें त्यांचें, जें पहिलें प्रेम, सांग, आतां, तें? ९५०
व दनें झांकुनि पदरें, हांसत पुसतील, त्यां स्वभावजयां
सांगों काय रणकथा, श्रुत होइल कातर[3]स्वभाव जयां? ९५१
ते थें ने रथ आतां, हूं! हाकीं हय, पराक्रमा त्यातें
दावूं,' म्हणतां सारथि तें चि करी; मग वधी अमात्यातें. ९५२
वा रिधिमध्यें सांबप्रमुखांहीं शाल्वसैनिक क्रूर,
तोडुनि शिरें, बुडविलें; बहुतेक क्षीण जाहले शूर. ९५३
सु चलें, घोर निमित्तें पाहोनि, अरिष्ट; यास्तव त्वरित
प्रभु धर्माज्ञा घेउनि आला, चिंता मनीं पथीं करित. ९५४
दे खोनि वीर[5]कदन, प्रद्युम्नादि स्वकीय जे त्यांतें,
स्वमुखें 'साधु!' म्हणे प्रभु, बाहुबळें प्रबळशत्रुजेत्यांतें. ९५५
वा यु घनावरि तैसा, मग अरिवरि हरि उठे, तदा शक्ती
दारुकवधार्थ सोडी; तोडी प्रभु; येथ किति तिची शक्ती? ९५६
[6]य तमान शाल्व इषुनीं भेदुनि, हरिच्या हरी भुजबळाला.
मुनि म्हणति, 'प्रभुहस्तांतूनि तदा शार्ङ्ग[7]चाप हि गळाला.' ९५७
न ष्टायु खळ म्हणे, 'रे मित्र[8]स्त्रीरत्नतस्करा! मरणीं
चैद्याच्या असतों, तरि होतों तुज रावणासि राम रणीं.' ९५८
मो र भुजंगासि तसा, शाल्वासि प्रभु म्हणे, "उगा मंदा!
म्हण 'शिव! राम!' तुजप्रति अंतक आला, जसा किरी[9] कंदीं[10]." ९५९
भ ग्न करि हरि गदेनें, बोलोनि असें, कुबुद्धिचें जत्रु[11].

---

१. कृष्णसारथी दारुक त्याचा पुत्र. २. मागें फिरणें. ३. भित्रा स्वभाव. ४. ५. (शत्रूकडील) वीरांची कापाकाप. ६ यत्न करणारा. ७. कृष्णाच्या हातांतील धनुष्य शृंगाचें (शिंगाचें) असल्यामुळें 'त्याला शार्ङ्ग' असें म्हणतात. ८. मित्राचें (शिशुपालाचें) स्त्रीरत्न (रुक्मिणी) चोरणाऱ्या. ९. वराह. १०. कांद्याला. ११. मस्तक आणि बाहु यांचा संधि.

भ्रमला, वमला रक्त; प्रभुचा, पावेल जय कसा, शत्रु? ९६०
ग प्प क्षणांत झाला सौभासह[1] शाल्व, मग करी माया.
ये दूत देवकीचा, नमुनि म्हणे यादवांचिया रायाः– ९६१
'व सुदेव खळें नेला बांधोनि, जसा चि पशु कंसापापें[2],
गमला त्वत्तात तसा. केला माझा न वध कसा पापें?' ९६२
ते ज मुखींचें उतरे श्रवणीं च; प्रभु म्हणे, 'बळसहाय
असतां, ढळला वंशप्रासादाचा कसा कळस? हाय!' ९६३
वा हे चिंता प्रभु तों, बांधुनि शौरीसि त्यापुढें आणी
शाल्व महामायावी, भगवंताप्रति असी वदे वाणीः– ९६४
'सु त ज्याचा तूं, मंदा! तो हा, कीं नंदगोप? वद नातें.
हे भेटि सेवटींची; नमुनि पहा रे! स्वतातवदनातें.' ९६५
दे खे प्रभु तों शाल्व स्वकृपाणें[3] शौरिचें शिर च्छेदी.
दे दीनबंधुला पितृशोक क्षण; होय ईश ही खेदी. ९६६
वा रिजसें खंडुनि शिर, हस्तें उडवीत जाय गगनीं च.
बैसोनि सौभयानीं, प्रभुवरि करि शस्त्रवृष्टि मग नीच. ९६७
य मदंडोग्रशरांहीं रिपुकवचधनुःशिरोमणि[4] पळांत
खंडूनि, विभु गदेनें यान हि पाडी, पयोनिधिजळांत. ९६८
न गणूनि सौभभंग[5] क्षितिवरि उतरे; तदा गदापाणी
भल्लें[6] शाल्वाचा भुज, चक्रें कंठ, त्रिलोकपति हाणी. ९६९
मो टा उत्सव झाला सर्वां देवांत, यादवांत, तदा.
तों दंतवक्र आला प्रभुवरि, हस्तीं धरूनि उग्र गदा. ९७०
भ क्त चि हा हि, ब्रह्मात्मजशप्त[7], प्रभु पथीं उभा राहे.
उतरे रथावरूनि हरि, एक तयाचा प्रहार ही साहे. ९७१
ग[8] दिवर परमेश्वर मग त्यासि गदेनें उरस्थळीं ताडी,

---

१. विमानासह. २. कसायापाशीं. ३. आपल्या तरवारीनें. ४. शत्रूचें कवच, धनुष्य आणि मस्तकावरील (मुकुट) मणि. ५. विमानाचें मोडणें. ६. भाल्यानें. ७. ९३० गीति पहा. ८. गदा धारण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ.

गिरिशिखराप्रति वज्रें शक्र, तसें त्यासि भूतळीं पाडी. ९७२
व क्त्रीं प्रभुच्या शिरलें त्याचें ही तेज, वारिला शाप.
तद्बंधु विदूरथ ही प्रभुनें केला वधूनि निष्पाप. ९७३
ते रा वर्षें केला वनवासाज्ञातवास; परि खोटा
दुर्योधन राज्य न दे. कुरुपांडवकलह वाढला मोटा. ९७४
वा र्ता दुराग्रहाची श्रुत होतां, राम तीर्थयात्रेला
गेला, जसा न देतां वैद्य क्षीणायुला सुमात्रेला. ९७५
सु[1] हृदत्यय न पहावा म्हणुनि, प्रभु तीर्थसेवें[2]नच्छद्में
प्रथम प्रभास पावन करि, त्यातें दाखवूनि पदपद्में. ९७६
दे यश सरस्वतीला गंगायमुनादिकांसि ही राम;
पुरवी, नैमिषवासिब्रह्मसभेच्या हि दृष्टिचा काम. ९७७
वा डवसभेंत एक चि होता उच्चासनीं, न तो वंदी,
सूत[3] प्रभुला, ज्याचे, तद्गुरुगुरु[4] नारदादि ही, वंदी. ९७८
य तिपतिवंद्यपद म्हणे, 'व्यासानें शिष्य पढविला मोघ[5];
पाषाण आंत शुष्क चि, वाहो वरि देवसिंधुचा ओघ.' ९७९
न मनीं प्रत्युत्थानीं चुकला; कुश[6] हाणितां चि तो मेला.
'हा! हा!' ब्राह्मण म्हणती; म्हणउनि करुणासमुद्र कोमेला. ९८०
मो डित होता केलें कर्म प्रभु; मग तदीय तनयातें,
बोधब्रह्मासन दे ब्राह्मणवचनेंकरूनि, सनयातें[7]. ९८१
भ म न व्हावा स्वकृतश्रुतिसेतु[8], म्हणोनि, जन्हि सदाशुचि, तें
प्रायश्चित्त करी, जें आलें पदरासि मुनिमतें उचितें. ९८२
गं[9] म्य जैं[10]नसंग्रहार्थं चि झाला सुब्राह्मणांचिया दंडीं[11].
सेवा सांगति ऐसी कीं, 'प्रभुजी! इल्वलासुरा दंडा.' ९८३

---

१. मित्राचा नाश. २. तीर्थाश्रयाच्या मिषानें. ३. रोमहर्षण. ४. त्याच्या गुरूचा (व्यासाचा) गुरु (पराशर). ५. व्यर्थ. ६. दर्भ. ७. न्याययुक्ताला. ८. आपण केलेला वेदाचा (वेदाध्ययनाचा) सेतु. ९. पात्र. १०. लोकांला सन्मार्ग दाखविण्यासाठीं. ११. शिक्षेला.

व धिला इल्वल पर्वीं, येतां दूषावयासि सत्रास,
रामें नैमिषवासी हर्षविले, जे सदैव सत्रास. १८४
ते विप्र वैजयंतीमाळा, दिव्यांबरें, वराभरणें,
देवूनि म्हणति, 'रामा! तुज हो ऐसा चि कीर्तिलाभ रणें.' १८५
वा डववृंदानुज्ञा घेउनियां, करुनि तीर्थयात्रा त्या,
येतां पुनः प्रभासीं, भारतरण कथिति मुनि तया त्रात्या. १८६
सु रकार्यसिद्धि जाणे, जाय विनशनासि राम तों शुद्ध,
तेथें करीत होते भीमसुयोधन गदी गदायुद्ध. १८७
दे खोनि त्यासि करिती, धर्मार्जुन कृष्ण यम पदा प्रणती,
'कां हा येथें आला? काय म्हणेल प्रभू?' असें म्हणती. १८८
वा त्सल्यें वारी प्रभु, सांगे प्रिय हित, न ऐकती पर ते.
'होणें तें हो' ऐसें बोलोनि क्षिप्र तेथुनीं परते. १८९
य ज्ञ करी मग जावुनि पुनरपि त्या नैमिषीं सविज्ञान.
जें, तें चि दक्षिणा ते घेती मागोनियां कवि, ज्ञान. १९०
न ग सत्वाचा, हरिचा विप्र सुदामा सखा; तया आर्या
त्याची, 'सख्यासि भेटा,' ऐसें प्रार्थी, महासती भार्या. १९१
'मो टें दारिद्र्य, नसे या जोडा त्रिभुवनांत उग्रास;
प्रभु भेटतां चि देइल या बाळांला सुवस्त्र सुग्रास.' १९२
भ र्ता द्रवला, पोहे मेळविले चार मुष्टि मागोनीं;
बांधोनि वस्त्रखंडीं, भेटीस दिले, पदासि लागोनीं. १९३
गं रुडासननगरींत श्रीच्या गेहांगणीं हि तो पावे.
प्रभु दयितापर्यंक त्यजुनि, सख्यातें विलोकितां धावे. १९४
व क्षःस्थळीं सख्यातें घट्ट धरी, गहिवरे, परिष्वंगें
त्याच्या, निववी प्रभुवर, अहि जैसा चंदनाचिया, अंगें. १९५
ते थुनि नेउनि बसवी पर्यंकीं बंधुला जगन्नाथ;

---

१. पर्वकाळीं. २. कुरुक्षेत्रांतील एका तीर्थाला. ३. नकुलसहदेव. ४. उग्र दिसणाऱ्याला (दारिद्र्याला). ५. वस्त्राच्या भागांत. ६. द्वारकेंत. ७. आलिंगनानें.

चरण प्रक्षाळुनि घे माथां श्रीतीर्थपाद तें पार्थ. ९९६
वा रा[1] घालुनि पूजुनि, कुशळ पुसोनि, श्रम क्षणांत हरी;
काढी स्वगुरुगृहींच्या काष्ठानयनादि[2] सत्कथांसि हरी. ९९७
सु हृदानीतोपायन[3] हुडकुनि घे, आपुल्या करीं सोडी,
सतुष[4] पृथुककण सेवी. जी प्रेमीं माधरीं[5] न ती गोडी. ९९८
दे शिकबंधुप्रति[6] दे कनकपुरी, आपुली तसी च हरी.
जड हि पय[7] पयां[8] निजगुण देतें; प्रभु कां न मित्रदैन्य हरी? ९९९
वा च्य न कारितां चि, पुरी रात्रीमध्यें चि निर्मिली क्षिप्र;
जेवविला स्वाद्वन्नें निजपर्यंकीं च निजविला विप्र. १०००
य दुनाथें मग बंधु प्रातःकाळीं च दूर बोळविला.
स्वमुकुट पुनःपुन्हां त्या सुब्राह्मणपदरजांत लोळविला. १००१
न वल करी, धन न दिलें यास्तव; मग तो मनांत धनदोष[9]
आणोनि ब्राह्मण, त्या प्रभुला वर्णूनि, पावला तोष. १००२
मो हे स्वपुर विलोकुनि, मग 'पुरविति नतविपत्तिचा दुम[10] जे,
हा त्या प्रभुचरणांचा दर्शनमहिमा,' असें मनीं उमजे. १००३
भ वकर्दमपतित सखा विप्र सुदामा असा समुद्धरिला.
धारि लाज विषयसेवन करितां, नक्तंदिव[11] स्मरें हरिला. १००४
ग[12] णकानीं सूचविलें मोटें सूर्योपराग[13] वरें[14] पर्व;
एकत्र कुरुक्षेत्रीं झाले पृथ्वीवरील जन सर्व. १००५
व सुदेव नंद पांडव कौरव सकुटुंब भेटले आप्त;
झालें सर्वांसि सुहृद्वरभगवद्दर्शनामृत प्राप्त. १००६
ते जन ऐकत होते प्रभुगुण दूरूनि जे जसे कानें,
तदधिक पाहुनि झाले शांत, जसे तप्त अमृतसेकानें. १००७

---

१. पाणी. २. लाकडें आणणें आदिकरून. ३. मित्रानें आणलेली भेट. ४. कोंड्यासह असलेले पोह्यांचे कण. ५. लक्ष्मीच्या अधरप्रांतीं. ६. गुरुबंधूला (सुदाम्याला). ७. दूध. ८. पाण्याला. ९. द्रव्य [असण्याचे] दोष. १०. पाठलाग. ११. रात्रंदिवस. १२. ज्योतिष्यानीं. १३. सूर्यग्रहण. १४. श्रेष्ठ.

वा टे बंधुसमागम कैसा कुंतीस, तें निवेदीन;
बहुसंकटांत चुकला निधि[1] सांपडतां जसा निवे दीन. १००८
सु त राम कृष्ण नमिती नंदयशोदापदांसि; दोघांस
दे तृप्ति सुतस्पर्श; स्पर्श क्षुधितांसि त्यांसि तो घांस. १००९
दे मोक्ष जो निजांकीं प्रेमें तो बसविला सदारानें[2]
नंदानें; योगिजनें न तसें, सेवूनि ही सदा रानें. १०१०
वा ळविल्या निजविरहें ज्या गोपी, प्रियसखी, तयांजवळी
एकांतीं करुणाघन जाउनि, त्यांला स्वबाहुनीं कवळी. १०११
य द्यपि रुसल्या होत्या, परि त्यांचा ताप नंदसुत नुरवी,
नलिनींचा खेद जसा तेजस्वी प्रेक्षणीय सुतनु रवी. १०१२
न लिनाक्षा देवाच्या वैदर्भीप्रमुख सर्व भार्यांतें
द्रुपदात्मजा म्हणे, 'मज सांगा स्वविवाहवृत्त', आर्यांतें. १०१३
मो टा आदर तीचा जाणुनि, त्या रुक्मिणीप्रमुख सर्वा
स्वविवाहकथा कथिती, ज्या स्वरसें नुरविती सुधागर्वा. १०१४
भ वभंजनासि पाहों तेथें द्वैपायनादि[3] मुनि आले,
ब्रह्मण्यदेवदर्शनसूनृतवागमृतसेवनें[4] धाले. १०१५
गं[5] मनोन्मुखां मुनींतें वंदुनि, वसुदेव, व्हावया मुक्ती,
कर्में कर्मांचा क्षय होय, असी विनउनी पुसे युक्ती. १०१६
व सुदेवाच्या प्रश्नें मुनि करिति स्मित; म्हणे सुरर्षि तदा,
'तीर्थांतरा भजे जन शुद्ध्यर्थी, ज्या प्रयागवास सदा.' १०१७
ते मुनि म्हणति, 'ऋणत्रय, शौरे! त्वां वारिलें नयज्ञानें.
हो मुक्त तिजें वारुनि, देवांचें वारिलें न यज्ञानें.' १०१८
वा हुनि मुनिचरण शिरीं, त्यांस चि वसुदेव तो, सहायज्ञ
ऋत्विज करूनि, विधिनें सिद्धिप्रति नेववी महायज्ञ. १०१९
सु हृदां विदर्भकोसलकुरुसृंजयकाशिमद्रकैकेयां

१. सांडलेला ठेवा. २. स्त्रीसहितानें. ३. व्यास आदिकरून. ४. कृष्णदेवदर्शन व सत्यभाषणरूप अमृत यांच्या सेवनानें. ५. जाण्याविषयीं उद्युक्त अशा.

शौरी असकृत् पूजी; 'यांमोलं' म्हणति जे न ऐके यां. १०२०
दे मग निरोप भीष्मकभीष्ममुखां, परि न शौरि त्या नंदा.
'आज, उद्यां' म्हणउनि घे ठेउनि सा पक्ष, मानसानंदा. १०२१
वा टे अवघड फार चि देतां, घेतां निरोप मग त्यांतें,
अन्योन्यदर्शनामृतपानें निववूनि ताप जगत्यांतें. १०२२
यं दुपरिवृढ दृढ कंठीं घालोनि मिठी उदंड गहिवरले,
तैं चित्रगुप्तकविच्या, धुतले व्रजकर्मलेख, वहिवरले. १०२३
न गरीप्रति गेल्यावरि एका समयीं स्मरोनि मुनिवाणी
नमनागतपुत्रांतें विनवी, जोडोनि शूरसुत पाणी. १०२४
"मो हें 'पुत्र' तुम्हांला म्हणतों मीं; परि तुम्हीं जगद्धेतु;
ईश्वर हो! मज तारा, व्हा या संसारसागरीं सेतु." १०२५
भ वतिमिराचा रवि, कविनुत सुत, दे ज्ञान त्या स्वबापातें,
ब्रह्मेंदीवरदामीं जें नुरवी क्षण हि विश्वसापातें. १०२६
ग दिचक्रिनायकांतें देवांतें देवकी म्हणे, 'गुरुतें
ईश्वर हो! मृतपुत्रानयनें सुख अर्पिलें जसें गुरु तें, १०२७
व धिले मत्सुत कंसें मज हि तसे भेटवूनि, यश जोडा.
अरिला मोक्ष हि देतां; तेथें हा अर्थ केवळ चि थोडा'. १०२८
ते प्रभु, 'अवश्य आज्ञा,' ऐसें बोलोनि, सेवका बळिला
सुँतळीं दाखविति पदें, जैसी कमळें तृषाकुळा अळिला. १०२९
वां णीभोगोद्युक्तें विधिनें ज्यां हांसतां दिला शाप,
देव मरीचिसुत असुर झाले, भोगावयासि तें पाप. १०३०
सु त हेमकशिपुचे ते देवक्युदरांत योगमायेनें
नेले; कंसहतां त्यां शोची प्रभुची हि माय मायेनें. १०३१

---

१. वारंवार. २. यामः अलं=जातों आतां, पुरे. ३. यादवांचे प्रभु (वसुदेव व नंद). ४. गोकुळांत केलेल्या कर्मांचे लेख. ५. कवींनीं स्तुत. ६. ब्रह्मरूपी कमल-मालेवर. ७. या नांवाच्या अधोलोकीं. ८. सरस्वतीच्या समागमाविषयीं उद्युक्त झालेल्या.

दे बळि त्यांतें प्रभुच्या हस्तीं, ऐकोनि असि कथा हो! ते
वैरोचनिनिकट[1] चि, हरिकथित निजकथेसि ऐकत चि होते. १०३२
वा राया मातेचा ताप, तयांचा हि शाप, बाळक सा
मातेला भेटविले. न पुरवितां काम दीनपाळ कसा? १०३३
य लें भेटाविले सुत पाहुनियां, माय बहु सुखी झाली.
भेटुनि, चुंबुनि, पाजुनि, हुंगुनि माथां, सुखाश्रुनीं न्हाली. १०३४
न मुनि तिला, शौरीला, त्यांच्या नाशूनि पुत्रशोकातें,
भगवत्स्पर्शहताशुभ[2] ते गेले देव देवलोकातें. १०३५
मो ह न लेश हि उरला देवककन्येसि, सत्य हरि कळला.
भाव जयाचा जैसा, त्यासि तसा कल्पवृक्ष हा फळला. १०३६
भ गिनी एक सुभद्रा, राम चि 'दुर्योधना' म्हणे 'द्यावी';
विजयासि[3] ती प्रभार्सी झाली, तीर्थासि हिंडतां, ठावी. १०३७
ग ति बरवी तैसी ती साधायाकारणें, महासुकृती
होय विजय त्रिदंडीयतिपति तदधरसुधापिपासु[4] कृती. १०३८
व ध्वर्थी तो चातुर्मास्य श्रीद्वारकेंत जिष्णु वसे.
एका श्रीहरिवांचुनि इतरां तो मंत्र विदित लेश नसे. १०३९
ते थें वसतां पूजिति पौर सदा; बळ हि एकदा, 'स्वामी!
पावन करा,' म्हणे, ने विनऊनि भिक्षेसि आपुल्या धामीं. १०४०
वीं[6] सवि भोजनसमयीं पाहे बसतां तिला बळाजवळ;
विसरे वदनीं घ्याया, वदनींचा ही गिळावया, कवळ. १०४१
सु कुमारी ती हि तया, पाहे नारी, मनोरमा यतिला,
अस्वस्थ होय; तेव्हां लावावि, लावी, विभूति माय तिला. १०४२
दे खे समय, बळातें वंचुनि, चोरावयासि नवरी ती.
हृच्चोर तिचे बंधु हि, होय तसा हा हि; ती न नव रीती. १०४३

---

१. [ प्रल्हादाचा पुत्र विरोचन त्याचा जो ] वैरोचिनी त्याच्याजवळ. २. भगवंताच्या स्पर्शानें नष्ट झालें आहे पाप ज्याचें ते. ३. अर्जुनाला. ४. तिचें ( सुभद्रेचें ) अधरामृतपान इच्छिणारा. ५. स्त्रीच्छु. ६. अर्जुन. ७. अंगारा.

वा होरि, देवयात्राकुतुकें[1] जन एकदा, निघे सर्व;
त्यांत सुभद्रा हि रथीं बैसोनि निघे; तसें चि तें पर्व. १०४४
य तिवेष पार्थ मातुळ कृष्णानुमतें तिला तशांत हरी.
रक्षकभटांत भासे तेव्हां प्रभु तो, जसा शशांत हरी. १०४५
नें[2] रकृतभगिनीहरणश्रवणें बळभद्र धरुनि कोपा, ‘हूं!
मुसळ! मुसळ! मुसळ!’ म्हणे ‘राहो रथ, चाप; कुमति तो पाहूं’. १०४६
मो टा क्षोभ प्रभुचा, पर्वीं जैसा चि होय जळधीचा.
श्रीकृष्णें पाय धरुनि, केला प्रकट प्रसाद[3] बळधीचा. १०४७
भ त्यांतें भगिनीच्या, बळभद्रें तत्क्षण द्रवच्चित्तें[4]
पाठविलीं बहु दासी, दास, रथेभाश्वगोधनें[5], वित्तें. १०४८
ग तसंगदोप विप्र श्रुतदेव निरिच्छ, कवि, सदा शांत,
मिथिलेंत वसे; राजा बहुलाश्व हि; त्यां स्मरे रमाकांत. १०४९
व त्सलगुरु हरि त्यांतें भेटाया, नारदादिमुनिसहित
गेला स्वयें चि, ज्याची पदपंकजधूळि ही भुवनमहित[6]. १०५०
ते साधु धांवले निजनाथागमवृत्तशीतकर्ण[7] कसे?
मातांप्रति चिरबंधनमुक्त[8] क्षुद्विकळचित्त[9] तर्णकसे. १०५१
वा टेंत एकदा चि प्रभुला दोघे हि नमुनियां भावें
म्हणति, ‘प्रभुजी! या निजपदकिंकरकिंकरालया यावें’. १०५२
सु खवाया दोघांतें, समुनि प्रभु एकदा चि दोघांच्या
गेला गृहांत, सभगण[10] चंद्र जसा अंतरांत ओघांच्या. १०५३
दे तो जनितीं[11] दोघां दायादां दोन आत्मधनभाग;
हा, या भक्तां, न तसे, पूर्ण चि दोघां हि दे महाभाग. १०५४

१. देवयात्रेच्या हौसेनें. २. नर=अर्जुन. ३. बलरामाच्या बुद्धीची प्रसन्नता. ४. द्रवलें आहे मन ज्याचें अशा. ५. रथ, हत्ती, घोडे व गुरें. ६. पृथ्वीला पूज्य. ७. स्वतःच्या नाथाच्या ( भगवानाच्या ) आगमनाच्या बातमीनें थंड झाले आहेत कान ज्यांचे. ८. पुष्कळ काळाच्या बंधनांतून सुटलेले. ९. भकेनें चित्त व्याकुळ झालेल्या वांसरासारखे. १०. नक्षत्रसमुदायासह. ११. बाप.

वा टे सन्मुनिसहित प्रभु आला आपुल्या चि गेहातें;
त्या परमानंदें ते दोघे ही विसरले स्वदेहातें. १०५५

य क्षेश्वर सधन, अधन उपमन्यु, परंतु वामदेवास
सम चि; तसे हे भक्त हि या एक प्रेमकाम देवास. १०५६

न रनाथें मणिकांचनभूषारुचिरांबरादिकीं देवा
मुनिसह पूजुनि केली, सर्व निवेदन करूनियां, सेवा. १०५७

मो र घनातें गगनीं, श्रुतदेव तसा रमेश्वरा गेहीं
पाहुनि, नाचे उडउनि वस्त्र; स्मृति तैं तया नसे देहीं. १०५८

भ क्त बहु प्रेमळ तो दारुतृणकुशासनें[1] तयां स्थापी.
चरणोदक सकुटुंब स्वशिरीं घे, वाढवूनि आस्था, पी. १०५९

ग द्यें पद्यें करुनि स्तुति, तुळसीमृदुलमंजरीमाळा
घालुनि, चंदन लाउनि, ओवाळुनि, ठेउनी पदीं भाळा, १०६०

वे[2] न शीत सुगंध, मधुर फळमूळ यैथोपपन्न[3] तें भक्तें
अर्पूनि, तर्पिला मुनिसह विभु सूपें[4] घृतांचितें भक्तें[5]. १०६१

ते मुनि, तो प्रभु, झाले तृप्त श्रुतदेवभक्तिनें चि तदा;
सापत्यस्वजन चुरी तो द्विज सप्रेम दीनबंधुपदा. १०६२

वा चेतें सफळ करी, वर्णी प्रभुचा प्रसाद, नमुनीं; तें
जाणे प्रभु, कीं, मज बहु आदरितो जेंवि, तेंवि न मुनींतें. १०६३

सु[6] ज्ञप्रियकथ हरि त्या ऐसा, जैनसंग्रहार्थ[7], बोध करीः–
'श्रुतदेवा ! हे मुनि तुज झाले संसारसागरांत तरी. १०६४

दे वक्षेत्रें तीर्थें यांहूनि उंणी[8] च, मजहुनीं मजला
हे मान्य; जो भजे यां, तो चि ज्ञाता भला मला भजला'. १०६५

वा त्सल्यें त्यां दोघां सांगुनि सन्मार्ग, ताप वारूनीं,

---

१. काष्ठें, गवत व दर्भ यांचीं आसनें. २. उदक. ३. यथाप्राप्त. ४. वरणानें. ५. घृतमिश्रित भातानें. ६. सुज्ञांला प्रिय आहेत कथा ज्याच्या. ७. मागें ९८३ गीति पहा. ८. उणीं.

गेला [1]कुशस्थळीला, येतां जातां असंख्य तारूनीं. १०६६
य न्मज्जन ताप हरी, वेदस्तुति यापुढें चि, ती गंगा,
भक्त भगीरथ पावे, भागवतशिवाश्रयें जिच्या संगा. १०६७
न लधर्मादिसुपुण्यश्लोकांचा मुकुटमणि [2]गिरित्रातें
व्यसनीं रक्षी, गावें आतां त्या विष्णुच्या चरित्रातें. १०६८
मो क्षोपदेशकुशळा सुरर्षिला, एक असुर वृकनामा,
'कोण' म्हणे 'देवांत क्षिप्र पुरवितो स्वभक्तजनकामा?' १०६९
'भ व एक [3]आशुतोष प्रख्यात, जगत्रयीं तसा न दुजा;'
नारद म्हणे, 'वृका! त्या भज; तो पुरवील शीघ्र काम तुजा. १०७०
गा जैति नामें, करिति स्तुति, रावण बाण ते, जसे [4]वंदी.
प्रभु ऐश्वर्य अतुळ दे त्यांतें, ज्यांतें जगत्रय हि वंदी.' १०७१
व चन असें ऐकुनि, तो वृक [5]केदारीं स्वमांसहोमातें
सा दिन करी; म्हणे खळ, 'सत्वर शंभो! प्रसन्न हो मातें.' १०७२
ते णें सप्तम दिवसीं शस्त्र उचलितां शिरासि कापाया,
प्रकटोनि अग्निकुंडीं प्रभु वारी कर धरूनि पापा या. १०७३
वा राया कर धरितां, प्रभुपाणि स्पर्शतां चि, तो पाहिला
नव्हता तैसा झाला; तें अमृत चि त्या व्रणाकुळा अहिला. १०७४
सु रमणि म्हणे, 'अगा! प्रिय आम्हांला कर्म काय हें होय?
अर्पावें मज माजें नाम चि, कीं पत्र पुष्प फळ तोय.' १०७५
'दे तों, माग,' म्हणे प्रभु; त्यासि म्हणे वृक, 'अभीष्ट वर दे हा,
ठेवीन शिरीं ज्याच्या, त्या भस्म करो, मदीय कर, देहा.' १०७६
वा क्यें त्या दुष्टाच्या झालें मन खिन्न, परि जगन्महितें
दिधला वर वरदेशें [6]शितिकंठें, अमृतरस जसा अहितें. १०७७
य त्न सफळ होतां, वृक गौरीचें हरण मानसीं आणी,
स्ववरपरीक्षार्थ शिरीं ठेऊं पाहे स्मरारिच्या पाणी. १०७८

---

१. द्वारकेला. २. शंकराला. ३. मागें ९४३ गीति पहा. ४. वंदी, स्तुतिपाठक. ५. केदारक्षेत्रीं. ६. नीलकंठानें—शंकरानें.

न　ष्ट कृतघ्न, प्रभुच्या पाठीला लागला चि, सोडीना.
जो सुरतरुनें दिधला, तो काय कुठार त्यासि तोडीना? १०७९
मो　टें संकट पडलें, दिक्पाळ भ्रांत जाहले सर्व.
भूम्याकाशदिगंतीं धांवें[1] स्ववराचिया भयें शर्व. १०८०
भ　यरहितशुभश्वेतद्वीपाप्रति जाय, मग तयीं अजि! तें
धरिलें पटु बटुरूप[2] प्रभुनें, जैसें बळिच्छळीं, अजितें. १०८१
गं[3]　जपशुच्या व्यसनीं प्रभु धांवे, मग सर्वपशुपतिव्यसनीं[4]
कां धावेना? हा तों योगाच्या नित्य निरत अभ्यसनीं. १०८२
वं[5]　र्त्मामध्यें भेटे, वंदुनि, योगींद्रवंद्यपद त्यातें
वृत्त पुसे; तों तो ही सांगे बटुतें मनोज्ञवदत्यातें[6]. १०८३
ते　व्हां हांसोनि म्हणे, 'ऐका हो शाकुनेय[7]! बापा! तें
वरदान दिलें, त्याच्या नायकिलें काय दक्षशापातें[8]? १०८४
वा　यां श्रमलां, श्रमलां; स्पष्ट महाभूत तो पिशाचपती;
व्यवहारीं जरि सावध असता, कां यासि बहु उमा जपती? १०८५
सु　ज्ञ तुम्हीं; बाळक मीं; मानाल कसें खरें? बरें; हात
स्वशिरीं च पहा ठेउनि; योग्य तया आत्मवंचका घात.' १०८६
दे　उनि दर्शन हरिनें हरिलें वृकचित्त, मोहिला पापी;
प्रभुवर लटिका भावी, स्वशिरीं स्वकरासि कौतुकें स्थापी. १०८७
वा　सववज्र नगावरि, पडला खळपाणि खळशिरीं; भुलला.
हस्तस्पर्शें मूर्धा त्या पाप्याचा सहस्रधा उलला. १०८८
य　मदंड कृतघ्नशिरीं तत्कर चि करूनि, दे हरा हर्ष.
हरि करि यशोमृताचें, कुसुमांचें करिति सुर जसें, वर्ष[9]. १०८९
न　द्युत्तमा जगीं जी विख्यात सरस्वती, तिच्या [10]रोधीं

---

१. धांवे (?). २. लहान मुलाचें स्वरूप. ३. गजनामक पशूच्या (गजेंद्राच्या). ४. सर्व पशूंचा स्वामी जो शिव त्याच्या संकटांत. ५. रस्त्यामध्यें. ६. मन हरण करणारें भाषण करणाऱ्याला. ७. भस्मासुर—पंत. ८. ज्यानें तो शिव पिशाचांचा राजा झाला आहे त्या दक्षशापातें. ९. वर्षाव. १०. तीरीं.

सत्र करिति मुनि, ठेउनि दृष्टि सदा आत्मवस्तुच्या[1] शोधीं. १०९०
'मो मा[2]सावित्रीपति देव तिघे श्रेष्ठ, यांत ही श्रेष्ठ
कोण?' असा तर्क उठे सत्रीं, जो सर्वसज्जनप्रेष्ठ[3]. १०९१
भ[4] ट्टानीं पाठविला सुपरीक्षक भृगु परीक्षणाकारितां;
कीं, 'जगदिष्टार्थ गुरुच्छळ हि करावा, करूं नये तरी तां[5].' १०९२
ग गनपथें प्रथम भृगु ब्रह्मसभेला चि जाय तो नीट;
न नमी स्तवी पित्यातें, सत्व पहाया न भी महाधीट. १०९३
व ह्निप्रतिम क्रोध ब्रह्याच्या पेटला मनीं, मग तो
विधिनें स्वयें शमविला; पुत्रस्नेहापुढें न तो तगतो. १०९४
ते थुनि भृगु कैलासीं गेला; तों शंभु, बंधुभावातें
धरुनि मनीं, भेटाया उठला प्रेमेंकरूनि भावातें. १०९५
बा हूंतें पसरूनि प्रभु भेटाया समीप जों आला,
न शिवालिंगन इच्छी; 'उत्पथगा[6] नातिळें,' म्हणे त्याला. १०९६
सुं[7] कृतिस्तुतपद भगवान् कोपे, घे शूळ त्यासि माराया,
तों जगदंबा पतिचे पाय धरी, देवरासि[8] ताराया. १०९७
दे वीनें सोडविला भृगु वैकुंठीं करी महासत्ता,
हाणी, श्रीच्या अंकीं निजल्या श्रीजानिच्या उरीं, लत्ता. १०९८
बा ळकपादाघातें माय जसी, ती तसी कृपामूर्ती
जागी होय, कराया त्या भृगुची सर्वकामनापूर्ती. १०९९
य द्यपि महापराधी भृगु, तदपि तयासि पाहतां चि, 'नवी
घडली चुकी' प्रभु म्हणे, त्यजुनि शयन, पाद धरुनियां विनवी. ११००
न मुनि, हळू चि भृगुपदें स्वकरें श्रीकर चुरी, म्हणे, 'देवा!
निजलों, चुकलों प्रत्युत्थानप्रत्युद्गमादिका[9] सेवा. ११०१

---

१. परमात्मरूपाच्या. २. मा+उमा+सावित्री+पति=लक्ष्मी, पार्वती व सावित्री यांचे पति. ३. सर्व साधूंचा प्रियतम. ४. पंडित लोकानीं. ५. त्वां (भृगूनें). ६. आडमार्गानें जाणाऱ्याला मी शिवत नाहीं. ७. सज्जनानीं स्तविले आहेत पाय ज्याचे. ८. दिराला (भृगूला). ९. कोणी आलें असतां उठून सामोरें जाणें इत्यादिक रीति आहेत जींत अशी.

मो टा हा अपराध, स्वामी! नमितों, क्षमा करा; पाय
मृदु, उर कठिन; दुखवले हाय! कसें तरि चुकूं? करूं काय? ११०२
भ व्यपदस्पर्शें उर हें केलें शुचि; तसें चि पायांच्या
तीर्थें वपु हि शुचि असो; माझी यावी मनीं कृपा यांच्या. ११०३
ग भीं, लोक सलोकप, माझ्या आहेत, त्यां मला शुचिता
द्या, तीर्थांच्या तीर्थें चरणजळें; हे दया तुम्हां उचिता. ११०४
व क्षःस्थळीं वसेल श्रीपावन, लाविलें तुम्हीं पद कीं;
या चिह्नीं हें शोभे; कैंची शोभा असी जडीं पदकीं[1]?' ११०५
ते प्रभुशशिशब्दकर[2] द्रवविति त्या विप्रचंद्रकांतनगा[3].
सत्रीं म्हणे, 'दुज्यातें, सोडुनि महाविभूतिकांत, न गा.' ११०६
वा स्तव तत्व कळाया, इतिहास विचित्र आणिखी एक
श्रवण करावा, गावा; भवदावार्तांसि हा सुधासेक. ११०७
सु त एकदा द्विजाचा, होतां चि द्वारकापुरीं मेला,
राजद्वारीं प्रेत स्थापुनि, आक्रोश भूसुरें केला. ११०८
'दे शपतीच्या पापें हा माझा घात, मीं नव्हें पापी,'
ऐसें[4] बोले, स्वसुतक्षयकारणदोष नृपाशिरीं स्थापी. ११०९
बा ळक तसे चि मेले आठ, नवम पुत्र जेधवां मेला,
तेव्हां तेथें होता अर्जुन, तेणें तदर्थ पण केला. १११०
'य दुपति समीप असतां,' पार्थ म्हणे, 'ब्राह्मणा! उगा; न रडें.
यावरि काळाचें ही कापीन ग्रासितां प्रजा नरडें. ११११
न व न कळतां चि गेले, हे यादव ठावुके चि आहेत.
अनळीं जळेन तरि मीं, जरि न तुझा पूरवीन हा हेत. १११२
मो घ नव्हे पण माझा; अर्जुन मीं राहिलों तुझ्या अवना.'
ऐसें ऐकुनि विप्र स्वस्थमनें जाय आपुल्या भवना. १११३
'भ रले दिवस, प्रसवावसर[5],' असें विप्र अर्जुना सांगे.

---

१. निर्जीव अशा पदकाच्या ठिकाणीं. २. प्रभुरूपी चंद्राचे शब्दरूप किरण. ३. ब्राह्मणरूप चंद्रकांतपर्वताला. ४. एसें. ५. प्रसूतिसमय [आला].

सत्र करिति मुनि, ठेउनि दृष्टि सदा आत्मवस्तुच्या[1] शोधीं. १०९०

'मो मासावित्रीपति[2] देव तिघे श्रेष्ठ, यांत ही श्रेष्ठ
कोण?' असा तर्क उठे सर्वां, जो सर्वसज्जनप्रेष्ठ[3]. १०९१

भ ट्टानीं[4] पाठविला सुपरीक्षक भृगु परीक्षणाकारितां;
कीं, 'जगदिष्टार्थ गुरुच्छळ हि करावा, करूं नये तरी तां[5].' १०९२

ग गनपथें प्रथम भृगु ब्रह्मसभेला चि जाय तो नीट;
न नमी स्तवी पित्यातें, सत्व पहाया न भी महाधीट. १०९३

व ह्निप्रतिम क्रोध ब्रह्याच्या पेटला मनीं, मग तो
विधिनें स्वयें शमविला; पुत्रस्नेहापुढें न तो तगतो. १०९४

ते थुनि भृगु कैलासीं गेला; तों शंभु, बंधुभावातें
धरुनि मनीं, भेटाया उठला प्रेमेंकरूनि भावातें. १०९५

बा हूंतें पसरूनि प्रभु भेटाया समीप जों आला,
न शिवालिंगन इच्छी; 'उत्पथगा[6] नातिळें,' म्हणे त्याला. १०९६

सुं कृतिस्तुतपद[7] भगवान् कोपे, घे शूळ त्यासि माराया,
तों जगदंबा पतिचे पाय धरी, देवरासि[8] ताराया. १०९७

दे वीनें सोडविला भृगु वैकुंठीं करी महासत्ता,
हाणी, श्रीच्या अंकीं निजल्या श्रीजानिच्या उरीं, लत्ता. १०९८

वा ळकपादाघातें माय जसी, ती तसी कृपामूर्ती
जागी होय, कराया त्या भृगुची सर्वकामनापूर्ती. १०९९

य द्यपि महापराधी भृगु, तदपि तयासि पाहतां चि, 'नवी
घडली चुकी' प्रभु म्हणे, त्यजुनि शयन, पाद धरुनियां विनवी. ११००

न मुनि, हळू चि भृगुपदें स्वकरें श्रीकर चुरी, म्हणे, 'देवा!
निजलों, चुकलों प्रत्युत्थानप्रत्युद्गमादिका[9] सेवा. ११०१

---

१. परमात्मरूपाच्या. २. मा+उमा+सावित्री+पति=लक्ष्मी, पार्वती व सावित्री यांचे पति. ३. सर्व साधूंचा प्रियतम. ४. पंडित लोकांनीं. ५. त्वां (भृगूनें). ६. आडमार्गानें जाणाऱ्याला मी शिवत नाहीं. ७. सज्जनांनीं स्तविले आहेत पाय ज्याचे. ८. दिराला (भृगूला). ९. कोणी आलें असतां उठून सामोरें जाणें इत्यादिक रीति आहेत जींत अशी.

मो टा हा अपराध, स्वामी! नमितों, क्षमा करा; पाय
मृदु, उर कठिन; दुखवले हाय! कसें तरि चुकूं? करूं काय? ११०२
भ व्यपदस्पर्शें उर हें केलें शुचि; तसें चि पायांच्या
तीर्थें वपु हि शुचि असो; माझी यावी मनीं कृपा यांच्या. ११०३
ग र्भीं, लोक सलोकप, माझ्या आहेत, त्यां मला शुचिता
द्या, तीर्थांच्या तीर्थें चरणजळें; हे दया तुम्हां उचिता. ११०४
व क्षःस्थळीं वसेल श्रीपावन, लाविलें तुम्हीं पद कीं;
या चिह्नीं हें शोभे; कैंची शोभा असी जडीं पदकीं[1]?' ११०५
ते प्रभुशशिशब्दकर[2] द्रवविति त्या विप्रचंद्रकांतनगा[3].
सत्रीं म्हणे, 'तुज्यातें, सोडूनि महाविभूतिकांत, न गा.' ११०६
वा स्तव तत्व कळाया, इतिहास विचित्र आणिखी एक
श्रवण करावा, गावा; भवदावार्तांसि हा सुधासेक. ११०७
सु त एकदा द्विजाचा, होतां चि द्वारकापुरीं मेला,
राजद्वारीं प्रेत स्थापुनि, आक्रोश भूसुरें केला. ११०८
'दे शपतीच्या पापें हा माझा घात, मीं नव्हें पापी,'
ऐसें[4] बोले, स्वसुतक्षयकारणदोष नृपाशिरीं स्थापी. ११०९
बा ळक तसे चि मेले आठ, नवम पुत्र जेधवां मेला,
तेव्हां तेथें होता अर्जुन, तेणें तदर्थ पण केला. १११०
'य दुपति समीप असतां,' पार्थ म्हणे, 'ब्राह्मणा! उगा; न रडें.
यावरि काळाचें ही कापीन ग्रासितां प्रजा नरडें. ११११
न व न कळतां चि गेले, हे यादव ठावुके चि आहेत.
अनळीं जळेन तरि मीं, जरि न तुझा पूरवीन हा हेत. १११२
मो घ नव्हे पण माझा; अर्जुन मीं राहिलों तुझ्या अवना.'
ऐसें ऐकुनि विप्र स्वस्थमनें जाय आपुल्या भवना. १११३
'भ रले दिवस, प्रसवावसर[5],' असें विप्र अर्जुना सांगे.

---

१. निर्जीव अशा पदकाच्या ठिकाणीं. २. प्रभुरूपी चंद्राचे शब्दरूप किरण. ३. ब्राह्मणरूप चंद्रकांतपर्वताला. ४. एसें. ५. प्रसूतिसमय [आला].

तेथें हि तन्मुखा ये, 'स्मर पार्थपण, प्रिये! भिसी कां गे!?' ११११४

ग र्भवतीच्या सदना, ईशातें नमुनि, अर्जुनें वात

न शिरे ऐसा पंजर केला, योजूनि खरशरव्रात[1]. १११५

व निता त्या विप्राची पुत्र प्रसवे सकृत्तया[2] पाहे;

स्वप्नींचा लाभ तसा होय; न सुतशव हि तीपुढें राहे! १११६

ते व्हां ब्राह्मण बहु त्या श्रीकृष्णसमक्ष जिष्णुला गांजी;

कां लाविला पण करुनि आशेला? करिल तो क्षमा कां जी? १११७

वा सवसुत, योगबळें यमलोकप्रभृति लोकपतिलोक

पाताळ नाकपृष्ठ हि शोधी; न पडे चि दृष्टिला तोक. १११८

सु[3] शिवापति मग दहनीं झाला सिद्ध स्वकाय होमाया.

कोणी हि असो, प्रभुची स्वबळें जाणेल काय हो! माया? १११९

दे ह ज्वलनीं त्यजितां, कृष्ण म्हणे, 'पांडुनंदना! चाल,

शिशु दश हि दावितों ते, मग हृष्ट तुम्हीं तिघें हि नाचाल.' ११२०

वा होनि सखा स्वरथीं, श्रीहरि हरि[4] पश्चिमेकडे हाकी.

मागें सद्वीपांबुधि[5] लोकालोकाचळास ही टाकी. ११२१

य त्न न चाले, झाले कुंठितगति हरि, असें तिमिर दाट;

प्रभुसंदिष्ट[6] सहस्रद्युमणिप्रभ[7] चक्र दाखवी वाट. ११२२

न रनारायण गेले तम लंघुनि; भागवत महज्ज्योति[8]

मग लागे; पार्थाच्या, तोंवरि, दृढ शक्ति, दृष्टिची, होती. ११२३

मो टें कौतुक दावी शौरि, शिरे जिष्णुसहित तोयांत;

दिव्य महाकाळपुर प्रेक्षी, मणिकनकखचित तो यांत. ११२४

भ वनीं त्या दशशतफण नागपति, स्फटिकशैलसा धवळ;

तद्भोगकल्पितासन[9] विष्णु; श्री, पुष्टि, कीर्ति, त्याजवळ. ११२५

ग गनमणिकोटिभास्वर, अष्टभुज, प्रेक्षिलें महाधाम[10];

---

१. प्रखर बाणांचा समुदाय. २. सकृत् तया. ३. सुभद्रापति—अर्जुन. ४. घोडे. ५. द्वीपांसह समुद्र. ६. प्रभुनें आज्ञापिलेलें. ७. हजार सूर्यांप्रमाणें तेजस्वी. ८. मोठा प्रकाश. ९. त्या सर्पदेहावर कल्पिलें आहे आसन ज्यानें. १०. महत्तेज.

पीतांबरकौस्तुभवनमालाश्रीवत्सधर घनश्याम. ११२६
व दन शुचिस्मित, उतरुनि सांडावे कोटि त्यावरुनि सोम.
तेथें शोभति कुटिलालककुंडलमुकुटमणिरुचिस्तोम[1]. ११२७
ते थें पार्षद[2] नंद सुनंद, सुदर्शन वरायुधें सूर्ते,
पाहोनि वंदिलें त्या दोघांहीं विश्वभाग्य तें पूर्तें. ११२८
वा रिजनाभ श्रीमान्नारायण तो म्हणे, 'बरें आलां.
यासाठीं च द्विजसुत हरिले आम्हीं च; घाबरे झालां. ११२९
सु त विप्राचे न्या, जा, वर्ता न्यायें, हरा धराभार;
माझ्या कळा तुम्हीं, मजपाशीं या शीघ्र, यश करा फार.' ११३०
दे आज्ञा प्रभु त्यातें; वंदूनि दहाजणा हि तोकांतें
आणुनि देतां, विप्र च्छळिलें जें नाठवील तो कां तें? ११३१
पा डव कृतार्थ केला, सावध पार्थ, प्रहृष्ट पुरलोक,
ज्या प्रभुनें, तद्यश हि श्रोत्यांचा नुरवि काम, मद, शोक. ११३२
य श देवाचें गातां, आइकतां, नरकपात चुकवी तें,
म्हणउनि किति जन सेविति; गेयें[3] श्राव्य चि म्हणोनि सुकवीतें. ११३३
न वनव उत्सव नित्य, श्रीसह जैं द्वारकेंत अज नांदे.
स्मरणें चि शिवप्रद जो, तो दृष्ट अभीष्ट काय न जनां दे? ११३४
मो[4] ट्टायितकिलकिंचितकुट्टमितप्रभृति हाव कांतांचे
पोषी प्रभु, भजति जया भवमुक्त्यर्थी समूह शांतांचे. ११३५
भ वनोपवनवनजळक्रीडा, नाना विनोद, जायांसीं
नित्य नवे देव करी, केल्या लीला कधीं न ज्या यांसीं. ११३६
ग र्व, असूया, मत्सर, हे दोष प्रीतिनाशकर कांहीं

---

१. कुरळे केश, कुंडलें व मुकुटावरील रत्नें यांच्या प्रभांचा समुदाय. २. सभासद. ३. गाण्यास योग्य. ४. मोट्टायित=कांतस्मरणादीनें उत्पन्न झालेल्या अनुरागानें प्रकट होणारा हावभाव, किलकिंचित=प्रेमातिशयानें निघणारें हसणें, रडणें इ०, कुट्टमित=कांतलीलांचा खोटा च अव्हेर करणें इ०, हे तिन्ही आहेत आदि ज्यांत असे.

स्वप्नीं हि न धरिले प्रभुभार्यांहीं, जेंवि औष्ण्य[1] करकांहीं[2]. ११३७
व ल्लभसेवा आंगें करिती, धरिती न लेश आळस त्या.
नांदविल्या समभावें, प्रभुनें सुखवूनि सर्वकाळ सत्या. ११३८
ते प्रभुदार प्रभुच्या ध्यानासवसेवनेंकरूनि सदा
उन्मत्त तसे वदले, कुतुकें चिंतूनि मनिं मुकुंदपदा. ११३९
‘बा ई कुररि[3]! निजो दे प्रभु; कां करिसी विलाप तूं? प्राया[4]
कृष्णकटाक्षशरक्षतहृदया आम्हीं जश्या, तसी जाया.’ ११४०
‘सु भगे! रात्रौ पतिच्या विरहें तूं, चक्रवाकि! आरडसी;
किंवा प्रभुसेवेच्छा बहु, परि न पुरे, म्हणोनियां रडसी?’ ११४१
दे वी असें चि म्हणती पाथोधिमृगांकमलयवातांतें[5],
घन[6]पिकनगापगांतें; गावें हंसासि वदति आतां तें. ११४२
“वा जिवरा[7] हंसा! ये, बैस, प्राशीं पयासि पत्ररथा[8]!
साधो! अगा खगार्या! सांग श्रवणप्रिया मुकुंदकथा. ११४३
य दुपतिचा तूं दूत? श्रीरमणें प्रेषिलें तुला काय?
कळलें विहित चि केलें; आश्रय त्याचे चि या जना पाय. ११४४
न लिननयन अजित प्रभु आहे कीं कुशळ? हें चि गौरीतें
पूजूनि नित्य म्हणतों, ‘माते! दे भव्य भद्र शौरीतें.’ ११४५
मो त्यांचा हार तुला घे, संतोषें दिला, तुझी आण.
पुसतों तें वद साचें; सत्यें कल्याण हें मनीं आण. ११४६
भ द्रा हंसा! पूर्वीं आम्हांसीं बोलिला स्वयें बोल,
तें स्मरतो कीं नाहीं? पुसतों हें मात्र तूं खरें बोल. ११४७
ग वळयांच्या कन्यांसीं पूर्वीं यांचें बरें कसें होतें?
आतां तयां सख्यांचें स्मरण नसे, विसरले कसें हो! तें? ११४८
व दतों, शुद्धापासीं वदतां चिंता नसे म्हणोनीं च;

---

१. ऊनपणा. २. गारानीं. ३. एक जातीची पक्षीण. ४. प्रायः, बहुतेक. ५. समुद्र, चंद्र व मलयपर्वतावरील वारा यांला. ६. ढग, कोकिल, पर्वत व नद्या यांला. ७. पक्षिश्रेष्ठा. ८. ( पंखें आहेत रथस्थानीं ज्यास अशा ) पक्षा.

ऐसा चलसौहृद[1] तो; 'निंदिति गुरुला' असें म्हणो नीच. ११४९
ते मंत्र त्या जनासीं कार्यापुरते तसे करी रासीं[2].
आतां त्यासीं याचें सख्य सुरभिचें[3] जसें करीरासीं[4]. ११५०
वा रिजनाभें उत्कस्मृतिपूर्वक आदरें बहायातें
पाठविलें म्हणसीं जरि, विरहा असमर्थ तो सहायातें. ११५१
सु ष्ठुविचारितमयि भो हंसवर![5] क्षुद्र दूत! हा निधना
देह[6] उचित; मान नव्हे; या मात्र नसो कदापि हानि धना. ११५२
दे वी आम्हीं सोडुनि मानातें कां भजों? तयास वदा,
'ऐसा आम्हां नलगे; हा ज्या लागेल, द्या तया सवदा.' ११५३
वा रिधरश्याम प्रभु, हंसा! कामार्थ बाहतो यांतें.
हें काय? चातकींतें आणुनि दे वारिवाह[7] तोयांतें. ११५४
य दुपतिला चि बहा जा, वत्सा! जातोसि पक्षिपा! परतें.
ये मार्गे, नीट पहा, येथ नुघडिजेल अक्षि[8] पापरतें. ११५५
न ळ नृप दमयंतीप्रति जैसा हंसें चि आणिला मार्गे,
तैसा हरि आणावा आम्हांपासीं तुवां महाभागें. ११५६
मो डूंना वचन तुझें, यश देवूं, परि रमा न आणावी;
येणें असेल चित्तीं, तरि हे आज्ञा अलंध्य जाणावी. ११५७
'भ य काय तुला श्रीचें?' स्पष्ट असें चि प्रभूसि सांगावें.
दूतें कां बोलावें संकोचें? गायकें हि कां गावें? ११५८
'गौ डिनीसीं[9] वैर असें कां?' जरि म्हणसील, तरि असें वैर,
आम्हां वंचुनि पीती ती च मुकुंदाधरामृत स्वैर. ११५९
व क्षःस्थळीं च लुबरी वसती; कांतोर[10] तें तिची वसती.
आम्हां उरलासुरला, आपण आकंठ सेविती रस ती. ११६०

---

१. अस्थिर आहे मित्रत्व ज्याचें. २. रासक्रीडेंत. ३. वसंतऋतूचें. ४. विवक्षित वृक्षाला. (याला वसंतांत पानें नसतात). ५. अरे हे हंसश्रेष्ठा! चांगलें विचारलेंस. ६. हा क्षुद्र देह. ७. मेघ. ८. डोळा. ९. मैत्रिणीशीं. १०. पतीचें वक्षःस्थळ.

**ते** व्हां उत्साह जसा, आतां चि तसा दिसे न कां गमनीं?
हंसा! या संदेशें आलें तत्काळ काय सांग मनीं? ११६१
**वा** चेनें न वदसि तूं, परि कळला भाव गा मराला! जें
त्वां चिंतिलें असे तें ऐक, मग मनांत पामरा! लाजें. ११६२
'**सु** भगा तदेकनिष्ठा श्री; त्याग तिचा कसा करील हरी?'
ऐसी च कल्पनेची उठली तुझिया मनीं खरी लहरी. ११६३
'**दे** इल विरह तिस कसा, गणनीं यन्नाम ये कनिष्ठेला[1]?'
आपण कसें म्हणावें, 'सोडा श्रीला हि एकनिष्ठेला'? ११६४
**वा** स्तव भाव तुझा हा; कां हंसा! हा च कीं? किती आंगा
खाजविसी? सत्य सिरःकंपानें तरि हि 'न' म्हणसी कां गा!? ११६५
**य** द्वजनीं तनुवाङ्मन अर्पुनि बद्धादरा असों, ज्या या,
काय न तदेकनिष्ठा? श्री च तसी, न इतरा, तस्या ज्याया? ११६६
**नै**[2] भसंगमकुलतिलका हंसा! कंसारि[3]पादराजीव
प्रकृतिमनोहर; तेथें, वद, न धरी कोण आदरा जीव? ११६७
'**मो** टी मानसनिष्ठा अनवीं[4] हंसीं[4], तसी न आधुनिकीं'
हीं बोलणीं शिशूंचीं; स्वप्नीं हि न मानितील साधु निकीं[5]. ११६८
**भ** क्ति जळाची तिमिला[6], रे! न तसी काय सूक्ष्म[7] यादासी[7]?
रे मुग्धा! दुग्धाभा[8]! ती श्री दासी, तस्या चि या दासी. ११६९
**ग** र्व तिणें न धरावा; केली कुब्जा हि धन्य तीपारिस.
महिमा देतो स्पर्शें प्रभु, जैसा लोहमूर्तिला परिस. ११७०
**व** त्सा! तदेकनिष्ठा श्री च? तस्या नव्हति काय अन्या या?
केली क्षमा मराळा!; गुरु एका सोसितात अन्याया. ११७१

---

१. करंगळीला. (मोजताना प्रथम करंगळीपासून सुरुवात करितात म्हणून कनिष्ठेला म्ह० प्रथमेला. श्री म्हणजे लक्ष्मी व 'श्री' हें च प्रथमाक्षर आहे). २. पक्षिकुलांत श्रेष्ठ अशा. ३. कृष्णपदकमल. ४. जुन्या हंसाच्या ठिकाणीं. ५. खरीं. ६. एका जातीच्या माशाला. ७. लहान माशाला. ८. दुधासारखी (पांढरी) आहे कांति ज्याची अशा.

ते पहिली स्त्री, यास्तव बहुमानातें अगार[1] माना तें.
कृष्णीं आम्हीं धरितों, धरिती तें कीं अगा! रमा नातें. ११७२

वा स स्वर्गीं ज्यांला, त्यांच्या गांठीस पुण्य जाणावें.
प्रभुभक्तांत सुनिष्ठा आहे चि, असें मनांत आणावें. ११७३

सु ज्ञा! अमलासि कसा? पितों नयनीं सदा तदास्यातें.
नसती तदेकनिष्ठा, तरि हरिच्या पावतों न दास्यातें. ११७४

दे तो प्रभु सन्निष्ठा, पाहुनि निजदास्य पूर्ण; या लाभें
होती ज्ञानी हि असे; अन्या भाग्या, तसें न याला भें. ११७५

वा हे भगवान् भर्ग[2] हि माथां श्रीकृष्णपादतोयांतें.
निष्ठा नसतां, होता प्राप्त कसा तीर्थपाद तो यांतें? ११७६

य द्यपि निष्ठुर कांहीं वदलों चि, असेल तरि हि बरी वाणी
घ्यावी, हंसा! घेसी दुग्ध जसें, त्यजुनि मिसळलें पाणी." ११७७

न क्तंदिव हरिदयिता अनुरक्ता पतिपदीं च यापरि त्या;
जातां निजेंत घटिका अल्प हि, देती अनल्प ताप रित्या[3]. ११७८

मो क्षार्थी स्मरति जया, स्वपदा, देवूनि शुद्धि, नेत्यातें,
धन्या किती म्हणाव्या, ज्या भजती भर्तृबुद्धिनें त्यातें? ११७९

भ व्यगुण प्रभुचे सुत, त्यांची गणना विचारितां ऐसी
ते एक लक्ष, त्यावरि सहस्र ही, एकषष्टिवरि ऐसी. ११८०

ग णना त्यांची कोटित्रय, आठ सहस्र, वरि शतें आठ,
यदुकुळशिशु ज्यांपासीं करिती विद्याकळा सदा पाठ. ११८१

व र्ण्यचरित्रप्रभुनें यदुचें सत्कुळ असें यशासहित
वाढविलें; तें गावें, ध्यावें, कविनें दुजें कशास हित? ११८२

ते कीर्तिसती न करी सरि, देवांची हि आपगा[4], ईची.
कामदुघेपरि कैंची शक्ति, हरायासि ताप, गाईची? ११८३

वा चा पवित्र झाल्या, विमळें झालीं कुळें हि, जीं मलिनें.

---

१. वसतिस्थान. २. शंकर. ३. रिकाम्या ४. नदी ( भागीरथी ).

नलिनेक्षणनामाश्रितपाप्यांस[1] हि हस्त जोडिले कलिनें. ११८४

सु कृतानंदनिधानें[2] केलीं अजितें मनोहरें चरितें;
भवदवदग्धजनार्तिप्रशमार्थ[3] सरें[4] चि हीं सुधाभरितें. ११८५

दे उनि अमृतरस सुजन, भवशमना, विष्णुच्या पृथु[5] कथानीं
केले सुतृप्त, लाउनि निजमातानीं जसे पृथुक[6] थानीं. ११८६

वा ल्मीकिगीतकीर्ति श्रीभक्तमयूरमुदिर राम करी
सेतु, श्रित ताराया, शतशः स्वकथातरी हि तो चि हरी. ११८७

य श गाउनियां, ज्याची करिति कवि व्यास शुक सदा सेवा,
**भागवतमंत्रमुक्तामणिमाळा** त्या चि वाहिली देवा. ११८८

---

## उपसंहार.

(शार्दूलविक्रीडित छंद)

ऐसे सांष्टशताच्छमंत्रमणि[7] हें, यांची असी वोविली
माळा, स्वच्छयशोगुणीं कविकरें अत्यादरें गोविली.
श्रीकृष्णें स्वगळां स्वयें चि धरिली, वक्षस्थळीं शोभली;
वर्णावी बहु काय? पाहुनि इला श्रीदृष्टि ही लोभली. १

इति श्रीमद्भगवद्भक्तानुचरश्रीरामनंदनमयूरकृतिविरचिता **श्रीभागवतमंत्रमुक्तामणिमाला** समाप्ता । श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

१. कमलनेत्राच्या (कृष्णाच्या) नांवाचा आश्रय केलेल्या पाप्यांला हि. २. पुण्य व आनंद यांच्या ठेव्यानें. ३. संसाररूप वणव्यांत होरपळलेले जे लोक त्यांच्या मनोव्यथेच्या निवारणार्थ. ४. सरोवरें. ५. मोठ्या. ६. बालक. ७. १०८ उत्तम मंत्रमणि.

श्रीः

# मंत्रभागवत.

## तृतीय माला.

### एकादश स्कंध.

न रहरिरूपें केला कनककशिपु दैत्य तो जसा नाहीं,
श्रीहरिनें या रूपें भूभर नाहीं च उरविला कांहीं. १

मो टा यादवरूप क्षोणीवरि[1] भार राहिला परं[2] तो,
शापें हरि कीं ताप न वसवाया ठाव पाहिला परतो. २

भ गवान् कण्व असित भृगु गाधिजमुनि अंगिरा वसिष्ठ तथा
दुर्वासा नारदमुनि अन्य हि, ज्यांची जगत्पवित्र कथा. ३

ग णपतिसे सर्वांहीं पूजावे जे जपोनि, धीरा त्यां[3]
प्रभुसि पुसुनि, पिंडारक[4] जें, त्या गेले, तपोनिधी, राया!. ४

व निता सांबासि करुनि, नमुनि तयां, यदुकुमार हें पुसती,
"'होइल काय इला हो?' पुसते हे गर्भिणी तुम्हां सुसती." ५

ते वंचित[5] मुनि कोपति, तद्धृदया प्रश्नवचन तें कुसळ.
म्हणती, 'हे बालिश हो! प्रसवेल, कुळासि चुरि असें मुसळ.' ६

वा डववाक्यें भ्याले; देखति ते, उदर सोडितां, मुसळा.
मद जाय, म्हणे, 'सहसा' जो 'विनयांतुनि अलाबुसे[6] उसळा.' ७

सु कलीं वदनें त्रासें; दाविति तें मुसळ आहुका[7] राज्या,

१. पृथ्वीवर. २. परंतु. ३. कृष्णाला. ४. क्षेत्रविशेष. ५. फसविले गेलेले.
६. भोपळ्यासारखे. ७. उग्रसेनाला.

न निवेदिति प्रभुसि, बळधन मागति सुर हि साहुकारा ज्या. ८
दे खुनि मुसळ, समस्त प्राणी द्वारावतीस्थ ते भ्याले;
तच्चूर्णशेष आहुकवचनें जलधींत टाकिते झाले. ९
वां[1] रिचर गिळी शेषा[2]; चूर्ण धरी वारि च अब्धिचें तोय;
लोटी तरंगहस्तें तीरीं लागोनि, ऐरका[3] होय. १०
य त्नें न मिळावें, परि लुब्धकजाळीं[4] सशल्य मीन सिरे.
काळा! जेंवि विघटनीं[5], घटनीं हि तसा, सलीलि[6] मीनासि[6] रे!. ११
न व तीक्ष्ण शल्य, मीनोदरलब्ध[7], शराग्र, लुब्धकें केलें.
काळवृकें धरिलें जगन्मृगशावक[8] जन्हि पळोनि केंकेलें[9]. १२
'मो दन[10]' 'अनु'पूर्वक त्या शापातें देवदेव दे; वसुनीं
द्वारावतींत, आंगीं सामर्थ्य हि तन्निवारणीं असुनीं. १३
भ गवान् नारद हरिपरिपालित यादवपुरींत मग राहे.
प्रभुचरणीं मिठि घाली, बहुधा सिकला भजोनि मगरा[11] हे. १४
ग णपति, नारद, गुरुवर भजका विद्याफळें सदा फळतो,
टळतो भवविघ्न, मनीं चिंतावा अर्थ, तो सुखें वळतो. १५
व सुदेव पुसे, त्यातें नारद मुनिराज भागवतधर्म
सांगे, हरिप्रसादें व्हाया प्राप्त स्वरूप, शुचि शर्म. १६
ते कवि हरि इत्यादिक नव योगी, ऋषभपुत्र जनकास
सांगति, तें मुनि सांगे ज्यांची धरिती मुमुक्षुजन कास. १७
"बा पा! निमिला सत्रीं भेटति ते, तेज धरिति जेंवि रवी.
अग्नि हि, एतां, उठले, [12]जेणें, परजनमदासि जें विरवी. १८
सु ज्ञ निमि पुजूनि म्हणे, 'हरिमूर्ति तुम्हीं अघासि वाराया,
फिरतां लोकांत, सुखें दर्शन देउनि जडांसि ताराया. १९

---

१. मत्स्य. २. बाकी राहिलेल्या भागाला. ३. तृणविशेष. ४. कोळ्याच्या जाळ्यामध्यें. ५. विघडविण्यांत. ६. लीलेनें सिद्ध असतोस. ७. मत्स्याच्या पोटांत मिळालेले. ८. जगरूप हरणाचें बालक. ९. [ दीनस्वरानें ] ओरडलें. १०. अनुमोदन. ११. सुसरीला. १२. [ नवयोगी ] एतां ज्या तेजामुळें अग्नि हि उठले.

**दे** साधुसंग जें, तें निरुपम निरवधि, कवींद्र, सुख, गाती.
सत्संगा सुगति कळे; तैसी हंसादिका न सुखगा ती. २०
**वा** त्सल्य साधुहृदयीं, जननीहृदयीं तसें न [1]रंज नांदे;
साधु अकिंचन ही जें, न कुबेरासम धनी नर जनां दे. २१
**य** ज्ञशताधिकदर्शन साधु तुम्हीं, पुण्यकीर्तिचा [2]थांगा;
जें अत्यंत क्षेम, प्रभु हो! करुणा करूनि, तें सांगा.' २२
**न** रदेवासि कवि म्हणे, "अत्यंत क्षेम पुससि जरि, राया!
तरि हरिचरणाब्जभजन, '[3]अकुतोभय' म्हणति सकळ कवि बा! या."
**मो** टें रहस्य म्हणुनि स्वमुखें जगदीश भागवतधर्म
जे, आत्मप्राप्ति सुखें व्हाया, सांगे, उपाय, [4]पविवर्म. २४
**भ** गवद्धर्म करिति, जो आश्रितजन त्या जडास ही, जतन;
अंधासि सकृप डोळस, तैसे देती घडों न हे पतन. २५
**ग** रज न करितां, तनुवचमनइंद्रियमतिअहंकृति हि यांहीं
घडतें तें अर्पावें हरिला, लौकिक हि कर्म जें कांहीं. २६
**ब** हु भय हरिमायेनें संसारीं हरिस विसरतां आहे,
यास्तव हरिस भजावें; न भ्रमवी, 'गुरु चि' हरि, म्हणे त्या [5]हे. २७
**ते** हे विषय मृषा चि, स्वप्न तसे कल्पिले मनें ज्या, तें
रोधी, जो अभय करी, हरिभक्ति सती नृपा! घडे त्यातें. २८
**चा** रिजनाभाचीं जीं जन्में कर्में सुमंगळें नावें
गातो विलज्ज, निस्पृह फिरतो, हरिजन विलोकितो भावें. २९
**सु** खदा होती पुरुषा त्या प्राप्ता प्रेमलक्षणा भक्ती,
गातो, हसतो, रडतो, नटतो; त्या हरि च सर्व ही व्यक्ती. ३०
**दे** वा भजतां चि, नृपा! भक्ति सदनुभव विरक्ति ही नामें
ग्रासीं ग्रासीं जेवि, [6]क्षुन्नाश सुतुष्टि पुष्टि [7]एकामें. ३१

---

१. लेशमात्र. २. आश्रयस्थान. ३. कोठून हि ज्याला भय नाहीं असा. ४. वज्रकवचरूप [ असे ] जे भागवतधर्म. ५. माया. ६. क्षुधेचा नाश. ७. एकदम.

वा खाणी हरि योगी भागवतांचीं च लक्षणें बापा!
तीं परिसावीं सुजनीं आधीं श्रवणें चि नाशिती तापा. ३२
'यं जितो हरितें श्रद्धेकरुनि प्रतिमेचिमाजि जो, परि तो
न हरिजनीं न च इतरीं प्राकृत, कीं, नव च भजन हें करितो. ३३
न लिनाक्षीं, तद्भक्तीं, मूर्खीं, अहितीं हि, जो करी प्रेमा,
मैत्री दया उपेक्षा तो मध्यम भक्त, जाण या नेमा. ३४
मो टा भागवत नृपा! सर्वां भूतांत देव जो पाहे,
देवीं सर्व हि भूतें, साक्षात् हरिरूप तो जगीं आहे. ३५
भ गवद्भक्तोत्तम तो, ज्याच्या हृन्मंदिरीं सदा वसती
करि हरि, न च सोडी, कीं, प्रेमगुणें चरण गोविले असती. ३६
ग रुडध्वजपद सोडुनि, येतां त्रैलोक्यराज्य पदरा, ज्या
निमिषार्ध हि चलन नको, त्याचें भागवत राज्यपद, राज्या!.' ३७
व दला 'माया' पुसतां योगीश्वर अंतरिक्ष तो, 'दृष्टी
दिसती जी स्थिति, भूपा! अंतीं संहृति तसी च हे सृष्टी, ३८
ते हे च होय भगवन्माया; राया! इच्याचिया कार्यें
सृष्टिस्थितिलयरूपें जाणावें बा! इला तुवां आर्यें.' ३९
'वा रिधिलक्षाहूनि हि माया अतिदुस्तरा; इस तराया
यत्न,' प्रबुद्ध हि म्हणे, 'हरिभजनाविण नसे दिसत' राया!. ४०
सु ख व्हाया संसारीं बहु यत्न, न व्हावया असुख, रचितां
होतो विपर्यय, मनीं धरिलें तें न च घडे असु खरचितां. ४१
दे ती दुःख चि धन, सुत, दार, सदन, आप्त, जाति सोडून;
हें प्रथम विचारावें कीं, 'लाभ अशांसि काय जोडून?' ४२
वा यां चि नित्यताभ्रम, कर्मार्जित हा तसा चि परलोक,
स्पर्धा आणि असूया भयनाशें यांत त्यांत ही शोक. ४३
य त्नें श्रेय कळाया शास्त्र अनुभव हि जया तशा भावें

१. पूजितो. २. एक योगी. ३. संहार. ४. विरोध. ५. [आपल्या] कर्मांनीं मिळविलेला.

सद्गुरुला शरण नृपा! त्यजुनि कपट दंभ सर्वथा जावें. ४४
न र न म्हणावा आत्मा, विष्णु गुरु असा चि भाव बाणावा;
सेवा करूनि त्याची, जाणायाचा सदर्थ जाणावा. ४५
मो दप्रद शुचि भगवद्धर्म शिकावे; नव्हे सुखा वेच.
आत्मा आत्मप्रद हरि, करिवरतारक जिहीं सुखावे च. ४६
भ गवज्जनसंग सदा, सर्वत्र असंग मन करायातें
जपुनि शिकावें, दीनीं करणें कारुण्य जनकराया! तें. ४७
गं[1] ळसरिस तें, समासीं[2] केली मैत्री तिला जपायाचें,
शिकणें श्रेष्ठजनीं नतपण, जेंवि हिमालयीं तपायाचें. ४८
व र शौच[3], तप, तितिक्षा[4], मौन, स्वाध्याय, आर्जव[5], शिकावें.
सुब्रह्मचर्य, भूतीं अद्रोह, समत्व, हें पिक पिकावें. ४९
ते ते सुगुण शिकावे, आत्मा ईश्वर समान सर्वांत.
हे चि शिकावी स्थिति, गुरु कपिलाषष्ठी जसी च पर्वांत. ५०
बाँ[6] ढ श्रद्धा शास्त्रीं भागवतीं, तदितरीं न कुत्सा, हें
बा! आधीं च शिकावें हरिकीर्तिश्रवण फार उत्साहें. ५१
सु खकर कीर्तन हरिचें, ध्यान शिकावें तसें चि, बा राज्या!
कर्म समस्त तदर्थ[7] चि, कामाचा स्पर्शला न वारा ज्या. ५२
दे वासि समर्पावें कृत जें जें काय आपल्यास रुचे;
सुख पारिजात दे, तें देतिल तरु काय, तापल्या[8], सरुचे? ५३
वा रिजनाभासि स्त्री पुत्र गृह प्राण हें निवेदूनं[9],
व्हाया स्वस्थ शिकावें, एणें चि भवांत यां निवे दूनं[10]. ५४
य ल समस्तीं भूतीं परिचर्येचा[11], नृपा! मनुष्याचा
बहु बहुमान करावा, शूर करितसे जसा धनुष्याचा; ५५
न रवर्या! त्याहुनि बहु, पुरुष सदाचारशील जे, त्यांचा;

---

१. मंगळसूत्रास. २. बरोबरीच्या पुरुषासीं. ३. शुद्धत्व. ४. सहनशीलता. ५. सरळपणा. ६ मोठी. ७. हेतूचा. ८. तापलेल्याला. ९. अर्पून. १०. संतप्त. ११. सेवेचा.

त्याहुनि भागवतांचा बहुत चि, [1]नवमेघनीलजेत्यांचा. ५६

मो क्षप्रद भगवद्यश याचें अन्योन्य कथन हर्षानें
नाचावया शिकावें तेणें, मोरें जसें चि [2]वर्षानें. ५७

भ क्ति असी; इजपासुनि भक्ति दुजी प्रेमलक्षणा होती;
मग जावूं दे, प्रभुच्या वार्तेवांचूनि, न क्षणा हो! ती. ५८

ग डबड करिती सात्विकभाव सुहिलकर, जसे विवाहीं हो!
ऐसा वाटो लोकां संसारीं, परि वसे वि[3]वाहीं हो!. ५९

व रपुरुष विष्णुधर्म चि शिकला, तत्प्रभवभक्तिनें वारिला,
मायेसि सुखें तरला, कीं, नारायण चि एक आदरिला.' ६०

ते व्हां निमि नमुनि म्हणे, 'मजला नारायणस्वरूप कथा;
कीं, ब्रह्मज्ञवर तुम्हीं अज्ञजना लावितां चि आत्मपथा.' ६१

वा[4] गीश पिप्पलायन योगींद्र म्हणे, "नृपोत्तमा! समज;
नारायण, परमात्मा, ब्रह्म, दिसे भिन्न तत्व हें न मज. ६२

सु ज्ञा! भिन्नें नामें मात्र गमति; तत्व एक हें होय.
'चूत' 'रसालाम्र' असीं नामें ठेवूत, एक कीं कोय. ६३

दे वा! जो विश्वाचा स्थित्युद्भवविलयहेतु, ज्या कांहीं
हेतु नसे, नारायण तो परतत्व चि, असें नृपा! पाहीं. ६४

बा! जा[5]गराद्यवस्थात्रयवर्ति, समाधिमाजि जें कांहीं
अनुभविति, 'ब्रह्म' म्हणति, तें परतत्व चि असें नृपा! पाहीं. ६५

य त्तेजें तनु असु मन इंद्रिय जड जें प्रवर्ततें कांहीं,
ज्या 'परमात्मा' म्हणती, तें परतत्व चि, असें नृपा! पाहीं." ६६

न रपति पुसे तयातें, कथि [6]आविर्होत्र कर्मयोगातें.
'कर्मांत सार हरिचें पूजन, द्याया स्वशर्म [7]यो गा! तें. ६७

मो क्षप्रद हरिपूजन, वैदिकतांत्रिकपथें, गुरूक्त, घडे.

---

१. नवीन ढगाप्रमाणे निळा (जो कृष्ण) त्याला जिंकणाऱ्याचा. २. पावसानें. ३. गरुडध्वज कृष्णावर. ४. वाणीचा स्वामी. ५. जागृति स्वप्न व सुषुप्ति या तिन्ही अवस्थांत असणारें. ६. योगिविशेष. ७. येवो.

अग्निरविजलातिथि निजहृदयीं जरि, तरि समस्त दोष झडे.' ६८
भ गवत्पूजन कथिलें; त्याचे अवतार, तत्सुगुण कर्में,
प्रियमूर्तिपूजनार्थ, स्तवनार्थ, पुसे वडावया शर्में. ६९
ग रुडरथाचे सर्व हि पुरुषाद्यवतार सार फार हित;
तद्रूपसुगुणकर्मज्ञान करी पडरिवदन भारहित[1]. ७०
व र देतो पुरवाया विषयिमनोरथ सुरद्रु मिळत्यातें.
सांगे प्रेमाश्रुभरें, बहु भिजवाया उर, द्रुमिळ[2] त्यातें. ७१
ते ते अवतार कथी; केले भस्म चि बळें जिहीं संदरी[3]
नारायणासि वर्णी बहु, धन्या ज्याचिया यशें बदरी[4]. ७२
वा सव म्हणे, 'तपतसे नारायण, हरिल मम सुधामातें;
कामा! जा, माझ्या बा! मोह तया गरळसम, सुधा मातें.' ७३
सु रपाळप्रहित[5] स्मर घेउनि संगें वसंत पवमान,
तो अप्सरादृगिषुनीं[6] वेधी प्रभुतें करूनि अवमान. ७४
दे व समजला दुर्नय, हंसला; त्यावरि तया न रुसवे च.
खग पीडिति, परि त्यांचा व्हावा वाटे न त्या तरुस वेच. ७५
वा प अपत्यातिक्रम, कामातिक्रम तसा चि तो साहे;
पाहे सदय, समीप स्मर पवन वसंत अप्सरा बाहे. ७६
य[7] वसें वातें, त्रासें तद्देहें, तेंवि, फार कांपति; तें
पाहुनि म्हणे, 'भिउ नका; येइल सत्या दया न कां पतितें?' ७७
न मिती कामादि सकळ, कर जोडुनि, विगतकांति; लाजावें
खद्योतीं[8] रविस न कां? ज्या[9] त्यजुनि गमे न शांतिला जावें. ७८
'मो हूं आलों, चुकलों,' ऐसें समजोनि जे भयें स्विन्न[10],
त्यांसि म्हणे, 'पूजा घ्या; हो आश्रम सफळ; कां वृथा खिन्न?' ७९
भ गवंतासि नमुनि ते म्हणती, 'बा! स्पर्शली तुज न माया;

---

१. निस्तेज. २. योगिविशेष. ३. साधूंचे शत्रु. ४ या नांवाचें क्षेत्रविशेष. ५. इंद्रानें पाठविलेला. ६. अप्सरांच्या दृष्टिरूप बाणानीं. ७. गवतें. ८. काजव्यानीं. ९. नारायणास—पंत. १०. घर्मयुक्त.

तारि च त्रिकाळ हि सभा साधूंची हर्षली तुज नमाया. ८०
ग म्य न व्हा चि प्रभुजी! केव्हां ही मायिकीं[1] विकारा, हो!
नवल न, अक्षोभ[2] दया महिमा ऐसा चि हा निका राहो. ८१
ब हु विघ्न सुर करिति, त्यां जे भजुनि तुला सदा सजायाला
लागति सुरलोकांतें अतिलंघुनि, तव पदास जायाला. ८२
ते वि प्रत्यूह[3] करिति न तयां कर्षक[4], तसे चि जे भाग
देती मखांत, त्यांचा येइल इंद्रादिकांसि कां राग? ८३
वा यु तसे दुर्धर तव सेवक, कीं त्यांसि पाय हे अवितें[5];
देती विघ्नशिरीं पद; भागवत व्याघ्र, विघ्न जे अवि[6] ते. ८४
सु रवरगुरो! तुजपुढें जऱ्हि विघ्नसहस्र आतत[7] मशक तें;
तूं काय? काय आम्हीं? न कराया भानुघात तम शकतें. ८५
दे वा! जिह्वोपस्थक्षुत्तृट्शीतोष्णवर्षवातांतें[8]
या आम्हां सिंधूंतें तरती, चुकवूनि आत्मघातांतें. ८६
वा यां चि त्यजिती वरतप, वश होवूनि विफळकोपातें;
जड गोष्पदांत बुडती; तव दास न जो, श्रमे चि तो पातें.' ८७
थ तिनाथ प्रभु त्यांतें कुतुकें खालें पहावया लावी;
बहु निजसेवानिरता अत्यद्भुतदर्शना स्त्रिया दावी. ८८
न यनें दिपलीं त्यांचीं पाहुनि नारायणाचिया दासी;
त्यांच्या गंधें भुलले; कोठें मुख? देखवे न पादासी. ८९
मो हक ते मोहुनि, त्यां देव म्हणे, 'या स्त्रियांत एकीला
न्या; स्वर्गविभूषण हो मुदिरघटा[9] सर्वदेवकेकीला[10].' ९०
भ गवद्वचनें ते सुरसेवक एकीस घेउनि, प्रभुला
नमुनि, स्वर्गा गेले; कोणासि म्हणेल उर्वशी न 'भुला'? ९१
ग र्वे गळाला, जीचें दर्शन होतां चि, कामदेवाचा,

---

१. मायाकृत. २. चांचल्याभाव. ३. विघ्न. ४. [मागें] ओढणारे. ५. रक्षिते. ६. मेंढे. ७. विस्तृत. ८. जीभ व जननेंद्रियें यांच्या क्षुधा व तृषा आणि थंडी, ऊन व पाऊस यांला. ९. मेघसमुदाय. १०. सर्व देवरूप मोरांला.

शक्रादिकांसि जीची, सुख यश सांगोनि काम दे, वाचा. ९२
व पु सुंदर परि, ज्यांचें लघु अंगुष्ठप्रमाण, नामानें
जे 'वालखिल्य,' आणिति समिधा कश्यपमखेष्ट[1]कामानें. ९३
ते गोष्पदांत बुडतां, इंद्र करी तदुपहास, बा राया!
धांवे, ईभाप्रति[2] तसा, देव विपत्तींत त्यांसि ताराया. ९४
वा रिधि बांधुनि वधिला दशमुख, तो रामचंद्र हा आतां
ध्यातां आइकतां यश; पाप जळे सर्व ही जया गातां. ९५
सु खउनि विनयें, राजा निमि त्यांसि पुसे, 'अभक्तगति काय?'
चमस म्हणे, 'तो नरकीं बुडतो, पंकांत जेंवि अतिकाय[3]. ९६
दे वातें न भजति खळ, विद्याधनकुळवयोमदें फुगती,
ते स्पष्ट गुरुद्रोही; त्यांची न चुके कधीं हि बा! कुगती.' ९७
बाँ[4] हुजमुकुटमणि पुसे युगधर्म, न तद्वचोमृतें धाला,
धरिता दिनकरभा[5] जन करभाजन[6] विष्णुचा कथी त्याला. ९८
"य जिती कृतीं चतुर्भुज, शुक्ल[7], जटिल, देवदेव, तो ध्यानें,
निर्वैर शांत सुपुरुष संपन्न चि जे शमें दमें ज्ञानें. ९९
न र तेव्हां परमात्मा, वैकुंठ, सुपर्ण, हंस, या नावें
गाती वानिति भावें, जैसें गावें जसें चि वानावें. १००
मो टे च्यार भुज, रुचिर रक्तप्रभ[8] यज्ञपात्रपाणि असा
त्रेतेंत हरि यजावा, यज्ञाहीं या युगांत, हा चि ठसा. १०१
भ गवन्नामें तेव्हां यज्ञ, उरुक्रम, जयंत, उरुगाय[9],
ज्याच्या यशासि लाजे देवांचा वृक्ष, ते हि गुरु गाय. १०२
ग रुडरथ कौस्तुभ[10]श्रीवत्सनिजायुधधर प्रभु श्याम

---

१. कश्यपऋषीच्या यज्ञाच्या इष्ट हेतूनें. २. हत्तीकडे. ३. स्थूल आहे देह ज्याचा तो. ४. परमेश्वराच्या बाहूपासून उत्पन्न झालेले क्षत्रिय, त्यांमध्यें मुकुटमणि असा (निमिराजा). ५. सूर्याचें तेज. ६. नवयोग्यांपैकीं एक योगी. ७. शुभ्र. ८. तांबडी आहे कांति ज्याची तो. ९. पुष्कळांनीं गाइलेला. १०. कौस्तुभ (रत्न), श्रीवत्स (लांछन) व स्वतःचीं शस्त्रास्त्रें धारण करणारा.

द्वापरयुगांत वेदें, तंत्रें हि यजिति पुरावया काम. १०३

**व** दति तईं 'संकर्षण नारायण वासुदेव' हीं नामें,
लाविति अघा कराया, [1]सासि [2]अजा जेंवि शक्तिहीना '[3]में.' १०४

**ते** जें उज्वळवर्णें कृष्ण कलियुगीं सकौस्तुभ स्वामी
सायुध सपार्षद यजिति, पूजांहीं बहु भरूनि तन्नामीं. १०५

**वा** चेनें स्तुति विभुची नित्य करावी, असी नृपा! भावें
"पदकमळ महापुरुषा! तव नमितों दीन मीं, सदा पावें. १०६

**सु** स्वरूप केवळ चि, जें विधि शिव यांहीं सदा स्तुत, ध्याया
जें योग्य, भृत्यपीडा हरितें तत्काळ, लागतां गाया. १०७

**दे** तें वांछित सर्व हि, परिभव होवूं न दे कदापि कवी.
तीर्थस्थान, भवजलधिसेतु, म्हणति 'जें सुखें सदा पिकवी.' १०८

**वा** सवदुर्लभ दुस्त्यज राजश्री हृष्टमानस त्यागी
जाय वनातें गुरुची पावाया सुबहुमान सत्या [6]गी. १०९

**य** द्यपि राक्षसमाया जाणे, तदपि [7]प्रियाँप्रिय कराया,
धांवे जें हेममृगामागें, आंगें तयाप्रति धराया." ११०

**न** रवर्या! स्तुति ऐसी श्रीरामाची सदा करावि हिता;
हे चि द्रववाया त्या देवा सद्गुणसदाकरा विहिता. १११

**मो** टा कलिचा गुण हा, कीं, केशवकीर्तनें चि सर्व तरे.
राज्या! हरिचरिताचें गाणें हें वज्र, पाप पर्वत रे!. ११२

**भ** गवद्गुणकीर्तन हा लाभ परम, मुक्ति शांतिसुख गाल्या;
या कीर्तिपुढें, मलिना विधुसि गमे कां न कांति, [9]सुखगा त्या? ११३

**ग** र्व कृतादियुगांचा हरिला बा! या चि सद्गुणें कलिनें,
कर्पूरचंदनांचा स्वसुवासें जेंवि [10]मृगमदें मलिनें. ११४

**[11]वं** न सेविति कावेरी, कृतमाला, ताम्रपर्णिका यांचें,

---

१. हातीं तलवार असणारा. २. बोकडाला. ३. बोकडाचा केविलवाणा उद्गार. ४. अनुचरांसह. ५. पित्याची. ६. वाणी. ७. स्त्रीला आवडणारी गोष्ट. ८. उत्तम गुणांची उत्तम खाण अशाला. ९. हंस–**पंत**. १०. कस्तुरीनें. ११. पाणी.

बहुधा ते जन हरिजन; यांच्या यश इंदु वर्णि कायांचें. ११५
ते न ऋणी, न च किंकर[1], आप्तनर[2]सुरर्षिभूतपितरांचे,
सोडुनि भेद, हरिस जे अनुसरले, त्यजुनि मार्ग इतरांचे. ११६
वा[3] रिजनिजचरणमधुप जो, प्रिय घडलें विकर्म हि तया तें;
हृद्गत परेश हरि तो हरितो; देतो चि शर्म हित यातें.” ११७
“सु तरूपीं भगवंतीं श्रीकृष्णीं स्नेह करुनियां तरलां;
जन्मुनि कृतकृत्य तुम्हीं; नेणा चि स्वसुखसागरीं भरलां. ११८
दे वकि! हे वसुदेव! द्वेष्टे कीं पात्र मुक्तिस द्वेषें;
प्रेमें तरलां हें किति? कीं दिधलि बकीस[4] मुक्ति सद्वेषें.” ११९
वा ढे प्रीति प्रभुवरि, जसि, पडतां दृष्टि इंदुवरि, लहरी.
हा तों प्रेमा सिंधु चि; बहु मानुनि एक बिंदु, वरिल हरी. १२०
य दुवर्या! प्रभु सुखवी बहु, कश्यप सुमुनि अदिति हा समज;
श्रीविष्णुधर्म पुसिले, आठवला म्हणुनि सदितिहास मज. १२१
न लिन[5]भवभवप्रमुख त्रिदश सकळ मग जगन्निवासाचें
दर्शन घेती, म्हणतें प्रणतां तत्काळ जें ‘निवा’ साचें. १२२
मो र चि ते, मुदिर चि हरि, पावति पाहोनि हर्ष मोटा हो!
स्तव केला जो त्यांहीं, सत्कविला तो न कां गमो टाहो? १२३
‘भ र हरिला, क्षिति मुदिता केली, लावूनि पादराजीवा;
विस्तारिलें, तराया, यश हें सर्वां हि सादरा जीवा. १२४
ग मला काळ स्वल्प चि हा, परि गेलीं सपाद[6]शतवर्षें.
यावें वैकुंठाप्रति. या चरितें सर्व कोंदलों हर्षें.’ १२५
व दले यापरि; बा! परि त्या परिहृत[7]निजजनाधितें हरितें
‘या चि’ न म्हणवे; सेवकमुख सूचन मात्र ईश्वरा करितें. १२६

---

१. चाकर. २. संबंधीजन, देव, ऋषि, भूत व पितर यांविषयींचे. ३. कमलरूप निजचरण त्यांचे ठायीं जो भ्रमर तो. ४. पूतनेला. ५. ब्रह्मदेव व शिव ज्यांत प्रमुख असे. ६. सवाशें वर्षें. ७. हरण केली आहे भक्तांची मानसिक व्यथा ज्यानें अशा.

ते विज्ञप्ति परिसुनि, प्रभुवर्य म्हणे तयांसि, "भू पदरा
पसारितसे कीं, 'यादव देति जसे, तेंवि ते न भूप, दरा.' १२७
वा रिंधिला जसि वेळा, या यदुवंशासि मीं च आवरिता.
यांच्यापुढें पडेना कोण, रणीं त्यजुनि सर्व आव, रिता? १२८
सु र हो! आटोपितसें मीं हा यदुवंश उद्धतपसारा[1]".
कोप मुनींस म्हणे, 'या गुरुकार्यार्थीं च शुद्ध तप सारा[2]'. १२९
दे ववराज्ञा घेउनि गेले ते देव आत्मसदनातें.
द्वारावतींत दाविति मग बहु उत्पात उग्र वदनातें. १३०
वा र्ष्णेय प्रभु सांगे, 'कास धरा आर्य हो! प्रभासाची.
येथें आली, शापें गेली, ती इंदुची प्रभा साची'. १३१
य दुवीरवचन रुचलें, यादव रथ लागले चि योजाया.
उद्धव समजे, विनवी एकांतीं प्रभुसवें चि तो जाया. १३२
न मुनि म्हणे उद्धव, 'हें जाणें, तूं नाथ, दास मीं, नातें;
करुणासिंधो! न च या[3] त्यागीं, धरितां पदास, मीनातें'. १३३
मो हें दाटे उद्धव, विरहापूर्वीं च अंतरीं फाटे.
वाटे अवघड फार चि; जाणों तें याद, सिंधु तो आटे. १३४
भ क्तासि म्हणे भगवान्, 'साधो! तूं सर्व संग सोडून,
मज पावसील, साधन मत्प्राप्तीचें शमादि जोडून. १३५
ग ज जैसा पद्मातें, कोप सिरुनियां, तयांसि, तुडवील;
उडवील शाप मति; पुर सप्तमदिवसीं समुद्र बुडवील'. १३६
'व क्ता ज्ञाता प्रभु तूं, सांग मला आत्मलाभसदुपाया;
विश्वगुरो! तुजवांचुनि करिल सदुपदेश कोण यदुपा! या?' १३७
ते जस्वी हि गडबडे प्रभुविरहभयें, म्हणे चि उद्धव 'हा!'
देव म्हणे, "मीं कथितों तो, तूं हृदयीं, विचार शुद्ध वहा. १३८
बा! नरशरीर दुर्लभ, सत्संगति सुमति यांत[4] मुद्धारा[5].

---

१. स्वैर वाढला आहे विस्तार ज्याचा असा. २. वेंचा. ३. मला. ४. नरशरीरांत (नरदेह प्राप्त असतां). ५. आनंदाची धार.

ज्ञाते आपण चि करिति आपुलिया, सुगुण वरुनि उद्धारा. १३९
सु ज्ञा! सर्वां भूतीं, बुध्यादि जडें समस्त चाळितसें,
आत्मा मीं एक, सगुण निर्गुण, गुणविश्व सर्व पाळितसें. १४०
दे तों सांगुनि तुज इतिहास, जयांत स्वतत्व अवधूतें
कथिलें यदुला, ज्याचें श्रवण स्वरताघ[1] नित्य नव धूतें. १४१
वा डववर अवधूत प्रेक्षुनि, पूजुनि, तयासवें यदु ज्या
गोष्टी करि तुज कथितों त्या, होती प्राप्त साधुला न दुज्या. १४२
'यें[2] ज्ञातिदर्शना बा! अवधूता! सुनिपुणा! असी बुद्धी
कोठुनि तुजला, जीस्तव, गंगेपासुनि जसी महाशुद्धी? १४३
नै[3] रयान, सुबुद्धि! करुनि विचरसि लोकांत, कवि हि बाळकसा;
न करिसि कर्म, न इच्छिसि किमपि, सुखी लोकपाळपाळकसा. १४४
मो टा बळवान् ज्ञानी दक्ष सुभग अमृतभाषण असूनीं
न करिसि कर्म, न इच्छिसि बहु, पारि परितृप्ति दाविलि असूनीं[4]. १४५
भ लतें चि करुनि, तूं जड उन्मत्त पिशाचसा च सोंगातें
मिरविसि, जाणाया, जें तव सुख, आम्हीं भुके असों गा! तें. १४६
ग ज गंगेंत, दवदहनमुक्त तसा, स्वस्थमन, न शोकांत,
या कामकोपलोभज्वलनाहीं देह्यमान[5] लोकांत.' १४७
व दला अवधूत असें, "म्हणतों जिस असुपरसि होवीस,
ईचे[6] दाते बा! ते मातेपरि, गुरु मदीय चोवीस. १४८
ते पंचमहाभूतें विधु रवि अजगर कपोत सिंधु, तसा
मधुकृत्[7] पतंग मधुहा[8] गज मृग झष[9] पिंगळा कुरर[10], परिसा. १४९
बा ळक तथा कुमारी, शरकर्ता सर्प ऊर्णनाभि[11] नृपा!
मद्गुरु सुपेशकर्ता[12], यांची, या मम मतीस हेतु, कृपा. १५०

---

१. आपल्या ठिकाणीं च मग्न असलेल्याचें पाप. २. यज्ञापेक्षां ज्याचें दर्शन श्रेष्ठ अशा. ३. मनुष्य देहरूप रथ. ४. प्राणानीं. ५. जळणाऱ्या. ६. या बुद्धीचे. ७. मधमाशी. ८. मध हरण करणारा. ९. मत्स्य. १०. पक्षिविशेष. ११. कोळी. १२. कुंभारीण माशी.

**सु**[1] तरां दैव[2]वशानुग भूतांहीं पीडिलें, तन्हि सहावें,
सिकलों भूपासुनि हें, देह असे तों सुखासुख वहावें. १५१
**दे** खुनि पादप[3]निर्झरयवसप्रसवक्रियापरार्थ अंग
केवळ परार्थसंभव, केला ग्या गुरु, असा चि वृक्ष मग. १५२
**वा**[6] युप्राण जसा बा! आहारें मात्र वर्ततो, भोगी
न रसा रूपा; तैसा तद्गुण तच्छिष्य कां नव्हे योगी? १५३
**य** लें घे गुण, सिरतो गहनीं दहनीं, कधीं नव्हे सक्त,
हा सेवी विषय, परि न गुंते तो बाह्यवायुचा भक्त. १५४
**न** रवर्या! गंधाश्रय, परि वायु जसा नव्हे चि तद्योगी.
देहीं न देहधर्में लिप्त, तसा वायुशिष्य सद्योगी. १५५
**मो** टा सर्वगत जसा आकाश, घटीं असे असंग परी.
आत्मा ऐसा देहीं, निश्चय हा गगनशिष्य साधु करी. १५६
**भ** रती वायुप्रेरित मेघादि पदार्थ, न च मळे गगन;
आत्मा ऐसा वपुनीं, हें कळवी, सुगुरु होय कां मग न? १५७
**ग** गनाचा शिष्य जसा यदुराया! हा तसा चि तोयाचा;
मधुरत्व मळहरत्व स्वच्छत्व हि सदुपदेश तो याचा. १५८
**व** ह्नि गुरु उदरभाजन तेजस्वी सर्वभक्ष परि अमळ;
खावें परार्पित चि; न च याचावें, बहु हि शक्ति तरि, अमळ. १५९
**ते** वीं च जसें काष्ठोपाधिस्तव लघुगुरुत्व हा वाहे,
आत्मा, देहोपाधिस्तव, शिकलों मीं सुयुक्ति बावा! हे. १६०
**वा** ढेना, क्षीण नव्हे, विधु, वृद्धिक्षय जसे कळांचिकडे,
देहाकडे तसे ते; त्यां आत्म्यासीं कधीं न योग घडे. १६१
**सु** ज्ञा होती, नाशति, दहनाच्या जेंवि सर्वदा ज्वाळा,

---

१. सुतराम् अत्यंत. २. दैवयोगानें आलेल्या. ३. वृक्ष, झरे व तृणें यांची जी प्रसवक्रिया तो आहे पर (श्रेष्ठ) अर्थ ज्यांचा असे. ४. वृक्ष. ५. परहिताकारितां आहे जन्म ज्यांचा. ६. वारा आहे प्राण (प्राणसाधन) ज्याचा तो सर्प. ७. पवित्र. ८. किंचिदपि—**पंत.**

देह तसे आत्म्याचे; शिखिशिक्षित हें हि मेदिनीपाळा!. १६२
दे तो, समर्थी घेतो जळ, जेंवि तयांत रवि नव्हे सक्त,
शिकलों विषयग्रहणत्याग तसें, म्हणुनि भानुचा भक्त. १६३
बा! हें हि अर्कशिक्षित, तो जेंवि दिसे जळें, नसुनि भिन्न,
तैसा देहें आत्मा, समजुनि ऐसें, कधीं नसें खिन्न. १६४
य त्नें मन रोधावें, कोठें स्नेहप्रसंग हे न हित;
शिकलों नृपा! कपोतापासुनि हें शील, सज्जनीं महित. १६५
न[1] गकोटरांत होता सस्त्रीक वनीं प्रियासख कपोत;
मूढ प्राणांसि म्हणे, 'स्त्रीस चि हे, आपणासि न जपोत.' १६६
मो दें भरला, प्रसउनि आपुलिया कोटरांत पिलयांतें;
बहु न मनी आपलियाहुनि तो नरदेवदेवनिलयांतें[2]. १६७
भ क्ष्य तयां बाळांतें, स्त्रीसह गेला कपोत, आणाया,
ज्या जातां तीं वदलीं, 'बहु सत्वर न विसरूनि आणा, या.' १६८
ग हनीं लुब्धक[3] पाहे त्या पोतांतें, त्यजूनि निर्जनीडा[4]
क्रीडा बाहिर करितां; जाळांत तयां धरी, करी पीडा. १६९
व दनीं धरूनि चारा, धांवत आली पुढें चि; तों जाळें
काळें धरिलीं पाहे, प्रथम कपोती च आपुलीं बाळें. १७०
ते बाळ, माय पाहुनि, आरडले, जाळयांत तळमळले;
धडफडुनि पडुनि रडुनि श्रमुनि भ्रमुनि क्षतांगबळ[5] मळले. १७१
बा ळांचें दुःख न ती साहे, त्यावरि पडे, जडे फांसा.
कां सावध न कपोतें व्हावें? ऐसें चि जन; न या हांसा. १७२
सु विकळ मानस झालें[6], दुःखित देखुनि मुलास, कळकळतें.
स्त्रीपुत्रप्रेम कसें काय, यदो! तें तुला सकळ कळतें. १७३
'दे[7] वन' 'पँरि'पूर्व करुनि, घातलि च उडी तयांवरि कपोतें.
हा निजनीड न, त्यांहीं भरि, हर्षें व्याध तो वरिक[8] पोतें. १७४

---

१. झाडाच्या ढोलींत. २. राजे व देव यांच्या घरांला. ३. पारधी. ४. आपलें घरटें. ५. शक्तिहीन. ६. झालेलें. ७. परिदेवन=दुःख. ८. वरिक.

बा! विटलों हें पाहुनि, केला गुरु, जरि कपोत पामर, तो.
व्यर्थ चि असा कुटुंबी गृह जरि तप त्या; तपो तपा, मरतो. १७५
य दुराया! इंद्रियसुख नाकीं नरकीं हि सहज तें आहे.
मग कां तदर्थ आयुःक्षय? ठावी युक्ति अजगरा बा! हे. १७६
न करावा उद्यम; गुरु लघु, विरस सरस, सुधासम ग्रास.
शिकलों अजगरगुरुचें हितसूचक गुरु बुधा! समग्रास. १७७
मो दितचित्त असावें, फार दिसावें प्रसन्न बाहेर,
गंभीरतेसि अभ्यंतर तों, केवळ मुलीस माहेर. १७८
भ रलें समुद्रगुरुचें शिक्षित, जें दुर्विगाह्यपण[1] आहे,
अक्षोभ्य अलंघ्य तसा, तैसा चि अपार सिंधुगुण बा! हे. १७९
ग वें न उतावें तिळ सुसमृद्धपणीं, तसें च आटावें
असमृद्धपणीं न कधीं; या हि गुणें सुगुरु सिंधु वाटावें. १८०
व ह्निमुखीं, रूपविषयकामुक[2], सहसा, पतंग, जो पडतो,
तो स्त्रीकनकविभूषावस्त्रत्यागीं गुरु स्वयें घडतो. १८१
ते थें तेथें थोडा थोडासा बहु, रसग्रहणलोभें,
एकीं च भुलुनि बद्ध न व्हावें, हें कथुनि अळि म्हणे 'शोभें'. १८२
वाँ[3] णि नसावी लेश हि रसिकपणीं, अणु महा असो शास्त्र;
सर्वांच्या हि, करावें साराला, हृदय आपुलें पात्र. १८३
सु खबुद्धिनें, 'सकाळीं सांजे' न म्हणोनि, भक्षिजे मात्र.
मधुमक्षिकेजवळि हें शिकलों मीं, पाणि कीं उदर पात्र. १८४
दे हीं, संग्रह करितां, असुवसुसह[4] जेंवि मधुसहित मासी
नाशे; मीं हें शिकलों, जाउ न द्यायास अंधुस हि तमासी. १८५
वाँ[6] मा काष्ठाची ही, चरणें ही, भिक्षुनें[7] न च शिवावी.
बद्ध चि तिणें, ईभीनें[8] इभसा; स्त्री स्पर्शिली, न च शिवा[9] वी. १८६

---

१. दुस्तरत्व. २. प्रकाशरूपी विषयाची इच्छा करणारा. ३. उणीव. ४. प्राणद्रव्यासह. ५. विकलावयवे वाजिनि प्रसिद्धः—**पंत**. ६. स्त्री. ७. संन्याश्यानें. ८. हत्तिणीनें. ९. कल्याणा उपजवी.

य[1] म होय आपणा स्त्री, भजतां तीतें दुजे बळी मथिती,
अनुभवुनि आपण असें, मज गज गुरु उ[2]रु दयालु हें कथिती. १८७
न दिजे, न भोगिजे धन, लुब्धें दुःखेंकरूनि सांचविलें,
तें अन्य बळी हरि, हें मधुहा[3] कथि, मधु हरूनि वांचविलें. १८८
मो ठ्या कष्टें संचित मधुतें मधुहा जसा प्रथम भोगी,
तैसा चि गृहस्थांच्या, पहिला, अन्नासि भोगितो, योगी. १८९
भ य होय बहु ग्रा[4]म्यें गीतें, समजोनि मीं वनीं टिकलों.
हें [5]मृगयुगीतमोहित हरिणापासूनियां यदो! शिकलों. १९०
ग जरीं, मन देतां चि, स्त्रीजनकृतवाद्यगीतनृत्यांच्या,
च्यवला[6] चि अनुष्ठानीं, सुविरक्त हि ऋष्यशृंग, कृ[7]त्यांच्या. १९१
व ध चि अतिरसासक्ता, हें कळवी, गळ गिळूनि, मीन मना.
दूरूनि, रसासि करितों, [8]बडिशहतमता मिळूनि, मीं नमना. १९२
ते वेश्या जनकपुरीं म्हणवि 'बरें फार' विं[9]गळाला, जे,
होय विरक्तमति, निजा दुष्कर्मा विटुनि पिंगळा लाजे. १९३
वा ट पहात बसे ती, चिंतुनि बहु धनद पुरुष विट[10]लीला;
नैराश्य प्राप्त तिला होय, परविषयसुखास विटलीला. १९४
सु रतरत बहुधनप्रद नवनव पुरुषासि नित्य अनुसरली;
जागुनि भागुनि विटली, मागें व्हायासि धन्य जं[11]नु, सरली. १९५
'दे वा न भजुनि, भजल्यें पुरुषा तुच्छा, सु[12]दुर्नयारूढा;
हा! हा! श्रीजनकांच्या या नगरीं मीं च एकली मूढा. १९६
वा हुनि वपु घेइन मीं विकत श्रितकल्पनग; रमा यातें
तसि आवडेन; यासि प्रेमें लागेन मग रमायातें. १९७
यं द्यपि अमंगळा हे, आहे च सदा हि यासमीप रमा,

---

१. नाशकारक. २. अत्यंत. ३. मधाचें हरण करणारा. ४. लोकसंबधी. ५. व्याधाच्या गाण्यावर लुब्ध झालेल्या. ६. भ्रष्ट पावला. ७. कार्यांच्या. ८. रसासक्तिर्नैव हितकरोति मीनसूचितं मतं–**पंत.** ९. विंचवाला. १०. जारलीला. ११. जन्म. १२. अत्यंत अनीतिमझाला.

शरणागता म्हणुनि, परि, होइन आवडति यास मीं परमा. १९८

**न** र पापबुद्धि, शुद्धि श्री न जयां, जरि हि राय, ते काय ?
काळापुढें चि ज्यांचे ओगारिले[1] असति आयते काय'. १९९

**मो** हंतमाच्या[2] तपना पावे वेश्या मनांत निर्वेदा[3];
पात्रत्व अनिर्विण्णा[4] न सुखीं, दानीं जसें न निर्वेदा[5]. २००

**भ** व्य विचारें, अति सुख नैराश्य, मनांत पिंगळा समजे;
निजुनि निजे, शीतळ सुख सेज तिला प्रथम इंगळासम जे. २०१

**ग** मला तेव्हां चि प्रियवस्तुपरिग्रह यदा! भला न मला;
शमला काम, कुररगुरुशिक्षित[6] अपरिग्रहीं[7] च हा रमला. २०२

**व** दनीं धरितां आमिष, कुररातें अन्य कुरर झडपीती;
त्यजुनि सुखी होय; अशा या उपदेशामृता न जड पीती. २०३

**ते** दोन्हीं ही नसती मजला मानापमान, जो आधी
गृहसुतवंतांसि असे; माझी तों स्पर्शली नसे या धी. २०४

**बा** ळकसा स्वक्रीड, स्वैरति[8] असें मीं सुखी, नसें खिन्न;
हा आप्त होय, हा पर होय, असा भाव वाळिला[9] भिन्न. २०५

**सु** ख परम हें चि, शिवणें चिंतारूपा कदापि न तमा, जें
अज्ञा सर्वज्ञाचें साम्य; अशापरि असें चि मत माझें. २०६

**दे** खों आले स्वास; न सदनीं, कांडी तदर्थ शाळींतें;
आइक, करी कुमारी जें, बंधुयशोर्थ कष्टकाळीं, तें. २०७

**वा** जति शंखवलयें[10] बहु, काढी उरले हि, करिति रव[11], दोन;
एक चि ठेवी कंकण; शिकवी मज यांत, फार न वदोन. २०८

**य** ति बहु करिति कलह, बा! दोघांत हि होय खेददा वार्ता;
एकांतवास केवळ अमृताचा घन चि भेददावार्ता[12]. २०९

---

१. वाढले. २. अज्ञानांधकारनाशक [ कृष्णाला ]. ३. विरक्तीला. ४. औदासिन्यशून्य अशा. ५. वेदर्दीना. ६. कुरर (पक्षिविशेष) तद्रूप जो गुरु त्यानें शिकविलेला. ७. उपाधिराहित्यांत. ८. आपल्या ठिकाणीं रत असा. ९. दूर ठेविला. १०. शंखाचीं कंकणें. ११. आवाज. १२. द्वैतरूप वणव्यानें पीडिलेल्याला.

न वनवहर्षद भगवद्रूपीं एकाग्रता स्वचित्ताची,
द्वैतास्फूर्ति[1] समाधिस हेतु, गृहा जेंवि राशि वित्ताची. २१०
मो टें रज विक्षेपा[2] कारण, तम ही लया; न यां[3] उरवी
वाढुजि सत्व, जसें खळवैभव बहु पाठ बंधुची पुरवी. २११
भ द्रोपाय असा हा शिकलों, शरकारसुगुरुजवळून.[4]
यातें चि मीं निवालों, भुजग जसा चंदनासि कवळून. २१२
ग जर गजरथाश्वांचा, वाद्यांचा, जाय भूप जवळून,
नेणे चि, उजू करितां, शरकार पुरुष, शरासि कवळून. २१३
व सति गुहेंत अनियता[5], एकाकी, सावधान आचारें,
न कळों स्वरूप द्यावें; भाषण ही निर्पट अल्प साचारें. २१४
ते हे अहिगुण[6] शिकलों; वसतों, तो तेंवि, परकृतीं गेहीं;
कीं, असुख गृहारंभीं, हें ज्यास्तव नश्वरत्व त्या देहीं. २१५
बा! ऊर्णनाभि[7] पसरी, क्रीडोनि गिळी स्वयें चि ऊर्णा[8], तें
पाहोनि समजलों, जो माया करि, हरि, तया स्वपूर्णातें. २१६
सु चवी मज पेशस्कृद्भ्रमर[9] असें, कीट आपुल्या भैयानें[10]
होय स्वरूप; भक्त द्वेषी ही विष्णु, विष्णुच्या ध्यानें. २१७
दे ह हि गुरु, नित्यार्तिश्वशृगालकवळ[11] विरक्तिला हेतु;
सुविवेकास हि तत्वज्ञानें संसारसागरीं सेतु. २१८
वा खाणिले गुरु इहीं, दिधला सुविवेकदीप हा हातीं.
याची प्राप्ति नसे ज्यां, भूतें करिती तमांत 'हा हा!' तीं." २१९
य दुसि कथी दत्त, असा हृदयांत विवेक शुद्ध वागावा;
मागावा गुरुला, हा इतिहास चि नित्य उद्धवा! गावा. २२०
न मुनि सदा सद्रूपा, गुरुसि भजावें, धरूं नये मान,
न कळत्र 'मम' म्हणावें; हें किति? मागें करूं नये मान." २२१

---

१. द्वैताचें मावळणें. २. भ्रमा. ३. रज व तम यांस. ४. बाणकर्त्या उत्तम गुरूपासून. ५. ज्याला नियमन नाहीं त्याला. ६. सर्प. ७. कोळी. ८. तंतूला. ९. कुंभारीण माशी. १०. भयानें. ११. नित्य दुःख, कुत्रा, कोल्हा व त्यांचा घांस.

**मो** क्षप्रदासि उद्धव शुद्धवचें[1] प्रश्न करि नमूनि असा
कीं, 'नित्यमुक्त आत्मा जो, देवा! तो चि नित्यबद्ध कसा?' २२२
**भ** गवान् म्हणे, "न बंध हि मोक्ष हि; बा! बंध भासतो भोगें.
मदधीन तीन सत्वादिक गुण, जे या उपाधिंच्या[2] योगें. २२३
**ग** मलासे बंध जिहीं, या सत्वादिकगुणांसि जन्माया
मूळ, 'अनिर्वचनीया[3]' म्हणति जिला, हे चि होय मन्माया. २२४
**व** स्तु[4] नव्हे, मिथ्या हा बंध, असें जाण उद्धवा! साचें.
ऐसें कळणें, वळणें, हें फळ गुरुसदनशुद्धवासाचें. २२५
**ते** मोक्ष बंध ज्यांस्तव, विद्याविद्या अनादि मम शक्ती.
बंध अविद्येनें बा! विद्येनें मुक्तिची अभिव्यक्ती[5]. २२६
**वा** र्युपाधिकरितां[6] बिंबप्रतिबिंबभेद रविस घडे.
जळकृत कंपादिक जें, प्रतिबिंबाला चि जेंवि सकळ जडे. २२७
**सु** ज्ञा! प्रतिबिंबें जीं, त्यांसि परस्पर उपाधिनें भेद;
घट फुटतां, बिंबैक्यें प्रतिबिंबाचा जसा सरे खेद[7]. २२८
**दे** मन तसा अविद्येमाजि, प्रतिबिंब तो मदंश घडे;
जीव तया चि असे, जों तींत अविद्येकडून बंध झडे[8]. २२९
**बा**! त्या जीवाला चि, स्वाविद्योपाधिच्या चि भेदानें
नानात्व असे; सुज्ञा! कथिलें पहिलें असें चि वेदानें. २३०
**य** दुकुलजा! एकघटीं आकाश रजें धुरें भरे, न पर;
सुखदुःखासीं तैसे पावति, योगा न जीव जे अपर. २३१
**न** रवर्या! जीवेश्वरखग, नग हा देह, यांत आहेत;
कर्मफळ एक[9] खातो; त्यांत दुज्याचा[10] नसे चि बा! हेत. २३२
**मो** ह नसे एकाला; तो जाणे आपणा, परा हि, अगा!
जो फळ भक्षित नाहीं, भक्षी त्या, ज्ञान हें असें न, खगा. २३३

---

१. निर्दोषवाणीनें. २. मायेच्या. ३. सांगण्यास कठिण अशी. ४. सत्य. ५. स्पष्टता. ६. उदकादींच्या संबंधामुळें. ७. कंपादि खेद. ८. नाहींसा होई. ९. जीव. १०. परमात्म्याचा.

भ व त्या नसे, सतत जो विद्येसीं युक्त, शक्तिसीं [1]भवसा.
तो बद्ध, ज्या अविद्या भवडी, [2]वात्या जसी दिशा यवसा. २३४
ग गन घटीं, कीं स्वप्नजदेहीं, कवि असुन ही, न देहस्थ;
कुमति असे नसुनि जसा स्वप्नीं जागरण जों न दे हस्त. २३५
'व रिति गुणांसि गुण' म्हणे, जें घेती इंद्रियें स्वविषयातें;
'मीं घेतों' बुध न म्हणे; हे किति? जें अमृत तें हि विष यातें. २३६
ते गुण चि कर्म करिती; होय अबुध बद्ध; 'मीं' म्हणे 'कर्ता';
कां बंधन पावेना, दाटुनि होवूनि सेविता [3]हर्ता? २३७
वा टुनि घेत्यां, दीपक अन्न जसें जेवित्यांसि जेवविती,
साक्षित्वें, विषयातें सेविति त्यां इंद्रियांसि सेववितो. २३८
सु ज्ञ असक्त असुनि हि प्रकृतींत, जसा जळांत बा! सविता,
दीपक अलिप्त जैसा, जन्हि सर्वां सर्व अर्थ [4]भासविता. २३९
दे उनि विरक्ति[5]शाणें तीक्ष्णत्व [6]ज्ञानसदसितें, सुकवी
छेदी संशय जो, तो मायेचे ओंठ हा जपें सुकवी. २४०
बा होरि निवे विद्वान्, सर्व हि संशय समूळ तोडून,
स्वप्नासि जसा जागृत, हा देहादिप्रपंच सोडून. २४१
य त्नें [7]गतसंकल्पा, ज्याच्या प्राणादि वृत्ति, तो युक्त;
जन्हि त्यांसीं करि देहीं व्यवहार, तथापि होय तो मुक्त. २४२
न ष्टमति पीडितिल, बुध तद्देहा पूजितील अथवा, हे
जन त्या अविक्रिया सम; तन्मतिभू हा प्रपंचपथ वाहे. २४३
मो डेना स्थिति त्याची, निंदा किंवा न ये तया स्तवन;
लोकव्यवहारातें मिथ्या समजे, म्हणे [8]तयास्तव 'न'. २४४
भ रला शब्दब्रह्मीं न परब्रह्मीं भरे तरि श्रमला;
श्रमला पढोनि घोकुनि आत्मज्ञांला न सुज्ञ तो गमला. २४५

---

१. महादेवासारखा. २. वावटळ. ३. टाकणारा. ४. दाखविणारा. ५. वैराग्यरूप सहाणीनें. ६. ज्ञानरूप उत्तम खड्गाला. ७. निष्काम. ८. स्वीकारीत नाहीं–पंत. टीपेची खूण 'न' वर पाहिजे असें वाटतें.

गृ[1] रत न व्हे स्त्री तैसी, नाहीं मत्कीर्तिपात्र जी वाचा;
पोषी असीस जो, त्या वांटा बहु कष्ट मात्र जीवाचा. २४६
व स्तुविचार दृढ करुनि, देहाद्यध्यास[2] करिल जो दूर,
सर्वगतीं मद्रूपीं मन अर्पिल तो चि निश्चयें शूर. २४७
ते हे स्थिति आधीं तुज साधेना उद्धवा! तरि न साधो.
सर्व विहितें[3] कर्म करुनि, मज अर्पीं, हित तुझें करिन, साधो!. २४८
बा ढश्रद्धावान्[4] जन लाउनि, मम पारिसतो कथा, नातें.
सेवी यश, जेंवि गणुनि हित सर्पापरिस तोक थानातें. २४९
स्तु[5] शिवें जन्में कर्में मम गातो, तदनुकार जो करितो,
धर्मार्थकाम यांच्या आचरणातें मदर्थ जो धरितो; २५०
दे हीं विरक्ति, माझा ठायीं त्या प्राप्त होतसे भक्ती;
ध्यातो मज; सत्संगीं जसि, कोठें ही तसी नसे शक्ती. २५१
वा वरतां सेवेंत, द्रववितसे साधुपाद; यावरि[6] ती
मग त्यांची गुरुकन्या, गुरुशिष्या तेंवि, बा! दया वरिती[6]. २५२
य त्न न करितां पावे मज सुजना बहु न मानला उशिर,
मत्प्राप्तिकाम[7], सज्जनचरणांतें, त्यजुनि मान, लाउ शिर." २५३
न मुनि पुसे उद्धव कवि कीं, "ज्याच्या, 'हाय!' कळि वदे, वातें,
साधु कसा? भक्ति कसी? तुज मत जें काय, कळिव देवा! तें." २५४
मो क्षद म्हणे, "सदय, जो कोणाचा ही करी च ना द्रोह,
नांदे क्षमा जयाच्या हृदयीं, तो साधु नाशितो मोह. २५५
भ व्यबळ सत्य ज्याचें, नित्य असूया[9]दिरहित जो काय,
सुखदुःखांत सम सदा, ज्याचा सर्वोपकाररत काय; २५६
गा डबडिना कामांहीं, सुमृदु, सदाचाररत, सदा दांत[10],

---

१ गृहस्थ, कुलीन. २. [आत्म्याच्या ठिकाणी] देहादींचा आरोप. ३. शास्त्रोपदिष्ट. ४. अत्यंत श्रद्धायुक्त. ५. सुमंगल. ६. अन्वयार्थ? ७. माझ्या लाभाची इच्छा करणारा. ८. मान्य. ९. परोत्कर्ष सहन न होणें इत्यादि दोषानीं रहित. १०. दमनशील.

ईष्ट[1], क्रियारहित, मितभोक्ता, जो भी परिग्रहा[2], शांत; २५७
व तें स्वधर्ममार्गीं, माझा आश्रित, सदा करी मनन,
जो सावधान, पावे न विकार, मनांत ज्याचिया जन न; २५८
ते वीं च विपत्तींत हि दीन नव्हे, जो क्षुधा तृषा शोक
मोह जरा मृत्यु इहीं केला नाहीं च उद्धवा! ओकें[3]; २५९
वा हेना मान, करी इतरांचा मान, बोधनीं[4] दक्ष,
वंचक नव्हे, प्रवर्ते धरुनि दयेचा चि नित्य जो पक्ष; २६०
सु ज्ञानी जो, माझ्या ध्यानीं, थानीं मुला तसी गोडी;
गुणदोषज्ञ हि 'भक्ति च हित करिल,' म्हणे, स्वधर्म ही सोडी; २६१
दे व जसा मीं, तत्वें जाणुनि जाणुनि पुनःपुन्हां, भजते
जे जन अनन्यभावें बहुसंमत भक्ततम[5] सदा मज ते.” २६२
वा खाणी साधूंचीं, भवपारद देव, लक्षणें तीस;
वर्णी, जीच्या त्याजिले न च नारद देवल क्षणें[6], तीसें[7]. २६३
'य दुकुलजा! भक्ति असी, माझ्या प्रतिमा, तथा मदीय जन,
यांचें स्पर्शन दर्शन तत्परिचर्या हि सुरनदी[8] यजन, २६४
न मन, स्तुति, गुणकर्में यांचें कीर्तन हि, मत्कथाश्रवण,
येथें श्रद्धा असणें, मद्ध्यानीं चित्त सर्वदा प्रवण[9]. २६५
मो दें अर्पण सर्वप्राप्तार्थांचें मला चि जें करणें,
दास्यें आत्मनिवेदन, कथनीं माझ्या कथांचिया भरणें. २६६
भँ[10] र बहु असणें, येतां जन्माष्टम्यादि मंगळें पर्वें;
अतिउत्सवें भरावीं पर्वें तैसीं च वार्षिकें[11] सर्वें. २६७
गँ[12] रज न करितां, दीक्षा व्रत यांतें परमआदरें धरणें;
आपण मूर्तिस्थापन, उद्यानादि[13] हि, मिळोनि वा करणें. २६८

---

१. हृष्ट (?). २. वस्तुसंग्रहास. ३. वसतिस्थान. ४. ज्ञानदानी. ५. उत्तम भक्त. ६. सुखानें. ७. त्या भक्तीस. ८. गंगासमा परिचर्या—पूजन—**पंत**. ९. तत्पर. १०. उत्सवातिशय. ११. प्रतिवर्षी येणारीं. १२. उणीव. १३. [ शोभेसाठीं ] बाग इत्यादि.

**व** जैन हि केलियाच्या कथानाचें आणि दंभमानांचें;
परम प्रेम हि पुष्पावळिदीपावळिसदन्नदानांचें.' २६९
**ते** वीस आणि सत्त प्रभुनें भक्तिप्रकार चाखविले,
पूजास्थानें एकादश सूर्यादिक पदार्थ दाखविले. २७०
'**बा**! तुज रहस्य कथितों, सत्संग चि देतसे नवशमातें;
हा जेंवि करी, करिती योगादिक ते तसे न वश मातें. २७१
**सु** स्वरूप पावले मज सत्संगें दैत्य राक्षस क्रूर;
गंधर्व अप्सरा मृग खग अहि, ज्यां शांतिची कथा दूर. २७२
**दे** वांतिल जे गुह्यक विद्याधर सिद्ध साध्य चारण जे,
वैश्य, स्त्रिया हि, शूद्र हि, ते ही बहु पावतात, वै[1]रण जे. २७३
**बा** चेनें हि न ज्यांसीं व्यवहार बरा, असे हि जे पापी,
त्या त्या युगांत राजस तामस त्यां मत्पदीं च हा[2] स्थापी. २७४
**य** श वृत्रप्रह्लादप्रमुखांचें ख्यात साधुसंगानें;
बळिबाणांचें स्तविलें जें त्यां हि महाविभूतिरंगानें[3]. २७५
**न** वल चि सत्संगाचा महिमा; मज पावला चि वृ[4]षपर्वा;
तैसा चि मय, बिभीषण, सुगळ[5], हनूमान् हि; हें विदित सर्वां. २७६
**मो** टें ऋक्षा[6], गृध्रा, त्या हि गजा, यश मिळे तुलाधारा[7],
न गमो चि उद्धवा रे! तो धर्मव्याध ही तुला धारा[8]. २७७
**भ** क्ता कुब्जा, त्या ही गोपी, त्या दीक्षितांचिया भार्या,
वेद, व्रत, तप, नसतां सत्संगें पावल्या मला आर्या. २७८
**ग** तिपात्र साधुसंगप्राप्तें प्रेमें चि केवळें, गोपी
नग खग मृग भुजग पशु हि, सत्संगतिनें चि मुक्ति बा! सोपी. २७९
**ब** हु योग सांख्य दान व्याख्या स्वाध्याय यज्ञ संन्यास
व्रत तप उपाय यांहीं प्राप्त सैयत्ना[9] हि मीं न अैन्यास. २८०

---

१. इत्ती. २. सत्संग. ३. महाविभूतीच्या आहेत लीला ज्याच्या त्यानें. ४. दैत्यांचा राजा. ५. सुग्रीव. ६. अस्वलाला (जांबवंताला). ७. तराजू आहे [जीवनाचा] आधार ज्याचा त्याला (वैश्याला). ८. धाकटा, लहान. ९. यत्नशील असा अन्यास.

**ते** व्हां मजहुनि अन्या सुखद असें देखती न त्या अबळा,
जेव्हां अक्रूर रथीं वाहुनि, मथुरेसि ने मला सबळा[1]. २८१
**वा** टत होत्या, माझ्या योगें, रात्रि क्षणार्धशा अल्पा,
कल्पापरि विरहीं त्या; गोपी अंगार[2] मानिती तल्पा[3]. २८२
**सु** त, पति, हा लोक, तसा परलोक हि, नेणति स्वदेहातें;
गेहातें न वळखती, वृंदावन गोपिकांसि दे हा[4]! तें. २८३
**दे** ति समाधींत बुडी मुनि, नेणति नामरूप ते जेंवी.
गोपींचा मोह हि तो सुसमाधिस माजिया चि तेजें वी. २८४
**वा** रिधिमाजि नद्याशा, प्रेमें मजमाजि गोपिका भरल्या,
मजला जार समजल्या, न ब्रह्म असें, तथापि त्या तरल्या. २८५
**य** द्यपि सुदुर्लभ, असें सुप्रेमें सुलभ, यापरि सदा मीं;
किंबहुना? बा! लागे बांधुनि घेणें हि या हरिस दामीं[5]. २८६
**न** लगे, सप्रेम भजन सोडुनि, बहु अन्य योग याग मला;
प्रेमोपायन घेउनि, भेटाया धन्य यो, गया[6] गमला. २८७
**मो** कलुनि विधि, निषेध, श्रोतव्य[7], श्रुत हि, मज चि ये शरण;
स्मरण करीं, अकुतोभय[8] तुजला करितील आमुचे चरण.' २८८
**भ** क्तशिरोमणि उद्धव विभुसि म्हणे, "संशयासि तोडावें
कीं, 'कर्म करावें' हें सांगुनि, म्हणतोसि 'कर्म सोडावें.'" २८९
**ग** रुडरथ म्हणे, 'साधो! मीं ईश्वर जेधवां स्वमायेतें
वरितों, प्रपंचरूपें स्फुरणें मज पुरुषसत्तमा येतें. २९०
**व** र्ते प्रपंच जो हा, याचा अध्यास[9] जेथवरि वागे,
जीवां अनाद्यविद्यायोगानें कर्तृभोक्तृपण लागे. २९१
**ते** व्हां च विधिनिषेधप्राप्ति असे, म्हणुनि चित्त शोधाया
कर्में कथिलीं, साधो! समज बरें, तूं चि योग्य बोधा या. २९२

---

१. बळरामासहित अशा. २. निखारा. ३. शय्येला. ४. दुःख. ५. दाव्यानीं. ६. पितरांसि सद्गतिप्रद–**पंत.** ७. ऐकण्यास योग्य असें (ऐकावयाचें राहिलेलें). ८. कोठून हि भय नाहीं असा. ९. मिथ्या आरोप.

**वा** ! चित्तशुद्धि होतां, वाराया कर्मजाड्य[1], मद्भजनीं
विक्षेपककर्मादर[2] या वदलों योग्य माजिया न जनीं. २९३

**सु** दृढें विश्वासें मज भज कर्में त्यजुनि; भक्ति तारील.
कां क्षुद्रोपाय सुधातृप्ति करिल, सर्व ताप वारील? २९४

**दे** त्ये विद्या दर्शन[5], तेव्हां कर्तव्य सर्व आटतसे;
वाटतसे कांड[3] थिटें[4], आपण सर्वत्र पूर्ण दाटतसे. २९५

**वा** टे तुला गुणत्रयवृत्ति प्रतिबंधक, प्रसिद्ध असें
असतां, या विद्येचें होणें उत्पन्न हें घडेल कसें? २९६

**य** त्नें प्रकृतिगुणत्रय हें, सत्वें रज हि तम हि, बुडवावें,
सत्यदयावृत्ति शमात्मकसत्वानें चि सत्व उडवावें. २९७

**न** यनींचा मळ झडतां, जैसा अर्थप्रकाश बहु होतो,
तैसा विवृद्धसत्वें[6] धर्म हि, मद्भक्तिरूप गुरु जो तो. २९८

**मो** डुनि असात्विकांचा प्रेमा, सात्विक पदार्थ जे, त्यांचें
सेवन सत्वगुणातें वाढवितें, तद्विपक्षजेत्यांचें[7]. २९९

**भ** क्तिस्वरूप धर्म प्रकटोनि, अधर्म सर्व ही नासी.
त्या निर्मूळा संभव[8] तेंवि नसे, जेंवि गर्व हीनासी[9]. ३००

**ग** णिले गुणहेतु[10] दहा, शास्त्र उदक जन हि देश काळ तथा
संस्कार जन्म कर्म ध्यान मनु[11] हि; यांत जाण साधुपथा. ३०१

**व** दती वृद्ध जयातें उत्तम, तें सत्व; निंदिती, तम तें;
स्तविति न निंदिति हि जया, उरलें त्रिगुणांत रज, असें गमतें. ३०२

**ते** दश पदार्थ सात्विक, ऐसे कीं शास्त्र जें निवृत्तिपर,
सेवावें तें चि जनें, प्रवृत्ति[12]पाखंडशास्त्र घातकर. ३०३

---

१. कर्मानें येणारें मांद्य. २. भ्रमोत्पादक असा कर्माविषयींचा आदर. ३. ब्रह्मांड. ४. अल्प. ५. पदार्थज्ञान. ६. वाढलेल्या सत्त्वगुणानें. ७. त्या सत्त्वगुणाचे जे शत्रु त्याना (रजोगुण व तमोगुण याना) जिंकणाऱ्यांचें. ८. उत्पत्ति. ९. धनविद्यारहिताला. १०. सत्त्वादिगुणांचीं कारणें. ११. मंत्र. १२. प्रवृत्तीला कारण असा नास्तिकवाद.

वा रि बरें तीर्थाचें; गंधोदक, मद्य, हें न सेवावें.
जन हि निवृत्त चि कर्मठ; सुमलिन तत्प्रेम दूर ठेवावें. ३०४
सु विविक्तदेश सात्त्विक, रथ्या द्यूतस्थळादि हे खोटे;
ब्राह्म मुहूर्त हित; निशामुख आणि निशीथकाळ हे तोटे. ३०५
दे हिहित नित्यकर्म चि; कर्में काम्याभिचारिकें दुष्टें,
सेवूं नयेत, जैसीं कीं भस्में पुष्टिनाशकें पुष्टें. ३०६
वा! जन्म विष्णुदीक्षाशिवदीक्षारूप होय, हें शुद्ध;
जें शाक्ततुच्छदीक्षारूप, तयातें न इच्छिती बुद्ध. ३०७
यें क्षपनरसखमूर्तिध्यान भलें जाण सात्त्विक स्पष्ट,
स्त्रीध्यान, अरिध्यान हि वाढवितें फार उद्धवा! कष्ट. ३०८
न भले काम्य क्षुद्र; प्राज्ञा! प्रणवादि मंत्र हा युक्त.
संस्कार आत्मशोधक देहीं, गेहीं च तो नव्हे उक्त. ३०९
मो ह झडे, काळ दडे, निर्मळ मद्भक्तिरूप धर्म घडे;
मग मत्प्रसाद होतां, जें परमज्ञान तें गळां चि पडे.' ३१०
भ क्त पुसे, 'पुरुषार्थ प्रभुजी! जरि सात्त्विकीं असा आहे,
जाणुनि दुःख हि सेविति जन राजसतामसांसि कां बा! हे?' ३११
ग दबंधु म्हणे, 'सुज्ञा! होतां देहादिकीं अहंबुद्धी,
व्यापी मना रज, करी संकल्प विकल्प तें उडे शुद्धी. ३१२
व ह्नि तसा काम बुधा! विषयगुणध्यानमारुतें खवळे.
दुःख असें जाणुनि ही कर्में करि जड, कदापि तो न वळे. ३१३
ते जस्वी, स्वमना जरि होतो विक्षेपें, मोह जावरितो;
विषयीं दोष पहातो, अनलस होउनि विरक्तिला वरितो. ३१४
वा ट मम ध्यानाची, हळुहळु अनळस, मनास जो लावी,
विषयविरक्ति तयाच्या त्या स्वांताला सुखें चि बोलावी. ३१५

---

१. अंतर्मुख. २. अत्यंत एकांतस्थान. ३ रस्ता. ४. सायंकाळ. ५. मध्यरात्र. ६. आत्महित. ७. सहेतुक आणि जारणमारणादि. ८. शक्तिपंथांतील. ९. शिव व विष्णु यांच्या मूर्तीचें ध्यान. १०. भ्रम. ११. मनाला.

**सु** त विधिचे सनकादिक मच्छिष्य, तिहीं असा चि हा योग
मद्ध्यानरूप [1]सदगद दिधला जायासि भवमहारोग.' ३१६

**दे** वालि म्हणे, 'कोणा रूपें त्वां सदुपदेश हा केला?
बा! पावलासि केव्हां, त्यांच्या तूं यदुपदेश हाकेला?' ३१७

**वा** रिजदलनयन म्हणे, "पूर्वी विधिला कुमार मुनि चवघे
पुसती, ज्यांची योगीं मति, जेंवि शिवीं उमा, रमुनि चव घे. ३१८

**'य** त्न कसा काय असे? येथें विषयांत मन सदा शिरतें;
विषय हि मनांत शिरती; अन्योन्य प्रेम हें कसें फिरतें?' ३१९

**न** सुचे उत्तर, मग करि विधि माजी संकटांत आठवण;
म्हणुन चि मज वंदुनि, कवि अष्टांगीं करुनि घेति आठ वण. ३२०

**मो** ह हराया गेलों मीं, त्या विधिजवळि हंसरूपें चि,
श्रम ज्यास, मत्प्रतापज्वलनाला जेंवि कंस [2]रू [3]पेंची. ३२१

**भ** व्यग्रभा मला ते, विधिसि पुढें करुनि, पूजिती नमुनी,
'तूं कोण?' असें पुसती, [4]जे, न म्हणे [4]स्वर्गपू जितीन, [4]मुनी. ३२२

**ग** रुडासन मीं वदलों:–प्रश्न असा विप्र हो! कसा घडतो?
कीं वस्तु एक, नाना न; उपाधि हि भूतसंघ जो, जड तो. ३२३

**व** स्तु परम कारण जें, संघें[5] तदात्मक चि होय भूतांचा[6].
प्रश्न व्यर्थ चि तुमचा; यासि न मानी विचार पूतांचा. ३२४

**ते** ते पदार्थ सर्व हि मीं चि असें, येति अनुभवाला जे;
मजहुनि भिन्न म्हणाया, पुरुष, [7]सुगुरुलब्धमनु भवा लाजे. ३२५

**वा** रिजभवासि पुसिलें जें काय तुम्हीं यथार्थ आतां, तें
परिसा; परि सावध व्हा चुकवाया बह्वनर्थपातांतें. ३२६

**सु** त हो! चित्तांत विषय, चित्त हि विषयांत, हें खरें आहे.
सुटति परस्पर त्याचे, स्वात्म्यास ब्रह्मरूप जो पाहे. ३२७

---

१. उत्तम औषध. २. कापूस. ३ पेंचांत (संकटात) आणी. ४. जे मुनि जितीन असें अमरावती न म्हणे; परमविरक्त कुमार–**पंत.** ५. पंचभूतसमुदाय. ६. निष्पापांचा–मुक्तांचा. ७. उत्तम गुरूपासून प्राप्त झाला आहे मंत्र ज्याला तो.

दे हादि सर्व मिथ्या, साक्षी ब्रह्मस्वरूप हा जीव,
येतें असें अनुभवा, द्रवतां गुरुराजपादराजीव. ३२८
वा[1] सवजाळ तसें हें दिसतें, परि सर्व अनृतसें कळतें;
मद्रूप भजुनि होतां चित्त, विषयसंगत स्वयें टळतें. ३२९
य ज्ञेश्वर मीं ऐसें वदुनि, करुनि न्हावया सुखनिवाडा,
गेलों वैकुंठाप्रति, जो माजा श्रीदयासुखनि[2] वाडा." ३३०
न रहरिस पुसे भक्त, 'श्रेयाचीं[3] साधनें श्रुतिज्ञानीं
बहु कथिलीं; सर्वांची[4] कीं एकाची करी स्तुति ज्ञानी? ३३१
मो क्षाचें साधन, तूं, निजभजन चि, म्हणसि, इतर ते इतर;
हित रक्षक दासांचा तूं लिवडुनि सर्व मुख्य तें वितर.' ३३२
भ गवान् म्हणे, "दिलि विधिसि पहिलि मदात्मकसुधर्मखनि[5] वाणी;
तो मनुसि, मनु हि भृगुमुखसप्तमुनींद्रांसि दे, न करि वाणी[6]. ३३३
ग र्भीं त्यांच्या झाले जे देवासुरनरप्रमुख सारे,
ते ते त्यात्यापासुनि, त्या मद्वाणिस पावले बा रे!. ३३४
ब हुविध सात्विक, राजस, तामस, ते जन, तिहीं जसी सुचली
तैसी श्रुतिची व्याख्या केली, नाना तशा तशा रुचली. ३३५
ते मायामोहितमति, अध्ययनरहित, परंपराबुद्धी,
किति वेदविरुद्ध वदति; पांखडी, त्यांसि तों नसे शुद्धी. ३३६
वा त्स्यायन 'काम' म्हणे; मीमांसक म्हणति 'मुख्य तो धर्म;'
जे दंडनीतिकर्ते, 'सामादि उपाय, भाग्य हें शर्म.' ३३७
सु यश श्रेयःसाधन, काव्यालंकारकार हें गाती;
जे योगशास्त्रकर्ते, ते शम, दम, सत्य, यां बहु ध्याती. ३३८
दे हाचें पोषण हें लोकायतिकांसि[7] मानलें फार.
यम, नियम, यज्ञ, दान, व्रत, तप, कितिकांसि भासलें सार. ३३९
वा! यांचीं काय फळें? आधीं मध्यें सुदुःखदें अंतीं.

---

१. इंद्रजाल. २. लक्ष्माच्या दयेचो उत्तम खाण च असा. ३. मोक्षाची. ४. दे. ५. मत्स्वरूप सुधर्माची खाण. ६. कमतरता. ७. चार्वाकमतानुसाऱ्यांस.

याकरितां मद्भक्ति च वरिली, सोडूनि सर्व ही, संतीं. ३४०
**य** ज्ञस्वरूप यज्ञ प्रभु परमानंदरूप जो हा मीं,
स्फुरलों स्वात्मत्वें; तरि तें सुख विधिचिया हि बा! नसे धामीं[1]. ३४१
**न** सुख असें अन्यांचें, त्या त्या लोकीं च त्यांसि तें स्वल्प,
माझ्या भक्ताचें तों परिपूर्ण, सरे न लोटतां कल्प. ३४२
**मो** क्ष हि भक्त न वांछी; ब्रह्मादि पदें तयासि मग काय?
भक्ताला परम प्रिय मीं च चतुर्बाहु हा सुभगकाय[2]. ३४३
**भ** क्त जसा तूं प्रिय मज, न बळ, न शिव, न विधि, उद्धवा! न रमा.
न रमाया मजला हे माजी बहु होय मूर्ति ही परमा. ३४४
**ग** मन करितसें मागुनि सच्चरणरजें विशुद्धिचीं धामें,
करिन मदंतर्वर्तिब्रह्मांडें शुचि, अशाचिया कामें. ३४५
**ब** हु सुख मद्भक्ताचें, त्याचें त्यास चि कळे, न अन्या तें.
मोक्षाची हि अपेक्षा ज्या नाहीं, योग्य त्या चि धन्यातें. ३४६
**ते** उत्तम राहोत, प्राकृत ही भक्त, जो तशाला हे
मद्भक्ति विषय बाधों दे न, अविद्या चि कीं कैशा[3] लाहे. ३४७
**बा** उद्धवा! जरि विषय चिंतुनि, मद्भजन जन करीती तें,
अग्नि तृणें, तेंवि अघें, जाळुनि दे त्यांसि जनकरीतीतें[4]. ३४८
**सु** खकर परमश्रेयःसाधन ऐसें नसे चि बा! इतर.
मीं भक्तिनें चि होतों वश भक्ता, जेंवि सत्सुता पितर." ३४९
**दे** व असा बहु वर्णी, स्वमुखें निजभक्तभक्तिपरमहिमा
ध्यानगति पुसे उद्धव, जी शमवी सर्व ताप, परम हिमा[5]. ३५०
**वा**[6] सवनीलनिभ वदे, 'कथितों ध्यानप्रकार सभ्यास.
वायु जिणावा, प्राणायामाचा प्रथम करुनि अभ्यास. ३५१
**य** त्नेंकरूनि, मुकुलित[7] जें रंभापुष्पसें[8] अधोवदन,

---

१. गांवीं. २. सुंदर आहे शरीर ज्याचें असा. ३. चाबूक. ४. जनकाला ज्या मार्गानें मोक्षप्राप्ति झाली त्या मार्गाला. ५. थंड. ६. इंद्रनीलमण्यासारखा जो श्यामवर्ण तो (कृष्ण). ७. मिटलेलें. ८. केळफुलासारखें.

तें ऊर्ध्वमुख ध्यावें, हृत्कमळ ध्येयमूर्तिचें सदन. ३५२

**न** ख, चरण, गुल्फ[1], पीतांबर, कटितट, नाभि, उदर, उर, भावें,
गल, भुज, मुख, नासा, श्रुति, नयन, निटिलें[2], शिर, सुरूप हें ध्यावें.

**मो** चै[3]यापुष्पसमानीं अष्टदळीं विकसितीं हृदयनलिनीं
श्रीवत्स, श्रीकौस्तुभमाळा, जी सेविली सतत अलिनीं; ३५४

**भ** व्यप्रभ नूपुर, मणिमय कांची[4], कुंडलें, मुकुट, कटकें[5],
ध्यातां मज घननीळा, विघ्नांचीं नाश पावती कटकें. ३५५

**ग** ति अभ्यासें ध्यानीं होतां, स्मि[6]तमात्र विमल चिंतुनि घे.
होसील मीं च येणें, हृदयांतिल बा! अशेष किंतु निघे. ३५६

**व** श करुनि इंद्रियें, मन लावी, जो श्वास जिणुनि, मद्ध्यानीं,
त्याचें काय करावें, सावध असतां स्म[7]रादिवध्यानीं? ३५७

**ते** व्हां विघ्न कराया, अणिमामहिमादि सिद्धि ज्या आठ,
अन्या हि पंच, दश, बा! योग्याची पुरवितात त्या पाठ. ३५८

**वा** हविती, सिद्धि करिति माझ्या प्राप्तींत अंतरा[8]यातें.
प्रथम चि विदित असावें, त्यांचें अहितत्व संतराया! तें.' ३५९

**सु** मति जन भजुनि जेथें पावति सिद्धीसि, त्या निज[9]विभूती,
कथि विजँ[10]यापरि या[11], करि करुणा, जाणोनियां निज विभू[12]ती. ३६०

**दे** व म्हणे, 'मीं आत्मा, मीं ईश्वर, मीं सुहृत्, समज साधो!
सर्व हि भूतें मीं, हा मत्करुणेनें तुला समज साधो. ३६१

**बा!** भूतांच्या स्थितिचा, उत्पत्तीचा, तसा चि नाशाचा,
मीं हेतु, करिति वश जे, त्यांमध्यें काळ होय हा साचा. ३६२

**य[13]** व ओषधींत तो मीं, कांचन धातूंत, विप्र वर्णांत',
कांहीं अधिका प्रभु कथि उद्धवजीच्या विभूति कर्णांत. ३६३

**न** घडे विभूतिकथन, प्रभुस हि, अजि! कीं तयां नसे अंत.

---

१. घोंटा. २. कपाळ. ३. कदली—**पंत.** ४. करदोटा. ५. कडीं. ६. किंचित हास्य. ७. कामादींकडून वध केले जाणारे ( मानव ) त्यानीं. ८. विघ्नाला. ९. आपले अंशावतार. १०. अर्जुनापरि. ११. उद्धवा. १२. प्रभु. १३. सातू.

तेज श्री अकरा[1] गुण, यावरुनि विभूति जाणती संत. ३६४

**मो** हनिवर्तक, निश्चित साधन निजभक्तिचें, असा धर्म

कथिला प्रभुनें, ज्याचें श्रवण श्रोत्यांसि अशनिचें वर्म[2]. ३६५

**भ** जन करावें हरिचें, धर्म कृतयुगांत मुख्य हा पहिला.

वर्णाश्रमधर्म तयावरि झाला, हा हि तारितो वहिलों[3]. ३६६

**ग** ति निजभजनें चि घडे, या ही वर्णाश्रमांत तें साधे.

ऐसें प्रभुनें कथिलें, जेणें वसतां भवीं, न भव बाधे. ३६७

**व** नंदनिभ[4] वनरुहाक्ष[5] प्रभु सांगे ब्रह्मचारिगुरुधर्म.

तेसें चि गृहस्थाचें, साधन जें आत्मभक्तिचें कर्म. ३६८

**ते** ज जयांत बहु असा प्रभु वानप्रस्थधर्म मग कळवी.

जो प्रसउनि हरिभक्तिस, गौरीजनकागमद[6] यशें पळवी. ३६९

**बाँ**[7] हस्पत्याला मग कथिला यतिधर्म, भक्ति जोडाया;

साक्षात्कारानंतर तें हि ज्ञानादि सर्व सोडाया. ३७०

**सु** त होउनि धन[8] घेतो, भजनें वश करुनि सुनर पितयातें.

तो भक्तियोग उद्धवभक्त पुसे, नमुनि, पुनरपि तयातें. ३७१

**दे** व म्हणे, 'अमृत कथा माझ्या, श्रद्धा असो सदा यांत.

शिशु करिति बहु वसाया मातांत, तसा न सोस दायांत. ३७२

**वा** ढावें प्रेम बहु श्रवणीं, तैसें चि कीर्तनीं, सजणें[9].

आत्मा मम स्तवें सुख पावावा, सजण[10] तो जसा सजणें. ३७३

**य** त्नें माझी पूजा, परिचर्या, नित्य आदरें प्रणती,

पूजा मद्भक्तांची, मत्पूजेहूनि समधिका पण ती. ३७४

**न** रवर्या ! सर्वा ही भूतीं, मन्मति सदैव हि वसावी.

बा ! लौकिक क्रिया ही, नित्य मदर्थी च सादर असावी. ३७५

---

१ तेज, श्री, कांति, ऐश्वर्य, ह्री, त्याग, सौभग, भग, वीर्य, तितिक्षा व विज्ञान असे अकरा. २. वज्राचें कवच. ३. सत्वर. ४. मेघासारखा ( श्यामवर्ण ). ५. कमलनेत्र. ६. पार्वतीचा पिता तद्रूप जो पर्वत ( हिमाचल ) त्याचा गर्व. ७. उद्धवाला. ८. जिनगी. ९. सिद्ध होणें. १०. सज्जन.

मो ह्या प्रेमें मद्गुणकथन, वचें लौकिकें हि संतत रे !
भाषण असो, भलतसें, गातां मत्कीर्ति होय संत, तरे. ३७६
भ क्तिसुखार्थ मन मला अर्पावें; काम सर्व सोडावे.
जे मद्भजनविरोधी सुखभोग, तयांसि हात जोडावे. ३७७
ग [1]जंकरबाहो ! बा ! हो कांहीं, मद्भक्तिहेतु सारें च,
[2]हुत, दत्त, मदर्पित, जें; भक्ति सुधा निववि हे [3]तुसारें च. ३७८
ब हु काय वदों ? यापरि करितां, मद्भक्तिरूप सव घडतो.
अवघड मद्भज[4]नसुसर मूढां, परभजनकूप सवघड तो. ३७९
ते हे मद्भक्ति, अशा धर्मांहीं प्राप्त होय ज्या, त्यातें
काय उणें ? जें भक्ता भक्ति न दे, श्री हि तोय[5]जा त्या तें. ३८०
वा [6]रिरुहीं मधुप तसा, माज्या रूपीं च दे मना जो गा !
धर्मविरागैश्वर्यज्ञानें जीं होय या धनाजोगा. ३८१
सु मते ! तें चि मन दिलें, देहागेहाकडे तरि स्पष्ट
कष्टप्राप्ति, अधर्मप्राप्ति, पुरुष होय नि[7]जसुखभ्रष्ट. ३८२
दे तो मद्भक्तिस जो साधुनि, उत्कृष्ट तो चि बा ! धर्म.
आत्मा एक चि दावी जें, तें चि ज्ञान देतसे शर्म. ३८३
वा युसम गुणांत नव्हे सक्त पुरुष पुरुषसत्तमा ! जेणें,
वैराग्य तें चि, अणिमादिक तें ऐश्वर्य, हें मनीं घेणें.' ३८४
य दुपतिस पुसे उद्धव, 'कतिवि[8]ध यमनियमशमदमादि कसे ?'
याचें उत्तर दे प्रभु, जेणें बुधहृदय पद्मसें विकसे. ३८५
'न यनिपुणा ! [9]अस्तेय, स्थैर्य, अहिंसा, क्षमा, अभय, लज्जा,
मौन, असंग, असंचय, आस्तिक्य, ब्रह्मचर्य, [10]ऋत, [11]सज्जा ! ३८६
मो टी गुरुसेवा, जप, तप, तीर्थाटन, मदर्चन हि, शुचिता,

---

१. हत्तीच्या सोंडेसारखे आहेत बाहु ज्याचे अशा. २. हवन केलेलें. ३. तुषारानें. ४. मद्भक्तिरूप उत्तम सरोवर. ५. समुद्रकन्या लक्ष्मी. ६. कमलीं. ७. मोक्षच्युत. ८. किती प्रकारचे. ९. चोरी न करणें. १०. सत्य. ११. सदुत्पन्ना उद्धवा-पंत.

होम, परार्थोद्योग, श्रद्धा, आतिथ्य, तुष्टि ही उचिता. ३८७
**भ** व्य यम नियम हे वा! बारा, बारा, असें मनीं आण.
जी मति मदेकनिष्ठा, हा शम; न उगी च शांति हे जाण. ३८८
**ग** तिरोध इंद्रियांचा दम, न च चोरादिदमन हें मात्र.
सुतितिक्षा विहितासुख[1]सहन चि, भारें न शिणविणें गात्र. ३८९
**ब** हु जिह्वोप[2]स्थांचा धरणें जो वेग, हे चि होय धृती;
न अनुद्वेग चि केवळ, समजेल असें यथार्थ तो चि कृती. ३९०
**ते** वीं च दान भूतद्रोह न करणें; धनार्पण चि नोहे.
भोगोपेक्षा चि तप न कृच्छ्रा[3]दि; मदुक्ति तुज मता हो हे. ३९१
**बा**! शौर्य वासनाप्रतिबंध चि, विक्रम नव्हे, असें समज.
सत्त्व ब्रह्मा[4]लोचन; भाषण चि यथार्थ मान्य तें न मज. ३९२
**सु** गुणा! ऋत समजावें हें कीं, सत्या प्रिया हि जी वाचा.
कर्मीं असंग, शौच; त्याग हि, सन्यास विभ[5]व जीवाचा. ३९३
**दे** [6]ही जे यांचें धन धर्म चि, पश्वादि धन न, दे तापा.
मीं यज्ञ, ज्ञानाचें देणें जें, हे चि दक्षिणा बापा!. ३९४
**वा** [7]तायाम चि पर[8] बळ; बा! परदुःखप्रहाण[9]काम दया.
वैभव, मम षड्[10]गुण हें मानी ज्ञाता; प्रसिद्ध जें न तया. ३९५
**य** द्यपि पुत्रादि म्हणति लाभ, नव्हे; आधि दुःख या लाभें.
मद्भक्तिलाभ उत्तम; कल्पांतीं ही नसे चि याला भें. ३९६
**न** ज्ञान मात्र विद्या; विद्या भेदप्रतीतिचा[11] बाध.
हेय[12]त्वमति अकर्मी, हे ही[13] मुख्या, इला चि तूं साध. ३९७
**मो** टें मंडन[14], जे गुण निरपेक्षत्वादि; न वलयादि[15]नग.

---

१. प्राप्तदुःखाचें सहन. २. जिह्वा व गुह्येंद्रिय यांचा. ३. व्रतविशेषादि. ४. ब्रह्मविचार. ५ उत्कर्ष. ६. देह ज्याला आहेत ते. ७. प्राणायाम—**पंत**. ८. उत्तम. ९. दुसऱ्याचें दुःख निवारण करण्याची इच्छा. १०. ऐश्वर्यादिकरून सहा गुण. ११. [ जीवात्म्यांतील ] द्वैतज्ञानाचा. १२. त्याज्यबुद्धि. १३. लज्जा. १४. भूषण. १५. कडें आदिकरून अलंकार.

सुखदु:खातिक्रम जो सुविचारें, हा चि सुखसुमेरुनग. ३९८
भ द्रा! तूं जाण विषयभोगापेक्षा चि दु:ख, न च अन्य,
जें अग्निदाहसंभव किंवा जें वृश्चिकादिविषजन्य. ३९९
ग लिताहंकृति जाणे बंधा मोक्षासि, अनुभवीं चढला,
तो पंडित; इतर नव्हे, जऱ्हि पुष्कळ शास्त्र सर्व ही पढला. ४००
व सला देहीं गेहीं, मीं माझें म्हणुनि, जाण तो मूढ.
ज्ञाता, वक्ता हि असो कीं रथशिबिकामहागजारूढ. ४०१
ते लाची विच्छिन्ना, जेंवि नव्हे उद्धवा! कदा धारा,
ऐसी निवृत्ति, सत्पथ, निष्कंटक[1] मत न मज सदाधारा. ४०२
बा पा! प्रवृत्तिमार्ग चि कुपथ, न चोराद्युपद्रवें तो कीं.
सत्वोद्रेक[2] स्वर्ग; न बसती शक्रादि देव ज्या लोकीं. ४०३
सु मते! तमोगुणाचा उत्कर्ष चि नरक, ते न अठरा जे.
बंधु, गुरु हि मीं च सख्या! मद्भजनाचा चि करिति मठ राजे. ४०४
दे ह मनुष्याचें हें गेह, न हर्म्यादि[3] काय तें हीन.
आढ्य[4] पुससि, तरि सद्गुणसंपन्न चि; जो धनी न तो ही न. ४०५
वा ढवितो विषयांची तृष्णा, संतुष्ट जो नसे प्राणी,
तो चि जन दरिद्र; क्षम न स्वत्राणीं न वा परत्राणीं. ४०६
य लें न इंद्रियें जो जिंकी, तो शोच्य[5] न च असा दीन.
विषयासक्त, नव्हे तो ईश न राजादि कीं पराधीन. ४०७
न यवेत्त्या! दर्शन गुणदोषांचें, हा चि दोष जाणावा.
तद्वर्जनस्वभाव[6] चि गुण, बोध असा मनांत आणावा.' ४०८
मो क्षेच्छु पुसे 'देवा! वेद चि गुणदोष देखतो, वदतो.
कथुनि विधिनिषेध चि, दे साधुनियां स्वर्ग मोक्ष हें पद तो.' ४०९
भ क्तासि प्रभु सांगे, "म्यां कथिला ज्ञानयोग सुविरक्ता,

---

१. निष्कंटकत्वें चि केवळ सत्पथ नव्हे—**पंत.** २. सत्वाची अभिवृद्धि. ३. मोठे वाडे इत्यादि. ४. धनिक. ५. शोकार्ह. ६. त्याचें ( गुणदोषांचें ) वर्जन करण्याचा स्वभाव.

तो कर्मयोग सक्ता, तिसरा निजभक्तियोग निजभक्ता. ४१०
ग मल्या गोड मम कथा, भाग्यें श्रद्धा तयांत ज्या झाली,
न विरक्त, न सक्त, तया, सुसुखीं मद्भक्तियोग हा घाली. ४११
ब हुमत नित्यनिमित्तजकर्म, सुनिर्वेद जों मनीं नाहीं,
कीं, जों श्रद्धा माज्या चरितश्रवणादिकीं नव्हे काहीं, ४१२
ते णें जाय न नरकीं, तो निष्काम स्वधर्म कीं करितो.
कैंचा नरक? निषिद्धाचरण स्वप्नीं हि न च मनीं धरि तो. ४१३
वा गे या लोकीं जो, अनघ, शुचि करी स्वधर्म हा मात्र.
होतो ज्ञानाला कीं भाग्यें मद्भक्तिला हि तो पात्र. ४१४
सु र इच्छिति या लोका, जैसे पडले अघें करुनि नरकीं.
त्यां न घडे, नरदेहें साधितसे ज्ञान भक्ति ही नर कीं. ४१५
दे वैगति न इच्छावी कुशळजनें, जेंवि नरकगति साधो!
श्रम देहासक्तिस्तव; न म्हणो नर 'वपु पुन्हां हि' मति 'साधो'. ४१६
वा! अर्थसिद्धिकर, परि नश्वर हें नरशरीर जाणोनीं,
मोक्षार्थ मृत्युपूर्वीं, यत्न करावा मनांत आणोनीं. ४१७
य मसख तोडिति तरुतें, जरि तेथें राहिला करुनि कोटें.
सावध अलंपट निघे, त्यजि नग खग, मग तयासि सुख मोटें. ४१८
नै क्त दिन इहीं जाणुनि आयुक्षय, जो सकंप कातरतो,
संग त्यजुनि भजुनि मज, हित समजुनि, साधुनायका! तरतो. ४१९
मो टा नृदेह आद्य प्लव, सुपटु सुलभ सुदुर्लभ हि झाला
गुरु परपारा नेता; आहें अनुकूळ पवन मीं ज्याला. ४२०
भ वसिंधुतें, असें ही असतां साहित्य, मर्त्य जो न तरे,
तो आत्मघातकी बा! न च कारि, जारि म्हणति 'गुरुसि हो नत रे!'. ४२१

---

१. सहेतुक कर्मांच्या ठिकाणीं आसक्त त्याला. २. नितांत उपरति. ३. स्वर्गस्थिति. ४. धर्मार्थकाममोक्ष या पुरुषार्थांची प्राप्ति करून देणारें. ५. यमाचे स्नेही, क्रूर पुरुष. ६. घरटें. ७. रात्र. ८. भितो. ९. नाव.

ग र कर्म; तत्फळजया[1] तेणें मन अचळ संतत धरावें,
जेंवि शिशुतुरग[2] तैसें अभ्यासें हळुहळू वश करावें. ४२२
व श मन होय; विवरितां विश्वाच्या उद्भवासि आणि लया.
तत्त्वंपदार्थशोधन[3] कीं भक्तजन चि वशासि आणिल या. ४२३
ते व्हां जरि प्रमादें कांहीं निंदित घडेल कर्म तरि
ज्ञानाभ्यासें जळतें; पळ तें न टिकें[4] चि. काय हा न करी? ४२४
बा! रे! वारे नामें अघ अभ्र चि. नाम शुद्ध वारें च.
मन्नामकीर्तन सुतरि[5] पापाचा उतरि उद्धवा! रेंच. ४२५
शु द्धा! निवृत्ति च हिता; पाप चि होय प्रवृत्ति; दे खेद.
जे निजनिजाधिकारीं निष्ठा गुण तो असें वदे वेद. ४२६
दे ती जात्यविशुद्धें[6] कर्में दुःखें; न करुनि हानि, यम.
म्हणुनि, विधिनिषेधानीं गुणदोषविधान होय, हा नियम. ४२७
वा त्सल्यें केली हे संगातें टाकवावया युक्ती.
या बद्धां जीवांला संसृतिपासूनि व्हावया मुक्ती. ४२८
य जितात मला प्रेमें जे योगी ज्ञानभक्तियोगांहीं.
त्यांसि प्रवृत्त्यभावें प्रायश्चित्तादि विधि नसे कांहीं. ४२९
न रतिलक, मच्चरित्रीं जो जातश्रद्ध,[7] ज्यासि उद्वेग
दे कर्म, रुचे तत्फळ होउनि माज्या यशीं हि मुद्वेग.[8] ४३०
मो दें मज चि भजावें; तेणें सेवित असोनि कामातें
निंदावें चि; म्हणावें 'सुखद विराग[9] चि असो निको[10] मातें'. ४३१
भ क्तिसुयोग जसा म्यां कथिला तेणें मला भजावें च,
तद्धृद्गत[11] काम म्हणति, 'राहुनि येथें न लाभ, जावें च.' ४३२
ग ज जेंवि निजस्थानीं हरि होतां प्रकट, कीं गरुड सर्प,

१. त्याचें (कर्माचें) फल जिंकण्याकरितां. २. शिंगरूं. ३. 'तत्' व 'त्वं' या वस्तूंला शोधणें. ४. नाहींसें होतें. ५. उत्तम नौका. ६. स्वभावतः अशुद्ध. ७. ज्याला श्रद्धा उत्पन्न झाली आहे तो. ८. आनंदातिशय. ९. विरक्ति, निष्कामपणा. १०. खरा. ११. भजकाच्या हृदयांतील.

तेविं प्रकाशतां मीं हृदयीं, तत्काम खपति[1] हृतदर्प. ४३३
**व** ज्र अहंकारनगीं, संशयगहनीं कुठार, कर्मतमीं
रवि, मदुदय; म्हणतों यापरि वैकुंठीं नसे चि कर्मत मीं. ४३४
**ते** ज्ञान विराग, न त्या श्रेयाचीं साधनें बहुत करुनीं;
जो कीं मज्जन, मज्जन करितो माज्या यशीं च, रुचि धरुनीं. ४३५
**बा** र्हस्पत्या! कर्में सुतपें, धर्में, तसें चि जें दानें,
जें योगें, वैराग्यें, साधुनि घावें, अभीष्ट जें, ज्ञानें. ४३६
**सु** रतटिनीकावेरीगोदावर्यादि तीर्थयात्रा त्या,
याहीं ही जें पावे, तें सर्व भजोनि भक्त या त्रात्या. ४३७
**दे** तो सुखें चि माज्या भक्ता, मद्भक्तियोग बा! स्वर्ग,
वैकुंठ हि, अपवर्ग[2] हि, अत्यंत वदान्य हा जसा भर्ग. ४३८
**वा** तो हि उद्धवा! परि मागायाची न आवडे भक्ता,
मद्भक्तिरता अन्या गति, ती कांजी जसी सुधासक्ता. ४३९
**य** तिपति धातु[3] तसे म्यां देतां हि न घेति मोक्ष हे माजे,
त्यां स्वर्ग काय बेगड, न वळति कैवल्यदिव्यहेमा[4] जे? ४४०
**नै** ष्टापेक्षत्व[5] महानिश्रेयस[6] होय उद्धवा! समज.
निरपेक्ष मीं हि ते ही, त्यांला मीं ते हि शुद्ध वास[7] मज. ४४१
**मो** हति भक्त अकामा[8], त्यां हि अकामांसि मीं हि मग मोहें;
आम्हीं समशील सख्या! म्हणुनि महासख्य, चित्र[9] न गमो हें. ४४२
**भ** क्तांच्या ठाई तों, ज्या म्हणती पुण्यपाप, तो कांहीं,
विहितप्रतिषिद्धोद्भव[10] गुणदोष स्फष्ट उद्धवा! नाहीं. ४४३
**ग** तिमार्ग असे कथिले म्यां; यांतिल जे नयज्ञ वाटसुर,
त्यां ब्रह्मलाभ; हे पथभक्त, तसे ते न यज्ञवाट[11] सुर." ४४४
**व** दला न सिद्ध साधक जे त्यां गुण दोष देव निंदूनीं,

---

१. सूर्य. २. मोक्ष. ३. सुवर्णादि. ४. मोक्षरूप दिव्य सुवर्णा. ५. निष्कामत्व. ६. मोठें कल्याण. ७. निवासस्थान. ८. निष्कामाला (मला). ९. आश्चर्य. १०. शास्त्रोक्त किंवा शास्त्रविरुद्ध कर्मापासून उत्पन्न होणारा. ११. यज्ञमंडप.

श्रोत्यांसि तृप्ति देतो जैसा घन चातकांसि बिंदूनीं. ४४५
ते गुण दोष नियम विधि बहुत चि, यांचें प्रवृत्ति संकुचिता,
करुनि, निवृत्ति च द्यावी. येथें तात्पर्य कीं न ती उचिता. ४४६
चा ढेल ग्रंथ बहु, प्रणति करुनि सोडिला चि म्यां गातां,
तत्वें, पुरुष, प्रकृती, भक्त पुसे, लिहिन किमपि तें आतां. ४४७
सु ज्ञ पुसे, 'प्रकृति, पुरुष, महान् अहंकार, पंच[1], तन्मात्रा,
भूतें हि हृषीकें[2], तीं अकरा, गुण तीन कथिसि सद्गात्रा! ४४८
दे वव्रतोक्त[3] कथिलीं, त्वां अष्टाविंशति[4] प्रभूतत्वें[5].
इतर इतरथा[6] कथिती; जाणसि सर्वज्ञ तूं प्रभू तत्वें.' ४४९
वा रिदनील विभु म्हणे, 'ऐक अभिप्राय त्यां हि आर्यांचा.
ते अंतर्भाव करिति, युक्तिनिपुण, कारणांत कार्यांचा. ४५०
य द्यपि मन्मत चि बरें, त्वन्मत न खरें असा कलह खोटा;
तदपि भ्रमवी मायामृगजळ, वादांत सर्वथा तोटा.' ४५१
न मुनि पुसे प्रकृतिपुरुषतत्व, तया, 'उद्धवा! अगा! पारिस,
कथितों' म्हणे सुरांच्या[7] देणारा उद्धवा[8] अंगापरिस. ४५२
"मो हें न दिसे, परि बा! अत्यंत प्रकृतिपुरुष यां भेद;
देहादि हा विकारी संघात[9], स्पष्ट सांगतो वेद. ४५३
अ रला चि विकाराहीं, जाणति हें, गुरुसि भजुनि, जे पूत;
अध्यात्म, एकरूप ज्ञात्या अधिदैव आणि अधिभूत. ४५४
गा णिले तीन, तयांत ध्यानीं अध्यात्म चक्षु आणावें,
अधिभूतरूप रविवपु अधिदैव हि चक्षुमाजि जाणावें. ४५५
घ ळखे रूपा चक्षु, प्रवर्तवी चक्षुला हि अंश रवी,
यांची सिद्धि परस्पर; 'रवि गगनीं स्वप्रकाश' म्हणति कवी. ४५६
ते अध्यात्मादिक जे यांचा कारण अभिन्न जाण सदा;

---

१. शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध. २. इंद्रियें. ३. भीष्मानें सांगितलेली. ४. अठ्ठावीस. ५. बाहुल्येंकरून. ६. अन्य रीतीनें. ७. कल्पवृक्षापेक्षां. ८. उत्सवा, आमंदा. ९. समुदाय.

जो एकरूप आत्मा, यांहुनि तो वेगळा सुशीलपदा!. ४५७
बा! गा! स्वयंप्रकाशें या अन्योन्यप्रकाशकांसि करी
हा आपण प्रकाशित, याची याणें चि सिद्धि होय खरी. ४५८
सु ज्ञा! त्वगादि इंद्रिय, तद्विषय स्पर्शनादि पवनादि,
बहिरंतरिंद्रियांचें दैवत, यांचा प्रकाशक अनादि. ४५९
दे ह चि आत्मा जेणें भासे, हा त्रिविध जो अहंकार,
झाला प्रधानजमहत्तत्वापासूनि[1] लब्धविस्तार. ४६०
वा ढविला आत्म्याच्या अज्ञानें भ्रम चि, भेद तज्ज्ञानें[2].
उडतो, उडवावा हा सुविचाराभ्यास करुनि तज्ज्ञानें[3]. ४६१
य द्यपि भेद भ्रम हा, तन्हि देतो उच्चनीचदेहातें,
म्हणुनि नसावा, साधे त्या हें, गुरु ज्यासि अभय दे हातें. ४६२
न घडावें तें घडतें; विषयांच्या काय होय न ध्यासें?
आत्म्याला जन्ममरण लिंगशरीराचिया चि अध्यासें[4]. ४६३
मो ह चि संसार सख्या! भोगोद्यम सर्वथैव सोडावा,
दुःखप्रशमोद्यम हा, मन्निष्ठारूप योग जोडावा. ४६४
भ व अनृत; यांत कोणी गांजितिल क्षुद्र, परि सहावें च;
स्वसुखधनार्थी तूं तरि साधो! हितबोध[5] परिस हा, वेंचें[6]. ४६५
ग र्हितवृत्ति[7] कदर्य[8] ब्राह्मण कोणीं अवंतिदेशांत,
कामी लोभी होता कोपाच्या सर्वदा निदेशांत[9]. ४६६
व सुसंग्रह[10] तेणें जो केला, तो आप्तपरजनें लुटिला;
झाला भिक्षु[11] विरागें, लोकांहीं फार गांजिला, कुटिला[12]. ४६७
ते जन मुतती, थुंकति, म्हणती, 'हा दांभिका! खळा! कुटिला!'
निंदापीडेनें तो, चिंचेनें ताम्रघट तसा उटिला[13]. ४६८

---

१. प्रकृतीपासून झालेलें जें महत्तत्त्व त्यापासून. २. त्या आत्म्याच्या ज्ञानानें. ३. जाणत्यानें. ४. मिथ्या आरोपानें. ५. मूळ पाठ—**सुखबोध.** ६. खर्ची पड, उपयोगीं पड. ७. निंद्य आचरणाचा. ८. कृपण. ९. आज्ञेंत. १०. द्रव्यसंचय. ११. संन्यासी. १२. बडवला. १३. उजळला.

था हैस्पत्या! जन्हि तो कुजनाहीं फार गांजिला भिक्षु,
झाली उग्रा नाना पीडा, तन्हि कटु नव्हे जसा इक्षु. ४६९
सु मति म्हणे 'जन, दैवत, आत्मा, ग्रह, कर्म, काळ, हे सा जे,
हेतु न सुखदुःखांचे; यांची तों हेतुता[1] मना साजे.[2]' ४७०
दे वनृतिर्यग्जन्में,[3] यां कारण सात्विकादि जीं कर्में,
तत्कारण गुणवृत्ति सृजिते,[4] दुःखें हि हें चि दे शर्में. ४७१
वा स मनासह तरि ही, आत्मा विद्याप्रधान हा आहे;
तत्कर्मसंगरहित[5] चि साक्षी च उगा चि होय, तें पाहे. ४७२
य द्यपि तसा चि, तरि ही जीव अविद्याप्रधान हा वाहे
बहु अभिमान मनाचा; गुणविषयां भजुनि, बंधना साहे. ४७३
न रदेहीं यम, नियम, व्रत, दान, जप, स्वधर्म, जे कांहीं,
यांचें मुख्य फळ मनोनिग्रह चि, ज्ञान वेगळें नाहीं. ४७४
मो ह त्यजुनि समाहित[6] मन, तरि दानादि हें किमर्थ? मना
जरि विक्षेप[7], तरि हि हें दानादि सकळ कशास सांग जना? ४७५
भ जति सकळ देव[8] मना, मन कोणांच्या हि हें नसे भजनीं;
भीष्म[9] मनोदेव बळी या वश करि तो चि देवदेव जनीं. ४७६
ग रसें असह्यवेग, व्यथित करी मर्म, दुर्जय, स्वैरी[10];
मन न जिणुनि, भलत्यासीं विग्रह[11] करितात मूढ ते भारी. ४७७
घ पु कल्पिलें मनें हें 'मी' 'हें माझें' असें म्हणति अंध;
भ्रमति भ्रमें अपारीं संसारीं, दृढ गळां करिति बंध. ४७८
ते षट्पदार्थ[12], त्यांत प्रथम जन सुखासुखासि हेतु जरी,
देहासि असो, आत्म्या काय? न दंडुनि घे, न दंड करी. ४७९
बा! जीभ चाविली जरि, तरि हित[13] जिव्हेचिसारिखे दांत;

---

१. कारणता. २. शोभे ३. देव, मनुष्य व पशुपक्ष्यादि ह्यांतील जन्म. ४. उत्पन्न करते. ५. त्या मनोभूत कर्माच्या ठिकाणीं निरासक्त. ६. शांत. ७. मोह. ८. इंद्रियदेवता. ९. भयंकर. १०. आपला शत्रु. ११. वैर. १२. ४७० ह्या गीतींत सांगितलेले सहा पदार्थ. १३. हितकर, उपयुक्त.

कोणावरि कोपावें? तत्सहन चि तोपकारि खेदांत. ४८०
**सु**[1] र दुःखा हेतु असो, आत्म्यासि नसे चि दैवतांस चि, तें;
कोणावरि कोपावें, जैं अंगीं अंग वेदना रचितें? ४८१
**दे** हीं सुखदुःखा जरि हेतु, स्वात्मा स्वभाव तरि तो कीं,
कोणावरि कोपावें? अन्य नसे, दुःखसुख मृषा लोकीं. ४८२
**वा** [2]सरकरादि जरि सुखदुःखांचे हेतु, तरि न ज्या काय,
सुखघन[3], असंग, शाश्वत, परमात्मा जो तया अजा काय? ४८३
**य** द्यपि भासे, 'साचें' म्हणतां ज्ञात्यासि होतसे व्रीडा;
कोणावरि कोपावें? देहा ग्रहविग्रहें[4] असे पीडा. ४८४
**न** सुख[5]सुखां हेतु असो लोकमतें कर्म, आत्मया काय?
आधीं असेल तें जरि, तरि म्हणविल अनुभवीं 'अहा! हाय!' ४८५
**मो** हें कर्म स्फुरतें; कीं, तें असतां जडाजडत्व जडे;
देह म्हणावें तरि जड, कर्मीं त्याला कसी प्रवृत्ति घडे? ४८६
**भ** व्यस्वभाव आत्मा शुद्धज्ञानस्वरूप, हा काहीं;
कर्म न करि, निष्क्रिय, हें वेदाहीं कळविलें चि हाकाहीं. ४८७
**ग** र्भें चि नसतां कैंचें शिशुयोगेंकरुनि दुःख कीं शर्म?
कोणावरि कोपावें? सुखदुःखद जें नसे चि तें कर्म. ४८८
**घ** दतिल काळातें जरि 'सुखदुःखां हेतु हा' असें बाळ[6],
आत्म्यासि काय? कीं हा ब्रह्मांश, ब्रह्मरूप तो काळ. ४८९
**ते** जानें ज्वलनाच्या भाजोनि, तदर्चि[7] काय हो! कणतें?
हिमशैत्य[8] अन्यनाशक, नाशिल जो आपुला चि तो कण तें? ४९०
**वा** स्तव हा[9] पर चि, नव्हे अंश; न सुखदुःख लेश हि परा[10]ला.
कोणावरि कोपावें? पाहें मीं अंधसा न च परालों[11]. ४९१

---

१. देव, इंद्रियदेवता. २. सूर्यादिग्रह. ३. आनंदमय. ४. ग्रहांच्या [ एकमेकांतील ] भांडणानें. ५. दुःखसुखांस–**पंत**. ६. अज्ञजन. ७. त्या (अग्नीची) ज्योत. ८. बर्फाची थंडी. ९. आत्मा. १०. परमात्म्याला. ११. आत्म्याव्यतिरिक्त जो देह त्याला.

सु खदुःखस्पर्श परा होय, अहंकार एक या हेतु;
सद्बोध हा चतुर्विधभूतभयक्षुब्धसागरीं सेतु[1]. ४९२

दे इल परात्मनिष्ठा हे कर[2] मज ही, जसा महर्षीतें,
काय मुकुंदपदांसीं केलें घालिल न साम[3] हर्षी तें? ४९३

बा हंस्पत्या! यापरि मुनिनें गर गिळुनि, गाइली गाथा;
माथा डोलविला म्यां, बहु रुचली मज हि सत्सभानाथा[4]. ४९४

य द्यपि दिसतो मिथ्या, मित्र उदासीन, शत्रु हा कष्ट;
सर्व हि संसार[5] सख्या! अज्ञानें, निजमनोभ्रम स्पष्ट. ४९५

न रवर्या! यास्तव तूं माझा ठाईं च बुद्धि लाव कसा,
या द्वंद्वसहनयोगा[6], भवगरुडा विगतशुद्धि लावकसा[7]. ४९६

मो ह सराया चितीं आत्म्यापासूनि आत्ममायेनें
द्वैत प्रकृतिपुरुष जे, होतें यांच्या चि दृश्य मायेनें. ४९७

भ गवंतीं लय पावे द्वैत, पुन्हां सत्य एक आद्यंतीं;
या सांख्यशास्त्रतेजें, द्वैतभ्रमशत्रु निवटिला संतीं. ४९८

ग डबड बहुत करु मनीं हें प्रकृतिपुरुषविवेकसुज्ञान[9];
जों त्रिगुणवृत्तिजय न, द्वैतभ्रम तों सरेल सुज्ञा! न. ४९९

व र्जुनि फळ, नित्य तथा नैमित्तिक मात्र कर्म जो करितो,
सात्विक, कर्ता, पुरुषश्रेष्ठ सुखें आपणासि उद्धरितो. ५००

ते जन राजस, तामस, भजती चिंतूनि कर्मफळ हिंसीं[10];
आत्मा न होय त्यांचा तेणें पावोनि शांति पळ हिंसीं[11]. ५०१

घा ढे सत्व चि रज तम जिंकुनि तेव्हां चि उद्धवा! युक्त,
सुखधर्मज्ञानासीं होय पुरुष हें मनीं धरीं उक्त[12]. ५०२

---

१. चार प्रकारच्या भूतांपासून जे भय तद्रूप खवळलेल्या समुद्रांत. २. हात–आधार. ३. सख्य. ४. सज्जनसमाजाच्या धुरीणीला. ५. संसार. ६. सुखदुःखादि द्वंद्वें सहन करण्याच्या योगाला. ७. लावानामक पक्षी त्यासारखा. ८. संबंधें योगें–पंत. ९. विवेकाच्या ठिकाणीं 'विकेक' असा हस्तदोष झाला आहे. १०. पशुमारणादि हननक्रिया. ११. थंडसा. १२. भाषण.

सु हृदा! जें मन्निष्ठ ज्ञान, तसें जें निकेतन[1] हि माजें,
निर्गुण चि जाण तें ही, मज येणें शरण उद्धवा! बा! जें. ५०३
दे वोत्तम जो मीं या मज अन्नफळादि जें निवेदून,
भक्षावें तें निर्गुण बा! येणें सर्व ही निवे दून[2]. ५०४
वा! माज्या सेवेंत श्रद्धा ती निर्गुणा असें जाण;
जें कीं मदाश्रयें सुख, तें ही निर्गुण चि हें मनीं आण. ५०५
य दुकुलवरा! गुणांहीं[3] सर्व हि संसार उभविला समज;
मद्भजनें गुण जिंकुनि, पावे मद्भक्त शुभविलास मज. ५०६
न बरा विषयिजनाचा योगीं निष्ठा जया तया संग,
होय विरागनगाचा[4] या[5] वज्रेंकरुनि उद्धवा! भंग. ५०७
मो हीं पडतो कूपीं अंधाचा अनुग जन जसा अंध;
गंध हि विषयि जनाचा सुविरक्ताला हि करितसे बंध. ५०८
भ[6] व्यनिधान विरागीं सुस्थिति बाणावयासि शैलाची[7],
उद्धवजी! उद्धव जी दे, गाथा आयका चि ऐलाची[8]. ५०९
ना रक चि तमांत होता, मळवी च भजोनि उर्वशीला[9] भा[10].
मोहांध मुक्तिलाभ चि मानी जो प्रथम उर्वशीलाभा. ५१०
व र्जुनि जातां, नग्न चि धांवे, उन्मत्तसा विलाप करी;
‘उर्वशि! जाये! घोरे! तिष्ठ[11]’ म्हणे; ती[12] इभी, इलाप करी. ५११
ते[13] ज्या लोकीं तेथं आचरुनि तदर्थ सर्व बरा गेला;
ऐसा ही विषयी, परि तो विषयीं तेंवि पर न रागेला. ५१२
वा मेला बहु भुलला, मानी पहिली च नवनवी रजनी;
झाला जागा; जिंकी कामा तो कीर्तिभवन, वीर, जनीं. ५१३
सु विरक्त होउनि म्हणे तो ऐल, ‘अहो! मदीय मोहाचा

---

१. निवासस्थान. २. दुःखी. ३. सत्व, रज व तम या गुणांनीं. ४. विरक्तिरूप पर्वताचा. ५. संगरूप. ६. मांगल्याचा ठेवा. ७. पर्वताची. ८. ऐलराजाची. ९. ईट स्वभावास. १०. कांति. ११. उभी रहा. १२. ती (उर्वशी) हत्तीण [व] ऐलराजा हत्ती. १३. ती उर्वशी.

विस्तार केवडा हा? विपुलत्वें बंधु [1]सुरभिदोहाचा; ५१४

दे वीच्या अधरासवपानीं दिनरजनि आयुचे खंड
गेले, मज न च कळले, काम चि करि, न पर अरि असें [2]भंडें. ५१५

वा सरमणि मावळला, किंवा हा उगवला हि न समजला;
पीतां घटघट घटभारि, न भुलविता दिव्य मद्यरस मजला. ५१६

य ज्ञपतिचक्रवर्ती धर्माच्या पावणार हाकेला,
मोहें [3]स्त्रीकेलिमृग चि राजशिखामणि असा हि हा केला. ५१७

न गणुनि सहवास, तृणापरि सोडुनि आपणासि जी जाय,
नग्न चि उन्मत्त तसा तीमागें धांवलों, म्हणें 'हाय!' ५१८

[4]मो घ चि अभिमान अहो! कैंचें त्या तेज, ईश्वरत्व, जनीं?
जो स्त्रीमागें लाता खाय [5]खर तसों, धरी न लाज मनीं. ५१९

[6]भ र चि तप, [7]श्रुतें, विद्या, एकांत, [8]त्याग, मौन, हें सर्व;
ज्याचें मन स्त्रियांहीं हरिलें तेणें धरूं नये गर्व. ५२०

ग र्दभ तसा स्त्रियांहीं ईश्वर ही जिंकिलों जसा बैल;
धिक्कार मला पंडितमानी न हितज्ञ मूढ मीं ऐल. ५२१

व र्षें पुष्कळ गेलीं उर्वश्यधरासवाचिया पानें;
जेंवि घृतें वह्नि, तसा काम शमेना चि पूर्वपापानें. ५२२

ते जस्वी कोण असे हरिवांचुनि अन्य पुंश्च[9]लिग्राहें
धरिल्या मनोगजातें सोडविता? कठिन बहु समग्रा हें. ५२३

वा क्यें सूक्तें [10]देवी बोध करी, तरि हि मीं असा मूढ.
कीं, मोह तसा चि मनीं, जैसा आंधार [11]गव्हरीं गूढ. ५२४

सु दती हे साधु, इणें केला अपराध आमुचा काय?
रज्जुकडे शब्द नसे, कल्पुनि अहि जड म्हणेल जरि 'हाय!'. ५२५

---

१. कामधेनूपासून प्राप्त होणाऱ्या दुधाचा. २. विपत्ति. ३. स्त्रियांशीं क्रीडा करण्यांत मृग (पशु). ४. व्यर्थ. ५. गाढवासारखा. ६. भारभूत. ७. शास्त्रीय ज्ञान. ८. दानधर्म. ९. वेश्यारूप नक्रानें. १०. उर्वशी. ११. गुहेंत.

दे ह परम मलिन अशुचि कोठेंकोठें[1] सुगंधता शुचिता,
गुणकल्पना मनाची गमली आंतासि अनुचिता उचिता. ५२६
वा चें कीं आईचें, स्त्रीवह्निस्वामिसारमेयांचें,[2]
सुहृदांचें, कीं निज वपु, न च निवडे, तुल्य हें गमे यांचें. ५२७
य द्यपि परिणामीं जें कृमिविष्टाभस्म हें कळे, वरतें
शुचि रम्य सुवस्तूंच्या मानुनि, विषयी स्तवी कळेवर[3] तें. ५२८
'न यनें, नासा, सुस्मित मुख या स्त्रीचें' म्हणे, 'अहा! काय!'
रक्त[4]पललपूयमयीं रमता कामी कृमी न हा काय? ५२९
मो ह घडे विषयेंद्रियसंयोग क्षोभवी मना म्हणुनीं,
स्त्रीस्त्रैणसंग न बरा, सोडावा घात आपुला गणुनीं. ५३०
भ रिले न विषय नेत्रश्रवणद्वारेंकरूनि, तरि गमतें,
दुर्बळ पंगु तसें मन इंद्रियरोधास्तव[5] स्वयें शमतें. ५३१
ग टकळि देतो मोहीं, करितो चि विवेकशक्तिचा भंग,
म्हणवूनि इंद्रियांहीं स्त्रीस्त्रैणांचा करूं नये संग. ५३२
व[6] स्तुज्ञांला हि नव्हे क्षण ही षड्वर्गशत्रु विश्वास्य,
मग मजसारखियांची काय कथा? वर्णितें चि विश्वास्य[7]." ५३३
ते जस्वी ऐल प्रभु ऐसें गावूनि, सेविलें ओक[8]
तें त्यजुनि उर्वशीचें जाय; न पाहे पुन्हा जसी ओक. ५३४
वा ट विरक्ति सख्या! मज पावायाची; तिणें चि तो मातें
पावे, ज्ञानाग्नींत द्वैताहुतिच्या करूनि होमातें. ५३५
सु टुनि कुसंगापासुनि, संतांसीं संग साधितां मुक्ति;
संतांच्या सर्वमनोव्यासंग च्छेदिती स्वयें उक्ती. ५३६
दे हीं अनपेक्ष सदा, समदर्शन, ज्यांसि शांति हें वित्त,
अपरिग्रह[9], निरहंकृति, निर्मम[10], निर्द्वंद्व, संत मच्चित्त. ५३७

---

१. 'कोष्ठें' असा कांहींसा भास होतो. २. कुत्र्याचें. ३. शरीर. ४. रक्त, मांस व पू यांच्या कर्दमांत. ५. इंद्रियदमनाकारणें. ६. आत्मवेत्त्यांला. ७. 'उर्वशीस भुलला' विश्व म्हणतें च—**पंत**. ८. गृह. ९. असंचय. १०. निःसंगता.

वा स करिति आनंदें माहेरीं जेंवि लाडक्या कन्या,
साधूंत मत्कथा, ज्या श्रोत्यांचें पाप नाशिती धन्या. ५३८

य श माजें जे ऐकति, अनुमोदिति, गाति, ज्यां सदासक्ती,[1]
ते श्रद्धानें[2] मत्पर पावति माजी सुनिर्मळा भक्ती. ५३९

नैं[3] लिनभवांडाख्या या प्रासादाच्या मला चि जोत्याला
भजतां, न प्राप्त असें काय असे साधु भक्त जो त्याला? ५४०

मो ह, भय, कर्मजाड्य[4] न राहे साधूंसि सेवितां कांहीं,
शीतत्रास, तम, जसें देवा दहना उपासितां नाहीं. ५४१

भ वसागरीं निमज्जंति,[5] उन्मज्जंति,[6] जीव यांसि हे संत
परमाश्रय, जेंवि प्लव बुडत्यां अब्धींत, वारिती अंत. ५४२

ग रुडध्वज मीं च जसा आर्तांला[7] शरण[8] वर्णिलों आहें,
अन्न चि जीवन जैसें जीवांचें, उद्धवा! मनीं पाहें. ५४३

वँ सु,[8] धर्म चि परलोकीं, बहुमत सर्वांस ही जसें बा! हें,
संसारपातभीतां[9] संत चि रक्षक, भजोनि यां राहें. ५४४

ते जस्वी संत चि हे नेत्रें देतात आंत बाहेर,
तुज दिव्य दृष्टि देउनि म्हणतिल, 'हा चिद्विलास बा! हेर.' ५४५

बा! संत देव, संत चि बांधव, गुरु संत, संत हे प्राण,
किंबहुना दाशार्हा[10]! विश्वात्मा मीं च संत हें जाण. ५४६

सु विचारें, सत्संगें, मुक्त चि झाला पुरूरवा अंतीं,
जे जे तरले ते ते उद्धवजी! जीव तारिले संतीं." ५४७

दे वासि पुसे उद्धव, तो सांगे स्वार्चनक्रियायोग
कीं, "हा मनःप्रसादक, या अगदें जाय भवमहारोग. ५४८

---

१. सत् (जें ब्रह्म) त्याच्या ठिकाणीं आसक्ति. २. श्रद्धा ठेवणारे. ३. कमला पासून उपजलेलें जें ब्रह्म तद्रूप जें ब्रह्मांड त्या नांवाच्या. ४. कर्मानीं येणारें मांद्य. ५. बुडतात. ६. वर येतात. ७. त्राता. ८. द्रव्य. ९. संसारापासून पतन होण्याला जे भ्यालेले त्याला. १०. यादवकुलावतंस दशार्ह त्याचा वंशज जो त्या (उद्धव).

वा डव, वारि, प्रतिमा, स्थंडिल, रवि, वह्नि, हृदय, हीं स्थानें;
येथें मज पूजावें सद्विधिनें, साधुनें कृतास्थानें[1]. ५४९
य जनार्थ प्रतिमा त्या लेप्यां[2], लेख्या[3] शिलामयी, अन्या,
दारु[4]मयी, धातुमयी, शुचिसिकता[5]मणिमनोमयी धन्या. ५५०
न र हो कीं नारी हो, अधिकार मदर्चनीं असे सर्वां.
नित्यार्चनापरिस बहु मानावें अष्टमीमुखा पर्वा. ५५१
मो टा महिमा पूजा चालाया ग्राम रम्य ओपावे[6],
ऐसें करितां, माज्यापरि ऐश्वर्यासि भक्त तो पावे. ५५२
भ क्तासि मत्प्रतिष्ठा करितां बा! सार्वभौमपद येतें.
घडतां मदर्चन सख्या! होइल जन कोण पात्र न दयेतें? ५५३
ग रुडध्वजा मला जो, देतो गृह करुनि शुद्धवासांचें[7],
भुवनत्रयप्रभुत्व प्राप्त तया होय उद्धवा! साचें. ५५४
व सतो पूजापुण्यें[8] तेथें, ज्या 'ब्रह्मलोक' वदतात.
[9]तीनीं घडती ज्या, त्या देतों मीं आत्मसाम्यंपद तात!. ५५५
ते मज चि सख्या! पावति जे भजति अकाम भक्तियोगानें.
होतो निष्काम सुखी, तैसा न सकाम दिव्यभोगानें. ५५६
वा हेस्पष्टा! ज्याला माजा निष्कामभजनसव घडतो,
मोक्ष परम दुर्घट जो, होताहे त्यासि निपट सवघड तो. ५५७
सु रविप्रवृत्तिहर[10] जो, तो कृमि अयुतायुताब्द[11] विष्ठेंत;
यास्तव पडों न द्यावें अंतर तिळमात्र पुण्यनिष्ठेंत. ५५८
दे हादि द्वैत मृषा जाणोनि परस्वभावकर्मातें,
जो न स्तवी, न निंदी, पावतसे तो चि सुज्ञ शर्मातें. ५५९

---

१. केली (ठेविली) आहे आस्था (भक्ति) ज्यानें त्यानें. २. लिंपलेल्या (मृत्तिकामय मूर्ति) ३. लिहिलेल्या (चित्रित मूर्ति). ४. लाकडाच्या. ५. स्वच्छ वाळूच्या, बहुमूल्य मण्यांच्या किंवा मानसिक. ६. अर्पण करावे. ७. पवित्र वसतिस्थानाचें. ८. पूजा, प्रतिष्ठा व गृह. ९. सारूप्य मुक्ति. १०. देव व ब्राह्मण यांच्या उपजीविकांचें (भागांचें) हरण करणारा. ११. दहा हजारदां दहा हजार वर्षें.

वा दी कोणी म्हणती द्वैतातें सत्य, सर्व ते भ्रांत;
भ्रांत प्राणी होती, लागेना दुर्मताश्रयें प्रांत[1]. ५६०
'य द्दृश्यं तदसत्यं, सत्यं ब्रह्मैव,'[2] गी[3] असी गुरुची,
हृदयीं नित्य असावी, माझ्या भजनीं हि सर्वदा सुरुची. ५६१
न मदन्य किमपि साधो! निजमायेनें प्रपंच मीं चि पहा,
नसुनि हि बागुल जैसा बाळासि तसा म्हणे भ्रमीं 'चिप' हा. ५६२
मो हें पाहो, कांपो, 'अहि अहि' ऐसें सुखें वदो, रचितो
स्वभ्रम चि त्या असत्या सर्पा, झाला फणी न, दोर चि तो. ५६३
भें[4] में तसा परमात्मा मीं जग, नग भिन्न काय मानावें?
वानावें भ्रांतांहीं नानारूपें तसें चि या नावें. ५६४
ग वसे विचार करितां, एक ब्रह्म चि षडिंद्रियजयानें.
ज्या मुक्तिची अपेक्षा, हा चि करावा सुनिश्चय तयानें." ५६५
व स्तुविचार प्रभुनें कथिल्यावरि, उद्धवें पुन्हां सोपा
पुसिला उपाय आत्मप्राप्तीचा सुहित पंडिता गोपा[5]. ५६६
ते व्हां स्वभक्तियोग चि कथि पुनरपि देव सार[6] सोपा या.
परिसा भगवत्करुणा मोक्षश्रीकेलिसारसोपाया[7]. ५६७
"वा हत जावीं कर्में, मजला मन, चित्त मज चि अर्पावें.
माझ्या यशोमृतानें साधुजना आपणा हि तर्पावें[8]. ५६८
सु खहेतु पर्व, यात्रा, परमोत्सव, वेगळे चि अथवा हे
मिळुनि करावे, हा हित, निर्भय, मद्धर्मराजपथ वाहे. ५६९
दे श तसे ते आश्रय करुनि वसावें, जयांत मज्जन गा!
जे आपणांत भीता म्हणति, म्हणे जेंवि सिंधु 'मज्ज'[9] नगा[10]. ५७०
वा स करुनि परमात्मा सकळां भूतांत एक पूर्ण वसे
जो, तो चि आपणांत हि, आकाश जसा घटांत तेंवि असे. ५७१

---

१. शेवट. २. जें दृश्य तें मिथ्या; ब्रह्म हें च सत्य. ३. वाणी, वचन. ४. सोनें. ५. गवळ्याला—कृष्णाला. ६. तत्वपूर्ण. ७. मोक्षश्रीच्या क्रीडाकमलरूप उपाया. ८. संतोषवावें. ९. बुडी दे. १०. पर्वताला.

य लें दाता, स्तेन[1], द्विज, अंत्यज, भास्कर, स्फुलिंग[2], तथा
अक्रूर, क्रूर, अशां ठायीं समदृष्टि, लाग या चि पथा. ५७२
न र जे उत्तम, मध्यम, अधम, तयांमाजि जो मला पाहे,
साधो! स्वाहंकारस्पर्धासूयातिरस्कृति[3] न राहे. ५७३
मो टा आपण तो तरि नीच, असी दृष्टि तीस्तव व्रीडा,
हांसतिल सखे जन हे, सोडावी कल्पना जसी पीडा. ५७४
भ म हि हो लववावा श्वानाला काय[4] गाढवाला; हे
स्थिति देहबुद्धिवारस्त्रीचा[5] तो काय गा! ढवा[6] लाहे? ५७५
ग गन जयापरि वर्ते सर्वघटांमाजि एक, ईश वसे;
हा अनुभव ये तोंवरि भजन असे, जे न ते कुधी शवसे. ५७६
व र्ते प्रपंच सर्व ब्रह्म चि होवूनि, ईशदृष्टीनें,
मग कर्में सोडावीं उरतां होवूनि वस्तु सृष्टीनें. ५७७
ते ते उपाय पुष्कळ आहेत, तयांत हा ठळक राहो,
याला चि अनुसराया देइन कर, परि भलें बळ करा हो!. ५७८
बा! रे! मद्धर्म करित असतां वैगुण्य एक ही अणु न,
सेवावा सर्वांहीं हा, म्हणतों 'दीनबंधु' मीं म्हणुन. ५७९
सु गुणा समर्पिला जो व्यर्थ हि कोणी करूनि आयास,
होतो धर्म चि; मग जो श्रवणादि विनाश काय गा! यास? ५८०
दे वा, अमृता, सत्या, देहें मर्त्यानृतें[7] हि जो जोडी,
त्याची विवेकिता कीं उद्धवजी! चतुरता नव्हे थोडी." ५८१
बा हस्पत्यासि असें, जें आत्मज्ञानदान दे हरि, तें;
तेव्हां स्वसुखें कोंदे ब्रह्मांड; भरेल कां न देह रितें? ५८२
य दुपतिचरणसरोजें वंदुनि, निघतां पुसोनि आज्ञा त्या,
कन्येसि तसें रोदन आलें, तें पसरवी च आ ज्ञात्या. ५८३

---

१. चोर. २. ठिणगी. ३. स्वतःविषयींचा गर्व [ व दुसऱ्याविषयींची ] स्पर्धा, द्वेष व तिरस्कार. ४. देह. ५. देह हा च आत्मा एतद्बुद्धिरूप वेश्येचा. ६. साजिंदा. ७. मर्त्य ( विनाशी ) [ म्हणून ] मिथ्या अशानें.

न मुनि पुसे उद्धव मग, जाउनि परते पुन्हां जसा चुकला,
तुकला[1] समबोधें, परि होवूं दे प्रेमगुण न तो उकला[2]. ५८४
मो हें रडत चि गेला तो उद्धव, बाळ जेंवि शाळेला;
पावे तें, पावाया प्रेषी यदुपाळ जें विशाळेला[3]. ५८५
भ गवद्भक्त नृप पुसे, 'उद्धव गेल्यावरि स्वयें अजितें,
शापातें अनुमोदुनि, निज कुळ संहारिलें कसें अजि! तें ?' ५८६
गं[4] तिमन्नाथ शुक म्हणे:-पाहुनि उत्पात सृष्टिगगनीं, ती
सांगे प्रभु 'प्रभासीं जावें' हे यादवांसि मग नीती. ५८७
व चनें प्रभुच्या शंखोद्धारीं[5] स्त्री बाळ वृद्ध धाडून,
ते यादव प्रभासीं गेले सोडुनि पुरीस[6] झाडून. ५८८
ते थें करुनि स्नानें, विप्रांला बहुविधें दिलीं दानें;
शापें हारिलीं ज्ञानें. ते करिते जाहले महापानें[7]. ५८९
वा णी, मति, तनु, कैसी स्वाधीना राहत्ये तशा पानें?
प्रभुमायेनें भ्रमले, बहु मद्यें कीं, तशा न शापानें. ५९०
सु टले गुरुमर्यादेपासुनि यादव न, सिंधु ते फुटले,
तुटले स्नेहमहागुण, कलह करायासि सर्व हुटहुटले. ५९१
दे उनि गाळी हृदयीं मर्मस्पृक्[8] शब्दबाण खुपसून
धावति, अन्योन्य भिडति, काळकवळ[9] जवळ खड्ग उपसून. ५९२
वा रूं जाय प्रभु ज्या, त्या न गमे स्वहित काळकवळातें;
मारावयासि लागति, न म्हणति ते त्या हि 'पाळक' बळातें. ५९३
य दुवीर सर्व शस्त्रें सरतां वध करिति एरकांहीं[10] हो!
प्रभुनें उपेक्षिले जे, त्यां पवि च तृणादि येर कांहीं हो. ५९४

---

१. [ समबोधार्थी आभंड म्हणून ] तोलला गेला. २. उलगडा. ३. बदरिकाश्रमाला. ४. उत्तम गति ज्याला मिळाली आहे अशांतील अग्रणि. ५. तीर्थविशेषीं. ६. नगरीला—द्वारकेला. ७. मद्यप्राशनें. ८. हृदयाला स्पर्श करणारे. ९. यमाचे घांस. १०. लव्हाळ्यानीं.

न  वल न वाटो, धरिती प्रभु[1] हस्तीं ऐरकापरिघ[2] ते तें.
प्रतिकूळ काळ होतां निःसार चि भलतसें पारिघतेतें[3]. ५९५
मो टा प्रळय चि झाला, राहों देती न एरका कांहीं,
ते[4] भक्षिलें शिवांहीं, गृध्रांहीं, जेंवि येर काकांहीं. ५९६
भ र भूमिचा उतरला मानुनि चित्ता न खेद केशव दे,
योगें वपु सिंधुतटीं सोडी बळ[5] अहित हित न लेश वदे. ५९७
ग रुडध्वज रामाचें पाहुनि निर्याण[6] पिप्पळाजवळ,
बैसे महीतळीं, तें काळमुखीं स्वकुळ करुनियां कवळ. ५९८
घ नदश्याम, चतुर्भुज, वनमाली, मकरकुंडली, मुदित,
श्रीवत्सांक, कनकपट, कौस्तुभधर, विश्वमंगलाभ्युदित[7]. ५९९
ते जोनिधि, कमलनयन, सुस्मितमुख, दक्षिणोरुवरि[8] वाम
श्रीचरण ठेउनि, प्रभु बसला होता सदेकविश्राम[9]. ६००
बा ण मुसलशेषानें[10] केला ज्या उग्र लुब्धकें[11], तेणें
येणें केलें तेथें, श्रीचरणें भ्रमविला जसा एणें[12]. ६०१
सु खरशरें श्रीचरणा वेधी तो पापनग जरा, ज्याला
स्मरतां बाधे कांहीं जन्ममरणताप न गजराज्याला. ६०२
दे खुनि चतुर्भुजातें, कृतकिल्बिष[13] तो जरा म्हणे 'हाय!'
पाय प्रभुचे धरि, करि देव दया, बाळकीं जसी माय. ६०३
वा त्सल्य तसें कोठें? त्या प्रभुच्या आयका यशाला हो!
अतुळा क्षमा, दया ती; कीं स्वर्गीं प्रभु म्हणे तशाला हो. ६०४
य मदंडोचित लुब्धक सुविमानीं तत्क्षणीं च वसवीला[14],
न सवी[15] लाहे सहसा जें पद तेथें तसा हि वसवीला. ६०५

१. रामकृष्ण. २. लव्हाळारूप परिघ—लोहदंड. ३. लोहदंडत्वाला. ४. मृत यादव. ५. बलराम. ६. [ इहलोकांतून ] जाणें. ७. विश्वाच्या कल्याणाचा अभ्युदय. ८. उजव्या मांडीवर. ९. सज्जनांचा एक च विसांवा. १०. मुसळाच्या अवशिष्ट भागानें (या च स्कंधाच्या पहिल्या ११ गीति पहा). ११. व्याधानें. १२. हरणानें. १३. अपराधी. १४. वसवीला (?) १५. यज्ञकर्ता.

न लिनाकडे अलि तसा दारुक शोधीत हरिकडे आला,
त्वरित रथावरुनि उडी घालुनि, तो साश्रु वंदिता झाला. ६०६
मो हे दारुक फार चि, न अवस्था ती तसी कधीं पाहे,
तों रथ गगनीं शिरला, आयुध हि निघे, न एक ही राहे. ६०७
भ रतां साश्व रथ नभीं, विस्मय पाहोनि दारुका वाटे;
त्यासि म्हणे प्रभु, ‘ साधो ! कथितों तुज या चि तूं घरीं वाटे. ६०८
ग ति सर्वज्ञातींची सांग द्वारावतींत; या महितें
सोडुनि गेला सागरतीरीं योगें शरीर राम हि तें. ६०९
व द मद्दशा हि सर्वां आप्तांसि; द्वारकेंत जे असती,
त्यांहीं तेथिल आतां सोडावी शीघ्र सर्वथा वसती. ६१०
ते थें यावारि वसतां, सागर बुडवील सत्य; जावें च;
म्यां त्यजिलें सुसमृद्ध हि, तें पुर हितहेतु न, त्यजावें च. ६११
वा[1] सवि इंद्रप्रस्था नेइल वसुदेव देवकीसहित,
वास द्वारवतीचा पूर्वी होता[2]; परंतु तो न हित. ६१२
सु खदुःख उपेक्षुनि, तूं मद्धर्मातें चि शरण जा भावें.
हे मन्मायारचना जाणुनि हृदयांत उपशमा[3] पावें.’ ६१३
दे वातें दारुक तो वंदुनि, करुनि प्रदक्षिणा, रडला;
गेला खिन्नमनें, कीं कुलनाश, प्रभुवियोग ही, घडला. ६१४
वा ट पुरीची[4] धरिली देहें, चित्तें न सोडिले चरण.
स्मरण प्रभुचें करित, त्वरित निघे ऐकवावया मरण. ६१५
य दुकुळसंक्षय पाहुनि, तो सूत द्वारकेकडे गेला,
पिप्पलमूळीं भगवान् प्रभु एकाकी च तेधवां ठेला. ६१६
न लिनभव, भवानीसह भव, भगवान् शक्र, सकळसुरसहित
तेथें धावुनि आले, प्रभुचें दर्शन जयांसि सुरस[5] हित. ६१७
मो घ[6]प्रताप केला काम जिहीं, ते कुमारमुनि[7] चवघे,

---

१. अर्जुन. २. [ हितकर ] होता. ३. शांततेला. ४. द्वारकेची. ५. प्रिय.
६. व्यर्थ पराक्रमाचा–निर्बल. ७. सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार.

आले ते हि मरीचिप्रमुख यशस्वी प्रजापति हि अवघे. ६१८

भ गवन्निर्याणातें तेथें आले पहावया पितर,
गंधर्व, अप्सरागण, अहि, खगवर[1], भक्त विष्णुचे इतर. ६१९

ग गन बहुविमानाहीं भरिति, करिति देव पुष्पवृष्टीतें,
गाती चरितें, हरितें पाहुनि ते निववितो स्वदृष्टीतें. ६२०

व ल्लभ लक्ष्मीचा तो श्रीकृष्ण प्रभु तयांकडे पाहे,
मसृणपद्मपत्र नेत्रें झांकूनि, समाधि धरुनियां राहे. ६२१

ते व्हां निज[2] निजलोका येइल विभु, हें मनांत आणोनीं,
सुर पुष्पवृष्टि करिती, वाद्यें वाजविति लाभ जाणोनीं. ६२२

वा द्यांचा गजर, कुसुमवृष्टि, स्तुति सर्व देव जों करिती,
निजधामाप्रति गेला; स्वगति तयांतें कळों न दे हरि ती. ६२३

सु[3] रवर, विधि, हर देखति विभुतें जातां न आत्मधामातें.
केव्हां दिसोनि पुरवित होता हि तदीय दृष्टिकामातें? ६२४

दे खति भगवद्गतिस न पूर्वी सुर देखते कवी जे तें,
तैसें जातां सोडुनि घनमंडळ जेंवि लोक वीजेतें. ६२५

वा[4] रिजयोनिप्रमुख त्रिदश प्रभुच्या प्रशंसिती गतितें.
माहात्म्य मनीं येतां यश विस्मय दे, न दे हि त्यां अति तें. ६२६

य श तें गात चि गेले निजलोका देव, विधि, कुमारमणी.
देवींची काय कथा? नवल करी शंभुची उमा रमणी. ६२७

न ट जैसा तेंवि धरी निजमायेनें चि देव सोंगातें.
विश्व रची, प्रतिपाळी जें निजरूपीं न दे वसों गा! तें. ६२८

मो हाया[5] तो दारुक सर्वां द्वारावतीस्थलोकातें,
पूर्वीं श्रीकृष्णातें, तैसा वेऊनि जाय शोकातें. ६२९

भ क्त प्रभुचा दारुक ज्यातें ऐकोनि म्हणति 'हाय!' कवी,
तें, नमुनि उग्रसेना वसुदेवा, वृष्णिनिधन आयकवी. ६३०

---

१. गरुड. २. आपला ( प्रभु ). ३. इंद्र. ४. महादेवादि देव. ५. [ दुःखानें ] भ्रमविण्यास.

ग डबडले जन साहति विभुच्या पळ हि न पुरस्थ विरहातें,
शुकसारिका म्हणति ‘हा !,’ ताडिति शिशुसे उर स्थविर[1] हातें. ६३१
व सु, वपु, विसरुनि पुरजन, यादवनिधनस्थळाकडे बाळ,
भाळ स्त्रीजन ताडित, धांवति, मृग जेंवि झोंबतां ज्वाळ. ६३२
ते थें वसुदेव रणीं न विलोकुनि राम कृष्ण असु खरची,
तें देवकीमनीं बहु सुतपतिनिधनोग्रशल्य असुख रची. ६३३
वा टे पतिपुत्रांचा तो नाश, तसा चि देवकीनाश,
प्रियजनवियोग जैसा अत्युग्र, तसा न देव कीनाश[2]. ६३४
सु कुमारी ती वास्तव तत्काळ प्राण रोहिणी सोडी.
शोकीं च उग्रता बहु आहे, हाळाहळीं निपट थोडी. ६३५
दे हांतें स्वपतींच्या आलिंगुनियां बहु स्त्रिया उचिता
सुचिताशय्या सेविति; त्यांची वर्णील कोण हो! शुचिता? ६३६
बा हूनीं आलिंगुनि रामा[3] रामाचिया सुदेहातें,
शिरल्या दहनीं; त्यां जें पतिविरहज्वर न दुःख दे[4] हा तें. ६३७
य दुवरवसुदेवाच्या पत्नी न म्हणोनि ‘हाय!’ गात्रातें
पतिगात्रासह होमिति; याहुनि पर कर्म काय गा! त्रातें? ६३८
ज लिनाक्षप्रभुमूर्ति ध्यानीं आलिंगुनि, प्रिया भार्या,
दहनीं प्रवेशल्या त्या, भीष्मकनृपकन्यकादि[5] ज्या आर्या. ६३९
मो हीं बुडतां भगवद्गीतेची कास धरुनियां तरला,
नर[6] लाधला सुधृतिला, मति न च होवूं दिली तिणें तरला[7]. ६४०
भ क्त सखा[8] श्रीहरिचा आप्तांचें सेवटील जें कार्य,
करिता झाला विधिनें, बहु सांत्वन आपुलें हि तो आर्य. ६४१
गा जें उग्ररव[9] जलधि, तो वात चि पौरजनतृणें उडवी,
तुडवी प्रासाद जसे गज पद्म, द्वारकापुरी बुडवी. ६४२
व र्जुनि भगवन्मंदिर मात्र, भिउनियां प्रभुप्रभावातें,

१. वृद्ध. २. यम. ३. स्त्रिया. ४. अग्नि. ५. रुक्मिणी आदिकरून. ६. अर्जुन. ७. चंचल. ८. उद्धव. ९. भीतिप्रद आहे आवाज ज्याचा असा.

श्रीद्वारका बुडविली ती, जैसी दीपकप्रभा वातें. ६४३
ते थें संनिहित सदा भगवान् मधुसूदन स्वयें आहे,
जो सर्वमंगळांचें मंगळ, निजजनवियोग न च साहे. ६४४
बा ळवृद्धांतें इंद्रप्रस्थीं धनंजय स्थापी
वज्रातें अभिषेचुनि सांगे त्या कीं, 'मुकुंदयश बा! पी'. ६४५
सु हृदांची क्षयवार्ता सर्वभ्रात्यांसि पार्थ आयकवी,
धर्मादि तेंव पितामह वदले दुःखें मुहूर्त 'हाय!' कवी. ६४६
दे उनि तुज पद, गेले स्वपदासि धरुनि महापथासि कवी,
हित तव पितामहांची जैसी माता तसी कथा सिकवी. ६४७
बा! या श्रीकृष्णाच्या गातो जो मर्त्य जन्मकर्मातें,
या लोकीं परलोकीं पावे तो परम पूत शर्मातें." ६४८
य श हरिचें हें देतें हरिभक्तिसुधेचिया जना चवितें,
भक्तमयूरां दावुनि करुणाघन रामराज नाचवि तें. ६४९

---

# द्वादश स्कंध.

न रनाथ पुसे, 'यदुकुलभूषण गेल्यावरि स्वधामातें,
वंश महीवरि उरला कोणाचा, सांग हें बुधा! मातें.' १
मो हतमोकें शुक म्हणे, "पूरुकुळीं उपरिचर वसु ख्यात,
त्याचा बृहद्रथ, तया होय जरासंध शत्रुघनवात. २
भ रतकुळवरा! त्याचा सहदेव, तया हि होय जो तनय,
मार्जारि नाम त्याचें, त्याचा पुत्र श्रुतश्रवा सनय. ३
ग णिले वीस नृप असे अंत्य रिपुंजय नृपाळ जो भावी,
त्या वधिल अमात्य शुनक; कुजनमति श्रीस कां न लोभावी? ४

---

१. जवळ. २. हस्तिनापुरीं. ३. कृष्णाचा नातू त्याला. ४. तुझे परीक्षितीचे. ५. मोक्षमार्गाला. ६. इंद्रानें संतुष्ट होऊन दिलेल्या विमानांत बसून हा वसु अंतरिक्षांत संचार करी म्हणून यास 'उपरिचर' असें अन्वर्थक नांव लाभलें होतें.

व धुनि स्वामीस शुनक, करिल प्रद्योत आत्मसुत राजा;
त्याचा पालक भूपति, तो होइल राजका नृपा आजा. ५
ते नंदि[1]वर्धनावधि पांच[2] प्रद्योतनाख्य जे भावी,
[3]अष्टत्रिंशोत्तरशत वर्षें त्यांची च भूमि हे व्हावी. ६
वा गवितिल शिशुनागापासुनि मग होय जो महानंदी,
दश, [4]षष्ट्यधिकशतत्रय वर्षें गातील त्यां नृपां बंदी. ७
सु त शूद्रीगर्भोद्भव एक महानंदिनृपतिचा नंद
प्रबळ, महा[5]पद्मपति, क्षत्रियसंक्षय करील तो मंद. ८
दे श करिल निःक्षत्रिय, त्यासि 'महापद्म' हें दुजें नाम,
होतिल आठ सुमाल्यप्रमुख तया पुत्र, [6]मत्तताधाम. ९
वा वन्न आणि अठ्ठेचाळिस वर्षें नृपाळ ते राज्य
करितिल [7]नवनंदाभिध, ज्यांचें धन सैन्य हें बळ प्राज्य. १०
य मसे तेव्हांपासुनि नृप शूद्रप्राय उग्र होतील,
[8]चाणक्य काळवदनीं नंदांच्या जीवनासि ओतील. ११
न वनंदांतें बुडविल, बहुत चि चाणक्य दाविल क्रौर्य,
मग चंद्रगुप्त होइल राजा, संज्ञेकरूनि जो 'मौर्य'. १२
मो दक दश काळाचे, धरणीपति चंद्रगुप्त तो पहिला,
अंत्य बृहद्रथ राजा शत सदतिस अब्द भोगितिल महिला. १३
भ र घेइल राज्याचा आपण मारूनि बृहद्रथा राज्या,
तो [9]पुष्पमित्र सेनापति, रुचला नरकलोक थारा ज्या. १४
ग जसे मदांध दश नृप त्यापासुनि देवभूतिपर्यंत,

---

१. नंदिवर्धनापर्यंत. २. प्रद्योत, पालक, विशाखयूप, राजक व नंदिवर्धन. ३. एकशें अडतीस. ४. तीनशें साठ. ५. लक्षकोटि [ सैन्याचा ] स्वामी. ६. उन्मत्तपणाचें आश्रयस्थान. ७. नंद या नांवाचे नऊजण ( नंद व त्याचे आठ मुलगे मिळून ). ८. या नांवाचा एक प्रख्यात मुत्सद्दी. ९. हा शुंग घराण्यांतील पहिला राजा; यानें मौर्यांचा शेवटचा जो बृहद्रथ त्यास मारून राज्यपद बळकाविलें, म्हणून नरकलोक ज्या थारा रुचला.

ते एकशतद्वादश वर्षें होतील करुनि अर्यंत. १५
**व** धुनि परस्त्रीसक्ता त्या शुंगीं[1] देवभूतिला, राज्य
कैण्व[2] अमात्य तयाचा नामें 'वसुदेव' करिल तो प्राज्य[3]. १६
**ते** काण्व तीनशांवरि पंचेचाळीस अब्द भूपाळ,
चवथा अंत्य सुशर्मा; होइल तद्भृत्य[4] वृषळ तत्काळें[4]. १७
**बा** हुबळें वीस नृपति वर्षें छप्पन्न चयारशें महितें
वश करुनि भोगितिल; तीं तत्कर्में धर्मनीतिचीं अहितें[5]. १८
**सु** ज्ञा ! मग आभीर[6] क्षितिपति होतील दुष्टधी सप्त,
दुःशील गर्दभी[7] दश करितिल ते साधुमानसें तप्त. १९
**दे** तील ताप सुजना; लोभी होतील कंक नृप सोळा;
कष्टद अष्ट दयालवरहित यवन करितिल[8] क्षमा गोळा. २०
**वा**! नृप गरुंड दश मग आधीं होतिल तुरुष्क ते चवदा.
एकोनैकादशशत अब्दें[9] म्हणतिल प्रजांसि 'हाच! वदा.' २१
**य** वन तुरुष्कांऽपरि क्षितिपति होतील मौन ते अकरा;
वर्षशतत्रय त्यांचें राज्य प्रसवेल पातकप्रकरा. २२
**न** रनाथ भूतनंदीपासुनि होय प्रवीर तों बा! रे!
षडधिकशताब्द[10] होतिल भूपति जे सकळ दुर्गुणां थारे. २३
**मो** हांधदृष्टि त्यांचे सुत म्हणवाया प्रजांसि 'हा!' तेरा,
पति खंडमंडळांचे[11]; धरितिल भूतक्षयार्थ हिंतेरा[12]. २४
**भ**[13] षण प्रमत्त तैसा अतिविषयी, पापमति, महाक्रूर,
मागध पुरंजय दुजा व्याकुळ करिल प्रजा जसा धूर. २५
**ग**[14] रशिखिदुःसह करिल म्लेच्छप्राय द्विजादिवर्णांतें.

---

१. पुष्पमित्रादि दशांची संज्ञा—**पंत.** २. वंशविशेष. ३. मोठें. ४. त्याचा (सुशर्म्याचा) सेवक [जो] शूद्र [तो] त्याचा [सुशर्म्याचा] नाशकर्ता. ५. धर्म आणि नीति यांस अनुपकारक अशीं. ६. गवळी राजे. ७. वंशविशेष. ८. पृथ्वीचें राज्य आटोपितील. ९. १०९९ वर्षें. १०. १०६ वर्षें. ११. खंडसमुदायांचे. १२. हत्यारा. १३. कुत्रा. १४. विष व अग्नि यांप्रमाणें दुःसह.

ऐसे कुनृप कलियुगीं, यद्वृत्त गरळ विवेकिकर्णीतें. २६
व र्तेल अधर्म जगीं; सत्य, शुचित्व, क्षमा, दया, आयु,
स्मृति, बळ तुरेल. तूळ[1] चि धर्म, कुकळिकाळ तो महावायु. २७
ते व्हां महत्वकारण वित्त चि, बळ तें चि धर्मनयहेतु,
दांपत्यकारणें[2] रुचि च होइल, मोडेल सर्व ही सेतु[3]. २८
वा डर्वपण[4] तें सूत्र[5] चि, पंडितपण फार बोलणें मात्र,
साधुत्वहेतु दंभ चि, अधनत्व नयीं[6] पराभवा पात्र. २९
सु रुचिरता केशांचें धारण; तें तीर्थ, दूर जें तोय;
पुरुषार्थ उदरभरण चि; धृष्टत्वें[7] चि सत्य कलियुगीं होय. ३०
दे हालंकार तरि स्नान चि, पोषिल कुटुंब तो दक्ष;
किति सांगों? करिल कली, जे दुर्गुण ते चि गुण असे लक्ष. ३१
वा तों धर्मनयांची न रुचेल चि, होतिल प्रजा दुष्टा.
रुष्टा, लुब्धा, क्षुद्रा, ज्यांची न असेल मति कधीं तुष्टा. ३२
य वन जसे गाईस, प्रबळ खळ तसे प्रजेसि भक्षितिल,
कुपतिभयें जन पळतिल, गिरिदुर्गीं प्राण मात्र रक्षितिल. ३३
न ष्टायु अवें जगतिल जन वर्षें वीस फार कीं तीस;
क्षीणा प्रजा; बुडवितिल दुर्भिक्ष, व्याधि, चोरटे, तीस. ३४
मो हें, बहु दुःखभरें, प्राणी अत्यंत ओडकळतील,
न च विटतिल, जरि हि विषय विषकंदाचे चि मोड कळतील. ३५
भ जतील श्यामाका[8]परि बहु अणुतेसि ओषधी, राज्या!
सेळी च धेनु होतील, न तसा स्पर्शें न दोष धीरां[9] ज्या. ३६
ग रुडरथ कल्किनामें विष्णुयश[10]क्षितिसुराचिया धामीं,
प्रभु अवतरेल धर्मस्वजनत्राणार्थ शंभलग्रामीं. ३७
व धिल सकळ दस्यूंतें[11] प्रभु बेसुनि देवदत्त[12]वाजिवारि.

---

१. कापूस. २. वैवाहिक स्थिरताचें कारण. ३. धर्ममर्यादा. ४. ब्राह्मणत्व. ५. जानवें. ६. न्यायाच्या ठिकाणीं. ७. धिटाई. ८ तृणविशेषाप्रमाणें. ९. धीर पुरुषा. १०. विष्णुयशनामक ब्राह्मणाच्या. ११. चोरांला. १२. घोड्यावर.

सुख देइल प्रजांतें, दिधलें त्वां[1] विपुळ जेंवि आजिवरि. ३८
ते जानें, सत्तेनें, प्रभुदेहाच्या सुपुण्यगंधानें,
होतील शुद्ध चित्तें सर्वजनांचीं हि तदनुसंधानें[2]. ३९
वा रि जसें पंकातें, अमृतकराचें जसें चि तापातें,
रविचें जेंवि तमातें, प्रभुचें दर्शन हरील पापातें. ४०
सु ख व्हाया जीवांला, वर्णाश्रमधर्म जो जसा पहिला
सर्व प्रवर्तवाया, न्यायें पाळावया पुन्हां महिला, ४१
दे वापि शशिकुलज, रविकुलज मरु, कलापनामकग्रामीं
आहेत योग साधुनि, आज्ञा करिल स्वयें तयां स्वामी[3]. ४२
वा ढवितिल वर्णाश्रमधर्म, कृतयुगप्रवृत्ति पुनरपि ती.
जन्ममरण चुकवाया जगदीशयशोमृतासि सुनर पिती. ४३
य श मात्र राहतें, बा! कांहीं काळापुढें मग न राहे,
क्षिति हांसे पति म्हणत्या काळनदतटोद्भवा नग[4]नरा हे. ४४
न हुप पृथु नृपति, अर्जुन[5], मांधाता, सगर, राम, शर्याती,
गर्य[6], नृग, पुरूरवा, रघु, यांची कीर्ति च मनुष्यवर्या! ती. ४५
मो टे खट्वांग निषधपति, गाधि, ययातिराज, शंतनु, ती
गंगा कन्या ज्यांची[7], करिती अद्यापि सर्व संत नुती[8]. ४६
भ रत, ककुत्स्थ, कुवलयाश्व क्षितिपति, धुंधुमार, तृणबिंदु,
कनककशिपु, शंबर, दशमुख, नमुचि, वदेल कोण कवि विंदु[9]? ४७
ग णना गणनाथाला न घडे ऐसे महीश कवि झाले,
कालह्रदांत[10] तेजोनिधि[11] दहनें करूनें[12] ही शकें विझाले. ४८
व सुधाधिपतिशतकथा[13]कथन न परमार्थ सर्वथा राज्या!

---

१. त्वां (परीक्षितानें). २. त्या (गंधाच्या) अनुरोधानें. ३. कल्की. ४. वृक्षासारख्या मनुष्यास. ५. कार्तवीर्य अर्जुन. ६. वैवस्वतमनूचा मुलगा. ७. भगीरथाची. ८. स्तुति. ९. ज्ञाता. १०. काळाच्या डोहांत. ११. अग्नि [लक्षणेनें] त्याच्याप्रमाणें तेजस्वी. १२. शककर्ते होऊन सुद्धां. १३. शेंकडों पृथ्वीपतींच्या कथांचें सांगणें.

हरिचा गुणानुवाद चि, म्हणती कविराज सर्व 'थारा' ज्या." ४९
ते व्हां नृप मुनिस म्हणे, 'मज दे सांगोनि हें हि तोषातें,
जन कोणत्या उपायें या कळिच्या नाशितील दोषातें?' ५०
वीं सव्यात्मजनंदन[1] मुनि निववायासि उत्तराजातें,[2]
ऐकावें सुजनाहीं दे बहु हर्षोनि उत्तरा ज्या तें:— ५१
"सु त भृत्य स्त्री शिष्य त्यजितिल पितृनाथपतिगुरूंसि नृपा!
न वसेल जनांत विनय लज्जा, परलोकभय, विवेक, कृपा. ५२
दे हस्त्रीजनपोषण, कपटव्यवहार सर्व ही उलटा,
मुल टाकितिल, पति कथा किति मग? बहु होतिल स्त्रिया कुलटा. ५३
वा चाल, श्रुतिदूषक, लोभी, वधितील काकिणीकरितां,[3]
वारितां चांडाळीस न भीतिल, देवद्विजस्व[4] ही हरितां. ५४
य ति धनसंग्रह करितिल, जन निर्धन अन्न फार भक्षितिल,
होतिल पुष्कळ पोरें; किंबहुना धर्म नय न रक्षितिल. ५५
न ळ गांजिला खळें त्या, पावुनि न म्हणेल कोण 'हा!' कळिला?
परि या दोषधिनें[5] हरिजन अहिनें वीशसा[6] न आकळिला. ५६
मो कलुनि लोकलज्जा, करितां श्रीकृष्णकीर्तन, प्राणी,
निश्चित तरेल जैसें हें, अन्य क्षम न पातकित्राणीं. ५७
भ स्म चि होती कळिचे दोष सकळ कृष्णकीर्तनें जाण,
आण स्वांतीं;[7] वाहूं वाटाया सत्य हें तुम्ही आण. ५८
ग रुडरथ प्रभु होतां संकीर्तित, पूजित, श्रुत, ध्यात,
बा! तत्काळ भवायुतपाप[8] हरी, हा प्रताप सुख्यात. ५९
व ह्नि जसा हेमस्थित[9] तद्गत ताम्रादि मळ जसा हरितो,
न जळादि, तसा याग न अशुभाशय[10] हृदयगत हरी हरि तो. ६०

---

१. वासवीच्या (सत्यवतीच्या) मलाचा (व्यासाचा) मुलगा—शुक. २. उत्तरेच्या मुलाला—परीक्षिताला. ३. दमडीसाठीं. ४. देव व ब्राह्मण यांचें धन. ५. दोषयुक्त आहे बुद्धि ज्याची अशा (कलीनें). ६. गरुड—पंत. ७. लक्ष्यांत. ८. दहा हजार जन्मांतील पाप. ९. सोन्यांत असलेला. १०. पापहेतु.

**ते** व्रत, जप, तप, विद्या, मैत्री, तीर्थाभिषेक, दान, असे
योगादि उपाय असति, शुद्धिप्रदता तसी न त्यांत वसे. ६१
**वा** स करुनि हृदयांत, श्रीकृष्ण दुरित जसा धुतो, साधु
जन कीर्तनें चि शुचिता उचिता; येणें असाधु तो साधु. ६२
**सु** खसिंधुकेशवातें यास्तव हृदयस्थ तूं करीं बापा!
पापा नाशिल सकळा, प्रकटुनि हरि हरिल कीर्तनें तापा. ६३
**दे** वांच्या देवातें धरितां हृदयांत, न चळतां स्मरणीं,
घे [1]भाक, बा! कशाला संशय? वरिसील सुगतिला मरणीं. ६४
**बा** पा! मरणारानीं वसवी जो द्वारका अयोध्या वा,
तो प्रभु चि सावधानें चित्तें ध्यानांत कां न यो? ध्यावा. ६५
**य** लें ध्यातां, शरणागतवत्सळ दीनबंधु देव 'रहा
होऊनि मत्स्वरूपीं मीं च' म्हणे; चिंतकासि दे वर हा. ६६
**न** रपा! दोषनिधि च कळि, परि मोटा एक गुण असे याचा;
श्रीकृष्णकीर्तनें चि प्राप्त नता मोक्ष सर्वथा साचा. ६७
**मो** क्षादि [2]कृतीं [3]ध्यातां, पावे त्रेतायुगांत [4]यजिता तें,
जें द्वापरांत दासा, कळिमध्यें कीर्तितां चि [5]अजितातें. ६८
**भ** गवान् [6]परमाण्वादिद्विपरार्धावधिक काळ साचार;
द्वादशसहस्र वर्षें [7]दिव्य; युगें यांत होति बा! च्यार. ६९
**ग** णिलीं च्यार सहस्रें तीन तथा, दोन एक, [8]दुपट शतें;
तीं च्यार कृत त्रेता द्वापर कलि नाम जाण सुकविमतें. ७०
**व** दति [9]चतुर्युगदशशत दिन विधिचा, कल्प ज्यांत मनु चवदा,

---

१. वचन. २. कृतयुगांत. ३. ध्यान करणारा. ४. यज्ञ करणारा. ५. कृष्णाला. ६. [ कालाच्या ] परमाणूपासून आरंभ करून दोन परार्धपर्यंत अवधि आहे ज्याचा असा [ ब्रह्मदेवाच्या आयुष्याचा काळ ]. ७. स्वर्गातील. ८. ज्या युगाला वर्षांचे जितके सहस्र सांगितले असतील त्यांच्या दुप्पट शतकें त्यांत मिळवून होणारी संख्या; म्ह० कृतयुगांत ४८०० वर्षें होतात. ९. चार हजार युगें.

प्रलय चतुर्विध[1]; रजनी नैमित्तिक, तो उणा अधिक न वदा. ७१
ते[2] थें तींलोकांचा[3] नाश, प्राकृतिक तो दुजा राज्या !
द्विपरार्धांतीं नाशति, त्या सप्त प्रकृति, वर्णिल्या बा ! ज्या. ७२
बा! जाण महदहंकृति[4], तन्मात्रा पांच[5] या प्रकृति सात;
यांचा होइल काळें द्विपरार्धांतीं नृपा ! असा घात. ७३
सु रपति[6] वर्षेल न शतवर्षें, माता[7] प्रजा न पोषील,
सागर, देह, मही, रस, सर्व हि अत्युग्र तपन[8] शोषील. ७४
दे दीप्यमान भास्कर, त्या संकर्षणमुखाग्नि[9] भेटेल,
ब्रह्मांड शुष्कगोमयपिंड[10] तसें चहुकडूनि पेटेल. ७५
वा हेल वात वर्षें शत, वारिद वृष्टि फार करितील;
वर्षोनि वर्ष शत ते सर्व ब्रह्मांडविवर[11] भरितील. ७६
यँ[12] वसाच्या राशिपरि ब्रह्मांड जळुनि विरेल तोयांत,
तें अनळीं, अनळ हि, जो कारण मारुत, शिरेल [13]तो यांत. ७७
न भ गिळिल मारुताला, त्यासि अहंकार, त्या महत्तत्व,
त्यातें प्रधान[14], कथिलें प्राकृतिकाचें तुला असें तत्व. ७८
मो ह सरेल ज्ञानें, तेव्हां आत्यंतिकप्रलय जाण;
नित्यप्रळय शरीरावस्थानाशें[15], असें मनीं आण. ७९
भ व्या भगवंताच्या कथिल्या लीला कथा अशा कांहीं,
या विस्तरें वदाया सामर्थ्य नृपा ! अजास[16] ही नाहीं. ८०
गा हन भवाब्धि तराया, भगवल्लीलाकथाश्रवणसेतु;

---

१. नैमित्तिक, प्राकृतिक, आत्यंतिक व नित्य असे चार प्रकारचे. २. [पहिल्या] नैमित्तिक प्रलयात. ३. [ भूर्लोक, भुवर्लोक व स्वर्लोक या ] तीन लोकांचा. ४. महत्तत्व आणि अहंकार. ५. शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे पंचविषय. ६. मेघाधिपति इंद्र. ७. पृथ्वी. ८. सूर्य. ९. शेषमुखोत्पन्न अग्नि. १०. वाळलेल्या शेणाचा गोळा. ११. ब्रह्मांडरूप दरी. १२. गवताच्या. १३. तो अनळ स्वकारण जो मारुत यांत शिरेल—**पंत.** १४. प्रकृति. १५ देहाच्या [ प्रतिदिवशीं बदलणाऱ्या ] अवस्थांच्या नाशानें. १६. ब्रह्मदेवास.

याहुनि अन्य कलियुगीं, नाहींच उपाय शुद्ध सुखहेतु. ८१
व दला श्रीनारायण नारदमुनिला पुराण[१]; नारद या
पात्र व्यासा करि; तो मज पढवी, कीं मनांत फार दया. ८२
ते शौनकादि नैमिषवासी, सुतपोधनैकवैश्रवण[२],
या सूतमुखें करितिल भागवताचें मुनींद्र कै[३] श्रवण. ८३
वा! ज्याचिया प्रसादापासुनि विधि[४] रुद्र मन्युपासून[५],
प्रभु यांत वर्णिला तो, ज्या मागति सर्व तोंड वासून. ८४
सु पुराण, श्रुतिसंमित[६], भागवत श्रवण जाहल्याउपरि
जन्ममरणभीति जना, अमृतें धुतल्या हि लोचना खुपरी. ८५
दे हाचे जन्ममरणधर्म, नृपा! ब्रह्म तूं, शुचि स्फटिक
रक्त[७], तसा चि शरीरीं हा भाव उपाधिनें[८] दिसे लटिक. ८६
वा ढ विचारापासुनि चळुनि न तूं धीर दक्ष काचावें[९],
म्हण निजहृदयांत 'अनृतदेहाला[१०] अनृततक्षका! चावें'. ८७
य लें उक्तविचारें स्थिर निजरूपीं च जरि रहासील,
तूं तक्षकभुजगातें चरणीं डसतां हि न च पहासील. ८८
न रवर्या! त्वां पुसिलें तें हरिलीलादि आयकविलें कीं,
मज पूस पुसायाचें; अर्पीना वस्तु काय कवि लेंकीं?" ८९
मो दें अभिमन्युतनुज वंदुनि त्या साधुपूज्यपादास[११],
बोले, "प्रभो! अनुग्रह केला; झाला कृतार्थ हा दास. ९०
भ गवान् हरि गुरुवर्या! त्वां मज मरणोन्मुखासि ऐकविला.
दीनोद्धरण चि बहुमत, न च उर्वश्युक्त 'तत्थै[१२]' कविला. ९१

---

१. श्रीमत् भागवत. २. चांगल्या तपोरूप धनाचे केवळ कुबेर च. ३. कधीं-तरी. ४. ब्रह्मदेव. ५. क्रोधापासून. ६. वेदतुल्य. ७. तांबडा. ८. मायेनें. ९. भ्यावें. १०. देहात्मभाव सुटला म्हणजे देह व तक्षक हे दोन्ही अनृत; मग चावण्याचें दुःख कोणास होणार? हे तात्पर्य-निर्णय. ११. साधूनीं पूज्य आहेत पाय ज्याचे अशाला (शुकाला). १२. गाण्यांतील तालाचा एक सूचक शब्द.

ग[1] रुडस्यंदनसद्यश हें नेतें दोष नैकें[2] विलयातें,
कोण हरिजनेतर अतितसा शसासि ऐकविल यातें ? ९२
ब हु अद्भुत न तुम्हां हरिभक्तांच्या मीं अनुग्रहा मानीं,
उग्र हि कलिकाळ[3] म्हणे शिरतां होउनि अनुग्र ‘हा !’ मानीं. ९३
ते जें गेलें त्वदनुग्रहरविच्या मोहतिमिर विलयातें;
धन्यत्व दिलें त्वां या[4] पतिता साधूंत हि मिरविल या तें. ९४
बा ! तक्षकादि लोकीं जे कोणी उग्र मृत्युचे कर्ते,
त्यांपासूनि भय नसे. मम धी ब्रह्मीं च निश्चळा वर्ते. ९५
सु ज्ञवरा ! गुरुवर्या ! भगवद्रूपा ! दयार्णवा ! प्राज्ञा !
मौन धरूनि ब्रह्मध्यान करायासि दे मला आज्ञा. ९६
दे ह, प्राण त्यजितों, चित्त ब्रह्मीं प्रवेशउनि योगें.
हो न जना कां ठावें ? गांठावें अनृतवपु अनृतभोगें.” ९७
वा डववर शुक आज्ञा देवूनि, शिरीं शिवोनि भूपातें,
जाय, यदीय पदांच्या रोमांच धरी निवोनि भू पातें. ९८
य तिपति शुक गेल्यावरि गंगातीरीं कुशासनीं ज्ञानी,
तो उत्तरामुख[5] बसे, संयताचतेंद्रियक्रिय[6] ध्यानीं. ९९
न रपतिस डसाया ये तक्षक, मार्गांत कश्यपा[7] पाहे,
नररूपें त्यासि पुसे, ‘जासी द्रुत[8], कार्य कोण गा ! आहे ?’ १००
मो टा श्रवणीं आदर जाणे ब्राह्मण म्हणे, ‘नृपा आर्या !
तक्षक डसेल, रक्षिन, वित्तें माझ्या हि करिल तो कार्या. १०१
भ स्म हि होतां उठविन’ विप्र म्हणे; म्हणुनि तक्षक व्याळ
दर्शन देवूनि वदे, ‘वट करितों दग्ध, या बरें पाळ.’ १०२
ग रहर[9] म्हणे, ‘दरयश[10] न जोडी’ व्यवहारदक्ष ‘कवडा तें,

---

१. विष्णूचें उत्तम यश. २. अनेक. ३. कलियुगरूप काळ. ४. या मला. ५. उत्तरेकडे तोंड करून. ६. नियमित केल्या आहेत चित्त आणि इंद्रियें यांच्या क्रिया ज्यानें असा. ७. या नांवाच्या ब्राह्मणास. ८. लवकर, घाईनें. ९. विष हरण करणारा. १०. शंखाचें यश (साम्य).

मत्सम मीं च, डस बरें.' तों तो करि भस्म तक्षक वडातें. १०३

व रविद्यासामर्थ्यें भस्मीं उठवी क्षणांत मोडातें,
मंत्रजळ तथा झालें बा! साक्षादमृत जेंवि रोडातें. १०४

ते व्हां वाटे ऐसें, झाली नव्हती च काय हानि वडा.
विषवैद्यांतुनि, जैसा मनुजांतुनि मनुजकाय, हा निवडा. १०५

वा डववरासि तक्षक दे बहु धन करुनियां अनुनयातें.
मागें फिरवी सांगुनि, विनयानें धरुनियां हनु, नयातें. १०६

सु ब्राह्मणरूपें तो तक्षक अभिमन्युनंदना चावे;
परमारणप्रतिज्ञासिद्धिसुखें कां न मंद नाचावे? १०७

दे ह जळे तक्षकविषदहनें त्या ब्रह्मभूतभूपाचा,
तो दाह पुत्रधर्म चि, घात घडे त्या न तातरूपाचा. १०८

वा द्यांचा गजर अमर कुसुमांची करिति तेधवां वृष्टि,
'हा!' साधु म्हणति, त्यांच्या शोकें प्रेमें हि साश्रु त्या दृष्टी. १०९

य मधर्म हि 'हा!' वदला, बहु विस्मित मानसांत तो झाला,
शोकभवें प्रथम, मग प्रेमभवें अश्रुच्या भरें न्हाला. ११०

'न ळ पुण्यश्लोक तसा हा हि परीक्षिन्नृपाळ' कवि म्हणती,
पण तीर्थकीर्तिहरिसम वदत्यांतें स्तवुनि करिति ते प्रणती. १११

मो टा क्षोभ परीक्षित्सुत जनमेजय नृपाळ तो पावे,
मग पाळकनाशाग्रहकर्में भूदेव कां न कोपावे? ११२

भ स्म भुजग बहु करवी तो आरंभूनि सर्पसत्रास,
शक्रासि शरण गेला होउनि तो दीन सर्प सत्रासें. ११३

---

१. अंकुराला. २. भगवान्—**पंत.** ३. प्रार्थनेला. ४. ब्रह्म झालेल्या राजाचा. ५. [शरीरास जें कारण त्या] जनकस्वरूपाचा. ६. चांगला असून अकालीं गेला म्हणून प्रथम दुःख व थोड्या काळांत मोक्षपदाला गेला म्हणून नंतर प्रेम. ७. पवित्र आहे कीर्ति ज्याची तो. ८. [पृथ्वीचा] पालनकर्ता त्याचा जो नाश तद्रूप आग्रहयुक्त कर्मानें ९. सभय.

'ग रळधरा[1]धम तक्षक मुनि हो! आहुनि पडे न कां होमीं?'
भूप पुसे, विप्र म्हणति, "म्हणतो, 'सुरपति! पडेन कां हो! मीं?'"
व सुधेश म्हणे, 'दुष्ट चि दुष्टाश्रय[2] वक्र[3], काय हो! माया?
पाडा दहनीं, प्रभु हो! आळस कां शक्रकाय होमाया?' ११५
ते ऋत्विज होमाया त्या सत्रीं पावकांत वक्रातें,
'ये रे! ये, पड' म्हणती तक्षकसहवर्तमान शक्रातें. ११६
वा सव सतक्षक पडों लागे सविमान गतमद असुनीं,
जनमेजया हित कथी सुरगुरु करुणासुधासदभ्र[4] मुनी. ११७
'सु ज्ञा! अजरामर अहि; घडलें कीं तक्षका सुधापान;
स्वारब्ध[5] कर्म सर्पव्याघ्रव्याध्यादि, सत्य हें मान. ११८
दे हाकडे जनु मरण; आत्मा शाश्वत; न होय हा, न मरे;
सुखदुःखद अन्य नसे; बहु केले भस्म सर्प; बा! शम रे!' ११९
वा णी गुरुची मानी; नृप करवि समाप्त सर्पसत्रास.
अभयें शक्र सुखविला, जो केला विगतदर्प सत्रास. १२०
य श गातां श्रीहरिचें, भजतां निष्काम पादराजीवां,
वरिती स्वयंवरवधू जेंवि तसी मुक्ति सादरा जीवां. १२१
न मन असो श्रीकृष्णद्वैपायन[6]गुरुवरासि, हा छात्र
ज्याच्या चरणध्यानें झालों या संहितेसि मीं पात्र. १२२
मो दें शौनक मुनिवर पुसता झाला विभाग वेदाचे.
सूत कथी पैलादिक[7], जे नाशक सर्वमोहखेदाचे. १२३
भ गवान् व्यासमुनीश्वर, मोहतम हरावयासि जो दक्ष,
दे रोमहर्षणातें[8] त्या च्यार पुराणसंहिता लक्ष. १२४

---

१. विष धारण करणारे [जे सर्प] त्यांतील अधम. २. दुष्टांचा आधार. ३. कुटिल. ४. करुणारूप अमृताचा चांगला ढग. ५. आपण आरंभिलेलें. ६. व्यासांस 'कृष्णद्वैपायन' म्हणण्याचें कारण असें कीं, कृष्णवर्ण यमुनेंतील द्वीपांत त्यांचा जन्म झाला होता. ७. पैल आदिकरून. (व्यासानें वेदाचे चार भाग करून पहिला ऋग्वेद पैलऋषीला, दुसरा वैशंपायनाला दिला, इत्यादि कथा आहे. ८. सूताचा बाप त्याला.

ग णिलीं ख्यात पुराणें ब्राह्म, तथा पाद्म, वैष्णव हि तिसरें;
शिव, लिंग, गरुड, नारद, भागवत हि, जें म्हणे, ‘भवा विसरें’. १२५

व ह्नि, स्कंद, भविष्य हि, तैसें चि ब्रह्मपूर्व[1] वैवर्त,
मार्कंडेय हि, ज्याचें श्रवण चुकवि उग्र भवमहागर्त. १२६

ते रा कथिलीं. वामन, वाराह हि, मात्स्य, कौर्म्य सतरावें,
अठरावें ब्रह्मांड, श्रवणें यांच्या भवाब्धिस तरावें. १२७

वा डवकुळपति शौनक सूतासि पुसे मृकंडतनयातें,
कीं, ‘तो चिरायु उरला कल्पांतीं’ म्हणति सुज्ञजन यातें. १२८

‘सु ज्ञा! तो यां[2] कल्पीं भार्गव अस्मत्कुळांत कीं झाला.
भूतलय नसे आझुनि कैसा त्याच्या चि अनुभवा आला? १२९

दे खे प्रभु शिशु पत्रीं[3] न वरुनि एकार्णवांत[4] हानि वटीं.
दुर्घट हें परिसतसों. उरला संदेह एक हा निवटीं.’ १३०

वाॅ क्पतिसा[5] सूत वदे, “चित्त तुझें शुभकथापर महर्षे!
त्वत्प्रश्नें मन माझें स्मरुनि खगाधिपरथा[6] परम हर्षे. १३१

य मनियमरत, बृहद्व्रतधर[7], हरिगुरुभक्त, शांत, शुभशील,
मार्कंडेय म्हणे, ‘या भक्तिपुढें सुरभि! काय दुभसील[8]?’ १३२

न ष्टविषयवासन धारि सुतपस्तेजेंकरूनि हा रविता;
होय, भजुनि मन्वंतरषट्क[9] हरिस, मृत्युला हि हारविता. १३३

मो टे मोटे योगी, विधि, शंभु, कुमार, भृगु, असे सर्व
विस्मित झाले, वाटे, तेजस्वी सूर्य यापुढें खर्व[10]. १३४

भ य बहु पावे मग या सप्तममन्वंतरीं[11] बलद्वेषी[12].
गंधर्व अप्सरा स्मर[13]मधुमदमलयानिळादिक प्रेषी. १३५

---

१. ब्रह्मवैवर्त. २. चालू वाराहकल्पांत. ३. वटपत्रावर. ४. [ प्रलयकाळच्या ] एकसमुद्रांत. ५. बृहस्पतीसारखा. ६. विष्णूला. ७. मोठें व्रत धारण करणारा. ८. दूध देशील. ९. सहा मन्वंतरें. १०. लहान. ११. सातव्या म्हणजे वैवस्वतमन्वंतरांत. १२. बलासुरशत्रु इंद्र. १३. काम, वसंत, मद, मलयपर्वतावरील वारा आदिकरून.

ग वें हिमालयाच्या उत्तरपार्श्वीं तदाश्रमीं आले.
भानुपुढें दीपकसे, निष्प्रभ मुनिसत्तमापुढें झाले. १३६
'व श मुनिस करूं चि करूं सुमनोहरदिव्यगीतनृत्यांहीं,'
या संकल्पें केलें सर्व हि तेथें महेंद्रभृत्यांहीं. १३७
ते पुंजिकस्थळी स्त्री केली मलयानिळें पुढें नग्ना.
मग्ना स्वसुखीं मुनिमति भग्ना झाली न हरिपदीं लग्ना. १३८
वा सवभृत्याहीं त्या मुनिला मोहावयासि जो केला,
तो जेंवि अभाग्यांचा उद्योग व्यर्थ सर्व ही गेला. १३९
सु हा भुजगा उठउनि, शिशुसा स्मर सगण जाय कातर तो,
ज्या स्मरहर मानवला, त्या कैसा साधुनायका तरतो? १४०
दे वेशानुचराहीं धर्षित तन्हि निर्विकार, तो मित्र
नारायणा नव्हे कां? श्रेष्ठीं श्रीहरिजनीं न तें चित्र. १४१
वा सव वचके पाहुनि मदनवदन सदन सर्वदैन्याचें,
होय सुविस्मित परिसुनि ओषध मुनितेज विघ्नसैन्याचें. १४२
य श मार्कंडेयाचें अत्यद्भुत होउनी हि अच्छाया.
कामादिविघ्नसेना पतिपासीं जाय, गीय अच्छा यी. १४३
न रनारायण ऋषिवर कृषिवर वन तेंवि सुमुनिवर वळले,
श्रीचरणपद्म ज्यांचें कीर्तिसुगंधें सदैव दरवळले. १४४
मो दभरें भरला तो मुनि, पाहुनि सानुकंप दोघांतें.
वंदुनि, पूजुनि, विनयें वर्णी त्या ज्ञानसंपदोघांतें. १४५
'भं द्रं ते' ऐसें त्या मुनिस म्हणुनि, सुप्रसन्नवदन मुनी,
'वर माग' म्हणति, तेव्हां त्यांतें विनवी महर्षि पद नमुनी. १४६

---

१. मार्कंडेयाच्या आश्रमांत. २. महेंद्राच्या सेवकानीं. ३. या नांवाची स्त्री. ४. जडलेली. ५. शिव. ६. सज्जनाग्रणीला ( मार्कंडेयाला ) उल्लंघितो. ७. छळलेला. ८. निर्विकारत्व व नारायणमित्रत्व. ९. कांतिहीन. १०. या (मार्कंडेयाला) चांगली गाती झाली-तिनें त्याची उत्तम स्तुति केली. ११. शेतावर. १२. ज्ञानरूप संपत्तीच्या ओघाला. १३. तुझें कल्याण [असो].

“ग तिदायक नायक हो! वर या पददर्शनांत शतकोटी.
श्रीचरणरेणु हा [1]श्रितभवकोटिमहाघशैलशतकोटी. १४७
व र देतां तरि, [2]जीणें मोहित सर्व हि, सपद्म[3]भव, लोक
वस्तूंत भेद पाहे. प्रभुजि! म्हणा, ‘या सतीसि[4] अवलोक.’” १४८
ते प्रभु ‘तथास्तु’ ऐसें सुस्मित[5]पीयूषसिक्तसें वदले.
वचकें न च केव्हां ही दास जयांचा, न नियतिसीं[6] वदले. १४९
वा रिदसे प्रभु गेले मोदानें मुनिमयूर निववून,
द्विज धन्य होय उजवें घालुनि निजशिर पदांसि सिववून. १५०
सु रसेव्यपुष्पभद्रातीरीं एके दिनीं मुनी आहे,
राहे संध्यासमयीं. सहसा मायाचरित्र हें पाहे. १५१
दे शोदेशींचे ही उपडुनि तृणसे नभांत उडवीत,
तुडवीत द्रुम मारुत ये जों तों घन हि विश्व बुडवीत. १५२
वा रिधि च्याऱ्ही मोडुनि मर्यादा धांवले जसे [7]दंती,
शतशः [8]क्ष्माधरांतें बुडविति परि ज्यांसि तिळ नसे खंती. १५३
य वननृपानीं श्रुतिसी, बुडविलि विश्वंभरा प्रजासहित,
लावी मुनिस गटकळ्या खाया तो देव, जो [9]व्रजास हित. १५४
न ळ जेंवि कलिव्यसनीं, मुनिवर एकार्णवीं बहु श्रमला,
श्रमला, तमांत गमला [10]खद्योत. म्हणे, ‘विनाश कां न मला?’ १५५
मो हीं चित्त, करी वपु मुनिचें एकार्णवांत मज्जन, हो!
तो अयुतायुतवर्षें, होय बहुक्लेशपात्र सज्जन हो!. १५६
[11]भ वतां बहुकाळ जळीं तो मार्कंडेय ताप बहु साहे,
एकार्णवीं महीच्या [12]उन्नतदेशीं सुरम्य वट पाहे. १५७
ग टकळिया खात जळीं ईशानदिशेकडील जी ढाळी,

---

१. आश्रितांच्या कोटि जन्मांतील महापातकरूप पर्वताला केवळ वज्र च. २. ज्या मायेच्या योगानें. ३. ब्रह्मदेवासह. ४. ईश्वरी मायेस. ५. सुस्मितरूप अमृतानें सिंचिलेंसें. ६. दैवाशीं. ७. हत्ती. ८. पर्वतांला. ९. गोकुळास. १०. काजवा. ११. फिरतां. १२. उंच प्रदेशांत.

तत्पत्रीं, शिशु, मारुत जावळचामर[1] जयावरी ढाळी, १५८
व[2] टदळशायी, श्यामळ, सुरुचिर निजचरण चोंखिता बाळ
पाहुनि भुलला, विसरे झाली एकार्णवांत आबाळ[3]. १५९
ते जस्विशिशुजवळि मुनि जातां, त्यातें तदीय निश्वास
मशकापरि ने उदरीं. तेथें पाहे अशेषविश्वास. १६०
बा ळोदरांत हिमगिरि, तत्पार्श्वीं[4] स्वाश्रमासि ही पाहे.
तन्निकट पुष्पभद्रानाम नदी जी, तसी च ती वाहे. १६१
सु ख मानी मुनि तेथें निजपरिचिततापसांसि पाहोनी,
तों शिशुच्या श्वासें ये बाहिर चिरकाळ आंत राहोनी. १६२
दे हाबाहिर शिशुच्या निघतां प्रलयार्णवीं घडे पतन,
तो कवि तोक विलोकी, पुनरपि जाला वटद्रु[5] ज्या वतन. १६३
वा टे आलिंगावा सुरुचिरतर बाळ जो मनीं ठसला,
तों तें कांहीं नाहीं. मुनि पुष्पवहातटीं[6] असे बसला! १६४
य[7] क्षपसख ये तेथें, बसुनि वृषवरीं प्रियेसवें फिरत.
पाहुनि उमा म्हणे, ‘या द्या वर, अत्यंत हा तपोनिरत.’ १६५
न गजेसि शिव म्हणे, ‘गे! निष्काम मुकुंदभक्त हा समज.
मोक्ष हि नको, तया द्या वर म्हणसी, ये म्हणोनि हास मज. १६६
मो टा हरिजनसंगमलाभ मज असे, न तूं उमे! रूस.
बोलवितों यासि पहा, सति! हा तृण मानितो सुमेरूस[8].’ १६७
भ व वदुनि असें निकट चि ठाके. मुनि न समजे हरागमना.
भगवद्ध्यानरताचा, न विलोकी, तरि हि ये न राग मना. १६८
ग रकंठप्रभु मुनिच्या हृदयीं शिरुनि, प्रकाशला[9] क्षिप्र.
होय समाधिविरत[10] तो नेत्रें उघडी, विलोकितां विप्र. १६९

---

१. जावळरूप मोरचेल. २. वडाच्या पानावर निजणारें. ३. गाळण. ४. त्या हिमालयाच्या बाजूला. ५. वटवृक्ष. ६. पुष्पभद्रेच्या तीरावर. ७. कुबेर आहे सखा ज्याचा तो शंकर. ८. [सोन्याच्या] उत्तम मेरुपर्वतास. ९. प्रकटला. १०. समाधिच्युत.

वं[1] सुमत्यमर सदार[2]प्रभुसि नमुनि, पूजुनि, स्तवुनि, भावें
सविनय वदे, 'गुरुवरा ! दास्य करूं काय तें कथुनि पावें.' १७०
ते व्हां श्रीशंभु म्हणे, ' विप्रवरा ! सुप्रसन्न मीं झालों.
आलों वर अर्पाया; मागुनि घे; दर्शनें तुझ्या धालों. १७१
बा ! वरद तिघे[3] आम्हीं, ज्यांपासुनि अमृत[4] मर्त्य साधुनि घे,
न च आमुच्या मनांतुनि समदृष्टि, असंग, शांत साधु निघे. १७२
सु ब्राह्मणांसि सर्वां लोकांसह, लोकपाळ जे सर्व
वंदिति, पूजिति, हें किति ? सदुपासक[5], विधि, मुकुंद, मीं शर्व. १७३
दे खति अणु हि न साधु ज्ञाते आम्हां तिघांत जे भेद.
तैसा चि भूतमात्रीं, त्यांच्या संदर्शनें[6] सरे खेद. १७४
वां[7] ळुनि भेद, पहातां सम साधु तुम्हीं अवैरता वारितां,
धरितां धृति, शांति, सदा आम्हीं भजतों तुम्हांसि याकारितां. १७५
र्य[8] श हो. न जळें, तीर्थें न अचेतन देव उपळधातुमय[9],
ते बहु काळें तारिति; दर्शनमात्रें चि हरिति साधु भय. १७६
न मितों आम्हीं सादर साधूंसि सदा हि, ज्यां सुशम[10] वित्त.
ते आमुचें त्रयीमय[11] रूप, जयाचें नसे मलिन चित्त. १७७
मो टे पापी पावति अंत्यज हि श्रवणदर्शनें शुचिता,
संभाषणें मग न कां तुमच्या ती ? उक्ति होय हे उचिता. १७८
भ व्यसुगुणरत्नाकर साधु ब्राह्मण तुम्हीं च वरशीळ,
यश अयश होय तुमच्या दासादासां, शिरीं चंवर[12] शीळ.[13]' १७९
ग हिंवरला प्रेमळ तो प्रभुवात्सल्यें म्हणे अगाधा त्या,
'आम्हां जडजीवांला न कळे लीळा तुझी अगा धात्या!' १८०

---

१. भूदेव. २. उमामहेश्वरांस. ३. ब्रह्मा, विष्णु व महेश. ४. मोक्ष. ५. साधूंची उपासना करणारे. ६. चांगल्या दर्शनानें. ७. नाहींसा होऊन. ८. यश असो लोकीं—**पंत.** ९. दगड व धातू यांचे. १०. उत्तम शांति. ११. वेदत्रयात्मक. १२. चवरी. १३. भाषायां दृषन्नाम—**पंत.**

व चनें चंद्रललाम[1]प्रभुचीं झालीं तथा सुधावर्षें[2],
मायादर्शन[4]तापप्रशम घडे, मग असें वदे हर्षें:— १८१
"ते जस्विगुरो! म्हणसी 'माग;' अमोघा[3] तुझी अभिव्यक्ती.
हरि तूं हर, हरिहरजन, यांचा ठायीं असो सदा भक्ती." १८२
वा मांगीकृतवाम[5] प्रभु बोले, 'सफळ हा असो काम.
विज्ञानसह[6] ज्ञान[6] त्रैकालिक जें; तयासि हो धाम[7]. १८३
सु यशःप्राप्ति तुज असो; अजरामरता तसी च जों कल्प[8],
होसिल पुराणवक्ता[9]. वैराग्यें द्रुहिणपद[10] गमो अल्प.' १८४
दे उनि वर हर जातां, वर्णुनि मुनितें, 'म्हणे उमे! रुचिर
सद्रत्न देखिलें कीं, न विलोकिल नमिल जरि सुमेरु चिर.' १८५
वा खाणी प्रभु, मुनिनें मायावैभव विलोकिलें मग तें;
अघ या सुयशश्रवणें जातें. तम रविपुढें कसें तगतें? १८६
य[11] ज्ञेशाचीं अंगें, पाद धरा; द्यौः[12] शिरःकमळ जाणा,
जरि अंगोपांगा[13]युधभूषण पुसतां असें मनीं आणा. १८७
न भ नाभि, वायु नासा, कर्ण दिशा, सूर्य विष्णुचें चक्षु,
शिश्न प्रजापति, भ्रू[14] यम, मृत्यु अपान[15], हें सुधी लक्षु[16]. १८८
मो टा प्रताप ज्यांचा ते प्रभुभुज लोकपाळ[17], चंद्र मन,
लज्जा उत्तर[18], लोभ हि अधर[19] ज्योत्स्ना[20] हि दंत कल्पु जन. १८९
भ गवंताचीं [21]रोमें तरु, मूर्धज[22] मेघ, चिंतितो धन्य,

---

१. चंद्र आहे भूषण ज्याचें अशा प्रभूची—शिवाची. २. अमृताचे वर्षाव. ३. व्यर्थ नव्हे अशी. ४. दर्शन. ५. डाव्या अंगाच्या ठिकाणीं केली आहे भार्या ज्यानें तो शिव. ६. भूत, भविष्य व वर्तमान यांच्या जाणीवेसह व अनुभवासह ज्ञान. ७. आश्रय. ८. ब्रह्मदेवाचा दिवस. ९. [मार्कंडेय–] पुराण सांगणारा. १०. ब्रह्मलोक. ११. विष्णूचीं. १२. अंतरिक्ष. १३. अवयवें व दुय्यम अवयवें यांच्या ठिकाणीं असलेलीं आयुधें व अलंकार. १४. भुंवई. १५. गुदद्वार. १६. पाहो. १७. अष्टदिक्पाळ. १८. वरचा ओंठ. १९. खालचा ओठ. २०. चांदिणें. २१. अंगावरील केंस. २२. डोक्यावरील केंस.

कौस्तुभरूपें वाहे लक्ष्मीपति शुद्ध जीवचैतन्य. १९०
ग रुडरथ कौस्तुभद्युतिरूप[1] श्रीवत्स तें उरीं वाहे.
श्रीसत्यलोक मुकुट, प्रभुसूत्र[2] प्रणव[3] हें कृती[4] पाहे. १९१
व नमाळा ती माया, कुंडलयुग[5] सांख्ययोग जाणावें,
प्रभुचें प्रधान[6] आसन पद्म असें हें मनांत बाणावें. १९२
ते जस्तत्व सुदर्शन विष्णुकरीं, प्राणतत्व ते चि गदा,
जळतत्व पांचजन्याभिध[7] दरवर[8] तो, स्मरा असें चि सदा. १९३
वाँ स प्रभुचें छंदोमय[9] पिवळें, गगनतत्व तो चि असी[10],
चर्म[11] तमोमय, काळ चि शार्ङ्ग[12], धरावी मनीं सदुक्ति असी. १९४
सु ज्ञ न विसरति विभुरथमन, मार्गण[13] इंद्रियें असें बा! ते,
तत्वज्ञाहीं कथिले तत्वबुभुत्सूंसि[14] कर्ममय भाते. १९५
दे व स्वषडैश्वर्य[15] चि लीलांबुज[16] वाहतो; तथा धर्म,
चामर; यश तें व्यजन[17]; ध्यानांत असें धरी तया शर्म. १९६
वा! वैकुंठ च्छत्र प्रभुचें, कैवल्य विष्णुचें धाम,
तो पांचरात्रि[18] आगमें[19], ज्या 'विष्वक्सेन' हें असें नाम. १९७
य ज्ञप्रभुतें वाहे वेदत्रयरूप गरुड. जे आठ,
अणिमादि ते सुनंदप्रमुख द्वारप असोत हे पाठ. १९८
न लिनाक्षकीर्तनानें सर्वांचें सर्व ही महाव सरे,
पावे परमपदातें. तेथुनि मुनि हो! कधीं न हा घसरे. १९९
मो क्षाधिक सुख ज्याच्या भजनीं, श्रीकृष्णराय उरुगाय[20],
याच्या[21] कीर्तिस म्हणती देवांची सिंधु ते हि गुरु[21] गाय. २००

---

१. कौस्तुभमण्याची प्रभा तद्रूप. २. यज्ञोपवीत. ३. ॐकार. ४. मुक्त. ५. कुंडलांची जोडी. ६. मुख्य. ७. पांचजन्य नांवाचा श्रेष्ठ शंख. ८. वस्त्र. ९. वेदस्वरूप. १०. खड्ग. ११. ढाल. १२. विष्णुधनुष्य. १३. बाण. १४. तत्त्वज्ञानेच्छूंला. १५. आपलें षड्गुणरूप ऐश्वर्य. १६. विलासकमल. १७. पंखा. १८. 'नारद पंचरात्र' नांवाचा जो ग्रंथ तो. १९. शास्त्र. २०. पुष्कळानीं गाइलेला. २१. गुरु (मोठे लोक) ते हि त्याच्या कीर्तिस सिंधु [व] देवांची गाय म्हणती, असा अन्वय.

**भ** लत्या मिषें मुखाला येतां श्रीकृष्णनाम ताप सरे,
प्रभुचें सद्यश गातां, आइकतां, पूर्णकामता पसरे. २०१
**ग** जराजतारकाचें नाहीं ज्या सुयश नाम वाणींत,
शिरतां बहु कांटाळे हरिजनमन तींत, जेंवि घाणींत. २०२
**व** र्णन हरिचरिताचें केलें मुनि हो! यथामति तराया,
घडली च अतितरा या श्रवणें गति उत्तमा [1]पतितराया. २०३
**ते** चि सुकवि, कीर्तिपुढें त्यांच्या बा शौनका! पुनिव [2]हारे;
म्हणति बुध जडां, 'जिह्वा जरि धरि हि न मौन, कापुनि वहा रे!'
**वां**[3] चावें ऐकावें[3] भागवतांतील उत्तम श्लोक,
कीं अर्ध, पादें[4], तारिल या इतुक्यानें चि उत्तमश्लोकें[5]. २०५
**सु** कवि तुम्हीं धन्य, तुम्हांकरितां हा सूत, मीं हि कीं धन्य,
तारक सार कविमतें हरियश चि, न कलियुगीं असें अन्य. २०६
**दे** उनि उत्साह मला श्रीभागवतार्थ वदविला साचा,
आनंद यापुढें तो तुच्छ ब्रह्मादिपदविलासाचा. २०७
**वा** चेनें, चित्तानें, देहानें, नित्य हरिपदा नमन,
[6]तज्जनसज्जनचरणा तैसें चि असो, विटो कदा न मन. २०८
**य** क्षपति[7] जसा अधना हर्षद अर्पुनि यथेष्ट वित्तातें,
श्रीव्यास श्रीशुकमुनि मज[8] जेंवि मुदिर मयूरचित्तातें. २०९
**न**[9] व मार्कंडेय, दश ब्राह्म, तथा पाद्म [10]षष्टि पंचोनें.
शैव हि सहस्र चोविस, जें ख्यात [11]श्रोतृशत्रु वंचोनें[11]. २१०
**मो** हांधकारभानु श्रीभागवत प्रसिद्ध अठरा हो!

---

१. पतितांतील राजाला. २. पूर्णिमा फिकी पडते. ३. वाचावे ऐकावे (?). ४. श्लोकाचा एक चरण. ५. उत्तम आहे कीर्ति ज्याची असा—विष्णु. ६. त्या (हरिपदांचे) जन जे (भक्त) ते च सज्जन त्यांच्या चरणा. ७. कुबेर. ८. सूताला. ९. ह्या आर्येपासून अखेरपर्यंतचा सर्व मजकूर (२ पृष्ठें) परलिखित आहे. पण उपसंहारांतील ४ थ्या श्लोकाचा उत्तरार्ध लेखकाच्या हातून गळला होता, तो कवीनें स्वहस्तानें शेवटीं लिहून ठेविला आहे. १०. पंचावन. ११. [पुराण] ऐकणाऱ्यांचे जे शत्रु त्यांला वगळून.

नारद हि पंचविंशति, जें म्हणतें [1]षडहितांसि ‘हठ राहो.’ २११

भ व्य भविष्य जयांवरि [2]पांच शतें ग्रंथ मोजिला [2]चवदा,
याच्या श्रवणीं च श्रीहरिनें स्वोद्धार योजिला च वदा. २१२

ग रुडपुराण हि कथिलें एकोणिस [3]काळ [3]काळसर्पाचें,
[4]यांच्या मुनि हो! ओखद [5]दोखदहनकारि हें चि दर्पाचें. २१३

व ह्निपुराण हि कथिलें पंचदशसहस्र च्यार शत, गावें,
स्कांद हि [6]सैकशतैकाशीति, श्रवणें चि पाप न तगावें. २१४

ते विस सहस्र वैष्णव, यन्महिमा [7]मोहमीनकैवर्त;
अठरा सहस्र कथिलें अतिसुखद [8]ब्रह्मपूर्व वैवर्त. २१५

वा राहपुराणांचा ग्रंथ रसिक हो! सहस्र चोवीस,
या संहितेसि म्हणती, ‘आम्हांसि सुधेपरीस होवीस.’ २१६

सु टका भवपाशांतुनि करि एकादशसहस्र तें लिंग,
ब्रह्मांड द्वादश जें सर्व हि पोटांत सांठवी [9]धिंग. २१७

दे तें श्रवणें सद्गति तें मत्स्यपुराण वर्णिलें चवदा,
सवदानधर्ममोक्षादिक तो जोडूनि देतसे सवदा. २१८

वा मनपुराण अयुत चि; कूर्मपुराण हि सहस्र बा! सतरा.
श्रीरामायण चोविस, लक्ष चि [10]इतिहास, भजुनि यास तरा. २१९

य श यांचें अत्यद्भुत, न टिकति कलिदोष, सा आरि समोर,
भक्त प्रेमळ चि अधिक निवुनि निववि, चातकापरिस **मोर**. २२०

---

१. [कामक्रोधादि] षड्रिपूंला. २. चवदा हजार पांचशें. ३. मृत्युरूप सर्पाचें, अंतक. ४. काळसर्पाच्या. ५. दोष जाळून टाकणारें. ६. एक्यायशी [हजार] एकशें. ७. मोहरूप माशाचा धीवर. ८. ब्रह्मवैवर्तनामक. ९. धिंगाणा. १०. भारत.

## उपसंहार.

**श्रीमंत्रभागवत** भक्तवशा हरीतें,
हें अर्पिलें [1]शुचिमणींद्रयशा [2]हरीतें.
[3]माळात्रय प्रभुवरा रुचलें. करानें
कंठीं पिता धरि दिलें निजलेंकरानें. १

श्रीराम द्रवुनि, स्वयें चि करवी ऐसी नवी योजना,
सामग्री अधनासि दे, करि [4]धनी त्याच्या गृहीं भोजना.
हें काय प्रभुला अशक्य? हृदया! कां [5]चित्र भासे तुला?
क्रीडार्थ प्लवगांसि योजुनि रची सिंधूत हा सेतुला. २


पुत्राभिधान वदतां हि [6]अजा मिळाला,
नारायण स्वपद दे चि अजामिळाला.
याची च कीर्ति परमा, नवल क्षमा ती,
झाले न [7]याँ भजुनि मानव लक्ष माती. ३

दयालु श्रीराम प्रभुवर चि दे हा यश. बरी
करी, मोठ्यांमोठ्यां सतत म्हणवी 'हाय!' शबरी.
शुचिप्रेमीं गोडी बहु रुचि, तसी काय बदरीं?
सुदीनातें घेतो द्रवुनि करुणासिंधु पदरीं. ४

[8]भक्तास्यें राम आज्ञा करि मज पहिली, [9]त्यां जसी नारदास्यें.
प्राणी ऐसे चि लोकीं त्रिभुवनगुरुनें तारिले फार दास्यें.
उत्साह प्रेम देतो, स्वयश जडमुखें आदरें बोलवी तो.
विश्वात्मा सज्जनांचीं कवि[10]शुकवचनें मस्तकें डोलवीतो. ५

---

१. शुभ्र मोठा मणि त्याच्या यशाला (साम्याला). २. हरण करणारें. ३. [मंत्रभागवताच्या] तीन माळा. ४. श्रीमान्. ५. आश्चर्य. ६. परमेश्वर-स्वरूपाला. ७. रामचंद्राला. ८. भक्ताच्या मुखानें. (**पंतां**ना मंत्रभागवत रचण्याविषयीं बाबा पाध्यांनीं प्रोत्साहन दिलें असें म्हणतात; परंतु कोणी तरी प्रोत्साहन दिलें असें म्हणणें मात्र, मंत्रभागवतांत 'श्रीभागवतमंत्रमुक्तामणिमाला' नामक पूर्वीं च रचिलेला दशम स्कंध समाविष्ट केला आहे, ह्या वस्तुस्थितीचा विचार करितां विश्वास्य वाटतें). ९. व्यासाला. १०. कविरूप पोपटाच्या बोलानें [पक्षीं] शुककवीच्या वचनानें.



श्रीः

## मोरोपंतकृत

# मंत्रमय भागवत.

( गीतिवृत्त )

नतमोक्षद[१] भवविधिनुत[२], जगदीश, वरेण्य[३], वैनतेयरथ[४]
वाराया वसुधाभर[५] देह धरी वासवादिगेयकथ[६]. १
नक्षत्रप[७] प्रमोदे[८], स्वकुळीं[९] भक्तामराग[१०] वरतेजा[११]
वात्सल्यें वसुदेवात्मज होतां, यजिति लोकवर[१२] ते ज्या. २
नरपति परमोग्र भयद कंस उरगसा वधीं रते, अल्प
बाळ व्यसु[१३] करि देवक्युदरज सा[१४] यादवारि यमकल्प[१५]. ३
नष्टा[१६] मोहुनि, भवनीं गवळयांच्या तेज आपुलें राम

---

१. कवीनें जरी ह्या प्रकरणाला **मंत्रमय भागवत** असें नांव दिलें आहे तरी ह्यांत फक्त दशम स्कंधाचा च सारांश क्रमानें दिला आहे. प्रस्तुत प्रकरणांत प्रत्येक गीतींत '**नमो भगवते वासुदेवाय**' हा मंत्र साधला आहे. २. शंकर व ब्रह्मदेव ह्यानीं स्तविलेला. ३. श्रेष्ठ. ४. वैनतेय (गरुड) आहे रथ ज्याचा असा. ५. पृथ्वीचा भार. ६. इंद्रादिकानीं हि ज्याची कथा वर्णावी असा. ७. चंद्र, सोम. ८. हर्ष पावे. ९. सोमवंशांत. १०. भक्तकल्पवृक्ष. ११. मोठा तेजस्वी. १२. अन्वयः–ज्या लोकवर (लोकपाल) यजिति [तो] भक्तामराग वरतेजा वसुदेवात्मज स्वकुळीं होतां, नक्षत्रप वात्सल्यें प्रमोदे. १३. प्राणरहित. १४. यांचीं नांवें:–कीर्तिमत्, सुषेण, उदापि, भद्रसेन, ऋभुदास व भद्रदेह. १५. यमासारखा. १६. दुष्टा [कंसा].

वाढवि; सुख दे वाढुनि नंदयशोदादिकां घनश्याम. ४
न गमो चित्र, भयदतम घनगर्जित वर्ष, तेथ शेष वरी,[1]
वारिधि तसी सुखें दे वाट हि यमुना, न मार्गविघ्न करी. ५
नष्टायु मोहिता भरि गररस वदनीं, कुबुद्धि ते हि तरे
वाखाणितां सुधाधिक वरदेश्वरबालयश[2] करी हित रे!. ६
अन[3] मोडी, भग्न करुनि गतिस, तृणावर्त[4] न परते मागें;
वाटेसि सुदेशाच्या[5] लावी, वारूनि पापचय[6] रागें. ७
नलिनाक्षमुखीं मोहे पाहुनि नभआदि जग, वदे 'हा!' ते[7]
वाहुनि वसु देह, तरि च वाल्मीकिप्रमुख गाति यश गाते. ८
नवल करी मोटें जन; भव्यप्रद[8] गर्ग[9] नाव, तेज, कथी;
वाचेला सुख दे जें, वागवि जड जेंवि माय, दोष मथी. ९
नव्यप्रमोदकर, शिशुलीलासुभगांग[10] बहुत, बळहरि ते
बाळ सुरगुरु हि झाले देहिहिता बापमायसे करिते. १०
नवनीतमोषं[11] सोसे न च, भक्षी अंगज बहु ते माती,
वासवि[12] सुमुख, वदे 'हा!' बागुलसें विश्वमाय बाळा[12] ती. ११
स्तनकाम मोघ होतां, भग्न करुनि मथनपात्र, मग भवते
वानर मेळउनि, सुरस दे वाटुनि, खाय, पातली तंव ते. १२
न करि क्षमा तमोमति[13], अर तनुचा, न गति जववती[14] तेणें,
वात्सल्यें सुत धरूं दे बाढ यशोदासबंध[15] गणि लेणें. १३

---

१. [ कृष्णाच्या मस्तका- ] वरी [ होता ]. २. वर देणारांत श्रेष्ठ अशा बाळकाची (कृष्णाची) कीर्ति. ३. रथ-गाडा. ४. या नांवाचा दैत्य वाऱ्याच्या रूपानें गोकुळांत आला होता. द. स्कं. अ. ७ पहा. ५. मोक्षाच्या मार्गास. ६. पापाची रास. ७. यशोदा. [ विश्वरूपदर्शनप्रसंग ]. ८. कल्याणप्रद. ९. हा यादवांचा गुरु. १०. बाळलीलेनें शोभत आहेत अंगें ज्यांचीं असें. ११. लोणी चोरणारा. १२. विश्वमाय बाळा मुख वासवि ( पसरवी ) [ व ] बागुलसें ( बोवासारखें ) [ भीति वाटण्याकरितां ] 'हा' ( हां, खबरदार! ) वदे. १३. संतापलेली—तामसी. १४. वेगवती ( गति ). १५. दृढ असें यशोदेकडून मिळालेलें बंधन.

घन मोहांतुनि इभसे उद्धारि [1]यम [2]अगम [2]अवनतेष्टकर;
घे रूप वा[3]सुराचें देवारि, करी तदीय घात [4]पर. १४
नरशिशु मानुनि मोहें भक्षी, गलदग्ध बक [5]हतेच्छ वमे,
बाळ हरि असुरदेहा चिरि सहज, नवार्द्र यवससा चि गमे. १५
नगसा मोटा सुभयंकर [6]अजगर वत्स, ते हि [7]तत्पाळ
वासुनि मुख देवास हि गिळि, हो[8]य तया अघा तदघ काळ. १६
नलिनं[9]ज मोही, होउनि डिं[10]भें अनुग वत्स ते हि वर्षभरी,
वाढवि सुख, न कळों दे भावा रामा हि विश्वकाय हरी. १७
नटतां समोर [11]गर्दभ गर्वें, बळ तेधवां चि त्यास वधी;
वानिति सुर देखुनि वि[12]भुबाहूंप्रति, विजय निववि वासवधी. १८
नटसा प्रभु प्रमोदें भग्न करी फण महागरळ वमते,
वा[13]सुकिशत देते बळ, बालिश कालिय तसे चि ते [13]शमते. १९
[14]वनवह्नि पी र[15]मोत्सवभवन, व्रज रक्षि गजवरा तेवीं;
वा! सुहृदे[16]कगुरु नवा नित्य प्रिय हरि च या जना सेवीं. २०
नग[17]पसमोरुवपु असुर बलभद्र मग प्रलंब वधि तेजें,

---

१. जुळे वृक्ष. ( कुबेरपुत्र नलकूबर आणि मणिग्रीव हे नारदशापानें 'यमलार्जुन' नामक जुळे वृक्ष झाले होते). २. नमन करणाऱ्यांचें इच्छिलें करणारा. ३. राक्षस वत्सासुर 'वासुराच्या' म्ह० वासराच्या रूपानें आला होता. ४. भगवान्—**पंत.** ५. निराश. (बगळ्याच्या रूपानें श्रीकृष्णाला गिळल्याबरोबर बकासुराच्या टाळूचा दाह झाल्यामुळें त्यानें कृष्णास ओकून टाकले; त्यासरसें, प्रभूनीं त्यास ताज्या लव्हाळ्याच्या काडीप्रमाणें चिरून फाडलें. द. स्कं. अ. ११ पहा). ६. अघासुर या रूपानें आला होता. ७. वत्सपाळ-गुराखी-गोपाळ. ८. अघा (अघासुराला) तदघ (त्याचें स्वतःचें पाप) काळ होय (मरण देतें झालें). ९. ब्रह्मदेव. द. स्कं. अ. १२. १०. बालक—गोपाळ. ११. धेनुकासुरवध. द. स्कंध अ. १५. १२. प्रभूच्या बाहूंस. १३. [जरि] वासुकिशत बळ देते [तरि] ते [जसा] बालिश कालिय तसे चि शमते. १४. द. स्कं. अ. १७ पहा. १५. लक्ष्मीच्या आनंदाचें स्थान. १६. आप्तांत सर्व श्रेष्ठ. १७. मोठ्या पर्वताप्रमाणें आहे प्रचंड शरीर ज्याचें.

वाहति कुसुमें देवी, वानिति यश सत्सभा, मना ये जें. २१
नग[1]जानियमोपासनभद्रमती गवळणी स्वसुरतेहा[2]
बाळा सुदती, त्यां दे वासें[3] चोरूनि, सदय वर ते हा. २२
नवसा परमोत्कांच्या[4] पावे प्रभविष्णु, गडबडुनि ते त्या
वाढिति सुरस पदेच्छुक[5] वाडवदार प्रिय स्वपद देत्या. २३
दिन सप्त वृष्टि मोटी करि शक्र, भयार्त गवळि ते हारितें
बाहति, नग सप्त दिवस धरि, सुख दे, व्यसन बाढदय[6] हरि तें. २४
म्हणुनि 'नमोस्तु' भवघ्ना गजवर[7]वाहन नतेष्टदा[8] राहे,
वाखाणुनि सुरभि वदे 'गोविंद,' नवात्मपय अजा[9] वाहे. २५
वननाथ[10]भृत्य मोहें ने व्रजभर्त्या[11], गमावते गवळी
वारिपथें तद्वसु दे, त्यां जाउनि वारिनायकाजवळी. २६
मदन[12]विमोहनवल्लभवेणुस्वरगति वनांत बहु माते,
वामा[13] सुरसें देह न सांवारि, 'किति वास?' म्हणति जय गाते. २७
[14]स्त्रीजनकामोद्दीपनभर गगनीं वरविमान ते रासीं;
वाणी सुरस वदे या, वानील समान काय येरासीं? २८
नग[15]जायात्रा मोटी, भक्षी अजगर वनांत ते दोघे;
बा! अहि उद्धारि, सुख दे, प्रभु वारुनि ताप शाप, यश तो घे. २९

---

१. [ कृष्णप्राप्तीकारितां ] नगजा (कात्यायनी) नियम ( व्रत ) पाळण्याची मंगळ इच्छा झाली आहे ज्याना. २. आपलें रतिसुख इच्छिणाऱ्या. ३. वस्त्रें. ४. अत्युत्कंठितांच्या. ५. प्रभुपदाची इच्छा करणाऱ्या ऋषिपत्न्या. द. स्कं. अ. २३ पहा. ६. परम दयाळु. ७. श्रेष्ठ हत्ती (ऐरावत) आहे वाहन ज्याचें तो इंद्र. ८. स्वाधिकारीं–**पंत**. ९. कृष्णास. द. स्कं. अ. २७. १०. वन=पाणी+नाथ=वरुण, त्याचा सेवक. ११. नंदास. द. स्कं. अ. २८. १२. मदनाप्रमाणें मोहक अशा कृष्णाच्या प्रिय वेणूच्या सुराची गति. १३. राधा. १४. स्त्रीजनांच्या कामाला चेतविणाऱ्या रसाचा भर ज्यांत आहे असें वरविमान ( उत्कृष्ट विमान ). १५. पार्वतीची यात्रा. द. स्कं. अ. ३४. आंगिराऋषीच्या शापानें रूपयौवनमत्त सुदर्शन विद्याधर अजगर झाला होता.

धनदाचा मोटा खळ भत्रैहित[1] अनुग बळें चि तेजें[2] जरी
बाल[3] नसे, ने सुदती; दे वायस पाय हंसकीर्तिवरी. ३०
नगगुरु, युमोग्र, वृषभ ध्वनिनें गर्भघ्न, वह्नि तेलानें,
वाढे तसा चि; केला व्यसु देवाजयद पीतचेलानें[4]. ३१
अहिदलन मोरसा करि भवहर खळतुरगवध[5] नतेष्टद, या
वानिति सुर वरदेशा, याची श्रितबाळकीं यथेष्ट दया. ३२
वनदासि[6] मोरसा, हरिभक्त[7] गहिवरोनि पूरितनतेहा[8]
वानित, सुभाग्य देखे बाळा माश्रयपदा कृतस्नेहा[9]. ३३
मन मोहीं गोपींचें भरलें, गडबडति, तेधवां रडती.
वाटे असुप्रयाण चि, देश दवानळ[10] चि, कायभर[11] पडती. ३४
नगरीं प्रमोदभर जगदीशा अवलोकितें जन शिवास
जाले सुदाम[12]कुब्जादिक देहीं अभिनवाव्ययनिवास[13]. ३५
गुरुबाणासन[14] मोडुनि, इभ[15] अगसा वधुनि, लेश तेजानें
बाढभुज[16] व्यसु केले देवाप्रिय मल्ल, मत्त जे पानें. ३६
अधनग, परमोग्र, भयद, गरळकटुवचन, न ते स्वजन मानी,
खळमघवा[17] व्यसु केला देशाहित कंस वारिनय[18] मानी. ३७
करुनि जनक मोदित, कुलभर्ता मग उग्रसेन, यादव ते,

---

१. धन्याचा (कृष्णाचा) शत्रु–शंखचूडनामक कुबेरसेवक. द. स्कं. अ. ३४. २. तेजस्वी. ३. बाल असा कृष्ण. ४. पीतांबरधारी कृष्णानें. द. स्कं अ. ३६–बैलाचें रूप घेणाऱ्या अरिष्टासुराची कथा. ५. दुष्ट घोड्याचा म्ह. तें रूप घेणाऱ्या केशी-दैत्याचा–नाश. द. स्कं. अ. ३७. ६. मेघास. ७. अक्रूर. ८. पूर्ण केली आहे नम्र झालेल्यांची इच्छा ज्यानें त्याला. ९. रमेच्या आश्रयाचें स्थान जो त्या प्रेमकर्त्या बाळा. १०. वणवा. ११. शरीरांचीं धुडें–भारें. १२. सुदामा माळी व कुब्जा दासी. १३. नूतन अविनाशी स्थळ. १४. कंसशरासन–पंत. (मोठें धनुष्य). १५. कंसाचा कुवलयापीड नांवाचा हत्ती. १६. पुष्ट आहेत भुज ज्यांचे असे (देव-शत्रु मल्ल). १७. दुष्टांचा इंद्र (स्वामी) जो कंस. १८. [ पाण्यासारखा ] अधोगमनशील–पंत.

स्वनिवाससुस्थित, मुदित देश, [1]शिवायन चि निजपदीं लवते. ३८
मृततनय [2]यमोन्मोचित भव्य गुरुसि, मग [3]कृतानतिस्तव ते
[4]द्विषदनिलवासुकि प्रभु देति, शिवालय सदैव जे [5]सेवते. ३९
स्वज्ञानमोहनाशक त्यां भक्तां गवळणींस [6]ते, [7]दासें
प्रेपुनि, वासुनि सुख, जें देति, न शम ज्याशिवाय खेदास. ४०
नरपति मागध मोटें भयद गजादिबळ घे; स्वतेज, अरी
[8]वार्ता परिसुनि देशीं, दावाया ये; बुडोनि जाय परी. ४१
परजनमोहद भट गजवरसे चि मदांध कोटि ते तीन
ज्याचे, वासुकिसा दे [9]दर, केला [10]बाढ यवन असुहीन. ४२
नव [11]पुर परमोत्तम शुभगतिद रचि वनांत, तेथ [12]अज राहे,
कुळ वाढवि; बहु सुख दे, जसि बाळा माय; कीर्ति [13]अजरा हे. ४३
नरसे चि पळति, मोटें भय दाविति, [14]सागरीं वसति अज ते.
वा! [15]सुरभितें न देखति, वाहुनि हृदयांत पाय यां भजते. ४४
नवरी रेवति मोदें बळभद्रा मग वरी, पदीं च रते;
जें वारिरुह सुरस दे, [16]वाळुनि त्या काय [17]मधुकरी परते? ४५
खळजन मोघाश करुनि, भव्या मग वारिलि भीष्म[18]की मा[18] ते,
बाहे [19]सुदेववाडवें, पत्र प्रेपूनि म्हणति ‘यश गाते.’ ४६
मदन [20]रमोदरज भयें सागरिं शंबर हतेच्छ बुडवि, परी

१. कल्याणाचें स्थान. २. यमापासून सोडविलेला [सांदीपनिगुरूचा मुलगा]. ३. केला आहे नमस्कार व स्तव ज्यानीं. ४. ते शत्रुरूप वाऱ्याला गिळणारे वासुकी च असे [रामकृष्ण]. ५. प्रसवणारे (?). ६. रामकृष्ण–**पंत**. ७. उद्धव–**पंत**. ८. आपला (जरासंधाचा) जामात जो कंस त्याचे वधाची बातमी. द. स्कं. अध्याय ५०, उत्तरार्ध–आरंभ. ९. भय. १०. वलिष्ठ. द. स्कंध अ. ५०।५१. ११. द्वारका. द. स्कं. अ. ५०. १२. कृष्ण. १३. अमर. १४. समुद्रांत–द्वारकेंत. १५. कामधेनूकडे ढुंकून सुद्धां पहात नाहींत. १६. टाकून. १७. भ्रमरी. १८. लक्ष्मी [जी] रुक्मिणी. १९. सुदेव ब्राह्मण. २०. लक्ष्मीच्या म्ह. रुक्मिणीच्या पोटीं आलेला मदनाचा अवतार म्ह. प्रद्युम्न.

वाढुनि असुर वधुनि दे दर्शन; बहु हृष्ट बापमाय करी. ४७
सुबहु दिन मोहद समरभक्त करी संगतोत्सव, सुतेतें
वाहे मणि वसुदेह हि, जें श्रीसुख हे हि बायको घे तें. ४८
मन मोडुनि भय पावे गडबडुनि सुतेसि सूर्यसख अर्पी;
वानिति सुरी; गदेपरि वास हरिकरीं; यशें जना तर्पी. ४९
न जगे हेमोदयरुचि[1]; भक्त जगन्मत सेवाक्रियेंत[2] रते,
वाहे मणि वसु, दे बा! यश, ये, हें समजती सुधी नर ते. ५०
रवितनया[3] परमोत्का भजनें जगदीश्वरा स्वयें वरि ते
वास सुकृतें पदीं दे वारिजेंशय[4] त्यांसि, दास्य जे करिते. ५१
न वरी प्रभु प्रमोदें पितृभगिनिजा[5] हि मग वरी, अरि ते
वाहुनि सुजविति[6] देशप बाहुज[7] नयनें[6] झटोनि रण करिते. ५२
नग्नजितें[8] मोदभरें वृषगर्वहरा, वरा, नतेष्टकरा
वाहिलि[9] सुता सुदेशजवारणहयसह नें[10] आंवरूनि[10] करा. ५३
पर[11] न मना ये मोहे, तातभगिन्यंगजा[12] वरी भ्राते[13]
बाहोनि, सुखें देती बाढश्रेयस्करा वरा या ते. ५४
मद्रनरपभू[14] मोदें इभगति[14] वरिलि, विसरे न ते कृष्णा.
वासवजें[15] सुज्ञें जसि देवी नववारिजनयना कृष्णा[16]. ५५
नरका मोठ्या समरीं भस्म करी, मग वरें[17] स्त्रिया तेजें

---

१. द्रव्याची इच्छा करणारा [अक्रूर] (द. स्कं. उ. अ. ५७). २. यज्ञकर्मांत. ३. कालिंदी. ४. कमळ आहे हातांत ज्याच्या असा. ५. बाप वसुदेव त्याची बहीण राजाधिदेवी, तिची कन्या मित्रविंदा. ६. (दुःखानें रडून) डोळे सुजविती. ७. क्षत्रिय. ८. नग्नजित नांवाच्या कोसलाधिपतीनें. ९. आपल्या जवळच्या सात उन्मत्त बैलांस वेसण घालणाऱ्यास स्वकन्या सत्या देण्याचा नग्नजिताचा पण होता, तो कृष्णानें जिंकिला. (द. स्कं. उ. अ. ५८). १०. सढळ हातानें. ११. दुसरा. १२. पितृभगिनी श्रुतकीर्तीची कन्या भद्रा. १३. भद्रेचे संतनादिक भाऊ. १४. मद्रदेशाधिपतीची इभगति (गजाप्रमाणें चालणारी) कन्या लक्ष्मणा. (द. स्कं. उ. अ. ५८.) १५. इंद्रपुत्र अर्जुनानें. १६. द्रौपदी. १७. श्रेष्ठ.

हरि वासवमद; सुरतरु दे, मागे इष्ट बायको ते जें. ५६
नवऱ्या मोदें भऱ्या लग्नीं जगदीश वरि रते, सोळा
वामा सहस्र[1] तितुका सुख दे; वाक्कायमन पदीं घोळा. ५७
नर्म[2] श्रीमोहद करि भवभंजन, गर्व नुरवि लव तेणें
'वाक्यें सुरसें' देवाचार्य[3] म्हणे, 'काय मीं असीं नेणें?' ५८
रुक्मी नय मोडी, त्यजि भय, खळ कालिंगकादि वळ ते ज्या.
वाइट हि असुनि देती, शलभ[4] देवा[5] तेंवि होय बळतेज्या[6]. ५९
बळिनंदन[7] मोटा हरभक्त महागर्व[8], वरेंज[9] तेज जया,
बाहुसहस्र सुरोत्तम[10] दे, वारुनि अनय, जीवदान तया. ६०
वनदसमोदार[11] भला नृग नृपवर तारिला नतेष्टकरें
वारिजनाभें[12], सुज्ञें, वरदें, यादवान्ववायवरें[13]. ६१
व्रजजन मोदित करि, बलभद्र, जगन्नाथ पुरवि वनितेहा;
वात्सल्यें सुख दे, कीं म्हणती बालक वयस्य वनिं ते 'हा!' ६२
नरपति पौंड्रक मोहें 'ईश' म्हणे 'जंवि भणग[14] मानव ते,'
त्या वधुनि वासुदेव[15] न करितां, बा! सुकवि काय मानवते? ६३
वानर[16] मोटा खळ भवविपदगदें[17] रैवतेच्छितक्रीडें[18]
वाम[19] विहतसुर[20] वधिला देशसवापाय[21] हृतधरापीडें[22]. ६४

१. एकटा. २. विनोद. ३. बृहस्पति. ४. टोळ. ५. वणव्यास. ६. बळरामाच्या पराक्रमास. ७. बळीचा पुत्र बाणासुर. ८. फार गर्विष्ठ. ९. शंकराच्या वरापासून मिळालेलें. १०. देवेंद्र कृष्ण. ११. मेघाप्रमाणें उदार. १२. पद्मनाभें कृष्णानें. १३. वंश—**पंत**. (यादववंशश्रेष्ठानें). १४. नट—**पंत**. १५. द. स्कं. उ. अ. ६६. अन्वयः—नरपति पौंड्रक [ स्वतःला ] ईश म्हणे; [ जर ] त्या वधुनि [ जंवि ] ते भणग मानव [ तेंवि ] वासुदेव [ कृष्ण ] न करितां [ तर ] बा! सुकवि मानवते ( संतुष्ट होत ) काय? १६. नरकासुराचा मित्र द्विविद वानर. १७. भवरोगाच्या औषधानें. १८. रैवतपर्वतावर इच्छिली आहे क्रीडा ज्यानें. १९. वक्रः—**पंत**. २०. नाशितमघ-**पंत**. ( मारले आहेत देव ज्यानें असा ). २१. देशांतील यज्ञांस अडथळा करणारा. २२. हरण केला आहे भूभार ज्यानें.

नय मोडुनि भववरजा[1] गजपुरिं करि बद्ध, तेधवां दुष्ट
बालिश सुयोधन वदे वाइट; ऐकोनि होय बळ रुष्ट. ६५
नगर यमोग्र[2] हेळें[3] उचटुनि, भगवत्पादज सरितेमाजी
बुडवित होता वासुनि मुख 'दे बा! अभय' वदलि[4] जनराजी. ६६
नवमोदद प्रतिभवन[5] गदपूर्वज[6] चित्रभाव ते दावी.
वाटे सुख देवमुनिस, वाढवि यश जो अनंत, वेदा वी. ६७
नरपतिमोचन, भक्तसुगम, मागध वधुनि ते हि, पार्थसख
चिंता वारी, सुख दे धर्मा, वागवुनि राजसूयमख. ६८
नरपति शापविमोहित भगवद्वेषीं च जो रते चैद्य[7]
बा! गति सुदर्शनें दे मारुनि त्यातें भवामयसुवैद्य[8]. ६९
मन मोही धर्मभगें[9], गमवि वन[10] स्थळ, भुलोनि तेथ पडे,
बाळ सुयोधन देखे स्वपरिभवा, हास्य मयसभेंत घडे. ७०
नगरी मोहे, रोधी सौभें[11] गगनयानचर बळी माते,
घनवात[12] सुनाभायुध[13] नांदे[14] निववावयासि यश गाते. ७१
निजजनसंग्रामोद्यम[15] भव्य गमेना, न वळति ते कोणी,
'बरवा सुतीर्थदेशीं वास' म्हणे, जाय बळ[16], फिरे [17]क्षोणी. ७२
सज्जन मोदित केले शुभगतिवरलाभकाम जे होते,
करि तत्सवाहित[18] व्यसु; दे, वाडव कथिति अर्थचय[19] जो, ते. ७३
नमुनि प्रमोदवि पृथुक[20] भक्षुनि, गाहिवरुनि तेधवां पुरतें

---

१. शंकराच्या प्रसादानें जन्मलेल्या. २. यमाप्रमाणें भयंकर. ३. नांगरानें. ४. असें—पंत. ५. प्रत्येक घर नूतनआनंददायी. ६. कृष्ण. ७. शिशुपाल. ८. भवरोगाचा उत्तम वैद्य. ९. धर्माच्या ऐश्वर्यानें. १०. पाणी. ११. शाल्वाला शंकरवरानें मिळालेलें दिव्य विमान. (द. स्कं. उ. अ. ७६—७७). १२. तो शाल्व—पंत. १३. सुदर्शन आहे आयुध ज्याचें तो. १४. हें—पंत. अन्वयः—गाते निववावयासि [ हें ] यश नांदे. १५. आपसांतील यादवी—कौरवपांडवांचा युद्धाचा उद्योग. १६. बळराम. १७. पृथ्वी. १८. त्यांच्या यशाचे शत्रु. १९. द्रव्यराशि. (द. स्कं. उ. अ. ७८—७९). २०. पोहे.

वाडवसखा सुदामा, त्या दे वासार्थ हेममय पुर[1] तें. ७४
जन रविचा[2] मोटा शुभ उपराग श्रवण करुनि ते आले,
सहवास कुरुसुदर्शी बाहुजसमुदाय[3] पावते झाले. ७५
द्रुपदतनयेसि मोदें भगवत्प्रियदार ते कथिति लग्नें,
बा! ज्या सुरसीं देवीचित्तें वावरुनि हाँ[4]यसीं मग्नें. ७६
नंदन मोहें भजती, गमति तदा सत्य वत्स ते पितर;
बाप वसुदेव वाटे नंदयशोदांपुढें जना इतर[5]. ७७
'गोपी नलिनी च, तमोहर[6] भगवान्' वदति जाणते अथवा
'सुकल्या वल्ली, देव हि वारिद' यश साधु हो! असें कथवा. ७८
नयनें मोदाश्रुभरें अंगज[7] बल कृष्ण ते भरिति तूर्ण;
बाळें व्यसु देवकिला[8] दाविति; वानील काय कवि पूर्ण? ७९
मन मोह शुभगुणगणें पावे; बळतेज उग्र, परि सिकवीं[9];
वासविस सुभद्रा दे; वानितिल उगे चि काय हरिसि कवी? ८०
अनुदिन मोदित भजनीं, सदनुगवर, शांतितेजआवास,
त्या सुज्ञा श्रुतदेवा भेटे यदुराज भुलुनि भावास. ८१
नरपति मोटा भक्त स्वगत चि बहुलाश्व[10] भूप तेथ वसे,
त्या वासुदेव वाढवि सुयशें; या नत[11], पित्यासि पुत्र तसे. ८२
चित्त न मोडी, भक्तीं अनुराग बहु, स्वदास[12] ते तारी;
मुख वासु, दे चि वारि, प्रिय घन चातकतृषा स्वयें वारी. ८३
हरि चि घन, मोर भक्त चि, कीं गर्जति करिति नृत्य सोत्सव ते,
वारुनि अघ, सुख देती जीवा प्रभुवर्यपाय हे स्वैर[13] सेवते. ८४

---

१. वासार्थ जें पुर दे तें हेममय-**पंत**. २. सूर्याचें ग्रहण. ३. क्षत्रियसमुदाय. ४. तृप्त. ५. परका. ६. सूर्य. ७. पुत्र. ८. रामकृष्णानीं देवकीला तिचे कंसानें मारलेले सहा हि पुत्र आणून दाखविले. (द. स्कं. उ. अ. ८५.) ९. (कृष्ण उग्र अशा बळरामास) समजावी. १०. श्रुतदेव (मिथिलानगरींतील एक कृष्णभक्त ब्राह्मण) व बहुलाश्वनामक मिथिलाधिपती राजा, या दोघांना एकदम दोन रूपें घेऊन कृष्णानें दर्शन दिलें. ११. नम्र झालेले. १२. बहुलाश्वश्रुतदेव-**पंत**. १३. स्वतंत्रपणें.

शमन करुनि मोहाचें, भजकां, जे गति 'वरा' म्हणति कवि, ते
[1]सदरिपवनवासुकि दे; वागवितिल काय पर असें [2]अविते? ८५
नगजेशा मोटा खळ भजुनि, गळां पडुनि, वर वरुनि परते,
[3]बाळ वृकासुर देवा 'हाय!' म्हणवि, अमर कांपले [4]पर ते. ८६
[5]वचन अमोघ; न व्हाया भस्म गरग्रीव लोक ते शर्व
भ्रमतां, वासुनि मुख 'हा!' म्हणती देवादि सभयधी [5]सर्व. ८७
[6]व्यसन तसें मोटें, भव गडबडतां, ते हि लोकपति, बाळ
[7]भूसुर वि[7]ष्णु वृका दे वामनसा भेटि [8]सद्भयदकाळ. ८८
वृकमन मोहुनि, भगवान् वदला तेव्हां [9]भवाहिता असुरा
"दे वा! शिरीं [10]शय, मृपा हर, हरिमाया चि भुलवि, बहु न सुरा." ८९
नवल असें मोटें भव[11]गजहरि कारि, वज्रतेज पाणि धरी,
वासव चि सुना[12]भकरच्छळ, देवारा[13]ति होय तो शिखरी. ९०
सुजन[14]प्रमोदकर मुनि करिती भ[15]गवत्त्रयीं विवादा ते,
वाडव सुज्ञ भृगु वदे, 'वारिन संशय, तुम्हीं निवा दाते.' ९१
कोप अनमनें मोटा भगवद्विधिच्या मनीं उठे, न उते,

---

१. सज्जनांचे शत्रु हा च कोणी वारा त्याला भक्षणारा वासुकिसर्प म्हणजे कृष्ण. २. ते पिते नव्हत. ३. मूर्ख—**पंत.** भस्मासुर ( द. स्कं. उ. अ. ८८ ). ४. श्रेष्ठ. ५. अन्वयः—वचन अमोघ; [तेव्हां] गरग्रीव ( विषकंठ) शर्व भस्म न व्हाया ते लोक भ्रमतां, मुख वासुनि देवादि सभयधी सर्व 'हा!' म्हणती. ६. संकट. ७. बटु ब्राह्मणाचें रूप घेणारा विष्णु. ८. सज्जनांच्या शत्रूचा काळ. ९ शंकराच्या शत्रूस. १०. हात. ११. संसाररूप हत्तीला सिंहासारखा. १२. सुदर्शनधारी विष्णूचें मिष केलेला. १३. तो देवाराति ( देवशत्रु—वृकासुर ) [ हा ] शिखरी ( पर्वत ) होय [ त्यावर ] विष्णूच्या मिषानें इंद्र च जणूं काय आला व त्याचा पाणी या कामीं वज्रतेज धारण करिता झाला, असा अर्थ. १४. पंतांनीं क्रमानें च ८९ आर्या लिहिल्यानंतर ९० व्या आर्येपासून पुढील ९ आर्यांचे क्रमांक हरताळून त्यांच्या जागीं ९८ पासून १०५ हे घातले आहेत. नंतर ९१ ते ९७ ह्या आर्या लिहून तसा इषारा हि फुली घालून दिला आहे. १५. ब्रह्मा, विष्णु व महेश ह्यांविषयीं.

धरि वाट [1]सुरमणिसि, दे न शिवों, बा! यद्गुण श्रिताघ धुते. ९२
अनळपरमोग्र शूळें भस्म श्रीगल करावया पाहे,
तेव्हां [2]शिवा सुदेवी वारी, दृढ पाय धरुनियां राहे. ९३
अविनत [3]माधामोरीं, भय न धरुनि राग करि, पदें हाणी,
वरतेजा भृगु वाडव सुज्ञ गदेला नवा [4]अजय आणी. ९४
उठुनि, नमी [5]मोक्षदगुरु परि भक्ता, गजवजोनि ते लत्ता
वानी, मानी सुख, ' शुचि देह, [6]शिवाश्रय ' म्हणे ' खरी [7]सत्ता '. ९५
सत्रीं जन प्रमोदित भृगुनें भगवद्यशें चि ते केले,
वानिति भूसुर देवा यत्स्मरणें ताप पापसह गेले. ९६
नद्युत्तमा तमोघ्नी भव्यगती [8]गी, तिच्या तटीं वसते
[9]वाडवं सुज्ञ करिति ' हा ! ' देवाघां पारखुनि, यशोरस ते. ९७
[10]नवं मोत्यांचे दाणेसे [11]डिंभं गमावले, न ते हानी
लघु वाडव सुतशोकीं दे गाळी, [12]यादवात्यनय मानी. ९८
[13]नर मोटा [14]पणभर घे, '[15]गवते यादव ' म्हणे, '[16]शिवा [17]दशमीं
स्पष्ट तव सुतीं देउनि संपादिन वाडवोत्तमा ! यश मीं. ९९
[18]अनळीं [19]मोघपण भासित होइन; गणिती न वपुसि, जे कवि, ते.
वासवि सुज्ञ वदे, करि बाणालय, [20]अबळ [21]ज्या [22]पवनसविते. १००

---

१. ' मला शिवूं नको ' हें भृगुवचन ऐकून क्रुद्ध झालेल्या शंकरास २. पार्वतीनें शांत केलें; परंतु, सत्त्वगुणनिधि ३. विष्णूच्या उरांत मारलेली भृगूची लाथ त्यानें मात्र सहन करून तो विनम्र च राहिला. याप्रमाणें परीक्षेंत विष्णु श्रेष्ठ ठरला. ४. या कृत्यामुळें विष्णूच्या गदेला हा पराभवाचा पहिला च प्रसंग आला. ५. मुक्ति देणाऱ्यांत श्रेष्ठ विष्णु. ६. मूळ पाठ–**शिवालय.** ७. ब्राह्मणाची. ८. सरस्वती–**पंत**. ९. ब्राह्मण. १०. नऊ. ११. बालक. १२. यादवकृत मोठा अपराध. ( द. स्कं. उ. अ. ८९. ) १३. अर्जुन. १४. प्रतिज्ञेचें ओझें. १५. कमकुवत ( गवतासारखे ). १६. कल्याणास. १७. दहाव्या ( सुती ). १८. अग्नींत. १९. निष्फळ झाला आहे पण ज्याचा. २०. असमर्थ. २१. ज्यापुढें. २२. वायु व सूर्य.

तरि[1] न उरे शिशु, मोहे भगवत्सख, तेधवां धवल[2]वाहा
कृष्ण म्हणे, "ये द्विजसुत देतों बा! काय तूं म्हणसि 'हा! हा!'?" १०१
नर परमोदार रथीं घे, भगवान् द्रुत निघे प्रवरतेजा;
वातसुगति देश क्रमि बा! शिवले काय न रविकर ते[3] ज्या. १०२
दावी परमघनतमोहर भगवत्प्रहित चक्रतेज पथा
वासवसुतसह देशीं ने वारिजनयन अ[4]द्भुता स्वरथा. १०३
शेषशयन, परमोत्तम भ[5]क्तस्वरगम, अनादि, वरतेजा,
बापा सुतसे, देखति वासवियदुराय बद्धकर ते ज्या. १०४
अ[6]ज्ञानतमोघ्न म्हणे, 'भर जगतीचा हरा, वधुनि पर ते,
द्रुत या; न्या वाडवसुत; मज देवा प्रिय सदा पदा स्मरते. १०५
नमुनि घना मोर तसे भ[7]गवत्प्रेरित फिरोनि नरहरि ते
येती वाहुनि दश सुत; देति तया, नवनवाभ्युदय करिते. १०६
संतत नव परमोत्सव भरले नगरींत वसति ते करिती.
वाद्यें सुस्वर गीतें, देवालय[8]गर्व सर्व ही हरिती. १०७
वं[9]नद प्रभुवर, मोर चि भक्तगण, वं[10]दान्यतेसि पार नसे,
वाखाणिति सुखदेश्वरवार्ता कविराय ही अशेष कसे? १०८

[ उपसंहार ]

मंत्रमय रचुनि भावें भागवत, नमूनि देवदेवा, हे
तुलसी च रामनंदन, 'सेवा ऐसी च दे' वदे, वाहे. १०९

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीमंत्रमयभागवतं संपूर्णम्।

श्रीकृष्णार्पितमस्तु ।

---

१. ब्राह्मणाच्या पुत्राच्या संरक्षणार्थ बाळंतगृहाभोंवतीं बाणालय केलें तरी. २. अर्जुनास. ३. ज्या काय ते रविकर न शिवले तो देश-**पंत**. ४. अद्भुता देशा-**पंत**. ५. भक्तांचा कल्पवृक्ष. ६. अज्ञानांधकाराचा नायनाट करणारा विष्णु. ७. भगवंतानें-शेषशायी पुरुषोत्तमानें-पाठविलेलें. ८. स्वर्गाचा गर्व. ९. मेघ. १०. दातृत्वास.

कै. अनंत वा. परांजपे
यांचे स्मरणार्थ
कुटुंबीयांकडून भेट

REFBK-0022452

# मंत्रभागवत

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ-पंक्ति. | शुद्ध. |
|---|---|
| २। २ | गणपति; तद्दांस |
| २। ३ | वर्ण्यव्रतें, वरशील कुमार शमविभेव वशिपति |
| २। ४ | तेत्तीस |
| २। ५ | वाळर्क रम्यपादराजीवा जडत्व |
| २। ६ | आत्मवसु |
| २। ७ | प्राचेतसादि |
| ३। ५ | गुरुसि भावें |
| ३। ९ | गरुडध्वजांश |
| ३।२१ | नैमिषारण्य |
| ४।११ | परीक्षिन्नृपरत्नांचें |
| ७।१२ | जातककोविद |
| ७।२४ | कुवेरासारखा |
| ८।२४ | मुक्ति, श्रीकृष्णाचे |
| १०। ५ | 'आ' ला |
| १०। ९ | भवानें.' |
| १४।२० | मरणान्याचें |
| १८।१७ | मन साधाया |
| २०। ७ | जावूं |
| २३।१५ | बुध तया 'बुद्ध' |
| २५।२६ | ( हेतुसाध्ययोर्व्याप्तिरन्वयः ) ( तदभावयोर्हेत्वभावसाध्याभावयोर्व्याप्तिः ) |
| २६।१४ | मोदांश्रुमद्गकर्ता |
| २६।२१ | वासवी |
| २८। २ | तमा |
| २८।१० | योगी |
| ३०।१४ | धन्या |
| ३०।१५ | देवश्रेष्ठासि |
| ३३। ४ | पदाति, |
| ५०।१९ | ११६ |
| ५४।१७ | निजदृष्टिसुधावृष्टीनें |
| ५६।१४ | श्रीहरिभक्ति |
| ५८।११ | मेरु |
| ५८।२३ | खंडाधिपति |
| ६०।२२ | निशीथांत |
| ६७।१० | राज्या ! |
| ६९।२३ | मोरोपंत |
| ७०।२८ | अचेतनाकडे |
| ७२। ५ | सुमुनिशुक्तीर्हा |

| पृष्ठ-पंक्ति. | शुद्ध. |
| --- | --- |
| ७२।२३ | अचेतन |
| ७५। ३ | केला |
| ७५। ६ | सांगें |
| ८३। ७ | लोकेश[३] |
| ८५।२४ | ब्रह्मदेवाला |
| ८८। ६ | हो गानें. |
| ८९।२० | हेतु[१०] |
| ९१। ७ | ज्ञानदृष्टि |
| ९१।१४ | ०कोटितडित्पद्मार्बु० |
| ९२। ७ | दे त्या |
| ९२।२० | दानकोविदा |
| ९९।२१ | स्वाभिध |
| ११२।१५ | मुनिवर, पुत्र |
| १२०।१९ | सौभरि |
| १२१।१२ | अमेध्यें |
| १२७।२५ | तिर्थी[१२] |
| १४४।१२ | ३५२ |
| १५९।१० | चि, अहो! |
| १६२।१५ | जरि |
| १६३। ७ | वत्सान्मुंच० |
| १६३।१० | फार |
| १६४। ६ | करी तों |
| १६५।१३ | आंतुनि |
| १७७। ८ | हांसति |
| १८९। ४ | नुघडितां[१४] |
| १९३।२६ | नवीन |
| १९७।१४ | श्यामल०[६] |
| २०६। ६ | दानपाति |
| २२०।२३ | प्रियविरहदुःख |
| २२०।२४ | पितृसचिवसुता |
| २२२।११ | श्रीहर हरिला; |
| २३९।१८ | तेथें |
| २६०।२२ | सर्वदेवकेकीला.'[१०] |
| २७४। ९ | सर्वांपरिस |
| २७४।१४ | या वरी |
| २७६। २ | कथनाचें |
| २७९।२२ | आवरितो; |
| २९३। ६ | देवनृतिर्यग्जन्में |
| २९५।२४ | जें |
| २९५।२५ | धुरीणाला. |
| २९८। २ | अशुचि |
| ३१२। ८ | न्यायें |
| ३१३।२३ | वह्नि |